र.ना.पंडित, बी.ए.

वर्षाची आगाऊ वर्गणी १४३ ट. खर्चासह.

केरळकोकिळ.

पुस्तक १० वें.

सन १८९६.

विधिरेव विशेषगर्हणीयः करट त्वं रट कस्त्वपराधः ।
सहकारतरौ चकार यस्ते सहवासं सरलेन कोकिलेन ॥१॥

दत्तात्रय महादेव गुर्जर बुकसेलर अॅण्ड पब्लिशर
रामवाडी
मुंबई.

किंमत १॥ रुपया.

सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत.

मुंबईत,
जावजी दादाजी यांच्या "निर्णयसागर" छा० छा० प्रसिद्ध केलें.

केरळकोकिळ वर्ष १० वें:—अनुक्रमणिका.

१ चित्रें.

पृष्ठें.

कोळी. २६५
*दंतयुक्त व चतुष्पाद पक्षी. ... २४१
प्रुशिआची उदार राणी लुइसा. ... २५
बीव्हर. १४५
मिक्याडो अथवा जपानचे बादशहा. १६९
रंग बदलणारा सरडा. ४९
लांब पुच्छाचा पक्षी. १२१
*षट्पद धेनु अथवा सहा पायांची गाय. ५
समुद्रलेखनी—महासागर. ... २१७
सील—महासागर. ७३
सौभाग्यवती रखमाबाई केळोकर लेडी सुपरिंटेन्डेंट, कोल्हापूर ... १९३
स्पंज—महासागर. ९७

२ अनेक विषय.

अमेरिकेंतील भयंकर अनर्थ. ... ६१
आर्यौषधींचा कारखाना—पनवेल येथील... ... ... ८३,१०२
तपेल्यांतलें डोकें... ... ... ५६
दुसऱ्याचें घेऊन मजा पाहूं नये, देऊन पहावी. २३४
नरदेहाविषयीं थोर लोकांचें ह्मणणें. २२८
पूर्वजांचा अभिमान. २३०
सूर्याच्या उष्णतेची परमावधि. ... २४६
स्थलनिर्देश—लंका अथवा सिंहल-द्वीप (पु० ९ अं. ८ पान १७८ पासून पुढें चालू) ३२
स्वयंभू 'सटिंफिकिटें.' ५९

३ कविता.

केरळकोकिळपरीक्षण रा. व्य. य. शिंगवाळकृत ४७
प्रतिसांवत्सरिक परमेश्वरप्रार्थना. १०
श्रीशिवछत्रपतिः—
१ जयंती. ८०
२ बाललीला... ... ... १२४
३ तेजस्विता... ... ... १५३
स्वदेशवसनग्रहण... ... ... ५३

४ लोकोत्तरचमत्कार.

थिओट्रोग्राफ, अथवा पदार्थांच्या हालचालीप्रमाणें हुबेहुब चलन-वलन करणारीं चित्रें... ... २२०
दीर्घायुषी मंडळी... ... ... २४९
लांकडाच्या तुळईतून अभिषेक—पत्रव्यवहार. १६२
सवाई राक्षस. १७७

५ पुस्तकपरीक्षा.

इंग्लंद देशाचा विस्तार—रा. रा. गोविंद सखाराम सरदेसाई, बी० ए.... ... ...४१,६७,९२

* अशी खूण ज्यांपुढें आहे ते "लोकोत्तरचमत्कार."

पृष्ठें.

इंदूर संस्थान भाग १ ला—विक्षिप्तकार... ... ... १८

कै० प्रि० गोपाळ गणेश आगरकर ह्यांचें चरित्र—रा. रा. जगन्नाथ धोंडू भांगले. ... २०

निर्मलानाटक—रा. रा. विष्णु सदाशिव फाटक, शहापूरकर. २३६

बुद्धिबळांचा खेळ—रा. रा. मंगेश रामकृष्ण तेलंग. १२७

मातृभक्ति—वे० रा. रा. आप्पाशास्त्री राशिवडेकर. ९६

विचारसौंदर्य—रा. रा. वासुदेव गोविंद आपटे, बी. ए. ... १२६

श्रीमद्भागवतार्थदर्शन—रा. रा. गणेश महादेव जानोरीकर. ... २१

श्रीरामचरित्र—रा. रा. गोविंद विष्णु फडके.... ... ... १८

समाधान—दत्त आणि दास मंडळी. २०

सौ० डा० आनंदीबाईचें चरित्र. (पु० ६ अं० ५ वरून पुढें चालू.)... ... ... १८६,२३८

पृष्ठें.

स्त्रियांचीं कर्तव्यें—रा. रा. नारायण भास्कर पंडित, बी. ए. आणि रा. रा. बाबण बापू कोरगांवकर. १५६

संगीतसावित्रीनाटक—रा. रा. सोकर बापुजी त्रिलोकेकर. ... १२९

६ स्फुट विषय.

मलबारवर्णन—तुलापुरुषदान. ... १२

वाचा, विचार करा आणि प्रयत्नास लागा; धनुर्धारी यांजकडून.... ... ... १३४,१६६

विद्युन्मानशास्त्र—व्याख्यान अकरावें. २५२,२७६

७ किरकोळ.

कूटप्रश्न. ३२

पत्रव्यवहार—वाढदिवसाची भेट-कविता. २२

पत्रव्यवहार. ३७, ६४, १३३, १६३, १८२ १८३, १८४

सिंहावलोकन

अथवा

सन १८९६ सालांत घडलेल्या ठळक ठळक गोष्टींचा गोषवारा.

ता० १० जानेवारी १८९६.—**इराणांत** एकव्या अक्षरबैजन प्रांतांत अति भयंकर **भूकंप** होऊन सुमारें १२०० माणसें प्राणास मुकलीं, आणि एक हजारावर घरें जमीनदोस्त झालीं!

ता० १३ जानेवारी १८९६.—**मुंबईत** तिव्होली नाटकगृहांत **दिवाणबहादूर मणिभाई जसभाई** यांच्या अध्यक्षतेखालीं संक्रांतिनिमित्त **आर्यमित्रमेळा** जमला होता. आर्यमित्रमेळ्यास एक नूतन पालवी फुटली ह्मणावयाची!

ता० ८ मार्च १८९६.—**सुरतेस** मोठी **आग** लागून सुमारें पाऊणशें घरें जळालीं व सात मनुष्यें अग्नीच्या भक्ष्यस्थानीं पडलीं. प्रत्येक वर्षी **सुरतेस** कांहींना कांहीं तरी अपघात होतोच! जलप्रलय किंवा अग्निप्रकोप हा ठेवलेलाच!

ता० ३, ४ व ५ एप्रिल १८९६.—**पहिली सनातन भारतधर्ममहापरिषद्.**—आर्यधर्माची दिवसेंदिवस पायमल्ली होत चालली आहे, तर त्यास उन्नतावस्था येऊन आपण आपापल्या धर्माप्रमाणें आचरण करावें, हा ह्या परिषदेचा मूळ हेतु आहे. ह्या सभेस **सागर, श्रीनाथद्वार, नाशिक, बडोदें, सुरत, धुळें, सातारा** इत्यादि ठिकाणांहून सुमारें १७५ प्रतिनिधि आले होते. **श्री देवकीनंदनाचार्य** यांची अध्यक्षस्थानीं योजना झाली होती. **श्रीमत् शंकराचार्य, श्रीगट्टुलाल महाराज, महामहोपाध्याय राजारामशास्त्री बोडस, शेट लखमीदास खिमजी, दिवाणबहादूर मणिभाई जसभाई, डॉ० कुंटे, डॉ० देशमुख, डॉ० भाटवडेकर, डॉ० काणे,** ह० भ० प० रा. रा. **नारायणबुवा घमंडे,** रा. रा. **शिवरामपंत साधले,** रा. रा. **भास्करराव बाळकृष्ण पितळे,** रा. रा. **बळवंत खंडूजी पारख,** (नाशिककर) रा. रा. **नानाभाई सदानंदजी काळे,** रा. रा. **शंकरशास्त्री पदे** इत्यादि मंडळी परिषदेची पुरस्कर्ती असून त्यांचें तीस पाठबळ आहे.

ता० १६ एप्रिल १८९६.—**रायगडा**वर **महाडकर** मंडळीच्या परिश्रमानें **श्री-शिवछत्रपती महाराजां**च्या जन्मदिवसाचा महोत्सव फार वर्णनीय झाला. हा महोत्सव इलाख्यांतील मुंबई, पुणें, कोल्हापूर, येवलें, रत्नागिरी, बडोदें, चिंचवड, शिरोळ, बार्शीसारख्या शहरांतूनही करण्यांत आला.

ता० ३० एप्रिल १८९६.—मुंबईत रात्रौ ११॥ राच्या सुमारास **भूकंपा**चा थोडासा धक्का बसला. तो सर्वत्र शहरभर कमीअधिक प्रमाणानें भासला. नुकसान झालें नाहीं, ही ईश्वराची मोठी कृपा होय!! कारण, मुंबईकरांना अशा प्रकारचा प्रळय ह्मणजे केवळ कल्पांताप्रमाणें होय!!!

ता० २ मे १८९६.—सिंधप्रांतांत **कराची** येथें **नववी प्रांतिक सभा** भरली होती. अध्यक्षस्थानीं मुंबईतील सुप्रसिद्ध, लोकप्रिय व विद्वान् वकील मि० **नारायण गणेश चंदावरकर**, बी० ए०, एल्० एल्० बी०, हे होते. त्या प्रसंगीं बऱ्याच उपयुक्त गोष्टींचा विचार करण्यांत आला. दहावी प्रांतिक सभा **साताऱ्यास** भरण्याचें ठरविलें.

ता० १७ जुलई १८९६.—**आफ्रिकेंत सौडन**च्या खारींत गेलेल्या हिंदुस्थानच्या काळ्या सैन्याचा सर्व खर्च हिंदुस्थानच्या माथीं सरकारानें लादला. याबद्दल आमच्या लोकांनीं पुष्कळ शंखध्वनि केला, परंतु उपयोग झाला नाहीं. सरकार बांधिल तें धोरण व करील ती पूर्वदिशा, अशी हल्लीं स्थिति आहे.

ता० २७ आगष्ट १८९६.—**कॉन्स्टॅन्टिनोपल** येथें ४० **आर्मिनियन** बंडवाल्यांनीं **आटोमन ब्यांके**वर हल्ला करून पहारेकऱ्यांस ठार मारलें व ब्यांक आपले ताब्यांत घेतली. परंतु पुढें मुसलमान लोकांनीं उलट खाऊन १००० **आर्मिनियन** लोकांची कत्तल उडविली. जणूं ढेंकूण चिलटेंच!!

ता० आगष्ट १८९६.—**आफ्रिकेंत**ील **झांझिबार**चा सुलतान व इंग्रज सरकार यांच्यांत कांहीं लढा पडून सुलतानानें ब्रिटिश सरकारच्या ह्मणण्याकडे लक्ष दिलें नाहीं, ह्मणून सुलतानाच्या राजवाड्यावर तोफांचा भडिमार करून तो जमीनदोस्त केला. पुढें ब्रि० सरकारनें माजी सुलतानाच्या चुलतभावास गादीवर बसविलें. व जुन्या पद्धतीप्रमाणें कारभार चालविण्याचें ठरविलें.

ता० ३ सप्तेंबर १८९६.—**जपान** बेटाच्या ईशान्येस व **टोकिओ** आखाताच्या उत्तर किनाऱ्यावर मोठा **भूकंप** होऊन **रोकुगो** शहर तर साफ जमीनदोस्त झालें, व कित्येक इतर शहरांची राखरांगोळी झाली. ह्या अनर्थपातामुळें सुमारें २७००० माणसें मृत्युमुखीं पडलीं, व २५००० माणसें जखमी झालीं, आणि ८००० घरें पडलीं व वाहून गेलीं. हा परमेश्वराचा महाकोप होय!!!

ता० ३० सप्तेंबर व ता० १ व २ आक्टोबर १८९६.—**पुणें** मुक्कामीं मि० **करक्याम** यांच्या अध्यक्षतेखालीं मुंबईइलाख्यांतील मध्यप्रांताची **शिक्षणपरि-**

षद् भरली होती. ह्या प्रसंगीं हल्लींच्या शिक्षणपद्धतींत काय काय फेरफार करावे वगैरेबद्दल बऱ्याच विद्वान् मंडळींत भवति न भवति झाली.

ता० १६ आक्टोबर १८९६.—**मुंबईस** एस्प्लनेड रस्त्यावरील **महाराणी व्हिक्टोरिया** ह्यांच्या संगमरवरी दगडाच्या पुतळ्यावर कोणी डांबर ओतलें आणि गळ्यांत अनेक तऱ्हेच्या चर्मपादुकांची माळ घातली होती. सदरहू पुतळ्याची एवढी प्राणप्रतिष्ठा करण्याचें धाडस करणारा मनुष्य खरोखर उलट्या काळजाचा असला पाहिजे! फारच दुःखाची व लाजिरवाणी गोष्ट होय!!

ता० २८ नोव्हेंबर १८९६.—ना० **व्हाईसराय** साहेबांस **बडोद्यांत** दारूकाम दाखविण्यास जमलेल्या गर्दीत एकीकडे ३०-३५ माणसें चेंगरून मेलीं व पुष्कळ जणांस अतिशय इजा झाली; व दुसरीकडे **व्हाईसराय** साहेबांची चैन चाललीच होती व त्यांचें आदरातिथ्य यथास्थित चाललें होतें!!

ता० २८, २९ व ३० डिसेंबर १८९६.—**बारावी राष्ट्रीय सभा.**—ही सभा **कलकत्ता** येथें भरली होती. **मुंबईतील** प्रसिद्ध ब्यारिष्टर व पुढाऱ्यांपैकीं एक मुसलमान जातीचे **नामदार रहिमतुल्ला महमद सयानी,** एम्. ए., एल्. एल्. बी. हे अध्यक्षस्थानीं होते. वार्षिक पर्वणीप्रमाणें ह्याही वर्षी सभेत अनेक उपयुक्त विषयांचा खल झाला. ही सभा भरण्यापूर्वी **पुण्या**प्रमाणें **कलकत्त्यांत**ही सुधारकदुर्धारकांची कांहीं वेळ लढालढी लागली होती. परंतु ती **नामदार सुरेंद्रनाथ बानर्जी** यांनीं युक्तीनें मिटविली. अध्यक्ष **ना० सयानी** यांनीं 'मुसलमान लोक राष्ट्रीय सभेस अनुकूल नाहींत, हा समज चुकीचा आहे' असें सर्वांच्या प्रत्ययास आणून दिलें. **तेरावी राष्ट्रीय सभा उमरावती ?** मुक्कामीं भरण्याचें ठरलें.

सन १८९६ सालांत हरपलेलीं नररत्नें!!!

ता० २ जानेवारी १८९६.—**रावराजे दिनकरराव राजवाडे.**—हे शिंद्याचे दिवाण होते. त्यांनीं १८५७ सालांतल्या **शिपायां**च्या **बंडा**च्या प्रसंगीं इंग्रजसरकारची बाजू राखली, आणि त्यामुळें शिंदेसरकारची गादी सलामत राहिली. इंग्रजसरकारनें त्यांस कायदेकौन्सिलचे कौन्सिलर नेमलें. पुढें ह्यांस प्रसिद्ध **बर्डेदिं-कमिशन**मध्यें कमिशनर नेमलें होतें. इंग्रजसरकारनें त्यांचा इमानीपणा, इब्रत वगैरे जाणून त्यांस बड्या **दिल्ली दरबार**च्या वेळीं "**राजा**" ही बहुमानाची पदवी वंशपरंपरेनें दिली. मरणसमयीं त्यांचें वय ७७ वर्षांचें होतें.

ता० १३ जानेवारी १८९६.—**रावसाहेब महादेव बल्लाळ नामजोशी.**—गेल्या पंधरासोळा वर्षांत **न्यू इंग्लिश स्कूल, केसरी, आर्यभूषण छापखाना, फर्ग्युसन कॉलेज** इत्यादि एतद्देशीय लोकांनीं उत्तम रीतीनें ज्या संस्था चालविल्या आहेत, त्यांच्या मूळ उत्पादकांपैकीं हे एक होते. हे देशी कारागिरीचे मोठे पुर-

स्कतें होते. ह्यांनीं "शिल्पकलाविज्ञान" नांवाचें मासिकपुस्तक, व "इंडस्ट्रियल रिव्ह्यू" नांवाचें त्रैमासिक, तांव्यापितळेचा कारखाना वगैरे चालविलीं होतीं. ह्यांनीं महाराष्ट्र भाषेचा एक प्रचंड कोश तयार करण्याचें काम सुरू केलें होतें; पण आमच्या कमनशिबानें त्यांची हयातच खुंटली!!

ता० २९ जानेवारी १८९६.—सर श्री तख्तसिंगजी जशवंतसिंगजी महाराज, जी०, सी. एस्. आय.—हे भावनगरचे ठाकूरसाहेब होते. अलीकडे ज्या एतद्देशीय संस्थानिकांनीं विद्येंत पारंगतता व राज्यकारभारांत धुरीणत्व संपादन करून आपल्या प्रजाजनांचें अखंड कल्याण करण्यांत ज्यांचे निरंतर परिश्रम चालले आहेत, अशांपैकींच प्रमुखांत वरील महाराजांची गणना आहे. अशीं हातातोंडास आलेलीं नररत्नें आह्मांस मुकावीं, हें देशाचें महत् दुर्भाग्य होय! ह्याच महाराजांच्या पदरीं कै० दिवाणबहादुर गौरीशंकर उदयशंकर अशासारखीं राज्यकलाकुशल व शहाणीं माणसें होतीं.

ता० फेब्रुआरी १८९६.—रावबहादुर व्यंकटराव रुक्मांगद इनामदार, बी० ए०, एल्० एल्० बी०.—हे असिस्टंट जज होते; हे विद्वान्, कुलीन, व मनमिळाऊ असून निष्पक्षपातीपणाबद्दल यांची मोठी ख्याती होती. ह्यांस पक्षघाताचा विकार होऊन त्यांतच त्यांचें देहावसान झालें. मरणसमयीं त्यांचें वय अवघें ४२ वर्षांचें होतें.

ता० ५ मार्च १८९६.—रावबहादुर हरि रावजी चिपळुणकर.—हे पुणें मुक्कामीं मोठे सधन, हुशार, स्वकर्तव्यतत्पर व लोकोपकारी गृहस्थ होते. पुण्यांतील बहुतेक सार्वजनिक व लोकोपयोगी कामांत ह्यांचा हात असे. ह्यांनीं अनेक गरीब लोकांस मनोभावें मदत करून आणि धंदेशिक्षणास उत्तेजन देऊन आपल्या पैशाचा उत्तम रीतीनें विनियोग केला.

ता० मार्च १८९६.—रावबहादुर निळकंठ जनार्दन कीर्तने.—हे देवास संस्थानचे दिवाण होते. इतिहास हा त्यांचा मोठा आवडीचा विषय होता. ह्यांनींच प्रसिद्ध इतिहासकार ग्रँड डफ् ह्यांच्या इतिहासावर खरमरीत टीका करून त्यांतील पुष्कळ चुका लोकांच्या नजरेस आणल्या. हे पुणें प्रांतीं बहुतेक सार्वजनिक कामांत पुढाकार घेत असत.

ता० ३० मार्च १८९६.—सरदार राव नाना मोरोबा.—हे अगदीं लहान असतांच ह्यांचे तीर्थरूप वारले. ह्यांनीं स्वतः चांगली विद्या संपादन करून हे नांवालौकिकास आले. प्रसिद्ध १८५७ सालच्या शिपायांच्या बंडाच्या प्रसंगीं हे इंग्रजसरकाराकडे असून त्यांनीं सरकारची इमानेइतबारें नोकरी बजाविली. हे गोरगरिबांस स्वतःच्या खर्चानें औषधपाणी देत असत. हे पापभीरु, सत्यनिष्ठ, मनमि-

लाऊ, परोपकारी व मोठे दृढनिश्चयी होते. ह्यांनीं पेन्शनचा वरींच वर्षे उपभोग घेतला. मरणसमयीं ह्यांचें वय ७२ वर्षांचें होतें.

ता० मे १८९६.—**रावसाहेब कृष्णाजी परशराम गाडगीळ.**—हे प्रथम **पुणें** हायस्कुलांत शिक्षक होते. पुढें ह्यांनीं कायद्याचा अभ्यास करून कांहीं दिवस वकिली केली, व पुढें मुनसफ झाले. पण कांहीं काळानें शरीरअस्वास्थ्यामुळें ह्यांस आपल्या नोकरीचा राजीनामा द्यावा लागला. हे मोठे विद्याव्यसनी, स्वातंत्र्यप्रिय व उद्योगी असून उत्तम मराठी लेखक होते. ह्यांनीं थोडे दिवसांवर **सर जॉन लबक** या इंग्लंडांतील नामांकित ग्रंथकर्त्याच्या **'प्लेझर्स ऑफ् लाईफ'** ह्या लोकमान्य ग्रंथाचें मराठींत भाषांतर केलें आहे, त्याचें नांव **'संसारसुख.'** ह्यांनीं मरणापूर्वी संन्यासग्रहण केलें होतें.

ता० २० मे १८९६.—**रावसाहेब दामोदर गणेश केळकर, एम्० ए०,**—हे **रत्नागिरी** हायस्कुलचे हेडमास्तर होते. शास्त्रीय व गणितविषय हे त्यांचे मोठे प्यारे असून त्यांत त्यांचा मोठा हातखंडा होता. विषय कितीही गहन असला, तरी तो विद्यार्थ्यांच्या मनांत उत्तमरीतीनें ठसविण्याची कला त्यांस चांगली साधली होती. हे अल्पवयांतच ह्मणजे आपल्या वयाच्या ४३ व्या वर्षी मरण पावले.

ता० मे १८९६.—**सरदार दिलरजंग बहादुर** ऊर्फ **अबदुल हक्क, सी० आय० ई.**—हे प्रथम अगदीं गरीब स्थितींत होते. पण पुढें ह्यांचा भाग्योदय झाला. हे हळु हळु निजामसरकारचे स्टेट सेक्रेटरी झाले. परंतु पुढें लांचाच्या आरोपावरून ह्यांस कामावरून दूर केलें. मुंबई हायकोर्टात फिर्यादही झाली. अखेरीस उभयतांचा समेट झाला. हे इंग्लंडांत जात असतां मृत्यु पावले.

ता० २ जून १८९६.—**रावबहादुर नारायणस्वामी नायडू.**—हे **नागपुरचे** सुप्रसिद्ध व लोकप्रिय वकील होते. **गोरक्षण** व **राष्ट्रीय परिषद** ह्या दोन्ही संस्थांस ते जीव कीं प्राण करीत. मध्यप्रांतांतला राष्ट्रीयसभेचा एक मोठा वाली नाहींसा झाला.

ता० २७ जून १८९६.—**रावसाहेब गंगाधर नरसिंह** ऊर्फ **बापूसाहेब केतकर.**—हे **नाशिक**चे प्रसिद्ध वकील होते. अवघ्या **नाशिक** जिल्ह्यांत **बापूसाहेबां**सारखा खटपटी व सार्वजनिक कामांत पुढाकार घेणारा मनुष्य क्वचितच सांपडेल. दुसऱ्यांवर उपकार करणें हें तर त्यांचें व्रीदच होतें. हे निःसीम काँग्रेसभक्त होते. **नाशिक**चे त्यांचें स्मारक ह्मणून **टाऊनहॉल** बांधण्याचा विचार झाला आहे.

ता० १० जुलै १८९६.—**प्रो० मौलाबक्ष.**—हे **बडोदें** येथें प्रसिद्ध गवई होते. साऱ्या मुंबई इलाख्यांत गायनकलेंत ह्यांचा हात धरणारा क्वचितच गवई सांपडेल. साऱ्या मुंबईइलाख्याचें गायनकलेचें नाक गेलें ह्मणावयाचें !!

ता० १५ जुलै १८९६.—**डॉ० अण्णा मोरेश्वर कुंटे, एम्० डी०.—हे** हिंदुस्थानांतले **पहिले एम्० डी०** होते. लहानपणींच त्यांचे तीर्थरूप निवर्तल्यामुळें त्यांनीं उत्कृष्ट रीतीनें विद्यार्जन करून हे स्वपराक्रमानें मोठ्या नांवालौकिकास चढले. डाक्टरी विद्येंत वियमान डॉक्टर लोकांत त्यांचा हात धरणारा एकही नव्हता. इतकेंच नव्हे, तर मोठ्या मोठ्या मी मी म्हणविणाऱ्या इंग्रजी डॉक्टरांना देखील त्यांनीं कधीं कधीं खालीं पाहाण्यास लावावें! ही काय थोडी ऐपत होय!! यांनीं 'आगकाड्या,' 'साबण,' 'कपड्यांस पक्का रंग देणें,' 'फोटोग्राफी' इत्यादि सुमारें एकोणीस बीस धंदे अगदीं आपलेसे केले होते. हे मोठे विद्याव्यसनी होते. त्यांनीं **'वाग्भट,' 'स्त्रीरोगविज्ञान,' 'अमृतानुभव,' 'ज्ञानेश्वरी'** सारखीं उत्तम उत्तम ग्रंथरत्नें सुलभ केलीं. त्यांस शेवटलीं कांहीं वर्षें महारोगाची व्याधि जडली होती, व शेवटीं मधुमेहाची भावना होऊन त्यांतच त्यांचा अंत झाला. त्यांच्याइतका उद्योगी, दृढनिश्चयी, दांडगा विद्वान् व आपल्या धंद्यांत अत्यंत प्रवीण पुरुष फारच विरळा. केवळ इहलोकीचा धन्वंतरि होय!!

ता० जुलई १८९६.—**शेट वरजिवनदास माधवदास.—हे मुंबईचे** कपोलवाणी ज्ञातींतील वयोवृद्ध, प्रख्यात व श्रीमंत व्यापारी होते. त्यांनीं आपल्या तीर्थरूपांच्या स्मरणार्थ एक सुंदर देवालय बांधून त्यांत श्रीलक्ष्मीनारायणाची संस्थापना केली आहे, तोच मुंबईतला प्रसिद्ध **'माधववाग'** होय.

ता० आगष्ट १८९६.—सरदार **मानाजीराव राघोजीराव आंग्रे.—हे अलिबाग**च्या प्रसिद्ध **आंग्रे** कुलांतील होते. हे तिकडे मुनिसिप्यालिटीचे चेअरमन व ऑनररी म्याजिस्ट्रेट होते. हे फार लोकप्रिय होते. त्यांस पुण्यास शीतज्वर येऊन तिकडेच अंत झाला. परंतु त्यांचें शव अलिबागेस नेऊन त्यास प्रेतसंस्कार केला.

ता० १८ आक्टोबर १८९६.—**बाबू मनमोहन घोस.**—त्यांनीं विलायतेस ब्यारिस्टरची परीक्षा दिली. विलायतेंत ब्यारिस्टर होऊन हिंदुस्थानांत काम करावयास आलेले हेच **पहिले** गृहस्थ होत. हे साऱ्या बंगालप्रांतांत उत्तम व नामांकित ब्यारिस्टर होऊन गेले. हे राष्ट्रीयसभेच्या पुरस्कर्त्यांत प्रमुख असून उत्कृष्ट वक्ते होते. त्यांच्या मरणामुळें राष्ट्रीयसभेचा केवळ एक पाय लंगडा पडला व राष्ट्राचीही महान् हानि झाली.

ता० १८ आक्टोबर १८९६.—**रा. रा. हरिश्चंद्र सदाशिवजी हाटे,** ए. एम्., आय. सी० ई०.—हे नेटिव्हांमध्यें उत्तमतऱ्हेचे इन्जिनिअर होते. **बोरघाट व थळघाट** यांच्यांत बोगर फोडून रेल्वेची सडक बांधण्याचे कामांत यांचा हात होता. हे जी० आय्० पी० रेल्वे कंपनींत **रेसिडेंट इन्जिनिअर**च्या जागेवर असून यांनीं रेल्वेची एकंदर ४४ वर्षें इमानेंइतबारें नोकरी बजाविली. हे कुलीन, विद्वान्, सहनशील, मनमिळाऊ व लोकप्रिय होते.

ता० २८ नोव्हेंबर १८९६.—**महामहोपाध्याय राजारामशास्त्री बोडस.**— हे मुंबईत **एल्फिन्स्टन कॉलेजां**त संस्कृत भाषेचे प्रोफेसर होते. अवध्या हिंदुस्थानांत आजकाल जे नांव घेण्यासारखे अति व्युत्पन्न शास्त्री होऊन गेले, त्यांपैकीं हे एक होते. त्यांचें वर्तन बालबोध असून स्वभाव अति थंड होता. त्यांच्या मरणामुळें विद्वान् शास्त्री मंडळींतील एक जागा रिकामी पडली.

संवत्सरमाहात्म्य १८९६.

(१) १८९६ च्या वर्षारंभास या इलाख्यांत प्रिन्सिपाल **वामन आबाजी मोडक** त्यांस '**सी० आय० ई०**' आणि **दीनबंधू**चे कर्ते रा० रा० **नारायण मेघाजी लोखंडे** त्यांस '**रावबहादूर**' ह्या बहुमानाच्या पदव्या मिळाल्या. (२) आफ्रिकेच्या अगदीं दक्षिणेस दच लोकांच्या ताब्यांतील **ट्रान्सव्हाल** प्रांतावर राज्यतृष्णेनें इंग्रजांच्या वतीनें डॉ. **जेम्सन** यांनीं स्वारी केली. परंतु **ट्रान्सव्हाल**चे प्रेसिडेन्ट **क्रूगर** यांनीं डॉक्टर साहेबांचा पराभव करून त्यांस कैद केलें. ह्या **ट्रान्सव्हाल** प्रकरणानें साऱ्या यूरोपखंडभर कांहीं वेळ बरीच चळवळ उडवून दिली. 'बुभुक्षितः किं नरोति पापम्'!! (३) **झालवार**चे महाराज **ज्यालीमसिंगजी** यांजवर राज्यद्रोहाचा खोटा आरोप ठेवून नवीन आलेल्या क्यापटन् **गार्डन** या अननुभविक पोलिटिकल एजंटाच्या शिफारसीवरून हिंदुस्थान सरकारानें कांहीं चवकशी न करितां त्यांस अन्यायानें पदच्युत केलें. व दरसाल एक लाख रुपयांच्या बिदागीवर त्यांची बोळवण केली. ह्या गोष्टीचा खुद्द पार्लमेंटपर्यंत गवगवा झाला, परंतु त्याची दाद घेतो कोण! आशाळभूत भुतें काय करतील याचा नेम नाहीं! (४) ना० **फेरोजशा मेथा** यांनीं प्रकृतीच्या नादुरुस्तीच्या सबबीवर **व्हॉइसराय**च्या सुप्रिम कौन्सिलमधील आपल्या जागेचा राजीनामा दिला. हिंदुस्थानसरकारचे फडणीस ना० **सर जेम्स वेस्टलन्ड** त्यांजबरोबर ना० **मेथा** त्यांची सुप्रिम कौन्सिलमध्यें उडालेली खडाजंगी ना०**मेथा** यांस राजीनामा देण्यास कारणीभूत झाली, असा बहुतेकांचा तर्क आहे. ना० **मेथा** यांच्या जागीं ऑ० मि० **सयानी** या विद्वन्मणीची योजना झाली. हें योग्यच झालें. (५) स्टेटसेक्रेटरी त्यांनीं म्यांचेस्टर येथील गिरणीवाल्यांच्या नफ्याकडेच केवळ लक्ष देऊन २० नंबरावरील सुतावर जकात ठेवल्यामुळें हिंदुस्थानांतील बहुतेक मोठमोठ्या शहरांत प्रचंड सभा होऊन इंग्रजी व्यापाऱ्यांची खोड मोडण्याकरितां पुष्कळ लोकांनीं देशी कापड वापरण्याचा निश्चय केला. (६) पाटणाप्रांताच्या नजीक **बोलंगीर** येथील **रामचंद्र सिंहदेव** या तरुण महाराजांनीं पोलिटिकल एजंटाच्या सासुरवासास त्रासून निरुपायानें अखेरीस प्रथम आपल्या राणीस गोळी घालून मग आपण स्वतःस गोळी घालून घेऊन आत्महत्या करून घेतली. एतद्देशीय राजेरजवाडे हे पोलिटिकल एजंटाच्या 'ता-

टाखालील मांजरें होत,' असें आमच्या इंग्रजबाहद्दरांस वाटतें! काय करावें!! बखत पडे ऐसा बाका, तो गधेकु कहेना काका" ह्या म्हणीकडे लक्ष देऊन तूर्त मूग गिळून स्वस्थ बसावें म्हणजे झालें!!! (७) **चिंचली** येथील गुरांचें व धान्यांचे बडें प्रदर्शन झालें. वरील प्रदर्शनास ना० **गव्हर्नर साहेबांसारखी** व इतर बडी बडी युरोपियन मंडळी पाहुणचार घेण्यास आली, त्या प्रसंगीं हजारों रुपयांची राखरांगोळी उडत असेल, याबद्दल कोणासही संशय घेण्यास जागाच नाहीं. (८) **व्हाइसराय**साहेबांच्या मद्रासच्या मुशाफरींत तिकडील **महाजन सभे**नें देऊं केलेल्या **मानपत्रां**तून 'कांहीं कलमें गाळल्याशिवाय आह्मी याचा स्वीकार करणार नाहीं' असें **व्हाइसराय**साहेबांनीं कळविल्यावरून वरील **महाजनसभे**नें हट्टास पेटून मुळीं मानपत्रच दिलें नाहीं! **व्हाइसराय**साहेबांची चांगलीच खोड मोडली! (९) मुक्तिफौजेंतील **जनरल बूथ** या भटाचार्यानीं हिंदुस्थानांतील गरीब शेतकऱ्यांची सध्याची स्थिति सुधारण्याचा आव घालून त्यांस इतर ओसाड व निर्जन प्रदेशीं वसाहत करण्याकरितां मायबाप सरकाराजवळ रदबदली करण्याचा घाट घातला. (१०) दक्षिणमलबार प्रांतांत मिशनरी लोकांनीं कांहीं **मोप्ले** लोकांस बाटविल्यावरून त्यांनीं **बंड** केलें. या दंग्यांत शेंकडों मोप्ले मारले गेले. (११) **एलफिन्स्टन् कॉलेजां**तील प्रसिद्ध **महामहोपाध्याय वे. शा. सं.** रा० रा० **भीमाचार्य झळकीकर** ह्यांनीं आपले जागेचा राजीनामा दिला. नंतर सरकारानें ती जागा अजी कमीच केली. (१२) कोल्हापुरांतील प्रसिद्ध **कपिलतीर्थ** बुजवून त्या जागेवर एक सार्वजनिक बाग करण्याचा **छत्रपति महाराजां**नीं विचार केल्यावरून तें प्राचीन तीर्थ न बुजविण्याविषयीं **दि० ब० मणिभाई जसभाई, डॉ० देशमुख, डॉ० भालचंद्र** वगैरे प्रसिद्ध पुढाऱ्यांनीं महाराजसरकाराजवळ आपलें वजन खर्च केलें; व देशी वर्तमानपत्रकारांनींही त्या संबंधानें बरीच ओरड केली. तूर्त हें प्रकरण तसेंच भिजत पडलें आहे. (१३) **ना० श्रीनिवास राघव अयंगार बी० ए०, सी० आय० ई** ह्या मद्रासी विद्वान्, बहुश्रुत व अनुभविक गृहस्थास बडोद्याचे **श्रीसयाजीराव गायकवाड** यांनीं आपले दिवाण नेमलें. (१४) **इराण**च्या शहास एका धर्मवेड्यानें धर्माच्या चुरशीवरून गोळी घालून ठार केलें. त्यांचा वडील पुत्र राखेचा असल्यामुळें द्वितीय चिरंजिवास गादीवर बसविलें. (१५) मुंबई युनिव्हर्सिटीची वार्षिक पांचहजारांची शिलक राहिलेली **ग्र्यांट** सरकारनें अखेरीची काढून घेतली. (१६) कलकत्त्यास बकरीईदच्या दिवशीं हिंदुलोकांदेखत गोवधाच्या कारणावरून हिंदुमुसलमानांमध्यें **दंगा** झाला. तो शमविण्याकरितां बराकपुराहून तारेनें लष्करी लोक आणावे लागले. (१७) खोजे लोकांचे धर्मगुरु हिज हायनेस **आगाखान** यांचे चुलते **जंगीशहा** व त्यांचे पुत्र हे **मक्के**च्या यात्रेस गेले असतां **जेद्दा** येथें एका कृतघ्नानें त्यांचा खून केला.

ल्या उभयतां पितापुत्रांचीं प्रेतें **कराचीस** आणून त्यांस मूठमाती दिली. (१८) **मुंबईत** कांहीं दिवसपर्यंत **लिटल जॉर्जिया माग्नेट** ह्या अमेरिकन बाईनें आपल्या शारीरिक शक्तीचे अद्भुत प्रयोग लोकांस दाखवून त्यांस अगदीं थक्क करून सोडलें. एखाद्याच्या माथ्यावर हात ठेऊन त्यास सहज वर उचलणें, सात आठ माणसांस एकदम उचलणें, स्वतःस चार पांच जणांनीं ढकलिलें असतां आपल्या जाग्यावरून अणुमात्र ढळूं नये, अशासारखे प्रयोग मोठे चित्तवेधक व आश्चर्यकारक होत. (२०) 'ज्या विद्यार्थ्यांस एखाद्या विषयांत ४५ मार्क्स मिळालेले आहेत, व तो जर परीक्षेंत नापास झाला, तर त्याची त्याच विषयांत पुन्हा परीक्षा घेऊं नये,' अशाबद्दल न्यायमूर्ति **रानडे** यांनीं मुंबई युनिव्हर्सिटीच्या सेनेटपुढें सूचना आणली. ती सूचना २–३ परीक्षा शिवायकरून बहुमतांनीं पास झाली. हा विद्यार्थी वर्गावर मोठा अनुग्रहच केला ह्मणावयाचा. (२०) **पंजाबां**तील प्रसिद्ध विद्वद्वर्य **स्वामी विवेकानंद** यांनीं **अमेरिके**स जाऊन हिंदुधर्मपर व्याख्यानें देऊन 'हिंदुधर्म सर्वांत श्रेष्ठ आहे,' असें तिकडील लोकांच्या प्रत्ययास आणून दिलें व कित्येकांस तर संन्यासदीक्षा देऊन त्यांस आपले शिष्य बनविले. (२१) **भोपाळ**च्या **बेगमसाहेबां**नीं दुष्काळपीडित लोकांस अन्नाचा पुरवठा करण्याकरितां आपल्या खजिन्यांत पैशाची शिल्लक नव्हती तरी स्वतःच्या अंगावरचे दागिने विकून लोकांस मदत करून आपलें नेहमींचें नैसर्गिक औदार्य जगाच्या प्रत्ययास आणून दिलें. धन्य त्या माउलीची!! (२२) **स्वाकीन**च्या लढाईचा खर्च हिंदुस्थानावर अन्यायानें लादल्याबद्दलची नाखुषी दर्शित करण्याकरितां **मद्रासे**तील लोकांनीं तिकडील शेरिफास शहरवासी लोकांची सभा भरविण्यास केलेली विनंती अमान्य झाल्यावरून तिकडील लोकांनीं अखेर सभा भरविण्यास कमी केलें नाहीं! जशास तसें!! (२३) विजयानगरच्या महाराजानें **स्वाकिन**च्या मोहिमेच्या खर्चाकरितां इंग्रज सरकाराला **एक लाख** रुपये देऊं करून आपली माबाप सरकाराविषयीं स्वामिभक्ति व पोकळ उदारता प्रगट करण्याचें धाडस केलें. (२४) यंदाच्या सिव्हिलसर्व्हिस परीक्षेमध्यें हिंदुस्थानांतील तिघे गृहस्थ पसार झाले! त्यांपैकीं बंगाल्यांतील उमेदवार **बाबू अतुलचंद्र चतरजी** हे सर्वांत पहिले झाले. (२६) **सोलापुर**चे कलेक्टर **रा० ब० लक्ष्मणराव गोपाळ देशमुख, सी. एस.** त्यांची कांहीं कारण नसतां **कानडा** जिल्ह्यांत कमी अधिकारावर बदली केली; हा सरकारी कावा होय. **रा० ब० देशमुख** हे आपल्या जिल्ह्यांत दुष्काळासंबंधानें बरीच मेहनत करीत होते. ह्मणून सरकारानें त्यांची बदली तिकडून करूं नये ह्मणून **पंढरपूर**च्या लोकांनीं सरकारास तारही केली. ऐकतो कोण!! (२६) रा. **शंकर गणेश द्रविड** हे खोटा दस्तऐवज केल्याच्या आरोपावरून तुरुंगवास भोगीत असतांना त्यांतल्या त्यांत त्यांनीं दुसरा एक दस्तऐवज करून त्यांच्या बरोबर

तुरुंगवास भोगत असलेले दुसरे इसम यांची मोठ्या शिताफीनें सुटका केली ह्या आरोपावरून त्यांस आणखी दोन वर्षे सक्तमजुरीची शिक्षा दिली. ह्या केसीमध्यें अनेक काळ्यागोऱ्या गोष्टी उघडकीस आल्या. (२७) मुंबईतील **आर्मी ॲन्ड नेव्ही को ऑपरेटिव्ह सोसायटी** नामक प्रसिद्ध इंग्रजी व्यापाऱ्यांचें दुकान आंतील सर्व मालासुद्धां जळून खाक झालें. माल व इमला मिळून एकंदर सुमारें ११-१२ लाखांचें नुकसान झालें. दोहींचाही विमा उतरला असल्यामुळें मालकाचें नुकसान न होतां विमेवाले मात्र बुडाले!

सन १८९६-९७ सालचा भयंकर दुष्काळ.—गेल्या वीस वर्षांपाठीमागील ह्मणजे सन १८७६-७७ रांतल्या **दुष्काळा**नें हिंदुस्थानवासी लोकांची किती दुर्दशा उडविली होती, हें सर्वांस महशूर आहेच. तथापि यंदांच्या ह्मणजे १८९६-९७ च्या दुष्काळानें साऱ्या हिंदुस्थानभर जो काय हाहाःकार उडविला आहे, तो फार अवर्णनीय होय. सन १८९६ च्या बरसात सुरवातीलाच चोहोंकडे अतिशय पर्जन्यवृष्टि झाली. तेणेंकरून नद्यानाल्यांस महापूर येऊन कांहीं कांहीं ठिकाणचे गांवचे गांव वाहून जाऊन माणसें व जनावरें यांची बरीच प्राणहानि झाली. आणि ह्मणून **अतिवृष्टी**मुळें हिंदुस्थानभर **ओला दुष्काळ** पडतो कीं काय, अशी सर्वांस मोठी भीति उत्पन्न झाली. परंतु पुढें पुढें तर पावसानें अजीच टाळा दिला. ह्मणजे मघा, पूर्वा, उत्तरा, हस्त आदीकरून धान्य वाढीस लावून तें पिकविण्यास ज्या नक्षत्रांची अत्यंत अवश्यकता होती, तीं मुळींच पडलीं नाहींत. त्यामुळें वाढीस लागलेलीं रोपें जागच्याजागींच निजलीं. माणसें उपासमारीनें पटापट मरूं लागलीं. मग गुराढोरांची अवस्था तर पुसूंच नका!! त्यांस चारा वैरण न मिळाल्यामुळें तीं तर अगणित मेलीं. कित्येकांनीं आपल्या पोटच्या पोरांप्रमाणें पाळलेलीं **गुरें** दुसऱ्यांस निरुपायानें कवडीमोलानें विकलीं; व कित्येकांनीं तर तीं पोसण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें रानावनांत देवाच्या हवाल्यावर सोडून दिलीं. पुढें सरकारानें मेहेरबान होऊन सह्याद्रि, सातपुड्यावरील जंगलांतील कुरणें गुरांस चरण्याकरितां कांहीं काळपर्यंत मोकळीं करून दिलीं. व प्रसंग पडल्यास त्या गुरांबरोबर जाणाऱ्या गुराख्यांसही फुकट खाण्याची सोय करून दिली. व्यापाऱ्यांनीं धान्याचे भाव दीड दुपटीनें वाढविल्यामुळें व पोटांत आग पडल्यामुळें **दिनापुर, वडनेर, उमरावती, नागपूर, धारवाड, आग्रा, सोलापूर, जर्माखिंडी** वगैरे ठिकाणीं गरीब लोकांनीं धान्यावर हात मारून बाजारचे बाजार **लुटले.** त्यांचा बंदोबस्त करितां करितां सरकारास पुरेवाट झाली, व कोठें कोठें पोलिसची व रयतेची मारामारी झाली. मिलिटरी लोक बोलावून त्यांचा बंदोबस्त करावा लागला. जमिनीवरील **सारा** अजीबात **माफ** करण्याबद्दल किंवा त्यांची कांहीं काळपर्यंत **तहकुबी** मिळविण्याबद्दल ठिकठिकाणच्या लोकांनीं कलेकटर, कमिशनरांस अर्ज केले. सरकारनें देशभर **रिलीफ वर्क्स** सुरू करून लाखों लोक

कामावर ठेविले; व त्यांस अपुरा मुशाहिरा देऊन त्यांजपासून खडी फोडण्यासारखीं जिवापलीकडील व त्रासदायक कामें करून घेतलीं आणि दुष्काळांत ऐन वेळेला उपयोगी पडण्याकरितां प्रजेनें हलालीनें मिळविलेल्या पैशावर **इन्कम ट्याक्स** बसवून जमा झालेल्या पैशाचा युरोपियन लोकांस **अलावन्स** देण्यांत व **स्वाकीनच्या स्वारीचा खर्च** भागविण्यांत उपयोग करून गरीब विचाऱ्या प्रजेस निरर्थक हाय हाय करण्यास लाविलें ! ! उलट पक्षीं इंदूरच्या **होळकर सरकारनें** हजारों खंडी धान्य खरेदी करून आपल्याच प्रजेस नव्हे, तर इतर ठिकाणच्या गरिबांस तें अति स्वस्त दरानें विकलें व फुकटही वांटलें. **निजामानें** तर आपल्या राज्यांत उत्पन्न झालेलें धान्य आपल्या राज्याबाहेर न जाऊं देण्याविषयीं सक्त हुकूम सोडून आपल्या प्रजेची दुष्काळचिंता निवारण केली.

बुबॉनिक फीव्हर अथवा ग्रंथिक सन्निपात,—गांठीचा ताप.—शके १८१८ चें साल ह्मटलें ह्मणजे बोलून चालून **दुर्मुखनाम** होय ! तर त्यानें नांवाप्रमाणें आपली कृति न गाजविली, तर तें **दुर्मुखनामच** नव्हे ! ! आह्मां हिंदुस्थानवासी जनांस केवळ अपरिचित व अगदीं नवा असा **इन्फ्ल्युएन्झा** ताप होय. ह्या तापानें कांहीं वर्षांपूर्वी एतद्देशीय लोकांची जी काय त्रेधा उडविली होती, तिचें विस्मरण अद्याप पडलें नाहीं, तोंच **बुबॉनिक फीव्हर** अथवा **ग्रंथिक सन्निपात** या भयंकर व केवळ असाध्य अशा रोगाचा प्रथम मुंबईत उद्भव झाला. मुंबईत पूर्वेच्या बाजूस **मांडवी** हा एक दाटवस्तीचा व फार गलिच्छ असा भाग आहे. ह्या ठिकाणीं प्रथम ह्मणजे आगष्ट १८९६ महिन्याच्या सुमारें अखेरीस ह्या भयंकर रोगास एक दोन माणसें बळी पडलीं. ही गोष्ट पहिल्यानें सहसा कोणाच्या लक्षांत आली नाहीं. परंतु पुढें गणपतिविसर्जनोत्तर **मांडवीं**तच ह्या रोगानें दर दिवशीं पटापट माणसें मरूं लागलीं; त्यावरून तिकडील रहिवाशांत बराच हाहाकार उडाला, व साऱ्या मुंबईशहरचें लक्ष तिकडे लागलें. दररोजची मृत्युसंख्या ह्मटली ह्मणजे ३०—३५ व्हावी. माणसास आधीं ज्वर येऊन मागाहून शरीराच्या कोणत्या तरी भागावर **वळ** किंवा **गांठ** येऊन दोन तीन दिवसांच्या आंतच बहुधा त्या माणसाचा निकाल लागत असे. कित्येक वैद्यांनीं ह्या रोगास **ग्रंथिक सन्निपात, ग्रंथिक विसर्प, अग्निरोहिणी** अशीं नावें दिलीं. ह्या रोगाचें मूळबीज कशांत आहे, किंवा ह्याचा उद्भव कशापासून झाला, आणि त्याजवर कोणत्या रामबाण औषधाची योजना करावी, या गोष्टींकडे शहरवासी लोकांचें, आरोग्यरक्षक अधिकारी वर्गाचें व मुख्यत्वेंकरून डाक्टर व वैद्य यांचें लक्ष वेधून राहिलें. कोणी ह्मणत, हा रोग चिनांतून दोन चिनी माणसें प्रथम मुंबईत आलीं, त्यांच्यापासून आला. दोन वर्षांपूर्वी चीनच्या दक्षिण भागास **हाँगकाँग** येथें ह्या महारोगानें कांहीं दिवस आपलें वास्तव्य केलें होतें, व तिकडूनच हा मुंबईत आला. मुंबई मुनिसिपालिटीनें साऱ्या

शहरांतून व मुख्यत्वेंकरून **मांडवी** भागांत साफसफाईचें काम मोठ्या जारीनें सुरू केलें. **मांडवी** हा भाग शहराचे पिछाडीस समुद्रकिनाऱ्यावर असल्यामुळें परदेशांतून येणारा अनेक तऱ्हेचा माल आणि धान्य हीं सांठविण्याकरितां ह्या ठिकाणीं मोठ-मोठ्या वखारी बांधल्या आहेत. धान्याच्या वखारींतून प्रथम धान्य खाऊन मोठमोठे गलेलठ्ठ झालेले **उंदीर** पटापट मरूं लागले. ते इतके कांहीं मेले कीं, त्यांस गाड्यावारी नेऊन टाकावें लागलें. तेव्हां हा रोग धान्यापासून उद्भवला असेल, असें कांहीं डाक्टर्स लोकांचें मत पडलें. तथापि मुंबईतील बहुतेक रहिवाशांचें 'मुंबई मुनिसि-पालटीनें नवीन प्रचारांत आणलेल्या **गटार** किंवा **ड्रेनेज** पद्धतीमुळें ह्या रोगाचा उद्भव झाला,' असें ठाम पण चुकीचें मत बनून गेलें. असो. ज्या घरांत प्रथम उंदीर मरूं लागले, त्या घरावर ह्या महारोगाचा किंवा सांतीचा घाला पडणारच असें खातरी-पूर्वक कळूं लागलें. अर्थात उंदीर मरणें ही प्रथमची माणसांस इशारत होऊं लागली. त्यामुळें त्या त्या घरांतील रहिवाशी आपापलीं घरें सोडून शहराच्या इतर भागांत वसती करूं लागले. ह्मणून **मांडवी** भाग अगदीं ओसाड पडला. होतां होतां ह्या सांतीनें शहरच्या इतर भागांत आपला मोर्चा वळविला. **मांडवी**नंतर **भुलेश्वर** व **भोईवाडा** व तिकडून समुद्रकिनाऱ्यानें शहरच्या दक्षिण भागांत **मोदीबे** व **कुलाबा** ह्या ठिकाणीं आपली चाल केली. तिकडून शहरच्या मध्यभागांत उप-स्थित होऊन **कामाठीपुरा, ग्र्यांटरोड,** व **भायखळा** ह्या ठिकाणीं रोगानें तर आपल्या पराक्रमाचा अगदीं कळस करून सोडला. आणि पुढें मुंबईचा कोणताही भाग ह्या रोगानें अजीबात सोडला नाहीं. जिकडेजिकडे ह्मणून ह्याची वक्रदृष्टि झाली, त्या त्या ठिकाणीं ह्यानें अगदीं सफाई केली. सरकारचें लक्ष ह्या रोगाचा प्रतीकार करण्याकरितां अनेक कडक उपायांची योजना करण्याकडे लागलें. प्रथम जिकडेतिकडे **नाकेबंदी** होऊन बाहेरगांवीं व मुंबईस जाणाऱ्यायेणाऱ्या प्रवा-शांची **तपासणी** सुरू झाली. त्यांतील ह्या रोगानें पछाडलेल्या इसमांस गांवाच्या बाहेर किंवा लोकवस्तीपासून अगदीं विलग अशा ठिकाणीं मुद्दाम उभारलेल्या मांडवांत ह्मणजे **सेग्रिगेशन क्यांपमध्यें** ठेऊं लागले. ठिकठिकाणीं **सेग्रिगेशन क्यांप्स व क्वारंटाइनें** सुरू झालीं. मुंबईतून बाहेरगांवीं जाणाऱ्या बंदरठि-काणच्या गांवांत उतारूंस कांहीं काळपर्यंत खोळंबवून ठेवून त्यांच्यापैकीं कोणी ह्या रोगानें पछाडला नसल्यास मागाहून त्यास गांवांत जाण्याची परवानगी देत. **युबॉ-निक फीव्हर** रोगग्रस्तांस औषधोपचार करण्याकरितां पहिल्यानें **आर्थररोड**-वर एक **हास्पिटल** उभारलें. शहरांत घरोघर तपासणी करून ह्या रोगपीडित इसमांस आजारी माणसें नेण्याकरितां ख्रिश्चन लोकांच्या प्रेतवाहक गाड्यांप्रमाणें मुद्दाम तयार केलेल्या गाड्यांतून उपचाराकरितां हास्पिटलामध्यें नेऊन टाकीत. हास्पिटलांत नेल्यावर सदरहू इसम बहुधा एकदोन दिवसांच्या आंतच **राम** ह्मणत.

हास्पिटलांतून औषधोपचारानें बरे होऊन परत घरोघरीं येत असे फारच थोडे. त्यामुळें सरकार वरील रोगग्रस्तांस **'हास्पिटलांत नेऊन कांहीं जालीम औषध देऊन मारून टाकतें,'** असा बहुतेक सार्वजनिक समज झाला. ह्मणून संधी साधून गिरण्यांतील मजूर लोकांनीं व इतर उनाडटप्पूंनीं **ऑर्थररोड हास्पिटला**वर चाल करून तें मोडून तोडून त्याचा विध्वंस करून टाकला. आपल्या कुटुंबांतील आजारी माणसांस घरांतून काढून हास्पिटलांत पाठविण्यास लोक नाराजी झाले. याप्रमाणें मुंबईत ठिकठिकाणीं अनेक **प्लेगहास्पिटल्स** बांधलीं. **बुबॉनिक तापा**चा अथवा कोणत्याही तापाचा मनुष्य आढळला कीं, शीर घरांत, घरांतील माणसांच्या इच्छेविरुद्ध कर त्याची उचलबांगडी, आणि टाक त्याला हास्पिटलांत नेऊन. अशी **धरपकड** सुरू झाली. त्यामुळें तर लोक अगदीं हवालदील होऊन जाऊन घरांतील आजारी माणसें अनेक तऱ्हांनीं छपविण्याचा क्रम सुरू झाला. हें ज्यावेळेस सरकारच्या नजरेस पडलें, त्यावेळेस तर सरकारनें आपलें उग्र स्वरूप प्रगट करण्यास प्रारंभ केला. **जनरल ग्याटेकर** ह्या सेनानायकाच्या हाताखालीं आडदांड सैन्य देऊन त्यांस बेसुमार अधिकार देऊन अगदीं **मार्शल ला** सुरू केला. गल्लीकुचींतील प्रत्येक घरोघरीं शिरून कोनकोंपरा धुंडाळून काढीत व **कोणत्याही** प्रकारचा आजारी मनुष्य सांपडला कीं, भरलींच त्याचीं तेथेंच शंभर वर्षे! मग घरांतील माणसांचा आकांत काय पुसावा!! जो मनुष्य पुढें दोन तीन दिवसांनीं मरणार, तो आजच आपणांस अंतरला, व त्याची आपणास इतःपर भेट मुळींच होणार नाहीं असें समजून कुटुंबांतील माणसें धायधाय रडत, व आजारी माणसांस आपणांपासून न नेण्याविषयीं त्यांचीं मोठ्या काकळुतीनें आर्जवें करीत. ह्या दुःखकारक प्रसंगाचें वर्णन करणें केवळ अशक्य होय! आजारी माणसें नेण्याकरितां आलेले सरकारचे शिपाई हे घरांतील माणसांस केवळ यमदूत भासत. ह्मणून पुढें पुढें तर मुंबईतील रहिवाशांस चालू सांतीपेक्षां सरकारच्या जुलमी वर्तनामुळेंच मनखी त्रास होऊं लागला. आणि ह्या महारोगास भिण्याचें सोडून सरकारच्या जुलमास भिऊन लोकांची मागाहून मुंबईतून **पळापळ** सुरू झाली. तथापि सरकारची एवढ्यानेंच तृप्तता न होतां त्यानें मुंबई मुनिसिपालटीसही बेसुमार अधिकार दिला— मग काय, मुंबईची मुनिसिपालटीच ती. तिनें गांवांत स्वच्छता ठेवण्याची सुरवात केली. मृत्यु झालेल्या रोगग्रस्त घरांच्या अंगणांत व घरांत **गंधक** व **डांबर** जाळीत. मु. चे लोक घरांत शिरून रोग्याचे **बिछाने** व **कपडे** घरासमोर भररस्त्यावर आणून जाळीत. आणखी सारें घर **फिनाइल**च्या पाण्यानें धुवून टाकून चुनेगची भिंतींस तर लावीतच लावीत, पण लांकडांच्या खिडक्याबाऱ्यांस, दरवाजांस, छतांस आणि तावदानांसही चुना चोपडून त्या घरांच्या अगदीं जणू मशिदी बनवीत. पंपाच्या द्वारें गल्लोगल्लींतले गटार धुवून टाकीत. सूर्यप्रकाश आंत

येण्याकरितां व बाहेरची स्वच्छ हवा आंत खेळती राहण्याकरितां घरांवरील कवलें काढून टाकून छपरांस भलें थोरलें भगदाड पाडीत, आंतील जमिनी उकरून टाकीत. घरांतील सामानसुमान व दुकानांतील खाण्याचे पदार्थही बाहेर आणून त्यांवर **घांसलेट** तेल ओतून त्याची भर चव्हाट्यावर **होळी** करून राखरांगोळी करीत, आणि **बुबॉनिक तापानें** मृत्यु झालेल्या घरांतील माणसांस तें घर सोडून दुसरीकडे जाण्यास भाग पाडीत. येणेप्रमाणें साफसफाई करण्याचा मु. नें सपाटा चालविला. पण त्यांत होतसे काय कीं, ह्या साफसफाई करणाऱ्या माणसांत मु. चे **महारमांग**ही घरांत बिनधोक शिरत. त्यामुळें तर लोकांस अधिकच किळस येऊन त्रास होऊं लागला. आजपर्यंत आठदहा लाख रुपये ह्या सांतीच्या पायीं खर्ची पडले. रोगबीज शोधून काढून त्यावर वस्ताद औषधाची योजना करण्याकरितां **फ्रान्स**-सरकारानें आपल्या पदरचे **डा० एअरसिन** ह्यांस हिंदुस्थानांत पाठविलें. त्यांनीं **व डा० हाफूकिन** ह्यांनीं गोस्तन देवीप्रमाणें घोड्याच्या शरीरांतून **लस** काढून ती माणसांच्या शरीरांत शस्त्रद्वारें घालून प्राणहानि न होऊं देण्याची अकटोविकट खटपट केली. परंतु त्यापासून निश्चित व खातरीपूर्वक असें अद्याप कांहींच निष्पन्न झालें नाहीं. ह्या रोगाचें स्वरूप प्रथमतः अगदीं सौम्य होतें. ह्मणजे सप्टेंबर व आक्टोबर महिन्यांत ४०–५०–६० असे एकट्या मुंबईशहरांत रोजचे मृत्यु होत असत. पण पुढें मृत्युसंख्या वाढत्या प्रमाणावर जाऊन डिसेंबर जानेवारी व फेब्रुवारी महिन्यांत तर सांतीनें अगदीं **कळस** केला. जरी ह्या वेळीं अधीं अधिक मुंबई रिकामी झाली होती, तरी जवळ जवळ **तीनशें** मृत्यु रोजचे होऊं लागले. ही संख्या फक्त मु० च्या रिपोर्टावरून घेतलेली आहे. पण लोकांचा समज तर ह्याहूनही पुष्कळ अधिक मृत्यु होत असावेत, असा होता. सरकारी रिपोर्टावरून आजपर्यंत (मे १८९७ अखेरपर्यंत) एकंदर **अकरा हजार** माणसें—फक्त मुंबई शहरांतीलच—ह्या महारोगास बळी पडलीं. व लोकानुमानावरून तर **चाळीस हजारां**वर माणसें मृत्युमुखीं पडलीं असावीं. कारण एकट्या सोनापुरांतील स्मशानभूमींत प्रत्येक दीड दोन तासांच्या अवधींत दहा दहा बारा बारा प्रेतांच्या तीन तीन रांगा एका काळीं जाळीत, व सातआठ प्रेतें, जाळण्यास जागा नसल्यामुळें खोळंबवून ठेवावीं लागत. असा क्रम बरेच दिवस चालला होता. त्यावरून वर भाकीत केलेली **चाळीस हजारां**ची संख्या खरी असावी, असें खास वाटतें. याशिवाय **पुणें, कराची, कच्छमांडवी, भूज, अलिबाग, मांडवा, पनवेल वसई, पापडी** वगैरे शहरांत व गांवांत देखील **बुबॉनिक** तापानें कोणत्या रीतीनें प्रळय करून सोडला, हें सर्वांस महशूर आहेच. ह्मणून मुंबई व इतर ठिकाणीं मिळून एकंदर पन्नास साठ हजार माणसें ह्या रोगास बळी पडलीं असावीं असा बहुतेकांचा समज आहे. कारण एखादा मनुष्य सांतीनें पछाडला असल्यास त्याची घरांतून उ-

चलबांगडी करून त्यास हास्पिटलांत ऊर्फ यमाजीभास्कराच्या दरबारांत नेऊन टाकतात ह्मणून आणि प्लेगकेस झाल्यावर म्युनिसिपालिटी आका घरांतील सामानाची, अंथरूणपांघुरणाची, कपड्यालत्याची व जें काय हातास मिळेल त्याची अफरातफर करून जाऊन, राख रांगोळी करते ह्मणून तें टाळण्याकरितां सांतीनें रोगी जरी मयत झाला असला, तरी तो इतर रोगानें मेला असें सांगून म्यु० आकाचा त्रास चुकवीत; यावरून वर लिहिलेल्या संख्येपेक्षांही पुष्कळ अधिक मृत्यु झाले असावेत, अशी आमची खतःची अटकळ आहे. असो; ह्या सांतीनें डौलानें मी मी ह्मणणाऱ्या मुंबईसारख्या बकाली, भरभराटीच्या व रात्रंदिवस वाहत्या शहराची थोडक्या अवकाशांत जी काय दुर्दशा उडविली, तिचें वर्णन करणेंच मुळीं अशक्य. तें सांगून कोणास खरें सुद्धां वाटणार नाहीं. अशा तऱ्हेचा प्रसंग अशा अवाढव्य शहरास कधीं तरी येईल हें कोणाच्या खप्नीं सुद्धां नव्हतें. ही सांत कमी न होतां उलटी दिवसेंदिवस वाढतच जाते असें पाहून अनेक सुखवस्तू व व्यापारी लोकांनीं तर मुंबईहून केव्हांच सूंबाल्या केला; पण ज्यांस सवड होती, त्यांनींही आपला गाशा गुंडाळून मुंबईनजीक आसपासच्या गांवीं जाऊन ते राहिले. कालांतरानें तिकडेही जेव्हां सांतीनें आपलें उग्र स्वरूप प्रगट केलें, तेव्हां तर त्यांची तारांबळ कांहीं पुसूंच नका!! कांहीं कांहीं नोकरलोकांनीं आपल्या नोकरीची परवा न करितां खदेशीं प्रयाण केलें. श्रीमंत वा गरीब चटसारे एका स्थितीप्रत पोंचून मुंबईतून चालते झाले. मग मुंबईची स्थिति काय पुसावयाची! निम्यावर अधिक लोकवस्ती कमी झाल्यावर मुंबईस प्रेतकळा कां येणार नाहीं!! जिकडे पहावें तिकडे कुलुपांचें प्रदर्शन सामसूम व भयाण! भरदिवसा रस्त्यातून हिंडण्याफिरण्यास अगदीं जिवावर येई. मग रात्रीचें तर नांवच घ्यावयास नको! शुद्ध यमाजीभास्कराची नगरी!!! मोठमोठाले नामांकित डाक्टर व वैद्य आपापला जीव घेऊन बाहेरगांवीं जाऊन राहिले. गरजेस जर डाक्टराची जरूर लागली-तर तो मिळण्याची मारामार पडूं लागली. आणि जे कोणी डाक्टर लोक मुंबईत राहिले होते, त्यांजकडे जाण्यास लोक भीत. कारण 'बुबॉनिकची केस असली, तर ती सरकारास जाहीर करावी, असा डाक्टर लोकांस सक्त हुकूम फर्माविला होता. व याप्रमाणें जो न करील, त्यास पन्नास रुपये दंडाची शिक्षा सांगितली होती. मुंबईचा व्यापार बहुतेक बंद पडला. मार्किटें बंद झालीं. गिरण्या, शाळा, छापखाने, कारखाने वगैरे बहुतेक बंद पडून मुंबई शहर ओस पडलें. वेळेवर प्रेतें बाहण्यास देखील सोयरींधायरीं तर राहूंच द्या, पण पैसे देऊन भाडोत्री माणसें देखील मिळतनाशीं झालीं. त्यामुळें कांहीं कांहीं ठिकाणीं एक एक दोन दोन दिवस प्रेतें घरांत पडून राहूं लागलीं. व कांहींकांनीं तर प्रेतें घरांतच टाकून दारांस कुलुपें लावून ते चालते झाले. कांहीं कांहीं ठिकाणीं प्रेतें घरांतच पुरलेलीं सांपडलीं. केव्हां केव्हां खजातीचीं माणसें न मिळाल्याकारणानें, घांटी, मराठे, बैरागी व महारभांग देखील आणि त्यांच्या अभावीं नाइलाजास्तव मुसलमानाकरवीं प्रेतें

वाहून नेण्याचा दुर्धर प्रसंग आला. जुनीं ह्मणजे ८०–८५ वर्षांचीं ह्मातारीं माणसें ह्मणूं लागलीं कीं, अशा तऱ्हेचा प्रसंग मुंबईवर आल्याचें त्यांच्या स्मरणांत नाहीं. लोकवस्ती कमी झाल्यामुळें कुत्रीं व मांजरें यांचा उपासमार होऊं लागला व त्यांपैकीं मांजरांचा तर बहुतेक संहार झाला. उंदीर तर प्रथमग्रासीं सांतीच्याच भक्ष्यस्थानीं पडले होते. वेळेवर अमुकएक जिन्नस मिळण्याची पंचाईत पडूं लागली. ही सांत चिनांतून आली या संशयावरून कित्येक सुवासिनी स्त्रियांनीं तर आपल्या हातांतील चिनई बहुमोल बांगड्या वाढविल्या. हा रोग गटारापासून उद्भवला असेल, असें कित्येकांस वाटून त्यांनीं आपल्या घरांतील मोऱ्या अजीबात बंद करून टाकल्या. मुंबई इलाख्याचे गव्हर्नर साहेब **लॉर्ड स्यांडहर्स्ट** यांनीं **जस्टिस आफू धि पीस**ची टौन हालांत सभा बोलावून त्यांजवर घरोघरीं हिंडून रोगी मनुष्य आढळल्यास त्यास हास्पिटलांत नेऊन टाकण्याची कामगिरी सोंपविली. ती त्यांनीं कांहीं वेळपर्यंत कशीमशी तरी चालविली. मुसलमानभाईनीं सांतीच्या रोगग्रस्तांस स्वतःच्या खर्चानें उपस्थित केलेल्या हास्पिटलांत नेऊन ठेवण्याचा फार अट्टाहास केला. ते तर प्रथम रोग्यांना हास्पिटलांत दुराग्रहानें धर्माच्या सबबीवर नेऊंच देईनात. त्यांची स्मशानभूमि प्रेतें पुरण्यास अपुरीशी वाटल्यावरून सरकारनें त्यांस दुसऱ्या ठिकाणीं नेमून दिलेल्या जागेमध्यें तीं न पुरण्याचा कांहीं वेळपर्यंत फार दुराग्रह धरला; व पुन्हा कांहीं दंगा होतो किंवा काय अशी सर्वांस भीति उत्पन्न झाली. कांहीं बदमाशी लोकांनीं प्लेगच्या नांवावर व्यापारी वगैरे लोकांस फसवून त्यांजकडून पैसे उपटण्याचें व्रत कांहीं काळपर्यंत चालविलें. पळापळीनें शहर केवळ ओस पडल्यामुळें चोरट्याभामट्यांनीं बऱ्याच ठिकाणीं हात फिरविला. युरोपियनांतील प्रसिद्ध डा० म्यानसर, प्रो० गार्डनर अशासारखे पुरुष प्लेगनें स्वाहा केले. कांहीं अधिकारीवर्गानें व त्यांच्या हाताखालील यःकश्चित् सेवकगणानें तर कोठें कोठें आपल्या अधिकाराचा फार दुरुपयोग केला ह्मणजे कित्येकांस कांहींच दुखणेंबाणें नसतांही त्यांस बळेंच हास्पिटलांत ओढून नेलें. गळ्याला गळेबंद असला तर पकड त्याला, टाक नेऊन हास्पिटलांत! कपाळावर सुंठ घातली असल्यास टाक नेऊन त्यास हास्पिटलांत!! डोकीला रुमाल बांधला असल्यास टाक नेऊन त्यास हास्पिटलांत!!! या रीतीनें त्यांनीं आपला अम्मल गाजविला. चांगल्या धट्याकट्या माणसास हास्पिटलांत नेल्यावर त्यानें परत आल्यावर तिकडील जो काय ब्रह्मघोंटाळा होता, तो लोकांच्या नजरेस आणला. असो. ही सांत बहुतकरून समुद्रकिनाऱ्याकिनाऱ्यानें आपला प्रभाव गाजवून गेली, असें अनुभवास आलें. चांगल्या चांगल्या ज्वान, धट्याकट्या, व सशक्त माणसांवर विशेषेंकरून सांतीनें झडप घातली. त्यामुळें बहुतेक कुटुंबांत मोठा हाहाकार उडाला. ईश्वरेच्छा!!!

स.मा.पंडित, वाई.

जानेवारी.(वर्षाची वर्गणी ... ट. खर्चासह. फुटकळ अंकास ०४.) १८९६



ह्या पुस्तकांतील लेख कोची (मलबार) येथें तयार होऊन,
ते मुंबई येथें छापून प्रसिद्ध होतात.

विषयांची अनुक्रमणिका.

	पृष्ठ.		पृष्ठ.
केरळकोकिळ–दहावें वर्ष १८९६.	१	मलबारवर्णन, तुलापुरुषदान.	१२
पुस्तकांची पोंच.	४	पुस्तकपरीक्षा.	१८
लोकोत्तरचमत्कार, षट्पद धेनु.	५	पत्रव्यवहार.	२२
प्रतिसांवत्सरिक परमेश्वरप्रार्थना.	१०		

कृष्णशास्त्री बिवलकर वैद्य, मु० आंजर्ले, ता० दापोली, जि० रत्नागिरी, यांचीं जगत्प्रसिद्ध सर्वोपयोगी निर्दोष व रामबाण औषधें.

या जाहिरातीचे खालीं "विशेष सूचना" केली आहे ती वाचकांच्या अवश्य लक्षांत असावी.

मदनविलासामृतसंजीविनी.

वीर्यस्तंभक, रक्तशोधक, अत्यंत कामोत्तेजक, चित्तोत्साह, बुद्धि–कांतिवर्धक व धातुपौष्टिक सुवर्ण-माक्षिक मौक्तिक कस्तूरीमिश्र अपूर्व गुटिका.

१. शरीराची उत्तम सुधारणा करणारीं अत्यंत महत्त्वाचीं जीं औषधें आहेत, त्यांत या गुटिका अगदीं पहिल्या प्रतीच्या ठरल्यामुळें यांचे अपूर्व गुण थोड्याच काळांत या देशाच्या सर्व भागीं व त्यांच्या आसमंतात् अतिशय पसरले आहेत. या सेवन केल्यानें नपुंसकत्व, इ-

द्रियशिथिलता, कडकी, जीर्णज्वर, अग्निमांद्य, कोणत्याही कारणांनीं आलेली अशक्तता, स्वप्नजन्य किंवा इतर धातुपात, उन्हाळे, छातीतील रोग, मस्तकशूल, मेंदूचे विकार, पांडुरोग, क्षय, मुळव्याधि, भगंदर, मूत्रसंकोच किंवा मूत्रातिरेक, कटिशूल, कटिवात, वातरोग, निद्रानाश, चक्कर, कफातिरेक, उपदंशासंबंधीं मुरलेले विकार, सूतिकारोग, व्रण, हात, पाय, मूत्रमार्ग, व शरीर यांचा दाह, ठणका, ग्लानि, अरुचि, मूत्राश्मरी, व चित्तभ्रम इ० अनेक विकार कितीही वयाच्या मनुष्यास कोणत्याही कारणांनीं प्राप्त झालेले नवीन किंवा जुनाट असले तरी अगदीं खात्रीनें बरे होतात. धातु व रक्त यांची शुद्धि व वृद्धि होऊन रक्तदूषणजन्य अनेक रोग हटकून बरे होतात. वीर्यस्तंभन, कामोद्दीपन होऊन अग्नि व शक्ति भरपूर वाढते. स्त्रियांची धुपणी व संततीस अपायकारक जे गर्भाशयस्थ रोग त्यांचें त्वरित निवारण होऊन कांति, स्मरणशक्ति व बुद्धि वाढते. ज्यांस फिरण्याचे, अभ्यास करण्याचे, लिहिण्याचे, व शिकविण्याचे श्रम फार पडतात, त्या सर्वांच्या आंगीं यांनीं अतिशय शक्ति येऊन मनास उत्साह प्राप्त होतो, सुस्ती जाते. ज्यास दूध व जडान्न पचत नाहीं त्यास तें भरपूर पचूं लागतें. कोष्ठशुद्धि होते. कोष्ठांतील अनियमित व्यापारांपासून होणारे दुष्ट परिणाम टळतात. या अप्रतिम गुटिका अत्यंत उपयुक्त शोधनानें केलेल्या असून यांच्या अप्रतिम गुणकारित्वाबद्दल हजारों सर्टिफिकिटें आहेत, सबब जास्त वर्णन करीत नाहीं. यांत अपायकारक पदार्थ बिलकूल नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस अत्यंत उपयोगी आहेत. वरील सर्व रोग जाऊन उत्तम गुण प्राप्त होण्यास या गुटिकांसारखें अप्रतिम औषधच नाहीं असें हजारों लोकांच्या पूर्ण अनुभवावरून स्पष्ट ह्मणतों. यांस पथ्यसेवनाची गरज नसतां, या पाहिजे त्या दिवसांत घेतल्या तरी हटकून गुण करितात. यामुळें त्यांचा अतिशय खप सुरू आहे. हल्लीं या गोळ्यांत अंतर्वेदी, नेपाळ, काश्मीर इ० देशांतील अत्यंत शुद्ध, ताजे, महत्त्वाचे व मौल्यवान् असे अनेक पदार्थ आणखी घालून त्यांची विशेष सुधारणा केली आहे आणि

लोकाग्रहावरून केवळ परोपकारार्थ झणून गोळ्यांचा दर फारच स्वस्त केला आहे. गोळ्या रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम सहा रुपयांच्या किंवा त्यांहून कितीही जास्त गोळ्या घेणारांस बंगीचा सर्व टपालखर्च माफ आहे. त्यांचे आंत घेणारांस मात्र तो वेगळा सहा आणे पडेल. एकदम ३२ गोळ्यांस १ रु. ७० गोळ्यांस २ रु. १६० गोळ्यांस ४ रु. २६० गोळ्यांस ६ रु. ५२० गोळ्यांस १० रु. अनुपानपत्रक सोबत मिळेल.

२ वृषणवृद्धि.—[अंतर्गळ] हा विकार होण्यास विशेषेंकरून नलाश्रित वायु हें जोरदार कारण आहे. काष्ठव्यवहार, मुष्टिप्रहार, अव्यवस्थित पतन इ० कारणेंही यांत आहेत. वरील कारणांनीं वृषणाचा एक किंवा दोन्ही भाग मोठे होऊन ठणका, सूज, वधिरता इ. विकार होतात. हे सर्व रोग आमच्या गोळ्या व मलम यांनीं १०।१२ दिवसांत खात्रीनें बरे होतात. अति जुनाट व कितीही जोरदार असलेले रोग ४० दिवसांचे आंत कायम बरे होतात. मलम ड. ८८ आणे व २४ गोळ्यांचे डबीस १॥ रुपया. दोन्ही मिळून किंमत २ रु. दोन्ही औषधांचा एकदम उपयोग करावा लागतो.

३ थंडगार नेत्रांजन.—हें परम गुणकारक अंजन स्तुतीस अत्यंत पात्र आहे, हें सतत दहा वर्षांच्या पूर्ण अनुभवानें कळवितों. यानें डोळ्यांचे साधारण विकार तर सहजच, परंतु दृष्टीचा समूळ नाश करणारे तिमिरांध्य, वडस, बिंदु, फुलें, कांच, सारा, भोर, गळती, खुपऱ्या, जळजळ, कंड, फूट, चिकटा, ठणका व लाली इ० अनेक विकार तत्संबंधी मस्तकशूलादि विकारांसह कितीही वयाच्या मनुष्यास कोणत्याही कारणांनीं प्राप्त झालेले नवीन किंवा जुनाट असले तरी नाजूक रीतीनें कोणतीही इजा न होतां बरे होतात. दृष्टि तीव्र व थंडगार राहते, शिवाय जागरण, उन्हांतून फिरणें, अग्नीचा शेक, उपदंशविकार, अतिवाचन, अतिव्यायाम, अतिमैथुन, अतिमद्यपान, अत्युष्ण व विदाही पदार्थभक्षण इ० अनेक कारणांनीं ज्यांचे डोळे बिघडतात त्यांस याचा फारच मोठा उपयोग आहे. हें चांगल्या

केरळकोकिळ—दहावें वर्ष १८९६.

नूतनसंवत्सरारंभ.

ह्या महिन्यापासून ह्मणजे जानेवारी १८९६ पासून 'केरळकोकिळा'स नववें वर्ष संपून दहावें वर्ष लागलें. हीं नऊ वर्षें ज्याच्या कृपेनें सुखासमाधानांत व सज्जनसेवेंत गेलीं, त्या जगच्चालकाच्या चरणीं शतशः वंदन असो. तसेंच ज्या उदार महात्म्यांनीं आपला उदार आश्रय देऊन कोकिळाची सेवा ग्रहण केली, त्यांच्या गुणाचें अभिनंदन केलें, त्यांचेही लीनतापूर्वक उपकार मानून चार खासगी शब्द त्यांच्या कानावर घालण्यास परवानगी घेत आहें. ही संधि वर्षांतून एकवेळच येणारी असल्यामुळें ती थोडीबहुत तरी साजरी करणें इष्ट दिसतें.

पण त्यापूर्वी "सर्वारंभास्तंदुलःप्रस्थमूलाः" ह्या संस्कृत श्लोकाप्रमाणें किंवा 'आधीं पोटोबा आणि मग विठोबा' ह्या प्राकृत ह्मणीप्रमाणें प्रथमतःच निढळींच्या घामाचा मोबदला असून याचकवृत्तीचे शब्द काढावयास मोठी दिलगिरी वाटते, पण उपाय नाहीं. आमच्या आश्रयदात्यांपैकीं कितीएक इतक्या उदार मनाचे आहेत कीं, कोकिळाची वर्गणी द्यावयाची ती देऊन शिवाय त्यास उत्साह येण्यासाठीं त्याच्या गुणाचें अभिनंदन करून वर्गणीच्या किती तरी पटीनें बक्षिसें देतात. ही गोष्ट गतवर्षीच्या पहिल्या अंकावरून सर्वांच्या लक्षांत येण्यासारखी आहे. त्या उदार महात्म्यांचे अनंत उपकार आहेत, हें कांहीं सांगणें नकोच. तसेंच जे कोणी ठरीव वर्गणी वेळच्यावेळीं पाठवितात, त्यांचेही उपकार कांहीं कमी नाहींत. पण जे कोकिळाचा सूर ऐकण्याविषयीं उत्कंठित असून, त्याच्या गायनाचा रसास्वाद घेऊन अंकांस दोन दिवस विलंब लागल्यास कार्ड पाठविण्याची तसदी घेऊन त्याच्या पोटापाण्याची काळजी वहात नाहींत,—वर्गणी पाठवीत नाहींत,—त्याच्या विनंतीची पर्वा करीत नाहींत, अशा लोकांविषयीं काय समजावें? त्यांस कोणती विनंति करावी, व काय ह्मणावें हेंच आह्मांस कळत नाहीं. अगोदर 'केरळकोकिळची' वर्गणी ती किती? वर्षास अवघी १॥ केवळ खर्च भागण्यापुरती. येवढ्या किमतींत २८८ पृष्ठांचें पुस्तक देणें ह्मणजे स्वस्ताईची परमावधि झाली असें कोणीही ह्मणेल. प्रतिमासास दोन दोन आणे पाठविले, किंवा बाजूस काढून ठेवले तर ह्या चिमुकल्या

गायकाची बेगमी होऊन जाईल. ती पाठविण्याविषयीं सरकारानें व्ही० पी० ची सोयही उत्तम करून ठेविली आहे. असें असून वर्षोंवर्ष सेवा घेऊनही जे कोणी व्ही० पी० परत करतात, त्यांच्या सौजन्याचा मासला ध्यानांत ठेवण्यासारखा आहे ! अशाप्रकारें वर्गणीच्या टोलवाटोलवीची लागलेली संवय चांगली नव्हे. सारांश, ज्यांजकडे कोकिळाची बाकी राहिली असेल त्यांनीं ती ताबडतोब पाठविण्याची, किंवा व्ही० पी० करून पाठविण्याबद्दल कार्ड पाठविण्याची कृपा करावी. येवढी कडनिकडीची विनंति प्रथमच करून विषयविवेचनाकडे रोंख फिरवितों. (वर्गणीदारांस सोयीनें पुस्तकसंग्रह करतां यावा ह्मणून मालक (ज. म. गुर्जर) ह्यांनीं आपलीं खासगी पुस्तकें एकदम कोणी पांच रुपयांचीं घेतल्यास तीं साडेतीन रुपयांस देण्याचें गतवर्षींच प्रसिद्ध केलें आहे. ही सोय कांहीं कमी नाहीं. तिचा उपयोग करून घेणें आश्रयदात्यांकडे आहे.)

चित्रयुक्तविषय पहिला. ह्यांत समुद्रफेंस, स्पंज, तारमत्स्य इत्यादि जलचरें, बील्हर, नानारंगी सरडा, उडतीं जनावरें इत्यादि स्थलचरें, हांसणारा पक्षी, दंतयुक्त पक्षी, सुप्रकाशित पक्षी इत्यादि पक्षगण, अनेक प्रकारची विचित्र सृष्टी व मनुष्यांच्या भिन्न भिन्न जाती; सत्पुरुष व साध्वीस्त्रिया इत्यादि विषय पूर्वप्रद्धतीवरच चालू रहातील. **कवितेचा** प्रकारही पूर्वीप्रमाणेंच. **मलबारवर्णनांत** कांहीं त्रावणकोरचा इतिहास, पूर्वराजांचीं चरित्रें, जीवनवृत्तांत, मलबारांतील व्यापारासंबंधी माहिती इत्यादि विषय येतील. **लोकोत्तर चमत्कार,** निरनिराळ्या विषयांवर निबंध, **जपानी** एक दोन पुराणें, **स्थलनिर्देश** ह्यांचाही सवडीप्रमाणें समावेश होईल. **'पंचोक्ति'** आलीकडे फारा दिवसांत आलेली नाहीं तिच्याकडेही मधून मधून वळण्याचा विचार आहे. **'विद्युन्मानस'** शास्त्राचीं आतां दोनच व्याख्यानें शिल्लक राहिलीं आहेत. एक 'शिष्यांस गुप्तमंत्र' व दुसरें 'मनाचा संततीवर संस्कार' तींही लौकरच पुरीं करण्यांत येतील. **पुस्तकपरीक्षेंत** श्री० गायकवाडसरकारच्या आज्ञेनें तयार झालेल्या पुस्तकांवरही वगैरे अभिप्राय देण्यांत येतील. **कलमबहादर**च्या शेल्यापागोट्यांत ह्या वर्षी वर्तमानपत्रकारांकडे वळण्याचा इरादा आहे. ह्याशिवाय वेळोवेळ सुचतील तसतसे **नवे विषय**ही देण्यांत येतील हें सांगणें नकोच. हे मनाचे संकल्प आहेत. पूर्ण करणार जगदीश. ह्या वर्षी शरीरव्याधीनें फार ग्रस्त केल्यामुळें शेवटच्या शेवटच्या कांहीं अंकांस कालातिक्रमाचा थोडा दोष आला. तोही ईश्वरकृपेनें लौकरच मुक्त होईल अशी आशा आहे.

रा. रा. वैद्य चित्र कोरणारे ह्यांच्या कुशलतेचें व त्यांत विशेष अशा गुणी कारागिराच्या नियमितपणाचें कौतुक करणें कर्तव्य होय. ते असलें काम इतकें काळजीनें, कुशलतेनें करतात कीं, असाच त्यांचा क्रम चालू राहील तर ते ह्या कामीं लवकरच प्रोफेसर होतील. कोकिळावर प्रेमदृष्टि ठेवून वेळच्यावेळीं खोटी न करतां ते चित्रें देतात, ह्याबद्दलही त्यांचे आभार आहेत.

अस्तु. सरतेशेवटीं परमेश्वरानें आमच्या आश्रयदात्यांस व सहायकारी मंडळीस सुखी ठेवून केरळकोकिळाचें गायन अधिक उल्हासवृत्तीनें चालवावें, अशी त्याची सविनय प्रार्थना करून प्रतिसांवत्सरिक भाषण पुरें करतों.

सर्वांचा नम्र सेवक.

केरळकोकिळ.

पुस्तकांची वगैरे पोंच.

१ थोरले मल्हारराव होळकर सुभेदार यांजवर काव्य. २ मेळ्यांचीं पुस्तकें ३ मेळ्यांचीं पदें. ४ अलंकारदर्पण. ५ श्रीपरमेश्वर ज्ञानदर्पण किंवा हिंदुधर्ममत-मंडन. ६ प्रांतिकसभेचा कटाव. ७ महाराज सखाराम बुवा ह्यांचें चरित्र. ८ संगीत गंगालहरी. ९ श्रीमद्भागवतार्थदर्शन. १० ताराबाई व हिराबाई. ११ आमचीं थोर माणसें प्रकाशकमंडळीकडून– १ श्रीमच्छत्रपति शिवाजीमहाराज २ रा॰ व॰ विश्वनाथ नारायण मंडलीक. चित्रें व चरित्रें. १२ निर्मलानाटिका. १३ इंदूर संस्थान भाग १. १४ निर्णयसागरची १८९६ सालची रोजनिशी. १५ सूक्तिकुसुममाला. १६ मेसर्स जी. बी. नाईक ह्यांजकडून हिंदू टाईमपीस व पंखे. १७ मूकव्याख्यान. १८ संगीत कादंबरी नाटक. १९ समाधान. २० कै॰ प्रि॰ गोपाळ गणेश आगरकर ह्यांचें चरित्र.

हीं पुस्तकें व वस्तु देणारांचे फार फार उपकार आहेत. कित्येक पुस्तकांची पोंच देण्यास विलंब लागला त्याबद्दल पाठविणारांनीं क्षमा करावी.

---

१ हा कटाव रा. रा. ब. खं. पारख ह्यांनीं केला आहे. ह्यांत त्या सभेचें वर्णन सायंत आहे. आपल्या ह्या कवितेंत प्रसाद आणण्याविषयीं त्यांनीं आणखी प्रयत्न केला पाहिजे. व तो त्यांस अगदीं सुसाध्य आहे. शीघ्रकवित्व हा गुण त्यांचा वर्णनीय होय ह्यांत शंका नाहीं.

२ एका जाड व मोहरेदार कागदावर ह्या लहान लहान तसबिरी असून थोड-क्यांत त्यांचें चरित्रही दिलेलें असतें. हे कागद संग्रही असावेत.

३ ही रोजनिशी प्रतिवर्षाप्रमाणेंच सुरेख आहे.

४ 'हिंदू घड्याळां' विषयीं मागील अंकीं अभिप्राय दिलाच आहे. मेसर्स नाईक ह्यांनीं गेल्या राष्ट्रीयसभेमध्यें सर्वांस चिनी कागदांचे सुशोभित पंखे पुरविले. ह्या पंख्यांवर एकाबाजूस त्यांनीं आपल्या हिंदू घड्याळांची जाहिरात चिकटविली होती. परोपकारच्या परोपकार, आणि जाहिरातच्या जाहिरात. अशीं दोन कामें झालीं. ह्या नवीन जाहिरातींच्या कल्पनेबद्दल मेसर्स नाईककंपनी खरोखर प्रशंसेस पात्र आहे.

५ हें एका ख्रिस्तभक्तानें लिहून प्रसिद्ध केलें असून त्यांत पुण्याच्या दुफळीस शां-ततेनें वागण्याविषयीं उपदेश आहे. ठीक आहे.

केरळकोकिळ.

लोकोत्तर चमत्कार.

षट्पद धेनु अथवा सहा पायांची गाय.



'गाय' ही फार प्राचीनकालापासून—वैदिककालापासून—सृष्टीच्या उत्पत्तीपासून झटलें तरी चालेल—आर्यलोकांनीं फार पूज्य मानिली आहे, इतकेंच नव्हे तर तें त्यांचें एक श्रेष्ठ दैवत आहे. ब्राह्मण लोकांच्या ऋषिप्रणित मंत्रांत जो अत्यंत श्रेष्ठ व गुह्य मंत्र त्याच्या छंदाचें नांव ही 'गायत्री.'* हा सर्व मान तिच्या सुस्वभावावरून व उपयुक्ततेवरूनच तीस मिळाला असावा. खरोखर हिच्या स्वभावाशीं आणि उपयुक्ततेशीं यथायोग्य तुलन्यासारखा प्राणी सर्व भूमंडळांत क्वचितच सांपडेल. कोणताही पुरुष किंवा स्त्री अत्यंत गरीब स्वभावाची दृष्टीस पडली, तर 'तो' किंवा 'ती' केवळ 'गाय' आहे, असें ह्मणण्याची रूढीच पडून

* ह्या मंत्रांतील ध्यानदेवता मात्र सूर्यावलंबी आहे.

गेली आहे. ह्यावरूनच ह्या प्राण्याच्या गरीबपणाची व सुशीलतेची साक्ष पटते. उपयोगाविषयीं तर बोलणेंच नाहीं. कारण, तो जगजाहीर आहे. खरोखरच गायीचें काय काय बरें उपयोगीं पडत नाहीं? आधीं मुख्य दूध. ह्मणजे भूमंडळावरील अमृतच तें. कारण, खरें अमृत केवळ नाममात्रेंकरून ऐकावयाचें मात्र. त्याचें दर्शन 'कल्पतरु' खालींच व्हावयाचें! ह्या दुधाच्या अंगीं किती किती बरें गुण भरलेले आहेत? त्याचें यथास्थित विवरण विद्वद्वैद्यांवांचून कोण बरें करण्यास समर्थ आहे? आणि पौष्टिक व पाचक तरी किती? परंतु उत्तरसमुद्रांतील मत्स्यहृदयार्काच्या रसास्वादास (कॉडलिव्हर आईलास) लालचावलेल्या प्रस्तुत मन्वंतरांतील लोकांस त्याचें महत्त्व काय होय? मांसावरच ज्यांची भक्ति जडली, त्यांस दहीं, दूध, लोणी, तूप, खवा ह्यांतील माधुर्य कळणार कसें? मोड खुडून खाण्याची ज्यांस संवय लागली, त्यांस फलोपभोगाचें महात्म्य कळणार कोठून? असो, मृतगायीचें गोरोचन[1] औषधांस उपयोगीं पडतें. चर्माचे जोडे वगैरे होतात. शिंगांच्या फण्या वगैरे वस्तु होतात. हें तर काय, पण कोणत्याही प्रकारच्या पातकाचें क्षालन करणें झालें तर, ब्राह्मणलोकांचें पवित्र होण्याचें मुख्य साधन जें 'पंचगव्य' त्यांत सुद्धां गोमयाची व गोमूत्राची योजना केलेली असते. ही योजना तरी, चिकित्साशास्त्रांत पारंगत झालेल्या पूर्व ऋषींनीं, त्यांच्यांत तसाच विशेष धर्म असल्यावांचून केली नसेल हें उघड आहे. गलिच्छ झालेलें स्थळ गोमयानें स्वच्छ होत असल्याचा तर आपणा प्रत्येकास अनुभवच आहे. तेव्हां अशा उपयुक्त दैवतास आमच्या पूर्वजांनीं पवित्र मानलें ह्यांत आश्चर्य तें काय?

प्राचीनकालीं गायींचीं खिल्लारें हीच संपत्ति मानली जात असे. आणि त्यांचें जो संरक्षण करी त्यांस कोणत्याही प्रकारची वाण पडत नसे. ह्यावरूनच त्यास 'गोधन' असें ह्मणण्याचा प्रघात पडला आहे. नारळीचें झाड एक वेळ लावलें ह्मणजे त्यास कोणत्याही प्रकारची मेहनत करावी लागत नाहीं. त्याजवर बारान्वारा चोवीस महिने पाहिजे त्यावेळीं पाहिजे त्या स्थितींत—ह्मणजे अगदीं कोंवळ्या दोड्यापासून तों

१ हा पदार्थ गायीच्या मस्तकामध्यें खड्याच्या रूपानें असून त्याचा रंग पिंवळा असतो.

जून नारळापर्यंत—फळ असतें. त्यापासून जळण, घरावरचें आच्छादन, दोर, दोरखंड वगैरे नानाप्रकारचे प्रपंचास व घरांस उपयोगी पदार्थ प्राप्त होतात. ह्मणून मलबारांतील लोक त्यास 'कल्पवृक्ष' असें ह्मणतात. त्याचप्रमाणें गायीपासूनही अनेक उपयोगी पदार्थ प्राप्त होत असल्यामुळें, तीस 'कामधेनु' ही संज्ञासुद्धां शोभण्यासारखी आहे. पूर्वीचे ऋषी निस्पृहपणानें अरण्यांत एकांतस्थानीं रहात असत. व तेथें एक धेनु असली तरी तेवढ्यानें त्यांचा आश्रमधर्म यथासांग चालत असे.

अशा प्रकारची एक कामधेनु वसिष्ठऋषींपाशीं असून तिच्या बलावर त्यांनीं विश्वामित्राचें सैन्यासहवर्तमान यथोचित आदरातिथ्य केलें. तें पाहून त्या धेनूविषयीं विश्वामित्रासारख्या लक्ष्मीपतीसही कसा लोभ सुटला, इत्यादि गोष्टी आमच्या बहुश्रुत वाचकांस कांहीं पुन्हा सांगावयास नकोत. 'गोग्रास' काढून ठेवल्यावांचून जेऊं नये असा ब्राह्मणजातींत तर धर्म निर्बंधच चालत आला आहे. धेनूंचीं खिल्लारें पाळण्याची चाल कृष्णावतारापर्यंत कशी प्रचारांत होती, हें गोपाल ह्या नांवावरून व गोपालांच्या पुराणवर्णितलीलेवरून सहज कळण्यासारखें आहे. पुढें पुढें हीं खिल्लारें किंवा धेनुसमुदाय कमी होत चालला खरा; तरी त्यांच्यावरील श्रद्धा छत्रपतींच्या कारकीर्दीपर्यंत—नव्हे पेशव्यांच्या अखेरपर्यंत—कायम होती. हें, इराणांतील पार्शीलोक जेव्हां गुथरायेंत रहावयास जागा मागूं लागले, तेव्हां त्यांजकडून "आह्मी गायी मारणार नाहीं; गोमांस भक्षण करणार नाहीं; प्रत्यहीं घरापुढें सडासंमार्जन करून रांगोळ्या घालीत जाऊं." इत्यादि करार करून घेतल्यावरून स्पष्ट दिसतें.

सांप्रत त्यांस विपरीतकाल आल्यामुळें कोणीच वाली नाहींसा झाला. गोविप्रांचे पाठीराखे प्रभु अस्तास गेले. आणि तिच्या दुग्धामृताची फारशी अपेक्षा न ठेवतां तिचे पाठीराखे प्रभु ताज्या मांसावर व जिव्हांवर तृप्ति करविणारे व समाधान मानणारे बनले! एकीकडून जंगलखात्याचा कोंडवाडा, आणि दुसरीकडून कसायांची सुरी. ह्या दोहोंच्या कचाटींतून

---

१ इंग्लिशलोकांच्या मोठमोठ्या मेजवानींत गायीच्या तळलेल्या 'जिभा' हें मोठें उंचें पक्वान्न मानतात. व ह्या प्रत्येकीस दहा दहा रुपये देऊन ह्या विकत आणतात असें ऐकिवांत आहे! काय हें रुचिवैचित्र्य!!

आमचें 'गोधन' कसें काय निभावेल तें दिसतेंच आहे. नाहीं ह्मणावयाला गुजराथी लोकांनीं आपल्या दयाशील स्वभावाप्रमाणें यथाशक्त्या धेनुपालनाची खटपट चालविली आहे. कोचीस प्रसिद्ध व्यापारी **मूलजी जेठा** ह्यांचे कारभारी रा० रा० **वीरजीशेट** ह्यांनीं गायीच्या नांवानें नारळीची जमीन निराळी विकत घेऊन कोणत्याही गाईस प्रत्येक दिवशीं चारापाणी मिळावें अशी तजवीज केली आहे. आलीकडे 'गोरक्षणाची' निघालेली चळवळही ह्या कामास चांगली साह्यभूत झाली आहे. नागपूरच्या 'गोरक्षण' सभेचें काम, तेथील प्रचंड धेनुसमुदाय, त्यांची जोपासना इत्यादि गोष्टी फारच तारीफ करण्यासारख्या व कित्ता वळविण्यासारख्या आहेत. तसेंच धारवाड, मिरज, कोल्हापूर, संकेश्वर येथील 'गोरक्षण' संस्थेचाही उद्योग जारीनें चालू असल्याचें पाहून आनंद होतो. असेंच राजेरजवाड्यांनींही गायींचीं खिल्लारें पाळण्याचें मनावर घेतलें पाहिजे. यायोगेंही आमच्यांतील अशक्तता जाण्यास चांगलें साहाय्य होईल असतु.

आज प्रथम चित्र दिलेल्या सहा पायांच्या अद्भुत गायीची थोडीशी माहिती देण्याचें मनांत आणलें होतें. त्यावरून सामान्यतः गायीविषयीं जे विचार सुचले ते प्रथमतः सादर केले. आतां चालू विषयाकडे वळूं. ही सहा पायांची गाय, उत्तर हिंदुस्थानांतून एक परदेशी घेऊन येऊन तो महाराष्ट्रदेशांतील मुख्य मुख्य शहरीं दाखवीत फिरत आहे. व त्यावर पैसा, अधेला जें काय मिळेल, तें घेऊन तो आपला व त्या लोकविलक्षण गायीचा चरितार्थ चालवीत आहे. ह्या गायीच्या शरीररचनेमध्यें अद्भुत गोष्ट ह्मणून ही कीं, तिला सहा पाय आहेत. ह्मणजे इतर गायींप्रमाणेंच तीस चार पाय असून मागल्या पायांच्या मध्यें आणखी दोन पाय आहेत. हा अधिक असलेल्या दोन पायांचा आकार, खूर ढोंपरांसुद्धां हुबेहुब मागील पायांसारखाच आहे. परंतु ते पाय किंचित् आंखूड असल्यामुळें जमिनीस लागत नाहींत. वर अधांतरी लोंबत असतात.

ही गाय पुढून पाहिली तर इतर गायींप्रमाणेंच असून मोठी तेजस्वी व आंगापिंडानें मजबूत दिसते. मुद्राही मोठी शांत व रमणीय आहे. त्यावरून तिच्या मागचा आकार इतका विलक्षण व अद्भुत असावा असें कांहींसुद्धां मनांत येत नाहीं. तथापि मागील ढुंगणाकडचा आकार

फार विलक्षण आहे. मागील दोन पायांच्या मध्यंतरीं दुसरे दोन पाय असल्याच्या योगानें मागील देहाचे दोन भाग असून ते एकत्र सांधल्याप्रमाणें आकार झालेला आहे. त्यामुळें मागील पुष्ठा स्वाभाविक आकाराहून पुष्कळ रुंद दिसतो. व तेथील अवयवांत मनस्वीच फरक झालेला आहे. ह्मणजे मूत्रेंद्रियें दोन असून त्यांपैकीं एक उजव्या पायाकडे व एक डाव्या पायाकडे अशीं आडव्या रेषेंत आहेत. पण त्या प्रत्येकाचा आकार, स्वाभाविक इंद्रियाहून बराच लहान व संकुचित आहे. पण त्याहून दुसरा चमत्कार हा कीं, तीस मलद्वार मुळींच नाहीं! शेण व गोमूत्र असलेल्या द्वारांपैकीं, कधीं उजव्यांतून व कधीं डाव्यांतूनही पडतें! कासा दोन मध्यभागीं सांधल्यासारख्या असून स्तन आठ आहेत. ह्या विलक्षण शरीररचनेमुळें तिचे मागील पाय फार फांकले जातात, व मध्यें आणखी दोन पाय लडबडत असल्यामुळें तीस चालण्यास फार प्रयास पडतात. ह्यास्तव तिचा धनी तीस एका गाडीवर घालून सर्व शहरांतून फिरवितो. त्या गाडीवरच तिला खाण्यासाठीं तिच्यापुढें चारा घातलेला असतो, व ऊन्ह लागूं नये ह्मणून तिच्यावर मंडपासारखी सांवली केलेली असते. तिच्या मागच्या अंगावर एक सुशोभित झूल टाकून तिचे मागील सर्व अवयव झांकून टाकलेले असतात. कोणी पैसा अधेला दिला, ह्मणजे तिचा तो धनी; ती झूल एका बाजूस करून ती विचित्र शरीररचना सर्वांस दाखवितो. ह्या गायीबद्दल त्यास माहिती विचारली असतां, तो विशेष सांगत नाहीं. फक्त अलहाबादेस आपणास कोणी एकानें दान दिली इतकेंच सांगतो.

संकेश्वर येथील गोरक्षणसभेचे सेक्रेटरी आह्मांस भेटले होते. त्यांनीं त्यांच्या गायीच्या कळपांत एक गाय स्तनाशिवाय असल्याचें सांगितलें. ह्या गायीस कास आहे. परंतु दूध बाहेर येण्यास स्तन किंवा छिद्रें मुळींच नाहींत. ही गाय दोन वेळ व्याली. परंतु वांसरांस दूध मुळींच न मिळाल्यामुळें तीं क्षुधेनें मरण पावलीं. ही गाय गाभणी झाली ह्मणजे कास चांगली मोठी होते, परंतु उपयोग काय? आमच्या मतें त्या सभेनें थोडी अधिक खटपट करावी. ह्मणजे त्या कासेस छिद्रें पडतात किंवा नाहीं, ह्याचा एखाद्या नामांकित डाक्टराकडे शोध करावा. आणि पडत असतील तर त्या छिद्रांस रबराचे स्तन जोडावेत ह्मणजे कार्य

होईल. हा एक यत्न आहे. चांगली कुशलता पाहिजे. दुसरें, तेंही साधत नसल्यास झालेलीं तिचीं वांसरें, दुसऱ्या एखाद्या गायीस, किंवा शेळीस वगैरे पाजण्याची खटपट करावी. ह्मणजे बिचारीं फुकट प्राणास मुकणार नाहींत. आमच्यामतें ही गोष्ट साध्य होण्यासारखी आहे. बरें, इतकेही प्रयत्न निष्फळच होत असतील, तर त्या गायीस पुन्हा गर्भ न राहील अशी तरी तजवीज करावी. ह्मणजे सभेच्या माथीं वत्सहत्त्या तरी बसणार नाहीं. असो. असे विचित्र आकार उत्पन्न करण्यांत परमेश्वराची नजरचूक ह्मणावी? का लीला ह्मणावी? का सृष्टिक्रमांतील कांहीं घोटाळा ह्मणावा? ह्याचा उलगडा होत नाहीं.

प्रतिसांवत्सरिक परमेश्वरप्रार्थना.

श्लोक. (विबुधप्रिया वृत्त.)

लागलें नव वर्ष हें बहु हर्ष वाटतसे मना
कीं जगत्पतिवंदनें अजि पूर्ण होतिल कामना ।
तप्त जे भवकाननीं नर शांतमंदिर हें तया
पाहुनी नत होतसे रत निश्चयें प्रभुची दया ॥ १ ॥
अंत पार न ईश्वरा तुज संतवृंदहि घोकिती
व्यास वाल्मिकि भागले मग त्यांत पामर मी किती ।
धैर्य हें धरितों तरी गुण गावया दृढ अंतरीं
लंघिती गगनांसही खग आपुलें बळ ज्यापरी ॥ २ ॥
दृश्यरूप न ईश्वरा तुज बोलणें भ्रम कूप हा
जीवचालक नेमपालक कोण चिंतुनि हें पहा ।
शोधिती मन बोधिती जन संत सज्जन सर्वदा
त्या तुझ्या नच मूर्ति भाषण कोण काढिल हें वदा ॥ ३ ॥
व्योम विस्तृत सांठलें जणु थोर निर्मळ आरसा
तारका ग्रहमालिका शशिसूर्य मंडळ कीं रसा ।
शोभतें प्रतिबिंब हें तव कोण घेइल वानवा
ज्ञानलोचन लाभले तरि होय ओळख मानवा ॥ ४ ॥

षड्रिपू अति गांजिती वपु नित्य लागुनि पाठिशीं
पीडितो भव केशवा लवलेश पुण्य न गांठिशीं ।
माय तूं प्रभु रायजी तव पाय हा मज आसरा
गाय झाडुनि पाय लोटिल काय वत्सल वासरा ॥ ५ ॥

जोड देउनि साधुची मज तोड हीं भवबंधनें
व्याळसा हरि काळ धाडुनि जाळ षड्रिपुइंधनें ।
पर्वतासम सर्व हें तम भोंवतीं जमलें पहा
झेंप घालुनि हे हरी करिं दूरकीं भ्रमलेप हा ॥ ६ ॥

जाहलीं किति होतिही किति आणि होतिलही किती
थोर घातक पातकें प्रभुराज कोठुनि त्यां मिती ।
लाज सोडुन आज हा तुज सांगतों बहु कोडगा
सत्य हें करुणार्णवा परि शीघ्र ह्यांतुन सोड गा ॥ ७ ॥

कोकिळाप्रति उत्तरोत्तर लागुंदे चढती कळा
आगळा खुलुंदे गळा चिरकाल होउनि मोकळा ।
पंचमस्वर गायनें करुं नित्य तल्लिन वाचकां
देत सन्मति अंगभूपति जेवि इच्छित याचकां ॥ ८ ॥

मस्तकीं कर ठेवुनी वर देईं किंकर पादपा
भार नासुनि गारही करि फार हो तुमची कृपा ।
तारिला गज त्यापरी मज पार्थिचा रज लावुनी
उद्धरा करुणाकरा मग धन्य होइन गाउनी ॥ ९ ॥

गांजलों बहुतापरी भवसागरीं अजि हे हरी
दीन त्वत्पद लीन पाहुनि मुक्तता करिं सत्वरी ।
भक्तमंडल संत सोज्वल तारिले खल गा तसे
छंद सुंदर जाणुनी मतिमंद कोकिळ गातसे ॥ १० ॥

मलबारवर्णन.

तुलापुरुषदान.

(के. को. पु. ९ अं० १२ वरून पुढें चालू.)

ह्यानंतर आचार्य तुलामंडपाची शुद्धि करून स्वारीच्या दरवाजांवर मंगलसूचक तोरणें लावतात. पूर्वेच्या दरवाजावरील तोरण अश्वत्थाचें (पिंपळाचें) असतें, पश्चिम दरवाजावरील वटाचें, दक्षिण दरवाजावरील औदुंबराचें व उत्तर दरवाजावरील पिंपळणीचें व ह्यांतील प्रत्येकावर विष्णूच्या चार शस्त्रांपैकीं एखादें शस्त्र काढलेलें असतें तीं शस्त्रें:—शंख, चक्र, गदा व पद्म अथवा कमल. मग आठ दिग्भागांच्या आठ ध्वजा अथवा निशाणें–उभारतात. ह्यांतील ईशान्येकडील ध्वजा प्रधान अथवा मुख्य होय. नंतर ह्या ध्वजांची मंत्रोक्त शुद्धि होते. इतक्यांत आचार्यांच्या हाताखालील मंडळी १२० पाण्याचे कलश मंत्रून तयार करून ठेवतात; हें पाणी त्या मंडपावर शिंपडतात. मग आचार्य मंडपाच्या मध्यभागीं केलेल्या ओट्यावर बसून लक्ष्मीदेवीची पूजा करितात. नंतर मोठ्या समारंभानें मुद्दाम तयार करविलेलीं तराजूंचीं पारडीं–व एक दांडी घेऊन येतात. व कित्येक होम झाल्यावर त्या कलशांतील पाण्यानें तीं पारडीं व ती दांडी शुद्ध केल्यावर ताजवा उभा करतात. तुलापुरुषप्रतिमा धरून एकंदर ९३ सोन्याच्या प्रतिमा होत्या. ह्यांपैकीं कांहीं मेणानें चिकटविल्या होत्या, कित्येक पारड्यांवर चिकटविल्या होत्या, परंतु वर सांगितलेली मुख्य प्रतिमा दांडीच्या मध्यभागीं म्हणजे कांटा असतो तेथें चिकटविली होती. प्रत्येक पारड्याखालीं एक एक सोन्याचें पाण्यानें भरलेलें भांडें ठेवलेलें होतें. ह्या भांड्यांना रेशमाचें वेष्टन असून त्यांवर फुलांच्या माळा घातल्या होत्या. आठ जपक ब्राह्मण, चार वेद, चारी दरवाजांशीं उभे राहून म्हणतात.

त्यांचा क्रम येणेंप्रमाणें:—ऋग्वेद पूर्वेच्या, यजुर्वेद दक्षिणेकडच्या, सामवेद पश्चिमेकडच्या व अथर्वण वेद उत्तरेकडच्या दरवाजांत बसून म्हणतात. आठ पठक हे रामायण, महाभारत व भागवत इत्यादि विषयक पुराणें वाचतात. ह्या दिवशीं रात्रीं महाराजांदेखत आचार्य तुलेची पूजा करतात व ह्यानंतर महाराजांकडून बारा ब्राह्मणांस भोजन व द-

क्षिणा देवविंतात. मग महाराज, आचार्य व इतर उपाध्यायांसह तुलामंडपांत येतात. व येथें आचार्य आठ दिक्पालांची ह्मणजे इंद्र, अग्नि, यम, निर्ऋत, वरुण, वायु, कुबेर व ईशान ह्यांची त्या त्या दिग्भागाकडे तोंड करून पूजा करितात. तसेंच नैर्ऋत्य व ईशान्य ह्या दोन दिशांस ब्रह्मा व अनंत ह्यांची पूजा होते. मग महाराज पुष्परचना करितात ह्मणजे ह्या वर सांगितलेल्या आठ देवतांना, ब्रह्मा व अनंत ह्यांस, व शेवटीं तुलेसही पुष्पें वाहतात. ह्यानंतर प्रार्थना करून महाराज आपल्या राजवाड्याकडे जातात.

आठवा दिवसः—ह्या दिवशीं आचार्य मोठ्या पहांटेस तुलापुरुष प्रतिमेची पूजा करितात व त्यानंतर स्नान करून शुचिर्भूत झालेले व शास्त्रोक्तरीत्या शुभ्र वस्त्र परिधान केलेले असे महाराज देवळांत येतात. येथें पूजा व बलिदान वगैरे केल्यावर महाराज तुलामंडपाकडे जातात. येथें आग्नेयेच्या बाजूस कांहीं ब्राह्मण महाराजांवर 'पुण्याहम्' नामक विधीनें तयार केलेलें पाणी—शिंपडतात. मग महाराज एका बाजूच्या खोलींत जातात. ह्या खोलींत रुप्याचीं फुलें ठेवावयाचीं पात्रें ठेवलेलीं असतात, व ह्या पात्रांत महाराज धान्याचे 'नऊ कण' पेरितात. व येथेंच आचार्य त्यांच्या आंगाला नऊ ताज्या पाण्याच्या कलशांतील पाणी उटणें ह्मणून लावतात. ह्यावर महाराज राजवाड्यांत जाऊन कपडे बदलून परत देवळांत येतात. ह्या वेळेस ह्या समारंभाकरितां मुद्दाम तयार केलेलीं कांहीं उंची उंची भूषणें घालतात व ह्याशिवाय हिरे माणकेंही घातलेलीं असतात. त्यांच्या उजव्या हातांत तेथील गादीची तरवार व डाव्यांत एक तेगा व चित्त्या वाघाच्या कातडीची केलेली गादीची ढाल असते. अशा पोषाखानिशीं देवळांतील एका मोठ्या सोनेरी निशाणाजवळ आल्यावर एक हत्ती दान करितात. व तसेंच देवळाच्या अंतर्भागांत आल्यावर सोन्याचीं नाणीं, रेशमी कपडे व रत्नें, जवाहीर वगैरे वांटतात. मग 'सिवाइ' मंडपाला प्रदक्षिणा घातल्यावर महाराज पुनः तुलामंडपांत येतात. येथें आल्यावर तुलेला तीन प्रदक्षिणा केल्यावर व नमस्कार घातल्यावर कांहीं दानें करितात. ह्याजवर सर्व उपाध्यायांस व आपल्या वाडवडिलांस नमस्कार करून त्यांची हा विधि करण्यास परवानगी मागतात. नंतर पश्चिमे-

कडच्या पारड्यांत महाराज चढतात. ह्यावेळीं त्यांच्या उजव्या हातांत यमाची व डाव्यांत सूर्याची प्रतिमा असते. लागलीच एक ताजीच्या ताजी फणसाच्या लांकडाची फळी असते, तीवर रेशमाचें वस्त्र टाकिलेलें असतें, त्यावर महाराज पूर्वाभिमुख होऊन बसतात. मांडीवर तलवार व ढाल घेतलेली असते, असें बसल्यावर महाराज कांहीं मंत्र ह्मणतात; नंतर दुसऱ्या ह्मणजे पूर्वेकडच्या पारड्यांत सोनें घालतात. हें कांहीं गट व कांहीं नाणीं मिळून घातलेलें असतें. हें सोनें इतकें घातलेलें असतें कीं तें पारडें ह्या भारानें जमिनीस लागतें व महाराज ज्यांत असतात तें खूप वर जातें. ह्यावर महाराज खालीं उतरतात व पूर्वेकडे तोंड करून तें सोनें तुलापुरुषप्रतिमा व दुसऱ्या कांहीं प्रतिमा ह्यांना एका पसरट पाण्यानें भरलेल्या भांड्यांत ठेवून त्यांस गंधपुष्पें वाहतात. मग प्राणायाम करून सर्व ब्राह्मणजातीस त्या (पसरट) पात्रांतील तें सोनें वांटतात. ह्यानंतर आचार्य ह्या समारंभाकरितां ज्या देवतांचें आवाहन करितात त्यांचें विसर्जन करून, मंडपाच्या वायव्येस ठेवलेला 'अवभृथ' कलश घेऊन त्यांतील पाण्याचें महाराजांस उटणें लावतात. पुनः एकदां 'पुण्याहवाचनाचें पाणी महाराजांवर शिंपडल्यावर महाराज आचार्यांस, इतर याज्ञिकांस व दुसऱ्या ब्राह्मणांस नमस्कार करितात व त्यांचा आशीर्वाद घेतात. मग महाराज मोठ्या समारंभानें त्या मंडपांत प्रदक्षिणा करितात व सोन्याच्या निशाणाजवळ आल्यावर आचार्यांस व इतर याज्ञिकांस निरोप देतात. पुनः देवळांत जाऊन पूजा केल्यावर व दक्षिणा दिल्यावर राजवाड्यांत परत जातात. ह्याप्रमाणें तुलाभारविधि समाप्त होतो. ह्या सर्वांत ध्यानांत ठेवण्याजोगी गोष्ट ही कीं, हा सर्व समारंभ वैदिक धर्तीवर असून हल्लीं जसा हिंदुधर्म प्रचारांत आहे तशाप्रमाणें दिसत नाहीं. कारण वेदांत आलेले इंद्र, अग्नि, वरुण, वायु, ह्याच ह्यांतील देवता आहेत. व तशींच यज्ञांत जीं याज्ञिकांच्या कर्माप्रमाणें त्यांस निरनिराळीं नांवें असतात, तींच नांवें ह्या समारंभांतील याज्ञिकांनाही दिलेलीं असतात.

तुलेच्या पारड्यांतील एकंदर सोन्यापैकीं $\frac{3}{4}$ सोनें—ह्या याज्ञिकांत वांटतात. तें येणेंप्रमाणें:—

१ आचार्य यांस $\frac{1}{4}$ पैकीं $\frac{3}{5}$ ह्मणजे एकंदर सोन्याचा बारावा हिस्सा.
२ ब्रह्मा, सदस्य व आठ ऋत्विक $\frac{1}{4}$ पैकीं $\frac{1}{5}$,, ,,
३ आठ पठक व आठ जपक..... ,, ,, ,,

ह्यांपैकीं तिसऱ्या वर्गांतल्यांस त्यांचें सोनें सारखें वांटलें जातें, ह्मणजे प्रत्येकास $\frac{1}{5}$ चा $\frac{1}{48}$ भाग सोनें मिळतें. पण दुसऱ्या वर्गांतील ब्राह्मणांचें तसें नाहीं. ब्रह्म्यास $\frac{1}{4}$ चा $\frac{3}{48}$ भाग सोनें मिळतें. सदस्यांस $\frac{1}{4}$ चा $\frac{3}{60}$ भाग सोनें व $\frac{1}{4}$ चें बाकी उरलें तें सोनें आठ ऋत्विकांस थोडेंबहुत सारखेंच वांटलें जातें. परंतु ह्यांतही थोडासा आचार्याचा भाग असतो हें येथें सांगितलें पाहिजे.

ह्यासमयीं पारड्यांतील एकंदर सोनें १८९० कलंजू अथवा १९ $\frac{1}{2}$ मचाती ह्मणजे जवळ जवळ ७९३४.८० तोळे होतें. वर दिलेल्या आंकड्यांवरून मुद्दाम आणवलेल्या सोन्यापेक्षां हें सोनें २६६. तोळे जास्त आहे हें दिसून येईल. ह्या अधिक सोन्याचा खर्च सरकारी खजिन्यांतून यावयाच्या अगोदर महाराजांनीं आपल्या खासगी खजिन्यांतून पुरविला होता.

प्रत्येक याज्ञिकाच्या वांटणीस सोनें आलें तें येणेंप्रमाणें:—

आचार्य (पहिल्या वर्गांतील).....	६६१.०७	तोळे.
,, (दुसऱ्या ,,).....	५०.९	,,
मिळून	७११.९७.	,,
ब्रह्मा	११०.१८	,,
सदस्य	९४.४३	,,
आठ ऋत्विकांपैकीं प्रत्येकास	५०.९१	,,
,, जपकांपैकीं ,, ...	४१.३३	,,
,, पठकांपैकीं ,, ...	,, ,,	,,

ह्यावरून पहातां आचार्यांस ७१२ तोळे ह्मणजे अगदीं कमींत कमी १९ रु. तोळाप्रमाणें जरी धरिलें तरी १०६८० रुपये मिळाले. ह्याशिवाय त्यांस दुसरीही पुष्कळ वारिकसारिक मिळकत होते. ह्यांचें आडनांव अथवा 'तरवाद'नांव 'तरून नलूर नंबूरिपाद' असें होतें. हेच पद्मनाभाच्या देवालयांतील व राजकुलांतील मुख्य उपाध्ये होत.

आतां बाकीचें $\frac{3}{4}$ सोनें सर्वसाधारण ब्राह्मणांस वांटतात. माजी

महाराजांच्या कारकीर्दीतील तुलाभाराची दक्षिणा येणेंप्रमाणें होती:—

	दर ब्राह्मणास.
नंबूरी ब्राह्मण—'अध्या' (सरदार) ह्यांस	३ कलंजू
नंबूरी ब्राह्मण—'कर्मी' (जे यज्ञ करतात) त्यांस	२ ,,
साधारण नंबूरी ब्राह्मणांस	१½ ,,
तामिळ ब्राह्मण	¾ ,,
ब्राह्मणांच्या बायकांस व मुलांस	½ ,,

परंतु ह्या खेपेस हा खर्च जरा कमी करण्यांत आला होता. तो असा:—

'अध्यां' स व 'कर्मी'स	२ कलंजू
साध्या नंबूरी ब्राह्मणांस	१¾ ,,

बाकीची ह्मणजे तामिळ ब्राह्मण त्यांच्या बायका व मुलें ह्यांसंबंधीं पूर्वीप्रमाणेंच होती. ह्याशिवाय मोठमोठ्या नंबूरी सरदारांस त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें मिळते. कित्येकांस १०० कलंजू दक्षिणा मिळते. जे तामिळ ब्राह्मण वेद व शास्त्र ह्याविषयींच्या परीक्षा पास होतात त्यांस सामान्य तामिळ ब्राह्मणांपेक्षां प्रत्येकीं ¾ कलंजू दक्षिणा ज्यास्त मिळते. मोठमोठ्या पंडितांस व वैदिकांस फारच मोठी दक्षिणा मिळते. मागच्या तुलाभाराच्या वेळीं ह्या दक्षिणांपैकीं अगदीं मोठी ह्मणजे ४५ कलंजूंची होती पण ह्यावेळीं ती १६ किंवा २० कलंजूच होती.

कित्येक इनामदार किंवा जमीनदार ह्या नात्यानें सरकाराशीं वंशपरंपरेनें अगदीं बांधलेले असतात, अशांची दक्षिणा पूर्वीपासूनच ठरलेली असते—शिवाय महाराज आपल्या चाकरनोकरांस त्यांची नोकरी वगैरे पाहून थोडथोड्या देणग्या देतात. पण हें सोनें दुसऱ्यांस द्यावयाचें झालें तर त्या किमतीचे पैसेच देतां येतात; सोनें तसेंच्या तसेंच देऊं ह्मटलें तर चालावयाचें नाहीं. कारण हें सोनें ब्राह्मणांसच द्यावयाचें असल्यानें त्याचा दुसरीकडे मुळींच उपयोग करतां कामा नये; अशी तिकडची वहिवाट आहे. पूर्वीच्या महाराजांनीं हा नियम इमानेंइतबारें पाळला होता व हल्लींचे महाराजही त्यापासून ढळले होते असें नाहीं. ह्या महाराजांनीं नेहमींप्रमाणें दयार्द्रबुद्धीनें आ-

पल्या परिचयांतील युरोपियन गृहस्थांस ह्यांतील कांहीं नाणीं नजर केलीं. मुख्यत्वेंकरून लॉर्ड नेपियर व ड्यूक ऑफ एडिंबरो ह्यांस आपआपल्या दिवाणखान्यांत ठेवावयास हीं नाणीं ह्मणजे मोठ्या चिजा झाल्या असतील. ह्या पुढील दिलेल्या कोष्टकांत पूर्वीच्या व हल्लीं तुलाभाराच्या वेळीं दिलेल्या दक्षिणेची खर्चाची तुलना केली आहे. ह्यांतील 'कलंजू' ह्मणजे ७८·६९ ग्रेन्स किंवा जवळ जवळ $\frac{5}{7}$ तोळा व 'मांचांति' ह्मणजे ३·९७९ ग्रेन्स होत.

ब्राह्मणांचीं नांवें.	तुलाभार १८५० तील		तुलाभार १८७० तील	
	कलंजू.	मां.	कलंजू.	मां.
१ आचार्य व दुसरे सव्वीस याज्ञिक ज्यांनीं हा समारंभ चालविला होता ते	५७३१	१	४५३७	१४½
२ मोठे नंबूरी संस्थानिक व सरदार.	८४६	५	७१२	१०
३ नंबूरी व कानडी ब्राह्मण.	४७७८	१०	३६२६	१५
४ तामिळ ब्राह्मण.	३६६६	५	२८४५	१५
५ ,, बायका, मुलें वगैरे.	१२४३	५	१४१६	५
६ ,, ब्राह्मण व पंडित व वेदशास्त्रांच्या परीक्षेंत पास झालेले.	३७०७	०	२७९०	१०
७ मित्र, चाकर, नोकर इत्यादिकांस	२८६७	२½	कळलेली नाहीं.	
मिळून.	२२९२४	८½	.....	...
वजनाचें एकंदर सोनें.....	२२९२४	३	१८१५०	१९
शिलक.	८४	१४½	.....	...

वरील कोष्टकावरून कळून येईल कीं तामिळ बायकांमुलें ह्यांस दिलेल्या दक्षिणेचा खर्च शिवायकरून बाकी सर्वांच्या दक्षिणेचा खर्च हल्लींच्या तुलाभारानें कमी केलेला दिसतो. तसेंच एकंदर खर्चाचा आंकडाही पूर्वीपेक्षां कमी असून व नंबूरी, कानडी ब्राह्मण व पंडित ह्यांची प्रत्येकीं दक्षिणाही कमी केली होती. ह्याशिवाय एकाएकीं ह्या तुलाभाराचा दिवस बदलल्यामुळें एकंदर खर्चाचा आंकडा फार कमी झाला आहे. दुसरें असें कीं, 'मुरजपम्' हा समारंभ नुक्ताच झाला असल्यामुळें नंबूरी सरदारांच्या प्रवासाचा खर्च, छपरीं उभारण्याचा खर्च, व मेजवानीचा वगैरे खर्च हे अजीबात करावे लागले नाहींत. एकंदर खर्च

१९५४२७ रु. झाला. शिवाय बारिकसारिक हिशोबांत न धरलेले जर धरलें तर एकंदर ठोक रक्कम १६०००० रु० खर्च होते. 'हिरण्यगर्भ'-समारंभही गादीवर बसावयाच्या आधींच करावा लागतो. त्याचा खर्च अदमासें १४०००० रु. असतो.

पुस्तकपरीक्षा.

श्रीरामचरित्र—अध्यात्मरामायण समूल सान्वय सरलार्थ रा. रा. गो. वि. **फडके** श्रीमद्भागवतार्थदर्शनकर्ते ह्यांनीं स्वतंत्र तयार करून छापविल्याचें आह्मीं आमच्या वाचकांस पूर्वी कळविलेंच आहे. परंतु तें पुस्तक मोठें असून किंमत फार आहे; व ज्यांस संस्कृतांत विशेष गति नाहीं, किंवा बायकामुलांसारख्यांस मूळाची विशेष आवश्यकता नाहीं, अशासारख्यांस तें चरित्र सरळ बखरीसारखें वाचावयास मिळावें ह्मणून त्यांतील अर्थ मात्र एकत्र करून त्याचें हें वेगळें पुस्तक छापविलें आहे. त्याप्रमाणें सरळ वाचावयास बरें पडतें. भाषाही चांगली आहे व प्रस्तावनेंत रामचरित्रापासून काय काय गोष्टी शिकण्यासारख्या आहेत, त्या फार मार्मिकतेनें सांगितलेल्या आहेत. ह्या पुस्तकाची किंमत २ रुपये आहे. तथापि **केरळकोकिळवाचकांस** तें त्यांनीं १। रुपयास देण्याचें कबूल केलें आहे. रामायणासारखी पवित्र व बोधपर कथा पुराणांतरीं सुद्धां क्वचितच सांपडेल, ह्यास्तव ही संधि साधण्याचें ज्या रसिकांच्या मनांत असेल त्यांनीं पुस्तककर्त्याकडे किंवा के. को. च्या मालकांकडे मागणी करावी.

इंदूर संस्थान भाग १ ला—वर्तमानपत्रें हीं प्रजेच्या सुखदुःखांचीं तोंडें आहेत, आणि त्यांचें यथायोग्य कर्तव्य बजावणें मोठें जोखमाचें काम आहे. तें पतकरण्यास मोठा धैर्यवान् पुरुष लागतो. कारण, प्रसंगवशात् एखाद्या सरकारी कामदाराचा किंवा संस्थानांत चाललेला जुलूम किंवा कृष्णकारस्थानें उघडकीस आणावीं लागतात. तो प्रयत्न कधीं कधीं सफल होऊन लोकांचें कल्याण तरी होतें, नाहीं तर फसून आपल्यावरच संकट गुदरण्याचा प्रसंग येतो. अशापैकीं एक काम मुंबईच्या 'विक्षिप्त' पत्रकर्त्यांनीं बऱ्याच दिवसांपासून अंगीकारिलें आहे. तें काम हेंच कीं, इंदूर संस्थानाधिपति श्रीमंत बाळासाहेब होळकर आपल्या राज्यांतील प्रजेवर मनसोक्त जुलूम करून आपल्या सत्तेचा कसकसा दुरुपयोग करतात ती बातमीदाराकडून बातमी आणवून ती पुराव्यासह प्रसिद्ध करीत

असतात. त्याचाच हा पहिला भाग आहे. व तो त्या पत्रकर्त्यांनीं त्या महाराजांसच नम्रपणानें अर्पण केला आहे; व तेणेंकरून त्या चाललेल्या जुलुमांचा प्रतिहार व्हावा अशी त्यांची इच्छा आहे. आणि तसें न होईल तर, तें होईपर्यंत अशा वर्णनाचे जितके भाग होतील तितके करून सारखे प्रसिद्ध करीत रहावयाचें असा त्यांनीं विडा उचलला आहे! आणि त्याप्रमाणें दुसरा भाग प्रसिद्ध झाल्याचेंही ऐकतों.

ह्यांतील जुलमांचें व लहरींचें वर्णन करतांना कडक शब्दांचा उपयोग केला आहे, पण त्यास उपाय नाहीं. कोणताही पक्ष स्वीकारला ह्मणजे तसा आवेश येणें साहजिक आहे. रस्त्यानें चाललेल्या तरुण स्त्रियेस धरून आणून तिचें वपन करणें, भंग्यास ब्राह्मणाचा पोषाख देऊन ब्रह्मवृंदास नमस्कार करावयास लावणें, रस्त्यावरून चाललेल्या मनुष्यास विनाकारण चापटपोळ्या लगावणें, भर बाजारांत वांकुल्या दाखविणें, असलीं कृत्यें करण्याचें काम खरोखर भ्रमिष्ट मनुष्यावांचून दुसरें कोणी करणार नाहीं. आतां ह्या विक्षिप्ताच्या बातमीदाराच्या लेखांत कांहीं तथ्यांश आहे का अजिबात सारें प्रतिकूल पक्षाकडून ढोंग माजलेलें आहे, हा एक मोठा वादग्रस्त प्रश्न ठरतो. व ज्या अर्थी महाराजांकडून अथवा इतर कोणाही तत्पक्षीयांकडून, किंवा खुद्द दिवाण बहादूर खंडेराव चिमणाजी यांजकडूनही अद्याप उत्तर ह्मणून येतच नाहीं, त्या अर्थी तो संशय दृढ होण्याला मोठेंच कारण होतें. शिवाय, लोक पराचा कावळा करतात, हें जर कबूल केलें, तर त्याबरोबरच प्रथम पर तरी असला पाहिजे हें ह्मणणें कबूल करणें भाग पडतें. राष्ट्रीयसभेविषयीं कळकळ प्रदर्शित करणें, ग्रंथकारांस नवीन ग्रंथ करण्यास उत्तेजन देणें, असलीं कृत्यें भ्रमिष्ट राजाकडून कधीं व्हावयाचीं नाहींत. व तीं श्रीमंत होळकर सरकाराकडून होत आहेत. ह्यावरून ते भ्रमिष्ट नसावेत. तर, आमच्यामतें त्यांचा स्वभाव फार तापट व रागीट असावा. कारण, रागांत सुद्धां मनुष्याला भान रहात नाहीं. आणि सत्ताधीशाच्या अंगीं राग असणें मोठें वाईट. ह्यास्तव तसें असेल तर श्रीमंत होळकर सरकारास आमची नम्रपणें अशी विनंती आहे कीं,

"भल्यानें कोप सांडावा शांतीनें असतां बरें"
"क्षुल्लकें कोप पाळावा भल्याचें काम तो नव्हे ॥"

हें समर्थांचें वाक्य लक्षांत ठेवून असेल तर आपल्या तापट स्वभावास आळा घालावा, आणि खरी हकीगत असेल ती बेलाशक प्रसिद्ध करावी. मुग्धस्थिति कोणासही इष्ट नाहीं. विक्षिप्ताच्या लेखाप्रमाणें खरोखरच झोटिंगबादशाही चालू

असेल—परमेश्वर करो आणि तसें नसो—तर विश्वासकर्त्याचा चालू क्रम फार तारीफ करण्यासारखा आहे, असेंच झटलें पाहिजे. पण इतकी आंधळ्यानें दळून कुत्र्यानें पीठ खाण्याची वेळ इंग्रज सरकारच्या राज्यांत आजमितीस आली असेल असें झणण्यास मन धजत नाहीं.

कै० प्रि० गोपाळ गणेश आगरकर ह्यांचें चरित्र—हें लहानसें पुस्तक रा. रा. जगन्नाथ धोंडू भांगले ह्यांनीं लिहिलें आहे. ह्यांत आगरकरांच्या गुणांचें चांगलें वर्णन करून त्यांच्या संबंधानें बरीच माहिती दिली आहे. आणखी विशेष हें कीं, पुनाळेकर आणि मंडळी, ठाकुरद्वार, मुंबई ह्यांनीं त्याच्या २००० प्रती फुकट वांटण्यासाठीं ठेवल्या आहेत. फार परोपकाराचें कृत्य आहे. सत्पुरुषाच्या कृतीचें चित्र सर्वांच्या नजरेसमोर असावें.

समाधान—दत्त आणि दासमंडळी पुस्तकमाला. भाग १—ह्यांत 'विचारमाला' 'श्रीगुरुचरित्रकथासारांश' व 'प्रार्थना' अशीं तीन पद्यात्मक प्रकरणें आहेत. पहिल्या प्रकरणांत 'नको' चें आख्यान आहे. दुसऱ्यांत श्रीदत्तकथेचें सार आहे, आणि तिसरींत एक भूपाळी आहे. ह्याचें गुणदोषविवेचन करण्यापूर्वी एक दोन सूचना करणें इष्ट दिसतात. पहिली सूचना ही कीं, दस्तऐवजाची गोष्ट आणि काव्याची गोष्ट सारखी आहे. दस्तऐवजामध्यें जसें प्रत्येक वाक्य निःशंक व निश्चित पाहिजे, तसेंच काव्यांतील वाक्यही निःशंक व निश्चित पाहिजे. दस्तऐवजांत जसा खोगीरभरतीचा शब्द खपत नाहीं, तसाच कवितेंतही खोगीरभरतीचा शब्द खपत नाहीं. दुसरें, कवितेमध्यें होईल तितका प्रसाद आणण्याचा प्रयत्न करावा. केवळ 'ट' 'स' 'ट' जोडलें झणजे कवितेचें काम झालें असें समजूं नये. कवितेचें काम वाटतें तितकें सोपें नसतें. प्रस्तुत पुस्तकांतील प्रथमच्याच प्रकरणांतील कित्येक विधानें पहा:—

पुण्याची मनिं कामना धरुं नको मूर्खांत बैसूं नको ।
देहाचें सुख दुःख तें गणुं नको चिंता भवाची नको ॥
नाना नेम नको व्रतें करुं नको कर्मांत गुंतूं नको ।
श्रीनारायणनामसार जपतां जन्मास येऊं नको ॥ १ ॥

ह्यांत 'पुण्याची कामना धरूं नको' तर कशाची पापाची धर? 'देहाचें सुख दुःख तें गणुं नको' हें तत्त्व सांगणें फार सोपें आहे. पण कवीस वृश्चिकदंश झाल्यानंतर मग अनुभव विचारावा? 'आई आई आणि देवा देवा' कांहीं थांबावयाचें नाहीं. 'चिंता भवाची नको' झणजे आजपर्यंत साधूंनीं जी चिंता

वाहिली आहे ती व्यर्थच ह्मणावयाची ! 'नाना नेम नको' असत्य भाषण करावयाचें नाहीं; अपशब्द उच्चारावयाचा नाहीं इत्यादि बंधनें कांहीं कामाचीं नाहींत. आपलें मुक्तद्वार असावें. 'मनःपूतं समाचरेत्' ! पण खरें रहस्य जें आहे तें शेवटच्या चरणांतः—

"श्रीनारायणनामसार **जपतां** जन्मास येऊं नको."

श्रीनारायणनामसाराचा जप चालू असतां जन्माला येऊं नकोस. तो बंद पडल्यानंतर जन्मास आलास तर कांहीं मोठीशी फिकीर नाहीं ! 'आप्तांशीं ममता नको' तर कोणाशीं शत्रूशीं पाहिजे ? 'मैत्री जनाची नको' जनाची मैत्री नको; तर कोणाची पशूची करावयाची कीं काय ? 'नाना ग्रंथ नको' ठीक. येवढें हें 'समाधान' घेऊन बसा ह्मणजे झालें. आणखी 'पोटाची हृदिं काळजी धरुं नको' भूक लागली तरी माधुकरीला जाऊं नकोस. कवी ताट वाढून पुढें ठेवतील ! तसेंच 'संसारीं **लघु** कामना करूं नको' केलीस तर मोठीशी तरी कामना कर. असें एक, आणि दोन. 'नको' सारें प्रकरण अशाच प्रमेयांनीं भरलें आहे. आतां शब्द खेंचण्याची खुबीः—

"चिंता शोक नको **परार्थ** करितां लोकांस लाजूं नको."

ह्यांत 'परार्थ' ह्याचा अर्थ काय ? 'परोपकार' असा कवीचा आशय आहे. पण तशा अर्थाचा त्यांत संपर्क सुद्धां नाहीं.

"चित्तीं राग नको **उमावर** महा वैराग्य सोडूं नको."

ह्यामध्यें 'उमावर' हा शब्द कोठें लावावयाचा ? बिचारा त्रिशंकूसारखा अधांतरीं लोंबत राहिला आहे ! त्याच्या हातास रज्जुखंड कधीं लागेल तो लागो.

"ब्रह्मानंद निमग्न चित्त असतां **कांहींच कांहीं** नको."

'कांहींच कांहीं' हें शब्दलाघव फार संस्मरणीय आहे !

"लोकीं तूं खळ दुष्ट नष्ट भलत्या **संगांत** बैसूं नको."

'संगांत' बसावयाचें तें कसें ? असो. तात्पर्य काय, 'घरोघर झाले कवी, नेणें प्रसादाची चवी' अशांतलाच प्रकार झाला आहे. दुसरे व तिसरे प्रकरणांतील कवित्व ह्याहून पुष्कळ अंशानें बरें आहे. पूर्वीच्या सूचनांकडे प्रस्तुत कवि लक्ष्य पुरवितील तर, त्यांच्या कविता ह्यापुढें पुष्कळ अंशानें बऱ्या होण्याचा संभव आहे.

श्रीमद्भागवतार्थदर्शन—हें मासिकपुस्तक रा. रा. **गणेश महादेव जानोरीकर,** आपल्या **'आर्यसेवक'** छापखान्यांत छापून मुंबई येथें प्रसिद्ध करीत असल्याचें, व त्यावर आह्मी अभिप्राय दिल्याचेंही आमच्या वाचकांस स्मरण

असेलच. तें श्रीमद्भागवताच्या सरलार्थाचें काम संपूर्ण होऊन तो सबंध बांधविलेला ग्रंथ, त्यांनीं आह्माकडे पाठवून दिला ह्याबद्दल त्यांचे आह्मी फार फार उपकारी आहों. ह्या प्रचंड ग्रंथाचे, सोयीसाठीं सहा विभाग करून त्यांचीं सहा निरनिराळीं पुस्तकें बांधविलीं आहेत. ह्या ग्रंथाच्या चांगुलपणाबद्दल पूर्वीच आह्मीं लिहिलें आहे. प्रथमतः मूळ श्लोक मोठ्या ठळक टाइपांनीं देऊन त्याखालीं मध्यम टाइपांत अन्वय, कंसांत अध्याहृत शब्द व अपरिचित शब्दांचे अर्थ; व त्याखालीं श्रीधरी टीकेस अनुसरून मराठी सरलार्थ उत्तम रीतीनें व्यक्त केला आहे. मधून मधून गहन वाक्यांचें स्पष्टीकरण; शंकासमाधानानें कंसामध्यें केलें आहे. आणखी, प्राकृत टीकाकारांचे श्लेषार्थदर्शक वगैरे चमत्कृतीचे श्लोकही टीपेमध्यें दाखल केले आहेत. त्यामुळें हा ग्रंथ विशेषच समाधानकारक बनला आहे, असें पुन्हाही एकवार सांगण्यास आह्मांस मोठा संतोष वाटतो. हा एवढा महत्त्वाचा ग्रंथ असून त्याची किंमतही अगदीं थोडी—ह्मणजे केवळ १८ रुपये ठेविली आहे, आणि 'केरळकोकिळ'च्या वाचकांस त्यांतही दोन रुपयांनीं कमी देऊं असें त्यांनीं सुचविण्याविषयीं आह्मांस कळविलें आहे. करितां आमच्या वाचकांपैकीं ज्यांस सार्थ भागवत वाचण्याची इच्छा असेल, व ज्यांस हा ग्रंथ घेण्याचें सामर्थ्य असेल, त्यांनीं ही संधि व्यर्थ दवडूं नये अशी आमचीही त्यांस शिफारस आहे.

पत्रव्यवहार.

वाढदिवसाची भेट.

आर्या.

विद्वज्जन-नुत-सत्य-प्रिय, केरळकोकिला तुझा घडला ।
भेटीचा लाभ, मला तेणें संतोष मानसीं झाला ॥ १ ॥
ईश-कृपेनें लागे, सद्रत्ना हें तुला दशम वर्ष ।
पाहुनि सर्व जनांच्या चित्तीं, अत्यंत दाटला हर्ष ॥ २ ॥

---

१ रा. रा. गोविंद विष्णु फडके हे भाषांतरकर्ते होत. ह्यांनीं महाराष्ट्रबांधवांकरितां एक मोठीच कामगिरी बजावली ह्यांत शंका नाहीं.

२ ग्रंथाची मागणी मात्र आमच्याकडे न करितां रा. **ज. म. गुर्जर** ह्यांजकडे करावी किंवा ग्रंथाच्या मालकाकडे, सोयीस पडेल तशी करावी.

प्रतिमासीं नेमें बहु, येउनि निजजन्मभूमिच्या दूर ।
साहूनि कष्ट, आह्मां देसी संतोष कोकिला फार ॥ ३ ॥
देश-हिता साधाया, अश्रांतश्रम करूनियां, सकलां ।
ज्ञानामृत पाजाया, तिळही आलस्य बा नसे तुजला ॥ ४ ॥
आश्चर्यकर चमत्कृति, दाउनि, परमेश-भक्ति दृढ करिसी ।
मधुर-सुकवितालापें, जनचित्ता तूं खराच गुंगविसी ॥ ५ ॥
सत्साधुचरित्राच्या, कथनें तूं सुखद मार्ग दाखविसी ।
विविध-स्थल-निर्देशें, मित्रा सर्वा जनासि रंजविसी ॥ ६ ॥
अद्भुत विद्युन्मानस– शास्त्राची रीति दाविली विमला ।
आश्चर्य-सरसिं तेणें, मग्न पहा लोक-वृंद हा झाला ॥ ७ ॥
यापरि सद्गुण-धामा सर्वा लोकीं अहा तुवां केला ।
उपकार फार फारचि, मित्रा तो वर्णवे नहीं मजला ॥ ८ ॥
ठेवो तुज सुखि ईश्वर, सज्जन तोषक चिरत्व देऊनी ।
तैसा प्रतिमासिं तुवां, द्यावा संतोष नियत भेटूनी ॥ ९ ॥
तेणें जावों अमुचा, काल सुखामाजि आस ही धरुनी ।
ईशातें विनवीं मी, आस करो पूर्ण ही कृपा करुनी ॥ १० ॥

मु० कल्होळ
ता० चिक्कोडी.
ता० १०-१२-९५.

आपला वर्गणीदार.
विष्णु बाबाजी कुळकर्णी, कल्होळ.

रा. रा. केरळकोकिळकर्ते यांस.

सा. वि. वि. पूर्वी आपण कोकिळांतील लेखद्वारें सुचविल्यावरून मला एक अपूर्व गोष्ट वाटली ती आपणाकडे लिहून पाठविली आहे. मर्जीस वाटल्यास छापण्याची तजवीज करावी.

मी संस्थान **अक्कलकोट** येथें पांच वर्षें इंजिनीयर होतों. **अक्कलकोट** संस्थानापैकीं परगणें **नागणसुर** येथें **चैनप्पा विरबसप्पा** नांवाचा एक सुमारें पांसष्ट किंवा सत्तर वर्षांचा जंगम रहात असतो. तो आपले डोक्यावर लांकडाचा पाऊण इंची जाडीचा एक तक्ता ठेवून त्यावर कोणाचा तरी हात ठेवून व त्यावर शंख ठेवून तोंडानें वाजवितो. एकवेळ तर तक्त्यावर मीं आपला हात ठेविला होता. शंख वाजतांना मला माझे हातांतून मुंग्या आल्याप्रमाणें भावना Sensation होत होती. हें मी तेथें असतांना दरवर्षी पहात होतों.

सन १८८८ सालीं जेव्हां त्यानें याप्रमाणें माथ्यावर ठेवून शंख वाजविला त्यावेळेस तेथें रावसाहेब **नरसो परशराम गद्रे** सबइंजिनीयर, **श्री. गोविंद गणेश जोशी** राजजोशी, रावसाहेब **कृष्णाजी गणेश टिळक** डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेट वगैरे मंडळी हजर होती. कळावें. ता. १.११.९५.

ता. मी त्यावेळीं त्याचा फोटो घेणार होतों परंतु त्यानें ती गोष्ट कबूल केली नाहीं, इतकेंच नव्हे परंतु त्या गोष्टीचा त्या जंगमास अतिशय राग आला म्हणून आम्हीं फोटोचा बेत रहित केला.

आपला. **भालचंद्र सी. थत्ते.** ओव्हरसीयर.

स्वस्ति श्रीः

रा. रा. केरलकोकिललेखकसन्निधौ— ता. ३०।१०।१८९५.

सविनयप्रणामपुरस्सरं विज्ञप्तिः—यन्मया निम्ने लिख्यते तन्महाशयैर्दृष्टश्रुतपूर्वं चेत्तर्हि नात्र विशेषाश्चर्यं प्रस्फुरति । अन्यथा महदाश्चर्यस्थानं वर्तते । वृत्तमेतद्भवतां विश्वमान्ये मासिकपुस्तके महति । न मे महाराष्ट्रभाषालेखने सामर्थ्यं नाप्यांग्लभाषालेखने । मन्मातृभाषा तु कर्णाटीति किंचित्संस्कृतयापि मल्लेखनीनिस्सृतत्वादसंस्कृतया भाषया वृत्तांतगौरवालिखामि । मया किलात्रागतेनैकदा "कुतश्चास्या गोः पुच्छश्छिन्नः ?" इति पृष्टेन गोपालेनोक्तम् । "अस्मग्रामविपिने संचरंतीनां गवां पुच्छं वन्या वृक्षाः तंतुवायभ्रामितुरीव, स्पर्शमात्रेण बलवदाकर्षंति । तेनातिव्यथया यतंत्योपि लांगूलमोक्षणं नाप्नुवंति । परँल्लूनवालधय एव गोष्ठमनुधावंति । अथवा यदि गोपालैस्तरुपुच्छयोरन्यतरच्छिद्यते तर्हि मुच्यंते । न केवलं वन्यशाखिनः किंतु तद्भवा मेढयोपि गोमहिष्यादिकान्बाधंते । वर्षे द्वित्रिवारमेवेदृशः प्रसंगस्समापतति(न तु सर्वदा) । ईदृशास्तरव एव लांगूलग्राहं कुर्वंतीति नियमो नास्ति । सर्वे किंशुकपलाशजंब्वादयो गृह्णंति । वृक्षैः छिन्ने लांगूले रक्ताऽभिसृत्यभावात्तच्छुष्यतीति कृषीवला लांगूलच्छेदनं विधास्यंति । अत्रत्यैरुच्यते— यस्मिन् यस्मिन् वृक्षमूले व्याघ्रो जृंभां तनोति; स स वृक्षःपुच्छ ग्राही भवतीति" । मदभिप्रायस्तु प्रायोह्यस्मिन्विद्युच्छक्त्या भवितव्यमिति । अत्र भवंत एव प्रमाणम् । इत्यलं

हेब्बाळ, ता. खानापूर डि. बेळगांव. } पुणेकरोपाह्वनरसिंहशर्मणः(कित्तूर).

PRINTED and published by Janardan Mahadeo Gurjar AT JAVAJI DADAJI'S "NIRNAYA-SAGARA" PRESS, Bombay.

दृष्टीच्या मनुष्यांनीं सुद्धां डोळ्यांत घातल्यास वरील विकार त्यांस विलकूल होणार नाहींत. लहान मुलांस तर हें अत्यंत उपयोगी आहे. १॥ रुपया.

४ गजकर्ण.—नायटे, खरूज, इत्यादि विकार ३ दिवसांत बरे होतात. डबीस ८ आणे.

५ विंचवाचें विष.—हें औषध लावतांच उतरतें. ड. ८ आणे. इतकें औषध ४० मनुष्यांस पुरतें.

वरील औषधि अत्यंत खात्रीच्या आहेत. त्यांनीं हजारों लोकांस गुण आला व नित्य येत आहेत. अनुभवानें तरी पक्की खात्री होईलच. यांशिवाय आमच्या येथें कस्तूरीच्या उत्तम कातगोळ्या, तमाखूच्या अर्कीच्या कस्तूरीमिश्र गोळ्या, उत्तम सुगंधी अत्तरें व ग्रंथोक्त रसायनें, धातूंचीं भस्में, पाक, तेल, घृतें, चूर्णें, आसवद्राव, क्षार, गुटिका, हेमगर्भादि रसायनें इत्यादि औषधें माफक किमतीस मिळतील. पाहण्यासाठीं सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा, तो फुकट पाठवूं, अनुपानपत्रक सोबत पाठवूं. पत्ता सुवाच्य. कोणीं प्रकृतिमान कळविल्यास रोगाचें निदान व योग्य चिकित्सा कळवूं. औषधें रोखीनें किंवा व्ही. पी. नें विकत मिळतील, टपालखर्च वेगळा पडेल. गरीब लोकांस स्वस्त दरानें औषधें देऊं. तीं जाहिरातीचे खालील किंवा वरील पत्त्यावर मिळतील. या औषधांत अपायकारक पदार्थ विलकूल नसून त्यांच्या अप्रतिम गुणकारित्वाबद्दल हजारों सर्टिफिकिटें मिळालीं व मिळत आहेत.

विशेष सूचना.—अलीकडे वर्तमानपत्रांतून आंजर्ले व नजीकच्या मुर्डी वगैरे गांवांतील औषधांच्या नवीन बऱ्याच जाहिराती सुरू झाल्या आहेत व त्यांपैकीं कांहीं जाहिरातींच्या खालीं किंवा वर ज्या सह्या आहेत त्या बहुतकरून आमच्याच नांवासारख्या ग्राहकांस भासण्याचा विशेष संभव आहे. यामुळें कदाचित् ग्राहकांचा घोटाळा होईल. तरी अशा लोकांशीं व त्यांच्या जाहिरातींशीं आमचा कोणत्याही प्रकारें अगदीं संबंध नाहीं. ग्राहकांनीं अवश्य लक्षांत ठेवून

आमचीं औषधें मागणें तीं कृष्णशास्त्री विवलकर वैद्य मु. आंजर्ले, ता. दापोली जि. रत्नागिरी या अगदीं बिनचूक सही व पत्त्यावर मागवावींत.

कृष्णशास्त्री विवलकर वैद्य.

८-१२] पत्ता---मु० आंजर्ले, ता० दापोली, जि. रत्नागिरी.

कर्नाटकांतील औषधि.

आजपावेतों १८ वर्षांपासून वाग्भटादि अनेक ग्रंथांच्या आधारानें मीं स्वतः औषध तयार करून अनेक लोकांस देऊन अनुभव घेतले आहेत. आणि बहुत लोकांकडून दाखले मिळाले आहेत. या कर्नाटक प्रांतांत अनेक वनस्पति मिळत असल्याकारणानें ताज्या वनस्पतींपासून औषधें जेव्हांचे तेव्हां तयार करण्यांत येतात.

१ मदनकामेश्वरी पाक.

या पाकांत ४० वनस्पतींचा समावेश केला असून उत्तम धातुपौष्टिक, शक्तिवर्धक, फार रुचिकर व अनेक रोगनाशक आहे. २४ रु. भार शेरास किंमत रुपये २.

२ प्रवाळ, कस्तूरी, केशरमिश्रित, धातुपौष्टिक, व स्तंभक, अग्निवर्धक, कामोत्तेजक गोळ्या ४२ किंमत रुपये २.

३ **प्रवाळभस्म.** वनस्पतिपुटानें तयार केला आहे. पौष्टिक, पित्तनाशक, धातुवर्धक. दर तोळ्यास किंमत रु. १८४

४ लोहमिश्रित मदनोत्तेजक गोळ्या. गोळ्या ४२ कि. रुपये. २. छातींतील रोग, धातुविकार, नपुंसकत्व, स्वप्नावस्था, रक्तसंबंधी रोग, अग्निमांद्य, मेंदूसंबंधी रोग, इत्यादि अनेक रोग या गोळ्यांपासून नाश पावतात. विशेष माहिती औषधासोबत मिळेल.

सदरहू औषधाचे अनुपानकागद औषधासोबत. औषधाचे किंमतीशिवाय, ट. ख. पडेल. व्ह्याल्युपेबल मार्गानें पाठवून देऊं.

५ उत्तम वेलदोडे. बाजारभावाप्रमाणें पाठवून देऊं.

४] पत्ता. रामप्पा सुब्राव बल्ले. कसबेकर सिरसी.
जिल्हा, उत्तरकानडा.

SPECIAL FOR INDIAN ILLUSTRATED HINDU REGLIGENS WATCHES.

प्रत्यक्ष देव देवतांनींच हृदयसंनिध वास केल्यावर अधर्म किर्तीसा टिकेल.

आर्यधर्माभिमानी लोकांकरितां सचित्र हिंदु घड्याळें.

नमुना मागवा तुसत्या पहाण्यानेंच आनंद तर होईलच होईल, तर मग वापरण्यानें कां न होणार बरें ?

रजिस्टर्ड हिंदु



रजिस्टर्ड वॉच.

देवतांचे दर्शनानें हिंदुधर्माभिमानास भरती नाहींका येणार ? नांव ऐकतांच पहावेंसें वाटतें व पहातांच घ्यावेंसें वाटतें.

हिंदु वॉच. Hindu Watch. हिंदु वॉच.

हिंदु घड्याळें कशीं आहेत, दिसण्यांत सुंदर, खिशांत हलकें, मजबूत, टिकाऊ, अंगचे चावीचें, उघड्या तोंडाचें, बिल्लोरी जाड कांच, भरपूरसबी, ज्युवेल्स, आंतील एकंदर सामान फारच मजबूत, दांडगाईला मुळींच न जुमानतां वेळ बरोबर दाखवितें. तबकडी मिन्याची असून त्यावर रीतीप्रमाणें रोमन आंकडे असून ठळक मराठी आंकडेही आहेत आणि प्रत्येक आंकड्यामध्ये हिंदुपूज्य देवतांचीं सुंदर चित्रें आहेत. श्रीगणपती, सरस्वती, रामदासस्वामी, हनुमंत, रामसीता, लक्ष्मीनारायण, गरुड, अष्टभुजादेवी, विठ्ठलरखुमाई, शंकरपार्वती, अक्कलकोटस्वामी, श्रीगुरुदत्तात्रय, आणि मध्यभागीं, महाराष्ट्रास जिवंत करणारे गोब्राह्मणप्रतिपालक श्रीशिवाजीछत्रपतीमहाराज यांचें सुबक चित्र आहे. अशीं हीं अपूर्व हिंदु घड्याळें आमचे देशबांधव व भगिनी काय ह्मणून न घेतील !

हिंदु सचित्र टाईमपीस यांत देवतांचीं १७ चित्रें असून महाराष्ट्रवीरमणि श्रीशिवराज हे दरबारी थाटानें मध्यभागीं बसले आहेत.

हिंदु सचित्र आर्मीटाईमपीस यांत पूज्य देवता आपआपले वाहनावर सशस्त्र बसल्या असून मध्यें श्रीशिवाजीछत्रपती हे अश्वारूढ सशस्त्र आहेत.

हिंदु सचित्र शंकरटाईमपीस, प्रत्येक आंकड्यामध्यें पूज्यदेवतांचीं सुंदर चित्रें असून मध्यभागीं श्रीशंकर पार्वतीसह व्याघ्रांबरावर बसले आहेत.

हिंदु सिलेंडर पिक्क नी. सी. वॉच किं. रु. ८॥ ते. १० ग्या. वर्ष १
हिंदु लिव्हर प्रीव्हेन्स नी. सी. वॉच किं. रु. १५ ग्यारन्टी वर्षें २
हिंदु रासकोप सिस्टीम नी. सी. वॉच किं. रु. १७ ग्या. वर्षें ३
हिंदु प्रिव्हेलन्स चांदीचें वॉच किं. रु. २५ ते ३० ग्या. वर्षें ४
हिंदु सोन्याचें वॉच किं. रु. १०० ते १२५ ग्या. वर्षें ४
हिंदु सचित्र आर्मी वॉचेस किं. रु. १० ते स. १२५ पर्यंत.

हिंदु सचित्रटाईमपीसेस सार्धे, अलार्म, स्विंग, जपींगई. किं. रु. २॥–४ ६–१० ते ३० पर्यंत.

प्याकिंग, पोस्टेज, मनिआर्डर खेरीज, घड्याळावरोबर कमान, काच, पेटी छेडा हीं ग्यारन्टीसह फुकट मिळतील. सर्व प्रकारचीं वॉचेस वगैरे दुरुस्तीचीं कामें खात्रीनें ग्यारन्टीसह माफक दरानें करून दिलीं जातील. व अनेक रोगांवर गुण देणाऱ्या विजेच्या आंगठ्या, पुतळ्या, पट्टे. ह्या वस्तु मिळतील विशेष माहितीकरितां सचित्र क्याटलाग मागवा. [१

जी० बी० नाईक आणि कंपनी.
वॉचमेकर ज्युवेलर, मर्चंट्स, विलासिसरोड, नाका भायखळा, मुंबई.

नवीन पुस्तकें.

१ श्रीज्ञानदेवकृत अमृतानुभव ग्रंथ श्रीहंसराजस्वामीकृत समओंवीबद्ध टीका व कठीण शब्दांचा कोश यांसह किंमत १२ आणे. ट. व व्ही.पी.ख.८३ आणे.

२ अमृतानुभव मूळ कठीण शब्दांच्या कोशासह. सांचा लहान खिशांत रहाण्याजोगा किंमत. ८६ ट. व व्ही. पी. ख. ८३ आणे.

भर्तृहरिकृत शतकत्रय (शृंगारनीति व वैराग्य) वामनपंडितकृत श्लोकबद्ध टीका व सरळ मराठी भाषांतर यांसह कि० १२ आणे. ट. व व्ही.पी.ख.८४ आणे.

तिन्ही पुस्तकें ग. कृ. च्या छापखान्यांत जाड व घोटींव कागदावर छापिलीं आहेत. प्रत्येक जातीच्या १० प्रती घेतल्यास १ प्रत जास्त मिळेल.

३] काशीनाथ वासुदेव खांडेकर.
पुस्तकविक्रीचें दुकान रामवाडी पोस्ट मार्केट मुंबई.

स.ना.पंडित, बार्इ.

फेब्रुवारी. (वर्षाची वर्गणी [illegible] फुटकळ अंकास ८४.) १८९६.

केरळकोकिळ.

वर्षारंभ जानेवारी.

पु० १०] [अं० २

विधिरेव विशेषगर्हणीयः करट त्वं रट कस्त्वयापराधः ॥
सहकारतरौ चकार यस्ते सहवासं सरलेन कोकिलेन ॥१॥

आनंदन महादेव गुर्जर बुकसेलर अॅण्ड पब्लिशर.
रामवाडी
मुंबई.

सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत.

Vaidya. वैद्य.

ह्या पुस्तकांतील लेख कोची (मलबार) येथें तयार होऊन, ते मुंबई येथें छापून प्रसिद्ध होतात.

विषयांची अनुक्रमणिका.

	पृष्ठ.		पृष्ठ.
प्रुशियाची उदार राणी लुइसा.	२५	पुस्तकपरीक्षा.	४१
स्थलनिर्देश....	३२	केरळकोकिळपरीक्षण. ...	४७
पत्रव्यवहार....	३७		

त्रिविक्रम काशीनाथ पित्रे, बी. ए. कृत

मुलांमुलींस खाऊ.

पुडा १ ला.–(किंमत ८ आणे. ट. ख. ८॥·)

"बाळांनो, तुमच्या नेहमींच्या खाऊपेक्षां हा खाऊ गोड आहे. बदाम, पिस्ते यांपेक्षां गोड; खारीक, खिसमिस, यांपेक्षां गोड; इतकेंच नाहीं तर बासुंदी, बर्फी, पेढे यांपेक्षांही गोड. नुसता गोड नाहीं तर फारच गोड."

"तुमचा नेहमींचा खाऊ जरा अधिक खाल्ला कीं त्याचा वीट येतो. तो तोंडापुढें न्यावासा वाटत नाहीं; पण हा पुड्यांतील खाऊ जितका अधिक खावा तितका अधिक गोड लागतो!"

"नेहमींच्या खाऊनें मळमळ सुटते, अजीर्ण होतें, इत्यादि. पण ह्या खाऊनें अजीर्ण वगैरे कांहींएक न होतां उलट अधिकाधिक भूकच वाढते. तेव्हां, यावरून तुह्मीच पहा, तुमच्या नेहमींच्या खाऊंत आणि ह्या आमच्या पुड्यांतील खाऊंत किती फरक आहे तो."

"मुलांनो, आमच्या फडताळांत असले विलायती व देशी नमुन्याचे खाऊचे पुडे पुष्कळ प्रकारचे आहेत. त्यांचे पुडे अगोदर तयार आहेत. तुमच्या हातीं ते एकामागून एक पडतील. आह्मी ते बांधीत आहों."

"तुमच्यांत बंधुप्रेम व एकोपा वाढावा; तुह्मी भांडगे व आपलपोटे न व्हावें; तुमचें आचरण चांगलें, शुद्ध व सरळ व्हावें, यास्तवच ही खाऊची व पुड्यांची खटपट सुरू आहे, हें नीट लक्षांत ठेवा, व तयार केलेल्या खाऊचा नीट उपयोग करा."

जनार्दन महादेव गुर्जर, दुकान रामवाडी–मुंबई.

॥ ओं नमः श्रीरामचंद्राय ॥

आर्यमहौषधालय मु० आंजलें.

या अत्यंत खात्रीच्या औषधाचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यांस कदाचित् आला नाहीं तर पैसे परत देऊंच व त्याशिवाय त्यांच्या आरोग्यार्थ एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकटच देऊं.

मदनविलासामृतसंजीविनी.

वीर्यस्तंभक, रक्तशोधक, अत्यंत कामोत्तेजक, चित्तोत्साहक, बुद्धि-कांतिवर्धक व धातुपौष्टिक सुवर्णमाक्षिकमौक्तिक कस्तूरीमिश्र अपूर्व गुटिका.

१. शरीराची उत्तम सुधारणा करणारीं अत्यंत महत्त्वाचीं जीं औषधें आहेत, त्यांत या गुटिका अगदीं पहिल्या प्रतीच्या ठरल्यामुळें यांचे अपूर्व गुण थोड्याच काळांत या देशाच्या सर्वभागीं व त्यांच्या आसमंतात् अतिशय पसरले आहेत. या सेवन केल्यानें नपुंसकत्व, इंद्रियशिथिलता, कडकी, जीर्णज्वर, अग्निमांद्य, अशक्तता, स्वप्नजन्य किंवा इतर धातुपात, छातींतील रोग, मेंदूचे विकार, पांडुरोग, क्षय, मूत्रसंकोच किंवा मूत्रातिरेक, कटिशूल, वातरोग, उपदंशसंबंधी मुरलेले विकार, हात, पाय, मूत्रमार्ग, व शरीर यांचा दाह, व अरुचि, इ० अनेक विकार कितीही वर्षांच्या मनुष्यांस नवीन किंवा जुनाट असले तरी खात्रीनें बरे होतात. धातु व रक्त यांची शुद्धि व वृद्धि होऊन रक्तदूषणजन्य अनेक रोग हटकून बरे होतात. वीर्यस्तंभन, व कामोद्दीपन होऊन अग्नि व शक्ति भरपूर वाढते. स्त्रियांची धुपणी व संततीस अपायकारक जे गर्भाशयस्थ रोग त्यांचें त्वरित निवारण होऊन कांति, स्मरणशक्ति व बुद्धि वाढते. ज्यांस शारीरिक व मानसिक श्रम फार पडतात, त्या सर्वांच्या आंगीं यांनीं अतिशय शक्ति येऊन मनास उत्साह प्राप्त होतो, सुस्ती जाते. ज्यांस दूध व जडान्न पचत नाहीं त्यांस तें भरपूर पचूं लागतें, कोष्ठशुद्धि होते. या अप्रतिम गुटिका अत्यंत शोधानें केल्या असून त्यांच्या अप्रतिम गुणका-

रित्वाबद्दल हजारों सर्टिफिकिटें मिळालीं व नित्य मिळत आहेत. यांत अपायकारक पदार्थ बिलकूल नाहींत. वरील सर्व रोग जाऊन उत्तम गुण प्राप्त होण्यास या गुटिकांसारखें अप्रतिम औषधच नाहीं असें पूर्ण अनुभवावरून स्पष्ट ह्मणतों. यांस पथ्यसेवनाची गरज नसतां या पाहिजे त्या दिवसांत घेतल्या तरी हटकून गुण करितात. यामुळें त्यांचा अतिशय खप सुरू आहे. गोळ्या रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम सहा रुपयांच्या किंवा त्यांहून कितीही जास्त गोळ्या घेणारांस बंगीचा सर्व टपालखर्च माफ आहे. त्यांचे आंत घेणारांस मात्र तो वेगळा सहा आणे पडेल. एकदम ३२ गोळ्यांस १ रु. ७० गोळ्यांस २ रु. १६० गोळ्यांस ४ रु. २६० गोळ्यांस ६ रु. ५२० गोळ्यांस १० रु.

थंडगार नेत्रांजन—हें अंजन स्तुतीस अत्यंत पात्र आहे, हें सतत दहा वर्षांच्या पूर्ण अनुभवानें कळवितों. यानें डोळ्यांचे साधारण विकार तर सहजच, परंतु दृष्टीचा समूळ नाश करणारे, तिमिरांध्य, वडस, बिंदु, फुलें, कांच, सारा, भोर, गळती, खुपऱ्या, जळजळ, कंड, फूट, चिकटा, ठणका व लाली इ० अनेक विकार तत्संबंधी मस्तकशूलादि विकारांसह कितीही वयाच्या मनुष्यास कोणत्याही कारणांनीं प्राप्त झालेले नवीन किंवा जुनाट असले तरी नाजूक रीतीनें कोणतीही इजा न होतां बरे होतात. दृष्टि तीव्र व थंडगार राहते. हें चांगल्या दृष्टीच्या मनुष्यांनींही डोळ्यांत घातल्यास वरील विकार त्यांस बिलकूल होणार नाहींत. लहान मुलांस तर हें अत्यंत उपयोगी आहे. २ तो० ड० १॥ रुपया.

विशेष सूचना.—अलीकडे आंजर्ले व मुर्डी वगैरे गांवांतील औषधांच्या बऱ्याच जाहिराती सुरू आहेत व त्यांपैकीं कांहीं जाहिरातींत ज्या सह्या आहेत त्या बहुतेक आमच्याच नांवासारख्या भासण्याचा विशेष संभव आहे. तरी अशा लोकांशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं हें अवश्य लक्षांत ठेवून आमचीं औषधें **"कृष्णशास्त्री बिवलकर वैद्य. मु० आंजर्ले ता० दापोली जि० रत्नागिरी."** याच पत्त्यावर रोखीनें किंवा व्ही.पी.नें मागवावींत. अनुपान पत्रकसोबत असतेंच.

९–१२]

प्रुशियाची उदार राणी लुइसा.

शतेषु जायते शूरः सहस्रेषु च पंडितः ।
वक्ता दशसहस्रेषु दाता भवति वा न वा ॥ १ ॥

शंभर मनुष्यांत एकादा मनुष्य शूर असतो; हजारांमध्यें एकादा विद्वान् असतो; दहा हजारांत एकादा वक्ता असतो; पण इतक्यांमध्येंही दाता एक तरी निपजेल किंवा नाहीं ह्याचा वानवाच. ह्यावरून दातृत्वाची थोरवी केवढी मोठी आहे, ही गोष्ट चांगली लक्षांत येईल. दाता होण्याला मुख्य दोन गोष्टींची अनुकूलता लागते. एक आपणापाशीं द्रव्याचा संग्रह पाहिजे; आणि दुसरें, मनामध्यें परोपकारबुद्धीचा अं-

कुर पाहिजे. हीं दोन्हींही जेथें एकत्र होतात, तोच पुरुष किंवा स्त्री त्या मानास पात्र होतात. **अहिल्याबाई** होळकरीण, व **बायजाबाई** शिंदे ह्यांनीं औदार्यानें आपली कीर्ति ह्या देशांत अगदीं अजरामर करून सोडली आहे. आपल्या देशांतील ह्या उभय साध्वी व उदार स्त्रियांसारखीच **प्रुशिया** देशामध्यें "**लुइसा**" नांवाची परमदयाशील माउली होऊन गेली. तिचें चरित्र थोडक्यांत देण्याचें आज योजिलें आहे.

ह्या राणीचा जन्म **जर्मनी** देशांत इ० स० १७७६ मध्यें झाला. आणि ही सहा वर्षांची असतांनाच हिची आई मरण पावली. तरी तिच्या आजीनें तीस उत्तम प्रकारचें शिक्षण दिलें. तिनें ह्या मुलीला 'प्रातःस्मरण' ह्या नांवाचें लहानसें पुस्तक दिलें होतें, ती तें मनःपूर्वक नित्यनियमानें वाचीत असे. ह्या मुलीला लहानपणापासूनच परमेश्वराप्रीत्यर्थ कविता करण्याचा नाद असे. तिनें बालपणांतच केलेल्या कवितांमध्यें एक मोठी गोड आणि सुस्वर कविता होती. तिच्यांतील सारांशः—

श्लोक(भुजंग.)

पुढें संकटे काय येतील घोर। सुखामाजि कीं काल जाईल थोर ॥
नये सांगतां लेशही मानवातें। तरावें कसें कोण जाणे भवातें ?
प्रभूच्या पदीं अर्पुनी मन्मनातें। पित्याचें मनीं ठेवितें नित्य नातें॥
जयाची सदा वर्णिती लोक लीला। उपेक्षील तो काय ऐशा मुलीला

तिच्या औदार्याचा गुण तर तिच्या लहानपणापासूनच तिच्यामध्यें दिसून आला. अनाथांचा आणि व्याधिग्रस्तांचा समाचार घेणें, हें तर तिचें आवडतें काम होतें. एके दिवशीं एका खेडेगांवांत, एक गरीब बाई आपल्या, भुकेनें व्याकुळ झालेल्या, मुलाकरितां भाकर मागत फिरत होती, तीस ह्या मुलीनें आपल्या खिशांत असलेले सारे पैसे देऊन टाकले ! आणि ह्यावेळीं तिचें वय अवघें तेरा वर्षांचें होतें ! कोणे एकेदिवशीं हिची आजी व तेथील गव्हर्नराची पत्नी, ह्यांच्या बरोबर **लुइसा** फिरावयास गेली असतां, अकस्मात् नाहींशी झाली. तेव्हां सर्व लोक तिला चहूंकडे शोधून दमले. अखेर ती एका किल्लेदाराच्या अजारी

असलेल्या मुलीजवळ, तीस पुस्तक वाचून दाखवीत बसलेली आढळली. अशा प्रकारें तिच्या औदार्याची आणि सौंदर्याची कीर्ति, प्रुशियाच्या गादिन्शान राजाच्या कानापर्यंत गेली. आणि त्यास तिचा मोह उत्पन्न होऊन इ० स० १७९३ च्या नाताळच्या सणांत त्यानें तिच्याशीं विवाह केला. ती बर्लिन येथें आली तेव्हां फारच मोठा मंगलोत्सव करण्यांत आला. त्यांचा रथ वेशीच्या दरवाज्यापाशीं येऊन थडकला तेव्हां नगरांतील एका मुलीनें, तीस अनुलक्षून कांहीं सुस्वर कविता म्हटल्या त्यांतील तात्पर्य असें होतें:—

"आजवर गेलेले सर्व दिवस विसरा. आजपासून पुढें तुम्हांला सोन्याचा दिवस उगवला आहे. ह्यापुढें तुमचें आयुष्य फार उत्तम आणि सुखांत जावो. इतउत्तर परमेश्वर तुम्हाला सर्व प्रकारचीं सुखें देईल, आणि तुम्ही अनेक नातवंडांची आजी व्हाल."

ही कविता ऐकून राणीस फार संतोष झाला. तिनें तत्काल रथांतून खालीं उतरून त्या मुलीचें चुंबन घेतलें. घरभरणीच्या दिवशीं नागरिकजनांनीं उत्सव करण्याविषयीं राजाची अनुज्ञा मागितली. तेव्हां राजा म्हणाला, "लढाईंत पतन पावलेल्या लोकांच्या अनाथ बायकांमुलांस कांहीं धर्म कराल, तर माझी पत्नी फार आनंदित होईल." त्याप्रमाणें पौरजनांनीं बरीच रक्कम जमा केली. व तींत राजानेंही चांगली भर घातली. ती सर्व त्या अनाथ बायकांमुलांस वांटण्यांत आली. तेव्हां राणीस मोठा संतोष झाला.

राणीस पहिला मुलगा झाला तेव्हां राजानें सुमुहूर्त समजून 'ओऱ्यानिनबर्ग' ह्या नांवाचा किल्ला तीस उन्हाळ्यांत राहावयास म्हणून नजर दिला; व आणखी काय इच्छा आहे म्हणून विचारलें. तेव्हां ती म्हणाली, "बर्लिन येथील गरीब लोकांस देण्यासाठीं माझा खिसा नेहेमीं मोहरा पुतळ्यांनीं भरलेला असावा." राजा म्हणाला, "भरलेला म्हणजे किती पाहिजे?" तिनें उत्तर दिलें, "आपल्या अंतःकरणांत जितक्या पुष्कळ वाटतील तितक्या." राजानें मोठ्या आनंदानें तीस त्या दिल्या. आणि त्यामुळें 'बर्लिन' येथील अगदीं गोरगरीब सुद्धां गबर होऊन गेले. दानधर्म करणें हीच तिची नेहेमींची करमणूक असे. कोणीही गरीब

मनुष्य तीस भेटो, त्यास तिच्यापासून कांहीं ना कांहीं तरी मिळकत व्हावयाची.

ज्या किल्ल्यांत ती राहिली होती, तो किल्ला फार अफाट आहे असें वाटल्यामुळें पुढें त्यांनीं त्याच्या जवळच 'प्यारेज' नांवाचा एक मोठा बगीचा होता, तो खरेदी घेतला आणि त्यामध्यें राहूं लागलीं. तेथें तीं अगदीं साधेपणानें राहत, व गांवढळ लोकांत मिळून मिसळून वागत. थोरला मुलगा वयांत येतांच त्यास गादीवर बसवून तीं उभयतांही राज्यकारभाराचा जोंजार सोडून देऊन 'प्यारेज'मध्यें रहावयास गेलीं. तेथें राणी तर गांवांतील साऱ्या मुलांच्या ओळखीची झाली होती. ती स्वतः बाजारांत जाऊन मेवामिठाई व खेळणीं खरेदी करी आणि गांवच्या मुलांस वांटून देई.

राजा व राणी ह्या उभयतांनींही आपली बागणूक अगदीं साधी ठेवली होती. तीं दोघेंही सार्वजनिक बागेंत एकत्र खेळावयास जात. इ० स० १७९७ मध्यें तीं बालिन येथील जत्रा पहावयास गेलीं होतीं. तींत त्यांनीं कितीएक जनावरें खरेदी केलीं, व एका हलवायाच्या दुकानावर बसून फराळ केला. इतक्यांत एका जनावरापाशीं शहरांतील कोणी एक स्त्री एक गुरूं खरेदी करण्याच्या इच्छेनें आली. परंतु तेथें राजाराणी पहातांच चपापून ती मागें फिरली. तेव्हां तीस राणीनें हाक मारून ह्मटलें, "बाईग! ये. मागें जाऊं नको. आह्मीं जर गुरें विकणारांचीं गुरें परत दवडूं लागलों, तर त्यांचें कसें होईल?" नंतर त्या दयाळू राणीनें त्या बाईस तुला कांहीं मुलें आहेत काय, ह्मणून प्रश्न केला; व तुमच्याच मुलाएवढा एक मुलगा आहे असें तिनें सांगितल्यावर, त्याच्याकरितां तिनें कांहीं चित्रें वगैरे खरेदी केलीं. आणि तीं तिच्यापाशीं देऊन ती ह्मणाली, "बाई! येवढें खेळणें त्या तुझ्या युवराजाला दे, आणि तें मीं दिलें आहे ह्मणून सांग." ही राणीची दयाशीलता कांहीं विशेष प्रकारची होती असें नाहीं, तर तिची ही नित्याचीच चाल होती. रस्त्यानें चालतांना कोणाचेंही मूल दृष्टीस पडलें, तर ती त्याला लगेच उचलून त्याच्या आईच्या कडेवर देई; व आईची गरीबी असल्यास कांहीं तरी खिशांतून काढून ती तिला देत असे. गरीबीच्या संबंधानें तिला कांहीं इच्छा नसली. तर ती तिच्याशीं

गोड बोलून पुढें जात असे. अशा दयाळू स्वभावामुळें ती आपल्या प्रजेची केवळ आदिदेवताच होऊन बसली होती, ह्यांत आश्चर्य तें कोणतें?

एक वेळ राजा व राणी आपल्या देशांत ह्मणजे प्रुशियांत प्रवास करावयास निघालीं. तेव्हां प्रत्येक गांवीं त्यांस पहाण्याकरितां त्यांच्या रथाभोंवतीं अगदीं पाळा पडत असे. एका खेडेगांवांत एका पाटलानें पुढें होऊन राणीस विनंती केली कीं, राणीसाहेबांनीं क्षणभर खालीं उतरावें. कारण, येथील शेतकरी लोक आपल्या देशजननीला पहाण्याची इच्छा करीत आहेत; व ते इतर शहरांप्रमाणेंच ह्या गांवांतही सत्कार करूं इच्छितात. हें ऐकून राणी तत्काल रथाखालीं उतरली, सर्वांचा पाहुणचार घेतला, व त्यांनीं पुढें ठेवलेली मेवामिठाईही तिनें थोडथोडी खाऊन पाहिली.

ही राणी राजपदास पोंचल्यावर तिनें आपल्या आजीस एक पत्र लिहिलें; त्यांत असें ह्मटलें आहे कीं, "मला येथें आल्यापासून सर्वांत मोठा आनंद कोणता ह्मणशील तर, गरीबगुरीबांस यथेच्छ दानधर्म करावयास मिळतो हा."

राणीला वाचावयाचाच केवळ नाद होता असें नाहीं; तर, ती आपली रोजनिशी स्वतः लिही. निरनिराळ्या विषयांवर तिनें लिहिलेले निबंधही पुष्कळ आहेत. तिला गाणीं तर फारच मंजुळ स्वरांवर गातां येत असत. पण हे तिचे आनंदाचे दिवस पुढें टिकले नाहींत; लौकरच त्यांचा लय झाला. कारण, **फ्रेंचां**नीं अभिमानास पेटून **प्रुशिया**बरोबर लढाई चालू केली. आणि **जेना** येथें त्यांचा जो भयंकर मोड झाला, त्यांत प्रुशियाचें राज्य अगदीं रसातळास गेलें, आणि त्यामुळें त्या दयाळू राणीचें अंतःकरण करपून गेलें!

हा झालेला राष्ट्राचा घात व आपला देशाभिमान, तिनें थोरल्या मुलास अकराव्या वर्षीं कळविला. तो असाः—"तूं तुझ्या देशास लागलेली काळिमा धुऊन टाक; आणि ग्रासलेल्या परतंत्रतेंतून त्यास मुक्त कर. फ्रेंचांकडून आपला देश परत घे, आणि आपल्या वाडवडिलांची कीर्ति राख." ह्याच पत्रांतील आवेश, थोरल्या मुलाच्या हाताखालील सेनेस पहिल्या **नेपोलियना**चा पाडाव करण्यास कारणीभूत झाला; आणि

तिच्याच आशीर्वादानें दुसऱ्या मुलानें **सिडान** येथें तिसऱ्या **नेपोलियना**चा पराभव करून त्याची तरवार हस्तगत केली.

नेपोलियनाच्या पराक्रमानें **प्रुशिया**चें तेज कांहीं कालपर्यंत अगदीं फिक्कें पडलें होतें. एकामागून एक त्यावर घाले येत. **फ्रीडलंड**च्या लढाईनंतर त्याचा अगदींच पराभव होऊन **'टिलसिट'**मध्यें राजा केवळ पदच्युत होऊन बसला. राणीचा स्वभाव इतका कोमल होता कीं, ती आपल्या प्रत्यक्ष शत्रूंविषयीं सुद्धां वांकडें बोलत नसे. तिनें **नेपोलियना**विषयीं एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, "मी त्याचा सर्वस्वी तिटकारा करतें असें नाहीं. तर तो एक, राजास पदच्युत करणारा, व सर्व राष्ट्रास दुःख देणारा आहे, अशा नात्यानें त्याजकडे पहातें. त्याची बुद्धि खरोखरच वर्णनीय आहे. पण त्याचें वर्तन शुद्ध ठकबाजीचें व खोटें आहे; तें मला सहन होत नाहीं." राणीच्या कारकीर्दीत **'सिलेसिया'** प्रांत राजास परत मिळाला होता; पण गमावलें असें फार.

ह्या विपत्तिकालांत राणीनें **म्याडम डी कूडेनर** ह्या बाईशीं स्नेह केला होता. तीस तिनें एकदां असें लिहून कळविलें कीं, "शुद्धानंदाचा झरा जावत्कालपर्यंत माझ्या हृदयांत वाहतो आहे, तावत्कालपर्यंत मला कशाचेंच दुःख वाटत नाहीं हें ध्यानांत ठेव. मृत्युलोकांतील थोरपणाचें आणि वैभवाचें मिथ्यात्व ज्ञानचक्षूनें मी पूर्णपणें ओळखतें. स्वर्गीच्या सुखापुढें त्याची योग्यता केवळ कःपदार्थ आहे."

इ० स० १८०९ मध्यें देश अगदींच खालावला. तेव्हां **प्रुशिया**चा राजा व राणी **रशिया**च्या दरबारीं गेलीं होतीं. पण तेथें त्यांस मिळावा तसा आश्रय मिळाला नाहीं. त्याबद्दल तिनें एका पत्रांत असा उल्लेख केला आहेः—"मी गेलें तशीच परत आलें. ह्याचें मला आतां फारसें नवल वाटत नाहीं. कारण, मृत्युलोक हें माझें राज्यच नव्हे." तिचा शेवटचा मुलगा **'कोनिंग्सबर्ग'** येथें ह्याच वर्षी जन्मला. हें राजकुटुंब ह्या ठिकाणीं तीन वर्षे हाल वनवास काढीत होतें. पण अखेर तीं लांबचा प्रवास सोसून **'बर्लिन'** येथें—ह्मणजे पूर्वीच्या राजधानींत गेलीं. **'अरंडेट'** ह्मणून तेथें एक नामांकित कवि व गवय्या होता. त्यानें स्वदेशाभिमानावर निरनिराळ्या रागदारीचीं गाणीं क-

रून तीं साऱ्या देशभर फिरून ह्मणून दाखविलीं; आणि त्या अप्रतिम गाण्याच्या आवेशानेंच **प्रुशियास** पुन्हा स्फुरण चढलें, आणि त्यानें **फ्रान्सा**चें जूं झुगारून दिलें. ह्या सुप्रसिद्ध कवीनें ह्या राणीच्या शेवटच्या पुत्रोत्सवाविषयीं एके ठिकाणीं येणेंप्रमाणें उल्लेख केला आहे. "ह्यासमयीं आनंदाश्रूंपेक्षां, दुःखाश्रूंनींच पुष्कळांचे डोळे भरले होते. राणीसाहेब प्रजाजनांचे मुजरे घ्यावयासाठीं खिडकींत उभ्या राहिल्या होत्या. तेव्हां, त्यांचे डोळे लाल झाले होते, हें त्या सुंदर राणीच्या आनंदामध्यें दुःखदर्शनाचें ठळक चिन्ह दिसून येत असे." ही राणी लग्न झाल्यापासून फक्त एक रात्र माहेरीं राहिली होती.

इ. स. १८१० तील जूनमध्यें तिची प्रकृति बिघडली. आणि दुसऱ्या महिन्यांत तिचें तें दुखणें अखेरचेंच आहे असें वाटलें. तिच्या फुप्फुसामध्यें फोड आले होते. तेव्हां ती ह्मणाली, "मृत्युलोकचा मोठेपणा किती क्षणभंगुर आहे बरें? मी पाहूं गेलें तर राणी आहें; पण आज माझा हात सुद्धां मला उचलवत नाहीं!" उत्तरोत्तर तिचें दुखणें विकोपास चाललें, व अधिकअधिक वेदना वाढून तिची शक्ति क्षीण होत चालली. तेव्हां राजा आपल्या दोन पुत्रांसह तिच्या बिछान्याजवळ गेला. राणीच्या नेत्रांस आनंदाश्रु आलेले पाहून त्याचाही कंठ भरून आला. तो दुःखार्तस्वरानें तीस ह्मणाला, "देव तुला उतार पाडो. हा मी येथें आहें." तिनें विचारलें, "आपल्याबरोबर आणखी कोण आहे?" राजा ह्मणाला, "**फ्रीज** आणि **वुइल्यम**." आसन्नमरण झालेली माता पुत्रांकडे पाहून बोलली, "अहा! ह्या माझ्या लाडक्यांकडे पाहिलें ह्मणजे मला किती आनंद होतो ह्मणून सांगूं?" मुलगे जवळ जाऊन बसल्यावर "बाळा **फ्रिजा, वुइल्यमा!**" इतकीं अक्षरें मात्र तिच्या मुखांतून निघालीं. पुढें तिच्यानें बोलवेना. राजपुत्र मातेच्या मुखाकडे पाहून आंतल्याआंत स्फुंदत होते. थोडा वेळ गेल्यावर त्या साध्वीनें त्यांस त्यांच्या भावाविषयीं व बहिणीविषयींही कांहीं प्रश्न केले; परंतु इतक्यांत आंतून कळ येऊन तीस विव्हळ केल्यामुळें मुलांसही उगी राहणें भाग पडलें. अंतसमय जवळ आला तेव्हां तिनें आकाशाकडे डोळे लावले, ती मोठ्यानें ह्मणाली, "हे परमेश्वरा! हे प्रभो! माझी उपेक्षा करूं नको!" आणखी पुन्हा जीव कासावीस

झाला तेव्हां पुन्हा ह्मणाली, "देवा ! सोडीव मला ह्या यातनांतून ! !" ही प्रार्थना मात्र सफल झाली. कारण, तोच तिचा शेवटचा श्वास होता ! राणीनें शोकाक्रांत होऊन सन्निध बसलेल्या आपल्या पतीच्या हातांत हात घालून परलोकीं प्रयाण केलें.

इ. स. १८१० तील डिसेंबरच्या २३ तारखेस ती शेवटचा पुत्र घेऊन **बर्लिन** येथें आली, ह्मणून त्याच दिवशीं तिचा प्रेतसंस्कार पुरा केला. ही उदार आणि साध्वी स्त्री आपल्या देशाचा भाग्योदय पाहण्यास वांचली नाहीं खरी; तरी प्रुशियानें पुढें स्वतंत्र होण्यासाठीं जें युद्ध करून जय संपादन केला, त्यांत ह्या राणीचा साध्वीपणा व तिच्यावरचा विश्वास हींच बीजरूपानें होतीं ह्यांत तिळमात्र संशय नाहीं.

स्वदेशावर व स्वतंत्रतेवर प्रीति, वागणुकींत साधेपणा; औदार्यांत सढळता, मनमिळाऊपणा आणि समाधान, कवितांची अभिरुची, परमेश्वरावर निष्ठा, इत्यादि बिनमोल गुण त्या साध्वी राणीच्या अंगीं असलेले **जर्मनी**च्यासुद्धां दृष्टीस पडले; मग इतरांस पडतील ह्यांत काय आश्चर्य ? आणि तेच तिच्या अजरामर कीर्तीस कारणीभूत झाले.

कूटप्रश्न.

मी एक इंग्रजी किताब आहें. माझ्या पोटांत ताकभात भराल, तर मी तुमची करमणूक करीन, गाऊन दाखवीन. तर मी कोण ?

स्थलनिर्देश.

लंका अथवा सिंहलद्वीप.

(पु० ९ अं० ८ पा० १७८ पासून पुढें चालू.)

मोत्यें:—सिलोनची मोत्यांविषयींही बरीच प्रसिद्धि आहे. हीं मोत्यें ज्या शिंपांत सांपडतात त्यांना मोत्यांच्या शिंपा असें ह्मणतात. ह्यांतील कालवें फार मऊ व नाजूक असतात. जरा कठीण शिंपी असली तर त्याला खुपावयाची. पण ईश्वरानें ह्या प्राण्याला एक शक्ति दिली आहे, तिच्या योगानें त्याला आपल्या अंगांतून एक प्रकारचा गुळ-

गुळीत, चकचकीत रस काढतां येतो व त्या रसानें तो त्या शिंपीची आंतील बाजू चांगली गुळगुळीत करून सोडतो. ह्या रसाला 'मोत्यांची आई' असें ह्मणतात. आतां मोत्यें कशीं होतात ह्याविषयीं लिहूंया. एखादा वाळूचा कण त्या शिंपल्यांत जातो व त्यानें आंतील प्राण्यास त्रास होतो. मग हा प्राणी आपल्याला त्रास न व्हावा ह्मणून त्या कणाला तो रस सारवूं लागतो मग तो कण अर्थातच आकारानें मोठा होतो, व होतां होतां त्याचें मोतीं बनतें. चिनी लोक एकादे वेळीं ह्या शिंपल्यांत शिशाच्या गोळ्या घालून ठेवतात. व एक दोन वर्षें तशाच राहूं देतात. मग त्या मोत्यांप्रमाणें दिसूं लागतात.

सिलोन येथील मोत्यें काढावयाची जागा पश्चिम किनाऱ्याकडे असून ती किनाऱ्यापासून पंधरा मैलांवर आहे. तेथील पाण्याची खोली नऊपासून बारा वांव असते. प्रथमतः होड्यांतून तेथें जातात. ह्या प्रत्येक होडींत दहा पाणबुडे व तेरा खलाशी असतात. पाणबुड्याजवळ एक तीस पौंड वजनाचा दगड असतो. हा तळापर्यंत जाऊन पोंचण्याइतक्या लांब दोरीला बांधतात. हिला एक विणलेला फांसा असतो त्यांत पाणबुड्या आपला पाय ठेवतो व दुसरी एक शिंपा गोळा करण्याकरितां टोपली असते तिला दोरी बांधून ती खालीं सोडतात; तींत तो आपला दुसरा पाय ठेवतो. तो दगड तळास पोंचे तोपर्यंत खालीं सोडतात. मग पाणबुड्या आपला फांसांतील पाय काढून घेऊन होईल तितकें पालथें पडण्याचा प्रयत्न करतो; व होईल तितक्या झटपटीनें शिंपा गोळा करून त्या टोपलींत टाकतो. त्याला दम निघेपर्यंत तो खालीं राहतो व मग दोरीला एक हिसका देतो. मग त्या टोपलीसकट त्याला वर घेतात. दुसरा पाणबुडा मग खालीं जातो, तोंवर हा पहिला वर दम घेतो व तो आल्यावर पुनः हा खालीं जातो व तो दम घेतो असें चाललेलें असतें. त्या शिंपा मग किनाऱ्यावर नेऊन त्यांतील मोत्यें काढून घेतात.

ह्या सर्व पाणबुड्यांनीं आपलें ठाणें अॅरिल्यो येथें दिलेलें असतें. भोंवतालचा प्रदेश फार भयाण असतो. त्या नदीपासून समुद्राचें पाणी जरा दूर आहे. शिवाय थोडे बहुतकरून ताडवृक्ष आहेत. त्या वालुकामय लांबलचक समुद्रकिनाऱ्यामागील एक कांटेरी जंगल एवढेंच काय तें झाडझाडोरें.

मासे धरावयाचा हंगाम आला ह्मणजे त्या निर्जन वालुकामय प्रदेशांत असंख्य झोंपडीं उभारतात. जें कांहीं कालापूर्वी अगदीं ओसाड होतें, तेंच स्थल आतां गारुडी, कलावंतिणी, फकीर वगैरेंनीं अगदीं गजबजून जातें. किनाऱ्यावर लहान मोठ्या पुष्कळ होड्या असतात. ह्या बहुतेक दुकानासारख्याच असतात. ह्या होड्यांत पाहिजे तो जिन्नस विकत मिळतो. ह्या हिंदुस्थानाच्या दक्षिण टोंकापासून जिन्नस घेऊन आलेल्या असतात.

ह्या मोत्यांच्या शिंपांचा लिलांव होतो; व दरहजारी वीस रुपयेप्रमाणें बहुधा विकतात. शिंपा बरेच दिवस तशाच ठेवतात, व मग मोत्यें काढूं लागतात. एकादे वेळेस सरकारास ह्या कामांत लाखों रुपये फायदा होतो व कित्येक खेपा सुनक्याही जातात.

ह्या समुद्रांत मासे खूब असतात. कित्येक लोक मासेच धरतात. एक प्रकारचीं समुद्रांतील कांसवें ह्यावेळेस तेथें अंडीं घालावयास येतात. ह्या तऱ्हेचीं कांसवेंही बरींच धरलीं जातात.

सिंहली लोकांतील दंतकथांप्रमाणें तेथील मूळचे रहिवासी ह्या बेटांत प्रथमतः याको अथवा राक्षस व नाग ह्मणजे सर्प हे राहत होते. त्यांच्यांत कांहीं राज्यव्यवस्था होती ह्मणतात. नागांच्या राजाचें एक रत्नजडित सिंहासनही होतें. व ह्या सिंहासनाबद्दल आसपासचे राजे त्याच्याशीं भांडत होते.

खरोखर याको व नाग लोक हे मूळचे कोठून आले होते हें कांहीं कळत नाहीं. कांहींचें मत असें पडतें कीं ते लोक नागांची व राक्षसांची पूजा करतात त्यावरून त्यांना हीं नांवें पडलीं असावींत. किंवा हीं नांवें त्यांना आर्य लोकांनीं तुच्छबुद्धीनें दिलीं असावींत. कारण आर्य लोकांनीं हिंदुस्थानांतील मूळच्या रहिवाशांना 'राक्षस' हें नांव दिलेलें आहे. याको लोक हे साधारण मनुष्यांप्रमाणेंच समजले जात होते असें दिसतें. कारण आर्य लोक ह्या लोकांचा पोषाख घालीत असत, व ह्यांच्याशीं शरीरसंबंधही करीत असत, तसेंच त्यांच्या मध्यें मिळून मिसळून एकाच शहरांत राहतही असत. कांहीं सिंहल राजांनीं 'माणसें व राक्षस' अथवा 'माणसें व नाग' ह्यांजकडून मोठमोठीं तळीं खणल्याबद्दल लिहिलेलें आढळतें.

वेद्दा—ह्या नांवाच्या जातीचे रानटी लोक हे तेथील मूळचे लोक असावेत असें ह्मणतात. हे पूर्वी आर्य लोक जिंकित येत आहेत असें पाहतांच जंगलांत पळून गेलेल्यांपैकीं होत. हे सुमारें दोन हजार वर्षांपासून ह्याच रानटी स्थितींत आहेत.

ह्यांत सुद्धां दोन पोटभेद आहेत. एक 'खडकावर राहणारे' व दुसरे 'गांवांत राहणारे.' 'गावांत राहणारे' वेद्दा लोक ब्रिटिश राज्याच्या सीमेवर चिखलाच्या व पालापाचोळ्याच्या झोंपड्यांत राहून तेथें कांहीं धान्य कसें तरी पेरतात, (पेरतात ह्मणण्यापेक्षां नुसतें जमिनीवर फेंकतात ह्मणणें बरोबर होईल) व त्यावर आपली उपजीविका करतात. व 'खडकावर राहणारे' वेद्दा लोक हे अरण्यांत राहून मुळें, मासे व मध ह्यांवर उपजीविका करितात. केव्हां केव्हां शिकारीवर राहतात. ते गुहांत किंवा तुटलेल्या कड्यांच्या खबदडींत राहतात. केव्हां केव्हां झाडांवर मध्येंच कांहीं पाळापाचोळा घालून जागा तयार करतात व त्यावरच पडलेले दृष्टीस पडतात. त्यांचे खाण्याचे प्राणी ह्मणजे पाकोळ्या, कावळे, घुबडें व पतंग हे होत. ह्यांची ते आपल्या धनुष्यांनीं शिकार करतात; परंतु हे रानरेडे व हत्ती ह्यांच्या मांसाला शिवत सुद्धां नाहींत. हरणाचें व दुसऱ्या कित्येकांचें मांस ते झाडांवर वाळवितात व झाडांच्या ढोलींत तें ठेवून बाहेरील बाजूनें ती ढोल मातीनें लिपून काढतात. त्यांना सरड्याचें व भाजलेलें माकडांचें मांस सर्वांत फार आवडतें. हे लोक आपल्या निरनिराळ्या टोळ्या करितात व आपआपल्यांत अरण्यें अरण्यें शिकारीकरितां वांटून घेतात.

ते आपली शिकार वाळवून लोकवस्तींत विकण्याकरितां नेतात. व त्याच ठिकाणीं मूरिश व्यापारी कपडे, कुऱ्हाडी, बाण, व दुसरे कांहीं जिन्नस विकावयास घेऊन येतात. ह्या मूरिश लोकास ते लोक मांस, हत्तीचे दांत, कातडीं वगैरे देऊन त्यामोबदला बाण वगैरे पाहिजेत ते जिन्नस खरेदी करतात. खरोखर हे रानटी वेद्दा लोक मूरिश व्यापाऱ्यांच्या दृष्टीस सुद्धां पडत नाहींत. ते आपले जिन्नस आदले रात्रीं पुढें मांडून व आपल्याला मोबदला काय पाहिजे आहे त्याविषयीं कांहीं खुणा करितात. व हे जिन्नस तेथें दुसरे दिवशीं येऊन पडले कीं रात्रीचे हळूच येऊन ते घेऊन पळून जातात. त्यांना पैसा ह्मणजे काय हें ठाऊक

नसतें, ह्मणून अर्थातच त्या पैशांची त्यांस जरूर नसते; त्यांना पाहिजे असतें तें येवढेंच—नारळ, मीठ, कुऱ्हाडी, व भांडीं वगैरे.

विशेष चमत्कार हा कीं त्यांना आपल्या बोटांवर पांचपर्यंत मोजतां येतें, पुढें मोजतांच येत नाहीं. त्यांना देवाची कल्पना सुद्धां नाहीं. मग त्यांच्यांत देवळें कोठून येतील? मात्र येवढें त्यांना वाटतें कीं, मनुष्य आजारी पडला कीं त्याला राक्षस येऊन त्रास देत असतो. ह्मणून कोणी आजारी पडला कीं ते 'राक्षस नाचविणारे' ह्मणजे पंचाक्षरी घेऊन येतात व त्यांजकडून त्या मनुष्यावरील 'राक्षसाला' हांकून काढतात. ब्रिटिश सरकारानें ह्यांना शिक्षण देऊन सुधारावयाचा बराच प्रयत्न केला आहे. त्याप्रमाणें कांहीं लोक आतां सुधारले आहेत; पण सुधारलेले असे थोडे. बहुतेक सर्व अझूनही रानटी स्थितींत असून रानांतच राहतात.

ह्या बेटाचा मूळचा इतिहासः—इतिहास ह्मणून विश्वसनीय गोष्ट अशी विजेयो नामक राजाची दिसते. विजेयो ह्याचा बाप बंगू ह्मणजे बंगालदेशचा राजा होता व त्याची आई टेलगू प्रांतांतील कलिंगच्या राजघराण्यांतील होती. विजेयोनें भयंकर गुन्हे केले तेव्हां त्याच्या बापाला त्याला सातशें माणसांसह जहाजांतून समुद्रांत सोडणें भाग पडलें. व हिंदुस्थानच्याच किनाऱ्यावर त्यानें उतरण्याचा प्रयत्न केला, पण तो फसून तो लंकेच्या किनाऱ्यावर येऊन उतरला.

विजेयो तेथें गेल्यावर तेथील एका टोळीवरील अधिपतीची कन्या (जिला ते लोक 'राक्षसी' ह्मणत तिला) पाहून तिच्याशीं त्यानें लग्न केलें. त्या बेटावर आपली सत्ता बरीच वाढवावी असें त्याच्या मनांत आलें. व त्या 'राक्षसी' बायकोचें त्याला त्या कामांत अनुमोदन मिळालें. तिच्या मदतीनें तो व त्याचे चाकर लोक ह्यांना एका लग्नाच्या मेजवानीस परवानगी मिळाली. हें लग्न एका टोळीवरील नाईकाच्या घरीं होतें. आंत शिरकाव मिळाल्यावर कांहीं वेळानें 'कुवेनी' त्याची 'राक्षसी' बायको हिनें एक खूण करतांच त्यांच्या मनोरथसिद्धीस अडथळा करण्यासारखे जे लोक होते ते सर्व कापून टाकले. परंतु ह्या फसव्या 'कुवेनी' बाईनाही विश्वासघातानें मिळविलेली मालमत्ता फार दिवस उपभोगावयास मिळाली नाहीं. विजेयोला आतां राज्य चांगल्यातऱ्हेनें

चालवावेंसें वाटलें. तेव्हां एक सद्गुणी बायको आपणास असावी असें वाटून समोरच्या किनाऱ्यावरील पांड्य देशाच्या राजाकडे त्यानें मागणी घातली व ती त्या राजानें कबूलही केली. ह्यावेळीं 'कुवेनी'च्या पोटीं विजेयोला एक मुलगा व एक मुलगी झाली होती. तेव्हां ह्या (पांड्य देशच्या राजाची कन्या) नवीन राणीसाहेब आपल्या दासदासी वगैरे सरंजामासह घरांत येतांच 'कुवेनी'ला विजेयोनें घालवून दिलें. नंतर ही गरीब बिचारी 'कुवेनी' आपलीं मुलें घेऊन 'योखो' लोकांची राजधानी 'लंकापूर' ह्मणून नगरी होती तेथें गेली. विसाव्याकरितां ती एक घर शोधीत असतां तिला एका मनुष्यानें ओळखिलें व तिनें केलेल्या विश्वासघाताच्या चुरसीनें तीस त्यानें तेथेंच ठार केलें. तिला मारतांच तिचीं मुलें अरण्यांत पळालीं. व असेंही ह्मणतात कीं **वेद** हे लोक 'कुवेनी' ची मुलगी व मुलगा ह्यांचे वंशज होत.

विजेयो ज्या प्रांतांत उतरला होता तेथेंच एक टमाना नांवाचें शहर वसविण्याचा त्याचा बेत होता. व टमाना हेंच आपल्या राजधानीचें मुख्य शहर करण्याचा त्याचा बेत होता; तथापि हा त्याचा बेत सिद्धीस गेला नाहीं.

मरतेवेळीं विजेयोनें आपल्या बापास आपला धाकटा भाऊ पुढें राज्य चालविण्याकरितां पाठविण्याविषयीं लिहिलें होतें. पण त्याचा बाप त्याच सुमारास वारल्यामुळें, त्याचा (बापाचा) सर्वांत धाकटा नातू पंडुवसा हा राज्याचा अधिकारी ह्मणून आला.

(पुढें चालू.)

पत्रव्यवहार.

रा. रा. **केरळकोकिळ**कर्ते यांस वि. वि.

तुमचा **कोकिळ** मनोरंजक आहे. त्यास विद्युन्मासशास्त्रव्याख्यानांनीं विशेष मनोरंजकता आली आहे. ज्या अंकांत तें व्याख्यान नसतें तो अंक पाहून मन उदासीन होतें. उत्कंठा ज्यास्त वाढते. तें व्याख्यान पुनः पुनः वाचावें असें होतें. यांत "**क्षणेक्षणे यन्नवतामुपैति तदेव रूपं रमणीयतायाः**" हें सौंदर्याचें स्वरूप अनुभवास येतें. आह्माकरितां—तद्व्याख्यानप्रियांकरितां—एक

अंक तरी त्या व्याख्यानांनीं भरून काढावा. करवीरमहिलेस स्थळ मिळालेंच नाहीं. असें कां? त्याविषयीं खुलासा होईल तर उपकारच होतील. उपाध्येबुवांचे परीक्षणांत व्यक्त होणारें तुमचें शब्दशास्त्रज्ञान विद्युन्मानसशास्त्रादि भाषांतरादिकांत दिसणारें अर्थशास्त्रज्ञान पाहून तुमच्या ठिकाणीं मला पूज्यबुद्धि उत्पन्न झाली आहे.

सुंदर पुरुष रंगस्थळीं पेंद्याचा वेष घेऊन आला तरी आनंदच देतो. त्याप्रमाणें प्रतिबंधक हा शब्द तुमचे लेखणींतून प्रतिबद्धक या रूपानें बाहेर पडला तरी आनंदच देतो. या व्याख्यानापासून, उडत असलेला पूर्वीचा मंत्रावरचा विश्वास समूळ उडाला. नवीन तऱ्हेचा बसला. चैतन्यसिद्धीचा प्रकार पाहून फार आनंद झाला. "ज्ञान रसाचे अंगीं बरें करण्याची शक्ति आणितें किंवा गुणावह परिणाम तरी करितें." (विद्यु० व्या० पृ० २४७) याचेखालीं टिपेंत हे श्लोक लिहावयाचे होते ते श्लोक.

क्रोधजो याति कामेन शांतिं क्रोधेन कामजः ॥
भयशोकोद्भवौ ताभ्यां भीशोकाभ्यां तथेतरौ ॥
ज्वरकालं स्मृतिं चास्य हारिभिर्विषयैर्हरेत् ॥
करुणार्द्रं मनः शुद्धं सर्वज्वरविनाशनं ॥

(वा० चि० श्लो० क्रमात् १६८।१७१)

कालः पाकः करः पादोभयं हर्षश्च तत्क्रिया ॥ (वा० स० स्थानयंत्र विध्यध्याय.)

मेसमेरिझम्, मेहरिझम् यांच्या स्वरूपावरून भूत खोटें वाटतें. आमचे गांवीं एका बाईला पिशाचपीडा आहे. आवेशाचेवेळीं (तो आवेश उपाय विचारण्याकरितां स्त्रियांनीं मुद्दाम आणविला होता) तीन चार स्त्रिया व मी बसलों होतों. आधीं स्त्रियांनीं पिशाचाचे नांवानें हाक मारून त्या विचारूं लागल्या, तेव्हां तिनें त्याप्रमाणेंच उत्तर दिलें. नंतर मी बुद्ध्या तिच्याच नांवानें विचारूं लागलों, तेव्हां शुद्धींत जसें उत्तर द्यावें तसेंच दिलें.

तुम्हीं असें म्हटलें आहे कीं—व्याख्या त्याचे विचार आपल्यांतील श्रीमज्जगद्गुरुशंकराचार्यांच्या सिद्धांतार्शी अगदीं जुळून आहेत—हें मला बरोबर वाटत नाहीं.

शंकराचार्यांचें मत.

१ जग काय तो एक ईश्वरच.

२ ईश्वरांत अवांतर भेद नाहीं.

३ त्याच्या ठिकाणीं परमार्थतः कोणताही गुण नाहीं, शक्ति नाहीं. (शां० अं० सू० १४.)

४ तो निराकार.

५ माया ह्मणून अध्यासरूप पदार्थ आहे, तींत प्रकृतिघटक द्रव्यें नाहींत. (शां० अ० १ सू० १ अवतरणिका.)

६ जग ईश्वराचा परिणाम व मिथ्या (ज्ञानबाध्य.)

७ एक पृथ्वीतत्वापासूनच वज्र, वैडूर्य, सूर्यकांत, पुष्पादि वैचित्र्य झालें आहे. आणि एक अन्नरसापासूनच भिन्न भिन्न रक्तादि धातु उत्पन्न होतात. केश, लोम, हाडें हीं होतात. (शां० अध्याय सूत्र २३) (पुष्कळ तत्वें मिळून अन्नरस बनतो. त्यांतील भिन्न भिन्न तत्वांपासूनच, भिन्न भिन्न रक्तादि धातु उत्पन्न होतात. हें तत्व शंकराचार्यांना समजलें नसावें अथवा लोकांचे डोळ्यांत धूळ टाकण्याकरितां हे दृष्टांत दिले असावे.)

डा० डाडसचें मत.

१ ईश्वर, प्रकृति (वीज) दोन पदार्थ.

२ ईश्वर ह्मणजे जीवसमुदाय (व्या० ७ पृ० २५१.)

३ तो ज्ञानादिसंपन्न.

४ जीव आणि ईश्वर परस्परभिन्न (व्या० ७ पृ० २७५ बावीसावे ओळीपासून पृ० २७६ तील १२ वे ओळीपर्यंत वाचा. सापाचा आकार माकडाला येत नाहीं. माकडाचा आकार सापाला येत नाहीं तेव्हां ईश्वराचा आकार सापाला, सापाचा आकार ईश्वराला कसा येईल.)

५ तो निराकार नाहीं (व्या०६ पृ० ८५.)

६ अध्यासात्मक माया नाहीं जड प्रकृति आहे तींत घटकद्रव्यें भरलीं आहेत.

७ जग विद्युत्परिणाम व सत्य (ज्ञानाबाध्य) (व्या० ३ पृ० १५६.)

८ रक्तादि धातु भिन्न भिन्न तत्वांपासून होतात.

९ वीज ह्मणजे भिन्न भिन्न तत्वांचा समुदाय (व्या० ७ पृ० २६३.)

जो मर्कटाद्यात्मे कधींही एक होत नाहींत ह्मणतो. ज्याला भिन्न भिन्न शंभर तत्वांनीं सुद्धां समाधान झालें नाहीं त्याचे मताशीं शंकराचार्यांचे मताचें साम्य दाखविणें ह्मणजे आश्चर्य वाटतें. "जें दिसतें तें सत्य नव्हे आणि सर्व पदार्थ ईश्वरस्वरूप आहेत." या वाक्यांचा अर्थ निराळाच आहे असें सिद्ध

होतें. आतां एवढेंच पुरे. माझी जन्मभाषा कानडी. मराठी भाषेचा अभ्यास ह्मणजे मासिकपुस्तकें आणि वर्तमानपत्रें वाचणें; करितां (मराठी) शब्ददोषांची माफी असावी, स्थळ मिळावें, लोभ असावा, ही विनंति.

आपला एक वर्गणीदार,

शेषदासाचार्य आद्य.

***

रा. रा. एडिटर **केरळकोकिळ,**

विनंति विशेष. **"सासरची पाठवणी"** या कविता फार सुरेख असून लहान मुलींनीं अर्थ समजून पाठ कराव्या, इतक्या सोप्याही आहेत. त्या कवितांत पतिपत्नींमध्यें सेव्यसेवकभाव असतो, असें गृहीतवत् धरलें आहे. व तशी रूढ समजूत आहे, हेंही निर्विवाद आहे; पण त्याला खरोखर कांहीं कारण नाहीं. सप्तपदीच्या भाषांतरांत त्याला आधार नाहीं. एवढेंच नव्हे, तर त्या पद्यांवरून उलट दंपत्यभाव ह्मणजे परस्पर मित्रभाव असेंच स्पष्ट दिसून येतें. शिवाय वधूवरांत तशी समजूत असणें, हें मानवी स्वभावाच्या भावी उन्नतीलाही प्रतिबंधक आहे. सबब छापून आलेल्या कवितांत जरी १९ व्या शतकाच्या पूर्वार्धांतील रूढसमजुती व्यक्त झाल्या आहेत, तथापि त्या कविता २० व्या शतकालाही अनुरूप असाव्या, अशा दृष्टीनें खालीं लिहिलेल्या सूचना केल्या आहेत. त्या विचाराअंतीं इष्ट वाटल्यास योग्य ती तजवीज व्हावी.

१ श्लोक ५० गाळून टाकावा व त्याचेबद्दल १७ नंतर पदराविषयीं एक पद्य असावें.

२ खालीं कोष्टकांत दर्शविल्याप्रमाणें पद्यांत फेरफार होणें.

पद्य.	पंक्ति.	मूळ.	सूचना.
३	३	सखे	बये
६	३	खोट्या विपरित मिषें	नाना परिसुनि कथा
१३	३	घरें मळिण हें	मलीन असणें
१४	४	आदरें	कौतुकें
२१	१	देव	मित्र
५१	१	सोडुं	मोडुं
,,	२	तोडुं	सोडुं

५२	१	देव	मित्र
,,	३	आज्ञेला	कार्याला

लोभ असावा, हे विनंति.

वासुदेव केशव मावळंकर.
बी. ए. एल्. एल्. बी.

* ह्यावर आमचें मत पुढील अंकी देऊं. तोंपर्यंत वाचकांचीं मतेंही कळून येतील. (ए. के. को.)

पुस्तकपरीक्षा.

श्रीमंत गायकवाडसरकारच्या आज्ञेनें तयार झालेलीं पुस्तकें.

२ इंग्लंददेशाचा विस्तार—हा प्रोफेसर **जे. आर. सीली**, एम्. ए. ह्यांच्या 'एक्स्पान्शन आफ् इंग्लंद' नांवाच्या पुस्तकाचा तर्जुमा रा. रा. **गोविंद सखाराम सरदेसाई** बी. ए. ह्यांनीं तयार केला आहे. हा ग्रंथ मूळग्रंथाशीं बरोबर उतरला आहे किंवा नाहीं, हें ताडून पहाण्याची मुळींच गरज नाहीं. कारण, तो अथपासून तों इतिपर्यंत अगदीं सरळ व सुबोध झालेला आहे. येवढेंच नव्हे, तर येवढा प्रचंड व गहन ग्रंथ लिहितांना जितकी ह्मणून काळजी ध्यावयास पाहिजे तितकी पूरोपूर घेतली आहे; हें ह्मणावयास आह्मांस मोठा संतोष होतो. ग्रंथ सुगम होण्यास, व त्याचें खरें महत्त्व आमच्या लोकांच्या मनांत सहजरीतीनें बिंबण्यास जितका ह्मणून प्रयत्न करणें शक्य दिसलें तितका करण्यांत राजश्री सरदेसाई ह्यांनीं काडीमात्र कसूर केलेली नाहीं. ह्मणजे प्रस्तुत ग्रंथकाराची थोडक्यांत माहिती; ग्रंथांतील सारांश; ग्रंथकाराचीं मतें; त्याजवर झालेल्या टीका; त्यावर आपलें मत; शेवटीं विषयविल्हेवारीनें परीक्षेस घातल्याप्रमाणें प्रश्न इत्यादि युक्तिप्रयुक्ति लढवून ग्रंथ अगदीं सुलभ करून महा-

१ प्रस्तुत भाषांतरकाराचा पश्चिमदेशांत प्रयाण करण्याचा योग आला तेव्हां, प्रस्तुत ग्रंथकार प्रो० सीली ह्यांची समक्ष गांठ घेऊन परस्पर संभाषणाचा लाभ घेण्याची संधि त्यांनीं व्यर्थ जाऊं दिली नाहीं.

राष्ट्रमंडळीपुढें ठेवला आहे. आणि शिवाय, प्रस्तुत ग्रंथकाराची मराठीभाषेवर सत्ताही चांगली आहे. तेव्हां प्रस्तुत ग्रंथ मराठीभाषेंत मोठा भूषणभूत झाल्याबद्दल वेगळें सांगण्याची गरजच राहिली नाहीं.

आतां मूळग्रंथांतील विषयाचें महत्त्व, मूळ ग्रंथकाराची ह्मणजे प्रोफेसर सीलीसाहेबांचीं मतें, त्याचें प्रतिपादन व थोरवी; आणि त्याची आह्मांस उपयुक्तता ह्याविषयीं विचार करूं. हा ग्रंथ प्रोफेसर साहेबांनीं इंग्लंदाचा एक तऱ्हेचा इतिहास ह्मणूनच लिहिला आहे. तथापि तो आजपर्यंत उपलब्ध असलेल्या इतिहासाप्रमाणें कथानकरूपी किंवा वृत्तांतरूपी मात्र नव्हे. त्यांनीं त्यास निराळेंच स्वरूप दिलें आहे. ह्मणजे तो एक गहन व मोठ्या विचाराचा विषय करून सोडला आहे ह्मटलें तरी चालेल. किंवा इतिहासाला आजपर्यंत कथानकाचें स्वरूप होतें. तें बदलून सीलीसाहेबांनीं त्यास शास्त्राचें स्वरूप दिलें, असें ह्मटलें तरी चिंता नाहीं. त्यांनीं इतिहासाची व्याख्याच मुळीं निराळी केली आहे. ते ह्मणतात, " घडलेल्या गोष्टींचें कथन केलें ह्मणजेच इतिहासकाराचें कर्तव्य संपलें असें नाहीं. तर मागें घडलेल्या गोष्टींवरून पुढें कोणकोणत्या गोष्टी घडतील, राज्याच्या कसकशा उलाढाली होतील, कोणाचा पगडा वर चढेल व कोणाचा खालीं होईल, हें अनुमानानें आधींच निश्चित करून ठेवणें—ह्मणजे भविष्य कथन करणें—हें इतिहासकाराचें खरें कर्तव्य आहे. " आणि ह्याच धोरणावर हा येवढा विस्तृत ग्रंथ लिहिला आहे. ह्यांत अमेरिकेविषयीं, हिंदुस्थानाविषयीं व इतर माहितीही अगदीं ओतप्रोत भरलेली आहे; आणि त्यांची शंका समाधान करण्याची हातोटीही फार तारिफ करण्यासारखी आहे. तेव्हां प्रस्तुत ग्रंथांतील विषय मोठा विचाराहं; अतएव गहन व्हावा हें अगदीं साहजिक आहे. तथापि रा. रा. सरदेसाई ह्यांनीं तो सरळ व सुलभ भाषेंत सांगून अनेक प्रकारांनीं तो विशद केला असल्यामुळें, सर्व महाराष्ट्रवाचकांवर त्यांचे संस्मरणीय उपकार झाले आहेत, ह्यांत तिळमात्र शंका नाहीं.

तथापि मूळ विषयावर व त्याच्या कर्त्यावरही बरेच आक्षेप घेण्यासारखे आहेत; व तद्देशीय टीकाकारांनीं घेतल्याचें भाषांतरकारांनीं नमूदही केलें आहे. येवढेंच नव्हे, तर त्याचें त्यांनीं यथामत्या खंडनही केलें आहे. ज्या ग्रंथाचें त्यांनीं परिशीलन केलें, ज्या विषयाचें त्यांनीं मनन केलें, ज्या ग्रंथकारास ते स्वतः भेटले, जी कृति त्यांनीं परम आदरानें लोकांपुढें मांडिली तिचें मंडन करण्यांत त्यांची पूज्यबुद्धि व्यक्त झाली ही गोष्ट खरी आहे. तथापि तेवढ्यानें इतर

टीकाकारांनीं प्रस्तुत ग्रंथावर काढलेल्या आक्षेपांचा निरास होतो असें मात्र समजतां उपयोगी नाहीं.

प्रोफेसर सीलीसाहेबांनीं इतिहासविषयावर विचार करण्याची नवीन टूम काढली, उपयुक्त गोष्टीचा शोध लावला ही गोष्ट खरी आहे. पण त्या आवेशांत पूर्व इतिहासलेखकांवर मनस्वीच ताशेरा झाडला आहे. किंबहुना आजपर्यंतच्या सर्व इतिहासकारांस तुच्छ मानून आपल्या नूतन कल्पनेचेंच वर्चस्व मिरविलें आहे असें ह्मटल्यास मुद्धां वावगें होणार नाहीं. आणि तेंही एक दोन वेळच नव्हे, तर ठिकठिकाणीं चर्वितचर्वण इतकें पाल्हाळिक झालें कीं, त्याचा कानास अगदीं वीट येऊन जातो. ग्रंथकाराचा कटाक्ष विशेषत: इंग्लंडच्या शेवटच्या तीन शतकांच्या इतिहासकारांवर फार आहे. ते ह्मणतात:—"ह्या शतकांचा इतिहास लिहितांना मुख्य गोष्ट कोणती घडत होती हें इतिहासकारांच्या लक्षांत न येतां, इतर क्षुल्लक गोष्टींवर ते पाहिजे तितका पाल्हाळ लावित बसतात. इतिहास ह्मणजे राज्य करण्याचा कायदा नव्हे. इतिहास ह्मणजे घडून आलेल्या गोष्टी जमेस धरून त्यांच्या माहितीनें नवीन उद्भवलेले प्रश्न सोडविणें. इतिहासाचा खरा उपयोग पुढें काय घडणार आहे. त्याचा आगाऊ अंदाज करणें हा होय. गोष्ट घडून आल्यावर ती सर्वांस समजतेच; परंतु ती घडून येण्याचे पूर्वी तिचें भाकित करून ठेवणें हें काम इतिहासाचें."

इत्यादि गोष्टी पुन:पुन्हा पुन:पुन्हा सांगून ठिकठिकाणीं पूर्व इतिहासकारांवर भडिमार केला आहे. व तो मोलें नांवाच्या टीकाकारासही दु:सह झाला आहे. ह्यावर आमचे सरदेसाई ग्रंथकाराची तरफदारी करतात:—"वादग्रस्त विषयांचें विवेचन करण्याच्या भरांत स्वपक्षपुष्ट्यर्थ ग्रंथकार स्वप्रतिपादित वाक्यास अत्यंत प्रधानत्व स्वाभाविकरीत्या देतो, ह्मणून तें अक्षरश: तसेंच घेऊन चालणें रास्त नाहीं." ह्या ह्मणण्यांतील पुळपुळीतपणा सहज कळण्यासारखा असल्यामुळें, त्याची अधिक चर्चा करण्याचें प्रयोजन दिसत नाहीं.

प्रस्तुत ग्रंथांतील प्रतिपाद्य विषय आमच्या वाचकांसही कळावा ह्मणून रा. रा. सरदेसाई ह्यांनीं काढलेला गोषवाराच येथें दाखल करतों:—

"राज्यविस्तारसंबंधानें इंग्लिशसमाजांत दोन अगदीं विरुद्धमतें प्रचारांत आहेत. एक अतिशयोक्त गुण व दुसरें अवमानित गुण. पहिलें मत धारण करणारे लोक इतका हा विस्तार पाहून आश्चर्यातिशय व हर्षोद्रेक यांनीं चकित होऊन असें ह्मणतात कीं, एक प्रकारचें भूषण व मनास समाधानकारक असें सम-

जून हें येवढें विस्तृत राष्ट्र स्वतःकडेच आपण राखलें पाहिजे. दुसरें मत असें आहे कीं, हा एवढा विस्तार केवळ अन्यायी परापहारानें झाला आहे, तो निरुपयोगी असून त्याचें ओझें विनाकारण इंग्लिशराष्ट्रास सोसावें लागतें; हा इंग्लंडावर लादलेला अनुपयुक्त भाग आहे, ह्मणून ज्या उपायांनीं हा सर्व विस्तार नाहींसा होईल ते उपाय राज्यकर्त्यांनीं योजावे. प्रस्तुत पुस्तकांत ह्या दोनही मतांचें अवलंबन केलेलें नाहीं.

पहिल्या मताच्या विरुद्ध प्रोफेसर असें ह्मणतात कीं:—

१ अतीव विस्तृत राष्ट्रें प्रजांना फारशीं सुखावह असूं शकणार नाहींत.

२ पूर्वजांच्या शौर्यधैर्यादि गुणांचें केवळ चीज ह्मणून राष्ट्रविस्तार राखिला पाहिजे, ह्या समजांत फारसें तथ्य नाहीं.

३ ताब्यांतील मुलूख ह्मणजे ताब्यांतील इतकी संपत्ति असें हें लोक समजतात तेंही बरोबर नाहीं.

४ अतीव विस्तार झाला ह्मणून तो करणारांच्या आंगीं शौर्यधैर्यादि गुण विलक्षण वास करीत होते, हेंही सिद्ध होत नाहीं.

दुसऱ्या मताविरुद्ध प्रोफेसर असें ह्मणतात कीं:—

१ जुन्याकाळच्या विस्तृत राज्यासारखें इंग्लिश राज्य जुलमी नाहीं.

२ तें ओसाड प्रदेशांवर स्वाभाविकरीत्या वाढत गेलें आहे.

३ जर तारीफ करण्यासारखें त्याच्यांत कांहीं नसेल, तर दोष देण्यासारखें अगर अस्वाभाविक असेंही त्यांत कांहीं नाहीं.

४ इंग्लंडांत जास्त वाढलेल्या लोकसंख्येस वसाहती ह्या तेथें जाऊन राहण्यास सोयीची जागा आहे.

५ अमेरिकेंतील युनायटेड स्टेट्स स्वतंत्र झालीं याजवरून इतर वसाहतीही केव्हां तरी स्वतंत्र होतील असा सिद्धांत काढतां येत नाहीं. वरील पहिल्या मताच्या विरुद्ध तिसऱ्या कलमांत सांगितलेल्या ज्या दोषामुळें त्या वसाहती एकवार स्वतंत्र झाल्या तो दोष आतां काढून टाकण्यांत आला आहे.

६ वीज आणि वाफ, ह्या दोन अद्भुतशक्तींचा शोध लागल्यानें दूर अंतरावरील प्रदेशांत धर्मैक्याचा प्रसार शक्य होऊन ते एका अंमलाखालीं सुखानें नांदण्याचीं साधनें जीं पूर्वी अस्तित्वांत नव्हतीं तीं हल्लीं उपलब्ध झालीं आहेत.

७ अलीकडे लोकनियुक्ततेचें तत्त्व प्रस्तुत होऊं लागल्यापासून दूर दूर प्रदेश एका अंमलाखालीं राहण्याची उत्कृष्ट सोय प्रचारांत येऊं लागली आहे.

असो. यावरून इतकेंच सिद्ध होतें कीं, जरी एकवार झालेला विस्तार राखलाच पाहिजे असें नाहीं, तरी तो राखणें इष्ट व फायदेशीर आहे."

येवढ्यावरून ह्या सर्व ग्रंथांत सीलीसाहेबांनीं काय काय विषय प्रतिपादन केला आहे, व शेवटीं सार किंवा अनुमान किंवा भविष्य काय काढलें आहे हें वाचकांच्या सहज लक्षांत येण्यासारखें आहे. पूर्वींच्या इतिहासकारांच्या चुक्या दाखविण्यांत किती वेळ खर्ची घातला आहे हें पुन्हां पहाणें असल्यास सदरहू ग्रंथाचें व ग्रंथकाराचें मंडन करणारे रा. रा. सरदेसाई सुद्धां मोठ्या खजिलपणानें ह्मणतात:—" इतिहासकारांचा समज चुकीचा झाला असल्याबद्दल प्रोफेसरांनीं पदोपदीं इतकें विवरण ह्या ग्रंथांत केलें आहे कीं, त्याचे उतारे पुनरपि येथें घेणें शक्य नाहीं. ह्मणून पुस्तकांतील, पृष्ठांचें तारण मात्र येथें देतों. पृष्ठ १।२।३।२९।१९८।२६१।२६९ वगैरे."

इतकी पूर्वींच्या इतिहासकारांची मनसोक्त निंदा करून स्वत: प्रोफेसरसाहेबांनीं कोणता अपूर्व शोध लावण्याची बहादुरी केली ? पूर्वींच्या इतिहासकारांना इतिहास ह्मणजे काय तें कळलें नाहीं; त्यांनीं शेंकडो चुक्या केल्या; मुख्य गोष्ट कोणती घडत होती हें त्यांच्या बुद्धीस कळलें नाहीं; क्षुल्लक बाबीवरच त्यांनीं पाल्हाळ लाविला. इतिहास ह्मणजे कांहीं घडलेल्या गोष्टींचें कथन नव्हे. घडलेल्या गोष्टी कोणासही कळतात. घडून आलेल्या गोष्टींवरून पुढील राज्यक्रांतीचें वगैरे आधीं भविष्य कथन करून ठेवणें ह्याचें नांव इतिहास. हें सारें क्षणभर कबूल केलें; तर प्रोफेसरसाहेबांनीं स्वत: कोणता सिद्धांत बांधला ? कोणतें अनुमान काढलें, आणि कोणतें भविष्य कथन केलें ? तर कांहीं नाहीं. डोंगर पोखरला आणि उंदीर काढला ह्यांतलीच अवस्था ! त्यांच्याच देशबांधवांपैकीं कोणी ह्मणतात, हिंदुस्थान हें आपल्या पूर्वजांच्या पराक्रमांचें द्योतक ह्मणून आपल्या ताब्यांत ठेवावें; आणि कोणी ह्मणतात, तें अन्यायानें केलेलें परापहरण आहे ह्यास्तव ज्यांचें त्यांस परत करावें. हा दोघांचाही समज चुकीचा आहे असें निष्ठून सांगून प्रोफेसरांनीं फैसला दिला. तो काय ? तर तो देश आपल्या ताब्यांत ठेवण्याची आवश्यकताच जरी नाहीं, तरी तो तसा ठेवणेंच फायदेशीर आहे. ह्मणजे 'आहे तें सर्व ठीक आहे, असेंच असावें.' हा सिद्धांत शाळेंतील एखादा विद्यार्थी सुद्धां सांगून किंवा सिद्ध करून देईल. मग एवढें अकांडतांडव करावयाला प्रोफेसरच कशाला पाहिजेत ? इतिहास ह्मणजे घडलेल्या गोष्टींचें कथन नव्हे; पुढील स्थितीचें आधीं भविष्य

वर्तवणें ह्याचें नांव इतिहास. हें जर खरें, तर प्रो० सीलीसाहेबांनीं कोणतें भविष्य आपल्या ग्रंथांत वर्तविलें ? हिंदुस्थान इंग्रजांच्या ताब्यांत राहील, का कधींकाळीं स्वतंत्र होईल ह्या विषयींचें कांहींतरी अनुमान यत्किंचित् तरी त्यांनीं केलें आहे काय ? तें जर त्यांनीं केलें असतें, तर त्यांचे त्यांच्या देशबांधवांनींच नव्हे तर आह्मी हिंदूंनीं सुद्धां पोवाडे गायले असते, बोलबलाय केली असती, नव्हे, लिंबलोण देखील उतरलें असतें. पण जी गोष्ट मुळींच असंभवनीय ती होणार कशी ? तुकारामांनीं ह्मटलें आहे:—" बोल बोलतां वाटे सोपें । करणी करतां टीर कांपे " ते खरें आहे. " राज्यक्रांतीचें भविष्य आधीं सांगून ठेवणें याचें नांव इतिहास." हें वाक्य तोंडानें सहज काढतां येतें. व तें ऐकणारांनाही क्षणभर गोड वाटतें, सत्य वाटतें, उपयुक्त वाटतें, व चकितही करून सोडतें; पण त्यांत यश येण्याचा मार्ग मृगजलांत स्नान करण्याइतकाच येण्याचा संभव आहे. कसा ? त्याविषयीं थोडासा विचार करूं.

खरोखर प्रो० साहेबांनीं अमुक वर्षांनीं हिंदुस्थान स्वतंत्र होईल, व ह्मालेंच पाहिजे. ह्यास कारणें अमुक अमुक—असा त्यांनींच उत्पन्न केलेला गूढ प्रश्न सोडविला असता, तर आह्मां हिंदुलोकांची आशावली वळावली असती. व तिच्या हर्षसुमनांची आह्मीं त्यांजवर वृष्टि केली असती. व त्यांच्या देशबांधवांनीं त्यांस पूर्वीच जागृति दिल्याबद्दल त्यांच्यावर छत्रचामरें सुद्धां वारलीं असतीं. पण तो योगायोग यावा कसा ? आधीं कोणतेंही भविष्य पूर्वी कथन करावयाचें ह्मणजे कांहीं सामान्य गोष्ट नव्हे. त्यांत राज्यक्रांतीचें भविष्य ह्मणजे केवळ दुरापास्तच ! ही गोष्ट प्रो० साहेबांना प्रथम लेखणींतून काढतांना जरी सोपीशी वाटली असली तरी ग्रंथ समाप्त झाल्यानंतर अखेरीस अनुभवाअंतीं ती अशक्य असल्याबद्दल खात्री झाल्याबांचून राहिली नसेल. कारण, साधारण गोष्टींत सुद्धां तिच्या परिणामाविषयीं जर प्रोफेसरांची खात्री होत नाहीं, संशयच बाकी राहतो, तर एवढ्या अफाट राष्ट्रविस्ताराच्या परिणामाचा निश्चयात्मक सिद्धांत त्यांच्यानें होणार कसा ?

प्रस्तुत भाषांतरकार रा. रा. सरदेसाई ह्यांनीं विलायतेस गेल्यावर प्रोफेसर साहेबांची प्रत्यक्ष गांठ घेतली. आणि त्या विद्वत्पुरुषाकडून कांहीं शंकांचें निवारण होईल ह्मणून कितीएक विषयांवरील मतें त्यांस विचारिलीं; परंतु त्यावर आलेलीं उत्तरें कशीं मासलेवाईक आहेत तीं पहा. आपल्या पूर्वीच्या चाली ह्मुगारून देऊन नवीन सुधारणा करणाऱ्यांच्या कृतीपासून नफा होईल किंवा कसें ? ह्यावरील प्रो० साहेबांचें मत सरदेसाई कळवितात:—

(पु० चा०)

केरळकोकिळपरीक्षण.

(शा० वि०)

होसी शिक्षक बालकां बहु बरा, प्रौढांस सद्बोधक
वृद्धां उत्तम मित्र, मान्य सुजनां, सर्वांसही तोषक ॥
कीं अज्ञान तमामध्यें असति जे ज्ञानार्क तूं त्यांप्रती
बारे **केरळकोकिळा** तव गुणां वर्णूं तरी मी किती ॥ १ ॥
वर्णायास यथार्थ ते गुण तुझे नोहे जरी शक्य हा
घेतों आज तरी लहान मुखि मी मोठाच कीं घांस हा ॥
ज्या तूतें बघ **केसरी**प्रभृति ते अत्यंत नांवाजिती
बारे **केरळकोकिळा** तव गुणां वर्णूं तरी मी किती ॥ २ ॥
जे प्राचीन मतावलंबि असती ऐसे जुने लोक, वा
तैसा आधुनिकाग्रणी-गणहि जो विद्वज्जनांचा नवा ॥
तेही भेदरहीत सर्व तुजला नानापरी वानिती
बारे **केरळकोकिळा** तव गुणां वर्णूं तरी मी किती ॥ ३ ॥
पक्षांमाजि पहा जसा रमवितो मंजू स्वरें कोकिल
तैसा वाचकमानसा रिझविसी सन्मान्य तूं **कोकिल** ॥
त्याहीहूनि विशेष सद्गुण तुझ्यामाजी परी वंदती
बारे **केरळकोकिळा** तव गुणां वर्णूं तरी मी किती ॥ ४ ॥
जो शब्दें रमवी वसंतसमयीं कामीजना केवल
वाटे सर्व जनांसही प्रिय बहू तत्रापि तो **कोकिल** ॥
तूं तों संतत रंजवूनि हरिसी अज्ञानरूप स्थिती
बारे **केरळकोकिळा** तव गुणां वर्णूं तरी मी किती ॥ ५ ॥
देसी दर्शन देउनी हरिख जो तूं आपुल्या वाचकां
वाटे देइल तो न मूर्त धनद द्रव्यार्पणें याचकां ॥
ओवाळावि च वाटतें तुजवरी तैं आदरें आरती
बारे **केरळकोकिळा** तव गुणां वर्णूं तरी मी किति ॥ ६ ॥
नारी रूपवती स्वयेंच खुलते साध्याहि डौलें जसी
रे त्वद्भूषणपद्धती अनुपमा, रम्या सुबोधा तसी ॥
जीनें तूं **मलबारवर्णन** तशी देसी दुजी माहिती
बारे **केरळकोकिळा** तव गुणां वर्णूं तरी मी किती ॥ ७ ॥

जेव्हां ग्रंथपरीक्षणार्थ बससी तूं आपुल्या आसनीं
होसी निस्पृह भाससी जणुं तदा सत्यव्रताची खनी ॥
दावीले गुण हे जधीं मत दिलें त्वां **बालबोधा**प्रती
बारे **केरळकोकिळा** तव गुणां वर्णूं तरी मी किती ॥ ८ ॥
जीमाजी भरलीं सुरम्य यमकें मोत्यें जसीं कोंदणीं
छंदोभंग नसे, न अन्य असती ते दोष मात्रागणीं ॥
ऐसी त्वत्कविता मना सुखविते जैसी पतीतें सती
बारे **केरळकोकिळा** तव गुणां वर्णूं तरी मी किती ॥ ९ ॥
कित्ता घेउनियां **मयूर** कविचा त्वां प्राकृतीं गोविलीं
पद्यें "**पंकजमाल**" ती बुधजनां अत्यादरें वाहिली ॥
छंदःशास्त्रयुत प्रसादरस दे माधुर्य तीतें किती !
बारे **केरळकोकिळा** तव गुणां वर्णूं तरी मी किती ॥ १० ॥
नानाशास्त्रविशारद क्षणभरी ऐकूनियां डोलती
ऐसे **शास्त्रिय** बोल वर्णुनि तुझे टीका करावी किती ॥
"**विद्युन्मानसशास्त्र**" आदि करुनी प्रौढी तयांची अती
बारे **केरळकोकिळा** तव गुणां वर्णूं तरी मी किती ॥ ११ ॥
निर्दोष स्थिति **ईश्वराविण** न ती अन्यत्र कीं सांपडे
या न्यायें क्वचित स्थलीं तव कृती दोषार्ह दृष्टी पडे ॥
देऊं कैंवि महत्व वर्णनिं अशा त्या सूक्ष्म दोषांप्रती ?
बारे **केरळकोकिळा** तव गुणां वर्णूं तरी मी किती ॥ १२ ॥
यथामति निवेदिलें स्वमत **कोकिळा** हें तुला
असो, सतत दर्शनें पुरवि आमुच्या हेतुला ॥
चिरायु विलसोनियां रिझवि सर्व विद्वज्जना
यशस्वि जनिं होउनी सुखवीं चालकाच्या मना ॥ १३ ॥

आ० न० से०

नवीन गोवें. } **व्यंकटेश यशवंत शिंगवाळ,**
के० को० जुना वर्गणीदार.

PRINTED and published by Janardan Mahadeo Gurjar AT JAVAJ DADAJI'S "NIRNAYA-SAGARA" PRESS, Bombay.

आर्यधर्माभिमानी लोकांकरितां सचित्र हिंदु घड्याळें.

प्रत्यक्ष देवदेवतांनींच हृदयासंबिध वास
केल्यावर अधर्म कितीसा टिकेल.



नमुना मागवा. तुमच्या पहाण्यानेंच आनंद जर होईलच होईल, तर मग वापरण्यानें कां न होणार बरें ? देवतांचे दर्शनानें हिंदुधर्माभिमानास भरती नाहींका येणार ? नांव ऐकतांच पहावेंसें वाटतें व पाहातांच घ्यावेंसें वाटतें.

हिंदु घड्याळें कशीं आहेत, दिसण्यांत सुंदर, खिशांत हलकीं, मजबूत, टिकाऊ, अंगचे चावीचीं, तबकडी मिन्याची पांढरी असून त्यावर रीतीप्रमाणें रोमन आंकडे असून ठळक मराठी आंकडेही आहेत आणि प्रत्येक आंकड्यामध्यें हिंदुपूज्य देवतांचीं सुंदर चित्रें आहेत. श्रीगणपती, सरस्वती, रामदासस्वामी, हनुमंत, रामसीता, लक्ष्मीनारायण, गरुड, अष्टभुजादेवी, विठ्ठलरखुमाई, शंकरपार्वती, अक्कलकोटस्वामी, श्रीगुरुदत्तात्रय, आणि मध्यभागीं, महाराष्ट्रास जिवंत करणारे गोब्राह्मणप्रतिपालक **श्रीशिवाजीछत्रपतीमहाराज** यांचें सुबक चित्र आहे. अशीं हीं अपूर्व हिंदु घड्याळें आमचे देशबांधव व भगिनी काय ह्मणून न घेतील !

हिंदु सिलेंडर पिक्क नी. सी. वॉच किं. रु. ८॥ ते. १० ग्या. वर्ष १
हिंदु लिव्हर प्रीव्हेन्स नी. सी. वॉच किं. रु. १५ ग्यारन्टी वर्षें २
हिंदु रासकोप सिस्टीम नी. सी. वॉच किं. रु. १७ ग्या. वर्षें ३
हिंदु प्रिव्हेलन्स चांदीचें वॉच किं. रु. २५ ते ३० ग्या. वर्षें ४
हिंदु सोन्याचें वॉच किं. रु. १०० ते १२५ ग्या. वर्षें ४
हिंदु सचित्र आर्मी वॉचेस किं. रु. १० ते १२५ पर्यंत.
हिंदु सचित्रटाईमपीसेस साधें, अलार्म, स्विंग, जपींगई. आंकड्यामध्यें देवतांचीं चित्रें, मध्यभागीं दरबारी व अश्वारूढ श्रीशिवाजी, आणि श्रीशंकरपार्वतीसह. किं. रु. २॥–४–६–१० ते ३० पर्यंत.

जी० बी० नाईक आणि कंपनी. बिलासिसरोड, नाका भायखळा, मुंबई.

नवीन पुस्तकें.

१ श्रीज्ञानदेवकृत अमृतानुभव ग्रंथ श्रीहंसराजस्वामीकृत समओंवीबद्ध टीका व कठीण शब्दांचा कोश यांसह किंमत १२ आणे. ट. व व्ही.पी.ख.८३ आणे.

२ अमृतानुभव मूळ कठीण शब्दांच्या कोशासह. सांचा लहान खिशांत रहाण्याजोगा किंमत. ८६ ट. व व्ही. पी. ख. ८३ आणे.

भर्तृहरिकृत शतकत्रय (शृंगार, नीति व वैराग्य) वामनपंडितकृत श्लोकबद्ध टीका व सरळ मराठी भाषांतर यांसह किं० १२ आणे. ट. व व्ही.पी.ख.८४ आणे.

तिन्ही पुस्तकें ग. कृ. च्या छापखान्यांत जाड व घोटींव कागदावर छापिलीं आहेत. प्रत्येक जातीच्या १० प्रती घेतल्यास १ प्रत जास्त मिळेल.

४] **काशीनाथ वासुदेव खांडेकर.**

पुस्तकविक्रीचें दुकान रामवाडी, पोस्ट मार्केट, मुंबई.

धनुर्धारीकृत पुस्तकें विक्रीस तयार.

(दोन रुपयांची घेतल्यास फक्त कोकिळच्या वर्गणीदारांस पाऊणपटींनें मिळतील.)

महाराष्ट्रकुटुंबसंग्राह्यपुस्तकावली.

१ मराठ्यांच्या मर्दुमकी. भाग १. कि. ८=
२ मराठ्यांच्या मर्दुमकी. भाग २. कि. ८≡
३ जवानमर्द ब्राह्मणभाई. बापू गोखले. कि. ८=
४ जवानमर्द ब्राह्मणभाई. विठ्ठल शिवदेव. भाग २. कि. ८≡
५ जवानमर्द ब्राह्मणभाई. हरिपंत फडके. भाग ३ कि. ८=
६ जवानमर्द मराठेगडी. होळकर. भाग १. कि. ८=
७ जवानमर्द मराठेगडी. जनकोजी शिंदे. भाग २. कि. ०।—
८ पानपतचा मोहरा. कि. ०।—
९ शूर अबला कि. ८=
१० वीरस्नुषा राधाबाई. आ. २री. कि. ८=
मराठ्यांचा पत्रबद्ध इतिहास मोडी. कि. ०।≡
आपल्या देशाचा लहानसा इतिहास. कि. ०।=
११ राजकार्यधुरंधर मंडळी. फडणीस नाना. कि. ०।=

२ प्रापंचिकांचा पुस्तकसंग्रह

१ पैसा कसा मिळेल? कि. ८—॥०
२ स्वभाव. कि. ८—॥०
३ अभ्यास. कि. ८॥
४ आजोबानें नातवास सांगितलेल्या गोष्टी. कि. ८—॥

जनार्दन महादेव गुर्जर, दुकान रामवाडी—मुंबई.

व्यापारी व ग्राहक ह्यांकरितां. **हरएकप्रकारचा माल** मुंबईत मिळणारा वस्त्रशीर बाहेरच्या लोकांस मिळण्याची सोय.

D. K. SANDU
RAMWADI, BOMBAY.

दत्तात्रेय कृष्ण सांडू ह्यांचें हरएक प्रकारचा माल मिळणारें, आणि माफक **अडत** घेऊन माल रवाना होणारें दुकान:—

रामवाडी, मुंबई.

आमच्या दुकानीं सावंतवाडीचा रंगितमाल **गंजिफा**, आर्यौषधीकारखाना—पनवेल येथील **औषधें, स्टेशनरी, वाकेरीचें भातें** असून सतारीची **तार**, सतारी मृदंग, तबले, इत्यादि पाठवितों.

वा. कृ. सांडू. दुकानदार—रामवाडी मुंबई.

कर्नाटकांतील औषधि.

आजपावेतों १८ वर्षांपासून वाग्भटादि अनेक ग्रंथांच्या आधारानें मीं स्वत औषध तयार करून अनेक लोकांस देऊन अनुभव घेतले आहेत. आणि बहुत लोकांकडून दाखले मिळाले आहेत. या कर्नाटक प्रांतांत अनेक वनस्पति मिळत असल्याकारणानें ताज्या वनस्पतींपासून औषधें जेव्हांचे तेव्हां तयार करण्यांत येतात.

१ मदनकामेश्वरी पाक.

या पाकांत ४० वनस्पतींचा समावेश केला असून उत्तम धातुपौष्टिक, शक्तिवर्धक, फार रुचिकर व अनेक रोगनाशक आहे. २४ रु. भार शेरास किंमत रुपये २.

२ प्रवाळ, कस्तूरी, केशरमिश्रित, धातुपौष्टिक, व स्तंभक, अग्निवर्धक, कामोत्तेजक गोळ्या ४२ किंमत रुपये २.

३ **प्रवाळभस्म.** वनस्पतिपुटानें तयार केलें आहे. पौष्टिक, पित्तनाशक, धातुवर्धक. दर तोळ्यास किंमत रु. १०४

४ लोहमिश्रित मदनोत्तेजक गोळ्या. गोळ्या ४२ कि. रुपये. २.

छातींतील रोग, धातुविकार, नपुंसकत्व, स्वप्नावस्था, रक्तसंबंधी रोग, अग्निमांद्य, मेंदूसंबंधी रोग, इत्यादि अनेक रोग या गोळ्यांपासून नाश पावतात. विशेष माहिती औषधासोबत मिळेल.

सदरहू औषधाचे अनुपानकागद औषधासोबत. औषधाचे किंमतीशिवाय, ट. ख. पडेल. व्ह्याल्युपेबल मार्गानें पाठवून देऊं.

५ उत्तम वेलदोडे. बाजारभावाप्रमाणें पाठवून देऊं.

५] **पत्ता. रामप्पा सुब्राव वझे. कसबेकर** सिरसी.
जिल्हा, उत्तरकानडा.

THE INDIAN GOVER. SECURITY MARRIAGE PROVISION FUND.

धी इनडीअन गव्हरन्मेंट सिक्युरिटी म्यारेज प्रोव्हीजनफंड.

मुंबई.

वरील फंडांत पूर्वी २५०० मेंबरांचीच संख्या ठेविली होती. ती भरून गेल्यामुळें व प्रवेश-अर्ज फार येऊं लागल्याकारणानें मेंबरांची संख्या ५००० पर्यंत वाढविली आहे. **वर्गणीचे दर** फारच कमी आहेत ह्मणजे दरमहा १।,२॥, ३॥।, अथवा ५ रुपये भरल्यानें **लग्न** अगर मौंजीबंधनाच्या खर्चासाठीं अनुक्रमें २५०, ५००,७५०, अथवा १००० रु० चें ठरींव बोनस मिळतें. दिसेंबर अखेरपर्यंत १७ मेंबरांस सदर्हूप्रमाणें बोनस मिळालें आहे. व दरमहिन्यास पुढेंही दिलें जाईल.

डेथबेनिफिटफंड. यांत कोणत्याही जातीच्या ६० वर्षांच्या आंतील स्त्री अगर पुरुष यांस डाक्टरचे सरटिफिकिटाशिवाय मेंबर होतां येतें. व मरणानंतर आपल्या वारसास २००० रु० पर्यंतचा पुरवठा करितां येतो. यांत ठरींव वर्गणी दरमाहा रु० १ आहे. प्रवेशफी रु० २—

वरील फंडाचा सर्व पैसा गव्हरन्मेंट सिक्युरिटीमध्यें ठेवण्याचा ठराव आहे. जास्त माहितीस्तव एक आणा पाठवावा. एजंट पाहिजेत.

पत्ता. नं. ५ कावसजी पटेलरस्ता, कोट, मुंबई. } Parulkar & Co. **सेक्रेटरीज्.**

आह्मीं देशावरील व्यापाऱ्यांचा माल येथें खपवून त्याच्या मोबदला इकडील माल देशावरास योग्य कमिशननें पाठवून देतों. तसेंच स्थावर मिळकती—घरें, बागबंगले वगैरेवर **कर्ज मिळवून देतों.** विशेष माहितीस्तव खालीं सही करणारांस समक्ष भेटावें अगर लिहावें. [१–१२

पत्ता. नं. ५ कावसजी पटेलरस्ता, कोट, मुंबई. } Parulkar & Co. **एजंटस्.**

स.ग.पंडित.यांचे

मार्च. (वर्षाची वर्गणी १०३ खंडासह. फुटकळ अंकास ०४.) १८९६.

केरळकोकिळ.

वर्षारंभ जानेवारी.

पु० १०] [अं० ३

विधिरेव विशेषगर्हणीयः करट त्वं रट कस्त्ववापराधः ॥
सहकारतरौ चकार यस्ते सहवासं सरलेन कोकिलेन ॥१॥

आनंदन महादेव गुर्जर बुकसेलर अॅण्ड पब्लिशर.
रामवाडी
मुंबई.
१८९६.

सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत.

ह्या पुस्तकांतील लेख कोची (मलबार) येथें तयार होऊन,
ते मुंबई येथें छापून प्रसिद्ध होतात.

विषयांची अनुक्रमणिका.

	पृष्ठ.		पृष्ठ.
रंग बदलणारा सरडा. ...	४९	अमेरिकेंतील भयंकर अनर्थ.	६१
स्वदेशवसनग्रहण.	५३	पत्रव्यवहार...	६४
तपेल्यांतलें डोकें.	५६	पुस्तकपरीक्षा.	६७
स्वयंभू 'सर्टिफिकिटें'. ...	५९		

पुस्तकांची पांच वगैरे.

१ द्वैतमतप्रसारक श्रीमध्वाचार्य ह्यांनीं स्थापिलेल्या मुख्य मुख्य मठांचा रंगीत वंशवृक्ष. २ विचारसौंदर्य. ३ इंदूर संस्थान भाग दुसरा. ४ निर्णयसागरचें शके १८१८ चें पंचांग. ५ मातृभक्ति. (संस्कृतचंद्रिका मासिकांतील निबंध.) ६ पटवर्धन यांची डायरी. ७ कन्याविक्रयदुष्परिणामनाटक ८ गणपत कृष्णाजीचें पंचांग.

वरील पुस्तकें व वस्तु पाठविणारांचे फार उपकार आहेत.

---

१ हा वृक्ष फार सुंदर रीतीनें पुण्याच्या चित्रशाळेंत तयार करून छापविण्याची रा. रा. गुरुराव रामचंद्र ह्यांनीं खटपट केली आहे. ह्यांत शेषशायी नारायणाची एक सुंदर प्रतिमा, श्रीमध्वाचार्य, गुरु, शिष्य इत्यादिकांचीं चित्रें असून वृक्षाच्या प्रत्येक पत्रावर शिष्यशाखेचीं नांवें आहेत. काम फार सुबक व सफाईदार असून आरशांत घालून ठेवण्यासारखें आहे. श्रीमध्वाचार्यसांप्रदायानीं ह्याची एक प्रत अवश्य संग्रह करावी.

२ ह्या पंचांगाचें काम प्रतिवर्षाप्रमाणेंच मनोहर असून, ह्यांत राशिचक्र वगैरे सर्व कांहीं आहे. ह्यांत निर्णयसागरच्या पुस्तकांचीं यादी दिली आहे. पंचाग उत्तम खरें.

३ ही डायरी मेहनतीनें तयार केलेली आहे. हींत साधारण सर्व माहिती असून प्रत्येक दिवसाचें नक्षत्र व घटिकापळेंही दिलीं आहेत. एका पेजावर एक इंग्रजी लहानशी ह्मण, व एका पेजावर एका रोगावर एक औषधोपाय सांगितला आहे. हें सर्व चांगलें आहे, पण छपाई मात्र नीट नाहीं. पुढील वर्षी तरी काळजी घेणें अवश्य आहे.

४ हेंही पंचांग वर्षाप्रमाणें जाड गुळगुळीत कागदावर उत्तम छापलें आहे. रा. रा. नाडकर्णी ह्यांच्या देखरेखीनें गणपत कृष्णाजी छा०चा उत्तरोत्तर जीर्णोद्धार होत आहे ही आनंदाची गोष्ट होय. २

कूटप्रश्नोत्तर.

'सर' हा इंग्रजी किताब. याच्या पोटांत **ता**=ताकभात भरला तर **सतार** ही कर्मणूक करणारी. रा. रा. जी. बी. वरदे मुंबई ह्यांनीं उत्तर बरोबर दिलें.

॥ ओं नमः श्रीरामचंद्राय ॥

आर्यमहौषधालय मु० आंजलें.

या अत्यंत खात्रीच्या औषधाचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यांस कदाचित् आला नाहीं तर पैसे परत देऊंच व त्याशिवाय त्यांच्या आरोग्यार्थ एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकटच देऊं.

मदनविलासामृतसंजीविनी.

वीर्यस्तंभक, रक्तशोधक, अत्यंत कामोत्तेजक, चित्तोत्साहक, बुद्धि–कांतिवर्धक व धातुपौष्टिक सुवर्णमाक्षिक मौक्तिक कस्तूरीमिश्र अपूर्व गुटिका.

१. शरीराची उत्तम सुधारणा करणारीं अत्यंत महत्त्वाचीं जीं औषधें आहेत, त्यांत या गुटिका अगदीं पहिल्या प्रतीच्या ठरल्यामुळें यांचे अपूर्व गुण थोड्याच काळांत या देशाच्या सर्वभागीं व त्यांच्या आसमंतात् अतिशय पसरले आहेत. या सेवन केल्यानें नपुंसकत्व, इंद्रियशिथिलता, कडकी, जीर्णज्वर, अग्निमांद्य, अशक्तता, स्वप्नजन्य किंवा इतर धातुपात, छातींतील रोग, मेंदूचे विकार, पांडुरोग, क्षय, मूत्रसंकोच किंवा मूत्रातिरेक, कटिशूल, वातरोग, उपदंशसंबंधी मुरलेले विकार, हात, पाय, मूत्रमार्ग, व शरीर यांचा दाह, व अरुचि, इ० अनेक विकार कितीही वर्षाच्या मनुष्यांस नवीन किंवा जुनाट असले तरी खात्रीनें बरे होतात. धातु व रक्त यांची शुद्धि व वृद्धि होऊन रक्तदूषणजन्य अनेक रोग हटकून बरे होतात. वीर्यस्तंभन, व कामोद्दीपन होऊन अग्नि व शक्ति भरपूर वाढते. स्त्रियांची धुपणी व संततीस अपायकारक जे गर्भाशयस्थ रोग त्यांचें त्वरित निवारण होऊन कांति, स्मरणशक्ति व बुद्धि वाढते. ज्यांस शारीरिक व मानसिक श्रम फार पडतात, त्या सर्वांच्या आंगीं यांनीं अतिशय शक्ति येऊन मनास उत्साह प्राप्त होतो, सुस्ती जाते. ज्यांस दूध व जडान्न पचत नाहीं त्यांस तें भरपूर पचूं लागतें, कोष्ठशुद्धि होते. या अप्रतिम गुटिका अत्यंत शोधानें केल्या असून त्यांच्या अप्रतिम गुणका-

रित्वाबद्दल हजारों सर्टिफिकिटें मिळालीं व नित्य मिळत आहेत. यांत अपायकारक पदार्थ बिलकूल नाहींत. वरील सर्व रोग जाऊन उत्तम गुण प्राप्त होण्यास या गुटिकांसारखें अप्रतिम औषधच नाहीं असें पूर्ण अनुभवावरून स्पष्ट ह्मणतों. यांस पथ्यसेवनाची गरज नसतां या पाहिजे त्या दिवसांत घेतल्या तरी हटकून गुण करितात. यामुळें त्यांचा अतिशय खप सुरू आहे. गोळ्या रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम सहा रुपयांच्या किंवा त्यांहून कितीही जास्त गोळ्या घेणारांस बंगीचा सर्व टपालखर्च माफ आहे. त्यांचे आंत घेणारांस मात्र तो वेगळा सहा आणे पडेल. एकदम ३२ गोळ्यांस १ रु. ७० गोळ्यांस २ रु. १६० गोळ्यांस ४ रु. २६० गोळ्यांस ६ रु. ५२० गोळ्यांस १० रु.

थंडगार नेत्रांजन—हें अंजन स्तुतीस अत्यंत पात्र आहे, हें सतत दहा वर्षांच्या पूर्ण अनुभवानें कळवितों. यानें डोळ्यांचे साधारण विकार तर सहजच, परंतु दृष्टीचा समूळ नाश करणारे, तिमिरांध्य, वडस, बिंदु, फुलें, कांच, सारा, भोर, गळती, खुपऱ्या, जळजळ, कंड, फूट, चिकटा, ठणका व लाली इ० अनेक विकार, तत्संबंधी मस्तकशूलादि विकारांसह कितीही वयाच्या मनुष्यास कोणत्याही कारणांनीं प्राप्त झालेले नवीन किंवा जुनाट असले तरी नाजूक रीतीनें कोणतीही इजा न होतां बरे होतात. दृष्टि तीव्र व थंडगार राहते. हें चांगल्या दृष्टीच्या मनुष्यांनींही डोळ्यांत घातल्यास वरील विकार त्यांस बिलकूल होणार नाहींत. लहान मुलांस तर हें अत्यंत उपयोगी आहे. २ तो० ड० १॥ रुपया.

विशेष सूचना.—अलीकडे आंजलें व मुर्डी वगैरे गांवांतील औषधांच्या बऱ्याच जाहिराती सुरू आहेत व त्यांपैकीं कांहीं जाहिरातींत ज्या सह्या आहेत त्या बहुतेक आमच्याच नांवासारख्या भासण्याचा विशेष संभव आहे. तरी अशा लोकांशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं हें अवश्य लक्षांत ठेवून आमचीं औषधें **"कृष्णशास्त्री बिवलकर वैद्य. मु० आंजलें ता० दापोली जि० रत्नागिरी."** याच पत्त्यावर रोखीनें किंवा व्ही.पी.नें मागवावींत. अनुपान पत्रकसोबत असतेंच.

१०–१२]

केरळकोकिळ.

रंग बदलणारा सरडा.

जों जों प्राणिधर्मशास्त्रांतील गोष्टी श्रवण कराव्या, तों तों मनास अधिकाधिक मौज वाटूं लागते. आणि प्राणिशास्त्रवेत्यांच्या उद्योगशीलतेची, त्यांच्या शोधकबुद्धीची धन्यता वाटल्यावांचून रहात नाहीं. त्यांनीं आजपर्यंत हजारों प्राण्यांचे शोध लाविले, व हजारों प्राण्यांचीं वर्णनें बराबर लिहून ठेविलीं. तीं वर्णनें वाचलीं ह्मणजे प्राण्यांच्या अंगांतील गुणधर्मांचें उत्तम ज्ञान होऊन, मनास मोठा चमत्कार वाटतो. कित्येक प्राणी अगदीं क्षुल्लक असून, त्यांच्या अंगीं वास्तव्य करणारे लोकविलक्षण व मनाला आल्हादक गुण ऐकले ह्मणजे परमेश्वरकृतीचें कौतुक वाटतें. शिरोभागीं निर्दिष्ट केलेला प्राणी यःकश्चित् सरडा होय. पण ह्याचेंच वर्णन वाचलें ह्मणजे वाचकांस वरील गोष्टीची साक्ष पटून येईल. हा प्राणी **आफ्रिका, एशिया, सिंहलद्वीप,** आणि **यूरोपच्या** दक्षिण भागांत, ह्मणजे **स्पेन**देशाच्या उत्तर भागांत वास्तव्य करून राहतो. ह्याच्या अनेक जाति आहेत. नुसत्या **माडागास्कर** बेटांतच ह्याच्या नवांहून जास्त जाति आहेत, आणि त्याशिवाय **बोर्बोन**

व **सिचेलीस** येथील निराळ्याच. हा प्राणी कृमिकीटकांवर आपला उदरनिर्वाह चालवितो. ह्याचें राहणें सदासर्वकाल वृक्षांवरच असतें. तो क्वचित् जमिनीवर येतो. मादी मात्र जमिनीवर नेहमीं येते. कारण ती आपलीं अंडीं जमिनींत पुरून ठेविते. ह्मणून हा एक चमत्कारच ह्मटला पाहिजे. हा प्राणी रंगारूपानें व गुणधर्मानें फारच मजेदार असतो. ह्याच्या शरीराची घडण आणि ह्याच्या अंगांत भिनलेल्या खोडी अपूर्व असतात. ह्याच्या देहाची रचना अशी चमत्कारिक असते कीं, तो त्यास हवा तेव्हां चापटका करतां येतो. ह्याचा पृष्ठभाग वर्तुलाकार असून थोडासा पुढें आलेला असतो. किंवा मनोऱ्याच्या आकाराचा असतो असें ह्मटल्यास अधिक सयुक्तिक दिसेल. सरड्याच्या मस्तकाचा पुढील भाग गोलाकृति असून, टाळूमागील भाग कोणाकृति असतो. मान आंखूड व भरींव असते. ह्याच्या चामडीवर लहान लहान गट्टू असतात. पाय सडपातळ असतात. त्यांचीं बोटें मोजून पांचच असतात. त्याचें शेंपूट मंडलाकार असून लांबच लांब असतें. त्यामुळें त्यास झाडांच्या फांदीस घट्ट विळखा घालून बसतां येते. नेत्र विशाल व फुगीर असतात. त्याच्या पापणीचें कातडें जाड असतें. त्या पापणींत अशी मौज असते कीं ती त्याच्या इच्छेस येईल तेव्हां प्रसृत करतां येते आणि वाटेल तेव्हां आकुंचित करतां येते. सरड्याच्या डोळ्यांस एक छिद्र असतें, त्याजवर पापणीचें आवरण असतें. ह्या प्राण्याचे डोळे अशा तऱ्हेनें वेष्टिलेले असतात कीं, कितीही झगझगीत प्रकाश असला तरी डोळे मुळींच दिपूं नयेत. ह्याच्या नेत्रांजनवळील स्नायूंची शक्ति फारच विलक्षण असते. त्यामुळें त्यास इतकें सामर्थ्य असतें कीं त्याचा प्रत्येक डोळा पाहिजे त्या भिन्न भिन्न वस्तूंवर—मग त्या अगदीं खालीं असोत, मध्यभागीं असोत, कीं अगदीं उंचावर असोत—त्याची त्यास सहजीं टेहळणी करितां येते. त्याची कीटकाकार आणि हवी तशी फिरवितां येण्यासारखी जीभ हें एक त्याचें अत्यद्भुत हत्यारच आहे. ती लंबवर्तुलाकार असून, तिची लांबी सहा इंच असते. तिचा भाग मांसल व विस्तृत असून जिव्हाग्र कांहींसें नलिकाकृति असतें, आणि त्यावर एक प्रकारचा चिकट पदार्थ असतो. त्याचे योगानें त्यास आपलें भक्ष्य धरितां येतें. तोंडाकडील

भाग पसरट असून, दांत फार तीव्र व खुरटे असतात. ह्याच्या पायांना पांच लांब, आणि तशाच मजबूत व अणीदार नख्या असतात, व त्यांवरून त्यांच्या अग्रापर्यंत चामड्याचें वेष्टन असतें. तें फार चमत्कारिक रीतीनें सांधलेलें असतें. त्या योगेंकरून त्यांच्या पायांस दोन गठळ्या झालेल्या असतात. पहिल्या तीन बोटांची एक गठळी, व दुसऱ्या दोन बोटांची एक. वरील सर्व रचनेवरून चोपई, घोरपड, सुसर वगैरे प्राण्यांहून हा प्राणी किती भिन्न आहे ह्याची वाचकांस सहज अटकळ करितां येईल. असो. वर सांगितलेल्या दोन गठळ्या अशा तऱ्हेच्या बनविलेल्या असतात कीं, कोकिळ, सुतार व पोपट, ह्या पक्षांच्या पद्धतीप्रमाणें त्यांस झाडास बिलगून बसतां येतें. त्यांचें लंबायमान व दणदकट शेंपूट पंचमावयवाप्रमाणें त्यांच्या उपयोगीं पडतें. ते चालतांना मोठ्या मंदगतीनें व बंदोबस्तानें जातात. त्यांत विशेषेंकरून एका फांदीवरून दुसऱ्या फांदीवर जावयाचें असल्यास ह्याच रीतीनें चालतात. त्यांचें भक्ष्य व त्यांचे वैरी हे कितीही लांबीच्या पल्ल्यावर असले तरी त्यांच्या दृष्टीस पडतात. तो मोठ्या दिलदारपणानें प्रतिपक्षाचें निवारण करितो. तो कृमिकीटक जेथें विपुल असतील तेथें जाऊन आपल्या अपूर्व कौशल्यानें आपली जिभली लांब करून त्यांच्यावरून फिरवतो, कीं लागलेच पुष्कळ प्राणी जिव्हाग्रास चिकटून वर येतात, ते तोंडांत धरून तो परततो. ही जीभ त्यास इतकी लांब करितां येते कीं, कधीं कधीं ती त्याच्या शरीराच्या भागाइतकी लांब होते. ह्या प्राण्याचा हा प्रकार देखील चमत्कृतिजनक आहे. कित्येक जातींच्या सरड्यांचें कातडें त्यांच्या स्नायूंपासून सुटें असतें, केव्हां केव्हां त्यांत हवा शिरून तें तट्ट फुगतें. पण हें सर्व त्याच्या मनावर अवलंबून असतें. हवी तर फुगीर करतां येते, हवी तर ढिली करतां येते. ह्या प्राण्याच्या अंगचा आश्चर्यकारक व ईश्वरदत्त गुण ह्मणजे वर्णांतर करणें हा होय. ह्मणजे हा आपला पूर्व रंग बदलून नवे तऱ्हेतऱ्हेचे रंग धारण करितो. केव्हां केव्हां, श्वेतवर्ण, केव्हां केव्हां पिंगट रंगी, कधीं कधीं हिरवाचार, कित्येकवेळीं ताम्रवर्णी, आणि एखादेवेळीं कज्जलरंगी, अशा रीतीनें तो आपल्या शरीराच्या निरनिराळ्या भागांवरचे रंग बदलून नाटकांतील वेषधारी पात्रांप्रमाणें नटरंगी बनतो.

पूर्वकालीन लोकांची अशी दृढतर समजूत होती कीं, तो ज्या वृक्षाच्या फांदीवर बसतो त्यापासून किंवा तो ज्या वस्तूंवर टेंकतो त्यापासून त्यास हे रंग प्राप्त होतात. परंतु हा समज निवळ भ्रामक होय. **थिओफ्रॉस्टस** आणि **प्लुतर्क** ह्यांचें ह्मणणें असें होतें कीं, तो आलटून पालटून रंग धारण करितो. **ॲरिस्टॉटल** ह्मणत असे कीं तो आपल्या सर्व शरीराचा रंग पालटतो. पण इतिहासदृष्ट्या ह्यांतील सत्यता पाहूं जातां हें सर्व त्यांच्या अज्ञानपणाचें दर्शक होय, असें आढळून येतें. आजपर्यंत चालत आलेली खरी कल्पना अशी आहे कीं, त्याच्या शरीरांतील रुधिराभिसरणक्रियेच्या कमजास्ती प्रमाणावर हे सर्व रंगांचे फेरबदल अवलंबून आहेत. दुसऱ्या एका ग्रंथकाराचें असें मत आहे कीं, रागाच्या किंवा भीतीच्या वेळीं जे मनोविकार भिन्नत्वानें मनांत उद्भवतात, त्यांपासून हे भिन्न भिन्न रंग ह्यास प्राप्त होतात.

ब्रिटिशपदार्थसंग्रहानुक्रमाच्या यादींत सरड्यांच्या सोळा, सतरा जाती वर्णिल्या आहेत. त्यांतील पांच जातींचें वर्णन खालीं लिहिल्याप्रमाणें:—

जात १ लीः—ह्या जातीचें मूलस्थान **फरनांडोपो** हें होय. ह्या जातीस झालरबंद सरडा असें अन्वर्थक नांव पडलें आहे. ह्याच्या पृष्ठभागावर एक पर असून पोटाकडील भागास एक लहानसा झुबका असतो.

जात २ रीः—ह्या जातीच्या सरड्यास पोटाकडे झुबका नसून जरा बाजूस असतो. ह्याचा पृष्ठभाग उंच असून, पोट व इतर बाजू चापट्या असतात. ह्याच्या झुबक्यास दांते दांते असतात.

जात ३ रीः—ह्याचें वसतिस्थान **ईस्टइंडीज** हें होय. ह्याचे पृष्ठभागीं एक व पोटाकडे एक असे दोन झुबके असतात, आणि त्यांसही दांते दांते असतात. ह्याचे पाठीवर लहान लहान व एकसारखीं खवलें असतात. कानशील सरळ असतें. ह्याचे दोन प्रकार आहेत. हा प्राणी **आफ्रिकेंत** व कधीं कधीं **सिसिली** आणि **स्पेन**देशाचा दक्षिणभाग ह्यांत सांपडतो हा एक प्रकार. एक सरड्याची जात **ईस्टइंडियां**त आढळते; सेनेगल नांवाचा सरडा **पश्चिमआफ्रिकेंत** वास्तव्य करतो; व एक जात **आशांटी** व **ग्यांबुन** येथें आढळते.

आणखी **बोर्बोन** व **माडागास्कर** येथें आढळणारा सरडा, व **माडागास्कर** येथें राहणारा गेंड्याच्या आकाराचा सरडा हा द्वितीय प्रकार होय.

जात ४ थी:—ह्याच्या पाठीवर एक दांते दांते असलेला असा झुबका असतो. पोट व पोटाकडील भाग सरळ असून, हनवटी व मुसकट हीं देखील तशींच सरळ असतात. ह्याचें वास्तव्य **आफ्रिकेंत** असतें. फणींद्राप्रमाणें फणा धारण करणारा सरडा **माडागास्कर** येथें आढळतो. येथेंच आणखी एक प्रकारचा सरडा असतो. त्याची हनुवटी सरळ असून थोबाड चापटकें असतें, आणि कित्येक **सिचेलीस, दक्षिणआफ्रिका** व **केप ऑफ् गुड्होप** येथें आढळून येतात.

जात ५ वी:—हा सरडा **माडागास्कर** येथें राहतो. ह्यास पृष्ठभागीं व पोटाकडे झुबके वगैरे कांहीं नसतात.

ह्याप्रमाणें सरड्यांच्या अनेक जाती आहेत. **एस्.डब्ल्यू. ब्रूक** ह्या नांवाच्या गृहस्थानें एक जातीचा सरडा बाळगिला होता, तो कांहीं विलक्षणच होता, त्यास तीन शिंगें होतीं. एका पुस्तकांत कित्येक सरड्यांस शिंगेंही असतात ह्मणून माहिती दिली आहे.

स्वदेशवसनग्रहण.

हटा सोडुनी झटा स्वदेशी कापड घ्याया चला उठा ।
नटासारखें नटावयाला कशास घेतां म्लेंच्छपटा ॥ ध्रु० ।
बरें कोणतें खरें कोणतें हेंहि कळेना अह्मांप्रती
परका लागे हरकामाला काय पहा ही कर्मगती ।
विटे रंग तरि चिटें चांगलीं अशी मनाला भुरळ पडे
भुले चित्त वरि फुलें पाहतां जळीं गळीं जणुं मीन जडे ।
बोटें धरितां चिरचिर फाटे मलमल वाटे तरी बरी
अल्पाकू साटिन् बनात फ्लुयान्ल काश्मिर झालें घरोघरीं ।

राठ सुताचे काठ त्यावरी दाट खळीचा ताठपणा
आठ अण्यांनीं स्वस्त धोतरें खास लाविति वाट ह्मणा ।
धवल पाहुनी नवल वाटतें अगाबोनिचें वसन नवें
गृहिणी सांगे बहिणीला आणि विहिणीलाही तेंच हवें ।
पेज माखुनी तेज राखिती धवल फुलांची शेज जशी
हरिख पाहुनी हरिख गमे परि अंतीं पडतां तोंडघशी ।
सैन घेउनी चैन करितसों ऐन हरपलें जरी तरी
मूर्खपणा हा अमुचा ऐसा पैसा परक्या घरीं भरीं ।
सुती कापडें धुती बापडे सात समुद्रांपलीकडे
घड्या पाहतां उड्या घालितां मूल रडे का चूल अडे ।
धुणावळीचे पैसे आधीं घेउनि साधी हेतु महा
विलायतेचे धोबी लोभी धूर्त कसे ते नीट पहा ।
जागोजागीं मुगटे तागी किती अभागी अह्मी बरें
धुतां तयांचा भुतासारखा वाण होउनी घाण भरे ।
काळे बाळे निळे तांबडे परोपरीचे रंग असे
वरतें बंदर सुंदर मंदिर अगानगाचे अमित ठसे ।
रेखिति कोठें मळे त्यामधें तळें विराजे विपुल जळें
दळें तरूंचीं कळे त्यावरी रुचिर शोभती पुष्पफळें ।
हातांतिल हे रुमाल त्यावरि कुशलपणा हा तरी किती
माल खपाया कमाल करिती नित्य चालती ह्याच रिती ।
संपत्तीचा झरा चालला विलायतेला भराभरा
करा गड्यांनो विचार कांहीं पराजयाची लाज धरा ।
अडलें कोठें घोडें तुमचें पडलें कोठें उणें कथा
मागें सरतां करि जागे होउनि लागा स्वहितपथा ।
देशी बंडी घालुन थंडी जाय न ऐसें काय असे
वसे अंतरीं आवड तेणें बेत करूनी सर्व फसे ।
दारिद्र्याचा पगडा आला उघडा डोळे झटा झटा
हटा सोडुनी झटा स्वदेशी कापड ध्याया चला उठा ॥
नटासारखें नटावयाला कशास घेतां म्लेंच्छपटा ॥ १ ॥

खादी पाहुनि गादी बाबा सांग मला तूं काय रुसे
सुशीवांचुनी उशीच न घडे असा नेम कां जगीं असे ।
धाबळ आहे मामळभट्टी कसें वाटतें तुझां खरें
तऱ्हेतऱ्हेचे रंग मनोहर अंग पाहतां भूक हरे ।
पहा नाम ज्या महावस्त्र हें अहा ठेविलें काय उगी
शालजोडिला जोडी नाहीं खोडी ठेविल कोण जगीं ।
हर कामाला पडे घोंगडें श्रेष्ठ जाहलें इष्ट गुणें
वर्षोवर्षें करी चाकरी मोल तरी त्या किती उणें ।
अपुल्या देशीं कमी कोणतें कापुस थोडा काय पिके
लोकर बघतां ठोकर लागुनि रेशिम तेंही पडे फिकें ।
जुन्या चालिचे नवे गालिचे टिकण्याला तरि काय कमी
दृश्यपणाचा गंध न ज्याला असा अंधही भरिल हमी ।
नागपूरचे धोतरजोडे थोडे टिकती काय तरी
बुद्धि गुंगते अंग पाहुनी रंग मनाला दंग करी ।
चंदेरीची बत्ती उत्तम जनीं प्रसिद्धी असे जुनी
नाजुक धागे पाहुनि लागे सुज्ञ जनांच्या चटक मनीं ।
कौशल्याचें सागर आगर पितांबरांचें गांव सदा
यवलें पाहुनि द्रवलें नाहीं कदा कुणाचें चित्त वदा ।
शहापूरही दूर नसे बा खण लुगड्यांचा पूर चढे
तागाहुनिही धागा बळकट कोण तयाच्या टिके पुढें ।
वद् कोणाला काशीचा कद नसे मानला आजवरी
वर्णन करुनी अशीं कथावीं नांवें गांवें कोठवरी ।
अहा पहा मी कसा विसरलों ढाका हाका मारितसे
जिचीं उपरणीं अद्भुत करणी बघतां त्यांतुनि पार दिसे ।
अंगावरती नाहीं कांहीं असाच होतो भास पहा
तोल तोलतां मोलच नाहीं तोळे अवघे भरति सहा ।
ऐसें ऐसें कापड असुनी झापड नेत्रांवरति कशी
खुषी आमची क्षणशिल तरि तूं पडशिल बाबा खास फशीं ।
कुणब्याला तर पटकुर धोतर सालोसालीं एक पुरे
साळी माळी भरतिल कैचीं परकीयांचीं घरें घरें ।

देशभक्त ते खरे हेच कीं ह्मणा तयांना तुह्मी खुळे
कामदार कीं वकील चैनी विलायतेचीं खरीं कुळें ।
बोध विशेषें अशाच लोकां हाच असे कीं पुन्हा पुन्हा
आत्मघात हा प्रसिद्ध आहे लोकांमाजी थोर गुन्हा ।
फटका नोहे घुटका आहे गोड सुधेचा खरा खुरा
झटका सोसुनि घटका मोडा शोधित येतिल सिद्धि घरा ।
वरकांतीची भ्रांती सोडुनी अंतीचें हित पहा पहा
निश्चय करुनी देशी कापड घेऊं ऐशी शपत वहा ।
नांव चोरुनी सावपणानें मत्कवनाची मधुर झरी
हरिती आंबटशोकी ह्मणुनी कोकिळ किल्ली कुलुप करी ।
नांवासमान दावा करणी बोलुं नका उगि वटावटा
हटा सोडुनी झटा स्वदेशी कापड ध्याया चला उठा ।
नटासारखें नटावयाला कशास घेतां म्लेंछपटा ॥ २ ॥

तपेल्यांतलें डोकें.

आमच्यांतले जसे भटभिक्षुक, तसे युरोपियन लोकांतील पाद्रिलोक होत. ह्यांपैकीं कितीएक लोक फार सज्जन असतात. पण कितीएक लोक इतके लोभी असतात कीं, सांगतां सोय नाहीं. अशाप्रकारचा एक लोभिष्ट पाद्री, **लानार्कशायर** येथें होऊन गेला; हा पाद्री चालू शतकाच्या प्रारंभास मरण पावला. ह्याच्या लोभिष्ट स्वभावानें त्याजवर एक मोठा चमत्कारिक प्रसंग येऊन त्याचा जो हास्यकारक फार्स उडाला, तो सर्वांनीं सर्वांस सागण्यासारखा झाला. किंवा परमेश्वरानेंच त्याच्या लोभिष्ट स्वभावाची खोड मोडली ह्मटलें तरी चालेल. ती गोष्ट अशीः—

वर सांगितलेले पाद्रिबुवा मोठे लोभी असत. कोणाच्याही घरीं एखादा चांगलासा पदार्थ अगर वस्तु दृष्टीस पडली पुरे, कीं ह्यांनीं त्याची आस काढलीच; ती त्या मालकापाशीं मागितलीच, अशी त्यांची चाल असे. मग ती वस्तु एखादें स्वयंपाक करण्याचें यःकश्चित् भांडें असो, कीं गळ्यांत घालण्याचा मोठा उंची दागिना असो. तसेंच ज्या-

पाशीं मागणी करावयाची तो गृहस्थ श्रीमान् असो; कीं भीक मागणारा एकादा दरिद्री असो, त्याची त्यास कांहीं लज्जा वाटत नसे. एके दिवशीं हे पाद्रिबुवा एका शिष्याच्या घरीं जाऊन बराच वेळ गप्पाष्टक मारीत बसले होते. त्याच घराच्या पडवीला एक गरीब ह्यातारी विऱ्हाड करून राहिलेली होती, तिनें एक नवेंच तांब्याचें तपेलें आणून त्यांत बटाटे उकडत ठेवले होते. ह्या पाद्रिबुवांची बसल्या बसल्या त्या ह्यातारीच्या तपेल्यावर दृष्टि गेली, आणि नेहेमींच्या संवयीप्रमाणें त्याविषयीं त्यांस मोह उत्पन्न झाला. तेव्हां त्या पात्राविषयीं त्यांनीं वर्णन सुरू केलें. 'अहाहा काय ह्या पात्राचा घाट साधला आहे? फारच सुबक! कोठून आणलें हो हें? मी असलें तपेलें घेण्यासाठीं आज फार दिवस पाहतों आहें, परंतु मला कोठें दृष्टीस सुद्धां पडत नाहीं. बाजारांत तपेलीं पुष्कळ मिळतात, परंतु ह्या मासल्याचें एकही नाहीं' इत्यादि स्तुति सुरू केली. तेव्हां त्या ह्यातारीला ह्या आशाळभूत भटाचा हेतु समजला. आणि ती ह्मणाली 'बरें, कांहीं चिंता नाहीं. हेंच तपेलें मुलाबरोबर आपल्या घरीं मी उद्यां पोचतें करीन.' पण तितका धीर पाद्रीबुवांपाशीं कोठून आणावा? ते त्या ह्यातारीस ह्मणाले "मी आपला फार अभारी आहें. आपण माझें मोठेंच काम केलेंत. आणखी वर आपल्या मुलाला माझ्या घरापर्यंत ओझें घेऊन येण्याचे श्रम कशाला पाहिजेत? तें माझ्याकडेच द्या. मीच तें घरीं घेऊन जातों." ह्यातारीनें पुष्कळ आढेवेढे घेतले, नानाप्रकारें त्यांची समजूत केली, पण पाद्रिबुवांचा हेका कांहीं सुटेना. तेव्हां तिनें निरुपाय होऊन त्या तपेल्यांतले बटाटे दुसऱ्या भांड्यांत ओतून घेऊन तें तपेलें रिकामें करून पाद्रिबुवांच्या स्वाधीन केलें.

ही नवी फुकटची कमाई घेऊन पाद्रिबुवांची स्वारी मठाकडे निघाली. ह्या घरापासून मठ चांगला दोन तीन मैलांच्या अंतरावर होता. व मध्यंतरीं रस्त्यावर फारशी वस्तीही नव्हती. पाद्रिबुवांनीं प्रथमतः तें तपेलें हातांत घेतलें होतें. पण तसें करण्यानें हात अवघडला. तेव्हां ह्या हातांतून त्या हातांत व त्या हातांतून ह्या हातांत असा बराच वेळ फेरफार करावा लागला. अखेर त्याची सुद्धां त्यांस मनस्वी अडचण पडूं लागली. कारण, गांवच्या निम्म्या पल्ल्यावरही पोंचले नाहींत, तोंच स-

काळचें ऊन्ह चढूं लागलें. त्यांत ते दिवस उष्णकाळाचे असल्यामुळें तें तपेलें अधिक अधिकच तापून हातांतही धरवेनासें झालें, तेव्हां पाद्रिबुवांनीं एक युक्ति काढली. आपली डोक्याची टोपी काढून हातांत घेतली. खिशांतला हातरुमाल काढून तो डोक्यास गुंडाळला. आणि त्यावर तें तपेलें टोपी घातल्याप्रमाणें खालीं तोंड करून बसविलें, आणि स्वारी झपाट्यानें पुढें निघाली. इतक्यांत दुसरीही कल्पना मनांत आली. ती ही कीं, सडक मठाकडे गेली आहे खरी; पण ती फार वळणावळणानें गेली असल्यामुळें जावयास विलंब लागतो. ह्याकरितां सडक सोडून देऊन आपण मधल्या पायवाटेनेंच जावें. आणि त्याप्रमाणें ह्या लोभिष्ट बुवांनीं डोक्यास त्या तपेल्याची टोपी घालून मधली पायवाट सुधारली. ऊन्ह सारखें चढतच होतें. इतक्यांत लहानशी ओहळ लागली. तिच्यावरून उडी मारून जाण्याचा प्रसंग आला. तेव्हां पुढील गोष्टीची मनांत कांहींच कल्पना न आल्यामुळें हे पाद्रिबुवा नेहेमींप्रमाणें पट्कर उडी मारून पलीकडे गेले. परंतु त्या उडीच्या धक्क्यानें तें डोक्यावरचें तपेलें हातरुमालावरून घसरून झट्कन खालीं आलें आणि त्याचा कांठ येऊन गळ्याभोंवतीं बसला! मग ती मजा काय विचारावी? तोंड गेलें सारें तपेल्यांत, आणि पाद्रिबुवा लागले अंधळ्या कोशिंबिरीचा खेळ खेळावयाला! तोंडावरून तपेलें निघण्याविषयीं पाहिजे तितकी झटपट केली, परंतु तपेलें कांहीं निघेना! भोंवतीं चिटपाखरूं सुद्धां कोणी नाहीं! सारें आडरान. आरडूनही कांहीं उपयोग नाहीं. आणि तसें करतांही येणें अशक्यच. कारण, तपेलें अगदीं मस्तकाच्या बहुतेक बेताचेंच होतें. त्यामुळें आतां शब्द काढण्याचीच आधीं मारामार. आणि काढलाच तर तो हातावरच्या मनुष्यास सुद्धां ऐकूं जाण्याची मुष्कील. अशी अवस्था झाली.

उन्हाच्या प्रखरतेमुळें तपेल्यांतील हवा अतिशय विरल होऊन बापड्याला श्वासोच्छ्वासही करतां येईनासा झाला. जीव घुसमटून अगदीं कासाविशी होऊं लागली. अखेर त्यास एक आठवण झाली कीं, येथून जवळच एक तांबटाचें दुकान वाटेवरच आहे. पण तेथपर्यंत तरी जावें कसें, ह्याची मोठी अडचण येऊन पडली. तरी धैर्य धरून त्यानें त्या दुकानाचा रोंख धरला, व अखेर तसाच धडपड करीत, बसत उठत,

खुरडत जाऊन एकदांचें त्या तांबटाचें दुकान जेमतेम गांठलें. तेथील लोकांनीं हें डोक्यांत तपेलें अडकविलेलें सोंग पाहिलें, तेव्हां सर्वांची हांसतां हांसतां अगदीं त्रेधा उडाली. हां हां ह्मणतां तो तमाशा पहावयास झुंडीच्या झुंडी लोटल्या. अखेर पाद्रिबुवा त्या तांबटास हाक मारून ह्मणाले "बाबा! कसेंही करून मला या संकटांतून मुक्त कर." तांबटालाही मोठें संकट पडलें. कारण, तें पात्र फुटतें तरी कसें? ठोका मारावयाला लागलें तर, न जाणो डोक्यासही इजा व्हावयाची. हें सर्व मनांत आणून तो त्या पाद्यास ह्मणाला "आतां एकच युक्ति आहे. तुह्मी ऐरणीवर आपलें डोकें आडवें करून निजा, आणि मी वरून घणाचा घाव मारतों, भांडें फुटलें तर ठीक, आणि न होऊन दुर्दैवानें तुह्मांस कांहीं इजा झाली, तर त्याचा जबाबदार मी नाहीं. हें आपणांस कबूल असल्यास मी प्रयत्न करतों." गृहस्थानें विचार केला, आतां हें नाकबूल करावें तर, जीव कोंडून तरी मरावें लागणारच; त्यापेक्षां ह्यांतच काय सोक्षमोक्ष होईल तो होवो. असें ह्मणून त्यानें त्या तांबटाचें ह्मणणें मान्य केलें. आणि आपण त्याच्या ह्मणण्याप्रमाणें ऐरणीवर आडवें डोकें ठेवून निजला. तांबटानें मोठ्या कुशलतेनें त्या तपेल्यावर घाव घातला, आणि सुदैवानें त्या तपेल्याचे दोन तुकडे होऊन तो गृहस्थ संकटांतून मुक्त झाला. व थोडा वेळ ताजा दम घेतल्यावर चांगला हुषार होऊन आपल्या मठाकडे निघून गेला.

तात्पर्य—लोभ हा फार वाईट आहे. ह्मणूनच संस्कृतांत ह्मटलें आहे "अतितृष्णा न कर्तवा चक्रं भ्रमति मस्तके".

स्वयंभू 'सर्टिफिकिटें'.

एकदां एका गृहस्थानें आपल्या आफिसांत काम करण्यासाठीं एक मुलगा ठेवावयाचा आहे, अशी वर्तमानपत्रांत जाहिरात दिली होती. ती वाचून सुमारें पन्नास मुलगे आफिसांत येऊन हजर झाले. कोणी कोणी आपल्या चांगुलपणाबद्दल सर्टिफिकिटांचे भारेच्या भारे आणले होते. ते सारे एका बाजूस ठेवून त्या गृहस्थानें ज्या मुलापाशीं सर्टिफिकिट वगैरे नव्हतें, अशा एका मुलास त्यानें निवडून काढलें, आणि बाकीच्यांस

आपआपल्या घरीं जावयास सांगितलें. हें पाहून त्या गृहस्थाचा एक स्नेही जवळ होता त्यानें त्या गृहस्थास विचारलें "काहो ? तुह्मीं सगळे मुलगे सोडून ह्याच मुलाला कशावरून पसंत केलें ? ह्यानें कोणाचेंही सर्टिफिकिट वगैरे आणलेलें नाहीं." गृहस्थ ह्मणाला "छे ! छे ! तुह्मी अगदीं चुकतां. त्याच्यापाशीं किती तरी सर्टिफिकिटें आहेत. कशीं तीं सांगतों ऐका. तो प्रथम आंत आला, तेव्हां पायपुसण्याला पाय पुसून आला. आणि आंत येतांना त्यानें पुन्हा होतें तसें दार लावून घेतलें. ह्यावरून त्याला व्यवस्था आणि टापटिप आहे. तसेंच आह्मी बोलत होतों, इतक्यांत तेथें एक वृद्ध मनुष्य आला. तो पायानें जरासा पंगू होता, त्यास त्यानें चटकर उठून आपली जागा दिली. ह्यावरून त्याच्या मनांत इतरांची काळजी असून त्याचें अंतःकरणही सदय आहे. माझ्या आफिसांत येतांच त्यानें मला प्रणाम केला, व मीं विचारल्या प्रश्नांचीं उत्तरें फार गंभीरपणानें आणि अदबीनें दिलीं. ह्यावरून त्याला ओळख आणि सभ्यपणा माहीत आहे हें सिद्ध होतें. तो माझ्या समोर असतां मीं मुद्दाम होऊनच आपल्या हातांतलें पुस्तक जमिनीवर पडल्यासारखें केलें. पण त्यानें चट्कर खालीं वांकून तें पुस्तक पुन्हा माझ्या हातांत दिलें. त्यावेळीं इतर मुलें एकमेकांकडे पहात बसलीं होतीं.

ह्यावरून तो मोठा सावध असावा असें दिसतें. त्याच्याशीं बोलण्याची माझी पाळी येईपर्यंत तो अगदीं निमूटपणें बसला होता. पण बाकीचीं मुलें हिकडे हिंड, तिकडे हिंड असे नानातऱ्हेचे चाळे करीत होतीं. ह्यावरून त्याच्या हुषारीची परीक्षा होते, आणि शांत स्वभावही दिसून येतो. मीं त्याच्या पोषाखाकडे पाहिलें, तर तो अगदीं स्वच्छ असून त्याला कोठें डाग किंवा त्याचा चोळामोळा केलेला नव्हता. त्याचे केंस साफ विंचरलेले व चापचोपून बसविलेले होते. आणि दांत तर इतके स्वच्छ होते कीं, जणूं काय हस्तिदंतच! त्याला मीं एका कागदावर सही करावयास सांगितलें, आणि हाताकडे निरखून पाहूं लागलों, तर त्याच्या बोटाला कीं नखाला एकही शाईचा डाग नव्हता. हात अगदीं स्वच्छ होते. नाहीं तर तो तांबड्या जाकिटाचा मुलगा! बेड्यानें सारीं बोटें काळे हातमोजे घातल्याप्रमाणें काळीं कुळकुळीत करून घेतलेलीं होतीं."

इतकें सांगून तो गृहस्थ आपल्या मित्रास ह्मणाला "हें पहा. आपल्या मित्रांकडून किंवा शिक्षकांकडून शेंकडों शिफारस-पत्रें आणल्यापेक्षांही ह्या स्वयंभू सर्टिफिकिटांची योग्यता अधिक आहे, हें ध्यानांत ठेवा. आणि अशा शिफारसयुक्त स्तुतिपत्रांचे भारेच्या भारे वाचण्यांत कालक्षेप करण्यापेक्षां, त्याच्या वर्तनाच्या सूक्ष्म निरीक्षणांतच एक दहा मिनिटें खर्च केलेलीं बरीं असें मला वाटतें." त्याच्या स्नेह्यानें ती गोष्ट मोठ्या आनंदानें मान्य केली.

अमेरिकेंतील भयंकर अनर्थ.

परमेश्वर ह्या जगांत जीं जीं बरीं किंवा वाईट कार्यें घडवून आणतो, तीं तीं सर्व प्राणिमात्रांच्या कल्याणाकरितांच असतात. व तो जी एखाद्या वेळीं अकस्मात् शिक्षा करतो, तीही अन्यायानें करीत नाहीं. तर तसें करण्याला त्यास कांहीं पूर्वापार संबंध असतो. अशीं वाक्यें महान् महान् साधु व तत्ववेत्त्यांच्या मुखांतून निघालेलीं आपण अनेकवेळ ऐकलेलीं आहेत. तथापि अकस्मात् एखादा अनर्थोत्पादक उत्पात होऊन निरपराधी शेंकडों जीवांची हानि झाली, ह्मणजे वरील तत्त्वविचारांत कोणत्याहीप्रकारें कल्पना चालत नाहीं. निदान तो संबंध मनुष्यांच्या तरी ध्यानांत येत नाहीं. **अमेरिके**मध्यें ता० ६ जून सन १८९२ रोजीं एक मोठा अनर्थापात घडला, आणि पुष्कळ जीवांची हानि झाली. तो प्रसंग इतका हृदयद्रावक होता कीं, तो वाचूनच अंगावर रोमांच उभे राहतात. व जगदीशानें तेथील लोकांवर एवढा क्षोभ कां केला तें समजत नाहीं. तो प्रकार असाः—

रॉक आईल तेलापासून आपल्या देशांत वारंवार किती अपाय घडतात व तें किती शीघ्र ज्वालाग्राही आहे हें वर्णन करण्याची तादृश गरज नाहीं. कारण तें ज्याच्या घरांत नाहीं असें घर विरळा. हें तेल **अमेरिकेंत** उत्पन्न होतें. तेथें ह्या तेलाच्या मोठमोठाल्या विहिरी आहेत. **पिटर्सबर्ग** येथें ह्या तेलाच्या फार मोठाल्या बखारी व तेल साफ करण्याचे कारखाने आहेत. एके ठिकाणीं तर हें उत्पन्न इतकें दांडगें

आहे, कीं तेथील वस्तीस 'आईल सिटि' ह्मणजे–तैलनगर–असें नांवच पडलें आहे.

वर सांगितलेल्या दिवशीं, ह्मणजे तारीख ९ जून सन १८९२ रोजीं **पिटर्सबर्ग, टायटस् व्हिली** व **ऑइल सिटि** ह्या तीन शहरांत व त्याच्या आसपास अतिवृष्टि झाली. रविवारीं सकाळींच आकाश भरून येऊन येवढा मुसळधार पर्जन्य पडला, कीं सर्व शहरांत, घरांत, दारांत, पाणीच पाणी होऊन गेलें. घरांत राहण्याचा उपाय थकला! तेन्हां धट्टे कट्टे लोक होते, ते टेंकडीवर पळत सुटले. पण बायकापोरांची दशा काय विचारावी? तीं सर्व घरांच्या आढ्यावर चढून हृदयद्रावक व केविलवाण्या स्वरानें आक्रोश करूं लागलीं. **टायटस व्हिली** शहराजवळील **आईल क्रीक** नांवाच्या खाडीचें पाणी इतकें जलदीनें वाढलें कीं हां हां ह्मणतां शहराचा सर्व सखल प्रदेश पाण्यानें भरून जाऊन सुमारें अर्ध मैल रुंद व दोन तृतियांश मैल लांब असा एक तलावच भरून राहिला! कांहीं लोक घाईघाईनें हिकडे तिकडे पळूं लागले. पण कोठचें पळणें आणि कोठचें काय? भरारा त्या पाण्याच्या ओघाच्या तडाक्यांत सांपडून वुडून मेले!

वास्तविक पाहिलें, तर अतिवृष्टीनें जेथें अनर्थ उडाला, तेथें अग्नीचा कांहीं संभव तरी? कारण अग्नीचें जलाशीं शत्रुत्व; परंतु ह्या प्रसंगीं हे शत्रुसुद्धां वैरभाव सोडून मित्र झाले. आणि त्या दोघांनीं मिळून त्या शहरांचा अगदीं सप्पा उडविला! **'अक्मे ऑइल रिफायनरी'** नांवाची एक सर्वांत मोठी वखार होती. तिच्यावर एक मोठा कडकडाट होऊन वीज पडली, आणि तिचा धूर सर्व शहरभर पसरला. सशक्त होते ते आपला जीव घेऊन पळत जात होते, त्यांस धुरानें अमावास्या करून सोडली! आधीं रॉक आईल तेल ह्मणजे शुद्ध दारू. त्यास अग्नि लागल्यावर तो प्रळय काय विचारावा? अशा गोंधळांत भयंकर आग शमविण्याचे उपाय लोकांस सुचावेत तरी कसे? ह्यामुळें ती आग फारच भडकली. **न्यूयार्क** व **पेन्सिलव्हानियारेलरोड**पासून तो **स्प्रिंग स्ट्रीट**पर्यंत सर्व घरांचा विध्वंस झाला, आणि मोठमोठाल्या वखारी जळून खाक झाल्या! रस्त्यांतील विद्युद्दीप, ग्यासाचे दिवे, पवनचक्क्या, पानचक्क्या तमाम जमीनदोस्त झाल्या! दोन लोखंडी पुलांची फुटून तुटून

वाट लागली ! हजारों हजार घरें जळून पडून मोडून त्यांची अगदीं राखरांगोळी झाली. पुष्कळ माणसें जळून मेलीं. पण जलसमाधीची संख्या याहूनही विशेष ! सर्व शहर केवळ उद्ध्वस्त होऊन गेलें ! पाऊस मुसळधार एकसारखा धो धो धो सुरूच होता. तेलाच्या वखारींतून निरनिराळ्या ठिकाणीं अग्निनारायण प्रगट होत असे. आणि तें जळजळीत तापलेलें तेल पाण्याच्या वेगानें दुसऱ्या वखारीवर जाऊन पडे. याप्रकारें सर्व पाण्यावर आग नाचूं लागल्यामुळें दसपट आग वाढली !! कित्येक वखारी, कित्येक खाणावळी, कित्येक दुकानें वगैरे जळून पार झालीं ! महा अनर्थापात उडाला. **टायटस् व्हिलींतील** अवघीं पंधरा मनुष्यें हातीं लागलीं !!! कोण प्रळय हा !

पिटर्सबर्ग आइल सिटी येथून त्या दिवशींच्या हिकडे तारा आल्या. त्यांतील आशय येणेंप्रमाणें होता. आज सकाळीं एकाएकीं इतकें पाणी चढेल हें कोणाच्या ध्यानींमनींही नव्हतें. हें पाणी इतकें जलद वाढलें कीं, पुरतें घरांतून बाहेर पडण्यास सुद्धां कोणास दम पुरला नाहीं. सर्व लोक एका टेंकडीवर चढून आणखी पाणी किती चढतें तें पाहूं लागले. इतक्यांत **रॉक आइल**च्या घाणीचा एकच भपकारा आला. त्यावरून आतां कोठेंतरी लौकरच आग लागेल ह्मणून लोकांनीं अनुमान केलें. ह्या गोष्टीस क्षणभर गेला न गेला, तोंच आगीचा डोंबाळा झाला ! 'धांवा धांवा' 'पळा पळा' ह्मणून जिकडे तिकडे एकच आरोळी उठली ! तमाम लोक आपआपला जीव घेऊन धूम टेंकडीकडे पळत सुटले. तेव्हांचा हलकल्लोळ काय सांगावा ? शेंकडो बायकामुलें पायांखालीं तुडविलीं जाऊन प्राणास मुकलीं !! आपलीं घरें पडतील ह्मणून जे लोक बाहेर पडले, ते प्रवाहांत सांपडून वाहून गेले ! कांहीं लोक पाण्यावर जळत असलेल्या रॉकेलतेलानें भाजून मेले !! आगीच्या ज्वाळा दोनदोनशें फूट उंच जात होत्या.

प्रथमतः एका मोठ्या तलावाचें अतिवृष्टीनें धरण फुटून तो लोंढा गांवांत शिरला. खाडी एकाएकीं ४० रॉड रुंद होऊन तुफान वाहूं लागली. त्यावर **रॉक आइल**चा आणि **बेंझिन**च्या तेलाचा थर वाहूं लागून जिकडे तिकडे आग पसरली. प्रथम पाण्यानें धांवत येऊन मनुष्यावर हल्ला करावा. त्यांतही मनुष्य बुडाला नाहीं, तर त्यावरून तरंगत

आलेल्या तेलाच्या आगीनें त्यास भाजून मारावें!! हाय हाय! त्या प्रसंगीं त्या शहरांत मृत्यु केवळ मूर्तिमंत उभा होता. त्या दिवशीं लोक आंथरुणावरून उठले ते उघडे बोडकेच टेंकड्याकडे पळत सुटले. पण ईश्वरच ज्यांच्यावर कोपला त्यांचें संरक्षण करणार कोण? कोठें पळतील बिचारे? ते कोठेंही गेले, तरी आगीनें आणि पाण्यानें त्यांची पाठ कांहीं सोडली नाहीं. किनाऱ्याकडे गेले तेंच; पुलाकडे गेले तेंच. कोठेंही जा, मृत्यूचें तोंड आहेच अशी स्थिति झाली. पवनचक्क्या, पानचक्क्या, तारायंत्रें, विजेचे दिवे, चटसारीं निजधामास गेलीं! सुमारें दोनशें लोक मेल्याचा पत्ता लागला व ४०००००० **डालर** नुकसान झालें! कोण भयंकर प्रसंग! हा तेलाचा प्रवाह **क्याफोर्ड** व **व्हेन्गो**-कौंटींतून वहात जाऊन **अलिघनी**नदीस मिळाला. ह्या १८ मैल जाग्यांत **टायटस् व्हिली** व **आईल सिटी** ह्यांशिवाय बारा खेडीं असून लोकवस्ती पन्नास हजारांच्या जवळ जवळ होती, तितक्या सर्वांचा नाश झाला. सन १८८९ तील **जॉनस्टन** येथें झालेल्या महाअनर्थासारखाच हा एक अनर्थ ह्मणावयाचा. आपल्या आर्यावर्त्तावर असा प्रसंग येत नाहीं ही परमेश्वराची केवढी कृपा आहे बरें?

पत्रव्यवहार.

श्री.

रा. रा. **केरळकोकिळ कर्ते** यांस,

आपल्या सुस्वर केरळकोकिळाचें आगमन प्रतिमासीं कुरुंदवाड लायब्ररींत होत असतेंच. सन १८९५ च्या डिसेंबर महिन्याचा केरळकोकिळ अंक आला तो वाचला. त्यांत, **श्रीमती सौभाग्यवती जानकीबाई साहेब** यांनीं केलेल्या श्रीगणेशस्तवावर आपला अभिप्राय आलेला अर्थात वाचण्यांत आला. त्या कविता ह्मणजे चांगल्या आहेत असा अर्थ नाहीं. तथापि, ग्रंथकर्त्रीस उत्तेजनप्रद आपण अभिनंदन केलेलें वाचून फार संतोष झाला. या ग्रंथकर्त्रीसच नव्हे, पण सर्व स्त्रीसमुदायास कांहीं शिकावें, वाचावें, वगैरेविषयीं उमेद येईल यांत संशय नाहीं. स्त्रीसमुदायानें वृथा गप्पागोष्टींत काल न दवडतां लिहावें, वाचावें, कांहीं मर्यादेपर्यंत विद्वान् व्हावें. **श्रीमंत बापूसाहेब** पूर्ण या मताचे

आहेत. मात्र हल्लीं सुधारक ह्मणविणारा वर्ग ज्या मार्गानें स्त्रीवर्गास विद्यादान करावें ह्मणतो तो मार्ग मात्र सुरक्षित नाहीं, असें **श्रीमंतांचें** मत आहे. असो.

आतां आपल्या कोकिळाच्या या अंकांतील दुसरा विषय जी० बी० नायक यांचीं हिंदू घड्याळें याजवर कविता, या कवितांतील श्लोक दुसरा चरण तिसरा यांत (शिवराय च्छत्रपतीला) यांत (च्छ) हें जोडाक्षर आहे ह्मणून मागील य अक्षरास गुरुत्व येतें तें नको. तसेंच श्लोक तिसरा चरण दुसरा यांत (देवि) असें आहे तेथें (वी) दीर्घ पाहिजे तसें केलें तर दोन्ही स्थळीं छंदोभंग होतो हे दोष आहेत. श्लोक सातवा यांत घड्याळाचीं सर्व यंत्रें वगैरे इकडे होऊन अथपासून इतिपर्यंत सर्व घड्याळें इकडे होऊं लागल्याशिवाय त्यांस देशी घड्याळें ह्मणतां येणार नाहीं. हें आपलें ह्मणणें अगदीं बरोबर आहे. तरी तूर्त झालें इतकेंच पुष्कळ हेंही खरें आहे.

आतां या घड्याळांतील **चित्रांविषयीं श्रीमंतांचें** मत असें आहे कीं, शिवराय, सर्वांस अत्यंत प्रिय, संमाननीय आहेत हें सर्वथा कबूल आहे. तरी श्रीगणपत्यादिदेवता त्याहून ह्मणजे शिवरायाहून पूज्य आहेत. याकरितां शिवरायाचें चित्र मध्यें व बाकी सर्व देवता शिवरायाच्या भोंवतालीं काढल्या हें खुद्द शिवरायास देखील बरेंसें वाटलें नसतें. कारण या सर्व देवता शिवरायास देखील अत्यंत पूज्य होत्या यांत संशय नाहीं. जर नायकांचे मनांत छत्रपतीस मध्यें बसविणें होतें, तर त्याचे अष्टप्रधान देवतांच्या ठिकाणीं बसविले असते तर फार चांगलें दिसलें असतें. देवतांचींच चित्रें काढविणें होतें तर छत्रपतीची प्रतिमा त्या घड्याळांत नकोच होती. कदाचित् मोठ्या मोठ्या देवता भोंवतालीं राहून शिवाजीस मध्यें घेऊन शत्रूपासून त्याचें रक्षण करितात, अशी कल्पना केली तर मात्र होण्यासारखी आहे. परंतु हें ह्मणणें तात्विक दिसत नाहीं.

पुनः याच अंकांतील तिसरा विषय (राक्षसी झोंप.) या सदरांतील कांहीं मनुष्यांचे विलक्षण झोंपेविषयींचा मजकूर वाचून अपूर्व आश्चर्य वाटलें. अशापैकीं नव्हे परंतु लहानसा एक अनुभव आह्मांसच आलेला आह्मी कळवितों. आमचे यजमानसाहेबांचे पदरीं एक **तात्याभट गाडगीळ** ह्मणून उत्तम वैदिक ब्राह्मण होते, ते नुकते दोन वर्षांपूर्वी येथें वारले. ते एकदां भाद्रपद-वद्य ६ रोजीं सकाळीं जे निजले ते वद्य ९ रोजीं सकाळीं उठले. तेव्हां घरचे लोक नित्याप्रमाणें सडासंमार्जन करीत होते, तात्याभटजींस आपण सकाळीं निजलों ते सायंकाळीं उठलों असें वाटलें होतें. आपण किती वेळ तरी निजलों,

स्नान, जेवण, कांहींच केलें नाहीं असे विस्मयांत होते. पण हे लोक सायंकाळचे वेळेस सडा, सारवण, कां करितात असें वाटून त्यांनीं त्यांस विचारलें तेव्हां ही सकाळचीच वेळ असून आज नवमी असल्याचें कळलें तेव्हां त्यांस आपण तीन दिवस सारखे निजलों याचा विस्मय वाटला. ही निद्रेची गोष्ट कुरुंदवाडांत घडली नसून सांगलीस कांहीं कामाकरितां हे गेले होते तेथें घडली. ही गोष्ट **तात्याभटजीं**नीं पुष्कळ वेळां सांगितली आहे. यानंतर कुरुंदवाडांतही दोन वेळां दोन दोन दिवस अहोरात्र सारखे निजले होते. असो पत्र फार लांबलें. माहीत होतें तें लिहिलें आहे. या सर्व लेखाचा उल्लेख येत्या अंकांत आपण योग्य वाटल्यास करावा.

श्रीमंत बापूसाहेब कुरुंदवाडकर यांचे आज्ञेवरून

दत्तात्रय गोविंद पटवर्धन.

*** प्रथमचा मजकूर सौजन्यदर्शक आहे, तो ठीकच आहे. स्त्रीशिक्षणाच्या संबंधानें श्रीमंतांचीं मतें आमच्या मताशीं अगदीं सदृश आहेत. आतां दुसऱ्या परिच्छेदाच्या प्रारंभीं श्रीमंतांनीं आमच्या कवितेंतील दोन दोष दाखविले आहेत, त्यांविषयीं विचार करूं. पहिला दोष हा कीं:— 'शिवराय छत्रपतिला' ह्या शब्दांत **'छ'** हें जोडाक्षर असल्यामुळें, मागील अक्षरास ह्मणजे **'य'**स द्वित्व येऊन छंदोभंग होतो,' ह्या संबंधानें व्याकरणरीत्या एवढेंच ह्मणणें पुरे आहे कीं, विशेषनामास्तव "संहिते"ची अविवक्षा झाल्यामुळें **च** होत नाहीं.

दुसरा दोष **'देवी'** शब्दाचा-'देवी' शब्द मूळचा दीर्घ असून, छंदोनुरोधानें आह्मीं तो ह्रस्व लिहिला आहे. परंतु अशाप्रकारचीं रूपांतरें **वामनपंडि**तांसारखे कवि 'निरंकुशः कवयः, ह्या सूत्राधारें महाराष्ट्र कवितेंत करतात, तर–पंडितांनीं केलीं ह्मणून आह्मींही करावींत असा जरी शास्त्रार्थ नव्हे तरी, उघड उघड नीरसत्व काठिण्य नाहीं अशा शब्दयोजनेनें प्रसंगोपात तोच 'संशयाचा फायदा' **कोकिळा**नें घेतला तर क्षम्यदोषांत त्याची गणना होण्यास हरकत नाहीं.

हिंदूघड्याळांत सभोंवार देवता बसवून मध्यभागीं शिवाजीची मूर्ति काढणें हें प्रत्यक्ष शिवरायाससुद्धां पसंत पडलें नसतें असें श्रीमंतांचें मत आहे. व 'देवता भोंवतालीं राहून शिवाजीस मध्यें घेऊन शत्रूपासून त्याचें रक्षण करतात.' हें ह्मणणें 'तात्विक दिसत नाहीं.' कां बरें? त्यापेक्षां सभोंवतीं अष्टप्रधान बसवून मध्यें **शिवाजी** काढला असता तर 'चांगलें दिसलें असतें.' युक्ति बरी आहे.

पण प्रधान आहेत आठ; आणि घड्याळाचे आंकडे आहेत बारा! तेव्हां बाकी भरती कोणाची करावयाची? हाही प्रश्न शिल्लक राहतोच.

झोंपेवद्दल रा० गाडगिळांचा अनुभव श्रीमंतांनीं कळविला ह्यावद्दल श्रीमंतांचे आह्मी फार फार उपकारी आहों.

—ए० के० को०—

पुस्तकपरीक्षा.

श्री० गायकवाड यांच्या आज्ञेनें तयार झालेलीं पुस्तकें.

इंग्लंददेशाचा विस्तार.

(मा० अं० चा०)

"कोणत्याही राष्ट्रानें आपला पूर्वापार परिपाठ व वर्तनक्रम एकदम झुगारून देऊन, इतर राष्ट्रांत सुखावह दिसणारे नवीन परिपाठांचा एकदम स्वीकार केला असतां त्याजपासून फायदा होईल कीं नाहीं त्याजवद्दल प्रोफेसरांस फार संशय आहे."

उत्कृष्ट उत्तर! रा. सर देसाई ह्यांस वरील गोष्टीवद्दल संशय होता, त्याचें बऱ्याच अंशानें छेदन होईल ह्मणून त्यांनीं प्रोफेसरांस मोठ्या आस्थेनें प्रश्न केला. तों प्रोफेसरांनीं त्याच संशयाच्या मागें 'फार' येवढें विशेषण जोडून तो त्यांचा त्यांस परत केला! हें उत्तर सांगावयाला साता समुद्रांच्या पलीकडचे प्रोफेसरच कशाला पाहिजेत. येथील शाळेपैकीं एखादें लहान पोर मुद्धां सांगूं शकेल. हा एका गोष्टीविषयीं सिद्धांत झाला. आतां दुसऱ्या गोष्टीविषयीं ऐका:—

"प्रस्तुतकालीं जपानदेशांत चालू असलेल्या प्रयोगाच्या फलद्रूपतेवद्दल त्यांस फार भीति वाटते." ह्यापेक्षां निश्चयाचे सिद्धांत, तर्कशास्त्राचीं अनुमानें, आणि पुढील भविष्यें तीं कसलीं वर्तवावयाचीं? आणखीं ऐका:—

"खरी राष्ट्रसुधारणा कोणती हा वादग्रस्त प्रश्न आहे." पूर्वीच्या इतिहासकारांनीं विचार ह्मणून कसला तो केला नाहीं; क्षुल्लक गोष्टीवर पाल्हाळ लावला; इतिहास ह्मणजे घडलेल्या गोष्टींचें कथन नव्हे; पुढील गोष्टींचें आधीं अनुमान काढणें याचें नांव इतिहास; असें पालोपद-गाणारानें "फार संशय आहे." "फार भीति वाटते." "हा वादग्रस्त प्रश्न आहे." अशा प्रकारचे सिद्धांत बाहेर

काढावेत ही केवढी बरें शोचनीय गोष्ट? प्रोफेसरसाहेबांना एकाही गोष्टीचा पुढील निश्चयात्मक सिद्धांत होत नसून ते दुसऱ्या इतिहासकारांस राजरोस नांवें ठेवावयास तयार होतात हा चमत्कार नव्हे काय? तात्पर्य "लोकां सांगे ब्रह्मज्ञान । आपण कोरडा पाषाण" अशापैकींच प्रोफेसरसाहेबांची अवस्था झाली आहे. बरें; आतां अशी कल्पना करूं कीं, प्रो० सीलींना स्वतः कोणताही सिद्धांत, अनुमान किंवा भविष्य वर्तवितां आलें नाहीं हें खरें; तरी लोकांनीं तें काढावें असा त्यांच्या लेखाचा हेतु आहे. हा हेतु सुद्धां सकृद्दर्शनीं मोठा स्तुत्य दिसतो. पण अशाप्रकारचें भविष्य वर्तवितां येणेंच मुळीं अशक्य आहे. इतक्यांतूनही तें कोणीं वर्तविलें अशी कल्पना केली, तर विद्यमानकालिन राज्यकर्ते, तें खोटें पाडल्यावांचून सोडणार नाहींत. समजा; कीं कोणी एका इतिहासकारानें मोठ्या विचाराअंतीं ठरविलें कीं अमुक एक देश हल्लीं अमुक राज्यकर्त्यांच्या सत्तेखालीं आहे खरा; परंतु तो आणखी शंभर वर्षांनीं त्यांच्या हातून जाईल. असें भविष्य केलें, तर तो कां जाईल, विद्यमान राज्यकर्त्यांच्या हातून कोणकोणत्या चुक्या होतील, तें सर्व प्रमाणें दाखवून सिद्ध केलें पाहिजे. तसें केलें तर सत्ता चालविणारे राज्यकर्ते त्यांत नमूद केलेल्या चुक्या होऊं न देण्याविषयीं आजपासूनच तजवीज ठेवतील, नाना तऱ्हा करतील, परंतु तें भविष्य खोटें पाडतीलच पाडतील. कारण, त्यांस तो सावधगिरी ठेवण्याचा एक इशाराच होऊन राहील.

मिळून इत्यर्थ काय कीं, अशा प्रकारचा भविष्यरूपी इतिहास आधीं कोणास लिहितां यावयाचा नाहीं. तितक्यांतून कोणीं रिकामा उपद्व्याप केला, तर त्यांतील अनुमानें व भविष्यें खरीं होण्याचा मुळींच संभव नाहीं. व प्रो० साहेबांनीं स्वतःही तशा प्रकारचें अनुमान किंवा भविष्य कांहीं एक काढलेलें नाहीं.

इतक्या गोष्टी जरी खऱ्या आहेत तरी, त्यांच्या ग्रंथांतील विचार अत्यंत प्रशंसनीय आहेत यांत तिळमात्र शंका नाहीं. त्यांतील पूर्वार्धांत त्यांनीं अमेरिकेसंबंधीं विचार केला आहे. तो भागही वाचण्यासारखा आहे तरी आमच्या विशेष उपयोगाचा नाहीं. पण उत्तरार्धांत त्यांनीं हिंदुस्थानाविषयीं विचार केला आहे. तो भाग प्रत्येक हिंदूनें वाचण्यासारखा—नव्हे गीतेसारखा पठण करण्यासारखा आहे. ह्यांत आह्मां लोकांविषयीं ग्रंथकारानें अशी कांहीं विपुल माहिती दिली आहे, व आमच्या सद्यस्थितीचें चित्र असें कांहीं सुरेख वठविलें आहे

कीं, त्याच्या कौशल्यापुढें जगत्प्रसिद्ध राजा रविवर्म्याचें नानारंगी कौशल्यही फिकें पडेल असें झटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. इंग्रजलोकांनीं हिंदुस्थानचें राज्य कसें घेतलें ? हिंदूलोकांच्या अंगीं कोणकोणते गुण आहेत ? ब्राह्मणधर्माचा पाया किती मजबूत आहे ? इत्यादि शेंकडों विषय त्यांनीं इतके विशद, इतके सत्य व इतक्या मार्मिकतेनें सांगितले आहेत कीं, ते निरंतर आर्यलोकांच्या दृष्टीसमोरच असणें योग्य आहे.

आह्मी ह्मणतों इंग्लिश लोकांना 'हिंदुस्थान'ही एक फुकटची कामधेनु मिळाली आहे, व तिच्यावर ते यथेच्छ चरत राहिले आहेत. पण इंग्लिश लोकांस त्यापासून तादृश सुख नाहीं. ते ह्मणतात हा विनाकारण आह्मांस भुर्दंड सोसावा लागत आहे. प्रो० सिलीसाहेबांचे पुढील उद्गार पहाः—

" हिंदुस्थानदेश इंग्लिशांच्या ताब्यांतून गेला तर, अगर इंग्लिश व्यापाऱ्यांस हिंदुस्थानाशीं व्यापार करण्याची मनाई झाली तर, इंग्लिश व्यापाऱ्यांस दरसाल ६ कोटि रुपयांचें नुकसान होईल. हा इंग्लंदाला इतका फायदा आहे खरा; तरी तितकेंच हिंदुस्थानचें ओझेंही इंग्लंदावर फार आहे. ह्मणून इंग्लंदानें हिंदुस्थान सोडून दिलें, तर त्यास कदाचित् ज्यास्त सुख मिळेल."

कां कशी आहे मजा ? 'शेळी जाते जिवानिशीं, आणि खाणारा ह्मणतो वातड, ! ग्रीस देशांतील प्राचीन इतिहासकारांनीं, आमच्या पूर्वजांच्या आंगच्या सात्विकगुणांचें वर्णन केलेलें ग्रंथकर्त्यांनें एके ठिकाणीं दिलें आहे; तें वाचावें. त्याचें रात्रंदिवस पारायण करावें येवढेंच नव्हे, तर तसे गुण आपल्या अंगांत पुनरपि येण्याविषयीं अहोरात्र परमेश्वरापाशीं करुणा भाकावी. अशी त्याची योग्यता असल्यावरून आह्मी तें मुद्दाम जाड टाइपांत देत आहों. तें वर्णन असेः—

" हिंदु लोक विलक्षण शूर असून युद्धकौशल्यांत त्यांची बरोबरी करण्यास एशियांतील दुसरे कोणतेही लोक समर्थ नाहींत. ते फार प्रामाणिक व साधे आहेत. इतके समंजस आहेत कीं, त्यांस कायद्याच्या आधारें फिर्याद करण्याचा प्रसंग पडत नाहीं. ते इतके प्रामाणिक आहेत कीं, त्यांच्या घरांत कुलुपांची जरूर लागत नाहीं, व त्यांचे करार लेखबद्ध असण्याची आवश्यकता पडत नाहीं. एकही हिंदुगृहस्थ खोटें बोलण्याचें उदाहरण उपलब्ध नाहीं."

ही गोष्ट कोणास खोटी वाटेल तर प्रो० सिलीसाहेब सांगतातः—

" ह्यांत कदाचित् अतिशयोक्ति असेल. पण अतिशयोक्ति ह्मणजे मिथ्यावर्णन नव्हे; तर जी गोष्ट मूळची असेल, तीच ज्यास्त करून सांगणें."

अरेरे ! वर निर्दिष्ट केलेले पूर्वजांचे साधुतुल्य व देवतातुल्य सद्गुण कोणीकडे ? ते फार प्रामाणिक व साधे होते; आह्मी अप्रामाणिक छचोर बनलों आहों. आणि हल्लींचे आमचे अधोगतीस येणारे गुण कोणीकडे ? पूर्वकालीं सुधारणा नव्हती; सांप्रत ती होऊं लागली आहे. असें ज्यांचें मत असेल, त्यांनीं वरील वाडवडिलांचें प्रतिबिंब पाहून खालीं मान घालावी, लज्जित व्हावें, नव्हे डोळ्यांतून आंसवें ढाळावींत. ज्या पूर्वजांचें असें वर्णन केलें आहे, त्यांच्याच प्रस्तुतकालीन वंशजांविषयीं परके लोक काय ह्मणतात तें ऐका:—

"हिंदुलोक अगदीं अप्रामाणिक, भित्रे व अतिशय कलहप्रिय आहेत असें हे लोक (इंग्लिश) ह्मणतात."

आमचे पूर्वज शूर व युद्धकौशल्यांत प्रवीण होते; आह्मी शून्य झालों आहों. ते इतके समंजस होते कीं, त्यांस फिर्यादीचा प्रसंगच येत नसे. आह्मी इतके असमंजस झालों आहोंत कीं, आमचें कोर्टावांचून एक दिवस चालत नाहीं. आजकाल वकिलांच्या तर उदरीं शनि आला आहे ! ज्या आह्मांला कुलुपांची गरज नव्हती, त्यांचा आमचा दिवसाढवळ्या घरफोडीशिवाय दिवस गेला ह्मणजे भाग्याचा, असें ह्मणण्याची पाळी आली आहे. खून ही तर काय सर्वसाधारण गोष्ट ! ज्या आह्मांला लेखबद्ध कराराची आवश्यकता नव्हती, तेच आह्मी स्टांपांवर सहीसाक्षीनिशीं केलेले करार खोटे पाडण्याविषयीं झाल झाल तोडतों आहों ! पूर्वी एकही हिंदुगृहस्थ खोटें बोलण्याचें उदाहरण उपलब्ध नव्हतें, आतां एकही हिंदुगृहस्थ सत्य बोलण्याचें उदाहरण उपलब्ध होणार नाहीं ! हरहर ! काय ही आमची दशा ! अशा आर्यांचे पुत्रपौत्र ह्मणवून घेणाऱ्या आह्मां कुलकलंकांस धिःकार असो ! सूर्याच्या पोटीं आह्मी खरोखरच शनैश्चरच जन्मलों ह्मणावयाचें. वाडवडिलांची कीर्ति, सद्गुण, परकीयांच्या तोंडून ऐकूनही ज्या आह्मांस लज्जा वाटत नाहीं, शरम वाटत नाहीं, रडें कोसळत नाहीं, हिंमत येत नाहीं, त्या आमचा निगरगट्टपणा किती ह्मणून वर्णन करावा ? सुधारकहो ! तुह्मी भलत्याच विषयाकडे आधीं कशाला वळतां ? मुळाशीं पाणी घाला. वरच्या आमच्या सद्गुणांच्या पूर्वजसंपादित जाहागिरी जप्त झाल्या आहेत, त्या परत मिळविण्याविषयीं खटपट करा. तें जर तुमच्या हातून होत नाहीं, तर आग लागो त्या तुमच्या सुधारणेला ! ती व्यर्थ पोकळ आहे हें खचित समजा.

सांप्रत इंग्लिश लोकांच्या बुद्धिमत्तेचा प्रभाव पाहून आह्मी अगदीं चकित होऊन जातों. व पाश्चात्य विद्यासागरांत तरंगत असलेले लोक तर, आपल्यास

केवळ क्षुद्र मानून घेतात. परंतु आमच्या पूर्वकालीन बुद्धिकौशल्यापुढें व कित्येक बाबतींत प्रस्तुतच्या पुढेंही त्यांनीं किंचित्ही गर्व बाहूं नये, असें त्यांचेच ज्ञातिबंधु प्रो० सिली सांगतात. ऐका:—

"इंग्रजलोक हिंदुलोकांपेक्षां हुषार नाहींत. त्यांचें मन हिंदुलोकांपेक्षां जास्त गंभीर किंवा जास्त विकसित नाहीं. रानटीलोकांनीं कधीं न ऐकलेले असे सुधारलेल्या राज्यकर्त्यांचे शहाणपणाचे विचार ऐकून, जसें त्यांस आकस्मिक आश्चर्य वाटतें, तसें हिंदुलोकांस इंग्रज लोकांपासून आश्चर्य वाटणारें नाहीं. इंग्रजलोकांच्या कवितेंत जसे कांहीं अत्युच्च विचार आहेत, तसे हिंदुलोकांच्या कवितेंतही आहेत. इंग्रजलोकांच्या नवीन सुधारलेल्या शास्त्रांतही हिंदुलोकांस अगदीं अपरिचित अशा कल्पना बहुधा नसतील. इंग्रजलोकांचे विचार जास्त आहेत, अगर जास्त प्रगल्भ आहेत, असा इंग्रजलोकांनीं गर्व करण्यास कांहीं कारण नाहीं."

हिंदुधर्मांतही श्रेष्ठ जो ब्राह्मणधर्म त्याचेंही प्रोफेसर साहेबांनीं मोठें वर्णन केलें आहे. ते ह्मणतात:—

"ज्यावेळेस रानटी परधर्मीलोकांनीं युरोपावर स्वाऱ्या केल्या, त्यावेळेस त्यांजबरोबर लढण्यास युरोपांतील सर्व लोक तयार झाले. तद्वतच ब्राह्मणधर्म हें एक हिंदुस्थानांतील एकीचें बीज असून त्याजपासून मागेंपुढें राष्ट्रीयत्व उत्पन्न होण्याचा संभव आहे. व कदाचित् असें होईलही. तथापि अशाप्रकारें एकी घडून येणारी असती तर, ती आजपर्यंत थोडीशी तरी, कां घडून आली नाहीं, हा एक प्रश्नच आहे."

"शत्रूंशीं सामना करण्याकरितां, सर्व हिंदुलोकांचीं अंत:करणें एकवट करून त्यांच्या ठायीं स्वाभिमानाची स्फूर्ति उत्पन्न न करितां केवळ स्वसंरक्षण करूनच हा ब्राह्मणधर्म स्वस्थ बसला आहे, ह्याचें कारण काय असेल तें असो."

"कित्येक वेळां प्रचंड उच्छेद झाला असतांही तो (ब्राह्मणधर्म) टिकाव धरून राहिला आहे."

पण असा हा राष्ट्रीयत्व उत्पन्न करणारा ब्राह्मणधर्म आमच्यांतील कित्येक ब्रह्मवृंदांना भारभूत—नव्हे विषवत् झाला आहे. त्याची त्यांना किळस आली आहे. अशा लोकांना श्रीमज्जगद्गुरूंची शब्दौषधी पसंत पडत नाहीं; त्यांना हें टोपीवाल्यांचें टिंक्चर तरी पथ्यावर पडेल तर पहावें!

आतां इंग्लिशलोकांनीं हिंदुस्थान घेतलें, त्यांत तरी मोठी तरवारबहादुरी केली; शौर्य गाजविलें; किंवा लष्करीबाणा प्रगट केला असा ज्यांचा समज असेल त्यांनीं पुढील उद्गार अवश्य वाचावेत.

"गोरेलोकांनीं हिंदुस्थान जिंकलें हें ह्मणणें अगदीं चुकीचें आहे. ज्या सैन्याकडून हिंदुस्थान जिंकलें गेलें, त्या सैन्यांत गोरेलोकांची संख्या सरासरीनें $\frac{1}{3}$ होती. असें असतांही सर्व कृत्यांमध्यें गोरेलोकांच्या पराक्रमाची अतिशयोक्ति केलेली आढळते; इतकेंच नाहीं, तर घडून आलेल्या गोष्टींचें सुद्धां अगदीं मिथ्या वर्णन केलेलें असून, लोकांच्या मनांतही तें चुकीचें भरून गेलें आहे; कारण, सर्व सैन्यांत गोरेलोक फक्त $\frac{1}{3}$ होते, तर बाकीचे $\frac{2}{3}$ कोण होते? अर्थात् काळेलोक होते. ह्यावरून परकीयांनीं हिंदुस्थान देश जिंकला हें ह्मणणें व्यर्थ आहे. ह्यापेक्षां **काळेलोकांनीं आपणच आपल्याला जिंकलें हें ह्मणणें जास्त शोभेल.**"

ह्यापुढें त्या इतिहासपटु व निःपक्षपाती इतिहासकारानें, आपल्या पूर्व ज्ञातिबांधवांच्या इतिहासांतील पक्षपातीपणा कसा स्पष्ट दाखविला आहे तो पहाः—

"हिंदुस्थानांत इंग्रजांचें सैन्य अवघें दोन लक्ष आहे. व त्या दोन लक्षांपैकीं ६५,०००, ह्मणजे एकंदर सैन्याचा सुमारें फार तर $\frac{1}{3}$ गोरेलोक आहेत, व इतके लोक तरी, सन १८५७ सालच्या बंडापासूनच ठेवलेले आहेत. इ० स० १८०८ ह्या वर्षी गोरेलोक फक्त २५ हजार असून काळेलोक १,३०,००० होते. ह्मणजे $\frac{1}{5}$ पेक्षांही कमी होते."

"मेकॉले ह्यानीं लिहिलेलें क्लाईव्हचें चरित्र पहा. त्यांत प्रत्येक ठिकाणीं 'राजकीयलष्कर' 'शूरसागर—' पुत्र 'क्लाईव्ह आणि त्याजबरोबरचे इंग्रजलोक याजपुढें कोणाचाच टिकाव लागेना.' वगैरे मजकूर आलेला आहे. परंतु काळेलोकांची संख्या गोरेलोकांच्या संख्येपेक्षां नेहेमीं जास्त असे. ते लढाईच्या कामांत कधींही मागें नसतां गोरेलोकांची बरोबरीच करीत होते. हें ध्यानांत ठेवलें ह्मणजे एकट्या लोकांनींच काय पराक्रम केला, व इंग्रजलोकांस जयप्राप्ति होण्याचें कारण केवळ गोरेलोकांचेंच शूरत्व कीं काय, ह्याचा उलगडा एकदम होतो."

"कोर्सिकामध्यें राहणाऱ्या एका गरीब सरदाराच्या लहानशा मुलानें (नैपोलियन बोनापार्ट) सर्व युरोपावर आपला अंमल बसवावा, ही गोष्ट खरोखरी जितकी अद्भुत आहे, तितकी ईस्ट इंडिया कंपनीनें हिंदुस्थान काबीज केलें, ही गोष्ट अद्भुत नाहीं. तथापि ईस्ट इंडिया कंपनीस इतका जय प्राप्त झाला, ही गोष्ट सर्वांस फारच अद्भुत वाटली. ती इतकी वाटण्याचें मुळींच कारण नव्हतें."

(चालू.)

PRINTED and published by Janardan Mahadeo Gurjar AT JAVAJI DADAJI'S "NIRNAYA-SAGARA" PRESS, Bombay.

आर्यधर्माभिमानी लोकांकरितां सचित्र हिंदु घड्याळें.

प्रत्यक्ष देवदेवतांनींच हृदयासंन्निध वास केल्यावर अधर्म कितीसा टिकेल.



नमुना मागवा. तुमचा पहाण्यानेंच आनंद जर होईलच होईल, तर मग वापरण्यानें कां न होणार बरें ? देवतांचे दर्शनानें हिंदुधर्माभिमानास भरती नाहींका येणार ? नांव ऐकतांच पहावेंसें वाटतें व पाहतांच घ्यावेंसें वाटतें.

हिंदु घड्याळें कशीं आहेत, दिसण्यांत सुंदर, खिशांत हलकीं, मजबूत, टिकाऊ, अंगचे चावीचीं, तबकडी मिन्याची पांढरी असून त्यावर रीतीप्रमाणें रोमन आंकडे असून ठळक मराठी आंकडेही आहेत आणि प्रत्येक आंकड्यामध्यें हिंदुपूज्य देवतांचीं सुंदर चित्रें आहेत. श्रीगणपती, सरस्वती, रामदासस्वामी, हनुमंत, रामसीता, लक्ष्मीनारायण, गरुड, अष्टभुजादेवी, विठ्ठलरखुमाई, शंकरपार्वती, अक्कलकोटस्वामी, श्रीगुरुदत्तात्रय, आणि मध्यभागीं, महाराष्ट्रास जिवंत करणारे गोब्राह्मणप्रतिपालक **श्रीशिवाजीछत्रपतीमहाराज** यांचें सुबक चित्र आहे. अशीं हीं अपूर्व हिंदु घड्याळें आमचे देशबांधव व भगिनी काय ह्मणून न घेतील !

हिंदु सिलेंडर पिक्क नी. सी. वॉच किं. रु. ८॥ ते. १० ग्या. वर्ष १
हिंदु लिव्हर प्रीव्हेन्स नी. सी. वॉच किं. रु. १५ ग्यारन्टी वर्षें २
हिंदु रासकोप सिस्टीम नी. सी. वॉच किं. रु. १७ ग्या. वर्षें ३
हिंदु प्रिव्हेलन्स चांदीचें वॉच किं. रु. २५ ते ३० ग्या. वर्षें ४
हिंदु सोन्याचें वॉच किं. रु. १०० ते १२५ ग्या. वर्षें ४
हिंदु सचित्र आर्मी वॉचेस किं. रु. १० ते १२५ पर्यंत.

हिंदु सचित्रटाईमपीसेस साधें, अलार्म, स्विंग, जपींगई. आंकड्यामध्यें देवतांचीं चित्रें, मध्यभागीं दरबारी व अश्वारूढ श्रीशिवाजी, आणि श्रीशंकरपार्वतीसह. किं. रु. २॥–४–६–१० ते ३० पर्यंत. [३

जी० बी० नाईक आणि कंपनी. बिलासिसरोड, नाका भायखळा, मुंबई.

व्यापारी व ग्राहक ह्यांकरितां. **हरएकप्रकारचा माल** मुंबईत मिळणारा वक्तशीर बाहेरच्या लोकांस मिळण्याची सोय.

D. K. SANDU
RAMWADI, BOMBAY.

दत्तात्रेय कृष्ण सांडू ह्यांचें हरएक प्रकारचा माल मिळणारें, आणि माफक **अडंत** घेऊन माल रवाना होणारें दुकान:—

रामवाडी, मुंबई.

आमच्या दुकानीं सावंतवाडीचा रंगित माल, **गंजिफा**, आयांषधीकारखाना—पनवेल येथील **औषधें**, **स्टेशनरी**, **वाकेरीचें भातें** असून सतारीची **तार**, सतारी, मृदंग, तबले, इत्यादि पाठवितों.

वा. कृ. सांडू. दुकानदार—रामवाडी मुंबई.

कर्नाटकांतील औषधि.

आजपावेतों १८ वर्षांपासून वाग्भटादि अनेक ग्रंथांच्या आधारानें मीं स्वत: औषध तयार करून अनेक लोकांस देऊन अनुभव घेतले आहेत. आणि बहुत लोकांकडून दाखले मिळाले आहेत. या कर्नाटक प्रांतांत अनेक वनस्पति मिळत असल्याकारणानें ताज्या वनस्पतींपासून औषधें जेव्हांचे तेव्हां तयार करण्यांत येतात.

१ मदनकामेश्वरी पाक.

या पाकांत ४० वनस्पतींचा समावेश केला असून उत्तम धातुपौष्टिक, शक्तिवर्धक, फार रुचिकर व अनेक रोगनाशक आहे. २४ रु. भार शेरास किंमत रुपये २.

२ प्रवाळ, कस्तूरी, केशरमिश्रित, धातुपौष्टिक, व स्तंभक, अग्निवर्धक, कामोत्तेजक गोळ्या ४२ किंमत रुपये २.

३ **प्रवाळभस्म.** वनस्पतिपुटानें तयार केलें आहे. पौष्टिक, पित्तनाशक, धातुवर्धक. दर तोळ्यास किंमत रु. १०४

४ लोहमिश्रित मदनोत्तेजक गोळ्या. गोळ्या ४२ कि. रुपये. २.

छातींतील रोग, धातुविकार, नपुंसकत्व, स्वप्नावस्था, रक्तसंबंधी रोग, अग्निमांद्य, मेंदूसंबंधी रोग, इत्यादि अनेक रोग या गोळ्यांपासून नाश पावतात. विशेष माहिती औषधासोबत मिळेल.

सदरहू औषधाचे अनुपानकागद औषधासोबत. औषधाचे किंमतीशिवाय, ट. ख. पडेल. व्ह्याल्युपेबलमार्गानें पाठवून देऊं.

५ **उत्तम वेलदोडे.** बाजारभावाप्रमाणें पाठवून देऊं.

६] **पत्ता. रामप्पा सुब्राव वझे. कसवेंकर** सिरसी.
जिल्हा, उत्तरकानड.

THE INDIAN GOVER. SECURITY MARRIAGE PROVISION FUND.

धी इनडीअन गव्हर्नमेंट सिक्युरिटी म्यारेज प्रोव्हीजन फंड.

मुंबई.

वरील फंडांत पूर्वी २५०० मेंबरांचीच संख्या ठेविली होती. ती भरून गेल्यामुळें व प्रवेश-अर्ज फार येऊं लागल्याकारणानें मेंबरांची संख्या ५००० पर्यंत वाढविली आहे. **वर्गणीचे दर** फारच कमी आहेत ह्मणजे दरमहा १।,२॥, ३॥, अथवा ५ रुपये भरल्यानें **लग्न** अगर **मौंजीबंधनाच्या खर्चा**साठीं अनुक्रमें २५०, ५००,७५० अथवा १००० रु० चें ठरीव बोनस मिळतें. दिसेंबर अखेरपर्यंत १७ मेंबरांस सदर्हूप्रमाणें बोनस मिळालें आहे. व दरमहिन्यास पुढेंही दिलें जाईल.

डेथबेनिफिटफंड. यांत कोणत्याही जातीच्या ६० वर्षांच्या आंतील स्त्री अगर पुरुष यांस डाक्टरचे सरटिफिकिटाशिवाय मेंबर होतां येतें. व मरणानंतर आपल्या वारसास २००० रु० पर्यंतचा पुरवठा करितां येतो. यांत ठरीव वर्गणी दरमाहा रु० १ आहे. प्रवेशफी रु० २—

वरील फंडाचा सर्व पैसा गव्हर्नमेंट सिक्युरिटीमध्यें ठेवण्याचा ठराव आहे. जास्त माहितीस्तव एक आणा पाठवावा. एजंट पाहिजेत.

पत्ता. नं. ५ कावसजी पटेलरस्ता, कोट, मुंबई.

Parulkar & Co.
सेक्रेटरीज्.

आह्मी देशावरील **व्यापाऱ्यांचा माल** येथें खपवून त्याच्या मोबदला इकडील माल देशावरास योग्य कमिशननें पाठवून देतों. तसेंच स्थावर मिळकती—घरें, बागबंगले वगैरेवर **कर्ज मिळवून देतों.** विशेष माहितीस्तव खालीं सही करणारांस समक्ष भेटावें अगर लिहावें. [२–१२

पत्ता. नं. ५ कावसजी पटेलरस्ता, कोट, मुंबई.

Parulkar & Co.
एजंटस्.

नवीन पुस्तकें.

१ श्रीज्ञानदेवकृत अमृतानुभव ग्रंथ श्रीहंसराजस्वामीकृत समओंवीबद्ध टीका व कठीण शब्दांचा कोश यांसह किंमत १२ आणे. ट. व व्ही.पी.ख.८३ आणे.

२ अमृतानुभव मूळ कठीण शब्दांच्या कोशासह. सांचा लहान खिशांत रहाण्याजोगा किंमत. ८६ ट. व व्ही. पी. ख. ८३ आणे.

भर्तृहरिकृत शतकत्रय (शृंगार, नीति व वैराग्य) वामनपंडितकृत श्लोकबद्ध टीका व सरळ मराठी भाषांतर यांसह किं० १२ आणे. ट. व व्ही.पी.ख.८४ आणे.

तिन्ही पुस्तकें ग. कृ. च्या छापखान्यांत जाड व घोटीव कागदावर छापिलीं आहेत. प्रत्येक जातीच्या १० प्रती घेतल्यास १ प्रत जास्त मिळेल.

५] **काशीनाथ वासुदेव खांडेकर.**

पुस्तकविक्रीचें दुकान रामवाडी, पोस्ट मार्केट, मुंबई.

दत्तात्रय बळवंत पारसनीस.—

झांशीच्या राणीसाहेबांच्या चरित्राचे कर्ते यांनीं लिहिलेला नवीन ऐतिहासिक ग्रंथ.

मराठ्यांचे पराक्रम.

मराठ्यांनीं आपल्या अतुल शौर्यानें व बुद्धिकौशल्यानें उत्तरहिंदुस्थानामध्यें जे प्रांत सर केले त्यांत बुंदेलखंड हा मुख्य होय. तेथील शूर क्षत्रीय नृपति राजा छत्रसाल यानें जो गत ग्राह गजेंद्रकी सो गत भइ है आज ॥ बाजी जात बुंदेलनकी राखो बाजी लाज॥१॥ अशा दीनवाणीनें प्रार्थना केल्यावरून महाराष्ट्रवीरशिरोमणि **बाजीराव** पेशवे यांनीं तिकडे जाऊन अद्भुत शौर्य गाजविलें व आपल्या कामगिरीबद्दल अनेक प्रांत संपादन करून तेथें मराठ्यांची सत्ता संस्थापित केली, तिचा इतिहास आजपर्यंत मुळींच उपलब्ध झाला नाहीं, तो सर्व मनोवेधक भाग अत्यंत परिश्रमानें जुनी माहिती मिळवून लिहिला आहे. यामध्यें छत्रसाल राजाचें वीररसप्रचुर चरित्र, बाजीरावाचे पराक्रम, सुभेदार गोविंदपंत बुंदेले यांच्या व त्यांच्या रणशूर पुत्रांच्या कर्तबगारी, पानपतच्या लढाईची हृदयद्रावक हकीकत, मराठ्यांचीं बुंदेलखंडांतील राज्यकारस्थानें, इत्यादि मनोरंजक व महत्वाची माहिती लेखी आहे. ही माहिती ग्रंथकारांनीं स्वतः बुंदेलखंडांत जाऊन गोविंदपंत बुंदेल्यांचे वंशज गुलसराईचे राजे व सागरचे सुभेदार यांच्याकडून अस्सल कागद पत्र तपासून लिहिली आहे. किंमत १। रुपया ठेविली आहे.

पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें:— सातारा येथें:—रा. रा. **म्यानेजर शुभसूचक प्रेस** यामध्यें. मुंबई येथें:—रा. रा. **जनार्दन महादेव गुर्जर** यांचे दुकानीं.

स.गा.पंडित, नाशिक

एप्रिल. (वर्षांची वर्गणी १८३ टं. खेचासह. फुटकळ अंकास ८४.) १८९६.

केरळकोकिळ.

वर्षारंभ जानेवारी.

पु० १०] [अं० ४

विधिरेव विशेषगर्हणीयः करट त्वं रट कस्त्वयापराधः ॥
सहकारतरौ चकार यस्तै सहवासं सरलेन कोकिलेन ॥१॥

जनार्दन सहादेव गुर्जर बुकसेलर अॅण्ड पब्लिशर
रामवाडी
मुंबई.

सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत.

ह्या पुस्तकांतील लेख कोची (मलबार) येथें तयार होऊन, ते मुंबई येथें छापून प्रसिद्ध होतात.

विषयांची अनुक्रमणिका.

	पृष्ठ.		पृष्ठ.
सील.	७३	कारखाना.	८३
श्रीशिवछत्रपति-जयंती. ...	८०	पुस्तकपरीक्षा.	९२
पनवेल येथील आर्यौषधींचा			

पुस्तकांची पोंच.

१ स्त्रियांचीं कर्तव्यें, २ मुलांमुलींस खाऊ—पुडा १ ला, ३ स्वधर्मज्ञानपुस्तकालय-धर्माची आवश्यकता आणि व्याख्या, ४ मराठ्यांचे पराक्रम.

हीं पुस्तकें पाठविणारांचे आभार आहेत.

फेब्रुवारींतील कूट प्रश्नांचीं उत्तरें देणारांचीं आणखी नांवें.

T. A. Mahale सेक्रेटरी वाचनमंदिर रेडी, विनायक विश्वनाथ बापट—स्कुल मास्तर मुरूड. विष्णु बळवंत थोरात-कोपरली, B.K. Dewdhar-Gunlakar.

पुस्तकें बांधावीं—यासोबत सिंहावलोकनाचा संपूर्ण मजकूर जात आहे.

केरळकोकिळांत प्रसिद्ध झालेल्या कविता—

सासरची पाठवणी.

स्वतंत्र पुस्तक किंमत ८० ट. ख. ८॥.

"केरळकोकिळांत छापविलेली साठ श्लोकांची सुंदर कविता सगळ्या लहान मोठ्या स्त्रियांनीं वाचावी, गावी आणि पाठ करावी अशी आहे."—**बालबोध.**

धनुर्धारीरचित—**नवीन पुस्तक. स्वधर्मज्ञानपुस्तकालयापैकीं.**

धर्माची आवश्यकता आणि व्याख्या.

कि. ८॥ आणा. ट. ख. बारा प्रतीस ८॥.

१ सुखाचें साधन. २ निराशावीज. ३ उदात्तवृत्ति व कृति कशी होईल. ४ कर्तव्य. ५ स्वधर्माश्रय. ६ स्वधर्मांचें अज्ञान. ७ धर्मज्ञानाचा यत्न. ८ धर्म ह्मणजे काय. असे विषयविवेचनाचे भाग आहेत. वर्गणीदारांस ५ प्रतीस ८० ट. ख. ८॥.

जनार्दन महादेव गुर्जर, मुंबई.

॥ ओं नमः श्रीरामचंद्राय ॥

आर्यमहौषधालय मु० आंजलें.

या अत्यंत खात्रीच्या औषधाचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यांस कदाचित् आला नाहीं तर पैसे परत देऊंच व त्याशिवाय त्यांच्या आरोग्यार्थ एखादें उत्तम औषध यावें लागल्यास तें फुकटच देऊं.

मदनविलासामृतसंजीविनी.

वीर्यस्तंभक, रक्तशोधक, अत्यंत कामोत्तेजक, चित्तोत्साहक, बुद्धि–कांतिवर्धक व धातुपौष्टिक सुवर्णमाक्षिकमौक्तिक कस्तूरीमिश्र अपूर्व गुटिका.

१. शरीराची उत्तम सुधारणा करणारीं अत्यंत महत्त्वाचीं जीं औषधें आहेत, त्यांत या गुटिका अगदीं पहिल्या प्रतीच्या ठरल्यामुळें यांचे अपूर्व गुण थोड्याच काळांत या देशाच्या सर्वभागीं व त्यांच्या आसमंतात् अतिशय पसरले आहेत. या सेवन केल्यानें नपुंसकत्व, इंद्रियशिथिलता, कडकी, जीर्णज्वर, अग्निमांद्य, अशक्तता, स्वप्नजन्य किंवा इतर धातुपात, छातींतील रोग, मेंदूचे विकार, पांडुरोग, क्षय, मूत्रसंकोच किंवा मूत्रातिरेक, कटिशूल, वातरोग, उपदंशसंबंधी मुरलेले विकार, हात, पाय, मूत्रमार्ग, व शरीर यांचा दाह, व अरुचि, इ० अनेक विकार कितीही वर्षाच्या मनुष्यांस नवीन किंवा जुनाट असले तरी खात्रीनें बरे होतात. धातु व रक्त यांची शुद्धि व वृद्धि होऊन रक्तदूषणजन्य अनेक रोग हटकून बरे होतात. वीर्यस्तंभन, व कामोद्दीपन होऊन अग्नि व शक्ति भरपूर वाढते. स्त्रियांची धुपणी व संततीस अपायकारक जे गर्भाशयस्थ रोग त्यांचें त्वरित निवारण होऊन कांति, स्मरणशक्ति व बुद्धि वाढते. ज्यांस शारीरिक व मानसिक श्रम फार पडतात, त्या सर्वांच्या आंगीं यांनीं अतिशय शक्ति येऊन मनास उत्साह प्राप्त होतो, सुस्ती जाते. ज्यांस दूध व जडान्न पचत नाहीं त्यांस तें भरपूर पचूं लागतें, कोष्ठशुद्धि होते. या अप्रतिम गुटिका अत्यंत शोधानें केल्या असून त्यांच्या अप्रतिम गुणका-

रित्वाबद्दल हजारों सर्टिफिकिटें मिळालीं व नित्य मिळत आहेत. यांत अपायकारक पदार्थ बिलकूल नाहींत. वरील सर्व रोग जाऊन उत्तम गुण प्राप्त होण्यास या गुटिकांसारखें अप्रतिम औषधच नाहीं असें पूर्ण अनुभवावरून स्पष्ट ह्मणतों. यांस पथ्यसेवनाची गरज नसतां या पाहिजे त्या दिवसांत घेतल्या तरी हटकून गुण करितात. यामुळें त्यांचा अतिशय खप सुरू आहे. गोळ्या रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम सहा रुपयांच्या किंवा त्यांहून कितीही जास्त गोळ्या घेणारांस बंगीचा सर्व टपालखर्च माफ आहे. त्यांचे आंत घेणारांस मात्र तो वेगळा सहा आणे पडेल. एकदम ३२ गोळ्यांस १ रु. ७० गोळ्यांस २ रु. १६० गोळ्यांस ४ रु. २६० गोळ्यांस ६ रु. ५२० गोळ्यांस १० रु.

थंडगार नेत्रांजन—हें अंजन स्तुतीस अत्यंत पात्र आहे, हें सतत दहा वर्षांच्या पूर्ण अनुभवानें कळवितों. यानें डोळ्यांचे साधारण विकार तर सहजच, परंतु दृष्टीचा समूळ नाश करणारे, तिमिरांध्य, वडस, बिंदु, फुलें, कांच, सारा, भोर, गळती, खुपऱ्या, जळजळ, कंड, फूट, चिकटा, ठणका व लाली इ० अनेक विकार, तत्संबंधी मस्तकशूलादि विकारांसह कितीही वयाच्या मनुष्यास कोणत्याही कारणांनीं प्राप्त झालेले नवीन किंवा जुनाट असले तरी नाजूक रीतीनें कोणतीही इजा न होतां बरे होतात. दृष्टि तीव्र व थंडगार राहते. हें चांगल्या दृष्टीच्या मनुष्यांनींही डोळ्यांत घातल्यास वरील विकार त्यांस बिलकूल होणार नाहींत. लहान मुलांस तर हें अत्यंत उपयोगी आहे. २ तो० ड० १॥ रुपया.

विशेष सूचना.—अलीकडे आंजर्ले व मुर्डी वगैरे गांवांतील औषधांच्या बऱ्याच जाहिराती सुरू आहेत व त्यांपैकीं कांहीं जाहिरातींत ज्या सह्या आहेत त्या बहुतेक आमच्याच नांवासारख्या भासण्याचा विशेष संभव आहे. तरी अशा लोकांशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं हें अवश्य लक्षांत ठेवून आमचीं औषधें **"कृष्णशास्त्री बिवलकर वैद्य. मु० आंजर्ले ता० दापोली जि० रत्नागिरी."** याच पत्त्यावर रोखीनें किंवा व्ही.पी.नें मागवावींत. अनुपान पत्रकसोबत असतेंच.

११–१२]

केरळकोकिळ.

महासागर.

सील.



महासागरामध्यें जे विशाल, अद्भुत व अत्युपयोगी प्राणी आहेत, त्यांपैकीं **'सील'** हा एक प्राणी होय. **'वालरसा'**चें सचित्र वर्णन आमच्या कोकिळांत पूर्वी येऊन गेलेंच आहे. त्याचा आकार आणि सीलचा आकार—ह्मणजे शरीराची घडण बहुतेकअंशीं सारखीच आहे. भेद ह्मणून इतकाच कीं, **वालरसा**ला हत्तीसारखे दोन सुळे असतात, ते ह्या प्राण्यास नाहींत. सील हे कांसवें, सुसरी ह्यांसारखेच जलचर स्थलचर प्राणी आहेत. ह्मणजे ते पाण्यांतही राहूं शकतात, व जमिनीवरही राहूं शकतात. समुद्रापेक्षां किनाऱ्यावर पडणें त्यांस फार आवडतें. त्यांत उन्हाळ्यामध्यें तर पुसूंच नये. उत्तरसमुद्राचे किनारे ह्या असंख्य प्राण्यांनीं गजबजून गेलेले असतात.

सीलच्या शरीराची ठेवण मोठी लोकविलक्षण असते. त्याच्या शरीराचा पुढील भाग, जनावरासारखा दिसतो, आणि मागील भाग माशासारखा दिसतो. ह्याचें तोंड मांजरासारखें असून नाक फार फेफाणें

---

१ केरळकोकिळ पुस्तक ३ अंक ६ पहा.

असतें. डोळे मोठे गरगरीत व पाणीदार असतात. ह्या प्राण्याला कान नाहींत. त्यांच्याऐवजीं त्यास छिद्रें मात्र असतात. त्यांच्यायोगें त्यास ऐकूं येतें, पण फारच कमी. मान मोठी भरदार असून खांद्यापाशीं तिची जाडी मनस्वीच असते. व तेथपासून शेपटापर्यंत त्याचा आकार निमुळता होत गेलेला असतो. त्यामुळें, मागील बाजू हुबेहुब माशासारखी दिसते. साऱ्या चामडीवर तुकतुकीत केंस असतात. जणों काय, तेल लावूनच साफ केले आहेत! **सील**चे पाय फार चमत्कारिक असतात. ते पाहून एखादा प्राणीशास्त्रवेत्ता सुद्धां फसेल. कारण, त्यांचा आकार थेट माशांच्या पंखांसारखा असल्यामुळें ते पंखच आहेत असें वाटतें. पण त्यांच्या शेवटास नख्या असतात, ही एक ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. पायांच्या मध्यें गुडघा वगैरे कोणताही सांधा नसतो. ह्मणून पुढील पाय अगदीं चामडीच्या बरोबर असतात, आणि मागील पाय केव्हां केव्हां शेपटासारखे सळ नळ पसरलेले असतात. **सील**चे दांत वाघासारखे आहेत, पण तो आपलें भक्ष्य त्यांनीं कधींही चावीत नाहीं. सबंधच्या सबंध दांतांचा स्पर्श केल्याशिवायच गिळून टाकतो. भक्ष्य फारच मोठा एकदम न गिळण्यासारखा असला, तर नखांनीं त्याचे तुकडे तुकडे करून मग ते गिळतो. त्याचा मेंदू फार मोठा असल्यानें त्याची बुद्धिही तशीच मोठी असते. **सील**मध्यें अनेक जाती आहेत. व त्याप्रमाणें त्यांचे आकारही निरनिराळ्या प्रकारचे असतात. तथापि सामान्यतः **सील**ाची लांबी सहापासून आठ फूट, व घेर सुमारें चार फूट असतो. त्यांच्या जातिभेदाप्रमाणें रंगारूपांतही बराच फरक असतो.

सीलमध्यें एक मोठी प्रचंड व भयंकर जात आहे. तिच्यांतील नराच्या मानेवर आयाळ असतात. ह्मणून दर्यावर्दी लोक त्यांस 'समुद्रांतील सिंह' असें ह्मणतात. हा प्राणी अत्यंत शक्तिमान् असतो. ह्याची लांबी कधीं कधीं ३० फूट, व खांद्याचा घेर १८ फूट भरतो. हा प्राणी अंगानें फार लठ्ठ असल्यामुळें त्यास किंमत फार येते. हे प्राणी **वेहरिंग**च्या बेटांत आढळण्यांत येतात, व **कामश्चाटका**च्या पूर्व किनाऱ्यावर तर हे मनस्वीच असतात. ह्यांच्या अंगांतून मनस्वी तेल नि-

वतें, व त्यावर मोठा व्यापार चालतो. एका समुद्रसिंहाच्या मांसाचेंच फक्त २२९० पौंड वजन असतें.

लहान लहान मासे, हेच ह्या प्राण्याचें मुख्य भक्ष्य असल्यामुळें, ते धरण्याच्या कामांत तो मोठा पटाईत असतो. **हेरिंग** नांवाच्या माशांचे जेथें थव्यांचे थवे राहतात, तेथें **सील** जाऊन त्यांपैकीं हजारोंचा सप्पा उडवितो. **हेरिंग**चा हंगाम संपला ह्मणजे **सील**च्या खाण्याचें जरा मानसिकच होतें. पण तो बुडणारा पटाईत असल्यामुळें, दुसऱ्याही कित्येक माशांस धरतो. तो लहान माशांचा पाठलाग करूं लागला ह्मणजे त्यास, उथळ पाण्यावांचून प्राणरक्षणास दुसरा मार्ग रहात नाहीं. '**मलेट**' ह्मणून एक अतिशय जलद पोंहणारा मासा आहे, त्याची आणि **सील**ची खोल पाण्यामध्यें धांवपळीची मोठीच झटापट चालते; ह्मणजे शशाचा आणि कुत्र्याचाच देखावा दृष्टीस पडतो ह्मटलें तरी चालेल. बराच वेळ घुलाटण्या दाखविल्यावर **मलेट** हा उथळ पाण्याकडे धांव घेतो; त्याच्यामागून **सील**ही जातो. तेव्हां त्या माशाला एका बाजूवर पडून पोंहल्यावांचून गत्यंतर नसतें. तसें केल्यानें मात्र तो अतिशय उथळ पाण्यांत जाऊं शकतो. आणि मग **सील**च्या तडाक्यांतून सुटतो.

कित्येक जातींच्या शब्दोच्चारांत 'पा' आणि 'मा' हीं अक्षरें स्पष्ट निघतात. आणि ते मोठमोठ्यानें ओरडूं लागले ह्मणजे "पापा, पापा, मामा, मामा," असे ध्वनि उमटतात. त्यामुळें इंग्रजीभाषेंत कोणीं "आई आई, बाबा बाबा" असें ह्मटल्याचा भास होतो! तेव्हां मोठी मौज वाटते. सोसाट्याचा वारा, मुसळधार पाऊस, व विजांचा कडकडाट असला ह्मणजे **सील** मोठ्या खुषींत येतात. काय चमत्कार आहे पहा! इतर प्राण्यांना जी गोष्ट भयप्रद, ती यांना ऐषआरामाची वेळा! **सील**च्या पोटामध्यें कधीं कधीं वाळू झरलेली सांपडते. ह्यावरून कित्येक लोकांचें असें मत आहे कीं, एखाद्या माशाचा पाठलाग करावयाच्या वेळीं, आपणास त्वरित बुडतां यावें ह्मणून ते वाळू खात असावेत. ह्या कल्पनेंत कितपत तथ्यांश असेल तो असो. परंतु **सील** हे वाळू खातांना सुद्धां कित्येकांनीं पाहिल्याचें लिहिलें आहे.

उन्हाळ्या दिवसांत बर्फाच्या धोंडीवर बसून वहात जाण्याचा **सील**

फार शोकी आहे. तो स्वभावानें मोठा धीट असतो. समुद्रांतून एखादी बोट जात असली, तर हे प्राणी तिच्या अगदीं नजीक येतात. ह्याचें कारण त्यांना नवें आणि चमत्कारिक ह्मणून जेवढें दिसेल तेवढें आवडतें. ह्यामुळें नवी वस्तु दृष्टीस पडली कीं तींत काय आहे, ती कशी आहे हें जवळ जाऊन पहाण्याचा त्यांचा स्वभावच आहे. **सील**, आपलीं पिलें बहुतकरून दगडांच्या कपारींत ठेवतात, व तेथें त्यांचीं कुटुंबेंच्या कुटुंबें वस्ती करून राहिलेलीं दृष्टीस पडतात. प्रत्येकाच्या मेळ्यामध्यें—किंवा कुटुंबामध्यें ते बरीच जागा सोडीत असल्यामुळें, त्यांचीं कुटुंबें अगदीं निरनिराळीं ओळखतां येतात. शेंपन्नास कुटुंबें मिळून, त्यांचा एक गांव वसलेला असतो ह्मटलें तरी चालेल.

सीलच्या अंगांत आणखी एक अद्भुत गुण आहे. तो हा कीं, त्याच्या कृतीकडे जर बारकाईनें नजर पोंचविली, तर पुढें हवेमध्यें काय काय फेरफार होणार तें कळतें. ह्मणजे **सील** हें एक जिवंत वायुमापकयंत्रच आहे ह्मटलें तरी शोभेल. वयांत आलेला **सील**, किनाऱ्यावर लोळण घेत असला ह्मणजे थोड्याच तासांत जोराचा वारा व पाऊस येऊन मोठें तुफान होईल ह्मणून समजावें.

आर्तिकसमुद्र, **ग्रीनलंड**, **ब्रिटन**चा उत्तरकिनारा, हें **सील**चें मुख्य वसतिस्थान होय. तेथें थंडी मनस्वी असून समुद्राचें पाणी थिजल्याकारणानें त्यावर बर्फाचे ढेपच्या ढेप तरंगत असतात. त्यावर विहार करणें, ही **सील**ची नित्यकृत्याची गोष्ट होय. **ग्रीनलंड**मध्यें धान्य, फळफळावळ, कांहींच उत्पन्न होत नाहीं. ह्यामुळें '**इक्किमाक्स**' नांवाचे जे तद्देशीय लोक, त्यांचें पीक, उत्पन्न, भक्ष्य, संपत्ति सर्व कायतें एक **सील** ! **सील** हें त्यांचें आवडतें व पुरवठ्याचें अन्न होय. ह्याचें मांस त्यांना फारच प्रिय असतें. त्याचें ताजें रक्त, चहाकाफीप्रमाणें मोठ्या भक्तिभावानें ते पितात. त्यापासून निघणारें तेल, त्यांच्या दिव्यास उपयोगी पडतें. शिवाय, तेलावर मोठा व्यापारही चालतो. **सील**ाच्या अंगांत मनस्वी तेल असतें. हें वर सांगितलें आहेच. एका **सील**ापासून सुमारें अर्धं पीप तेल निघतें. व प्रत्येक पिपाची किंमत अदमासें ८० **फ्रांक** येते. **अमेरिकें**त व **युरोपां**त ह्या तेलाचा फार खप होतो. चामड्याचा उपयोगही तसाच. तंबूच्या कनाती, आच्छादनें, आंगरखे, बिछाने, बो-

टींचीं छपरें, वाद्यां, इत्यादि सर्व पदार्थ तेथील लोक **सील**च्या चामड्याचेच करतात. **अमेरिकन** लोक **सील**च्या चामड्याचे फुगे करून त्यांत वारा भरून त्यांच्या सांगडी करतात. आणि त्यांच्या साह्यानें मोठमोठ्या नद्या उतरून जातात, किंवा मासे धरण्याकरितां, यथेच्छ जलविहार करतात. चरबी, मांस, हाडें, लोंकर इत्यादि सर्वांचा तद्देशीयांस मोठा उपयोग होतो. इतरांसही होत नाहीं असें नाहीं. त्यांचीं कातडीं, लोंकर, व तेल हेही व्यापारांतील महत्त्वाचे जिन्नस आहेत.

'इक्किमाक्स' लोकांची सारी मदार **सील**वरच असल्यामुळें, त्यांची पारध करणें, हाच त्यांचा मुख्य धंदा असतो. भयाचें कांहीं चिन्ह दिसत नसलें ह्मणजे, **सील** हे किनाऱ्यावर किंवा बर्फाच्या धोंडीवर येऊन खुशाल झोंप घेत असतात. ती संधि साधून **इक्किमाक्स** लोक, एकदम त्यांच्यावर हल्ला करितात. हातांतील सोटे जोरानें त्यांच्या नाकावर मारून त्यांचीं नाकें ठेंचतात, किंवा कुऱ्हाडीचे घावांवर घाव घालून त्यांचे तुकडे तुकडे करून सोडतात. **सील** हे मोठे धैर्यवान् प्राणी आहेत. त्यांच्या अंगावर सहज जरी कोणी दगड मारला, तरी ते चवताळून त्याच्या अंगावर तुटून पडतात. लोक थोडे असून आटोक्यांत असले ह्मणजे मग तर हे त्यांची अगदीं दाणादाण करून सोडतात. परंतु शिकारीलोकांचा जमाव मोठा असला ह्मणजे त्यांचा उपाय चालत नाहीं. त्यांची जखम साधारण असली, तर ते झपाट्यानें समुद्राकडे धांवत सुटतात. व पायांनीं समुद्रकांठचे खडे व चिखल जोरानें शिकारीलोकांच्या अंगावर फेंकतात. त्यांचा मार इतका भयंकर व दुःसह असतो कीं, शिकारीलोकांपैकींही कित्येक लोक, कधीं कधीं जायबंदी होतात. शिकारीलोकांचा हल्ला सुरू झाला ह्मणजे, **सील** हे मोठमोठ्यानें आरडूं लागतात. व तो त्यांचा शब्द फारच दीनवाणा व करुणोत्पादक असतो.

इक्किमाक्सलोकांची **सील**ची शिकार करण्याची दुसरी एक पद्धत आहे, ती फार चमत्कारिक आहे. हें वर्णन वाचतांना, ही एक गोष्ट लक्ष्यांत ठेविली पाहिजे कीं, त्या देशांतील किनाऱ्यावर समुद्राचें पाणी दृष्टीस पडत नाहीं. तर, समुद्राच्या सपाटीवर तीन तीन फूट चार चार फूट उंचीचा बर्फाचा जाड थर होऊन राहिलेला असतो. त्यावरून लोक, जमिनीवरून चाल-

त्याप्रमाणें खुशाल जातयेत असतात. (बर्फ हें पाण्यापेक्षां हलकें असल्यामुळें पाण्यावर तरंगतें, हा अनुभव पुष्कळांनीं घेतलेला असेलच.) त्या बर्फाच्या थराला कोठें तरी मध्येंच एक खळगा पाडून तें भोंक आरपार पाण्यास पोंचवितात. असें केलें ह्मणजे त्यांतून प्रकाशाचे किरण पाण्यांत जाऊन, तें चकचकीत काय आहे तें पाहण्याविषयीं **सील**चें मन उत्सुक होतें. आणि तो धांवत येऊन त्या बर्फातील भोंकांतून तोंड वर काढतो. तेथें एक दोन पारधी भाले हातांत घेऊन वाट पहात बसलेलेच असतात, ते चटकर त्याच्या शरीरांत भाला खुपसून जोरानें त्यास वर घेतात. ह्याप्रमाणें प्रत्येकाचा नित्य क्रम चालू असतो.

सील प्राणी इतका क्रूर व भयंकर आहे तरी तो, लहानपणापासून बाळगला, तर अगदीं कुत्र्यामांजराप्रमाणें माणसाळतो, येवढेंच नव्हे, तर मनुष्यावर तो मनस्वीच प्रेम करतो. ह्याची बुद्धि फार नावाजण्यासारखी असते. ह्याला एकदां माणसांचा लळा लागला ह्मणजे तो अगदीं त्याच्या मागून हिंडतो, खेळतो, अंगाला अंग घांसतो, मजामजा करतो. ह्याला '**समुद्रश्वान**' असें नांव दिलें तर खासें शोभेल. कारण, तो कुत्र्याप्रमाणेंच विश्वासूही असतो. शंभर मनुष्यांतून हा आपल्या धन्याचा स्वर ओळखून काढतो. **सील**ाचें लहान पिलूं तर फारच आज्ञाधारक असतें. **एडमन्स्टन** ह्या नांवाच्या एका थोर गृहस्थानें एक **सील** पाळला होता. तो मनुष्याबरोबर किंवा कुत्र्याबरोबर सुद्धां शेकोटीपाशीं जाऊन शेकत बसत असे. समुद्रांत जाऊन स्नान करून पुन्हा परत येई. हा **सील**, वर सांगितलेली जी '**समुद्रासिंहा**'ची जात, त्या जातीचा, ह्मणजे मोठा प्रचंड व भयंकर होता. तरी तो मनुष्यास पाठीवर बसूं देई. व लहान मुलें सुद्धां त्याच्या जबड्यांत हात घालीत!

दुसऱ्या एका पाळलेल्या **सील**ाची गोष्ट, फारच चित्तवेधक व करुणास्पद आहे. एका समुद्रकिनाऱ्यावर राहणाऱ्या **ऐरिश** शेतकऱ्यानें लहानपणापासून एक **सील** पाळला होता. तो घरांतील सर्व माणसांचा लाडका असून स्वभावानें फारच गरीब असे. तो मुलांबरोबर खेळे; चाकरमाणसांत मिळून मिसळून असे; व घरांतील माणसांशीं सलगी करी. उन्हाळ्यांत दारापुढें उन्ह घेत पडे, व हिंवाळ्यांत शेगडीपाशीं जाऊन

शेकत बसे. थोडीं वर्षे गेल्यावर अकस्मात् एक भयंकर सांत उद्भवून शेतकऱ्याचीं एकामागून एक गुरें मरूं लागलीं. त्या शेतकऱ्याच्या शेजारींच, एक वृद्ध कपि रहात होते. त्यांनीं त्या शेतकऱ्याच्या मनांत असें भरवून दिलें कीं, तूं हें हिडिस् जनावर—ह्मणजे **सील** घरांत बाळगल्यामुळें, हा अनर्थापात झाला. हें जनावर मोठें द्वाड—अपशकुनी—आहे. ह्याकरितां त्याला तूं आधीं ठार मारून टाक. परंतु त्या जन्मापासून पाळलेल्या निरुपद्रवी प्राण्यास मारण्याचें त्या शेतकऱ्यास धैर्य होईना. तरी, मनाचा व जनाचा संशय निघून जावा, ह्मणून त्यानें एक बोट घेतली, आणि तींत त्यास '**क्रेअर**'बेटाच्या अगदीं पलीकडे नेऊन समुद्रांत फेंकून दिलें. पण सांगावयाचा चमत्कार हा कीं, दुसऱ्या दिवशीं सकाळीं पहातात तों स्वयंपाकघरांतील चुलीपाशीं **सील** हा खुशाल झोंप घेत पडला आहे! ह्मणजे ही स्वारी एका दिवसांत समुद्रांतून पोंहत येऊन, जमिनीवरून मजल मारून रात्रीच्यारात्रीं स्वयंपाकघराच्या खिडकींतून आंत शिरून, आपल्या रोजच्या ठिकाणावर विश्रांति घेण्यास पोंचली!

गुरें मरण्याचा सपाटा चालूच होता. व त्या थेरड्या शेजाऱ्याचें, त्या गरीब प्राण्याचा जीव घेण्याबद्दल, त्या शेतकऱ्याजवळ टुमणें सुरूच होतें. ह्मणून पुन्हा त्या शेतकऱ्यानें त्यास पहिल्यापेक्षांही कित्येक मैल दूर नेऊन सोडलें. सायंकाळीं स्वयंपाकीण चूल पेटवूं लागली तों, बाहेरच्या दाराशीं मोठ्यानें कोणी उकरतें आहे, असा भास झाला. ह्मणून दार उघडलें, तों हे **सील**बुवा आंत घुसलेच. त्यावेळीं त्यानें असा कांहीं चमत्कारिक शब्द केला कीं, जणों काय आपल्या मात्यापित्याचें व अन्नदात्याचें घर सांपडल्याबद्दल आनंदच मानीत आहे! तो त्या दीर्घ प्रवासाच्या श्रमानें थकला असल्यामुळें, हिकडे तिकडे न पाहतां, चुलीच्या उबेस जाऊन उजाडेपर्यंत स्वस्थ निजला.

दुसऱ्या दिवशीं ह्माताऱ्याची आणि शेतकऱ्याची पुन्हा गांठ पडली. तेव्हां तो त्या शेतकऱ्यास, **सीला**ला ठार मारून टाकण्याविषयीं फारच आग्रह करूं लागला. पण जीव घेण्याची गोष्ट काढली कीं, त्या शेतकऱ्याच्या अंगावर कांटा उभा राही. तेव्हां त्या ह्माताऱ्यानें त्यास एक युक्ति सांगितली. तो ह्मणाला 'तुह्मांस त्याचा जीव घेणें होत नाहीं

तर नाहीं, आतां एक तरी करा. त्याचे डोळे काढून तरी त्यास समुद्रांत फेंका. नाहींतर तुमच्या मागची ही ब्याद टळण्याला कांहीं दुसरा मार्ग नाहीं.' हा मंत्रोपदेश त्या भोळ्या शेतकऱ्याच्या मनांत बराच ठसला. आणि त्यानें त्या बिचाऱ्या **सीला**चे दोन्ही डोळे काढून त्यास अतिशय दूर नेऊन समुद्रांत टाकून दिलें. आठ अहोरात्री त्या **सीला**नें **अटलांटिक** महासागरांत काढल्यानंतर एके दिवशीं रात्रीं मोठें तुफान झालें. रात्रभर वारा आणि पाऊस काय मी मी ह्मणत होता. शेतकऱ्याच्या घरचीं सर्व माणसें घट्ट दार लावून घरांत बसलीं होतीं. पण मधून मधून दाराला कोणी हलकेच धक्के देत आहे, व रडण्यासारखा सूर काढीत आहे असें वाटे. परंतु रात्रीचें कोणी उठलें नाहीं. सकाळीं दार उघडून पाहतात तों, उंबऱ्यांतच आपला नेहमींचा बाळगलेला **सील** मरून पडला आहे! काय ज्ञान? किती ओढा? आणि केवढें मनुष्यप्रेम! जन्मापासून मुलाप्रमाणें संगोपन केलेल्या त्या **सी-लाचें** अकस्मात् दारापाशीं प्रेत पाहून काय वाटलें असेल? केलेल्या क्रूरपणाबद्दल त्यास किती पश्चात्ताप झाला असेल? व किती मन खात राहिलें असेल बरें? ह्याचा विचार आह्मी आमच्या वाचकांवरच सोंपवून ह्या लेखाची समाप्ति करितों.

श्रीशिवछत्रपति

जयंती.

गा जी गाजी प्रेमें आजी राय **शिवाजी** छत्रपति ।
यवनकरींना हरीसारखा जर्जर करि जो शीघ्रगति ॥ ध्रु० ॥
त्रस्त करीती आर्यजनांना मस्त यवन ते घडी घडी ।
नानापरिचे विभू रचोनी प्रभू जाहला शूर गडी ॥
वसे वेरुळीं अजा जयाचा पाटिलवृत्तिच असे घरीं ।
मालोजी तो साल्स मोठा घरीं जयाची रीत बरी ॥
परोपकारी हुषार भारी चतुर भाषणीं असे पुरा ।
राजकारणी महाधोरणी देवभक्तही खराखुरा ॥

नाम **भोंसले** कुलास ज्याच्या मुलावांचुनी मनीं झुरे ।
पुत्र **शहाजी** भला निपजला फळासि आलें **दैव** खरें ॥
भाल मुलाचें विशाल शोभे लाल कमलसे गाल पहा ।
बाल पाहुनी नृपाल चित्तीं कां न गमावें धन्य अहा ॥
कांति पाहुनी भ्रांति पडे कीं देव असे कीं यक्ष असे ।
चित्र रेखिलें विचित्र विधिनें सौंदर्याच्या सर्वरसें ॥
शिमग्यामाजी उत्सव मोठा हर्षें **जाधवराव** करी ।
आप्त ह्मणोनी प्राप्त जाहले **मालोजी**ही तया घरीं ॥
शाहाजीला सवें घेतला बालभानुसा जना दिसे ।
सुंदरवसनें अलंकारही घालुनि ताताजवळ बसे ॥
जाधवरावें अपुली कन्या सहज पहाया आणविली ।
रूपगुणें अनुरूप पाहुनी सर्व सभेला मानवली ॥
हात धरोनी तात पुसे हा पती हवा का सांग बरें ।
तोंच टाकिती गुलालरंगा अंगावर तीं परस्परें ॥
कौतुक झालें सकल जनांना भाकित पुढचें काय कळे ।
थोडा ऐसा जोडा ह्मणती पहावयाला जगीं मिळे ॥
बालांची ती लीला पाहुनि **मालोजी**ही उठे ह्मणे ।
झालों व्याही शंका नाहीं ऐका सारे नीटपणें ॥
लग्न होउनी मग्न जहालीं सुखांत दोघें पहा पुढें ।
'**जिजाइ**' ऐसें नाम ठेविलें सौख्यशशीला कला चढे ॥
सद्गुणखाणी अनुपमवाणी अंगीं पाणी दिसे महा ।
रहा पाहुनी **शहाजी**सही पदरीं ठेवी **बादशहा** ॥
साजे ऐशी राजे पदवी आनंदानें दिली तया ।
तोडे घोडे सैन्य देउनी दैन्य पाठवी सकल लया ॥
नांव करोनी गांव मिळविले इनाम ज्यानें पुणें सुपें ।
दुष्ट लोक ते रुष्ट जाहले वैभव नेत्रांमाजि खुपे ॥

गूढ कशाचें तयांत सांगा नाहिंत कोठें मूढमतीं ।
गा जी गाजी प्रेमें आजी राय **शिवाजी छत्रपति** ॥ १॥

जिजाबाइ तों **शिवनेरी**च्या किल्ल्यामाजीं वसे सदा ।
जागृत देवी **शिवाइ** सेवी प्रेमें वंदुनि नित्य पदा ॥
पोटीं व्हावा पुत्र ह्मणोनी देविस केला नवस जिनें ।
'माते त्यातें नांव तुझें गे ठेविन मोठ्या आवडिनें' ॥

गर्भवती तों सती जाहली पती हेतुही पूर्ण करी ।
गर्भतेज तें करी चढोनी **कौशल्ये**ची बरोबरी ॥
देशमुक्तता करावयाला **महेश** घेई जन्म जगीं ।
व्यसनीं प्रगटे **विश्वपाल** ही चाल चालते युगायुगीं ॥

नवमासांनीं पुत्र जाहला मंगलवार्ता जनां कळे ।
आर्यजनांच्या कार्यतरूला दिसूं लागलीं पक्वफळें ॥
गुढ्या तोरणें साजति नगरीं वाजति वाद्यें एकसरें ।
आनंदानें तोफा सुटती नादानें त्या गगन भरे ॥

कुलदीपक तो सर्वव्यापक धर्मस्थापक अवतरला ।
गोविप्रांना वाटे सुरतरु फांटे फुटुनी भरभरला ॥
ग्रहगण झाला अनुकुल खासा समय पाहुनी भराभरा ।
हलका होइल भार ह्मणोनी तोष पावली फार धरा ॥

गजावरोनी प्रजाजनांना वांटिति साखर घरोघरीं ।
आनंदाचें पर्व वाटलें सर्व जनांना परोपरी ॥
सन सोळाशें सत्ताविस हें साल साधुनी मातृकुशी ।
धन्य करोनी उदय पावला भूतदयेचा पूर्ण शशी ॥

सुवर्ण गायी दान दीधल्या मान करोनी विप्रजनां ।
इष्ट देउनी शिष्टजनांना तुष्ट राखिलें सकलमनां ॥
गडीमाणसां कडीं सुवर्णी कोणां कोणां होन दिले ।
कृत्य करोनी उदार ऐसें भृत्यजनांना तोषविलें ॥

मंगलदायक नाम 'शिवाजी' ठेविति हर्षें यथाविधी ।
मुद्रा भासे रुद्रासम परि होइल वाटे कृपानिधी ॥
नक्षत्रासम डोळे काळे शुकासारखें नाक वरी ।
आजानुबाहू मूर्ति मनोहर राजलक्षणें परोपरी ॥
जडित कुंडलें डुलती कानीं पिंपळपानीं सर्व हिरे ।
बालभूषणें अंगीं अंगी घालुनि रंगीं बाळ फिरे ॥
बोल बोबडे मोल न ज्याला सुधेपरिसही अग्रगणी ।
धन्य धन्य तीं मातापितरें कोण तयाचें पुण्य गणी ॥
आनंदाचा पूर लोटला "केरळकोकिळ" वर्णि किती ।
गा जी गाजी प्रेमें आजी राय शिवाजी छत्रपति ।
यवनकरींना हरीसारखा जर्जर करि जो शीघ्रगति ॥ २ ॥

पनवेल येथील

आर्यौषधींचा कारखाना.

भ्रांता वेदांतिनः किं पठथ शठतयाद्यापि चाद्वैतविद्यां
पृथ्वीतत्त्वे लुठंतो विमृशथ सततं कर्कशास्तार्किकाः किं ।
वेदैर्नानागमैः किं गलपथय हृदयं श्रोत्रियाः श्रोत्रशूलै-
र्वैद्यं सर्वानवद्यं विचिनुत शरणं प्राणसंप्रीणनाय ॥ १ ॥*

वरच्या श्लोकांत अलंकाराच्या पूर्ततेसाठीं इतर शास्त्रांना गौणता येत असली तरी, त्यांत वैद्यशास्त्राची उपयुक्तता आणि वैद्याचें महत्त्व उत्तम प्रकारें ध्वनित केलें आहे ह्यांत शंका नाहीं. कोणताही काल व स्थिति अशी नाहीं, कीं जींत औषधांची व वैद्यांची गरज नाहीं. राजा स्वदेशी

१ हे वेदांत्यांनो ! तुह्मी खुळे आहांत. लोकांना ठकवण्याची अद्वैतविद्या कशाला शिकतां ? हे कर्कश शब्दांच्या तर्कशास्त्र्यांनो ! तुह्मी स्वतः मृन्मयतत्त्वांत लोळून रात्रंदिवस विचार हो कसला करतां ? लोकांचे कानटाळे बसविणाऱ्या वैदिकांनो ! नानाशाखायुक्त वेद घोकून छातींतून रक्त कां पाडून घेतां ? सर्वांहून निष्कलंक असा जो वैद्य, त्याला शरण जाऊन प्राणसंरक्षणाची तजवीज आधीं पहा.

असो, कीं परदेशी असो; वय लहान असो, कीं मोठें असो; जातीनें स्त्री असो कीं पुरुष असो; वैद्य आणि औषध हीं पाहिजेतच.

प्रस्तुत विषयाला हात घालण्यापूर्वी, आपल्या आयुर्वेदाच्या इतिहासाविषयीं थोडक्यांत विचार करूं. आयुर्वेद हा ऋग्वेदाचाच पोटभाग आहे. हा कोणकोणांपासून कोणीं घेतला, ह्याविषयीं येणेंप्रमाणें उल्लेख केलेला आहेः—

ब्रह्मा स्मृत्वाऽऽयुषो वेदं प्रजापतिमजिग्रहत् ।
सोऽश्विनौ तौऽसहस्राक्षं सोत्रिपुत्रादिकान्मुनीन् ॥ २ ॥

भावप्रकाशः—

ह्या वेदाची मूळकल्पना **ब्रह्मदेवां**नीं काढली. त्यांच्यापासून **प्रजापतीं**नें घेतली. **प्रजापतीं**पासून **अश्विनीकुमारां**नीं, त्यांच्यापासून **इंद्रा**नें, आणि **इंद्रा**पासून **अत्रिपुत्रा**दिक ऋषींनीं घेतली. त्यानंतर **भरद्वाज** व **चरक**. सांप्रतकालीं जितके प्राचीन वैद्यकग्रंथ ह्मणून आहेत ते सर्व चरकसंहितेपासूनच निघालेले. प्राचीनकालीं कोणत्याही विद्येचा अभ्यास करणें फार कठीण पडे. आतांप्रमाणें 'कॉलेजें' व 'स्कालर्शिपा' नव्हत्या. त्यावेळीं गुरुगृहवास पतकरून जन्मच्या जन्म घालवावा लागे. भिक्षावृत्ति पतकरून निर्वाह करावा, आणि गुरूची सेवा करीत रहावें. ह्मणजे कालांतरानें प्रसन्नता झाली तर झाली. गुरुगृहवास किती कठीण असतो, ह्याची कल्पना पाहिजे असेल तर आदिपर्वातील उपमन्यूच्या कथेकडे लक्ष्य पुरवावें ह्मणजे झालें. तसेंच त्याकालीं मुद्रणकलेची वगैरे सोय नव्हती, ह्यामुळें बहुतेक जन्म पाठांतरांतच घालवावा लागे. एक एक ग्रंथाची प्रत मिळविणें ह्मणजे एक एक वाडा बांधणें, किंवा इनामजमीन संपादन करणें इतकें कठीण होतें. शंभर शंभर पुतळ्या किंवा मोहराही एकएका ग्रंथाबद्दल द्याव्या लागत. कोठें कोठें शंभर गाई, शंभर बैलही दिल्याचे दाखले आढळतात. असो. चरकापासून पुढें सर्व वैद्यकाचें सार ह्मणून थोडक्यांत काढूं लागले. जसेंः— वाग्भट. परंतु त्यासमर्थीसुद्धां ग्रंथ तोंडपाठ करण्याची चाल होती. ग्रंथ सूत्ररूपानें असला ह्मणजे पाठ करण्यास सुलभ व ग्रंथाचाही विस्तार नाहीं ह्मणून जें काय लिहिणें तें सूत्ररूपानें लिहिण्याची चाल होती.

त्यामुळें त्यांत कठीणपणा राहून गुरुमुखाशिवाय त्याचा उलगडा होत नसे. पुढें पुढें ही विद्यासुद्धां अस्तास जाण्याचा समय आला होता. कारण, पुढें लौकरच ह्या देशाचें नष्टचर्य ओढवलें, आणि महंमदासारख्या मुसलमानांची टोळधाड, ह्या आर्यभूमीवर पडून सारी धुमाकूळ माजली. मग प्राचीन विद्येकडे पहाणार कोण? एका हातांत कुराण, व एका हातांत तरवार असा प्रसंग येऊन बेतल्यामुळें तर, प्राण वांचवितां वांचवितांच लोकांस पुरे झालें. पण तसल्या बिकट प्रसंगांतूनही आमच्या प्राचीन विद्या इतपत राहिल्या हीसुद्धां कांहीं कमी नशीबाची गोष्ट नाहीं. परंतु संकटावस्थेंतही कांहींनाकांहीं आश्रय मिळतो, असा ईश्वरी नियम आहे. महापुरांत वाहत असलेल्या मनुष्यास एखादें लांकूड तरी सांपडतें; अफाट दर्यांत गटकळ्या खात असलेल्या मनुष्यास एखादें बेट तरी लागतें. त्याप्रमाणें यवनसमुद्रांतही आमच्या आर्यलोकांस **अकबर बादशाहा** हें सुखाचें बेट सांपडलें. तेथें बरेंच विश्रांतिसुख भोगावयास मिळालें. तो जसा आरबीभाषेचा अभिमानी होता, तसाच संस्कृतभाषेचाही होता. त्याचें स्वज्ञातिबांधवांवर जसें प्रेम असे, तसेंच इतर कोणत्याही जातीवर असे. त्यामुळें संस्कृतविद्यांना पुन्हा पुनर्जीवन प्राप्त झालें. द्राक्षें, खजूर, खारका, इत्यादि परदेशांतील जिन्नस आह्मांस माहित होते खरे. पण त्यांपासून होणाऱ्या औषधांची माहिती नव्हती; ती होऊन इसफगोल, गुलाबकळी, खुरासणी ओवा, इत्यादि जास्त औषधांची आमच्या वैद्यकांत भर पडली.

पुढें लौकरच **श्रीशिवाजीमहाराजांचा** उदय झाला, त्यामुळें महाराष्ट्रांतील प्रत्येक कुटुंबास ऊर्जितावस्था प्राप्त झाली तरी पण राष्ट्राची शांतता पूर्ण अंशावर चढली नव्हती ह्मणून स्वतंत्र वैद्यकशाळा अशा कोठेंच नव्हत्या ह्मणण्यास हरकत नाहीं. प्रत्येक श्रीमंताच्या पदरीं नामांकित वैद्य मात्र असे. व त्यांच्याजवळ १।२ शिष्यही असत. शेवटच्या **बाजीरावा**पाशीं, **वामनराव** ह्या नांवाचे कोणी प्रख्यात वैद्य होते. पुढें पेशवाईचा अंत झाला, त्यावेळीं ब्राह्मणांच्या सालोसालच्या ठरलेल्या दक्षिणा **एलफिन्स्टन** साहेबांनीं दयाळू होऊन कायम ठेवल्या. पुढें दक्षिणेची परीक्षा बंद करून पाठशाळेची स्थापना झाली. तींत गुणांशानें प्रत्येक विद्यार्थ्यास पांच रुपयांपासून सात रुपयांपर्यंत

स्कालरशिप मिळत असे. वेदाकडे व शास्त्राकडे मिळून एकंदर १९०० रुपये दरमहा खर्च होत असत. ह्यावेळीं एकंदर दहा शाळा होत्या. पैकीं ऋग्वेद, यजुर्वेद, आपस्तंब, व वेदांत ह्या चार विषयांच्या शाळा बंद करण्यांत आल्या. शास्त्रांच्या शाळा विश्रामबागेंत असत. त्या सहा मात्र शिल्लक राहिल्या. त्यांतः—

व्याकरणाचे विद्यार्थी	२०	अलंकार	१६
वैद्यक	१६	धर्मशास्त्र	१६
न्याय	१६	ज्योतिषशास्त्र....	१६
	९२		४८

ह्याप्रमाणें पगारी विद्यार्थी शंभर, व फीशिवायही अनेक विद्यार्थी घेतले जात. पुढें कांहीं मुदतीनें विद्यार्थ्यांचे पगार कमी (३॥ पासून ९ पर्यंत) करण्यांत आले. पुढें पाहिजे त्या जातीच्या विद्यार्थ्याला शिकविलें पाहिजे असा नियम झाला. व अखेरीस डेक्कन कॉलेजाची स्थापना होऊन पाठशाळा ह्यांतच अंतर्भूत होऊन प्राचीन शास्त्रें आश्रयरहित पडलीं!

ह्या कालीं पुण्यामध्यें पाठशाळेशिवाय, इतर रीतीनें गुरूजवळ अध्ययन करून प्रत्येक विद्येमध्यें अनेक लोक तयार झाले, व त्यांनीं आपआपल्या कामांत उत्तम लौकिक संपादन केला. प्रसिद्ध भिषग्वर्य **बापूसाहेब मेहंदळे, बंडू नाना रानडे** वगैरे विद्वद्रत्नें तयार झालीं तीं याच कालांत. ह्यांच्यापैकीं कोणीही पाठशाळेंत शिकलेला नव्हता. अशा प्रकारचे वैद्य तयार झाले खरे, पण औषधीगुणांत वगैरे नवीन शोध किंवा सुधारणा कांहींच झाली नाहीं. कारण, औषधी तयार करण्याची सर्व खटपट प्रत्येक वैद्यालाच करावी लागे. त्यामुळें एकावरच सारा भार पडे, आणि त्यांपैकीं थोड्यांसच जय येई. ह्मणजे विद्वानांनीं परिश्रम करून साध्य केलेली विद्या एक, आणि उदरभरणाची व्यवस्था सारी दुसऱ्याच विद्येवर, असा प्रकार झाला.

वे०शा०सं० **श्रीधर शास्त्री पाटणकर** ह्यांनीं वैद्यशास्त्र व अलंकारशास्त्र पढून, या विद्येव्यतिरिक्त अन्य विद्यांच्या शिक्षणावर आपला निर्वाह केला. व आतां पेनशनाचा उपभोग घेत आहेत. **काशि-**

नाथ ऊर्फ तात्या शास्त्री थोरात पाठशाळेंत वैद्यक पढून पनवेलीस मराठी शाळेवर हेडमास्तर झाले. तेथें त्यांस वीस रुपये पगार मिळून शिवाय वैद्यक्रियेवर त्यांनीं चांगलाच लौकिक संपादन केला. तसेंच वे०शा०सं० **सखाराम शास्त्री** नावलेकर हल्लीं वस्ती पनवेल, **नृसिंह शास्त्री शेज्वलकर** हल्लीं वस्ती पुणें (हे गृहस्थ तेथें असणाऱ्या 'वेदशास्त्रोत्तेजक' शाळेंतील व्याकरणशास्त्राचे परीक्षक असतात) ह्या उभयतांनीं व्याकरणशास्त्राचें अध्ययन करून वैद्यकीवर निर्वाह चालविला आहे ! ह्याप्रकारें बुद्धि, श्रम, व उदरनिर्वाहाचें साधन, हीं एका रेषेंत न आल्यामुळें, त्यांची व्हावी तशी चीज झाली नाहीं. आतां विद्वान् ह्मणून त्यांचा लौकिक होणें साहजिकच आहे. पण वर सांगितलेली त्रयी नीट जुळती, तर ह्याहून किती तरी पट अधिक लौकिक झाला असता.

प्रस्तुतचे आमचे राज्यकर्ते परकी आहेत, तरी त्यांनीं ह्या आमच्या परक्या देशांत जीं परोपकाराचीं व औदार्याचीं कृत्यें केलीं आहेत, त्यांत औषधांची व इंग्रजी वैद्यांची सुलभता हें एक महत्कृत्य होय. शहरांतील गल्लोगल्लींनीं शिकलेले एल्. एम्. अँड् एस्. डाक्तर, व खेड्यापाड्यांतून गोरगरीबांस सुद्धां मुफत औषध; असें करून टाकलें आहे, मग तें कितीही मूल्यवान् असो. अशी सोय पूर्वीच्या कोणत्याही राजाच्या कारकीर्दींत असल्याचें आढळून येत नाहीं.

असें आहे तरी, ह्या नव्या थाटमाटास भुलून आमच्या देशांत उत्पन्न होणाऱ्या **दिव्यौषधींचा** व **प्राचीन आर्यवैद्यकाचा** आह्मीं सत्यनाश करतां कामा नये; ही गोष्ट पूर्णपणें लक्ष्यांत वागविली पाहिजे. पाश्चात्य देशांतून येणाऱ्या सुंदर सुंदर आकारांच्या बाटल्या; त्यांचीं तीं गुलजार आणि चित्रविचित्र बुचें; रंगीबेरंगी अक्षरें व चिठ्या; त्यांचीं तीं सुबक बिंदुमापनाचीं व द्रवमापनाचीं काचपात्रें; त्यांचीं तीं पांढरीं शुभ्र व लोण्यासारखीं सत्त्वें; हीं पाहून आपल्या त्या सराट्यांचा व रिंगणीमूळांचा अगदीं तिटकारा येतो. त्यांच्या त्या झळझळीत मद्यार्कापुढें आमचा काढानिकाढा केवळ शेणखल्यासारखा भासूं लागतो. व त्याप्रमाणें आमचीं पूर्वापार चालत आलेलीं औषधें नवीं करावयाचीं एका बाजूस ठेवून करण्याच्या व घेण्याच्या पद्धतीसुद्धां विसरत चाललों आहोंत. ही निखालस चुकी आहे. ज्ञानेश्वर महाराजांनीं ह्मटलें आहेः—

"तरी लोकांची धवळारें । देखोनियां मनोहरें । असती आपुलीं तृणारें । मोडावीं केवीं ॥" लोकांचे मनोहर चुनेगच्ची वाडे पाहून आपल्या असलेल्या गवताच्या झोंपड्या का उसकटून टाकावयाच्या ? हाच न्याय येथें लागू आहे. प्रोफेसर **सिली** ह्मणतातः— **"आपण विद्यमान गोष्टी सुस्थितीस आणाव्या. परंतु त्यांचा नाश करूं नये."** वरील उक्ति आमच्या साधूची आहे, आणि खालची उक्ति पाश्चात्य विद्वानाची आहे. मिळून दोन्हीही आमच्या हृत्पटलावर खोदून ठेवण्यासारख्या आहेत. ह्याच प्रकारचे उद्गार पुण्यास गायनसमाजोत्सवप्रसंगीं गव्हर्नरसाहेबांचे निघाले होते.

प्रस्तुत आह्मी फार आळशी आणि परावलंबी झालों आहोंत. प्रत्येक वस्तु परदेशांतून आलेली घेण्याची आह्मांस संवय लागली आहे. आह्मांस यःकश्चित् सार्धे, घरांत मिळण्यासारखें औषध असलें, तरीसुद्धां तें बाजारांतील बाटलींतलें आयतें घेण्याची संवय लागली आहे. उदाहरणार्थ, एरंडेल तेलच कां ध्याना ? हें आह्मांला, आमच्या मुलांबाळांना रेचक घेण्यासाठीं आठचार दिवसांनीं बहुधा लागतेंच. आतां खरें पाहिलें तर एरंड्यांचा आमचे हिकडे सवंग सुकाळ आहे. येवढेंच नव्हे, पण त्या लाखोखंडी आमच्या देशांतून परदेशांत जातात. आमच्या खेड्यापाड्यांतून त्यांना दमडीसुद्धां पडावयाची नाहीं. त्यांचें तेल काढणें, ह्मणजे मोठी यांत्रिकविद्या आहे, अशांतलाही प्रकार नाहीं. पण आमचे लोक यूरोपांतून लेबल लावून आलेल्या बाटलीला पांच आणे देतील ! त्याशिवाय त्यांस चैन पडावयाचें नाहीं. ही संवय चांगली नाहीं येवढेंच नव्हे, तर मोठी अपायकारक आहे. पुढें मागें असें होईल कीं, एरंडेल तेल हा शब्द अजिबात नाहींसा होऊन त्याच्या ऐवजीं 'क्यास्टर ऑईल' हा शब्द प्रचारांत येईल. आणि तो माल यूरोपांतून आला नाहीं तर तो पदार्थ काय होता तें न समजून आमच्यांतलें एक औषधच नाहींसें होऊन जाईल!

ही प्रत्येक औषधाच्या—ह्मणा किंवा जिनसाच्या ह्मणा—बाबतींत दुसऱ्याच्या तोंडानें पाणी पिण्याची संवय इष्ट नाहीं. आजरोजीं आठवड्याच्या आठवड्याला आह्मांस डांक येऊन पोंचल्यामुळें, यूरोपखंड जरी परसांतली भाजी होऊन राहिलें आहे, तरी तें साता समुद्रांपलीकडे आहे ही गोष्ट विसरतां कामा नये. आईमध्यें आणि दाई किंवा आपली कुलस्त्री आणि

पण्यागना यांमध्यें जितकें अंतर, तितकेंच स्वकीय आणि परकीय ह्यांचेमध्यें अंतर आहे. दाईनें कितीही ममता केली तरी तिला आईपण यावयाचें नाहीं; तसें परकीयांनीं आह्मांविषयीं कितीही कळकळ वाहिली तरी त्यांत आपलेपणा यावयाचा नाहीं. व इतक्या लांबीचा परकीय लोकांचा व्यापार यावच्चंद्रदिवाकरौ असाच चालेल असेंही खात्रीनें ह्मणतां येणार नाहीं. कालवशात् हें दळणवळण बंद पडलें, किंवा उत्तरोत्तर सस्ताई करून करून माल पाठविणें त्यांस अशक्य झालें, तर आमची दशा कुत्रासुद्धां खाणार नाहीं! एक पैला एक आगपेटी होतां होतां फार तर पैला दहा दहापर्यंत देतील. पण पुढें यांत्रिकशक्तीचाही खर्च भागेनासा होऊन आगपेट्या येण्याचा मार्ग खुंटला, ह्मणजे मग आह्मांला आगपेट्याही नाहींत, आणि पूर्वीच्या चकमकीचेंही स्मरण नाहीं. मिळून पुन्हा आमचें बस्तान मंथा आणि अरणी यांवर येऊन सुधारणेच्या श्रीगणेशापासून प्रारंभ होणार!

पण औषधापासून होणारी हानि ह्याहूनही जबरदस्त. मुलांना जंतांचा विकार झाला, तर **'स्यांटोनाईन'** आणून देण्याची आह्मांस संवय पडून गेली आहे. त्या **स्यांटोनाईन**च्या बाटल्या जर का बाजारांत मिळेनाशा झाल्या, तर आमचीं मुलें भराभर यमाजीभास्करापुढें नेऊन उभीं केलीं पाहिजेत! कारण, **स्यांटोनाईन** तें काय, किंवा कशाचें? कसें करतात? हें आह्मांस माहिती नाहीं. व कवसकुल्याचें औषध आमच्या आजीबरोबरच निजधामास गेलेलें! एवंच तसा प्रसंग आल्यास आह्मी, **ड्याक** लोक आणि **हाटेंटाट** लोक यांसारखेच होऊन बसूं.

वरील त्रोटक प्रतिपादनावरून औषधादि द्रव्यें आपल्याच देशांत तयार होऊन त्यांचा उपयोग व्हावा ही गोष्ट अत्यंत इष्ट आहे हें सहजीं ध्यानांत येईल. आतां **लापलंडा**सारखी वनस्पतिशून्य, धातुशून्य भूमि आमच्या कपाळीं आली असती, तर अशा प्रकारचा मार्ग अर्थातच खुंटला असता. परंतु परमेश्वरकृपेनें आह्मांस जी भूमि प्राप्त झाली आहे ती दिव्य औषधी, आणि दिव्य धातु ह्यांचें भांडार आहे. **म्हैसूर, अलणावर** इत्यादि ठिकाणीं सोन्याच्या खाणी आहेत; **कलकत्ता, मणिपूर** येथें दगडी कोळशांच्या खाणी आहेत; **सिलोन**मध्यें शिसपेनसलीच्या शिशाच्या खाणी आहेत. **कोयनेल** तयार करणारी दि-

व्यौषधी **सिंकोना नीलगिरीस** भरली आहे. **सार्सापरिलाचें** गवत मलबारांत भरलें आहे. 'टिंकचर' बेलाडोनिया हें औषध ह्या देशांतून बेलफळें नेऊन तें यूरोपांत तयार करून आणतात! हगवणीवर ताज्या बेलफळाच्या बलकानें जसा गुण येतो, तसा त्या शिळ्या अर्कानें येत नाहीं. पण असलीं सारीं औषधेंसुद्धां आमच्या हयगयीनें लुप्त होत चाललीं. वातविकारावर रामबाण गुण आणणारें **'लिमनग्रास आईल'** ज्या गवता (गवती चहा) पासून निघतें, त्या गवताचीं जंगलेंच्या जंगलें **सिलोनांत** फैलावलीं आहेत. 'स्ट्रिक्निया' औषध मलबारांत शेंकडों खंड्या उत्पन्न होणाऱ्या काजऱ्याच्या बियांपासून होतें. कोणतीही वनस्पति, धातु किंवा प्राणी, आमच्या देशांत नाहीं असें बहुधा नाहीं. असें असतां आह्मांस प्रत्यहीं लागणारीं औषधें आमच्याच देशांत तयार होऊं नयेत काय?

पण हल्लींची स्थिति पहा! दक्षिणसमुद्राजवळ वनस्पती काढावयाच्या; त्या कुटावयाला व साफ करावयाला उत्तरसमुद्राजवळ न्यावयाच्या; आणि त्या पोटांत ध्यावयाला पुन्हा दक्षिणसमुद्रापाशीं आणावयाच्या! कोण हा द्राविडी प्राणायाम! त्यापेक्षां येथील वनस्पतींचीं औषधें येथेंच तयार व्हावयाचीं नाहींत काय? होतील. पण राजाश्रय पाहिजे; किंवा लोकाश्रय तरी पाहिजे. पैकीं सार्वभौम सरकारानें 'यथा राजा तथा प्रजा' ह्या न्यायानें पाश्चात्यविद्येनें मंडित झालेल्या पढिक डाक्टरांचा व **टिंकचरें, पावडर्स** व **आसिडें** ह्यांचा सवंग सुकाळ करून टाकल्यामुळें, जुन्या वैद्यांस व हिरडा बेहडा आवळकाठीस किंवा मात्रा, भस्में, गुटिकांस तरी विचारणार कोण? तशांत दारिद्र्यावस्था आमच्या हाडाशीं खिळलेली. बहुतेक वैद्य केवळ पोटार्थी. हातानें नाडी दाबून धरावी, आणि कफवातपित्तत्रयीपैकीं कोणाचें तरी आधिक्य सांगावें, कशाची तरी गोळी किंवा मुळी द्यावी ह्मणजे आटोपला कारभार. हास्पितळांतलें मुक्तद्वारचें औषध टाकून ह्या विचाऱ्याला तरी अ-

१ डाक्टर ईस्टनच्या सायरपच्या औषधामध्यें मे० केंप आणि कंपनी ह्मणतेः—
The quinine Alkolicds consisting of quinine and allied bases, we prepare from Nilgiri Cinchona as recommended by the Government of India.

धिक पैसे देणार कोण? तेव्हां अर्थातच 'देणावळ तशी धुणावळ' अशांतला प्रकार होतो. ह्याहूनही अश्विनीकुमार बनावयाचें असेल तर जाहिरातींचा भडीमार! वचनाला कांहीं दरिद्रता नाहीं. 'तासांत गुण' 'पैसे परत' 'रामबाण' 'धन्वंतरी' असें होतां होतां अखेर 'मृत्यु ह्मणून यावयाचाच नाहीं' ही प्रतिज्ञा कोणाकडून बाहेर पडते त्याकडे डोळे लागून राहिले आहेत! असो.

विलायतेस औषधासाठीं जाणारीं मूलद्रव्यें बहुतेक ह्याच देशांतलीं, असें वर सांगण्यांत आलेंच आहे. शाळा, व कॉलेजें ह्यांमध्यें औषधक्रियेसंबंधानें प्रयोगशः पाहिजे तसें मुळींच शिक्षण देण्यांत येत नाहीं. आमच्यांतील कितीएक डाक्टर लक्षाधीश आहेत, तरी त्यांच्या मनांत इंग्रजी अगर देशी औषधें तयार करण्याचा कारखाना घालावयाचें येत नाहीं. संपत्ति ह्मणजे तरी काय? केवळ द्रव्यच असें कांहीं ह्मणतां येत नाहीं. उत्पन्न होणाऱ्या साधनाची विपुलता तीच संपत्ति होय, असें ह्मटलें तर शोभण्यासारखें आहे. जसेः—शेतकऱ्याचे नांगर, बैल, इत्यादि. व्यापाऱ्यांचा अनेक प्रकारचा माल, त्याचप्रमाणें वैद्य व डाक्टर ह्यांचीं औषधें हीच संपत्ति होय. असें असतां सुतार, लोहार, तांबट, दुकानदार, पेढीवाले, इत्यादि तमाम लोक जमिनीची इच्छा करितात. ह्यामुळें त्यांच्या त्यांच्या धंद्यांत दुर्लक्ष्य होऊन शेतकरीवर्गास मात्र विनाकारण अडचण झाली आहे, व होतही आहे.

हल्लींची आर्यवैद्यकस्थिति केवळ बुडत्या मार्गांत आहे. वैद्यशास्त्राची वेदही ज्यांनीं पाहिली नाहीं, तेच धन्वंतरी बनून पुढें येतात. शिकलेले लोक पोटापुरता उद्योग पहातात. मग 'मला आतां काय करावयाचें आहे?' हा मंत्र! ह्यामुळें देशाचें फार नुकसान झालें आहे. गुरूचा शिष्यावर विश्वास नाहीं; शिष्याचा गुरूवर विश्वास नाहीं. ही स्थिति! एक दोन जरी बुट्या पदरीं पडल्या न पडल्या तों शिष्य वैद्यराज बनतात. यामुळें विद्या बुडाली. व औषधीक्रिया अशिक्षितांच्या हातीं जात चालली. आणि "पारा लसणीच्या रसांत एक प्रहरभर खलला कीं, शुद्ध होतो!" असे ग्रंथाधार निघाले. मग काय? अशा ग्रंथाला ऊत येत चालला. वैद्यशास्त्रावर सशास्त्र ग्रंथ तर २०० वर्षांत तयार झालेला नाहीं. सुलभ ग्रंथ झाले पाहिजेत; अनुभव कळले पाहिजेत; वनस्पती, शारीर, रसायन-

कृति इत्यादि विषयांचें परिशीलन वाढलें पाहिजे. सारांश, पूर्वीच्या कालाच्या मानानें त्यावेळेस आपलें वैद्यक पूर्णदशेस आलें होतें. आणि तें आजच्या स्थितीला किती तरी पटीनें अधिक सुधारावयास पाहिजे होतें. कारण, जग हें नेहमीं सुधारत असतें. आणि त्यांत वैद्यशास्त्र हें तर नेहमीं सुधारत्या पंथावरच राहणार. पण आजमितीला जें वैद्यशास्त्र अवगत आहे, तें पूर्वीच्या स्थितीच्या सरासरी निम्या प्रमाणानेंही नाहीं. इतर राष्ट्रांकडे पाहिलें तर तीं ह्या कालांत फारच पुढें गेलीं आहेत. ह्मणून एक ठिकाणींच सर्व कामें व्हावींत अशी कोठें तरी सोय होणें अवश्य आहे.

(चालू.)

पुस्तकपरीक्षा.

श्री० गायकवाड यांच्या आज्ञेनें तयार झालेलीं पुस्तकें.

इंग्लंददेशाचा विस्तार.

(मा. अं. चालू.)

कारण, त्यावेळची हिंदुस्थानची स्थितीच तशी धोंटाळ्याची होती. व सारे आर्यलोक 'स्वत्व' ह्मणून काय त्याची ओळखच विसरून गेले होते. त्यांचें चित्र प्रस्तुत ग्रंथकारानें किती सुंदर वठविलें आहे तें पहा—

" केव्हां केव्हां असेंही घडे कीं, जे राजे मोंगलांकडून पूर्णपणें जिंकले गेले नव्हते, तेच पुढें येऊन सार्वभौमत्व प्राप्त करून घेण्याविषयीं खटपट करूं लागले ह्मणून सांगितलें, त्याचीं उदाहरणें पहा. निजाम ह्मणून मोंगलांचा एक मुख्य अंमलदार होता, तो हैदराबादचें संस्थान बळकावून बसला. हैदरअल्ली ह्मणून एक सरदार स्वतः शूर असल्यामुळें धाडस करून पुढें आला व त्यानें ह्मैसूरचें राज्य आपल्या धन्यापासून बळकावून घेतलें. पेशवे म्हणून दक्षिणेमध्यें ब्राह्मण राजे होते, ते मराठ्यांचें राज्य चालवीत असत. ते मोठे बलाढ्य असून मोंगलांकडून जिंकले गेले नव्हते. या सर्वांपाशीं भाड्यानें आणलेलें सैन्य असे. आपसांमध्यें नेहमीं लढाई व लुटालूट चालू असे. हे दंगे (इतके जबरदस्त असत कीं, सर्व यूरोपामध्यें सुद्धां असे दंगे) फक्त एकदां, कारोलिंजयन राज्य मोडकळीस आलें त्या वेळेसच घडून आले असतील. दुसऱ्या कोणत्याही वेळीं अशा प्रकारची अंदाधुंदी यूरोपांत नव्हती."

" या सर्व गोष्टींचें तत्त्व असें होतें कीं, हिंदुस्थानाला अस्तिल नव्हतें. अर्थात् राष्ट्रीय अभिमान त्याच्यांत नव्हता. ह्मणून परकीय लोक आले असतां, त्यांच्याशीं परकीयपणा वाटण्याला जागा नव्हती. जेथें ' स्वत्व ' नाहीं, तेथें परकीयत्व को-

ठून असणार ? व परकीयांशीं स्पर्धा तरी कोण करणार ? ह्या गोष्टींशीं साम्यता पावतील अशीं उदाहरणें यूरोपीय इतिहासांतही आहेत."

"समाजऐक्यता हिंदुस्थानांत नाहीं. अशा देशांत स्वतःबरोबर अथवा परकीयाबरोबर लढाई करण्यास पाहिजे ह्या राजाला जाऊन मिळणारे व पाहिजे त्या राजावर उठणारे लोक मिळतील, यांत नवल तें काय ? हिंदुस्थानामध्यें राष्ट्रीयत्वाची कल्पना फार घोंटाळ्याची आहे. स्वत्व व परकीयत्व ह्यांमधील अंतर निघून गेल्यासारखें झालें आहे."

"दुसरें, वीस कोटी हिंदुलोकांमध्यें जर, आपण सर्व मिळून एक राष्ट्र आहों, असें मानण्याची संवय असून मग इंग्रजलोकांचा प्रवेश हिंदुस्थानांत झाला असता तर मात्र आश्चर्य वाटण्यास जागा राहती; तसें नाहीं ह्मणून त्यांत आश्चर्यही नाहीं. केवळ पुष्कळ लोकांचा जमाव एके ठिकाणीं असला, व एक राष्ट्रीयता व समानार्थित्व ह्यांनीं तो दृढ संबद्ध नसेल, तर त्यांतील लोक एकमेकांच्या विरुद्ध उठण्यास तत्पर असून, परकीयांच्या ताब्यांतही सहज जातील."

"आपलें राज्य आपले ताब्यांत असण्याचा हक्क सर्वांच्या मनांतून निघून गेला होता."

"समाजच जर कुटुंबरचनेचा नसून एकमेकांचे शत्रु असलेल्या अशा दोन चार जातींनीं बनलेला असेल, तर सर्व देशावद्दल अभिमान लोकांत असणें शक्य नाहीं. फार झालें तर प्रत्येक खेडेगांवाबद्दल मात्र मनुष्यास अभिमान वाटेल. व अशा वेळेस फार तर ग्रामाभिमान दृष्टीस पडेल. हिंदुस्थानांतील राजे लोकांचें सैन्य भाड्यानें आणून लढाई करीत असत."

"ह्या प्रकाराला परकीय लोकांनीं हिंदुस्थान जिंकलें, असें ह्मणतां येणार नाहीं; ही एक अंतस्थ राज्यक्रांतीच झाली, असें ह्मटल्यास जास्त शोभेल."

आतां इंग्रजलोकांची कारवाई, व आपलें घोडें पुढें ढकलण्याची खुबी:—

"फ्रेंचांची पिछेहट करावी व आपल्या वसाहतीचें परकीयांपासून संरक्षण करावें हा मूळपासून इंग्रजांचा उद्देश; पण पुढें तें मान बदललें. आरंभीं म्हैसूर व महाराष्ट्र येथील लोक इंग्रजांशीं व्यापार सुरू ठेवण्यास कबूल नव्हते. परंतु इंग्रजलोकांची लोभिष्ट उत्कंठा इतकी अनावर जाहली कीं, या प्रदेशावर त्यांनीं आपलीं सैन्यें पाठविलीं, मालावर जकात घेण्याचीं जीं नाकीं पूर्वी होतीं तीं त्यांनीं जमीनदोस्त केलीं. आणि आपला माल नेऊन त्यांच्या मुलखांत भरला."

तेव्हां इंग्लिशलोकांनीं हिंदुस्थान घेतलें ही कांहीं अद्भुत गोष्ट नव्हे. तर अद्भुत गोष्ट कोणती तें सीलीसाहेब सांगतातः—

"तो परिणाम हा कीं, सर्व हिंदुस्थानभर ब्राह्मणधर्माचा पगडा पूर्णपणें चालू असतां, सर्व जगतामध्यें प्रमुखतेस पावलेले असे जे जे पाश्चिमात्यांचे विचार त्यांचा हिंदुस्थानांत फैलाव होऊं लागला."

" पहिला भाग हिंदुस्थानाशीं संबंध झाल्यानें जे वाईट परिणाम इंग्लंडावर घडून यावयाचे ते बंद झाले, हा होय. दुसरा भाग, पुष्कळ वेळपर्यंत झटापट चालून कालांतरानें तरी इंग्रजी सुधारणेच्या अंमलाचा पगडा हिंदुस्थानावर बसला हा होय."

हल्लींच्या सुधारणेचा कचेपणा, व वेदकालांतील परिपूर्णता प्रोफेसर साहेबांनीं एके ठिकाणीं व्यक्त केलेली फारच सुश्राव्य असल्यावरून ती आम्ही येथें देत आहों:—

" प्रस्तुत चालू असलेल्या सुधारणेला अर्धसुधारणा ह्मणतां येईल. इतक्या जारीची सुधारणा आजपर्यंत कधींही दुसऱ्या राष्ट्राकडून झाली नसेल. वेदांच्या भाषारणीवरून दिसतें कीं, त्यावेळीं आर्यलोक अगदीं रानटी स्थितींत होते. तरी त्यांच्या आंगीं बुद्धिमत्ता व भूतदया हे गुण त्यावेळीं वसत होते. हिंदुस्थानांत आल्यावर तर त्यांची सुधारणा फार जलद वाढूं लागली. त्यांच्या त्यावेळच्या ज्या कित्येक रीतिभाती होत्या, त्यांजपासून त्यांचे कायदे उत्पन्न होऊन शेवटीं त्यांचा एके ठिकाणीं संग्रहही केला गेला. श्रमविभागांचें तत्त्व त्यांचें लक्ष्यांत आलें. त्यांच्यापासून कवित्वाची व तत्वज्ञानाची सुरुवात झाली. शास्त्रीय विषयांस आरंभही त्यांच्यापासूनच झाला."

" गुणसंपन्न आर्यलोकांच्या अवशिष्ट वंशजांचीही तिसऱ्या प्रकारची सुधारणा अर्धभ्रष्ट व प्रतिबद्धक झालेली आहे. ते गुणसंपन्न लोकही आरंभापासून जगाच्या प्रधान व वृद्धिंगत सुधारणेपासून विलक्षण रीतीनें अलिप्त राहिलेले आहेत. ह्या लोकांच्या हातून कित्येक महत्कृत्यें फार प्राचीनकाळीं घडून आलीं. त्या लोकांतील वीररसप्रधान काव्यें पाश्चिमात्य काव्यांशीं केवळ तुलनाहि असून, तीं फार प्राचीन आहेत; तरी लोक समजतात इतकीं तीं प्राचीन नाहींत. त्याचप्रमाणें ह्या लोकांचे तत्त्वज्ञानावरील निरनिराळे ग्रंथ व शास्त्रीय पायावर रचलेलें स्वभाषेचें सुंदर व्याकरण हीं फार प्राचीन आहेत. अर्वाचीन काळीं मात्र ह्या लोकांच्या हातून महत्त्वाच्या गोष्टी घडून आल्या नाहींत."

आतां आमचें व इंग्रजलोकांचें कितपत सख्य होण्याचा संभव आहे, व त्यांच्या हातून आमचें कल्याण होण्याची कितपत आशा आहे, त्याचा उल्लेख:—

" परकीय लोक कितीही दयाळू असले तरी, त्यांच्या मनांत परकीय प्रजेविषयीं खरोखर कळवळा कोठून येणार ?"

"प्रजेच्या कल्याणाकडे इंग्रजलोकांइतकें दुर्लक्ष दुसऱ्या कोणत्याही सरकारचें नसेल."

पांचशें पानांच्या ग्रंथांतून पूर्वीचीं टळक टळक वाक्यांचीं अवतरणें घेतलीं आहेत, ह्यावरून प्रस्तुत ग्रंथाच्या योग्यतेची कल्पना, वाचकांस बऱ्याच अंशानें

करतां येईल. आणि दृढतर आशा आहे कीं, अशाप्रकारचा ग्रंथ अनायासें आह्मां महाराष्ट्रबांधवांस मिळाला आहे, त्याअर्थी तो निदान एकवेळ तरी वाचण्याची आमच्या वाचकांस उत्कंठा उत्पन्न होईल. ह्यांत प्रो० **सीली**साहेबांनीं, त्यांच्या प्रतिपाद्य विषयाच्या हेतूप्रमाणें, पुढील कोणतेंही भविष्य वर्तविलें नाहीं तरी, त्यांत ऐतिहासिक, धार्मिक, सामाजिक व राजकीय माहितीचा भरणा विपुल केला आहे, ह्यांत संशय नाहीं. पण सर्वांत त्यांची मोठी व तारीफ करण्यासारखी कामगिरी ह्मटली ह्मणजे, इंग्लिशांचें व आमचें दाखविलेलें नातें; राजाचें व प्रजेचें रेखलेलें सुंदर चित्र; उभयतांच्याही गुणांचें व दोषांचें केलेलें आविष्करण; उभयतांसही निःपक्षपातानें व निर्मल अंतःकरणानें दाखवून दिलेले मार्ग; ही होय. ह्यांतील राजा व प्रजा ह्यांच्या प्रतिपादित गुणदोषांच्या विषयावर कोणी काव्यपटूनें भैरवीरागांत गीत रचून त्याचें उभयतांनींही प्रातःस्मरण करीत जाण्याविषयीं नियम घालून दिला, तर आह्मां उभयतांचेंही कोटकल्याण होईल ह्यांत तिळमात्र संशय नाहीं.

"Expansion of England" हा मूळग्रंथ आमच्या पाहण्यांत नाहीं. तथापि, त्याचा एकंदरींत सारांश मनांत उतरण्याला बरेच प्रयास पडतील असा आमचा तर्क आहे. परंतु प्रस्तुत भाषांतरकर्ते रा० रा० **सरदेसाई** ह्यांनीं प्रस्तावनेंत एकंदर ग्रंथाचा गोषवारा देऊन, शेवटीं निरनिराळ्या प्रकरणावर प्रश्न देऊन, इंग्लंदचा विस्तार कसकसा झाला, त्याच्या माहितीचा तक्ता परिशिष्टांत दाखल करून, प्रस्तुत ग्रंथ करवेल तितका सुलभ करून दिला आहे. शिवाय, टीपांमध्येंही त्यांनीं पुष्कळ माहिती दिली आहे. ह्मणजे श्री० **सयाजीराव महाराज गायकवाडांनीं** त्यांजवर जें काम सोंपविलें, तें त्यांनीं अगदीं मनःपूर्वक केलें, असें ह्मणण्यांत आह्मांस मोठा संतोष वाटतो. भाषेमध्यें क्वचितच स्थळीं कित्येक शब्द अशुद्ध व मागेंपुढेंही पडले आहेत, तथापि एकंदरींत त्यांची भाषा चांगल्या प्रकारची असल्यानें, समजण्यास त्रास पडत नाहीं. येवढेंच नव्हे, पण हें भाषांतर आहे असासुद्धां मनाला भास होत नाहीं.

ह्या ग्रंथाच्या पूर्वार्धाचा संबंध विशेषेंकरून **अमेरिके**शीं व **इंग्लंडा**शींच असल्यामुळें, आपल्या कित्येक लोकांस त्या भागाचा फारसा उपयोग नाहीं, असें वाटेल. तरी इतिहासप्रियांना व स्वदेशाविषयीं विचार करणारांना तोही भाग रमणीयच वाटेल ह्यांत तिळप्राय शंका नाहीं. एकंदरींत ह्या पुस्तकाचीही निवड उत्तम प्रकारची झाली, आणि त्यायोगें महाराष्ट्रदेशांतील उत्तम

ग्रंथांत एक भर पडली. ह्याकरतां मूलग्रंथकार, विद्वान् व इतिहासशास्त्रवेत्ते प्रो० **सीलीसाहेब** ह्यांचे, विद्याभिलाषी व उदार श्रीमंत **सयाजीरावमहाराज गायकवाड** ह्यांचे, व रा० रा० **गोविंद सखाराम सरदेसाई**, बी.ए. ह्यांचे, आह्मीं सर्व महाराष्ट्रीयांनीं उपकारबद्ध झालें पाहिजे. व असेच उत्तरोत्तर अत्युपयोगी ग्रंथ आह्मांस वाचावयास मिळतील अशी आशाही पण बाळगिली पाहिजे.

खरोखर श्री० **गायकवाडसरकारांनीं** प्रसिद्ध करविलेल्या मोठमोठ्या ग्रंथांचें यथासांग परीक्षण करावयास पुस्तकाचा सांचाही तसाच मोठा पाहिजे. आमचा **'केरळकोकिळ'** पडला संकोचित. त्यांत 'भिन्नरुचिर्हि लोकः' ह्या नियम पुढें आहेच. रावबहादुर सावंतवाडीसंस्थानच्या **कारभाऱ्यांसारखे** थोर थोर आश्रयदाते कोकिळाचा आकार वाढविण्याविषयीं वारंवार सुचवितात, तरी मालकांस व आह्मांसही अद्याप तसें करण्याचें धैर्य येत नाहीं. ह्यामुळें ह्या एकाच विषयाकडे पोंचावें तितकें लक्ष्य पोंचत नाहीं. तरी, सवडीप्रमाणें मधून मधून आणखीही एक एक ग्रंथ हातीं घेण्यास आह्मांस मोठी हौस वाटेल, येवढें सांगून तूर्तच्या प्रसंगीं रजा घेतों.

मातृभक्तिः—हा संस्कृतभाषेंतील उत्कृष्ट निबंध, वे० रा० रा० **आप्पाशास्त्री राशिवडेकर**–कोल्हापूर–ह्यांनीं तयार करून तो, कलकत्त्यास निघणाऱ्या 'संस्कृतचंद्रिका' नामक मासिकपुस्तकांत छापून प्रसिद्ध केला आहे. व त्याबद्दल त्यांस बक्षीसही मिळालें आहे. ह्यांची संस्कृतभाषा लिहिण्याची शैली फार मनोरम आहे. शिवाय, त्यांनीं भारत, मनुस्मृति, विष्णुपुराण, हारीतसंहिता, वसिष्ठसंहिता, गौतमसंहिता, अग्निपुराण, गरुडपुराण इत्यादि अनेक ग्रंथांतील वचनांचा मोठा संग्रह देऊन निबंध फार सुशोभित केला आहे. आतां रा० राशिवडेकर ह्यांच्या मनांतून खर्च भागण्यापुरते वर्गणीदार मिळाल्यास 'संस्कृत' भाषेमध्यें एक स्वतंत्र मासिकपुस्तक चालू करण्याचा विचार आहे. उद्योग स्तुत्य आहे. व महाराष्ट्रदेशांत स्वतंत्रलेखांचें संस्कृत मासिकपुस्तक हें पहिलेंच होईल. लेखही प्रस्तुतच्या निबंधावरून सरस येतील असें धोरण आहे. मात्र जमेचा अदमास करावयाचा तो वर्गणीदारांवरून करूं नये, वर्गणीच्या वसुलावरून करावा झणजे झालें.

PRINTED and published by Janardan Mahadeo Gurjar AT JAVAJI DADAJI'S "NIRNAYA-SAGARA" PRESS, Bombay.

ता० २७, २८ व ३० डिसेंबर १८९५.—**अकरावी राष्ट्रीयसभाः**— पुण्यास अकरावी राष्ट्रीयपरिषद् अतिउत्तम रीतीनें पार पडली. आजपर्यंत ज्या दहा राष्ट्रीय सभा झाल्या, त्या सभांची ही अकरावी सभा केवळ मेरुमणीच होय. कलकत्त्यांतील सुप्रसिद्ध, अतिविद्वान्, लोकप्रिय व अवघ्या हिंदुस्थानांतील अगदीं पहिल्या प्रतीच्या वक्त्यांपैकीं सर्वांत पहिल्या नंबरचे वक्ते **नामदार बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी, सी०एस्०** यांनीं अध्यक्षस्थान विराजमान केलें होतें. **सामाजिक परिषद् राष्ट्रीय सभे**च्या मंडपांत भरावी कीं न भरावी ह्याबद्दल पुण्यांत जी कांहीं वेळ खडाजंगी उडून राहिली, त्यावरून ही अकरावी राष्ट्रीय सभा कशी पार पडेल, अशी साऱ्या लोकांस दहशत लागून राहिली होती. परंतु, मशारनिल्हे **बाबूसाहेब** व **नामदार जस्टिस रानडे** यांच्या मध्यस्थीनें व शहाणपणानें सर्व गोष्टी यथासांग पार पडल्या. या सभेंत जे ठराव पास झाले, त्यांवरूनच हिची पूर्णता झाली, असें वाटल्यावांचून राहणार नाहीं. प्रथम दिवशीं रिसेप्शन् कमिटीच्या अध्यक्षांचें भाषण झाल्यावर **बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी** यांची अध्यक्षस्थानीं योजना झाली. नंतर त्यांचें सुमारें अडीच तीन तासपर्यंत लोकांस चित्रासारखें तटस्थ करून टाकणारें, अस्खलित, मुद्देसूद, गंभीर, आवेशयुक्त, उदात्त, प्रगल्भ विचारांचें असें भाषण झालें. त्यांची वाणी अतिरसाळ व महाप्रासादिक आहे; ती इतकी कीं, त्यांच्या शत्रूंसही त्यांचें ह्मणणें ऐकण्यास लाविते. हा काय थोडा प्रसाद! अध्यक्षांच्या भाषणानंतर सबजेक्ट कमिटीची निवड होऊन सभेचें पहिल्या दिवसाचें काम संपलें.

दुसऱ्या दिवशीं ठराव सभेपुढें मांडून ते पास होण्याची सुरवात झाली. एकंदर २६ ठराव पास झाले. ते अतिसंक्षेपांत खालीं देतोः—

(१) राष्ट्रीयसभेकरतां कायमचे नियम, (२) हिंदुस्थानच्या खर्चासंबंधी चवकशी करण्याकरितां नेमलेलें कमिशन, (३) लष्करी खर्च, होमचार्जीस व मुलखीखातें यांचे खर्च कमी करणें, (४) ज्युडिशिअल व एक्झिक्युटिव्ह हे दोनही अधिकार वेगवेगळे करणें, (५) ज्युरीचा हक्क देणें, (६) नेटिव्ह संस्थानांतील वर्तमानपत्रांसंबंधी झालेला ठराव, (७) समकालिन सिव्हिलसर्व्हिस परीक्षा, (८) सरहद्दीवर होणाऱ्या खर्चाचा बोजा थोडाबहुत इंग्लंडनें सोसणें, (९) दक्षिण आफ्रिकेंत वसाहतीस गेलेल्या तिकडील हिंदु लोकांस हक्कस्वातंत्र्य देणें, (१०) शेतकरी लोकांची कर्जातून मुक्तता करणें, (११) कायदेकौन्सिलमध्यें लोकनियुक्त सभासदांस प्रश्न विचारण्याचे हक्क, (१२) सिव्हिल आणि मेडिकल सर्व्हिस, (१३) वकील व मुखत्यार वकील यांच्या संबंधाचें बिल, (१४) जमिनीचा धारा कायम करणें, (१५) प्रिव्ही लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्यें मध्यप्रांतांतील लोकांच्या तर्फे मुखत्यार नेमून पाठविणें, (१६) हुंडणावळ, (१७) आगगाडींतून प्रवास करणाऱ्या तिसऱ्या वर्गाच्या उतारू लोकांचे हाल, (१८) जंगलसंबंधी ठराव, (१९) मिठावरील जकात कमी करणें,

(२०) शिक्षणप्रसार, (२१) २० नंबरच्या सुतावरील जकात न काढणें, (२२) कंठाळी, (२३) ब्रिटिश काँग्रेस कमिटीस ६० हजार रुपये पाठविणें, (२४) सर डब्ल्यू० वेडरबर्न व ब्रि० काँ० कमिटीचे इतर सभासद यांचें आभारप्रदर्शन, (२५) १८९६ सालाकरितां मि० ए० ओ० ह्यूम ह्यांची जनरल सेक्रेटरीच्या जागेवर योजना व मि० वाच्छा ह्यांची जॉइन्ट जनरल सेक्रेटरीच्या जागेवर योजना, (२६) १२ वी राष्ट्रीयसभा कलकत्त्यास भरणें, वगैरे ठराव समेंत पास झाले. त्यावेळीं हिंदुस्थानांतून चोहींकडून आलेल्या विद्वान् मुखत्यारांचीं उत्तम उत्तम भाषणें झालीं. सभाविसर्जनापूर्वी **ना० बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी** यांनीं तीन दिवसपर्यंत ११ व्या राष्ट्रीयसभेचें काम अतिउत्तम रीतीनें चालविल्याबद्दल त्यांच्या संबंधानें वऱ्हाडचे माजी डायरेक्टर ऑफ् पब्लिक इनस्ट्रक्शन् रा० ब० **श्रीराम भिकाजी जठार** हे आभारप्रदर्शक भाषण करीत असतांना अध्यक्ष **ना० बानर्जी** यांजवर एकसारखी पुष्पवृष्टी होत होती. त्यावेळचा आनंद, बाबूसाहेबांची तल्लीन झालेली चित्तवृत्ति, डेलिगेट लोकांचा उत्साह वगैरे गोष्टी प्रेक्षणीय होत्या. फार तर काय, बाबूसाहेबांनीं आपल्या शेवटच्या भाषणांत "ह्यापेक्षां जास्त मानाची मला मुळींच इच्छा राहिली नाहीं" असें प्रेमोद्गारानें व सद्गदीत अंतःकरणानें बोलून दाखवून आपली पूर्ण तृप्तता, अत्यंत आभारपूर्वक व्यक्त केली; आणि नंतर मि० **अमरचंद** यांनीं हिंदी भाषेंत व नासिकचे प्रसिद्ध वक्ते व कवि रा. रा. **बळवंत खंडूजी पारख** यांनीं मराठींत आपल्या कविता वाचल्या व क्षणभर जमलेल्या मंडळीस कौतुक करण्यास लावलें. येणेंप्रमाणें विजयी ११ व्या राष्ट्रीयसभेची परिसमाप्ति झाली.

ता० २९ डिसेंबर १८९५.—स्वतंत्र उभारलेल्या मंडपांत **डॉ० रामकृष्ण गोपाळ भांडारकर** यांच्या अध्यक्षतेखालीं **सामाजिक परिषद्** भरली. **ना० महादेव गोविंद रानडे,** सी० आय्० ई० यांनीं 'सामाजिक सुधारणेचा इतिहास' या विषयावर व्याख्यान दिलें.

ता० २९ डिसेंबर १८९५.—**श्रीशिवाजी महाराजांच्या** स्मारकाप्रीत्यर्थ पुण्यास **श्री० पंतप्रतिनिधि** यांच्या अध्यक्षतेखालीं जगीं सभा भरली. सुमारें १५ हजार मंडळी जमली होती.

ता० २९ डिसेंबर १८९५.—पुण्यास **मि० नसरवानजी माणिकजी पेटिट** ह्यांच्या **ईगल्स नेस्ट** नांवाच्या भव्य बंगल्यांत पुण्यास जमलेल्या राष्ट्रीयसभेच्या डेलिगेटांस **श्री बाबा महाराज** यांनीं गार्डन पार्टी–मेजवानी दिली. त्या वेळचा प्रसंग मोठा अपूर्व होता.

ता० ३१ डिसेंबर १८९५.—पुण्याच्या विद्यार्थी मंडळीनें ११ व्या राष्ट्रीयसभेचे अध्यक्ष **ना० बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी** यांस मानपत्र दिलें.

सन १८९५ सालांत हरपलेलीं नररत्नें!!!

ता० १५ जानेवारी १८९५.—**सर मुथुस्वामी अय्यार, के. सी. आय. ई.**—हे मद्रास हायकोर्टचे जज होते. हे न्यायाच्या कामांत फार निष्णात होते, यांच्या जागीं मद्रास सरकारानें **दिवाण बहादूर एस्. सुब्रामनिया अय्यार, सी. आय. ई.** यांची योजना केली.

ता० १० फेब्रुवारी १८९५.—**रा. ब. वीरप्रसाद तापीप्रसाद.**—हे प्रथम डेप्युटि कलेक्टर होते मागाहून मुंबई म्युनिसिप्यालिटीचे माजी कमिशनर **सर चार्लस् ऑलिव्हंट** यांनीं त्यांस सरकारांतून मागून घेऊन म्युनिसिप्यालिटींत **रेव्हिन्यु रिफंड ऑडिटर ऑफिसर**च्या जागेपर्यंत बढती दिली. यांनीं म्युनिसिप्यालिटीच्या **असेसमेंट** खात्याची उत्तम शिस्तवार व्यवस्था लाविली.

ता० २९ एप्रिल १८९५.—**श्रीविभाजी जामसाहेब.**—हे काठेवाडांतील **जामनगरचे** अधिपति होते. हे मोठे उदार, उपकारी, स्वधर्मपरायण असून आपल्या प्रजेवर ते पुत्रवत् प्रेम करीत.

ता० ६ मे १८९५.—**रायबहादूर हरिश्चंद्र यादवजी** जे० पी०.—ज्यांनीं मावाप सरकारची तीन तीन चार चार तपें निष्ठेनें सेवा केली त्यांपैकीं हे एक होत.

ता० १२ मे १८९५.—**रा० ब० नाना मोरोजी.**—घरची अत्यंत गरीबी, परंतु उत्तम विद्या संपादन केली. साध्या मास्तरीपणापासून तों दिवाणगिरीपर्यंत यांनीं कामें केलीं. हे मुंबईस तिसरे **प्रेसिडेन्सि माजिस्ट्रेट** असतांना यांनीं बरीच कीर्ति मिळविली. १८५७ सालच्या बंडाच्या वेळेस पुणें मुक्कामीं त्यांनीं लोकांची बाजू राखिली नसती तर तिकडे मोठा कहर उसळून गेला असता. त्यांच्या आधीं त्यांची पत्नी व ब्यारिस्टरासारखे हातातोंडास आलेले मुलगे मरण पावले.

ता० १७ जून १८९५.—**प्रिन्सिपाल गोपाळ गणेश आगरकर.**—यांस समजूं लागल्यापासून विद्याभ्यासाची अगदीं गैरसोय असतांही यांनीं दृढनिश्चयानें व झटून अभ्यास करून **एम्. ए.** पर्यंत पारंगता मिळविली. पुण्यांतील **'न्यू इंग्लिश स्कूल,' 'फर्ग्युसन् कालेज,' 'डेक्कन एज्युकेशन् सोसायटी'** वगैरे संस्थांची, तसेंच **'आर्यभूषण,' 'आर्यविजय'** छापखाने, त्याचप्रमाणें **'केसरी,' 'मराठा'** व **'सुधारक'**ह्या लोकमान्य वर्तमानपत्रांचीं नांवें ऐकिलीं कीं, त्यांच्याबद्दल जास्त शिफारस नको. **प्रि० वामनराव आपटे** यांच्या पश्चात् रा० **आगरकर** हेच **फर्ग्युसन् कॉलेजचे प्रिन्सिपॉल** झाले.

ता० ११ आक्टोबर १८९५.—**महाराज जसवंतसिंगजी.**—हे **जोधपुरचे** महाराज होते. हे लोकप्रिय, न्यायी व सर्व धर्मातील लोकांस सारख्या नजरेनें वागविणारे होते. यांच्या स्मशानयात्रेस साठ हजार मंडळी जमली होती.

संवत्सरमाहात्म्य.

(१) **रा० ब० लक्ष्मण गोपाळ देशमुख, सी० एस्०** यांस **सोलापूरचे** व **ऑ० सरदार रा० ब० गणपतराव दामोदर पानसे, सी० एस्०** यांस **विजापूरचे कलेक्टर** नेमलें. मुंबई इलाख्यांत पुष्कळ ठिकाणीं ज्यांच्या बेपर्वाईमुळें हिंदुमुसलमानांतील **दंग्यां**स केवळ तेजी आल्यासारखें होऊन जे अवध्या प्रजेच्या असंतोषास पात्र झाले होते, त्या मुंबईच्या माजी गव्हर्नर **लॉर्ड हॅरिस** साहेबांनीं **रा० ब० देशमुख** व **रा० ब० पानसे** यांची **कलेक्टरां**च्या जागेवर योजना करून आपलें गुणग्राहकत्व जगापुढें मांडून अखेर साधली यांत तिलप्राय शंका नाहीं. (२) आमच्या इंग्रज बहादुरांनीं **चित्रळची मोहीम** फत्ते करून **दोन कोटी** रुपयांस **खार लावला.** या मोहिमेस मदत करण्याकरितां आपला सर्व खजिना इंग्रजसरकारास सादर करण्यास तयार आहोंत असें **भोपाळ**च्या **बेगम** साहेबांनीं कळविलें. **सर लिपेल ग्रिफन** ह्या 'खाल्या घरचे वांसे मोजणाऱ्या द्वाड पोलिटिकल एजन्टानें **बेगम** साहेबांवर केलेल्या **चिरस्मरणीय अनुग्रहा**ची विस्मृति पाडून व मन मोठें करून आपली ऐन वेळेला उदारता प्रगट केली हें **बेगम** साहेबांचें नैसर्गिक सौजन्य वाखाणण्यासारखें होय!! (३) **सचीन**च्या माजी **नबाबाचे** बंधु **नसरुल्लाखान,** ब्यारिस्टर ॲट लॉ यांनीं **सुरत**चे कलेक्टर मि० **लेली** यांस एका खटल्यांत १० हजार रुपये **लांच** देऊं केल्याच्या आरोपावरून मुंबई चीफ प्रे० म्या० मि० **स्लेटर** यांनीं **एक हजार** रुपये वगैरे **दंड** ठोठावला; परंतु ते अपिलांत मोकळे झाले. (४) **प्रो० बाळ गंगाधर टिळक** यांची मध्यभागतर्फे आणि रा. रा. **दाजी आबाजी खरे,** बी. ए., एल्. एल्. बी. यांची दक्षिणभागतर्फे **मुंबई कायदेकौन्सिलां**त निवडणूक झाली. (५) मुंबई हायकोर्टातील चीफ जस्टिस **सर चार्लस सार्जन्ट** हे पेनशन घेऊन विलायतेस गेल्यामुळें जस्टिस **फ्यारन्** यांची चीफ जज्जाच्या जागेवर योजना झाली. त्यामुळें त्यांच्या जागेवर ऑ० मि० **बदुद्दिन तय्यबजी** या नेटिव्ह गृहस्थास न्यायपदावर बसण्याची संधि मिळाली. **सर चार्लस सार्जन्ट** यांनीं विलायतेस प्रयाण करण्यापूर्वी हायकोर्टात ज्यांनीं दहा वर्षेपर्यंत वकिली चालविली असेल त्यांनीं पुढें एक वर्षपर्यंत वकिली न करतां हायकोर्टातील चाललेले खटले ऐकले ह्मणजे त्यांस **आड्व्होकेट**ची पदवी मिळावी, अशी योजना करून ठेविली आहे. (६) **पाटणा** प्रांतांतील **वोलनगीर**च्या महाराजांनीं प्रथम आपल्या राणीस गोळी घालून शेवटीं **आत्महत्त्या** करून घेतली. बापड्याला पोलिटिकल एजन्टची पोलिटिक्याालिटी नडली कीं काय नकळे!! (७) यूरोपिअन टर्कीतील मुसलमानांनीं तद्देशीय दहा बारा हजार **आर्मेनिअन** लोकांची **कत्तल** केली. त्यामुळें यूरोपांतील बलाढ्य राष्ट्रांनीं टर्कीच्या सुलतानास बराच दपटशा देऊन ह्या संबंधाची लवकर व्यवस्था करण्यास बजाविलें. (८) फार दिवस

चालू असलेल्या **चीन** व **जपान** ह्या पौर्वात्य बलाढ्य राष्ट्रांतील **महायुद्धा**चा शेवट झाला. (९) हिंदुपदपादशाहीचे संस्थापक कै० **शिवछत्रपती** ह्यांच्या **रायगडा**वरील मोडकळीस आलेल्या **समाधी**च्या व **छत्री**च्या **जीर्णोद्धारार्थ** नामदार **टिळक** यांच्या प्रेरणेनें सर्व इलाखाभर वेळोवेळीं प्रचंड सभा भरून पुष्कळ वर्गणी गोळा झाली. (१०) **काबूल**च्या **अमीरा**चे द्वितीय चिरंजीव **प्रिन्स नसरुल्लाखान** यांनीं राणीसरकारच्या निमंत्रणावरून इंग्लंडची **मुशाफरी** केली. त्यामुळें हिंदुस्थानच्या खजिन्यांतून पावड्यावारी पैशांची **राखरांगोळी** उडाली!! (११) **पंचमहालचे** पोलीस अधिकारी मि० **चार्लस लेस्टर** यांस त्यांच्या अधोगीनें गोळी घालून ठार केलें. **लेस्टर** बाईस अवघी **दहाच** वर्षांची सजा मिळाली. (१२) **भिंगा**च्या राजपुत्राची प्रिय पत्नी मरण पावल्यामुळें त्याच्या पित्यानें त्याचा द्वितीय संबंध करण्याचा निश्चय केला. परंतु प्रियपत्नीविरहजन्य दुःखामुळें राजपुत्रास ती गोष्ट न मानवतां त्यानें वेडेपणानें आपणास चितेवर जिवंत जाळून घेतलें. एकुलता एक पुत्र गत होऊन गादीसही कोणी वारस राहिला नाहीं असें पाहून राजेसाहेबांनीं **संन्यास** गृहण करून काशीयात्रेचा मार्ग सुधरला. (१३) विलायतेंतील पार्लमेंटामध्यें प्रजापक्षाच्या प्रधानमंडळीनें **राजीनामा** दिल्यामुळें **लॉर्ड स्यालिसबरी**प्रभृति **कान्झरव्हेटिव्ह** प्रधानमंडळ **पदारूढ** झालें. नव्या निवडणुकींत मि० **दादाभाई नवरोजी** यांस यश न येतां मि० **भावनगरी** यांचा पार्लमेंटांत प्रवेश झाला. (१४) गेल्या मोहरमांत **पोरबंदर, बडोदें** व **धुळें** या ठिकाणीं **दंगे** झाले. धुळ्यास झालेल्या दंग्यानें मात्र वरील दंग्यांस खालीं पहाण्यास लाविलें. **येवल्यास**ही दंग्याची **पुनरावृत्ति** झाली. (१५) पुण्यांतील नांवाजलेल्या **सार्वजनिकसभे**च्या नव्या वर्षाच्या निवडणुकीसंबंधानें तिकडे पक्षप्रतिपक्ष होऊन आपापसांत लढाइही झाली. (१६) या सालीं **गणपतीच्या मेळ्यां**नीं बरीच आघाडी मारून **सार्वजनिक गणपती** उदयास आले. मेळ्यांतील लहानथोरांचा उत्साह व भक्ति मोठी अवर्णनीय होती. (१७) माजी गव्हर्नर **लार्ड हॅरीस** यांस जातां जातां खुष करण्याकरितां **डॉ. भांडारकर** यांनीं रुजू नसतां व्हाईस चान्सेलर या अधिकाराच्या जोरावर दोन कान्व्होकेशन्स (पदवीदानसमारंभ) भरले. त्यामुळें ते बहुजनसमाजाच्या इतराजीस मात्र पात्र झाले. (१८) **इंदुरांत** प्रस्तुत चाललेल्या खटपटीमुळें **दिवाण बहादूर खंडेराव चिमणराव बेदरकर** यांनीं दिवाणगिरीचा **राजीनामा** दिला. पण तो हिंदुस्थानसरकारानें स्वीकारला नाहीं. तूर्त **इंदुराधिपति बाळासाहेब महाराजां**स 'मल्हारशाई'चे डोहळे आठवले आहेत. त्याकडे महाराजांनीं लक्ष पुरवून आपली वर्तणूक सुधारावी.

गेल्या पांच सालांत (सन १८९१–१८९५) घडलेल्या ठळक ठळक गोष्टींची जंत्री.

सन १८९१.—ता० २६ फेब्रुआरी.—हिंदुस्थानची खानेसुमारी झाली.
ता० १९ मार्च.—एज ऑफ् कन्सेन्ट—संमतिवयाचा कायदा पास झाला.
ता० २१ मार्च.—मणिपूरचें बंड. २७–४–९१ इंग्रजांनीं मणिपूर घेतलें.
ता० २५ एप्रिल.—राजाबाईटावरअपघात.
ता० १९ मे.—इंदुरचें वळवंतराव वामन वुटीप्रकरण. त्यांचा मृत्यु.
ता० १३ आगष्ट.—मणिपूरचे थांगल जनरल व युवराज यांस फांशीं दिलें.
ता० २८ डिसेंबर.—७ वी राष्ट्रीयसभा–नागपूर.–अध्यक्ष रा. ब. पी. आनंदाचार्लु.
सन १८९२.—ता० २९ एप्रिल.—मॉरिशिअस बेटांतील भयंकर वादळ.
ता० ७ जुलै.—ऑ. दादाभाई नवरोजी पार्लमेंटचे सभासद निवडले गेले.
ता० ९ नव्हेंबर.—आफगाणिस्थानांत हजारा लोकांचें बंड.
ता०२८डिसें०.—८ वी राष्ट्रीयसभा–अलाहाबाद. अध्यक्ष बाबू डब्ल्यु. सी.बानरजी.
सन १८९३.—ता०२५ जुलै.—प्रभासपट्टण येथें हिंदुमुसलमानांचा दंगा झाला.
ता० ११ आगष्ट.—मुंबईस हिंदुमुसलमानांचा अतिभयंकर दंगा झाला.
ता० १४ नोव्हेंबर.—सर मार्टिमर ड्युरंड यांनीं कावुलच्या मिशनची फत्ते केली.
ता० २७ डिसेंबर.—९ वी राष्ट्रीयसभा–लाहोर. अध्यक्ष ऑ. दादाभाई नवरोजी, एम. पी.
सन १८९४.—ता० ६ फेब्रुआरी.—येवल्यास हिंदुमुसलमानांचा दंगा झाला.
ता० ५ मे.—खा. ब. मिरझा अबाज अल्ही बेग ह्यांची वांईस दांडगाई.
ता० २४ जून.—फ्रान्सचे प्रेसिडेन्ट कार्नो यांचा खून.
ता० २७ जुलै.—चीन व जपानमधील महायुद्धास प्रारंभ.
ता० २५ आगष्ट.—गोहना तलावाचा स्फोट.
ता० ३ सप्तेंबर.—अमेरिकेंत मिनेसोटा व बिनकानसिन येथें जंगलांना भयंकर आगी.
ता० १३ सप्तेंबर.—पुण्यास हिंदुमुसलमानांचा दंगा.
ता० २४ सप्तेंबर.—बडोद्यास बापटकमिशन बसलें.
ता० २६ डिसेंबर.—१० वी राष्ट्रीयसभा–मद्रास. अध्यक्ष. मि. आल्फ्रेड वेब, एम्. पी.
सन १८९५.–ता० २२ जून.—पार्लमेंटांत सालिसबरी प्रधानमंडळाची सरशी.
ता० २६ जून.—इंडियन एक्सपेंडिचर कमिशन बसलें.
ता० ४ जुलै.—पोरबंदरास हिंदुमुसलमानांचा दंगा झाला.
ता० ५ जुलै.—बडोद्यास दंगा झाला. ता० ११ आगष्ट.—येवल्यास दंगा झाला.
ता० १ सप्तेंबर.–धुळ्यास दंगा झाला. ता०१४ सप्तेंबर.–गोंव्यास बंडाची सुरवात.
ता० २७डिसें०—११ वी राष्ट्रीयसभा.–पुणें. अध्यक्ष ना. बाबू सुरेंद्रनाथ बानरजी.

पांच सालांत(१८९१–१८९५)हरपलेलीं नररत्नें.

१८९१.–शेट हिंदुमल बाल मुकुंद. डॉ. काशिनाथ वामन काणे. चार्लस ब्राडला, एम्. पी. महामहोपाध्याय रामशास्त्री आपटे. मि. लक्ष्मण रामचंद्र वैद्य, एम्. ए. एल्. एल्. बी०. राजा सरटी. माधवराव. मि. रघुनाथ नारायण खोटे, सी. आय्. ई०. व्हान हेल्मुथ मोल्टके. रा. रा. बंडुनाना रानडे. डॉ. राजा राजेंद्रलाल मित्र. पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर. रा. रा. रावजी शास्त्री गोडबोले. स्टुअर्ट पार्लनेल, एम्, पी०. श्री. आप्पासाहेब सांगलीकर. शेट नसरवानजी माणिकजी पेटिट. लॉर्ड लिटन. दिवाण बहादुर गौरीशंकर उदयशंकर. रा. रा. रावजी शास्त्री देवकुळे. गोपाळराव नरसिंह देशपांडे, इंदापूरकर. रा. ब. माधवराव वासुदेव बर्वे, सी. आय्. ई०. मि. ए. रेव्याट्सेक. रा. रा. शांताराम नारायण वकील. रा. सा. गजानन कृष्ण भाटवडेकर. रा. ब. विनायकराव जनार्दन कीर्त्तने.

१८९२.–रा. ब. त्रिमलराव व्यंकटेश इनामदार. ऑ. पंडित आयोध्यानाथ. प्रिन्स आल्बर्ट व्हिक्टर. रा. रा. जावजी दादाजी. महामहोपाध्याय पंडित दुर्गाप्रसाद. प्रि. वामन शिवराम आपटे, एम्. ए०. रा. रा. आत्माराम कान्होबा. सरदार रा. ब. गोपाळराव हरी देशमुख.

१८९३.–ऑ. रा. ब. कृष्णाजी लक्ष्मण नुलकर, सी आय्. ई०. मि. सोराबजी शापुरजी बंगाली सी. आय्. ई०. रा. ब. यशवंतराव मोरेश्वर केळकर. ऑ. ज. मि. काशिनाथ त्रिंबक तेलंग, एम्. ए. एल्. एल्. बी., सी. आय्. ई०. रा. सा. नारायण महादेव परमानंद. डॉ. विठ्ठल विष्णु गोखले, एम्. डी०. शेट दामोदर ठाकरशी मुळजी. महाराज धुलिपसिंग. रा. ब. गणपतराव भास्करजी.

१८९४.–रा. रा. बाबाजी रंगनाथ वैउडे. रा. ब. शंकर पांडुरंग पंडित, एम्. ए. रा. ब. यशवंत वासुदेव आठल्ये, एम्. ए. एल्. एल्. बी. सरदार. रा. ब. विनायकराव वासुदेवजी. रा. ब. जर्नादन वासुदेवजी. रा. रा. महादेव चिमणाजी आपटे, बी. ए. एल्. एल्. बी०. सर चमा राजेंद्र उदयार, जी. सी., एस्. आय्०.

१८९५.–सर मुथुस्वामी अय्यार, के. सी. आय्. ई०. रा. ब. नाना मोरोजी. प्रि. गोपाळ गणेश आगरकर, एम्. ए. मि. फ्रामजी दिनशा पेटिट. प्रो. केळकर.

गेल्या पांच वर्षांतील संवत्सरमहात्म्याचा सारांश.

गेल्या पांच वर्षांत ज्या विनतारीखवार गोष्टी घडल्या त्यांपैकीं अगदीं ठळक ठळक अशा वाचकांच्या स्मरणार्थ खालीं दिल्या आहेत, त्या येणेप्रमाणें:—

१८९१.—दक्षिणेंत दुष्काळ. वर्तमानपत्रांवरील अब्रूनुकसानीच्या फिर्यादी. मिठाकरतां दोन बायांस दंड. पुण्यांतील पांचहौदी मिशन. इम्पीरिअल डायमंड

पामीर. रशियांत दुष्काळ. जपानांत भूकंप. इटालींतील व्हेसुव्हियस ज्वालामुखी पर्वत. जनरल बोलेंजर. फ्रान्सांत इन्फ्लुएन्सा. मक्केंत महामारी. अबदुल हक्क व निजामसरकार.

१८९२.—श्रीनगर, काबुल, रशिया, पंजाब व नाशिक या ठिकाणीं महामारी. काठेवाडांत मियाणी लोकांचें बंड. तुपांत चर्बीची भेसळ. चोंहोंकडे मजूर लोकांचा संप. जुरीपद्धत. हरिद्वारचा मेळा. सरकारी वकिलांनीं राष्ट्रीयसभेस न जाण्याबद्दल सक्युर्लर. मि. फेगन. डॉ. देशमुख ह्यांचा असिस्टन्ट केमिकल ॲनालायझर या जागेचा राजीनामा. मि. मॅक्लीन व अमृतबझारपत्रिका. कर्नाटकांत स्त्रियांनीं दरोडे घातले. गोंव्यांत सोनारलोकांच्या लग्नसमारंभासंबंधानें तिकडील रहिवाशांनीं बंड केलें. ना. काशिनाथ त्रिंबक तेलंग सी. आय्. ई. हे व्हाइसचान्सेलर झाले. महोडा बिल, इंडियाकौन्सिल, शेतकीकमिशन, फ्याक्टरी ॲक्ट, पुण्यांतील ग्रामण्य, गिल्झिट, उगांडा, चीन, पनामाक्यानल वगैरे प्रकरणें.

१८९३.—व्हिक्टोरिया व क्यांपरडाऊन या आगबोटींची टक्कर, व व्हिक्टोरियास जलसमाधि. प्रभासपट्टन, मुंबई, येवलें, अजमगड, गोरखपूर, कलकत्ता इत्यादि ठिकाणीं दंगे झाले. ग्ल्याडस्टन साहेबांवर कोणी टाऊन्सेन्ड नांवाच्या वेड्या मनुष्यानें गोळी घातली. रशियांतून यहुदी लोकांस हद्दपार केलें. फ्रान्स व सयाम ह्यांची झुंज. जुरीपद्धतीवर गदा. इंग्लंदांत इम्पीरिअल इनस्टीट्यूटसंबंधानें एतद्देशीय राजेलोकांवर बिलें केलीं. पुण्यांतील शुक्ल व कृष्ण पक्ष. हैदराबादेस मेहदी हसनवरील बड्या बेअब्रूचा खटला. ऑ. रा. ब. महादेव गोविंद रानडे सी. आय्. ई. हे मुंबई हायकोर्टाचे जज्ज झाले. अमेरिकेंत चिकागो येथें बडें जंगी प्रदर्शन झालें.

१८९४.—मि. नॉर्टन साहेबांवर व्यभिचाराचा आरोप. ग्ल्याडस्टन साहेबांचा राजीनामा. आम्रवृक्षमृत्तिकाविलोकन. पुण्यास नागोबाची मिरवणूक.

१८९५.—रा. ब. लक्ष्मण गोपाळ देशमुख व ऑ. सरदार रा. ब. गणपतराव दामोदर पानसे यांस अनुक्रमें सोलापूर व विजापूरचे कलेक्टर नेमिलें. चित्रळची मोहीम. नसरुल्लाखान व लेली प्रकरण. केसरीकार प्रो. बाळ गंगाधर टिळक यांची कायदेकौन्सिलांत निवड. ऑ. मि. बद्रुद्दीन तैय्यबजी हायकोर्टचे जज्ज झाले. पाटणाच्या महाराजांची आत्महत्या. आर्मेनियन लोकांची कत्तल. चीन व जपानमधील महायुद्धाचा शेवट. श्रीशिवछत्रपतीसमाधिजीर्णोद्धार. कावुलचे प्रिन्स नसरुल्लाखानांची विलायतची मुशाफरी. लेस्टर बाईनें पतिहत्या केली. भिंगाच्या राजपुत्राचें जिवंत जाळून घेणें व त्याच्या पित्याचें संन्यासग्रहण. सार्वजनिकसभेत लठ्ठालठ्ठी. सार्वजनिक गणपती उदयास आले. दसऱ्याचे मेळे. डॉ. भांडारकर यांनीं दुराग्रहानें दोन कान्व्होकेशन्स भरलीं. इंदुराधिपति बाळासाहेब होळकर ह्यांचे वर्तनाविषयीं गवगवा.

आर्यधर्माभिमानी लोकांकरितां सचित्र हिंदु घड्याळें.

प्रत्यक्ष देवदेवतांनींच हृदयासन्निध वास
केल्यावर अधर्म कितीसा टिकेल.



नमुना मागवा. तुमच्या पहाण्यानेंच आनंद जर होईलच होईल, तर मग वारण्यानें कां न होणार बरें? देवतांचे दर्शनानें हिंदुधर्माभिमानास भरती नाहींका येणार? नांव ऐकतांच पहावेंसें वाटतें व पाहतांच घ्यावेंसें वाटतें.

हिंदु घड्याळें कशीं आहेत, दिसण्यांत सुंदर, खिशांत हलकीं, मजबूत, टिकाऊ, अंगचे चावीचीं, तबकडी मिन्याची पांढरी असून त्यावर रीतीप्रमाणें रोमन आंकडे असून ठळक मराठी आंकडेही आहेत आणि प्रत्येक आंकड्यामध्यें हिंदुपूज्य देवतांचीं सुंदर चित्रें आहेत. श्रीगणपती, सरस्वती, रामदासस्वामी, हनुमंत, रामसीता, लक्ष्मीनारायण, गरुड, अष्टभुजादेवी, विठ्ठलरखुमाई, शंकरपार्वती, अक्कलकोटस्वामी, श्रीगुरुदत्तात्रय, आणि मध्यभागीं, महाराष्ट्रास जिवंत करणारे गोब्राह्मणप्रतिपालक **श्रीशिवाजीछत्रपतीमहाराज** यांचें सुबक चित्र आहे. अशीं हीं अपूर्व हिंदु घड्याळें आमचे देशबांधव व भगिनी काय ह्मणून न घेतील!

हिंदु सिलेंडर पिक्क नी. सी. वॉच किं. रु. ८॥ ते. १० ग्या. वर्ष १
हिंदु लिव्हर प्रीव्हेन्स नी. सी. वॉच किं. रु. १५ ग्यारन्टी वर्षें २
हिंदु रासकोप सिस्टीम नी. सी. वॉच किं. रु. १७ ग्या. वर्षें ३
हिंदु प्रिव्हेलन्स चांदीचें वॉच किं. रु. २५ ते ३० ग्या. वर्षें ४
हिंदु सोन्याचें वॉच किं. रु. १०० ते १२५ ग्या. वर्षें ४
हिंदु सचित्र आर्मी वॉचेस किं. रु. १० ते १२५ पर्यंत.

हिंदु सचित्रटाईमपीसेस साधें, अलार्म, स्विंग, जपींगई. आंकड्यांमध्यें देवतांचीं चित्रें, मध्यभागीं दरबारी व अश्वारूढ श्रीशिवाजी, आणि श्रीशंकर पार्वतीसह. किं. रु. २॥–४–६–१० ते ३० पर्यंत. [४

जी० बी० नाईक आणि कंपनी. बिलासिसरोड, नाका भायखळा, मुंबई.

THE INDIAN GOVER. SECURITY MARRIAGE PROVISION FUND.

धी इनडीअन गव्हर्नमेंट सिक्युरिटी म्यारेज प्रोव्हीजन फंड.

मुंबई.

वरील फंडांत पूर्वी २५०० मेंबरांचीच संख्या ठेविली होती. ती भरून गेल्यामुळें व प्रवेश-अर्ज फार येऊं लागल्याकारणानें मेंबरांची संख्या ५००० पर्यंत वाढविली आहे. **वर्गणीचे दर** फारच कमी आहेत ह्मणजे दरमहा १।,२॥, ३॥, अथवा ५ रुपये भरल्यानें **लग्न** अगर **मौंजीबंधनाच्या खर्चा**साठीं अनुक्रमें २५०, ५००,७५० अथवा १००० रु० चें ठरीव बोनस मिळतें. दिसेंबर अखेरपर्यंत १७ मेंबरांस सदर्हूप्रमाणें बोनस मिळालें आहे. व दरमहिन्यास पुढेंही दिलें जाईल.

डेथबेनिफिटफंड. यांत कोणत्याही जातीच्या ६० वर्षांच्या आंतील स्त्री अगर पुरुष यांस डाक्टरचे सरटिफिकिटाशिवाय मेंबर होतां येतें. व मरणानंतर आपल्या वारसास २००० रु० पर्यंतचा पुरवठा करितां येतो. यांत ठरीव वर्गणी दरमाहा रु० १ आहे. प्रवेशफी रु० २—

वरील फंडाचा सर्व पैसा गव्हर्नमेंट सिक्युरिटीमध्यें ठेवण्याचा ठराव आहे. जास्त माहितीस्तव एक आणा पाठवावा. एजंट पाहिजेत.

पत्ता. नं. ५ कावसजी पटेलरस्ता, कोट, मुंबई.

Parulkar & Co.
सेक्रेटरीज्.

आह्मी देशावरील **व्यापाऱ्यांचा माल** येथें खपवून त्याच्या मोबदला इकडील माल देशावरास योग्य कमिशननें पाठवून देतों. तसेंच स्थावर मिळकती—घरें, बागबंगले वगैरेंवर **कर्ज मिळवून देतों.** विशेष माहितीस्तव खालीं सही करणारांस समक्ष भेटावें अगर लिहावें. [३–१२

पत्ता. नं. ५ कावसजी पटेलरस्ता, कोट, मुंबई.

Parulkar & Co.
एजंटस्.

नवीन पुस्तकें.

१ श्रीज्ञानदेवकृत अमृतानुभव ग्रंथ, श्रीहंसराजस्वामीकृत समओंवीबद्ध टीका व कठीण शब्दांचा कोश यांसह किंमत १२ आणे. ट. व व्ही.पी.ख.८३ आणे.

२ अमृतानुभव मूळ कठीण शब्दांच्या कोशासह. सांचा लहान खिशांत रहाण्याजोगा किंमत. ८६ ट. व व्ही. पी. ख. ८३ आणे.

भर्तृहरिकृत शतकत्रय (शृंगार, नीति व वैराग्य) वामनपंडितकृत श्लोकबद्ध टीका व सरळ मराठी भाषांतर यांसह किं० १२ आणे. ट. व व्ही.पी.ख.८४ आणे.

तिन्ही पुस्तकें ग. कृ. च्या छापखान्यांत जाड व घोंटीव कागदावर छापिलीं आहेत. प्रत्येक जातीच्या १० प्रती घेतल्यास १ प्रत जास्त मिळेल.

६] **काशीनाथ वासुदेव खांडेकर.**

पुस्तकविक्रीचें दुकान रामवाडी, पोस्ट मार्केट, मुंबई.

दत्तात्रय बळवंत पारसनीस.—

झांशीच्या राणीसाहेबांच्या चरित्राचे कर्ते ह्यांनीं लिहिलेला नवीन ऐतिहासिक ग्रंथ.

मराठ्यांचे पराक्रम.

मराठ्यांनीं आपल्या अतुल शौर्यानें व बुद्धिकौशल्यानें उत्तरहिंदुस्थानामध्यें जे प्रांत सर केले त्यांत बुंदेलखंड हा मुख्य होय. तेथील शूर क्षत्रीय नृपति राजा छत्रसाल ह्यानें जो गत ग्राह गजेंद्रकी सो गत भइ है आज ॥ बाजी जात बुंदेलनकी राखो बाजी लाज॥१॥ अशा दीनवाणीनें प्रार्थना केल्यावरून महाराष्ट्रवीरशिरोमणि **बाजीराव** पेशवे ह्यांनीं तिकडे जाऊन अद्भुत शौर्य गाजविलें व आपल्या कामगिरीबद्दल अनेक प्रांत संपादन करून तेथें मराठ्यांची सत्ता संस्थापित केली, तिचा इतिहास आजपर्यंत मुळींच उपलब्ध झाला नाहीं, तो सर्व मनोवेधक भाग अत्यंत परिश्रमानें जुनी माहिती मिळवून लिहिला आहे. ह्यामध्यें छत्रसाल राजाचें वीररसप्रचुर चरित्र, बाजीरावाचे पराक्रम, सुभेदार गोविंदपंत बुंदेले ह्यांच्या व त्यांच्या रणशूर पुत्रांच्या कर्तबगारी, पानपतच्या लढाईची हृदयद्रावक हकीकत, मराठ्यांचीं बुंदेलखंडांतील राज्यकारस्थानें, इत्यादि मनोरंजक व महत्वाची माहिती लेखी आहे. ही माहिती ग्रंथकारांनीं स्वतः बुंदेलखंडांत जाऊन गोविंदपंत बुंदेल्यांचे वंशज गुलसराईचे राजे व सागरचे सुभेदार ह्यांच्याकडून अस्सल कागद पत्र मिळवून लिहिली आहे. किंमत १। रुपया ठेविली आहे.

पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें:— सातारा येथें:—रा. रा. **म्यानेजर शुभसूचक प्रेस** ह्यामध्यें. मुंबई येथें:—रा. रा. **जनार्दन महादेव गुर्जर** ह्यांचे दुकानीं.

व्यापारी व ग्राहक ह्यांकरितां. **हरएकप्रकारचा माल** मुंबईत मिळणारा वक्तशीर बाहेरच्या लोकांस मिळण्याची सोय.

D. K. SANDU
RAMWADI, BOMBAY.

दत्तात्रेय कृष्ण सांडू ह्यांचें हरएक प्रकारचा माल मिळणारें, आणि माफक **अडत** घेऊन माल रवाना होणारें दुकानः—

रामवाडी, मुंबई.

आमच्या दुकानीं सावंतवाडीचा रंगित माल, **गंजिफा**, आयौषधी कारखाना—पनवेल येथील **औषधें, स्टेशनरी, वाकेरीचें भातें** असून सतारीची **तार**, सतारी, मृदंग, तबले, वक्षेकृत **कफनाशक गोळ्या**, इत्यादि पाठवितों.

वा. कृ. सांडू. दुकानदार—रामवाडी मुंबई.

कर्नाटकांतील औषधि.

आजपावेतों १८ वर्षांपासून वाग्भटादि अनेक ग्रंथांच्या आधारानें मीं स्वतः औषध तयार करून अनेक लोकांस देऊन अनुभव घेतले आहेत. आणि बहुत लोकांकडून दाखले मिळाले आहेत. या कर्नाटक प्रांतांत अनेक वनस्पति मिळत असल्याकारणानें ताज्या वनस्पतींपासून औषधें जेव्हांचे तेव्हां तयार करण्यांत येतात.

१ मदनकामेश्वरी पाक.

या पाकांत ४० वनस्पतींचा समावेश केला असून उत्तम धातुपौष्टिक, शक्तिवर्धक, फार रुचिकर व अनेक रोगनाशक आहे. २४ रु. भार शेरास किंमत रुपये २.

२ प्रवाळ, कस्तूरी, केशरमिश्रित, धातुपौष्टिक, व स्तंभक, अग्निवर्धक, कामोत्तेजक गोळ्या ४२ किंमत रुपये २.

३ **प्रवाळभस्म.** वनस्पतिपुटानें तयार केलें आहे. पौष्टिक, पित्तनाशक, धातुवर्धक. दर तोळ्यास किंमत रु. १८४

४ लोहमिश्रित मदनोत्तेजक गोळ्या. गोळ्या ४२ कि. रुपये. २.

छातींतील रोग, धातुविकार, नपुंसकत्व, स्वप्नावस्था, रक्तसंबंधी रोग, अग्निमांद्य, मेंदूसंबंधी रोग, इत्यादि अनेक रोग या गोळ्यांपासून नाश पावतात. विशेष माहिती औषधासोबत मिळेल.

सदरहू औषधाचे अनुपानकागद औषधासोबत. औषधाचे किंमतीशिवाय, ट. ख. पडेल. व्ह्याल्युपेबलमार्गानें पाठवून देऊं.

५ उत्तम वेलदोडे. बाजारभावाप्रमाणें पाठवून देऊं.

७] **पत्ता. रामप्पा सुब्राव वझे. कसबेकर** सिरसी.
जिल्हा, उत्तरकानड.

[illegible]

मे. (वर्षाची वर्गणी १८३ ट. खर्चासह. फुटकळ अंकास ७४.) १८९६.

केरळकोकिळ.

वर्षारंभ जानेवारी.

पु० १०] [अं० ९

विधिरेव विशेषगर्हणीयः करट त्वं रट कस्त्वापराधः ॥
सहकारतरौ चकार यस्ते सहवासं सरलेन कोकिलेन ॥१॥

जनार्दन महादेव गुर्जर बुकसेलर आणि पब्लिशर.
रामवाडी
मुंबई.

सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत.

रित्वाबद्दल हजारों सर्टिफिकिटें मिळालीं व नित्य मिळत आहेत. यांत अपायकारक पदार्थ बिलकूल नाहींत. वरील सर्व रोग जाऊन उत्तम गुण प्राप्त होण्यास या गुटिकांसारखें अप्रतिम औषधच नाहीं असें पूर्ण अनुभवावरून स्पष्ट म्हणतों. यांस पथ्यसेवनाची गरज नसतां या पाहिजे त्या दिवसांत घेतल्या तरी हटकून गुण करितात. यामुळें त्यांचा अतिशय खप सुरू आहे. गोळ्या रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम सहा रुपयांच्या किंवा त्यांहून कितीही जास्त गोळ्या घेणारांस बंगीचा सर्व टपालखर्च माफ आहे. त्यांचे आंत घेणारांस मात्र तो वेगळा सहा आणे पडेल. एकदम ३२ गोळ्यांस १ रु. ७० गोळ्यांस २ रु. १६० गोळ्यांस ४ रु. २६० गोळ्यांस ६ रु. ५२० गोळ्यांस १० रु.

थंडगार नेत्रांजन—हें अंजन स्तुतीस अत्यंत पात्र आहे, हें सतत दहा वर्षांच्या पूर्ण अनुभवानें कळवितों. यानें डोळ्यांचे साधारण विकार तर सहजच, परंतु दृष्टीचा समूळ नाश करणारे, तिमिरांध्य, वडस, बिंदु, फुलें, कांच, सारा, भोर, गळती, खुपऱ्या, जळजळ, कंड, फूट, चिकटा, ठणका व लाली इ० अनेक विकार, तत्संबंधी मस्तकशूलादि विकारांसह कितीही वयाच्या मनुष्यास कोणत्याही कारणांनीं प्राप्त झालेले नवीन किंवा जुनाट असले तरी नाजूक रीतीनें कोणतीही इजा न होतां बरे होतात. दृष्टि तीव्र व थंडगार राहते. हें चांगल्या दृष्टीच्या मनुष्यांनींही डोळ्यांत घातल्यास वरील विकार त्यांस बिलकूल होणार नाहींत. लहान मुलांस तर हें अत्यंत उपयोगी आहे. २ तो० ड० १॥ रुपया.

विशेष सूचना.—अलीकडे आंजलें व मुर्डी वगैरे गांवांतील औषधांच्या बऱ्याच जाहिराती सुरू आहेत व त्यांपैकीं कांहीं जाहिरातींत ज्या सह्या आहेत त्या बहुतेक आमच्याच नांवासारख्या भासण्याचा विशेष संभव आहे. तरी अशा लोकांशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं हें अवश्य लक्षांत ठेवून आमचीं औषधें **"कृष्णशास्त्री बिवलकर वैद्य. मु० आंजलें ता० दापोली जि० रत्नागिरी."** याच पत्त्यावर रोखीनें किंवा व्ही.पी.नें मागवावींत. अनुपान पत्रकसोबत असतेंच.

१२–१२]

केरळकोकिळ.

महासागर.

स्पंज.

स्पंज हा पदार्थ आमच्या देशांतील पूर्वकालीन लोकांस माहीत नव्हता असें दिसतें. तथापि, सांप्रत बऱ्याच लोकांनीं तो ऐकिलेला व पाहिलेलाही आहे. दवाखान्यांत वापरणाऱ्या लोकांस तर त्याचा परिचय विशेष. **स्पंजा**चा रंग तपकिरी असून त्याचा आकार उंड्यासारखा, सभोंवार छाटून काढल्यासारखा, व क्वचित् दुमसे दुमसे आल्यासारखा असतो. तो लोंकरीसारखा मऊ असून, हातांत धरून गच्च आंवळला तर, पाहिजे तितका चेपला जातो; आणि सोडला ह्मणजे पुन्हा जशाचा तसा होतो. **स्पंज** हा लोकरीसारखाच बारीक बारीक तंतू एकत्र होऊन झालेला दिसतो. त्यास बारीक बारीक हजारों छिद्रें असतात, किंवा तो सर्व छिद्रयुक्तच असतो ह्मटलें तरी चालेल. शिवाय,

मधून मधून त्यास बरींच मोठमोठीं भोंकेंही असतात. ह्यामुळें पाणी, रक्त अशासारखे पातळ पदार्थ, ब्लाटिंगपेपराप्रमाणें तो तेव्हांच शोषण करून घेतो. परंतु ब्लाटिंगपेपरामध्यें–किंवा टीपकागदामध्यें–पातळ पदार्थ शाईसारखा फारच थोडा आकर्षण केला जातो. तो अधिक ओढून घेण्यास त्याजवळ सांठा नसतो. **स्पंजा**ची गोष्ट ह्याहून निराळी आहे. त्याच्या साधारण चेंडूयेवढ्या तुकड्यामध्यें शाई, पाणी, रक्त अशासारखा पातळ पदार्थ एका ग्लासाहून अधिक शोषून घेण्याचें सामर्थ्य असतें. व तो पिळला ह्मणजे पातळ पदार्थ सर्व पुन्हा जशाचा तसा बाहेर पडतो. हा विलक्षण गुण त्याच्या अंगीं असल्यामुळें, त्यास भारी किंमत पडते तरी, लोक अनेक कामांकडे त्याचा उपयोग करतात. हें **स्पंजा**चे गुणधर्म व आकार ह्यांविषयीं झालें. परंतु **स्पंज** हा काय पदार्थ आहे हें फारच थोड्यांस माहीत असेल. तो एका प्राण्याचा सांपळा आहे, असें ऐकलें ह्मणजे मनाला केवढा चमत्कार वाटतो! परंतु **स्पंज** हा एक जलस्थ प्राणी आहे, ह्याबद्दल अलीकडच्या शोधांवरून कांहीं संशय उरला नाहीं. ह्यास्तव ह्या अद्भुत प्राण्याची माहिती आज आह्मी आमच्या वाचकांस सादर करतों.

प्राचीन वनस्पतिशास्त्रज्ञ लोक, **स्पंज** हा आपला विषय आहे असें समजून त्याची हलक्या जलवनस्पतींच्या कोटींत गणना करीत, ह्यांत कांहीं मोठेंसें नवल नाहीं. कारण, त्याचा सबंध आकार निखालस झाडासारखा–ह्मणजे निवडुंगाच्या झाडाची उपमा त्यास अगदीं बरोबर साजेल असा–असतो. तो निवडुंगाप्रमाणेंच समुद्रांतील खडपावर मुळें धरून वाढतो. आणि सर्वप्रकारचीं वनस्पतीचीं लक्षणें त्यामध्यें दृष्टिगोचर होतात. ह्यामुळें **स्पंज** हा प्राणी आहे, हें एकाएकीं कोणाच्या लक्ष्यांत येत नाहीं. तो जिवंत असला तरी, सजीवपणाचें चिन्ह त्यामध्यें कांहींच दिसून येत नाहीं. तुह्मी त्यास पाहिजे तें करा; मारा; तोडा; कीं तापलेल्या सांडसानें डागा; त्यामध्यें यत्किंचितही भीतीचें किंवा चलनवलनाचें चिन्ह दिसून येत नाहीं. पण **स्पंज** हा प्राणी असल्याचा एक मोठा सबळ पुरावा आहे. तो असा कीं, प्राण्याचें चामडें, केस, किंवा लोकर हे पदार्थ जाळले असतां, त्यापासून एक विशेष प्रकारची दुर्गंधी उत्पन्न होते. ही दुर्गंधी प्राणिजपदार्थांपासूनच उत्पन्न होते, इतर कोणत्याही

वनस्पतिजन्य किंवा खनिजपदार्थापासून उत्पन्न होत नाहीं. **स्पंजा**चा एक तुकडा घेऊन तो जाळला असतां, ही दुर्गंधी विशेषच उत्पन्न होते.

स्पंजाच्या देहाची रचना व उत्पत्ति फार चमत्कारिक आहे. **स्पंजा**चें जें झाड किंवा शरीर ह्मणा—अथवा त्या हजारों प्राण्यांचा समुदाय ह्मणा—ज्या खडकावर समुद्राच्या तळाशीं उगवलेलें किंवा धरलेलें असतें, तेथपासून पाण्याच्या प्रवाहानें बारीक बारीक रजःकण निघून ते दूर दूर जातात. हींच त्या **स्पंजा**चीं अंडीं किंवा बीजें होत. ह्यांचा आकार शिजविलेल्या साबूदाण्याप्रमाणें, किंवा राजगिऱ्याप्रमाणें पारदर्शक व बिलबिलित असतो. हींच अंडीं समुद्राच्या पाण्यानें पोसतात, व त्यांत जीवनधर्म येऊन तीं इतस्ततः भ्रमण करूं लागतात, आणि बरासा खडक चांगल्या खोल पाण्यांत असलेला पाहून त्यास तीं चिकटतात. तेथें वारुळांतील मुंग्यांप्रमाणें हजारों प्राणी उत्पन्न होऊन निवडुंगाच्या फण्यांप्रमाणें **स्पंज** वाढूं लागतो. **स्पंज** अगदीं कोंवळा असतो, तेव्हां अंड्यांतील पांढऱ्या बलकाप्रमाणें बिलबिलित असतो. व मधून मधून एक एक शिजविलेल्या साबूच्या दाण्याप्रमाणें पारदर्शक गोळी दिसत असते. ही एक एक गोळी ह्मणजे निरनिराळा प्राणी होय.

सूक्ष्मदर्शक यंत्रांतून पाहिलें तर ह्यांच्या देहांतील रचना, व प्राणजीवनधर्म कांहीं चमत्कारिकच दिसून येतात. कोणत्याही प्राण्याची ज्ञानशक्ति व इच्छा, हीं त्याच्यांतील एका विशेष रसावर अवलंबून असतात. ह्या रसाला 'ज्ञानरस' असें नांव आहे. हा रस ज्या अवयवामध्यें भरलेला असतो, तो अवयव, प्राणिशास्त्रवेत्ते फार महत्त्वाचा समजतात. मनुष्यादि उच्च जातीच्या प्राण्यांना हा अवयव अगदीं निराळा असतो. त्यासच मेंदू असें ह्मणतात. ह्या मेंदूपासून केसासारखे बारीक बारीक ज्ञानतंतू निघून ते सर्व शरीरावर पसरलेले असतात, आणि त्यांच्यांतून हा रस चहूंकडे वाहत असतो. **स्पंजा**ची पारदर्शक गोळी ह्मणून जी वर सांगितली, तोच त्याचा मेंदू, तोच त्याचा देह, व तेंच त्याचें पोट होय. त्यांत ज्ञानरस भरलेला सूक्ष्मदर्शक यंत्रांतून स्पष्ट दिसतो. ह्याची आकृति कांहीं अंशीं घोड्याच्या नालासारखी असून, त्याच्या भोंवतीं पंख्याला लावल्याप्रमाणें झालर असते. चपट्या बाजूकडे मात्र ती असत नाहीं. कारण, तेंच त्याचें तोंड होय. ह्या तोंडाच्या दोहों बाजूंस मिशांप्रमाणें बरेच लांब तंतू अस-

तात. ह्या तोंडावाटे, सूक्ष्मदर्शक यंत्रांतून पाहिलें तर, एकसारखा पाण्याचा प्रवाह मोठ्या वेगानें आंत जात आहे, व बाहेर पडत आहे, असें दृष्टीस पडतें. हाच ह्या प्राण्याचा श्वासोच्छ्वास होय. ह्याच्याच योगानें त्याच्या देहांतील रुधिराभिसरणाची क्रिया चालते.

एका **स्पंजां**त अशाप्रकारच्या हजारों प्राण्यांचा समुदाय असतो, ह्मणून वर सांगितलेंच आहे. त्यांतून एखादा प्राणी, पाण्याच्या प्रवाहानें वगैरे बाहेर पडला, तर दुसऱ्या कोणत्या तरी खडकास चिकटतो. ह्मणजे आपल्या मिशांनीं तो खडक धरतो. आणि लगेच दुसरे तशाच प्रकारचे प्राणी, त्याच्या रसापासून उत्पन्न होऊन त्याचें झाड, किंवा **स्पंज** बनूं लागतो. खालच्या बाजूस असणाऱ्या प्राण्यांच्या खडकास धरून असणाऱ्या ज्या मिशा, तींच त्या झाडांचीं मुळें होत. एका **स्पंजां**त निरनिराळे प्राणी आहेत ह्मणून सांगितलें तरी, ते सर्व मिळून एकच प्राणी असल्याप्रमाणें एकमेकांस सांधलेले असतात. ह्मणजे त्या प्रत्येकाच्या भोंवतालची झालर, व बलक हीं सर्व सांधलेलींच असतात. आणि मधून मधून जाळीप्रमाणें असणाऱ्या लहानमोठ्या भोंकांतून पाणी आंत घेण्याचा, व बाहेर सोडण्याचा झपाटा चाललेला असतो. पण ही क्रिया हा प्राणी जिवंत असेपर्यंतच चालते, ती मेल्यावर चालत नाहीं. **स्पंज** जून झाला ह्मणजे हा प्राणी मरतो, किंवा हे प्राणी मरतात, असें ह्मणावें. **स्पंज** मेल्यानंतर त्याचें शिंपल्याप्रमाणें किंवा शंखाप्रमाणें राहाण्याचें राहिलेलें जें कवच, तेंच हे आपल्या उपयोगांत येणारे **स्पंज** होत. शंखांतले प्राणी किंवा समुद्रफेसांतले प्राणी, मरण पावले ह्मणजे त्यांचीं कवचें समुद्राच्या किनाऱ्यास येऊन पडतात, तसें **स्पंजा**चें मात्र सहसा होत नाहीं. तो समुद्राच्या अंतर्भागांत खडकासच खिळून राहिलेला असतो. कालांतरानें पाण्याच्या प्रवाहानें बाहेर पडलाच, तर त्याचे तुकडे कुजून छिन्नविच्छिन्न होऊन बाहेर पडतात. ते अर्थातच निरुपयोगी असतात. ह्मणून कामास लागणारे **स्पंज** काढण्यासाठीं खोल समुद्राच्या तळीं जावें लागतें.

स्पंजाच्या मुख्य जाती तीन आहेत. एक **शृंगमय स्पंज;** दुसरे **गारेचे स्पंज;** आणि तिसरे **चुनखडूचे स्पंज.** आपण जे मऊ, लवचीक, व पिंवळसर रंगाचे **स्पंज** वापरण्यास घेतों, ते शृंगमय होत. त्याचा एक लहानसा तुकडा घेऊन त्यांत सूक्ष्मदर्शक यंत्रानें पाहिलें तर, तो सर्व,

शृंगमय पदार्थाचे बारीक बारीक तंतू एकमेकांत गुंतून झाला आहे, असें दिसतें. हें शृंगमय तंतूंचें जाळें नेत्रांस फारच रमणीय दिसतें. ह्यांतील तंतू त्या प्राण्याच्या अंगांतील रसापासूनच तयार झालेले असतात. दुसरे गारेचे **स्पंज** असतात, त्यांचें झाड मोठें शोभिवंत असतें, ह्मणून तीं श्रीमंत लोक मुद्दाम विकत घेऊन आपल्या दिवाणखान्यांत, कपाटांत किंवा टेबलावर ठेवतात. द्वीपांतरास जाणाऱ्या गलबतावरचे खलाशी, येतांना हीं झाडें विकावयासाठीं बरोबर घेऊन येतात. कोचीस येणाऱ्या गलबतांवर अशा प्रकारचीं मोठीं मजेमजेचीं झाडें कधीं कधीं दृष्टीस पडतात. आह्मींही अशा प्रकारचीं एक दोन झाडें खरेदी केलीं होतीं. तिसरे चुनखडूचे **स्पंज** असतात, त्यांचींही झाडें दिसण्यांत बरीं असतात, तरी तीं अतिशय ढिसूळ असल्यामुळें फार दिवस टिकत नाहींत. केव्हां केव्हां हे तिन्ही जातींचे **स्पंज** एकमेकांस चिकटलेले आढळतात, आणि त्यांचे ते सांधे अगदीं बेमालुम असतात. कित्येकांचें ह्मणणें असें आहे कीं, शृंगमय **स्पंज**च फार दिवसांचे जुने झाले ह्मणजे त्यांचेच चुनखडूचे व गारेचे स्पंज होतात.

ह्यांशिवायही रंगारूपांत सुंदर सुंदर अशा दुसऱ्या अनेक जाती आहेत. पण त्या सर्व शृंगमय जातींपैकीं असतात. कितीएक **स्पंज** पेल्याच्या आकाराचे असतात. ह्या जातीचा एक **स्पंज** वरील चित्रांत दाखविला आहे. कित्येक **स्पंज** फुलाच्या आकाराचे असतात. कित्येक तांबडे, आबाशाई व जांभळेही असतात. **स्पंजा**ची वाढ फार झपाट्यानें चालते. भूमध्यसमुद्रांत **स्पंज** फार सांपडतात. ह्मणून प्रतिवर्षी तेथें मोठा व्यापार चालतो. सीलोनांतील मोत्यांच्या कारखान्याप्रमाणेंच **स्पंज** काढण्याची वगैरे तऱ्हा आहे. प्रत्येक पाणबुडा समुद्राच्या तळाशीं जाऊन **स्पंजा**चीं झाडें उपट्टून वर आणतो. सर्वांमध्यें ग्रीक लोक व सीरियन लोक **स्पंज** काढणारे मोठे वस्ताद आहेत. इतर समुद्रांतूनही अनेक ठिकाणीं **स्पंज** आढळतात. पण फार प्रसिद्ध कारखाना असा भूमध्यसमुद्रावरचाच. असो. एकंदरींत परमेश्वर पदार्थ निर्माण करणारा भला, आणि मनुष्य त्याचा उपयोग करणाराही भला!

पनवेल येथील

आर्यौषधींचा कारखाना.

(मा. अं. चालू.)

तात्पर्य काय कीं, राजाश्रयाचा अभाव झाल्यामुळें आमचें प्राचीन वैद्यक व दिव्यौषधी उदयास येणें मोठ्या भगीरथप्रयत्नाचें काम होऊन राहिलें आहे. आधीं यथाशास्त्र वैद्यकी शिकणें व त्याचा अनुभव घेत बसणें हें कांहीं कमी प्रयासाचें काम नाहीं. त्यांत वनस्पति, धातु यांचें शोधनमारण करणें व तेलें, भस्में, चूर्णें तयार करणें, भट्टया लावणें ह्यांचा समावेश केला ह्मणजे कसलाही उद्योगी पुरुष असला तरी त्याची छाती दडपून जाईल, ह्यांत शंका नाहीं. चिताऱ्यानें आपल्याच हातानें रंग घोटणें व कलमें बांधणें, लेखकानें आपणच शाई करणें व लेखण्या तयार करणें, ह्याहूनही वैद्यानें औषधें तयार करणें ही जिकीर व यातायात फार मोठी आहे. कारण औषधें हीं अनंत आहेत. पण कितीएक दीर्घोद्योगी व दृढनिश्चयी महात्मे असे असतात कीं, शेंकडों अडचणी केवळ स्वपराक्रमानें दूर सारून भगीरथप्रयत्नानें रसातळास गेलेल्या शास्त्ररत्नांचा उद्धार करतातच करतात. अशा दीर्घोद्योगी व सद्धेतुसाधक मंडळीपैकींच वे० शा० **कृष्णशास्त्री पुराणिक वैद्य,** व रा० रा० **विष्णु कृष्ण पुराणिक,** कारखान्याचे चालक ही पितापुत्रांची जोडी आहे.

आमच्या लोकांत कर्तबगारी नाहीं; हिंमत नाहीं; शिस्त नाहीं; युरोपियन लोकांसारखी टापटीप नाहीं; दूरदर्शित्व नाहीं; नवीन कल्पना काढण्याचें सामर्थ्य नाहीं, असें ज्यांचें मत असेल त्यांनीं वर सांगितलेल्या गृहस्थांनीं **पनवेल** येथें स्थापन केलेला **आर्यौषधींचा कारखाना** अवश्य जाऊन पहावा, ह्मणजे त्यांच्या मनाचें परिपूर्ण समाधान होईल. येवढेंच नव्हे पण प्राचीन वैद्यशास्त्राविषयीं व जुन्या पद्धतीच्या वैद्यांविषयीं पूज्यबुद्धि व आदर उत्पन्न होईल. तशी ज्यांना सवड होणार नाहीं, त्यांच्या मनांत त्याविषयीं थोडी तरी कल्पना व्हावी, ह्मणून त्याची थोडीशी हकीकत आज आह्मी देत आहों.

ह्या कारखान्याची जागा त्यांच्या घरानजीकच असून चांगली प्रशस्त आहे. राहात्या घराच्या पूर्वेकडील इमारत एकमजली असून तींत मुख्य

वैद्यांची बैठक व औषध देण्याचें स्थळ आहे. शास्त्रीबुवा वयानें पोक्त असून विद्वान्, तरतरित, नम्र व बोलण्यांत चतुर असे दिसतात. कितीही रोगी आले तरी त्यांचें यथोचित आदरातिथ्य करणें, त्यांची मनापासून चिकित्सा करणें, त्यांचीं लक्षणें ऐकून घेणें, त्यांवर यथाशास्त्र औषधयोजना करणें इत्यादि कामांत आस्थापूर्वक गुंतून राहिल्याचें दिसून येतें. जुन्या वैद्यांवर असा एक आरोप आहे कीं, ते आपला धंदा गुप्त ठेवतात. ह्मणजे रोग कोणता, कशापासून झाला हेंही सांगत नाहींत, व त्यावर कोणत्या औषधाची योजना केली, तेंही कळवीत नाहींत. कसली तरी गोळी, किंवा पूड, किंवा भस्म देतात ह्मणजे झालें. तसा छपवाछपवीचा प्रकार येथें बिलकुल नाहीं. येथें इंग्रजी दवाखान्याप्रमाणेंच रोग्याची प्रिस्क्रिप्शन–ह्मणजे लेखी तक्ता तयार करतात, व त्यांत रोग, निदान, लक्षणें, औषध इत्यादिकांचें सविस्तर वर्णन असतें. त्यांत भस्म किंवा मात्रा नमूद असेल तर ती कोणच्या ग्रंथाधारें केली वगैरेचा तपशील त्यांच्या प्रसिद्धिपत्रकांत असतोच.

आंतील बाजूस औषधें देणाऱ्यांच्या खोल्या आहेत. तेथें सुद्धां स्वच्छता, टापटीप अगदीं इंग्रजी दवाखान्याच्या धर्तीवर ठेवलेली असते. औषधांच्या कपाटांत आसवांच्या, अरिष्टांच्या बाटल्या; भस्माच्या व गोळ्यांच्या लहान लहान बाटल्या, नांवांच्या चिठ्ठ्या वगैरे लावून फार सुरेख ठेविल्या असतात. वजनाचे कांटे, खलबत्ते, चाकू, काऱ्या वगैरे सामान अगदीं जेथल्यातेथें व अगदीं ठाकठिकीनें ठेवलेलें असतें. टेबलाप्रमाणेंच उंच ग्यालऱ्या करून त्यांवरून औषधें देण्यांत व ठेवण्यांत औषध देणारे सारखे गुंतून राहिलेले असतात. राहत्या घराच्या पश्चिमदिशेला कारखान्याची पृथक् व प्रशस्त जागा आहे त्यांत उत्तरेच्या बाजूला औषधें तयार करण्याची दुसरी इमारत आहे. ही एक मजल्याचीच असून तींत नानाप्रकारच्या भट्ट्या, यंत्रें वगैरे काटतैलें तयार करण्याची मोठमोठीं पातेलीं व हौद लावून ठेवलेलीं आहेत. थोड्या जळणांत अधिक उष्णता कशी उत्पन्न करावी हें ह्यांत फार चतुराईनें दाखविलें आहे. त्यावरील निरनिराळीं पात्रें ठेवण्याची तजवीज, व जळजळीत धातुरसाचीं पात्रें वगैरे उतरण्याची तजवीज, निरनिराळ्या

प्रकारचीं नूतन केलेलीं गांवठी अग्निधारक औषधी यंत्रें, हीं पाहिलीं ह्मणजे चालकांच्या यांत्रिक कुशलतेबद्दल कौतुक वाटल्यावांचून राहत नाहीं.

पश्चिमेच्या बाजूला दोनमजली इमारत आहे. तेथें सर्व प्रकारच्या औषधींचा मोठा संग्रह, कागदपत्रांचें रेकार्ड-दप्तर व चालकांची (शास्त्रिबुवांचे चिरंजीव रा० रा० विष्णु कृष्ण पुराणिक ह्यांची) कचेरी असते. नवीन औषधें तयार करणें, वनस्पति वगैरे संग्रह करणें, पत्रव्यवहार व हिशेब ठेवणें इत्यादि सर्व कामांवर ह्यांची देखरेख असते. ह्या व्यवस्थेच्या कामांत हे गृहस्थ इतके दक्ष आहेत कीं, तसा सरकारी कामदारही असणें कठीण. कोणाचा दहा वर्षांच्या पूर्वी झालेला जरी पत्रव्यवहार असला, तरी ते तो तत्काल पुढें आणवितात; इतकी ह्यांची विल्हेवारी सुरेख व व्यवस्थेशीर आहे. वडिलांच्या व ह्यांच्या बैठकीच्या जागेंत अंतर असल्यामुळें साधारण सलामसलती नेहेमीं बहुतकरून माणसाच्या हातीं चिठ्ठचा देऊनच चालतात.

ह्यांचे **पत्रोत्तर–ठरीववावी, रुग्णपत्रिका** व **रोजनिशी** येवढे तीन छापील तक्ते पाहिले, तरी सुद्धां त्या पुरुषाच्या उद्योगशीलतेची धन्य वाटल्यावांचून राहत नाहीं. 'पत्रोत्तर–ठरीववावी' ह्या तक्त्यांत पत्रें पाठविणारांनीं पत्रें कशीं पाठवावींत तें सुचविलें आहे. नंतर औषधाचा टिकाऊपणा वगैरे बऱ्याच बाबी आहेत. पण त्यावरून व्याधिग्रस्तांस व गिऱ्हाइकांस पुष्कळच साह्य होण्यासारखें आहे. दुसरा तक्ता **'रुग्णपत्रिका'** हा होय. ह्यांतील माहिती किती ह्मणून सांगावी? रोग्याचें नांव, गांव, काय होतें? केव्हांपासून? कारण कांहीं माहिती आहे काय? पूर्वी औषधोपचार काय केले? इत्यादि पहिले प्रश्न. नंतर प्रत्यहीं कोष्टकांत भरण्याच्या बाबी. चालू उपचार, आरोग्यसूचक लक्षणें, झोंप गाढ, स्वप्न, रोग्याचें वजन शेर, आंगांतील उष्णतेचे अंश, इत्यादि खेड्यापाड्यांतील लोकांसही आपल्या प्रकृतीचें मान बरोबर कळवितां यावें ह्मणून विकाराचे व आरोग्याचे परमावधीचे शंभर अंश कल्पून त्या प्रमाणानें विकार व आरोग्यता रोग्यानें कळवावी. ही युक्ति किती तरी महत्वाची होय हें विचाराअंतीं वाटल्यावांचून राहात नाहीं. ह्याशिवाय प्रत्येक बाबीवर खुलासेवार टीपा आहेत त्या वेगळ्याच. तिसरा तक्ता रोजनिशी. ही फारच पाहण्यासारखी–नव्हे तारीफ करण्यासा-

रखी आहे. हिच्यांत जमाखर्चाचा सर्व तपशील, हजर नोकरसंख्या—लोहार, सुतार, कारकून, वगैरे तपशीलासह—औषधें तयार होत असलेल्यांचीं नांवें, भट्ट्यांची हजेरी—गजपुट, वालुकायंत्र, बाष्पयंत्र, अग्निशिशी इत्यादि—नवीन औषधें अनुभवाकरितां तयार झालीं तीं, नवीन औषधांची जरूरी, औषधासंबंधी अनुभव कळविणाराचें नांव, नवी युक्ति काढण्याविषयीं प्रयत्न—तपशील—कारखाना पाहण्यास आलेल्या लोकांचीं नांवें व पत्ता, बाहेरगांवाहून आलेले रोगी व पाहुणे, पत्रव्यवहार, शाळेचा शिक्षणक्रम, विद्यार्थ्यांची हजेरी वगैरे तपशील, औषधांची लागवड व अनुभव, कारखान्यासंबंधी लोकमत, चालकांच्या वेळाची खासगी डायरी—हींत सकाळीं ६ पासून तों रात्रीं सुद्धां दोन तासांचीं कोष्टकें आहेत. इतकीं कोष्टकें प्रत्यहीं जो बिनचूक रीतीनें भरून फायलांस ठेवतो, त्या पुरुषाची पाठ किती थोपटावी हें कांहीं समजत नाहीं. इतकीं सर्व नित्याचीं कामें सांभाळून वनस्पतींची नवी लागवड करून त्यांचा अनुभव पहाणें, नवीन कल्पना काढणें ह्मणजे कांहीं सामान्य उद्योग नव्हे. अशा भगीरथ प्रयत्नांशिवाय, आमच्या जीर्ण कलांचा उद्धार व्हावयाचा नाहीं. **चालकां**च्या इमारतींतील औषधांचा संग्रह पाहूनही जीव चकित होऊन जातो. एका बाजूला मुरंब्यांच्या व पाकांच्या मोठमोठाल्या बरण्या ठेंचून लागल्या आहेत; एका बाजूला अरिष्टांच्या व आसवांच्या बरण्यांच्या ओळी; एका बाजूला भस्मांच्या व चूर्णांच्या कुप्या; एका बाजूला कडू पडवळांची रास; एका बाजूला वावडिंगांची रास; एका बाजूला कुड्याचीं पाळें; एकीकडे पळसाची फुलें पडलीं आहेत, तर एका बाजूला कुवारकांडें; एका बाजूला नागरमोथे, तर एका बाजूला काढेचिराईत. एका बाजूला रित्या बाटल्यांचा ढीग, तर दुसऱ्या बाजूस बुचांचे गठ्ठे. असे एक कीं दोन? काय काय ह्मणून सांगावें? प्रत्यक्ष अश्विनीकुमार तेथें आले तर ते सुद्धां प्रसन्न होतील, मग आह्मी खुष झालों ह्मांत नवल तें काय?

'औषधें घेण्याची रीति' ह्मणून त्यांनीं एक स्वतंत्रच दोन आणे किमतीचें पुस्तक छापलें आहे. त्यावरून त्यांच्या कारखान्यांत शास्त्रोक्त रीतीनें तयार केलेलीं २४ भस्में; ५२ रसायनें; ८ कुपीस्थ रसायनें; २७ गुग्गुलगुटिका; १७ चूर्णें; ९ पाक; १८ आसवें; १९ सत्त्वें व क्षार;

११ तैलें व मलमें; ४ अर्क; व ९० तऱ्हेचीं अनुभविक औषधें तयार आहेत असें समजतें. ह्मणजे एकंदर संख्या अडीचशें सुमार झाली. ह्यांशिवाय पाहिजे तें नवें औषधही सांगितलेल्या ग्रंथाप्रमाणें थोड्या मुदतींत यथाशास्त्र करून देण्याचें त्यांनीं अभिवचन दिलें आहे. ह्या औषधांबद्दल नवीन शोधाची तयारी चालू आहे त्यावरून आजमितीस आणखीही औषधें तयार झालीं असतील. पुस्तकांत आणखीही पुष्कळ उपयुक्त माहिती दिलेली असून साधारण रोगांवर अनुपानेंही सांगितलीं आहेत. हें पुस्तक वाळगण्यानें सुद्धां संसारी मनुष्यास पुष्कळ उपयोग होण्यासारखा आहे. कारण, त्यांत, आरोग्य राखण्याच्या संबंधानें साधारण सूचनाही पुष्कळ आहेत.

आह्मी प्रत्यक्ष तेथें गेलों होतों तेव्हां दक्षिणेकडील नव्या इमारतीचें काम चाललें होतें. सदरहू इमारत सुमारें ४० हात लांब व १९ हात रुंद आहे व खर्चाचा अजमास आठ हजार रुपयांचा केला आहे. चारही बाजूंच्या पायामधील सुमारें सहा फूट दगड फोडून खालीं तळघरासारखी जागा हवा व उजेड आंत यावा ह्मणून सभोंवतीं मोठाल्या खिडक्या ठेवून तयार केली आहे. यांत चूर्णें कुटणें, औषधिमात्रा खलणें, व यांसंबंधी यंत्रसामुग्री तयार करून ती व्यवस्थित राहावी अशा सोयीची केली आहे. खालील जमिनीमध्यें सबंध दगडांची फरशीच असल्यामुळें, पातळ औषधी गाळणें, पिळणें वगैरे क्रिया या ठिकाणीं केल्यानें समयीं त्या सांडल्या अगर ऊत येऊन बरण्या, बाटल्या फुटल्या तरी न जिरतां तें पातळ औषध भरतां यावें अशी सोय आहे. उन्हाळ्यांत उष्णतेची बाधा या ठिकाणीं बिलकूल होणार नाहीं, ह्मणून थंड हवेवर जागा पालटण्याप्रमाणें येथें राहून कारखान्याचें काम पाहतां येईल. सभोंवतालचें पाणी आंत येऊन त्रास होऊं नये ह्मणून भितीच्या बाहेर दुसरी भित घालण्याचा विचार आहे. तळमजल्याचे वरील भाग ह्मणजे बाहेरून दिसणारा पहिला मजला यांत दप्तर, पोष्ट व रेल्वेमार्फतचा व्यवहार, आल्यागेल्या पत्रांची व्यवस्था ज्याच्या त्याच्या नांवाच्या फाइली, निरनिराळे देश, जिल्हे व गांवपरत्वें ठेवणें, व इतर वैद्यकपुस्तकसंग्रह व पुस्तकलेखन इत्यादि सर्व व्यवस्था व्हावी अशी तजवीज करावयाची आहे. यावरील भागही योग्यकाळीं मजला देतां येईल अशा

तजविजीनें तयार करावयाचा आहे. ही इमारत इतक्यांत तयार झाली असावी. एकंदरींत सर्व कारखान्यांत मिळून चाळीस पन्नास हजार रुपये सुमारें गुंतलेले असावेत असा तर्क आहे. पण ही सर्व इष्टेट आपल्या घरांत मुरावी, आपल्या पोरांबाळांनीं मोडून खावी, असा शास्त्रिबुवांचा मुळींच उद्देश नाहीं. त्यांचें ह्मणणें ह्या कारखान्यांत वैद्यकीय शाळा असावी; रोग्यांची राहाण्याची वगैरे सोय व्हावी; व विद्यार्थ्यांत जो उत्तम विद्वान् व कारखाना चालविण्यास योग्य ठरेल त्यानें हा सर्व कारखाना पुढें चालवावा. मग तो विद्यार्थी आपल्या घरांतला असो कीं बाहेरचा असो. अशा प्रकारचा कामधेनुसारखा कारखाना स्वत्वनिवृत्तीनें सार्वजनिक संस्थेकडे देणें हें औदार्य कांहीं सामान्य नव्हे. इतकेंच नाहीं तर असें घडून आलें ह्मणजे विद्वान्, पुढारी, देशाचे बोलके हितचिंतक ह्यांनीं हा धडा वाढविण्यासारखा होय व अशाच मार्गानें झाली तर स्वदेशोन्नति होईल.

ह्या कारखान्याची कीर्ति ऐकून तो पाहण्यासाठीं आह्मी मुद्दाम गेलों होतों. त्यासमयीं तेथील चालकांचें व आमचें बरेंच संभाषण झालें. त्यांत त्यांनीं आपल्या कारखान्याविषयीं जे उद्गार काढले, ते अत्यंत दूरदर्शित्वाचे, खऱ्या कळकळीचे व आर्यवैद्यकाच्या पुनरुज्जीवनास सहाय करणारे असे आहेत. ते ह्मणालेः—

" कोणत्याही धंद्यांत कर्त्याचें मन माघार घेईल असा प्रकार होतां कामा नये. फायदेशीर धंदे लयास जातात ते, आहाराबाहेर खर्च केल्यानें जातात, त्याशिवाय जात नाहींत. कोणत्याही संस्थेचा उत्कर्ष व्हावयाला, तिचे चालक पुरुष एकापुढें एक चांगले निपजावे लागतात. ह्मणून संततिपरंपरेनें एखाद्या संस्थेचा निरंतर उत्कर्ष होईलच असें मानतां येत नाहीं. आर्यधर्मानें सर्व पुत्रादिक संततीला सारखें मानण्याविषयीं आज्ञा केली आहे. त्यांत त्याचा हेतु परस्परांवर परस्परांचें अत्यंत प्रेम राहून संकटसमयीं परस्परांस मदत करावी असा आहे. पण त्या आज्ञेचा परिणाम आजच्या स्थितीला फारच भयंकर होऊं लागला आहे. ह्मणजे पुत्रादिकांची सर्व इष्टेट वाढत्या संसारांत निरुद्योगीपणानें किंवा आपसांतील कलहानें सरकारी स्टांप, वकील, कोर्ट, साक्षीदार यांच्या पायीं नष्ट होऊन बुद्धि, युक्ति, वेळ हींही वाईट मार्गाक-

डेसच खर्च होतात. जहागिरदारांसारखे, इनामदारांसारखे थोर लोकही ह्यायोगें धुळीस मिळतात. मग साधारण प्रापंचिकांचा तो किती निभाव लागणार ? सात्विक कुटुंबांची अशा प्रकारें वाताहात झालेली पाहिली ह्मणजे ह्या समसमान दायविभागाच्या धर्माज्ञेच्या परिणामाबद्दल वाईट वाटतें. व ह्या बाबतींत मलबारांतील दायविभागाच्या चाली व आज्ञा मोठ्या फायदेशीर वाटतात. आमच्यांतील दायविभागांच्या चालीनें कुटुंबांतील संपत्तीचाच नाश होतो असें नाहीं, तर एका कुटुंबांतील मनुष्य, सहोदर इत्यादिक, ज्यांची मदत मिळावयाची, ते शत्रु बनून सर्वतोपरी हानीस कारण होतात. इतकेंच नव्हे, तर गांवांत अगर देशावरही आप्त, स्नेही, ह्या सर्व मंडळीमध्यें मोठ्या दुहीचे तंटे पडतात. अशा स्थितींत एकी होणार कशी ? एकी करा, एकी करा, ह्मणून हल्लीं जो कंठशोष चालला आहे, त्याच्या मुळाशीं आमच्या मतें हें आपआपसांतील द्वैतच कारण आहे. "

" कुटुंबाच्या व समाजाच्या घाताला जें कारण, तें उद्योगी संस्थेला किती बरें घातक होणार ? ह्याच्या पायांत कितीकांचे उद्योग रसातळास गेले आहेत. उत्तेजन देणें एका बाजूस राहिलें, पण त्रास न देणें एवढें तरी त्यांनीं करावें कीं नाहीं ? पण तेवढें सुद्धां त्यांच्यानें होत नाहीं. व कायदे असे कांहीं चमत्कारिक आहेत कीं, त्यांतून पाहिजे तसा अर्थ निघूं शकतो. ह्याकरितां ज्याला आपल्या संततीनें भांडण तंटा न करितां रहावें, अशी इच्छा असेल, अशा कर्त्या पुरुषानें सर्व मिळकत एके ठिकाणीं ठेवून तिची वहिवाट आळीपाळीनें करण्याविषयीं तजवीज करावी. प्रत्येक स्त्री, पुरुष, मूल ह्यांची व्यवस्था सर्व प्रकारें बांधून टाकावीं. विद्या शिकणारा, व्यापार करणारा, ह्यांस त्यांच्या अक्कलहुषारीप्रमाणें पैसा व्याजीं द्यावा. व अमुक पैसा खर्च केला कीं, त्याचा अंश ह्या इष्टेटींतून निघाला असें ठरवावें. आळशी, व्यसनी, तंटेखोर, असे मनुष्य असतील ते फक्त पंक्तीचे मालक. निराळे राहूं इच्छिणारांचा इष्टेटीवर मुळींच कांहीं संबंध नाहीं. इष्टेटीची व्यवस्था पहाणारे मनुष्य ह्याच कुटुंबांतील पण नोकरासारखे समजावे."

" ज्यांचा परिणाम समाजव्यवस्थेवर घडतो, अशा तत्त्वांचा संबंध एखादी संस्था, कारखाने, देवस्थानें, धर्मादाय, इत्यादिकांशीं आल्यास,

तीं नामशेष झाल्यास कांहीं नवल नाहीं. ह्याकरितां त्या त्या संस्था स्थापन करणारांनीं ह्याबद्दल आरंभींच उद्योग करावा हें उचित होय."

" वैद्यलोकांच्या घराण्यासंबंधानें विचार करितां ही गोष्ट प्रत्ययाला येण्यास उशीर नाहीं. मूळपुरुषानें कष्ट सोसून अनेक पुस्तकें, क्रियांचीं टिपणें, युक्ति, औषधें व तीं तयार करण्याची सामुग्री जमवावी आणि पुढें त्यांचा उपयोग करणारा निघाला नाहीं किंवा वांटणी करण्याचा प्रसंग येणें ह्मणजे त्या कुटुंबांतील मनुष्यांत तंटे, आळस, ह्यांची वृद्धि करणें होय. **आयौषधींचा कारखाना** व त्यास जोडून **वैद्यशाळा** ही कल्पना जशी आहे तशीच त्या संस्था कायम राखून शिवाय त्याला त्या कधीं नष्ट होऊं नयेत अशा प्रकारची स्वतंत्रता करून दिली ह्मणजे मनुष्यांचें पहिलें कर्तव्य संपलें. शाळेंतील शिष्यांपैकीं कारखाना चालविण्यास सर्व प्रकारें योग्य असा पाहून अनुक्रमानें सर्व कामें त्याकडून करवून तो मुख्य चालक समजावा. ही रीति अति उत्तम होय. ह्या योगें स्वकुलांतील संततीलाही एक प्रकारें उत्तम मार्गास लावल्यासारखें होणार आहे."

" ह्याकरितां अशी एक संस्था पाहिजे कीं, तींत तयार औषधींचें भांडार, विद्येचें पीठ, औषधीक्रियेची पूर्ण माहिती, व इतरही वैद्यकास लागणाऱ्या अवश्य गोष्टी मिळूं शकतील. अशा संस्थेला राजाश्रय व लोकाश्रय पाहिजे ह्मणजे विद्यार्थ्यांची सोय सहज लागते. मग औषधें तयार करावयाचीं, ह्मणजे खलबत्त्यापासून प्रारंभ इत्यादि काळजी अनायासें निवारण होईल. अशा संस्थेला राजाश्रय मिळणेंही कांहीं कठीण नाहीं. व तो मिळेपर्यंत ह्मणजे कांहीं अडून राहील असाही भाग नाहीं. दहा वर्षांनीं होणाऱ्या कामास फार तर पंधरा वर्षें लागतील, इतकेंच."

आणखी ते ह्मणाले " पुढील उद्योग, व हेतु बोलून दाखविण्यांत कांहीं अर्थ नाहीं. तथापि मनांतील संकल्प असा आहेः—

१ हा कारखाना निरंतर अशाच वाढत्या स्थितींत असावा. कोणत्याही रीतीनें याचा ऱ्हास होऊं नये, अशी तजवीज, आज सुचतील ते अडथळे दूर करून उत्तम प्रकारें करावी.

२ कारखान्याच्या शेजारीं एक वैद्यशाळा स्थापन करावी.

३ औषधीगुण, पृथक्करणानें व अनुभवानें प्रसिद्ध करावेत.

४ शिक्षणासाठीं एक वनस्पतींचा बाग तयार करावा.

५ निराश्रितांस धर्मार्थ औषधें द्यावीं.

६ औषधें घेण्यास येणाऱ्या ऐपतदार मनुष्याच्या रहाण्याची, भोजनाची व कर्मणुकीची सोय तयार करावी.

७ औषधी तयार करण्याकरितां सर्व यांत्रिक सामुग्री बनवावी.

८ डाक्टर व वैद्य यांस स्वस्त प्रमाणानें औषधें देतां यावीं अशी तजवीज करावी.

९ एक विद्वान् डाक्तर, विद्यार्थ्यांस शस्त्रक्रिया शिकविण्यास व गुणदोषपृथक्करण करण्यास ठेवावा.

१० सारांश, वैद्यकाच्या प्रत्येक अंगाचा अभ्युदय व्हावा अशी इच्छा आहे."

पनवेल येथील **आर्यौषधीकारखान्याचे मालक** वे० शा० **कृष्णशास्त्री पुराणिक,** व त्यांचे पुत्र **विष्णु कृष्ण पुराणिक,** हे होत. हें प्रथम निर्दिष्ट करण्यांत आलेंच आहे. त्यांचेच हे विचार सारांशरूपानें दिले आहेत. हे किती प्रगल्भ, दूरदर्शित्वाचे, लोककल्याणाचे आहेत हें वाचकांसही सहज रीतीनें समजण्यासारखें आहे. ह्यांतील संस्थेचा पाया चिरकाल स्थाईक होण्याचीं व शास्त्राच्या उन्नतीचीं तत्त्वें किती विचारानें काढलीं आहेत, हेंही निराळें सांगणें नको. कोणतीही संस्था सुरळीतपणें चालण्याला, किंवा उद्योगाची भरभराट होण्याला, स्वार्थदृष्टि नेहमीं आड येते. ती जो ताब्यांत ठेवूं शकतो, तोच देशहिताला हातभार लावणारा होतो. पण तें काम फार कठीण व मनोनिग्रहाचें असल्यामुळें, तसे पुरुष फारच क्वचित् निपजतात.

पनवेलचा कारखाना इतक्या ऊर्जितावस्थेस येण्यास मुख्य कारणांपैकीं खर्चाचा नियमितपणा हें एक होय. त्यांतील उत्पन्नाचा फारच थोडा अंश प्रपंचाकडे जातो. अनेक युक्तिप्रयुक्ति लढवून हलक्या लोकांपासून भारी दर्जाचें काम करून घेतात. पुढील उद्देश फारच मोठे असल्यामुळें, झालेलें काम कांहींच नव्हे असें त्यांस वाटतें. आणि महत्वाकांक्षा व उद्योग ह्यांची झपाट्यानें वृद्धि होत असते. कारखाना पहावयास आलेल्या लोकांस समजूत देणें, बाहेरगांवच्या लोकांस औषधींसंबंधीं खुलासेवार माहिती देणें, औषधें मागविणारांची होईल तितकी नीट सोय

करणें, इत्यादि गोष्टींकडे कारखान्याचे चालक फारच दक्षतेनें लक्ष्य पुरवितात.

ह्यामुळें कोणताही सद्गृहस्थ तेथें जावो, त्याच्या मनांत ह्या कारखान्यासंबंधानें व त्यांतील उद्योगाच्या संबंधानें पूज्यबुद्धि उत्पन्न होते. सर्जन मेजर **डिमक,** माजी सरकारी मुख्य मेडिकल स्टोअरकीपर डा. **गर्दे,** डाक्टर **देशमुख,** डाक्टर **भाटवडेकर,** इत्यादि मोठमोठ्या व तच्छास्त्रपारंगत मंडळांनींही ह्या कारखान्याविषयीं प्रशंसा केली आहे. तसेंच डाक्टर **कावसजी दादा चांदजी** ह्यांनीं हा कारखाना पाहून मुंबईच्या **' जमेजमशेद '** नांवाच्या वजनदार गुजराथी पत्रांत केलेलें वर्णनही आह्मां हिंदुलोकांस विशेष भूषणभूत झालें आहे. शिवाय **'पुणेंवैभव' 'विद्याविलास' 'भिषग्विलास' 'इंदुप्रकाश'** इत्यादि वर्तमानपत्रकारांनीं व मासिकपुस्तककारांनीं ह्या कारखान्याचें परिपूर्ण अभिनंदन केलें आहे. आणि तें अगदीं यथायोग्य आहे.

अशा दांडग्या कारखान्यामध्यें खपही दांडगाच असला पाहिजे हें उघड आहे. व त्याप्रमाणें आहेही. परंतु चमत्कार हा कीं, आपल्या कारखान्याच्या संबंधानें शास्त्रीबुवांनीं कोठेंही जाहिरात दिलेली फारशी आढळत नाहीं. एक दोन ठिकाणीं होती ती, फक्त त्यांच्या एजंटांनीं दिलेली होती. [मुंबईस ह्या कारखान्याचे मुख्य एजंट रा०रा० **दत्तात्रेय कृष्ण सांडू**–दुकान रामवाडी हे असून, त्यांच्याकडून ह्या कारखान्यासंबंधी औषधें, माहिती वगैरे पाहिजे त्यास मिळते.] ह्यावरून ' नहि कस्तूरिकागंधः शपथेन विभाव्यते ' ह्या वाक्याचा प्रत्यय मात्र दिसून येतो. गुणी व उद्योगी मनुष्य कोठें खेड्यापाड्यांत ठेवा, कीं अरण्यांत ठेवा, त्याच्या कीर्तीचा परिमळ कस्तूरीप्रमाणें वातावरणांत पसरावयाचाच !

नेटिव्ह वैद्यांचें तुटपुंजें ज्ञान, जाहिरातींतील भपकेदार शब्द, चुटपुटती सामुग्री, औषधांचा गुप्तपणा, हीं पाहिलीं ह्मणजे त्यांचें औषध घेण्यास मनच धजत नाहीं. अंगावर कांटा उभा राहतो. कारण, रोग बरा व्हावयाचा एका बाजूस राहून एखादें रसायन कच्चें असलें, किंवा अविधिपूर्वक तयार झालें असलें तर भलतेंच नवें लचांड उत्पन्न व्हावयाचें. किंबहुना प्राणावरही बेतण्यास चुकायाचें नाहीं; व असे प्रकार घड-

ल्याचेंही प्रसिद्ध झालें आहे. ती भीति पनवेलच्या कारखान्यांत बिलकूल नाहीं. तो कारखाना ज्यांनीं प्रत्यक्ष पाहिला आहे, ते लोक तेथीलच औषधें मागवितील, व तीं ते बिनदिकत घेतील. व आमचीही सर्व लोकांस तीच शिफारस आहे.

आतां ह्या कारखान्याच्या संबंधानें श्रीमंत **सयाजीराव महाराज गायकवाड**—बडोदें संस्थानचे अधिपति यांस तसेंच महाराष्ट्र, दक्षिण महाराष्ट्रसंस्थानिक व कारखान्याचे मालक यांसही एक दोन सूचना करणें आहेत, तेवढ्या करून हा लेख संपूर्ण करूं.

आर्यवैद्यकाच्या उन्नतीसाठीं बरेच लोक सांप्रत ही खटपट करीत आहेत. तरी त्यांत यावें तसें यश येत नाहीं. ह्मणजे उलटा एक एक पाय मागेंच पडत आहे, ह्मटलें तरी चालेल. पुण्यास युनिव्हर्सिटीसारखी 'वेदशास्त्रोत्तेजक' नांवाची सभा स्थापन झाल्याचें पूर्वी सांगितलेंच आहे. तिच्या वार्षिक रिपोर्टावरून पाहिलें तर, शके १८१९ पर्यंत वैद्यशास्त्रांत अवघे बाराच विद्यार्थी पास झाले. त्यांत पहिल्या इयत्तेंत–ह्मणजे वीस रुपये बक्षिसांत–नऊ; तीस रुपये बक्षिसांत तीन; आणि चाळीस रुपये बक्षिसांत पूज्य! ह्मणजे याचा अर्थ आणखी वीस पंचवीस वर्षांनीं उत्तम आर्यवैद्यक पढलेला वैद्य शिकण्याच्या कामाला मिळणें दुरापास्त होणार!

गांवोगांवीं व शहरोशहरीं वैद्यांचीं नांवें ऐकूं येतात. व 'वैद्य नाहींत' असेही शब्द ऐकूं येतात. तेव्हां ह्यांतील खरें कोणतें? ह्यांतील खरा भाग इतकाच कीं, पढिक वैद्य नाहीं. प्राप्त झालेला प्रसंग पार पाडून नेणें अनुभवाचें काम आहे. पण तो प्रसंग येणार हें कळणें, आल्यावर अनेक प्रसंग पाहून ठरविलेल्या सिद्धांतांप्रमाणें तजवीज करणें हें शास्त्र पढल्याशिवाय होणें नाहीं. ह्याची परीक्षा, शेंकडा किती रोगी बरे झाले, व किती मृत्यु पावले, ह्यावरून ठरवावयाची असते. नुसतें अमक्यानें धनुर्वायूचा किंवा सन्निपाताचा रोगी बरा केला, असें ह्मणून उपयोग नाहीं. किंवा अमक्याच्या देखरेखीखालीं मेला, असेंही धरून उपयोगी नाहीं.

परंपराप्राप्तऔषधी अनुभविक असतात, ह्मणजे गुण येण्यास त्या औषधी कारण होतात. पण अशा औषधी ज्या अनुभवाच्या पायावर

तयार होतात, तो पाया शास्त्र होय; ह्मणून शास्त्र शिकणें फार अगत्याचें आहे. त्यावांचून धंदा चालावयाचा नाहीं. ज्यानें जो धंदा पत्करला, त्याबद्दल तो जबाबदार आहे. त्यानें सृष्टिचालकापासून त्या उद्योगाबद्दल परवाना घेतला आहे, असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. ह्मास्तव त्यानें आपलें तन, मन, धन ह्यांचा उपयोग त्याकडेच केला पाहिजे. जाहिराती हें एक कोणत्याही वस्तूचा किंवा ज्ञानाचा प्रसार होण्यास प्रस्तुतच्या सुधारलेल्या मन्वंतरांत मोठें साधन आहे, लोक मानीत आहेत, व सर्व धंद्यांचे लोक अनुभवही घेत आहेत. तयार औषधें विकण्याचें काम याच धोरणावर हल्लीं चालू असून, त्यायोगें वर्तमानपत्रें व मासिकपुस्तकें, ह्यांच्या प्रसारास प्रत्यक्ष मदत होत आहे. पनवेलच्या कारखान्याबद्दल वर्तमानपत्रांत फारशा जाहिराती नसतां, वार्षिक विक्रीचें मान वाढत्या प्रमाणावर आहे. ह्याचें कारण, एक रोगी बरा झाला असतां, त्यानें दुसऱ्यास, दुसऱ्यानें तिसऱ्यास परंपरेनें सांगत जाणें हीच चालती बोलती जाहिरात होय. धंदा करणाऱ्या वैद्यानें, विद्या व औषधीक्रियाही दुसऱ्यास शिकविण्याचा परवाना सृष्टिचालकापासून घेतलेला आहे; तेव्हां त्याचें काम प्रत्येकानें नीट बजावलेंच पाहिजे. तो तें नीट न करील, तर घातक, चोर अशा विशेषणांस पात्र होईल. हें काम एकट्यानें करण्यास कठीण, सबब सर्व किंवा कांहीं वैद्य मिळून जुटीनें हें काम पार पाडण्यासारखें आहे. पण त्या जुटीचा परिणाम या हल्लींच्या काळांत हिंदुस्थानामध्यें चांगला होत नाहीं. व आणखी कांहीं काळ—लोकांना ह्यांतील तत्त्वें कळेपर्यंत—तरी त्यांत यश येणार नाहीं, असें अनुमान आहे.

जुटीनें वैद्यकशाळा स्थापन करण्याचे प्रयत्नही आजपर्यंत मुळींच झाले नाहींत असें नाहीं. पण त्यांत यश ह्मणून नाहीं. इ० स० १८७६ च्या सुमारास, मुंबईस 'आयुर्वेदशोधक' मंडळी निघून तिनें सुमारें एक वर्षपर्यंत वैद्यकशाळा चालविली. पण अखेरीस आपआपसांत दुफळी होऊन तिचा लय झाला. ह्या मंडळींत सुमारें २० डाक्टर, ३० वैद्य व ५० सभ्यगृहस्थ होते! इ० स० १८८७ सालीं, पुण्यास, डाक्टर **गोडबोले** व इतर मंडळी यांच्या प्रयत्नानें 'आर्यौग्लवैद्यक' शाळास्थापनेचा आरंभ होईल असा सुमार दिसत होता. पण शिकविण्याच्या

बाबतींत व इतर बाबतींतही मतभेद होऊन त्या प्रयत्नांसही यश आलें नाहीं. पुणें येथें संस्कृत पाठशाळेला जोडून वैद्यकाचा वर्ग, वर्ष सव्वावर्षापासून चालू केलेला आहे. ह्याला वैद्य **शंकरशास्त्री महाजन** धर्मार्थ पाठ सांगतात असें ऐकण्यांत आहे. वर्ग अद्याप बाल्यावस्थेंतच असल्यामुळें, त्याबद्दल विशेष कांहीं सांगतां येत नाहीं.

हा एकाचा आणि एकजुटीचा विचार झाला. आतां राजाश्रयानें हें काम कसें काय तडीस जातें त्याचाही विचार करूं या. राजाचें नांव घेतलें ह्मणजे आपल्या देशांत विद्या हेंच जीवित मानणारा, प्राचीनशास्त्रांचा उद्धार करणारा, गुणीजनांचे गुण जाणणारा, प्रजेच्या कल्याणार्थ रात्रंदिवस झटणारा, ज्ञानप्रसारार्थ झीज सोसणारा, व अक्षय्य विचारांत व सदुद्योगांत निमग्न असणारा असा हिकडच्या भागांत एकच प्रभु दिसतो. तो कोण ? तर अर्थात् **श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड** हे होत. ह्यांच्या राज्यांत मात्र आर्यांग्ल वैद्यशाळास्थापनेचा प्रयत्न बऱ्याच दिवसांपासून चालू आहे. सुप्रसिद्ध, लोकप्रिय, आर्यवैद्यकाची कळकळ बाळगणारे डाक्टर **भालचंद्र** हे बडोद्यास असतांना अशा प्रकारची आर्यांग्ल वैद्यकशाळा सुरू होती, व ते तीस शिक्षणही देत असत. इंग्रजींतील विषय, मराठीभाषेंमध्यें समजून सांगण्याचा त्यांत परिपाठ होता. पण त्याचा पुढें परिणाम काय झाला, कितपत यश आलें, तें विशेषसें प्रसिद्धीस आलें नाहीं. आतांही एक बडोद्यास आर्यवैद्यकशाळा आहे. पण ती बरीच निकृष्टावस्थेंत असल्याचें ऐकिवांत येतें. ह्या शाळेंतील विद्यार्थ्यांस 'स्कालरशिपा' ठेवलेल्या आहेत.

---

१ आर्यवैद्यकाच्या उन्नतीविषयीं अन्य कोणाचा प्रयत्न नसेलच असें नाहीं. श्रीमंत बाबासाहेब **घोरपडे, इचलकरंजी** संस्थानाधीश ह्यांनीं आपल्या वाड्याजवळच एक मोठें सुंदर 'वनस्पत्योद्यान' तयार केलें आहे. ह्यांत आपल्या वैद्यशास्त्रांत वर्णन केलेल्या बहुतेक वनस्पतींची लागवड करण्यांत आली आहे. त्यावरील देखरेख करणारा माळीही मोठा खटपटी असून हुषार आहे. त्यानें त्या उद्यानाची निगा फारच सुरेख ठेवली आहे. शिवाय, तो प्रत्येक वनस्पतीचें नांव, गुण, व कोणत्या कोणत्या रोगावर तिचा उपयोग होतो, हें तोंडानें भराभर सांगूं लागला ह्मणजे ऐकणारास विशेष चमत्कार वाटतो. असा हा प्रयत्न, निदान आमच्या पहाण्यांत तरी पहिलाच आहे. व त्याबद्दल **इचलकरंजीचे चीफ** अत्यंत प्रशंसेस पात्र आहेत इचलकरंजीचें वर्णन 'स्थलनिर्देशांत' देण्याचा लौकरच विचार आहे.

तरी त्या शाळेंत यावेत तितके विद्यार्थी येत नाहींत, असें ह्मणतात. त्याचीं कारणें पाहूं गेलें तर शिकून पुढें काय करावयाचें ? हा विचार प्रथम मनांत येणें साहजिकच आहे. व त्याचें उत्तर, आपला आपणच धंदा शोधून काढावयाचा, व खलबत्त्यापासून तयारी करावयाची हें ! शिवाय, तेथील विद्यार्थ्यांचें वय अधिक असल्यामुळें, विद्याभ्यासाकडे लौकरच दुर्लक्ष होतें. शाळेला कधीं तीन वर्षांची, कधीं एक वर्षाची मुदत. सन १८९५ सालीं ह्या शाळेला अवधी एक वर्षाची मुदत मिळाली आहे. इतकी अशाश्वत स्थिति ! शाश्वत स्थिति येण्याला, शाळेचा निरंतर अभ्युदय व्हावा अशी इच्छा असणाऱ्यांच्या हातीं शाळेची व्यवस्था पाहिजे. परंतु उदार राजे क्वचित् असतात; व शास्त्राचा अभ्युदय इच्छिणारे विद्वान् व खेरे उद्योगी लोकही क्वचित् असतात. तेव्हां त्यांचा संयोग होण्याची गोष्टही क्वचित्च घडून येते. बहुतेक ' तीथ आहे तों भट नाहीं, आणि भट आहे तों तीथ नाहीं ' असाच प्रकार !

पनवेलीसारख्या पायाशुद्ध कारखान्याच्या शेजारीं अशा प्रकारची आर्यवैद्यकशाळा स्थापन झाली, तर त्या शाळेला व कारखान्यालाही अनेक फायदे होण्याचा संभव आहे. पहिला फायदा हा कीं, कारखान्यांत काम करणारे लोक वैद्यच लागतात, ते ह्या शाळेंतून मिळतील. दुसरें, कारखान्याचा संबंध असलेल्या प्रांतांत, तयार झालेल्या वैद्यांची रवानगी होऊन, त्या योगानें कारखान्याचा, विद्यार्थ्यांचा, व लोकांचाही फायदा होईल. अशाप्रकारें कारखाना, शाळा, व लोक ह्या तिघांचेही जींत फायदे आहेत, ती संस्था ऊर्जितावस्थेस कां बरें येणार नाहीं ? अवश्य येईल.

ह्यास्तव श्री० **सयाजीराव महाराज गायकवाड** यांस आमची अशी सूचना आहे कीं, त्यांनीं मुद्दाम पनवेलीस मनुष्य पाठवून सदर आर्यौषधींच्या कारखान्याची माहिती आणवावी, आणि योग्य वाटल्यास वैद्यशाळेचा व या कारखान्याचा संयोग करावा. अर्थात् तीं एकमेकांस जोडावींत. ह्मणजे उभयतांचाही पुष्कळ अंशांनीं फायदा होण्याचा संभव आहे असें आह्मांस वाटतें. असें करण्यास दोन मार्ग आहेत; एक पनवेलचे वैद्य अर्थात् कारखाना—कारण मुख्य शाळेच्या फायद्याचें कलम तेंच आहे,—बडोद्यास न्यावा, किंवा बडोद्याची शाळा पनवेल येथें

स्थापन करावी. पण पहिला मार्ग बराच दुर्घट आहे. कारण पनवेलचा आर्यौषधिकारखाना ही एक संस्था आहे; तेव्हां तिचें स्थलांतर करणें कठीण व योग्यही नाहीं. आतां महाराजांची वैद्यकशाळा, हीही एक संस्थाच आहे खरी; पण पनवेलचा कारखाना, स्थिर असून त्याला कायमचें स्वरूप आलें आहे; तसें वडोद्याच्या वैद्यकशाळेला अद्याप आल्याचें दिसत नाहीं. त्या शाळेची मुदत वाढविण्यांत येते. आतां श्री० गायकवाडसरकारास असें करणें नीटसें वाटणार नाहीं. कारण, कोणतीही संस्था आपल्या राज्यांत चालावी, असें प्रत्येक राजास वाटत असतें; आणि तसें वाटणें साहजिकच आहे. परंतु दोन्ही संस्था उत्तम प्रकारें चालण्याचें जर अनुमान असेल तर, लोककल्याणार्थ तसाही प्रयत्न करून पहावा. ह्मणजे पनवेलचा कारखाना व्यवस्थेशीर असून त्याचे मालक त्या शास्त्रांत निष्णात असून अश्रांत श्रम करणारे, व संस्थेची उन्नतावस्था चिंतणारे आहेत असें निदर्शनास आल्यास—आणि तसें होईल असा भरंवसा वाटतो—निदान तीन वर्षांच्या मुदतीनें तरी वैद्यकशाळा त्यास जोडावी. ह्मणजे महाराज गायकवाड यांचा हेतु नीटपणें सिद्धीस जाऊन आर्यवैद्यकाचा उद्धार केल्याचें श्रेय पदरीं पडेल. करितां, ह्या गोष्टीचा **श्रीमंत महाराज सरकार सयाजीराव गायकवाड** ह्यांनीं अवश्य विचार करावा, अशी त्यांस आमची नम्रपणें सूचना आहे.

असो. वरील सूचना अमलांत आल्यास दुधांत साखर पडल्याप्रमाणें होणार आहे. बाकी, पनवेलच्या आर्यौषधींच्या कारखान्याचे मालक खरे आस्थेवाईक असल्यामुळें, आस्ते आस्ते आपला कारखाना ह्याहूनही ऊर्जितदशेस आणतील ह्यांत तिळमात्र शंका नाहीं. येवढेंच नव्हे, तर मालकांचा त्या कारखान्याची पुढील व्यवस्था करण्याचा जो हेतु आह्मांस कळला आहे, तो ज्यावेळीं घडून येईल त्यावेळीं 'आजपर्यंत अशी व्यवस्था कोणींच केलेली नाहीं' असेच सर्वतोमुखीं उद्गार निघाल्यावांचून रहाणार नाहींत.

वरील विस्तृतलेखावरून ह्या कारखान्याची व्यवस्था व स्वरूप किती पायाशुद्ध आहे, हें वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल. अशा प्रकारच्या दीर्घोद्योगी मनुष्यांच्या श्रमांचें हस्तेपरहस्तें चीज करणें प्रत्येक आर्यबंधूचें कर्तव्य आहे. डाक्टरलोकांसही आमची अगत्याची सूचना

आहे कीं, ह्या कारखान्यांतील औषधांचा उपयोग आपआपल्या दवाखान्यांतून ते करतील, तर पुष्कळ परीनें आर्यवैद्यशास्त्रोद्धारास हातभार लावल्याचें त्यांस श्रेय येईल; व तसें करण्यांत कांहीं प्रत्यवायही दिसत नाहीं. कारण, येथील औषधें यथाशास्त्र सिद्ध झालेलीं असतात, त्यांत किंतु नाहीं. एखादें भस्म कच्चें राहिलें असेल, किंवा औषधाचें पुट कमी झालें असेल, ही शंका ध्यावयास नको.

श्रीमंत गायकवाड सरकारांनीं कारखान्यास जोडण्याकरितां शाळा दिली तरीही **महाराष्ट्र दक्षिणमहाराष्ट्रसंस्थानिकांनीं** शाळेप्रीत्यर्थ पनवेलच्या कारखान्यास यथाशक्ति वार्षिक नेमणूक करून दिली तर खात्रीनें कारखान्याचे चालक आज शाळा उभारतील. अशा शाळेंत तयार झालेले वैद्य आपआपल्या संस्थानांतून ठेवावे. ह्मणून कारखान्याची माहिती अगोदर काढून मग आमच्या विनंतीचा विचार करावा. शाळेंतील शिक्षणपद्धतीचाही कारखान्याचे चालकांनीं बराच विचार केला आहे व त्या रीतीनें शिक्षण मिळून वैद्य तयार झाला तर हल्लींच्या डाक्टरांची सर्वस्वीं बरोबरी करील असें वाटतें.

आतां ह्या कारखान्याच्या मालकांस एक दोन सूचना करणें इष्ट दिसतात. त्या सूचना ह्या कीं, ह्या कारखान्यांत शस्त्रक्रियेची व शरीररचनाज्ञानाची सोय कशी काय करण्याचा विचार आहे? ती करणें फार अगत्याचें काम आहे. वाग्भटाच्या वेळेस प्रत्यक्ष प्रेतपरीक्षा करण्याचा सांप्रदाय होता, असें त्या ग्रंथावरून दिसतें. पण तसें करणें सद्यस्थितीस अनुचित व दुर्घटही होईल. ह्याकरितां तसा योगायोग येईपर्यंत, शरीराच्या अंतर्भागांचे रंगीत नकाशे आयते विकत मिळतात, ते आणवून किंवा नवे तयार करून, त्यांचें ज्ञान विद्यार्थ्यांस करून देणें जरूर आहे. येवढेंच नव्हे, तर अशाप्रकारचीं मोठमोठालीं चित्रें कारखान्यामध्यें सदोदित टांगलेलीं असावींत. ह्मणजे येणाऱ्याजाणाऱ्यांस, मुलांबाळांस, गड्यामाणसांस सुद्धां त्याचें सहज ज्ञान होईल. दुसरी सूचना अशी कीं, संस्कृत नांवाच्या औषधाशीं तुल्य होणारें इंग्रजींतील औषधाचें नांव काय? त्या सर्वांचा शोध करून तशाप्रकारचें एक निराळें पुस्तकच प्रसिद्ध करावें. उदाहरणार्थः—लोहभस्म ह्मणजे इंग्रजींत ज्याला 'आक्साइड आफ़ आयर्न' ह्मणतात तें. 'टिंकचर बेलाडोनिया' ह्मणजे बे-

लफळाचा मगज किंवा अर्क इत्यादि. असें केल्याच्या योगानें, नवशिक्यांची अधिक खात्री पटून विशेष श्रद्धा वाढत जाण्यास कारण होईल. शिवाय, वैद्यकाच्या धंद्यांत वनस्पतीचें नांव माहीत असतें, परंतु ती ओळखण्याची मोठी मारामार ! ह्यासाठीं प्रत्येक वनस्पतीचें हुबेहुब चित्र काढवून त्याचें वर्णन, व देशीभाषेतील निरनिराळीं नांवें व इंग्रजी नांवें त्यांत नमूद करावींत. अशाप्रकारचें पुस्तक तयार झालें तर, पुष्कळच हिताचें आहे. आतां हें काम बरेंच दुर्घट आहे, ही गोष्ट खरी. तथापि 'शनैः शनैः' अशा पंथानें तरी तें चालावें. आणखी एक सूचना अशी आहे कीं आजपर्यंत त्यांजकडे जितके रोगी प्रत्यक्ष व पत्रव्यवहारानें बरे झाले त्या रोगांचीं तीं लक्षणें, तीं औषधें व ते उपचार ह्यांची साद्यंत हकीगत दप्तरांत नमूद असेल त्याप्रमाणें व्यवस्थितरूपानें एकत्र करून छापून स्वतंत्र पुस्तक करावें ह्मणजे हे **अनुभविक आरोग्यविधि** विशेष महत्वाचे होतील. त्याचप्रमाणें आसवारिष्टादि औषधांचीं **अनुभविक मिश्रणें** प्रसिद्ध करावीं. ह्मणजे त्यांचाही चांगलाच उपयोग होईल. ह्या गोष्टींचा विचार मालक व चालक करतील अशी आशा बाळगतों.

आतां सरतेशेवटीं, अशा उद्योगी व परोपकारी संस्थेची निरंतर भरभराट होवो, असें जगन्नियंत्यापाशीं मागणें मागून, व पितापुत्रद्वयशास्त्र्यांचा प्रेमानें निरोप घेऊन हा बराच लांबलेला लेख समाप्त करतों.

आयुर्वेदशाळा—पनवेल.

वरील लेख लिहून पुरा होत आहे, इतक्यांत पनवेलचे कारखान्यांतून एक सुंदर निमंत्रणपत्रिका आली. तींत आह्मीं वर दर्शविलेल्या चालकांचे विचारांचें दिग्दर्शन असून " **वैद्यशाळा** होऊन वैद्यशास्त्रशिक्षण यथासांग व उत्तम व्हावें, गुरु व विद्यार्थी आपआपल्या धर्मी तत्पर रहावे, उत्तम विद्वान् झालेल्या शिष्यांचे हातून जुन्या ग्रंथांवर टीका व्हावी, व नवीन अनुभविक ग्रंथ तयार व्हावे, सारांश वैद्यशास्त्राच्या प्रत्येक अंगाची अभिवृद्धि व्हावी, कारखाना चिरंजीव होऊन त्याचा सर्वत्र, सर्वदा, सर्वतोपरी उपयोग व्हावा ह्मणून कारखान्याच्या इमारती, जमीनजुमला, त्यांतील स्थावरजंगम मिळकत, तयार औषधी इत्यादिसह या

आर्यौषधिकारखान्याचा स्वत्वनिवृत्तिपूर्वक श्रीभूतपापेश्वरचरणीं उत्सर्ग

करण्याचा संकल्प केला आहे."

"या संस्थेचें एक मुख्य अंग जें **आयुर्वेदशाळा** तिचा प्रारंभ वैशाख शुद्ध १० बुधवार शके १८१८ या दिवशीं घटी ११ (तारीख २२ माहे एप्रिल १८९६ दहा वाजून ३ मिनिटें) यावेळीं मुमुहूर्तीं योजिला आहे."

हा मुख्य मजकूर होता. तो समारंभ त्या दिवशीं ह्मणजे बुधवार तारीख २२-४-९६ रोजीं झाला. स्थलसंकोचास्तव त्याची सविस्तर माहिती आज देतां येत नाहीं ह्मणून दिलगिरी वाटते. तरी **आयुर्वेदशाळे**च्या समारंभाचा कार्यक्रम व सभेंत झालेल्या भाषणांतील मुख्य मुद्यांचें दिग्दर्शन करितों:—

मुंबईहून **डा. देशमुख, डा. खेर**प्रभृति डाक्टरमंडळ व ठळक ठळक वैद्य, सोलापुरचे भिषग्विलासकर्ते **डा. रानडे**, बडोदा कॉलेजांतील संस्कृत भाषेचे **प्रो. आर्ते, एम. ए.**, रा. रा. **मुकुंद बाळकृष्ण गुर्जर, बी. ए.**, प्रभाकर पत्राचे एडिटर, प्रसिद्ध वक्ते रा. रा. **घमंडेबोवा, पागे**. अशी ठिकठिकाणची बडी बडी मंडळी व यांशिवाय पनवेल येथील वकील, व्यापारी, सुखवस्तु गृहस्थ, प्रसिद्ध श्रीमंत **ओझे** अशी मंडळी कार्यसिद्धीस आली होती.

मुमुहूर्तीं आयुर्वेदशाळेचा–होमहवनादि–स्थापनविधि व शाळेचे गुरुवर्य–व्याकरणशास्त्र, वैद्यकशास्त्र व धर्मशास्त्र–अधीत सुखभावी, विनयसंपन्न, पापभीरु असे–वे. शा. सं. **कृष्णशास्त्री नवरे** यांचें पूजन, हा प्रकार ११ वाजेपर्यंत झाला. १२ वाजतां भोजन. भोजनोत्तर साडेपांच वाजेपर्यंत कारखाना पाहण्याचा वेळ. साडेपांच वाजतां भव्य सुशोभित उच्च मंडपांत सर्व लोक हजर झाले. सभेच्या कार्यारंभीं आर्यौषधिकारखान्याचे मालक वे. शा. सं. **कृष्णशास्त्री पुराणिक** यांच्या तिसऱ्या व चवथ्या चिरंजीवांनीं स्वागतपर पद्य सुस्वर झटलें तें:—

चाल–भूपतीखरे०

आनंद वाटतो आज अह्मांला साचा ॥ कीं तातहेतु हो पूर्ण बहुत दिवसांचा ॥
हें श्रेष्ठबंधुचें हृद्गत ये उदयाला ॥ अति कौतुक वाटे जोड नसे जगिं याला ॥
मोडोनि अमोलिक वेळ तुह्मीं कार्याचा । आलांत वाटतो भार अह्मांला याचा ।
चाल—राहतां राजधानींत तुह्मि सदां । ठाउकी तुह्मांला नाहीं आपदा ।
अह्मि, ग्राम्य विनयता येथें संपदा। चाल-सर्वांस जाहला किति तरि श्रम येण्याचा ।
मागणें क्षमा हा हेतु खरोखर मनिंचा ॥

नंतर आर्यौषधिकारखान्याचे मालक वे. शा. **कृष्णशास्त्री पुराणिक** यांनीं आभारप्रदर्शक भाषणांत फार दिवसांचा हेतुपूर्ण झाल्याबद्दल अत्यानंद दर्शविला. प्रस्तुतचा उत्सर्ग व दान यांतील भेद सांगितला:—"एखादा तळें बांधतो व त्याचा उत्सर्ग करतो याचा अर्थ त्यानें त्या तळ्याचें पाणी पिऊं नये असा नाहीं. गाय दान दिली तर तिचें दूध घेण्याचा आपणास हक्क नसतो. उत्सर्गानें उत्सृष्ट वस्तूचा उपयोग करण्याचा उत्सर्गकारांस इतरांबरोबर हक्क आहे." सभेचें काम

व्यवस्थित चालावें ह्मणून शास्त्रीबोवांचे विनंतीवरून **डा. देशमुख** अध्यक्षस्थानीं विराजमान झाले. नंतर **डा. रानडे** यांनीं आरंभापासून आजपर्यंतचा आर्यवैद्यकाचा अति महत्वाचा इतिहास, व सभेचा हेतु सांगितला. नंतर **रा. आत्माराम हरी खेर बी. ए** यांनीं थोडक्यांत पनवेल येथील आर्यौषधिकारखान्याची लिहिलेली माहिती वाचिली व शास्त्रीबोवांचे द्वितीय चिरंजीव रा. **गदाधर कृष्ण पुराणिक** यांनीं शाळेचे नियम व व्यवस्था वाचिली. नंतर रा. **वासुदेवराव करंदीकर** पनवेल येथील प्रसिद्ध वकील हे बोलण्यास उभे राहिले. ते ह्मणाले "आर्यौषधी आपणांस विशेष श्रेयस्कर होतील. यास सबळ कारण आहे तें हें कीं सर्व इंग्रजी औषधें इंग्लंडचें हवामान, इंग्लिश लोकांचे रीतिरिवाज यांस अनुसरून तयार केलेलीं असतात, व आर्यवैद्यकांतील औषधें हिंदुस्थानांतील हवामानाप्रमाणें तयार केलेलीं असतात. इंग्लंद हा शीतप्रदेश, वर्षांतील बहुतेक दिवस बर्फ पडत असतें व हिंदुस्थान हा समशीतोष्ण प्रदेश, इंग्लिश लोकांचें भक्ष्य हिंदुस्थानांतील लोकांच्या भक्ष्याहून भिन्न, करितां इंग्लिश औषधें विशेष श्रेयस्कर न होतां आर्यौषधीच अधिक फायदेशीर होण्याचा संभव आहे. करितां आर्यौषधींना ऊर्जितावस्थेंत आणणें हें प्रत्येक आर्याचें कर्तव्य आहे." नंतर प्रसिद्ध वक्ते रा. रा. **घर्मंडे** यांचें चढकदार भाषण झालें, ते ह्मणाले, "शूर दोन प्रकारचे असतात एक रणशूर व दुसरा दानशूर. हल्लीं संरक्षणाचा सर्व मक्ता प्रभूंनीं आपणच घेतल्यामुळें रणशूरांची विशेष जरूरी नाहीं, आजच्या महत्कृत्यानें वे. शा. सं. **कृष्णशास्त्री** यांची दानशूरांमध्यें गणना करतां येते." नंतर **डाक्टर खेर** यांनीं वाग्भटाची महती सप्रमाण सिद्ध केली व शास्त्रीबोवांनीं आपलें जीवितसर्वस्व अर्पण केलें याबद्दल तारीफ केली. पुढें वे. शा. **दिनकरशास्त्री** तारळेकर, **वासुदेवशास्त्री ऐनापुरे** व **शंकर दाजी शास्त्री** पदे यांचीं भाषणें झालीं. शेवटीं अध्यक्षांचें फारच मुद्देसूद भाषण झालें. ते ह्मणाले "आयुर्वेदपारंगत वैद्य, हे, जर इंग्रजी वैद्यकांतील इंद्रियविज्ञानशास्त्राचा अभ्यास करतील व शारीरिकांत तयार होतील व वैद्यकांतील नवीन शोधांची माहिती वरचेवर करून घेतील, तरच, राजाश्रयानें तयार झालेल्या डाक्टरांपेक्षां लोकाश्रयास अधिक पात्र होतील." नंतर शास्त्रीबोवांनीं सर्वांचे आभार मानिले व गुलाब पानसुपारी होऊन सभा विसर्जन झाली. सभेंत एक विशेष सूचना यावयास पाहिजे होती तिच्या संबंधानें व **डा. रानडे** यांच्या भाषणांतील सारांश वगैरे पुढील खेपेस सवडीनें लिहूं.

PRINTED and published by Janardan Mahadeo Gurjar AT JAVAJI DADAJI'S "NIRNAYA-SAGARA" PRESS, Bombay.

आर्यधर्माभिमानी लोकाकरितां सचित्र हिंदु घड्याळें.

प्रत्यक्ष देवदेवतांनींच हृदयासन्निध वास केल्यावर अधर्म कितीसा टिकेल.

रजिस्टर्ड हिंदु



रजिस्टर्ड वॉच.

नमुना मागवा. तुमच्या पहाण्यानेंच आनंद जर होईलच होईल, तर मग बाजारच्यानें कां न घेणार बरें ? देवतांचे दर्शनानें हिंदुधर्माभिमानास भरती नाहींका येणार ? नाव एकतांच पहावेसें वाटतें व पाहतांच घ्यावेसें वाटतें.

हिंदु घड्याळें कशीं आहेत, दिसण्यांत सुंदर, खिशांत हलकीं, मजबूत, टिकाऊ, **अंगचे चावीचीं**, तबकडी मिन्याची पांढरी असून त्यावर रीतीप्रमाणें रोमन आंकडे असून ठळक मराठी आंकडेही आहेत आणि प्रत्येक आंकड्यामध्यें हिंदुपूज्य देवतांचीं सुंदर चित्रें आहेत. श्रीगणपती, सरस्वती, रामदासस्वामी, हनुमंत, रामसीता, लक्ष्मीनारायण, गरुड, अष्टभुजादेवी, विठ्ठलरखुमाई, शंकरपार्वती, अक्कलकोटस्वामी, श्रीगुरुदत्तात्रय, आणि मध्यभागीं, महाराष्ट्रास जिवंत करणारे गोब्राह्मणप्रतिपालक **श्रीशिवाजीछत्रपतीमहाराज** यांचें सुबक चित्र आहे. अशीं हीं अपूर्व हिंदु घड्याळें आमचे देशबांधव व भगिनी काय ह्मणून न घेतील !

हिंदु सिलेंडर पिक्क नी. सी. वॉच किं. रु. ८॥ ते. १० ग्या. वर्षे १
हिंदु लिव्हर प्रीव्हेन्स नी. सी. वॉच किं. रु. १५ ग्यारन्टी वर्षे २
हिंदु रासकोप सिस्टीम नी. सी. वॉच किं. रु. १७ ग्या. वर्षे ३
हिंदु प्रिव्हेलन्स चांदीचें वॉच किं. रु. २५ ते ३० ग्या. वर्षे ४
हिंदु सोन्याचें वॉच किं. रु. १०० ते १२५ ग्या. वर्षे ४
हिंदु सचित्र आर्मी वॉचेस किं. रु. १० ते १२५ पर्यंत.

हिंदु सचित्र टाईमपीसेस साधे, अलार्म, स्विंग, जपींगई. आंकड्यांमध्यें देवतांचीं चित्रें, मध्यभागीं दरबारी व अश्वारूढ श्रीशिवाजी, आणि श्रीशंकर पार्वतीसह. किं. रु. २॥–४–६–१० ते ३० पर्यंत. [५

जी० बी० नाईक आणि कंपनी. बिलासिसरोड, नाका भायखळा, मुंबई.

धि इंडियन म्यारेज ऍण्ड डेथ बेनिफिट फंड लिमिटेड, मुंबई.

डिरेक्टर्स.

रावसाहेब दलपतराम प्राणजीवन खक्कर जे. पी.

बद्रुद्दिन अब्दुल्ला कूर एस्क्वायर जे. पी.

रुसतम बी. पेमास्तर एस्क्वायर बी. ए. एल् एल्. बी.

धनजीशा फ्रामजी चिनाय एस्क्वायर.

विष्णु नारायण परुळकर एस्क्वायर (एक्स आफिशिओ.)

मध्यम स्थितींतील मनुष्यांस आपल्या मुलांमुलींच्या लग्नाचे वेळीं व आपल्या मरणानंतर आपल्या वारसाकरितां पैशाचा संग्रह करून ठेवितां यावा म्हणून हा फंड १८९४ मध्यें स्थापन झाला आहे. इतक्या अवधींत ३००० पेक्षां जास्त मेंबर झाले असून सरासरी १५० मेंबरांस फायदा मिळाला आहे. लग्नफंडाची वर्गणी दर महिन्यास १। पासून ६। रु. पर्यंत आहे.

मरण-फंडाची वर्गणी फक्त १ रुपया आहे.

व या मरणफंडांतील मेंबरांच्या पश्चात त्यांच्या वारसास २००० रुपयेपर्यंतची रक्कम फायद्या दाखल मिळेल. जास्त माहिती खालील पत्त्यावर एक आण्याचें तिकिट पाठविल्यानें मिळेल. [४–१२

आफीस–५
कावसजी पटेल स्ट्रीट
फोर्ट मुंबई.

परुळकर ऍण्ड कं०
एजंट्स.

व्यापारी व ग्राहक ह्यांकरितां. **हरएक प्रकारचा माल** मुंबईत मिळणारा वक्तशीर बाहेरच्या लोकांस मिळण्याची सोय.

D. K. SANDU
RAMWADI, BOMBAY.

दत्तात्रेय कृष्ण सांडू ह्यांचें हरएक प्रकारचा माल मिळणारें, आणि माफक अडत घेऊन माल रवाना होणारें दुकान:—

रामवाडी, मुंबई.

आमच्या दुकानीं सावंतवाडीचा रंगित माल, **गंजिफा**, आयौंषधी कारखाना—पनवेल येथील **औषधें, स्टेशनरी, वाकेरीचें भातें** असून सतारीची **तार**, सतारी, मृदंग, तबले, वक्षेकृत **कफनाशक गोळ्या**, इत्यादि पाठवितों.

वा. कृ. सांडू. दुकानदार—रामवाडी मुंबई.

कर्नाटकांतील औषधि.

आजपावेतों १८ वर्षांपासून वाग्भटादि अनेक ग्रंथांच्या आधारानें मीं स्वत: औषध तयार करून अनेक लोकांस देऊन अनुभव घेतले आहेत. आणि बहुत लोकांकडून दाखले मिळाले आहेत. या कर्नाटक प्रांतांत अनेक वनस्पति मिळत असल्याकारणानें ताज्या वनस्पतींपासून औषधें जेव्हांचे तेव्हां तयार करण्यांत येतात.

१ मदनकामेश्वरी पाक.

या पाकांत ४० वनस्पतींचा समावेश केला असून उत्तम धातुपौष्टिक, शक्तिवर्धक, फार रुचिकर व अनेक रोगनाशक आहे. २४ रु. भार शेरास किंमत रुपये २.

२ प्रवाळ, कस्तूरी, केशरमिश्रित, धातुपौष्टिक, व स्तंभक, अग्निवर्धक, कामोत्तेजक गोळ्या ४२. किंमत रुपये २.

३ **प्रवाळभस्म.** वनस्पतिपुटानें तयार केलें आहे. पौष्टिक, पित्तनाशक, धातुवर्धक. दर तोळ्यास किंमत रु. १८४.

४ लोहमिश्रित मदनोत्तेजक गोळ्या. गोळ्या ४२. कि. रुपये. २.

छातींतील रोग, धातुविकार, नपुंसकत्व, स्वप्नावस्था, रक्तसंबंधी रोग, अग्निमांद्य, मेंदूसंबंधी रोग, इत्यादि अनेक रोग या गोळ्यांपासून नाश पावतात. विशेष माहिती औषधासोबत मिळेल.

सदरहू औषधाचे अनुपानकागद औषधासोबत. औषधाचे किंमतीशिवाय ट. ख. पडेल. व्याल्युपेबलमार्गानें पाठवून देऊं.

५ **उत्तम वेलदोडे.** बाजारभावाप्रमाणें पाठवून देऊं.

पत्ता. रामप्पा सुब्राव वझे. कसबेकर सिरसी.
जिल्हा, उत्तरकानड.

नवीन पुस्तकें.

१ श्रीज्ञानदेवकृत अमृतानुभव ग्रंथ, श्रीहंसराजस्वामीकृत समओंवीबद्ध टीका व कठीण शब्दांचा कोश यांसह किंमत १२ आणे. ट. व व्ही.पी.ख.८३आणे.

२ अमृतानुभव मूळ कठीण शब्दांच्या कोशासह. सांचा लहान खिशांत रहाण्याजोगा किंमत. ८६ ट. व व्ही. पी. ख. ८३ आणे.

भर्तृहरिकृत शतकत्रय (शृंगार, नीति व वैराग्य) वामनपंडितकृत श्लोकबद्ध टीका व सरळ मराठी भाषांतर यांसह किं०१२आणे. ट.व व्ही.पी.ख.८४ आणे.

तिन्हीं पुस्तकें ग. कृ. च्या छापखान्यांत जाड व घोंटीव कागदावर छापिलीं आहेत. प्रत्येक जातीच्या १० प्रती घेतल्यास १ प्रत जास्त मिळेल.

७] **काशीनाथ वासुदेव खांडेकर.**
पुस्तकविक्रीचें दुकान रामवाडी, पोस्ट मार्केट, मुंबई.

केरळकोकिळाच्या वर्गणीदारांस रु. १८१४ ट. ख. ८४.

वैद्यकशार्ङ्गधरसंहिता.

नवीन मराठी भाषांतरसहित.

पृष्ठसंख्या–५२७–किं. रु. २॥ ट. ख. ।·

" अर्वाचीन सर्व ग्रंथांमध्यें शार्ङ्गधरसहिता अत्युत्तम होय. ह्यामध्यें सर्व विषयांची व्यवस्था जशी अनुक्रमानें लावलेली आहे तशी दुसऱ्या कोणत्याही ग्रंथांत केलेली आढळत नाहीं. ह्या ग्रंथांत जे प्रयोग लिहिले आहेत ते सारे अनुभव घेऊन त्यांचें यथार्थ गुणवर्णन केलें आहे. ह्यांत इतर ग्रंथांप्रमाणें औषधांची अतिशयोक्ति नाहीं. अशा प्रकारचा सर्वोत्तम लोकप्रिय ग्रंथ असून त्याच्या प्राकृत भाषांतरामध्यें–प्राकृत टीकाकाराचे स्वतः असोत किंवा लेखकाचे असोत जे प्रमाद झालेले आहेत त्यांची दुरुस्ती छापणारांनीं आजपर्यंत केलेली नाहीं. कित्येकांनीं तर कांहीं बाहेरचा ग्रंथच ह्यांत घुसडून दिला आहे. हे सर्व घोंटाळे काढून करवेल तितकें शुद्ध व सरळ भाषांतर केलें असून विषयानुक्रमणिकेशिवाय आजपर्यंत न झालेली रोगानुक्रमणिका दिली आहे. त्यामुळें कोणत्या रोगावर काय औषध हें झट्कन पाहिजे त्यास समजतें. प्रसिद्ध प्रसिद्ध अशा वैद्यांच्या सूचनेप्रमाणें ह्यांत शक्य ती सुधारणा केली आहे. व्हा. पे. नें पाठवूं.

जनार्दन महादेव गुर्जर, रामवाडी मुंबई.

ल.ना.पांडित बाई.

जून. (वर्षाची वर्गणी १८३ ट. खचासह. फुटकळ अंकास ८४.) १८९६.

केरळकोकिळ.

वर्षारंभ जानेवारी.

पु० १०] [अं० ६

विधिरेव विशेषगर्हणीयः करट त्वं रट कस्त्वापराधः ॥
सहकारतरौ चकार यस्ते सहवासं सरलेन कोकिलेन ॥१॥

प्रकाशक महादेव गुर्जर बुकसेलर अॅण्ड पब्लिशर.
रामवाडी
मुंबई.

सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत.

ह्या पुस्तकांतील लेख कोची (मलबार) येथें तयार होऊन, ते मुंबई येथें छापून प्रसिद्ध होतात.

विषयांची अनुक्रमणिका.

	पृष्ठ.		पृष्ठ.
लांब पुच्छाचा पक्षी. ...	१२१	पत्रव्यवहार.	१३३
श्रीशिवछत्रपति (कविता)...	१२४	वाचा, विचार करा आणि	
पुस्तकपरीक्षा.	१२६	प्रयत्नास लागा. ...	१३४

रा. रा. विष्णु आत्माराम देसाई, कणकवली यांस—आपलें पत्र पुढील अंकीं प्रसिद्ध करण्यांत येईल.

केरळकोकिळच्या वर्गणीदारांसच किं. रु. २ ट. ख. ४८.

(नंबर कळवून वर्गणीदारांनीं मागणी करावी.)

श्रीगुरुचरित्र.

किं. रु. ३ ट. ख. ४८.

भाविक लोकांजवळील बऱ्याच प्रतींवरून व जागृतस्थानाच्या पोटभेदांस अनुसरून तयार केलें असून त्यांत अध्याय २६ यांतील **वेदरचना** व अध्याय ३६–३७ यांतील **कर्ममार्ग** अगदीं चरित्रकाराच्या मूळाप्रमाणें शुद्ध केले आहेत. वृद्धांसही वाचण्यास फारसा त्रास पडणार नाहीं असा टाईप मोठा आहे. प्रत्येक अध्यायास चित्रें आहेत. व्हा. पे. पाठवूं.

प्रभाकर–रोजचें वर्तमानपत्र.

१८३९ त सुरू झालेलें.

गेल्या दसऱ्यापासून व्यवस्थित रीतीनें व वक्तशीर प्रसिद्ध होतें.

वर्षाची वर्गणी ट. हं. सह ९॥ रुपये.

मुकुंद बाळकृष्ण गुर्जर, बी. ए.
म्यानेजर.
गिरगांव—मुंबई.

॥ ओं नमः श्रीरामचंद्राय ॥

आर्यमहौषधालय मु० आंजलें.

या अत्यंत खात्रीच्या औषधाचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यांस कदाचित् आला नाहीं तर पैसे परत देऊंच व त्याशिवाय त्यांच्या आरोग्यार्थ एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकटच देऊं.

मदनविलासामृतसंजीविनी.

वीर्यस्तंभक, रक्तशोधक, अत्यंत कामोत्तेजक, चित्तोत्साहक, बुद्धि-कांतिवर्धक व धातुपौष्टिक सुवर्णमाक्षिक मौक्तिक कस्तूरीमिश्र अपूर्व गुटिका.

१. शरीराची उत्तम सुधारणा करणारीं अत्यंत महत्वाचीं जीं औषधें आहेत, त्यांत या गुटिका अगदीं पहिल्या प्रतीच्या ठरल्यामुळें यांचे अपूर्व गुण थोड्याच काळांत या देशाच्या सर्वभागीं व त्यांच्या आसमंतात् अतिशय पसरले आहेत. या सेवन केल्यानें नपुंसकत्व, इंद्रियशिथिलता, कडकी, जीर्णज्वर, अग्निमांद्य, अशक्तता, स्वप्नजन्य किंवा इतर धातुपात, छातींतील रोग, मेंदूचे विकार, पांडुरोग, क्षय, मूत्रसंकोच किंवा मूत्रातिरेक, कटिशूल, वातरोग, उपदंशसंबंधी मुरलेले विकार, हात, पाय, मूत्रमार्ग, व शरीर यांचा दाह, व अरुचि, इ० अनेक विकार कितीही वर्षांच्या मनुष्यास नवीन किंवा जुनाट असले तरी खात्रीनें बरे होतात. धातु व रक्त यांची शुद्धि व वृद्धि होऊन रक्तदूषणजन्य अनेक रोग हटकून बरे होतात. वीर्यस्तंभन, व कामोद्दीपन होऊन अग्नि व शक्ति भरपूर वाढते. स्त्रियांची धुपणी व संततीस अपायकारक जे गर्भाशयस्थ रोग त्यांचें त्वरित निवारण होऊन कांति, स्मरणशक्ति व बुद्धि वाढते. ज्यांस शारीरिक व मानसिक श्रम फार पडतात, त्या सर्वांच्या आंगीं यांनीं अतिशय शक्ति येऊन मनास उत्साह प्राप्त होतो, सुस्ती जाते. ज्यांस दूध व जडान्न पचत नाहीं त्यांस तें भरपूर पचूं लागतें, कोष्ठशुद्धि होते. या अप्रतिम गुटिका अत्यंत शोधानें केल्या असून त्यांच्या अप्रतिम गुणका-

रित्वाबद्दल हजारों सर्टिफिकिटें मिळालीं व नित्य मिळत आहेत. यांत अपायकारक पदार्थ बिलकूल नाहींत. वरील सर्व रोग जाऊन उत्तम गुण प्राप्त होण्यास या गुटिकांसारखें अप्रतिम औषधच नाहीं असें पूर्ण अनुभवावरून स्पष्ट म्हणतों. यांस पथ्यसेवनाची गरज नसतां या पाहिजे त्या दिवसांत घेतल्या तरी हटकून गुण करितात. यामुळें त्यांचा अतिशय खप सुरू आहे. गोळ्या रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम सहा रुपयांच्या किंवा त्यांहून कितीही जास्त गोळ्या घेणारांस बंगीचा सर्व टपालखर्च माफ आहे. त्यांचे आंत घेणारांस मात्र तो वेगळा सहा आणे पडेल. एकदम ३२ गोळ्यांस १ रु. ७० गोळ्यांस २ रु. १६० गोळ्यांस ४ रु. २६० गोळ्यांस ६ रु. ५२० गोळ्यांस १० रु.

थंडगार नेत्रांजन—हें अंजन स्तुतीस अत्यंत पात्र आहे, हें सतत दहा वर्षांच्या पूर्ण अनुभवानें कळवितों. यानें डोळ्यांचे साधारण विकार तर सहजच, परंतु दृष्टीचा समूळ नाश करणारे, तिमिरांध्य, वडस, बिंदु, फुलें, कांच, सारा, भोर, गळती, खुपऱ्या, जळजळ, कंड, फूट, चिकटा, ठणका व लाली इ० अनेक विकार, तत्संबंधी मस्तकशूलादि विकारांसह कितीही वयाच्या मनुष्यास कोणत्याही कारणांनीं प्राप्त झालेले नवीन किंवा जुनाट असले तरी नाजूक रीतीनें कोणतीही इजा न होतां बरे होतात. दृष्टि तीव्र व थंडगार राहते. हें चांगल्या दृष्टीच्या मनुष्यांनींही डोळ्यांत घातल्यास वरील विकार त्यांस बिलकूल होणार नाहींत. लहान मुलांस तर हें अत्यंत उपयोगी आहे. २ तो० ड० १॥ रुपया.

विशेष सूचना.—अलीकडे आंजलें व मुर्डी वगैरे गांवांतील औषधांच्या बऱ्याच जाहिराती सुरू आहेत व त्यांपैकीं कांहीं जाहिरातींत ज्या सह्या आहेत त्या बहुतेक आमच्याच नांवासारख्या भासण्याचा विशेष संभव आहे. तरी अशा लोकांशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं हें अवश्य लक्षांत ठेवून आमचीं औषधें **"कृष्णशास्त्री बिवलकर वैद्य. मु० आंजलें ता० दापोली जि० रत्नागिरी."** याच पत्त्यावर रोखीनें किंवा व्ही.पी.नें मागवावींत. अनुपान पत्रकसोबत असतेंच.

१–१२]

केरळकोकिळ.

पु० १०] [अं० ६.

लांब पुच्छाचा पक्षी.

पृथ्वीवर जितके ह्मणून सुंदर पक्षी आहेत, त्यांतच वरील पक्ष्याची गणना आहे. ह्याच्या अप्रतिम सौंदर्यावरून ह्यास 'सतेजरत्न, असें ह्मणण्याचा प्रघात पडला आहे. ह्याचें मूलस्थान **अमेरिका** हें होय. हा पक्षी कधीं कधीं '**वेस्टइंडीज**' मध्येंही सांपडतो.

ह्या पक्ष्याची चोंच लांबलचक, चिंचोळी व कमानदार अशी असते. ह्याची जीभ बहुतकरून अग्रभागीं दुभागलेली असते, त्यामुळें त्यास फलपुष्पांतील अमृततुल्य मधुररसाचा विशेष आस्वाद घेतां येतो. ह्याच्या जिव्हाग्रांत आणखी एक मौज असते ती ही कीं, तिच्या शेवटीं लहान लहान केसरें असतात, त्यायोगेंकरून तो पुष्पांतील लहान लहान जीवजंतुसमुदाय बाहेर काढून, तो पुष्परस शोषण करून, त्याबरोबर त्यांचाही स्वाहा करून टाकतो. हीं केसरें सूक्ष्मदर्शक यंत्रांतून पाहतां चांगल्या साळपिसाएवढीं दिसून येतात. हा पक्षी आकृतीनें फारच लहान असतो, पण तितकाच हा शोभिवंत व डौलदार दिसतो. त्यास पाहिलें ह्मणजे असें वाटतें कीं, हा पक्षी ह्मणजे केवळ उल्हासवृत्तीचें स्थान, सौंदर्याची प्रतिमा आणि कांचनाची प्रभा. तो उडतांना उन्हांतून केवळ रत्नाप्रमाणें चमकतो. त्या वेळीं त्याच्या पिसाऱ्याकडे पाहिलें ह्मणजे नेत्र दिप्प होऊन जातात. ह्या पक्षाचा उदरनिर्वाह फलपुष्पांवरच चालतो असें नाहीं, तर तो कधीं कधीं माशांसही पकडतो. ह्याच्या आणखी पुष्कळ लहान लहान जाती आहेत. हा पक्षी इतक्या जलदीनें उडत असतो कीं, त्याजवर सहसा नजर ठरत नाहीं. इतकेंच नव्हे तर, जेव्हां तो घिरट्या घालतो, तेव्हां एखाद्यास असें वाटेल कीं, निःसंशय हा अगदीं निश्चलस्थितींत एखाद्या तंतूप्रमाणें वाऱ्यावरच तरंगत राहिलेला आहे. आपल्याहून भारी अशा पक्ष्यावरोबर देखील तो टक्कर देतो. हेंचसें काय, पण तो त्याच्यावर एकदम हल्ला करून, त्यास आपल्या नेत्रांनीं भेवडावून, त्याचा एकसारखा पाठलाग करून, असा घाबरवून सोडतो कीं, त्या पक्ष्यास 'दे माय धरणी ठाय' असें होऊन, हार खाऊन पलायन करावें लागतें. तो स्वज्ञातिबांधवांशीं लढण्यास सुद्धां मागेंपुढें पाहत नाहीं. ह्या पक्षिवर्गातील दोन नरांची जर नजरानजर झाली, तर ते रागानें संतप्त होऊन, आपले केंस पिंजारून एकमेकांवर धांवून जातात, आणि आपल्या स्वरानें ओरडून मोठ्या आवेशानें लढतात. ती त्यांची झुंज आटोपल्यावर ज्यास विजयश्री प्राप्त होते, तो पक्षी स्वसंपादित कीर्तिवैभवाचा उपभोग घ्यावयास जातो.

ह्या पक्ष्याचें घरटें ह्मणजे मोठें कौशल्याचें काम असतें. ह्या जातीं-

तील नर सर्व साहित्य जमवून आणतात, आणि माद्या त्यांची व्यवस्था लावितात. तें लहान लहान वनस्पतींनीं केलेलें असून, त्यांचे कंगोरे मुखरसानें अगदीं बंद करून, अंतर्भागीं फारच कौशल्यानें जाळीदार काम केलेलें असतें; ह्मणजे ती बाजू नानाप्रकारच्या वनस्पतींच्या रेशमी तंतूंनीं वेष्टिलेली असते. हें घरटें ह्मणजे शुद्ध एक पाळणाच असतो. कधीं कधीं एखाद्या वनस्पतीच्या फांदीचा, किंवा एखाद्या झोंपडीच्या गवती छपराचा त्याला आधार असतो. ह्या पक्ष्याची मादी वर्षांतून दोनदां अंडीं घालते. तीं वाटाण्याएवढीं असून पांढरीं शुभ्र अशीं दिसतात. सहा दिवस अंडीं उबविल्यानंतर पटापट पिलें बाहेर पडतात, व पुढें एक आठवडा गेल्यावर त्यांना उडून जाण्याचें सामर्थ्य येऊं लागतें.

ह्या पक्ष्याचें मांस चांगलें नसतें, पण त्याचे पंख फारच मूल्यवान् असतात. स्त्रिया ह्या पंखांचे–गळपट्ट्यांपासून तों तहत कर्णभूषणापर्यंत नानातऱ्हेचे उपयोग करितात. **इंडियन** लोक–ख्रिस्तीधर्मदीक्षा घेतलेले–आपल्या पूज्य साधूसंतांच्या मूर्ति सजविण्याकडे यांचा उपयोग करितात. कांहीं कालामागें **मेक्सिकन्** व **पेरुविअन्** लोक हे ह्या पिसांनीं आपल्या दुलया सुशोभित करून ठेवीत. हा पक्षी माणसाळत नाहीं. कारण त्याच्या शरीराच्या नाजुकपणामुळें त्याला मनुष्याचा दाब सहन होत नाहीं. त्याची यत्किंचित् जरी हयगय झाली तरी तो कांहीं महिन्यांनीं मरून पडतो. '**मान्स्टर स्पायडर**'–राक्षसी कोळी हा ह्यांचा सर्वांत दांडगा शत्रु होय. हा कोळी आपलें जाळें ह्या पक्ष्याच्या घरट्याभोंवतीं बांधतो, त्यामुळें ह्या पक्ष्याची फार हानि होते. ह्या पक्ष्याचीं अंडीं आणि पिलें त्या कोळ्याच्या भक्ष्यस्थानीं पडतात. केव्हां केव्हां वयातीत पक्षी देखील तडाक्यांत सांपडून, त्यांची पिलांप्रमाणेंच गति होते. ह्या पक्ष्यास दोन दोहींकडे लांब लांब शेंपटें असतात. हा 'हमिंगबर्ड' नांवाच्या पक्ष्याच्या जातीचा आहे. ह्या पक्ष्याच्या अगदीं किमानपक्ष पांचशें जाती प्रचारांत आहेत. ह्या जातीचे पक्षी **ब्रेझिल, ग्वायना** व **कानडा** येथें विपुल आहेत.

श्रीशिवछत्रपति.

२ बाललीला.

महाचतुर तो **शहाजी** परी दुर्जन करिती द्वेष अहा !
असुनि सासरे **जाधवरावहि** त्यांतचि मिळती नवल पहा ॥
जामातार्चे वैभव पाहुनि श्वशुर लागले उलट पथा ।
हेवा देवांदिकांस न सुटे मनुजाची ती काय कथा ॥
हुच्च यवन ते मिळवुनि सारे वळवुनि घेती **दिल्लिपती** ।
विभू रचोनी प्रभूवरी ते चालुनि येती मंदमती ॥
राजे विचार करिती माजे कलह घरीं हा नसे बरा ।
लज्जा सोडुनि कज्जा करणें उचित नसे जी खचित नरा ॥
खलाचलातें दूर टाकुनी शूर चालला **विजापुरीं** ।
यवनाधिप तों कल्पवल्लरी चालत आली ह्मणे घरीं ॥
अपोआप तत्प्रताप कळला चातुर्याची पडे प्रभा ।
खूष होउनी बादशहानें **कर्नाटक**चा दिला सुभा ॥
समर करोनी **अमरपुरी**सम **तंजावर**चें राज्य नवें ।
स्थापन करुनी मुख्य होउनी सख्य जोडिती धन्यासवें ॥
हर्षें कितीक वर्षें राहे शत्रु घालुनी रसातळा ।
काल लोटतां बाल पहाया नृपाल झाला उतावळा ॥
शिवरायाची कीर्ति ऐकुनी मूर्ति पहावी असें मना ।
वाटुनि आणी पुत्ररत्न तें शीघ्र धाडुनी आप्तजनां ॥
कुरवाळोनी करीं मुखातें प्रेमें ठेवी हस्त शिरीं ।
भूप ह्मणे गुणरूप पाहुनी धन्य जाहलों खरोखरीं ॥
बालभानुसा आजानुबाहु नासिक चांफ्याचीच कळी ।
कमलनयन ते विमल शोभती विस्तृत वक्षस्थळी बळी ॥

जेठीसम ती शरीरकाठी मल्लयुद्धही करी भलें ।
बाहू बघतां राहूसम हा ग्रासिल वाटे शत्रुकुळें ॥
खंदा वाजी बंदा राजी होई बसतां बालगडी ।
चपल कुडीची घडी करोनी मारी बारा हात उडी ॥
भाला पाहुनि कालाप्रतिही घाला आला असें गमे ।
तरवारीची फेंक पाहुनी कैक जनांचें चित्त रमे ॥
बाण लावुनी निशाण मारी अचुक जणों कीं राम दुजा ।
समरगुणांच्या खुणा दाविती खुजा तरी त्या बालभुजा ॥
बंदूकीची गोळी सुटतां होळी झाली खास ह्मणा ।
मोहें पोहे हर्षसागरीं नृपती मोल न तोल गुणां ॥
सकल कला त्या फलासि आल्या उणें न कोठें पाव रती ।
गा जी गाजी प्रेमें आजी राय **शिवाजी** छत्रपती ॥
यवनकरींना हरीसारखा जर्जर करि जो शीघ्रगती ॥ ध्रु० ॥ ३ ॥
मधुर बोल ते मोल न ज्यांला अर्थ पाहतां खोल किती ।
सद्दी ऐशी मुत्सद्दीही ऐकुनि माना डोलविती ॥
थोर कल्पना सदा वदावी वृथा जल्पना नसे कदा ।
उदारतेवर मदार सारी चित्त वाहिलें ईशपदा ॥
धर्म जिवाचा सखाच केवळ भक्ति सर्वथा संतजनीं ।
गोविप्रांना सुखी करावें हीच वासना नित्य मनीं ॥
दानमान बहु विद्वानांना नीच जनांचा वीट असे ।
सारासारीं विचार भारी स्वजनहितेच्छा मनीं वसे ॥
बारकाइनें फार पहावा कारभारही पोक्तपणें ।
लक्ष ठेवुनी दक्ष रहावें काय कुठें कीं पडे उणें ॥
निशिदिनिं जागे पागेवरती वागे मागें कोण कसा ।
देखुनि डोळां रेखुनि ठेविति हृत्पटलावरि सर्व ठसा ॥
उमर धाकटी कुमर परंतु दिसे विचारें प्रौढ खरा ।
दुर्व्यसनाचा गंध न अंगीं आचरणानें शुद्ध हिरा ॥

धरा लाभली खरा मोहरा असें भासलें सकल जनां ।
दोष न अंगीं लेश जयाच्या तोष जाहला तातमना ॥
साक्षात्कारें सारें कळवी पूर्वी **अंबा** धराधिपा ।
खूण बाणली जाण अंतरीं ह्मणे प्रभूची थोर कृपा ॥
पदरीं नसतां पुण्य एवढें उदरीं जन्मे **जगत्पती** ।
किती अह्मांवरि दया तयाची उपकारांला नसे मिती ॥
भावें न्यावें पुत्ररत्न हें **विजापूर**च्या धन्याकडे ।
पुढती दैवें असेल जें जें नेमियलेलें तसें घडे ॥
शिवरायातें संगें घेउनि आंगें गेले **विजापुरा** ।
बादशहा तैं **शहाजी**स दे शस्त्रें वस्त्रें हिरा तुरा ॥
हर्षे डोले बोले तुमचा पुत्र **शिवाजी** बहुत गुणी ।
कीर्ति ऐकुनी मूर्ति पहावी असें वाटतें फार मनीं ॥
बेटा भेटावयास आणा उत्कट इच्छा करा पुरी ।
बहुत खुषीनें पाहूं वाहूं सरकाराची कामगिरी ॥
अन्न पुरविता प्रसन्न होतां भूप जाहला फार सुखी ।
तयार व्हाया शिवरायाला निरोप धाडी आप्तमुखीं ॥
ऐकुनि झाली आग तनूची बालहरीला राग चढे ।
डाग लागतो कुलास ह्मणुनी स्पष्ट बोलणें भाग पडे ॥
गुप्ततेज तें वर्णिल पुढतीं ' **केरळकोकिळ** ' यथामतीं ।
गा जी गाजी प्रेमें आजी राय **शिवाजी** छत्रपती ॥
यवनकरींना हरीसारखा जर्जर करि जो शीघ्रगती ॥ ध्रु० ॥ ४ ॥

पुस्तकपरीक्षा.

विचारसौंदर्य–भाग १ ला—ह्या पुस्तकांत रा. रा. **वासुदेव गोविंद आपटे**, बी. ए. शिक्षक, नूतन मराठी विद्यालय, पुणें, ह्यांनीं हिंदुस्थानच्या राजकीय स्थितीसंबंधानें स्वदेशांतील व परदेशांतील थोर थोर पुरुषांनीं वेळोवेळीं काढलेले विचार ग्रथित केले आहेत. भाषापद्धति चांगली आहे, आणि विचार अत्यंत

प्रौढ व उपयोगी आहेतच आहेत. स्वत्वाची ओळख करून देणारें हें एक साधन असल्यामुळें, अर्थातच तें संग्रह करण्याची वेगळी शिफारस नको. दुसऱ्या भागांत 'हिंदुस्थानच्या सामाजिक स्थितीसंबंधानें थोर माणसांचे विचार' येणार आहेत. त्यांसही विचारीमंडळीनें आश्रय देणें योग्य आहे.

बुद्धिबळांचा खेळ—हें पुस्तक रा. रा. **मंगेश रामकृष्ण तेलंग**, क्लार्क हायकोर्ट, अपिलेट साइड, मुंबई–ह्यांनीं रचून प्रसिद्ध केलें आहे. सर्व खेळांत बुद्धिबळांचा खेळ राजमान्य आहे. ह्याचें मुख्य कारण, गंजिफा, सोंगट्या इत्यादि अन्य कोणतेही खेळ प्रारब्धाधीन असतात. ह्मणजे डाव आला तरच जय मिळवितां येतो, नाहीं तर कसलाही बुद्धिवान् खेळणारा असला तरी व्यर्थ होतें. केव्हां केव्हां त्यांतही बुद्धि खर्च करावी लागते, पण फारच थोडी. तशी गोष्ट बुद्धिबळांच्या डावांत नाहीं. ह्यांत जो बुद्धिवान् तोच सदा विजयी असतो. मनाची खरी एकाग्रता करणारा साऱ्या जगतांत ह्यासारखा दुसरा खेळ नाहीं. गणित, तर्क, भूमिति इत्यादिकांनीं जशी मानसिकशक्ति वृद्धिंगत होते, तशीच ह्या खेळानेंही ती होते, अशी प्राचीनकाळापासून प्रसिद्धि आहे. अनेक बुद्धिमान लोक त्यामध्यें तल्लीन होऊन जावेत इतका त्यांत मनोरमपणा भरलेला आहे. तसेंच ह्याच्या नादानें कितीएक लोक व्यवहारशून्य झाले आहेत. कित्येकांनी भोजनामध्येंच गाजराच्या कोशिंबिरीला राजा समजून 'प्याद्याचा शह' ह्मटलें आहे. कित्येकांना निद्रेंत आणि व्याधींत, बुद्धिबळांच्या मोहऱ्यांनीं भंडावून सोडलें आहे. अशा प्रकारें बुद्धिबळांच्या खेळाचा नाद, हें जरी एकप्रकारचे वेड आहे, तरी त्या खेळापासून बोधाच्या गोष्टीही पुष्कळ घेण्यासारख्या आहेत. आणि त्या देखील नुसत्या व्यवहारांतच नव्हेत, तर राजप्रकरणामध्यें. खरोखरच ह्या खेळाची कल्पना ज्यानें प्रथमतः बसविली, त्याच्या बुद्धिमत्तेची तारीफच खरी.

राज्यामध्यें प्रधानाची आवश्यकता किती असते; तो अकस्मात् मृत्युमुखीं पडला असतां, त्या पक्षाला किती दुर्बलता प्राप्त होते; शूरत्वानें विजयी होत गेलेला यःकश्चित् शिपाई सुद्धां 'प्रधानपदास' कसा चढतो[1]; कारागृहांत पडलेल्या राजाची कशी स्थिति होते; एकदा पाठीमागें शह लागला ह्मणजे आपण कसे जिगजिगून जातों; इत्यादि अनेक गोष्टी ह्या खेळावरून स्पष्ट ध्यानांत येतात. आणि त्याच्या कल्पकाची मोठी धन्य वाटते. कोणी मोठा मुत्सद्दी असो; कीं सेनानायक असो. त्यास बुद्धिबळांचा खेळ हा आपला अवगत असावयाचाच. इतकेंच नव्हे,

१ "प्याजीके फरजी भये, तेढे तेढे जात"—कबीर—

तर जो बुद्धिबळें खेळणारा पटाईत असतो, तोच सेनापतीचें काम उत्तम रीतीनें पार पाडतो, असेंही पुष्कळांचें ह्मणणें आहे.

पेशवाईतील शहाणे सखाराम बापू, हे ह्या खेळांत प्रवीण असल्याचें प्रसिद्धच आहे. नेपोलियन बोनापार्ट तर लढाईचा हल्ला येईपर्यंत बुद्धिबळें खेळत होता, ह्याबद्दल इतिहास साक्ष देतो. ह्या खेळावर इंग्रजीमध्यें अनेक ग्रंथ आहेत. शिवाय शेंकडों वर्तमानपत्रांतून व मासिकपुस्तकांतून प्रत्येकीं कूटप्रश्न व डाव प्रसिद्ध होतात ते वेगळेच. अशा राजमान्य खेळाचें आपल्या भाषेंत एकही पुस्तक नसावें ही मोठीच उणीव. श्री० गायकवाड सरकारांनीं प्रस्तुत क्रीडामालेच्या ग्रंथांची प्रसिद्धि चालविली आहे खरी, तरी त्यांत सुद्धां अद्याप ह्या नामांकित खेळाचें पुस्तक नाहीं. आह्मीं अगदीं बाल्यदशेंत एक 'बुद्धिबळांच्या' खेळाबद्दल शिळाछापाचें पुस्तक पाहिल्याचें स्मरतें. मग त्यांत कसा काय विषय असेल तो असो! तथापि ती उणीव आज रा० रा० तेलंग ह्यांनीं पुष्कळ अंशांनीं भरून काढली ह्मणण्यास हरकत नाहीं. आणि तीही सुव्यवस्थित रीतीनें; ह्मणून विशेष आनंद वाटतो.

ह्या पुस्तकांत ह्या खेळाच्या उत्पत्तीविषयीं बरेंच विवेचन करून त्याचें मूळ भरतखंडांतच असलें पाहिजे, असें प्राचीन संस्कृत ग्रंथांच्या वगैरे आधारानें सिद्ध केलें आहे. नंतर मोहऱ्यांच्या आकृति, स्थानें व चाली ह्यांची माहिती; पारिभा-

---

१ "It has been said, that a first-rate Chess-player would make a good general, for the same quality of mind which enables the Chess-player to dispose his men advantageously upon the mimic battle-field, represented by the chequered board, would serve to marshal a host of living warriors upon the tented plain."

CAPT. CRAWLEY'S
Handy Book of Games.

'ह्यांडीबुक ऑफ् गेम्स' नांवाच्या पुस्तकांत येणेंप्रमाणें उल्लेख केला आहे. "असें ह्मणतात कीं, चांगला बुद्धिबळें खेळणारा चांगला सेनापति होऊं शकतो. कारण, पटरूपी समरांगणावर बुद्धिबळांतील निर्जिव मोहरींरूप सैन्य चालविण्यास जी बुद्धि लागते, तीच बुद्धि आसपास तंबू, राहुट्या ठोकलेल्या समरांगणांत सजीव वीरांची सेनाही चालविण्यास उपयोगीं पडते."

षिक शब्द; खेळाचे सर्वसंमत नियम; प्रत्येक मोहऱ्याची विशेष माहिती; नूतनाभ्यासी लोकांस उपदेश; व मासल्याकरतां खेळ इत्यादि दिले आहेत. प्यादी, मात अमुकच डावांत कशी करावी ह्याचीही माहिती चांगल्या प्रकारें दिली आहे. सोडविण्याचे प्रश्न एकंदर सुमारें ८० आहेत. पुस्तकछपाईचें काम निर्णयसागरमध्यें उत्तमप्रतीचें केलें आहे. भाषा व विषयप्रतिपादनाचा नीटनेटकेपणा चांगला नांवाजण्यासारखा आहे. तथापि कित्येक वाक्यें इंग्रजी पद्धतीवर गेलीं आहेत. अर्थात् निवळ मराठी वाचकांस तीं कळणें दुरापास्तच. ह्याचें ठळक उदाहरण एका हेडिंगाचेंच आहे. तें हेडिंग हें:—"खेळ उघडण्याचे निरनिराळे प्रकार!" कां कशी आहे वाक्यरचना? ह्याचा अर्थ वाचकांनीं काय समजावयाचा? इंग्रजीमध्यें 'openings of games' असें ह्मणतात. त्याचेंच शब्दशः भाषांतर पुस्तककर्त्यानें आपल्या कृतींत उठवून दिलें आहे. 'खेळण्याचा प्रारंभ' किंवा 'आरंभीं डाव टाकण्याच्या तऱ्हा' अशा प्रकारचें समजण्यासारखें वाक्य पुस्तककर्त्यांस एकही सुचूं नयेना? कोण ही मराठी भाषेची दैना!

प्रश्नांपैकीं कितीएक आपल्या देशांतील प्यादीचे डाव आहेत तेवढे मात्र उपयोगी आहेत. बाकीचे प्रश्न इतके सोपे आहेत कीं, ते केवळ नवशिक्याच्याच उपयोगी. साधारण खेळणारांस त्यांत विशेष स्वारस्य वाटावयाचें नाहीं. उदाहरणार्थ—'एका डावांत प्यादी करा' हा कूटप्रश्न ह्मणजे निवळ नवशिक्यांचा खेळ! टाइम्स आफ इंडिया, ग्याफिक, बॉयझ् ओन पेपर अशासारख्यांतून प्रश्न घेतले असते, तर इतर शिकलेल्या लोकांसही किती तरी प्रिय व उपयोगी झाले असते. असो. पुढील आवृत्तीच्या वेळेस पुस्तककर्ते ह्या सूचना लक्ष्यांत घेतील अशी आशा आहे. एकंदरींत विचार केला तर, प्रस्तुत पुस्तकापासून बुद्धिबळें खेळणारांस पुष्कळ प्रकारचें साह्य होईल ह्यांत मात्र शंका नाहीं.

संगीत सावित्री नाटक—हें रा० रा० **सोकर बापुजी त्रिलोकेकर** ह्यांनीं रचलेलें आहे. आमच्यापुढें ह्या गृहस्थांची आलेली ही दुसरी कृति होय. संगीत हरिश्चंद्र नाटकावर दिलेला अभिप्राय वाचकांस स्मरत असेलच. आज दुसऱ्या कृतीकडे पहावयाचें. संगीताच्या संबंधानें अभिप्रायाचे नेहमीं दोन प्रकार होत असतात. एक त्याच्या प्रत्यक्ष तालसुरानें व अभिनयानें मनावर उठणारा ठसा; आणि दुसरें तें काव्य या दृष्टीनें त्यास लागणारा कस. प्रस्तुत नाटकाचा प्रयोग आह्मीं प्रत्यक्ष पाहिलेलाही नाहीं, व त्या कलेंत आमची मार्मिकताही तितक्यापुरतीच आहे. आह्मांपाशीं आहे काय ती एक पुस्तकपरीक्षेची

कसोटी. तिच्यावरच घर्षणसंस्कार करून शंभर नंबरी किती व हीण किती हें आह्मी पहाणार.

रा० त्रिलोकेकर यांची कवित्वशक्ति चांगल्यापैकीं असून तिच्यांत अनुप्रास, कोमल शब्द, मनोविकार जागृत करणारे छंद इत्यादि गुण बऱ्याच अंशांनीं येत असल्यामुळें तींत साहजिक मनोरंजकता असते, हें पूर्वीच्या एका परीक्षणांत सांगितलेंच आहे. ते गुण ह्याही नाटकांत दृष्टीस पडतात. दक्षिणाप्राइझ कमिटीनेंही ह्या पुस्तकाची योग्य संभावना बक्षीस देऊन केल्याचें समजतें. सावित्रीचें कथानक स्त्रीचातुर्याविषयीं व सद्गुणांविषयीं प्रसिद्धच आहे. ह्यांतील कितीएक पद्यें साहजिक मनास लोलुप करणारीं आहेत. उदाहरणार्थ— सत्यवानाची मदनविव्हलता:—

" नयन दंग हृदयिं रंग बघुनि सुंदरी । परि अनंग करि दुभंग हृदय निजशरीं ॥ ध्रु० ॥ पीतवर्ण तनु सुवर्ण नीट नेटकी । लक्षुनि ती कंटकमय कनककेतकी । विपिन धरी बघुनि करी हंसगती कीं । कोकिलतनु कृष्णवर्ण होय सुस्वरीं ॥ (पृ. २७)

ह्या लहानशा पद्यांत अनुप्रासाची, अर्थसौरस्याची जणों काय स्पर्धाच लागली आहे असें दिसतें. सावित्रीची स्थितिही तशीच पहा:—

" सुंदर ही बघुनि मूर्ति मदनमोहिनी । हृत्सागरिं हर्षलहरि येति साजणी ॥ ध्रु० ॥ चंद्रोदयिं विकसित जशि मिलित कुमुदिनी । घनवर्षें तृप्त जशी तप्त मेदिनी । उत्सुक निधिसंगमिं मम हृत्पयस्विनी । मन्मानससरविहारि हंस वरिं मनीं ॥ सुंदर० ॥ १ ॥" (पृ. ३२)

ह्यांतील एक दोन शब्द वजा घातले तर रसिकजनांचेंही हृदय प्रफुल्लित होईल. श्लोकामध्यें तर सरसत्व विशेषच असतें. त्याचा थोडासा मासला:—

श्लोक.

माथा पिंगट त्या जटा विलसती गंगा असे निर्मल
वामांकीं गिरिजा वसे निशिदिनीं भाळीं शशी उज्ज्वल ।
योगीवृंदं मुनी सुरासुर तसे ध्याती जयाच्या पदा
तो गौरीहर या वधूसह वरा रक्षो सदासर्वदा ॥ १ ॥(पृ. ६३)

खालच्या श्लोकांत सर्व कथेचा सारांश, आणि सावित्रीचे सद्गुण सरळ व साधेपणानें एकत्र गोंवले आहेत.

शाखा शुष्क द्रुमाची पतिशिरिं पडतां मूर्च्छना ये तयाला
स्वांकीं त्याला सुशीला निजवुनि मग ती आठवी दीनपाला ।
ये तत्स्थानीं निहंता हरि तदसु करीं टाकुनी पाशमाला
युक्तीं भक्तीं सदुक्तीं अकळि मग सती मोहपाशीं यमाला ॥ १ ॥

पुलकांकित तनु करण्यास खालील साकी बरीच साह्यभूत होईल.

वाटे येथुनि निकट पतीच्या उडुनि खगापरि जावें ।
डोळे भरुनी पाहुनि पतिला प्रेमालिंगन द्यावें ॥
इच्छित मज मिळलें(?) । पूर्वज पुण्य फळा आलें ॥१॥ ध्रु०॥

ह्याप्रमाणें गुणस्थळांचें दिग्दर्शन करून दोषांकडे नजर फेंकली ह्मणजे मनाचा अत्यंत विरस होतो. कारण, तिकडचा कांटा बराच झुकता आहे. अनेक ठिकाणीं छंदोभंग आहे.

"घेणें वांटा तदुःखाचा आहे धर्म प्रजेचा." (पृ. ४)

हा साकीचा चरण आहे. ह्यांतील 'प्र' ह्या अक्षराच्या योगानें मागील 'में' अक्षरास दीर्घत्व येतें. आणि त्यामुळें सर्व चरणाच्या मात्रा २९ होतात. आणि साकीस पाहिजेत २८. पण कांहींका असेना ? एक मात्रा वर आहे येवढीच सही !

तसेंच त्या साकीचा शेवटचा चरण मृगनयने प्रियकरणी ह्यांत दोन मात्रा कमी असल्यामुळें सहज ह्मणण्यास अडथळा येतो.

"असुनी वैभव शचिसम माझें लाज परी मन वाही" (पृ. १०). वैभव असून लाज आहे ह्मणण्यापेक्षां दुःख आहे ह्मणणें योग्य.

सावित्रीसारख्या स्त्रीगुणमंडित मुलीनें-'उपवर दुहितेतें पाहून अंतर तळमळणाऱ्या व त्या चिंतेनें ज्यांची तनु जळत आहे' (पृ.८-९) अशा मातापितरांना-लज्जाभूषणाचा परित्याग करून स्वमुखानें "अविवाहित राहिल्यानें जन माझी निंदा करितील" (पृ. १४) ह्मणून आणि तें संगीत पद्धतीनें-सांगणें चमत्कारिक वाटतें. तसेंच "यांनाच मीं मनानें वरलें आहे" असें भरसभेंत संगीतानें सांगणें (पृ.३९) यापेक्षां दासीमुखें सांगितलें असतें तर, आह्मांस वाटतें, रसभंग न होतां त्यांत ह्या उत्तम कुलीन रीतीच्या अनुकरणानें विशेष सहृदयता आली असती.

" कुसुमचापें सचिल न्हाली " असें ह्मणून "लपवि रूपें मदन कोटी. " ह्मणणें हा वर्णनीय अलंकार नव्हे. स्त्रियांच्या वदनाला अगदीं परमावधीची उपमा ह्मणजे पूर्णचंद्राची दिलेली आढळते. पण सावित्री " वदनतेजें रवी झांकी " (पृ.३) अशी असल्यामुळेंच " तिच्या तोलीला तोल देणारा कोणी" न मिळून "तेजें दिपती नृपती आणि तिला न वरती," असें झालें!

ह्या नाटकांतील भाषणरूपी रत्नास सुभाषितरूपी कोंदण ठिकठिकाणीं चांगलेंच केलें आहे; पण कांहीं ठिकाणीं तें पोपटपंचीसारखें झालें आहे. मालवीचें पृष्ठ ५४ वरील भाषण पहा. अशानें मोटेवर चोर धरल्याचा प्रकार होऊन नव्या रचनेस बाध येतो.

पृ. ६ नटी:—" नि नाहींका आपल्या गंगूची हातभर सुरी माझ्या उरावर." रा. रा. सोकरजींसारख्याच्या गंभीर भारदस्त अशा कृतीस हें वाक्य रुक्ष होय.

अशा प्रकारचीं उदाहरणें आणखींही बरींच आढळतील. शब्दयोजनेकडेही द्यावें तितकें लक्ष दिलेलें नाहीं. 'तोलीला' 'धडधडके' 'थरकांपतें' 'जाणीं' 'थाक' " नृपराणा " " नवतिभार " तपोतेज इत्यादि शब्द अशुद्ध आहेत. आणि " पुरवा मनिंची अडी "—" सोसेल कसा विघड मजला " इत्यादि वाक्यांतील जाड अक्षरांचे शब्द विपरीत अर्थाचे आहेत. आणि ह्या सर्वांना छपाईनें जें सहाय्य केलें आहे, तें कांहीं अवर्णनीयच ! शुद्ध, अशुद्ध, ह्रस्व, दीर्घ यांना भेदभाव किंवा नियम ह्मणून कसला तो नाहींच ! वानगीकरितां एक वाक्य:—

" यथाकालीं कन्येचें दान न करणांरा पिता व पिता मरण पावल. असतां मातेचें रक्षण न करणारा पुत्र निंद्य होता तूं उपवर झाली आहेस." (पृ. १४)

ग्रंथकर्ते व छापखानेवाले ह्या दोघांच्याही दृष्टीपुढें अशी धडधडीत घाण रहावी, ह्यापेक्षां आह्मां महाराष्ट्रीयांच्या कर्तबगारीची अधिक उच्च ध्वजा ती कोणती ? असो. हे दोष सूक्ष्म दृष्टीनें दिसणारे होत पण एकंदरीनें प्रत्येक नाटकमंडळीनें—अश्लील, विसंगत व समाज विघडविणारे प्रयोग करण्याचें सोडून—हा प्रयोग करावा ह्मणजे स्वार्थाय च सुखाय च होईल. दोषदिग्दर्शनाबद्दल रा. रा. त्रिलोकेकर ह्यांचें मन विकल्पित होणार नाहीं अशी आशा बाळगून सर्व आबालवृद्ध स्त्रीपुरुषांनीं प्रयोग पाहण्यास व वाचण्यास योग्य अशा प्रकारचें हें नाटक आहे, हें सांगून मोठ्या प्रेमानें ग्रंथकर्त्याचा निरोप घेतों.

पत्रव्यवहार.

बा कोकिळा!

तूं खुशाल तरी आहेसना? जागा तरी आहेसना? तुझी स्मरणशक्ति ठिकाणावर तर आहेना? फ्रान्स देशांतील ज्वराच्या सांतीप्रमाणें तुझें पूर्वस्मरण नष्ट तर झालें नाहीं? देव करो, आणि अशा प्रकारच्या अरिष्टांची लवमात्रही तुला बाधा न हो! कारण, तूं हजारों लोकांस रमविणारा आहेस; हजारों लोकांस प्रसन्न करणारा आहेस; हजारों लोकांस ज्ञान देणारा आहेस; आणि हजारों लोकांस उपदेशही करणारा आहेस. 'भाग्यवान् पुरुषाचें स्त्रीसौख्य,' 'सासरची पाठवणी इत्यादि तुझ्यापासून प्राप्त झालेल्या अमोलिक ओंवाळण्या, तुझ्या देशभगिनी, अनंतकालपर्यंत कंठांत धारण करून भूषण मिरवितील. पण बाबा! तुझ्या त्या पायधोळ आशीर्वादांना आणि मिठ्या वचनांना मात्र कोपरांपासून नमस्कार असो! तुझ्या पंचमस्वरांत जनानी आवाजही मिश्र करून गायनामृताची यत्किंचित् कला वाढते का पहावी, ह्या हेतूनें मीं तुजकडे अवघें एकच पत्र पाठविलें. त्यास तुजकडून आश्रय मिळाल्यास, आणखीही कांहीं कालपर्यंत, तुझ्या पडवीला बिऱ्हाड द्यावें असें मनांत होतें, पण त्या आशेचा मोड तूं अजिबात खोडून टाकलास. माझा लेख पुनरपि कानांवर येण्याविषयीं तुझे वाचक उत्कंठित आहेत. ह्यावरून, व तूंही त्यास आश्रय दिलास ह्यावरून तो टाकाऊच असें ह्मणतां येणार नाहीं. मग अशा अर्घ्यापानावरून कां बरें उठवितोस? क्षुधिताला-दारावादेर कां ढकलतोस? बस, बस, थांब, थांब, ह्मणून प्राण व्याकुळ तरी काय ह्मणून करावयाला लावतोस? 'द्वारि तिष्ठति किंकरः' ह्याप्रमाणें मी तुझ्याकडे डोळे लावून बसलें आहें. पण तुझ्या घरीं दाद आहे कोठें? तुझ्या दाराशीं बी. ए. एम्. ए. सारखे पदवीधर, कवि, स्तुतिपाठक झुलत राहिले आहेत! तेथें माझ्यासारख्या क्षुद्र अबलेला कोण विचारतो? माझीं शेषपत्रें तुझ्या दप्तरीं तरी आहेत का? का दिलींस वृत्तपत्रांबरोबर, वाण्याच्या घरीं खडीसाखर बांधायला? नसतील, तर येवढी मौनवृत्ति कां? लांबलचक पत्रांना तुझ्या पुस्तकांत थारा मिळतो, आणि माझ्याच लेखाला तेवढी जागा नाहीं होय? अरे! तूं त्या केसरीच्या डुरकावणीला भ्यालास होय? का मोदवृत्ताच्या स्तुतीनें लज्जित झालास? कां केळवेकर बाईच्या पत्रानें संशयसागरांत बुडालास? झालें तरी काय? पण बाबारे! ह्या करवीरांत दुसरीही आणखी अशीच 'जैनभगिनी' सुदैवानें

अवतीर्ण होऊन, ती येत्या वर्षप्रतिपदेपासून स्त्रीवक्तृत्वसभा सुरू करावी म्हणते. तसा योग आला, तर केसरीसारख्यांची सुद्धां खडी जिरेल, हें तूं पक्कें लक्षांत ठेव. डगूं नकोस असल्या कुतर्कांना मीठ घालूं नको. तुझें व्रत तूं चालीव. पण मी वेडी तर नव्हेंना? 'चिकित्सा' जेथें धूळ खात पडली आहे; 'भीमकर्मा राघोबा' जेथें रणांत तळपतो आहे, तेथें 'करवीरस्थ महिले' ला 'ये' 'बस' म्हणायला वेळ आहे कोणाला? पण असें करणें तुझ्या ब्रीदाला, तुझ्या शीलाला, तुझ्या करणीला योग्य नव्हेरे नव्हे! म्हणून मी तुला जागा करतें; सावध करतें; स्मरण देऊन पहातें. याउप्परही तुझी झोंप जात नसेल, तर दे माझी पडशी घराबाहेर फेंकून. होऊं दे काय तो सोक्षमोक्ष. एक घाव दोन तुकडे. पुन्हा मळमळ नको. कारण, 'आशायाः परमं दुःखं निराशा परमं सुखं' अशी म्हणच आहे. लोभ असावा ही विज्ञप्ति.

करवीर, ३।२।९६ } नम्र करवीरस्थ महिला.

*** महिलेचा लेख खरोखर लोकादरास पात्र असून तिचें मन त्रस्त होण्याइतकी आमच्याकडून त्याची उपेक्षा झाली खरी म्हणून तो लेख सुरू करण्याचें मोठ्या आनंदानें आश्वासन देतों.

ए० के० को.

वाचा, विचार करा आणि प्रयत्नास लागा.

(धनुर्धारी यांजकडून)

१ आमचा परम प्यार हिंदुस्थान देश सांप्रत अत्यंत नीच दरिद्रपंकांत रुतला आहे. माणसीं सरासरीनें सालिना अवघे २७ रुपये देखील प्राप्ति नाहीं, एकंदर लोकसंख्येंतील जवळ जवळ चौथा हिस्सा इतक्या लोकांस निव्वळ उपासमारींत दिवस काढावे लागतात, या गोष्टी स्वतः सरकार कबूल करितात! त्यावद्दल कोणास कांहीं शंका म्हणून आतां उरलेली नाहीं.

परंतु आह्मी कंगालांतले कंगाल, भिकाऱ्यांतले भिकारी, एकादशी, प्रदोष शिवरात्री रोजरोज करणारे अशी नित्य जपमाळ घेऊन कितीही कंठशोष चालविला तरी त्याचा कांहीएक उपयोग व्हावयाचा नाहीं. येऊं नये तें भयंकर संकट

दुर्दैवानें आपणावर ओढवलें खरें त्याला करावयाचें आहे काय? **"मना श्रेष्ठधारिष्ट जीवीं धरावें"** अशा हिम्मतीनें आलें अंगावर त्यास शिंगावर घेतलेंच पाहिजे. अशी तयारी असणेंच पुरुषलक्षण होय! मुळु मुळु रडत बसण्यानें किंवा हाय हाय ह्मणून छाती बडविल्यानें अगर आपलें दुर्दैव ह्मणून दुसऱ्याच्या नांवानें बोटें मोडीत बसण्यानें अथवा कसें करूं, काय करूं ह्मणून घोकीत बसण्यानें कांहीं कार्यभाग होत नसतो.

हल्लीं आह्मी आर्यावर्तीय जे कांहीं मोठ्या कचाटींत सांपडलों आहोंत ते असेः—

(अ) आमचीं शस्त्रास्त्रें सरकारानें हिरावून घेतलीं आहेत त्यामुळें आमचा **मर्दानीपणाच** मुळीं **झिरपूं** लागला आहे. आणि चारदोन पिढ्यांत शस्त्रास्त्रांचें दर्शन जेपाळसारख्या रेचक औषधीचें हटकून काम करील यांत संशय नाहीं!

(आ) दिवाणी फौजदारी कायद्यांचें स्वरूप व त्यांची अम्मलबजावणी आह्मांस ज्ञानी बाण्यावरच नेत आहे.

(इ) चार शतकें वाढीस लागलेला थंड हवेंतला, अनेक सामाजिक अनुकूलतेंतला व स्वभाषेंतून मिळणारा असा विलायती अभ्यासक्रम उष्ण हवेंत, चाळीस वर्षांच्या अवधींतच, परक्या भाषेंतून सामाजिक हरकती असतांही आमच्या तरुण पिढीवर लादण्यांत आल्यामुळें बिचाऱ्या भावी प्रजेची कंबरच मोडत आहे व असले ते हैबतखान प्रपंचास जुंपले जाताहेत.

(उ) अपुरें अन्न, पोरांची सारखी काळजी, वाढत्या गरजा, फाजील चोंचले, धर्माचा आधार नाहीं, ईश्वराची ओळख नाहीं इत्यादिकांमुळें नको हा जीव आणि नको हा संसार अशा फुटक्या छातीची मनस्वी प्रजा, अशामुळें रडकीं पोरें, दुखणाईत बायको, ओढगस्त प्रपंच आणि सभोंवतालच्या कंगालपणामुळें बिनकळकळीचा बनलेला परिवार, अशी स्थिति सर्वत्र आढळते.

(ऋ) काय करावें, उद्योग कोणता पाहावा, धंदा काय पत्करावा हेंच कोडें सर्वत्रांस सारखें पडलेलें आहे. दरोबस्त आमचे उद्योगधंदे राजाश्रयाच्या बळावर विलायतकरांनीं चांगले डबघाईस आणिले आहेत. आमच्या सर्व गरजा ते भागविताहेत. त्यांनीं आह्मांस लागणाऱ्या तमाम वस्तु पुरविण्याचा जणुं मक्ताच घेतला आहे अशी आजमितीला स्थिति आहे. शिवाय अनियंत्रित व्यापारतत्वें, घटकेंत तोळा, घटकेंत मासा अशा जुगारी स्वरूपाची विलायती हुंडी, अत्यंत निष्ठुर व दुस्सनी कळकळीनें ओतप्रोत भरलेल्या सरकारची औदासिन्यवृत्ति, एखादा धंदा उभारूं झटलें कीं नरड्यावर नख ठेवण्याचे कायदे बाहेर पाडणारीं सरकारकौन्सिलें आणि मग दरिद्रामुळें परस्परांतील विश्वासाचा सप्पाटून अभाव, अव्यस्थितपणा, मूर्खपणामुळें एकत्र होऊन काम करण्याची अक्कल नसणें, इत्यादिकांची यथेच्छ समृद्धि, अशा स्थितींत आ-

मच्या लोकांस उद्योगधंद्याविषें "चुबुकसमर्पितजानुः" असें पडावें लागलें तर त्यांत विशेष नवल नाहीं !

(ल) जास्त खाणारांची जमिनीवर दाटी, टीचटीचभर लांबीरुंदीचीं बिनखती शेतें, नक्तनाण्यांतलें आणि **नमके**वेळीं असें सरकारचें देणें, फारेष्ट कायद्यामुळें खतास सरपणाचें करावें लागत असलेलें काम, कंगाल आणि कर्जबाजारी कामकरूंची मरतुकडी मेहनत, अपुऱ्या जनावरांची मशागत, दिवाणीकोर्टांत जाण्याची हौस, वकिलांची कायदेशीर लूट, भाऊबंदकीचें तंटे, बींबियाण्यांचा अभाव, पर्जन्यरायांची तब्बेत, इत्यादिकांपुढें शेतकी कशी निर्माल्यवत् झालेली.

(ए) रिकामपणा, घरबसल्या जिणें, सांथीचें सरकाराकडून निवारण, युद्धांची वार्ता सुद्धां न ऐकण्याइतकी शांत राज्यसत्ता यामुळें संतानाभिवृद्धि कशी गणितश्रेढीवर चाललेली आहे.

अशी जिकडे तिकडे संकटांची कशी रेलचेल उडून गेलेली आणि ही स्थिति सुधारण्यासाठीं राजकीय चळवळी, सामाजिक सुधारणा, औद्योगिक प्रयत्न आणि विद्याप्रसार इत्यादि दिशांनीं प्रयत्न करणाऱ्या संस्था दरिद्रातिशयामुळें उपजतांच मरतात. दरिद्र फार यामुळें अनीति मनस्वी झपाट्यानें वाढत आहे. दुर्व्यसनें भराभर जडताहेत.

तेव्हां अशा प्रसंगीं करावें काय? खऱ्या कळकळीचा प्रभु नाहीं. स्वतःच्या मनगटाच्या जोराची प्रजा नव्हे, तेव्हां अशा या हालअपेष्टांत चार पांच हजार वर्षांच्या पलीकडील ह्यातीचें हें आर्यराष्ट्र अजी नष्ट होणार कीं काय ही भीति अगदीं साहजिक आहे.

ह्मणून सद्यस्थितीला अनुरूप व आवश्यक असा एकच उपाय दिसतो. मात्र तो सिद्धीस जाण्यास सहाय्याची काय कमतरता पडेल ती पडो.

२ तो उपाय ह्मणजे **परदेशीं वसाहतीस जाणें:—**

(क) आह्मी आज उणींपुरीं ३०।३५ वर्षें इंग्रजांनीं येथें राज्य कसें **कमावलें** आणि आह्मीं कां **गमाविलें** याचा इतिहास धोकीत आहों; तर काय असे आह्मी मरेतोंपर्यंत धोकीतच बसणार? औषधयोजनेचा श्लोक नुस्ता पाठ केल्यानें कधीं कोणास गुण आला आहे?

(ख) येवढें मोठें स्वराज्यसौभाग्य आह्मीं पारखें करून घेतलें तें घेतलें, त्याबद्दल दिनदुनयेंत नाचकी पुष्कळ होत आहे त्याची अद्दल चांगली घडते. पण शेजारीं–अगदीं कुशीला–असलेल्या खंडांत परक्यांनीं रक्ताचा थेंब न सांडतां वापशेटीच्या पेंडीसारखी आपापल्या सत्तेची वांटणी जी चालविली आहे त्याची आह्मांला कांहींच का शुद्ध नसावी. त्यांच्या त्या दाटींत आह्मींही आपलें सोंवळेंभांडे टाकून तेलंगी अगांतुकी तरी मांडावयाला हवी?

(ग) किंवा तोही प्रश्न राहूं द्या बाजूस. गणितशास्त्रांत प्रथमतः जर **एका**चा आंकडा असला तर मग बाकी त्याजवर जितकीं जास्त पूज्यें मांडावीं तितकी किंमत वाढतच जाते. हाच न्याय समाजांत. एक मनुष्य **एक्या**सारखा असला ह्मणजे मग बाकीचीं पूज्यें भलीं चांगलीं उपयोगीं पडतात आणि इतिहास पाहतां लोकोत्तर अशी एखादीच विभूति असते. बाकीचीं सर्व शून्यें च. इतर वेळ उदरनिर्वाहांत किंवा दुसऱ्या व्यवसायांत जाऊं लागला तर तास दोन तास तरी शारीरिक मेहनत केल्यानें अंगांत तकवा राहतो हें खरें आहे. ह्मणून मर्दानीपणास नित्य आणि ओहटीसारख्या वेगानें आंचवत जाणाऱ्या आमच्या मंडळास—त्यांतील कांहीं-जणांस **मर्दानी तालीम** मिळेल अशी सोय पहावयास हवी. ती सोय पाहण्यासाठीं आणि तेथें चांगलें तयार बनण्याकरितां कांहीं मंडळी वाह्यदेशीं पाठविली पाहिजे. शंभर मर्द शिपायांच्या भिस्तीवर लाख लाख लोकांच्या नाकांत वेसणी अडकविलेल्या आह्मी पाहतों.

(घ) निर्जनवनांतील अत्यंत सुवासिक पुष्पें कोणीही न हुंगतां झाडांवरच्या झाडांवर कोमेजून जातात, त्याप्रमाणें आमच्या मंडळांतील कैकांच्या मानसिक श्रेष्ठता व कैक कर्तबगारी जिथल्या तेथें नष्ट होतात, कारण प्रसंग नाहींत. पण असें आहे कीं, गुणाचा विकास होत गेला तर तो केव्हां व कसा उपयोगीं पडेल याचा काय नियम आहे? स्वराज्य नाहीं ह्मणून विकास पावण्याचे प्रसंग येत नाहींत. यास्तव स्वतःच्या हिमतीवर ते प्रसंग येथें नाहींत तर दुसरीकडे आणण्याचा प्रयत्न कां न करावा? वक्तृत्व, ग्रंथकारपणा इत्यादि आणण्यासाठीं मंडळ्या स्थापाव्या लागतातच ना? मग ही **राजकीय तालीम** परदेशांत कां नये स्थापूं?

(च) येथें—आमच्या देशांत इंग्लंडच्या कारखान्यांशीं कोठें किंचित् स्पर्धा होईल कीं काय ही भीति—भीतीची नुस्ती सांवली येतांच, येथील उद्योगाच्या नरड्यांवर नख देण्याला आमचें सरकार कसें दक्ष असतें हें गिरणीसंबंधाच्या कायद्यांवरून स्पष्ट कळून आलेंच असेल. शितावरून भाताची परीक्षा. आमचे एथलें दरिद्र हुसकून लावण्यास बाहेर जाऊन कमाई करून आलें पाहिजे, येथें कांहीं सोय नाहीं. सारा व्यापार इंग्रजांच्या हातांत. कारखाने सगळे परखंडांत, शिवाय ते येथें उभारण्याला अडचणी वर सांगण्यांत आल्याच आहेत; यास्तव येथें आसन्नमरण झालेल्याच्या नादीं लागण्याचें सोडून कांहींजणांनीं बाहेर जाऊन तेथें धनोत्पादनाचे यत्न चालवावेत. आणि येथें गुदमरून मरण्याइतक्या झालेल्या दाटींत थोडें वर होण्यास सवड ठेवण्याचें श्रेय घ्यावें.

(छ) महाराष्ट्रदेशाच्या इतिहासाकडे पाहिलें तर, अशा वाह्यप्रदेशीं दबा धरून मग स्वदेशांत संपत्ति हांकून आणण्याचा प्रयत्न झाला, तेव्हांच आपला उदय झाला, असें आढळून येतें. **गाईकवाड, शिंदे, होळकर, भोंसले, पवार, पटव-**

धन यांनीं वसाहती नाहीं केल्या तर केलें काय? आतां त्या, देशांतल्या देशांत आणि ह्या देशाबाहेरच्या इतकेंच.

(ज) आपल्या पूर्वजांनीं यवनी बादशाहीचे पाय लागण्यापूर्वी मात्र आफ्रिका, अमेरिका, मसाल्याची बेटें येथें मोठाल्या वसाहती स्थापिल्या होत्या आणि आमचे पूर्वज आर्य हेही हिंदुस्थानांत वसाहतीसाठींच आलेले. तेव्हां हा प्रकार कांहीं अश्रुतपूर्व नव्हे.

३ पण हे उपाय सिद्धीस जातील कसे? (क) पैसा कोठून आणावा? (का) यांत पुढाकार कोण घेईल? (की) जाण्याला तयार कोण होणार? आणि (कु) तेथें गेल्यावर तरी सुख होईल किंवा आगींतून उठलें आणि फोंफाट्यांत जाऊन पडलें असें होणार नाहीं कशावरून, हे मुख्य अडचणीचे प्रश्न आहेत. आणि परिणामीं कितीही चांगली गोष्ट असली तरी प्रारंभ कसा करावा ही अडचण दूर झाल्याविना त्याच्या विचारांची दिशाही कोणी कबूल करणार नाहीं हें उघड आहे.

(ख) आपल्या मेहनतीचें चीज, आशेची परिपूर्णता आणि उद्योगाच्या साफल्यतेची पुरी पुरी खात्री, इतक्या गोष्टी एकत्र जमल्या ह्मणजे पुढील आशेवर भांडवल रोंखण्याची बुद्धि होते एक, किंवा निवळ धर्मादाय, लौकिक संपादण्याखातर पदरची गांठ सोडण्यास प्रवृत्त होणारी मंडळीही पुष्कळ आहे. किंवा उत्तम व व्यवस्थित **पत** ह्मणजेच खरें भांडवल आहे. या वसाहतीच्या प्रश्नाला भांडवल थोडेंथोडकें लागावयाचें नाहीं आणि आमच्या भोळ्या, धार्मिक शेटसावकारांची नजर इकडे फिरणें कठीण, यास्तव (१) वसाहतकर्जे (२) अमेरिकेंत व इंग्लंदांत धर्मादाय हेच दोन मार्ग शक्य दिसतात, व्याज सुटेल या आशेवर एथील धनिक आपल्या तिजोऱ्या मोकळ्या करणार नाहींत. कारण विश्वासाचा अभाव आणि "जग मिथ्या" ही समजूत जोरदार आहे. आणखीही दुसऱ्या अडचणी आहेतच.

यास्तव आफ्रिकेंतील स्वतंत्र वसाहती राणीसरकारच्या अमलाखालचे व इंग्लंडसत्तेच्या अंकित असे मुलुख आणि इतर युरोपियन राष्ट्रवसाहती या तिन्हींतून आपणांस प्रारंभाला पुरे इतका मुलूख कांहीं सवलतीवर मिळवावा; त्या सवलती दाखवून "वसाहतकर्जे" (Colonial Debts) देणाराशीं अटी ठरवाव्या आणि मग संपत्तीच्या मदानें थलथलीत झालेल्या राष्ट्रांत धर्मादायसाहाय्य मागावें. ही पैसा कोठून आणावा या शंकेच्या समाधानाची गोष्ट झाली. प्रयत्न आपला, कुमक देणारा ईश्वर. पंडितावाईनें विधवांच्या सदनास अमेरिकेंत भांडवल उभें केलें, धर्मशिक्षणाकरितां मिशनऱ्यांमार्फत पाण्यासारखा पैसा ओतविला जातो. त्या देशांतून उपासमारीचे हाल बंद करण्यास कुमक होणार नाहीं हें शक्य नव्हे. व्यवस्थितपणा आणि कडकडीत स्वार्थत्याग

केलेले पुढारी काय करूं शकणार नाहींत? ज्या साऱ्या युरोपच्या राष्ट्राला आह्मीं प्रथम आश्रय दिला त्यांच्याकडे जाण्याचा वखत खोटा तर खराच पण तो आला आहे, तरी त्यांच्याकडून चांगली कुमक होण्याचा संभव आहे. मनुष्यजात आणि त्यांतून शाहणी व समंजस अद्याप इतकी अधम झाली नाहीं, अशीही आशा आपल्या प्रयत्नाची बरीच थबथबलेली दिशा आहे. प्रयत्न करावा, निश्चितपणाची हमी असेल तरच प्रयत्न करावा हे नेभळ्या हिमतीच्या लोकांचें शास्त्र होय.

(खा) पुढाकार कोण घेईल आणि जाण्याला तयार कोण होईल? ही अडचण खरी आहे. पोटांत दुखेल तोच ओंवा खाईल हें खरें. तथापि त्यांतल्या त्यांत विचार असा करावयाचा कीं, आपलें एकट्याचें कसें तरी निभावलें ह्मणा किंवा निभावेल पण पुढल्या पिढीची वाट काय? आमच्या लोकांचें द्रव्यसंपादन व द्रव्यरक्षणार्थ तत्संबंधी तमाम प्रयत्न आपल्या स्वतःपेक्षां आपल्या पोराबाळांखातरच जास्त असतात. ओढघस्तीच्या प्रपंचांत, अळेंवळें कसे तरी चार दोन पैसे वांचवीत, आपल्या आयुष्याचा विमा उतरविण्याचा हेतु, आपल्या पश्चात् आपल्या पोराबाळांना कुमक व्हावी हाच ना? कंगाल अन्न, फाटकें वस्त्र, उपभोगाचा पुरा अभाव अशा स्थितींत पै पै सांठविणारे द्रव्यरक्षक आपणांवरोबर पैसा येईल अशा का समजुतीचे असतात? तेव्हां तें कांहीं नाहीं. आपला सारा प्रपंच आपणांखेरीज इतरांसाठीं ह्मणजे स्वतःच्या बायकापोरांखातर असतो. मनुष्य मेल्यानंतरचा शोक मृताकरितां नसून स्वतःकरितां असतो हें अगदीं खरें, तसेंच मनुष्यस्वभावाचे येथील स्वहितसिध्यर्थ सर्व उद्योग स्वतःशिवाय इतरांसाठींच असतात.

ह्मणून विचार करावयाचा तो असा कीं, आपण कसेबसे तरी पंचवीस संपले पांच उरले अशा स्थितीसच येऊन पोंचलों. उरले पांच ते कसे तरी जाणार पण आपल्या पश्चात् आपल्या पोरांचें व्हावें कसें? आपण करितों ती सरकारी किंवा सावकारी चाकरी आपल्या पोरांला मिळेल अशी खात्री नाहीं. शेजारीपाजारी, नेहीसोबती, आप्तइष्ट सारे पैशाकरितां टपून बसलेले; वाढल्या दारिद्र्यामुळें समाजाची एकंदर नीति चांगली ओहटीस लागलेली; व्यापार जुगारी झालेला, कारण, विलायती हुंडीचा भाव जुगारी आणि तिचा संबंध नाहीं असा आवकजावक व्यापारी जिन्नस नाहीं; कलाकौशल्यादि कारखाने धुळीस मिळण्याच्या नशिबाचे, चाकरीची दुर्मिळता तर आपल्या समोर आहेच. तेव्हां त्या पोरांवाळांनीं येथें सुखरूप रहावें आणि रहाणें कितपत शक्य आहे?

दुसरें, पिढीजाद इनामदार, जाहगीरदार आहेत त्यांचें वैभव हरघडी गळत चाललेलें; कारण भाऊबंदकी. एकाचीं चार घरें होणार, याशिवाय चोंचले, दिवा-

णीकोटें वगैरे लुटी निराळ्याच. लाख रुपये दौलतीचें घराणें, त्यांत दहा दहा हजारांचे जाहगीरदार झालेले आपणांपुढें आहेतच. आणि राजेपदाच्या इभ्रतीची मंडळी मोलमजुरीच्या यशास येऊन पोंचलेली दिसते.

संतति वाढती तसें उत्पन्न नाहीं किंवा उद्योग पुढें पाऊल टाकणारा नाहीं हें सुख-वस्तूंच्या तोंडानें कबूल होणारें आहे.

यास्तव, आपल्या उद्योगाचा सारा फलितार्थ आपल्या पोरांबाळाकरितां, अशी जबरदस्त कळकळ असणारांनीं कळकळीच्या जोराइतपतच दूरदृष्टिही पण ठेवावी. ह्मणजे परदेशच्या वसाहतीचा मार्ग आपण आपल्या हयातींत सुकर करणें प्रत्येकाचें खरें कर्तव्य, असें विचाराअंतीं तरी खास दिसून येईल. परंतु आजमितीला खाऊन पिऊन सुखी असे लोक जाण्यास तयार नसावयाचे आणि ज्यांना नौकरीचाकरीची सोय आहे ह्मणजे अर्थात ज्यांना अशा गोष्टी कळतात, त्यांनीं हातचें सोडून पळत्याच्या पाठीस लागणें शहाणपणाचें नाहीं हेंही खरें. ह्मणूनच येथून वसाहतीसाठीं जाणारी मंडळी मद्रास व बंगाला इकडील "कूलिएमिग्रंट" "गुलाम मजूर" यांच्या सारख्या स्थितीचे तयार झाले. आणखी आमची मंडळी "**अल्पतृप्ति**" मनस्वी आहे. व्यक्ति-मात्रक सुखाला ही तृप्ति चांगली उपयोगीं पडते खरी पण राष्ट्रीयदृष्ट्या ती चांगली घातुक असें ह्मणावयास कांहीं हरकत नाहीं.

अशा स्थितींत **आफ्रिकेच्या वसाहतीचा प्रश्न** केवढाही कल्याणप्रद असला तरी त्याचा व्यावहारिक उपयोग कांहींएक होणार नाहीं. कारण जाणार कोण? ह्मणून (१) बंगाल्याकडील जमीनदार, महाराष्ट्रांतील धनिक सावकार, जाहगीरदार आणि संस्थानिक यांनीं आपणांसाठीं तिकडे इष्टेटी कराव्या व देखरेखीसाठीं कार-भारी, उत्पन्नांत हिस्सा देऊन तिकडे रवाना करावेत. आफ्रिकेंत गेलेले व मुदत संपलेले हिंदुस्थानचे मजूर व तद्देशीय लोक यांच्या कुमकेनें वसाहती आपोआप होतील. **पेशव्यांनीं** माळवा, कर्नाटक, हिंदुस्थान, बुंदेलखंड येथें स्थापिलेल्या वसाहती मिळेल त्यांत शेंकडा दहा आमचें, बाकी सर्व तुमचें अशा करारानें एकेक कर्तबगारीच्या माणसास मुकरर केलें आणि मग त्यांनीं आपोआप आपला परिवार गोळा केला. हाच प्रकार आफ्रिकेंत केल्यास एक पंथ दो काज. व्यापारी लोकांच्या देशावरील पेढ्या, मुनीम, भागीदार असतो ह्मणूनच फायदेशीर होतात. निवळ पगारी माणसानें काम भागत नसतें. प्रत्येकाला तूं जारे ह्मणण्यापेक्षां एक कारभारी पाठविला ह्मणजे सर्व स्थिति पाहून तो आपला गोतवळा जमा करितो व जमा करण्याला त्याला अडचण पडत नसते. त्या गोतवळ्याचे गोतवळे पुनः असतातच.

(२) आफ्रिकेंत हिंदुस्थानचे मजूर दरसाल पुष्कळ–ह्मणजे १०।१५ हजार–जा-तात व त्यांची मुदत संपली कीं त्यांना सक्तीनें आणून इकडे पोंचवितात. किंवा दुसरा करार कर ह्मणतात. यास्तव मुदत सरलेले ते लोक आपल्या उपयोगीं

पडतील आणि त्यांचा ओढाही साहजिकपणें आपल्या देशबंधूंकडेच राहील. शिवाय तद्देशीय लोकांशीं सख्य इंग्रजांपेक्षां आपणांसी जास्त सुलभ व शक्य आहे ह्मणून येथून फारशी मंडळी रवाना करण्याची प्रथमतः उरसफोड नको. कर्तबगारीचीं चार पांच माणसें झालीं ह्मणजे पुरेत. आणि तीं मिळणें अशक्य नव्हे हें खास.

(खी) तेथें गेल्यावर सुख होईल काय आणि तेथें जाऊन करावा धंदा कोणता? हाही एक जबरदस्त प्रश्न आहे.

हल्लीं आमची-हिंदुस्थानांतली-दोन अडीच लाख मंडळी दक्षिणआफ्रिकेंत आहे व आमच्या व्यापारी मंडळीचीं २५० वर दुकानें त्या प्रांतीं आहेत; आजकाल तेथल्या आमच्या देशबांधवांस वसाहतवाल्या गोऱ्यांकडून अत्यंत जाच होतो असा बोभाटा माजला आहे. कांग्रेसनें एक ठराव केला. वर्तमानपत्रांनीं लेख लिहिले आहेत व खुद्द विलायतेसही बरीच चळवळ नेटानें चाललेली आहे. तेव्हां हा असा तिकडे प्रकार चालला असतां आणखी आपण जाऊन तेथें कशास पडावें, अशी शंका येणें अगदीं साहजिक होय. परंतु तेथील जाचासंबधानें वस्तुतः स्थिति फार भिन्न आहे व तो जाच नाहींसा करण्यासाठींच आह्मीं एथली चांगली मंडळी पाठविली पाहिजे.

(१) गांवठणापासून बाहेर ह्मारवड्यांसारखे आमच्या देशबंधूंस वसाहतवाले राहण्यास लावितात.

(२) रात्रीं अपरात्रीं रहदारीच्या रस्त्यांवरून परवानगीशिवाय फिरूं देत नाहींत.

(३) व्यापारउदिमासाठीं फार दिरंगाईनें परवाने मिळतात व हव्या त्या ठिकाणीं दुकान काढण्यास हरकती येतात.

(४) खरें स्थानिक स्वराज्य तेथें असतां मतदारपणाचा हक्क (व्होट) मिळत नाहीं. रेल्वे, ट्रॉम यांतून फिरण्यास हरकत व पंक्तिप्रपंच फार होतो. (५) "कुलीज" ह्मणजे मजूर या नांवानें संबोधितात. आपला मान रहात नाहीं, टक्काशेर भाजी टक्काशेर खाजा असा प्रकार इत्रतींत आहे.

याच कायत्या जाचाच्या मुख्य बिना. इकडून गेलेल्या आमच्या देशबांधवांत शेंकडा नव्वद मजूर-हमाल-आहेत ही गोष्ट आणि त्यांची आरोग्यशास्त्रासंबंधी वर्तणूक, त्यांचा निरक्षरपणा व यासंबंधानें त्यांची असलेली नीति इत्यादि गोष्टी एका पारड्यांत आणि हे जाच दुसऱ्यांत घालून वजन केलें तर कांटा कोणीकडे झुकता राहील हें ज्याचें त्याला कळण्यासारखें आहे. व्यापारी झाले तरी दर्जा केवढा आणि युरोपियन या इयत्तेंत ते कितपत टिकतील हें स्वपक्षाभिमानानें फाजील आंधळे न होणाऱ्या लोकांस तेव्हांच कळेल. येथल्या शहरांतील संभावित लोकांच्या वस्तींत आणि भररस्त्यांवर लघु व दीर्घशंका किती विपुल सुटलेल्या असतात आणि सार्वजनिक आरोग्य या दृष्टीनें आह्मी व वरिष्ठप्रतीचे लोक सुद्धां किती नालायक आहों

याचा विचार केला ह्मणजे आमच्यांतील कमी दर्जाचा लोकसमूह, गोऱ्या वसाहतवाल्यांस, आपल्या वस्तींत न मिळूं मिसळूं देण्याच्या योग्यतेचा वाटल्यास त्यांत गैर तें कांहीं नाहीं. अनेक भयंकर रोगांची सांत या लोकांपासून व त्यांच्या देशांतून उद्भवते ही ठाम समजूत–खरी किंवा खोटी–वसाहतवाल्या गोऱ्यांची आहे तेव्हां आपल्या वस्तीपासून दूर राखण्याचा त्यांनीं प्रयत्न केला तर त्यांत गैर तें काय आहे ?

वसाहतवाल्या गोऱ्यांचा समाज व मुख्यत्वें त्यांच्या स्त्रिया यांना फाजील मोकळीक असते व वसाहत करणारांना त्यांतल्या त्यांत ती जास्त द्यावी लागते ही आणि आमच्या इकडून गेलेले कमी दर्जाचे लोक या दोन्ही गोष्टींचा विचार करितां आपल्या भरवस्तींत रात्रीं अपरात्रीं रहदारी करूं न देणें यांतही कांहीं फारसें चुकत नाहीं. आमच्या इकडे कैकाडी व रामोशी वगैरेना पोलीस आणि ग्रामाधिकारी कसे व कां विनाकारण हात धुवून पाठीस लागलेले असतात याचें कारण पाहिल्यावर वसाहतवाल्यांसंबंधानें इतकी आरडाओरड कां याचा निदान आपल्या मनाशीं तरी विचार करावा.

व्यापाराचे परवाने मिळण्यांत दिरंगाई आणि स्थळाच्या पसंतींत हरकती हें खरें आहे. पण येथें दिवाणीकोर्टात किंवा इतर सरकारी कचेऱ्यांत आपणांस हवेत ते कागदपत्र—सर्व आमचे लोक असतां—मिळण्याला कशा खेरीज हरकती येतात याचा अनुभव कोणास नाहीं काय ? असु. मिळून सारांश तो इतकाच कीं, भाषा, धर्म, आचारविचार अज्ञान इत्यादिकांच्या भिन्नतेमुळें आणि आपलें ह्मणणें काय हें कळवितां देखील येत नसल्यानें—कारण वसाहतवाल्या गोऱ्यांची भाषा—इंग्रजी–आमच्या देशांतून गेलेल्या शेंकडा ९६ पेक्षां जास्त लोकांस येत नाहीं. एकमेकांत गैरसमजाच्या ढिगाऱ्यांचे ढिगारे सांचलेले आहेत. अशा स्थितींत परिणाम घडावयाचा तो कोणता ? हें उघड दिसतेंच आहे. परस्परांचें मनोगत व्यक्त करण्याची ताकद नाहीं, त्या ठिकाणीं कळकळ उपजणें आणि अदबशीर वागणूक करणें मुष्कील आहे.

मतदारपणाचा हक्क नसावा हा मोठा जबरदस्त अन्याय खरा. पण आपल्या भाषेचें ज्ञान नाहीं, आपले रिवाज कळत नाहींत, अशा आणि आपणांकडे बंदेगुलामगिरी पत्करून आलेल्यांस बरोबरीचे हक्क देणें गोऱ्या वसाहतवाल्यांसच काय पण प्रत्यक्ष इंद्रलोकींच्या देवांस सुद्धां कठीण जाईल. बरोबरीचे हक्क मिळण्याची लायकी दाखवून मग हमरीतुमरीवर यावें. एका वसाहतींतल्या कायद्यांत "इंग्रजी लिहितां वाचतां येणारा" हा "व्होटर"च्या लायकीचा समजला जातो असा उल्लेख केलेला आहे. दुसऱ्या एक दोन वसाहतींत मात्र तो प्रकार नाहीं. किंवा तें असो. मुख्य मतलब तो एवढाच कीं "आपलेंच नाणें खोटें मग इतराशीं झगडावें कां ?" असाच प्रकार इथून तिथून या आफ्रिकाप्रकरणांत आहे.

आतां अछत्रीं राहून मिरपूड मागणें अशांतला प्रकार थोडाबहुत या आफ्रिकेंत गेलेल्या हिंदुस्थानच्या लोकांसंबधानें होत आहे ही दुर्दैवाची गोष्ट होय; हमरीतुमरीवर येणें आणि तुझ्या वरिष्ठांकडे दाद मागून तुझी खोडकी मोडीन ही हिम्मत हिंदुस्थानांतील न्याय व पद्धत यांच्या भक्कम पायावरील सरकारकारभारास मात्र साजते. तसा प्रकार वसाहतवाल्यांसारख्या आडदांड मंडळीशीं उपयोगी नसतो. वसाहतवाले सरकार स्वतंत्र व जरासे बेमुरवत, त्यांच्यावरचा शांबर्लेन सेक्रेटरीचा तावा जरा मंडपशोभेपैकीं आणि अशा स्थितींत डेप्युटेशनें पाठवून किंवा थेटपर्यंत मजल पोंचविण्यांत जरासा दूरदर्शीपणा कमीच ह्मणावयाचा. जेथल्या तेथें विनवणी, दिलसफाई, काकळूत वगैरेच्या पोटीं कांहीं खटपट होती तर, इतक्या चिथणीस येण्याचा तरी कमी संभव असें कोणीही आणि तेव्हांच कबूल करील. व्यापारी "कॉन्सल" सारखे एक दोन कामदार, वसाहतवाले गोरे आणि मजूरदार काळे यांच्यांतील गैरसमज, स्वपरभेद किंवा अन्यायी वर्तन यांस नाहींसें करण्यासाठीं नेमण्याची खटपट पुष्कळ उपयोगीं पडती.

असु, ह्मणजे मुख्य सारांश तो इतकाच कीं वसाहतीस जातांना प्रथमपासून आपल्या महत्वाकांक्षेस अनुरूप असाच सुखावह व मानास्पद प्रकार असावा ही हांव मुळीं उपयोगाची नाहीं. कालिकत येथें झामोरिनकडे प्रथम पोर्टुगीज वास्को डिगामा आला तेव्हां काय प्रकार होता? **श्रीछत्रपतिशिवाजी** महाराजांच्या राज्याभिषेकसमयीं एका इंग्रजास कसें वागविण्यांत आलें? पेशव्यांच्या दरबारीं इंग्रज वकिलास कसें यावें लागत असे किंवा इतकें तरी कशाला? आजमितीस सार्वभौमसत्ता भोगणाऱ्या इंग्रजांची दीड दोन शतकें आमच्या देशांत बूज कितपत होती याचा विचार केला ह्मणजे पुरे. नदीचा उगम प्रारंभीं क्षुद्रच असावयाचा. गगनचुंबित वृक्ष प्रथमतः भिकार रोपडें असतें. 'जेवीन तर तुपाशीं नाहीं तर उपाशीं' हा बाणा सोडून पूर्णावस्थेस पोंचतांना आक्रमाव्या लागणाऱ्या सर्व स्थितींतून पार पडण्याची तयारी असली पाहिजे. टाकीचे घाव सोसल्याखेरीज देवकळा येत नसते आणि लगामाला पाय मागें आणि तोबऱ्याला तोंड पुढें असें करूनही चालत नाहीं. मुळें खोल जावींत यासाठीं वाऱ्याच्या सोसाट्यास मुकाट्यानें सादर व्हावें लागतें.

ह्मणून शतका दोन शतकांनीं प्राप्त होणारी बहारदारी आजच मिळेल तर आह्मी वाहेर पडून वसाहती करूं हें ह्मणणें कांहींएक कामाचें नाहीं. **आशा** प्रथमपासूनच बेताबाताची ठेवावी आणि संकटें, अडचणी, त्रास, दगदगी इत्यादि सर्व पायांखालीं तुडवीत जाऊं अशी हिम्मत हवी.

आतां तेथें जाऊन करावा धंदा कोणता हा प्रश्न आहे. **शेतकी, कलाकौशल्य** आणि **व्यापार** हे तीन धनोत्पादक धंदे. हिंदुस्थानांत शेतकी विनफाय-

याचा रोजगार आहे तसा तिकडे नसणें साहजिक होय. जमिनीचा मगदूर चांगला. हिंदुस्थानांतल्या जमिनी सालोसाल विऊन विऊन निःसत्व झालेल्या आहेत. शिवाय दुसरें राजकीय, सामाजिक आणि द्रव्यसंबंधी संकटांचें जाळें इकडे फार पसरलेलें आहे. इंग्रज व्यापाऱ्यांपेक्षां कमी खर्चाची दुकानदारी, सतत सारख्या मेहनतीची संवय, दुर्व्यसनाचा व फाजील मिजासी राहणीचा अभाव इत्यादिकांमुळें इंग्रज व्यापाऱ्यांपेक्षां आपल्याला किफायतदारीचा व्यापार चांगला करितां येईल. शिवाय आफ्रिकेंतील गिऱ्हाइकी आमच्या लोकांस इंग्रजांपेक्षां जास्त अनुकूल असण्याचा संभव हटकून आहे. कच्छ, गुजराथ व काठेवाड इकडील व्यापारी १०० सव्वाशें वर्षांपासून आफ्रिकेकडे व्यापाराला जाताहेत व **जंगबार**च्या–झांजिबार–च्या सुलतानांस एकदोघांनीं आपल्या मुठींतही आणलें होतें. पण जर्मन व फ्रेंच यांच्यापुढें त्यांचें तेज फिकें पडून सुलतान महसूफ तिकडे वळून धोपाटणें हातीं घेत आतां स्वस्थ बसले आहेत.

४ या कामीं प्रयत्न कसे करावेत? हाही प्रश्न साहजिकपणें पुढें उभा राहतो. प्रारंभीं एक माणूस पुढें पाठवून सर्व माहिती प्रत्यक्ष पाहिलेली गोळा करावी, तेथें गेलेल्या मजूर व व्यापारी हिंदुस्थानच्या लोकांचीं मतें अजमावून पाहावींत, कोठें किती व काय शर्तींवर जमीन मिळण्याचा संभव आहे याचा उद्योग चालवावा. **मुंबईची प्रेसिडेन्सी असोसिएशन, पुण्याची सार्वजनिक सभा, मद्रासची महाजनसभा** व **कलकरयाची सभा** या चौघांनीं या कामीं एकदिलानें काम केलें पाहिजे. आफ्रिकेंत दोन किंवा तीन मुशाफर व तीन **कॉन्सल**सारखे गृहस्थ आधीं पाठवावेत. व्यक्तिमात्राच्या वजनाचा हा काळ नव्हे. जाणाऱ्या माणसांत कांहीं वजन उत्पन्न करावयास हवें. **श्रीगाइकवाड सरकार** दरसाल कांहीं विद्यार्थी युरोपादि देशांत पाठवितात तसेच दोन मुशाफर पाठविण्यांत येतील तर कांहीं बावगें होणार नाहीं. आफ्रिकेंतील हिंदुस्थानची प्रजा व्यापारधंद्यांत गुंतली आहे ती गुजराथी भाषेची आहे. मजूर बंगाली व मद्रासी आहेत. राजेरजवाड्यांस उघडपणें या बाबतींत कांहीं करितां येणें शक्य नव्हे. सबब राजकीय चळवळीच्या सभांनींच पुढाकार घ्यावा. आधीं सर्व माहिती आणविण्याची खटपट आणि मग दुसरा विचार.

(पुढें चालू).

PRINTED and published by Janardan Mahadeo Gurjar AT JAVAJI DADAJI'S "NIRNAYA-SAGARA" PRESS, Bombay.

आर्यधर्माभिमानी लोकाकरितां सचित्र हिंदु घड्याळें.

प्रत्यक्ष देवदेवतांनींच हृदयासंबिध घास
केल्यावर अधर्म कितीसा टिकेल.

नसुता मागावा. तुमला पहाण्यानेंच आनंद जर होईलच होईल, तर मग वापरण्यानें कां न होणार बरें? देवतांचे दर्शनानें हिंदुधर्माभिमानास भरती नाहींका येणार? नांव ऐकतांच पहावेंसें वाटतें व पाहतांच घ्यावेंसें वाटतें.

हिंदु घड्याळें कशीं आहेत, दिसण्यांत सुंदर, खिशांत हलकीं, मजबूत, टिकाऊ, अंगचे चावीचीं, तबकडी मिन्याची पांढरी असून त्यावर रीतीप्रमाणें रोमन आंकडे असून ठळक मराठी आंकडेही आहेत आणि प्रत्येक आंकड्यामध्यें हिंदुपूज्य देवतांचीं सुंदर चित्रें आहेत. श्रीगणपति, सरस्वती, रामदासस्वामी, हनुमंत, रामसीता, लक्ष्मीनारायण, गरुड, अष्टभुजादेवी, विठ्ठलरखुमाई, शंकरपार्वती, अक्कलकोटस्वामी, श्रीगुरुदत्तात्रय, आणि मध्यभागीं, महाराष्ट्रास जिवंत करणारे गोब्राह्मणप्रतिपालक **श्रीशिवाजीछत्रपतिमहाराज** यांचें सुबक चित्र आहे. अशीं हीं अपूर्व हिंदु घड्याळें आमचे देशबांधव व भगिनी काय ह्मणून न घेतील!

हिंदु सिलेंडर पिक्क नी. सी. वॉच किं. रु. १० ग्या. वर्ष १
हिंदु लिव्हर प्रीव्हेन्स नी. सी. वॉच किं. रु. १५ ग्यारन्टी वर्षें २
हिंदु रासकोप सिस्टीम नी. सी. वॉच किं. रु. १७ ग्या. वर्षें ३
हिंदु प्रिव्हेलन्स चांदीचें वॉच किं. रु. २५ ते ३० ग्या. वर्षें ४
हिंदु सोन्याचें वॉच किं. रु. १०० ते १२५ ग्या. वर्षें ४
हिंदु सचित्र आर्मी वॉचेस किं. रु. १० ते १२५ पर्यंत.

हिंदु सचित्र टाईमपीसेस साधें, अलार्म, स्विंग, जपींगई. आंकड्यांमध्यें देवतांचीं चित्रें, मध्यभागीं दरबारी व अश्वारूढ श्रीशिवाजी, आणि श्रीशंकर पार्वतीसह. किं. रु. ४–६–१० ते ३० पर्यंत. [६

जी० बी० नाईक आणि कंपनी. बिलासिसरोड, नाका भायखळा, मुंबई.

धि इंडियन म्यारेज ॲण्ड डेथ बेनिफिट फंड लिमिटेड, मुंबई.

डिरेक्टर्स.

रावसाहेब दलपतराम प्राणजीवन खक्कर जे. पी.

बद्रुद्दिन अब्दुल्ला कूर एस्क्वायर जे. पी.

रुसतम बी. पेमास्तर एस्क्वायर बी. ए. एल् एल्. बी.

धनजीशा फ्रामजी चिनाय एस्क्वायर.

विष्णु नारायण परुळकर एस्क्वायर (एक्स आफिशिओ.)

मध्यम स्थितींतील मनुष्यांस आपल्या मुलांमुलींच्या लग्नाचे वेळीं व आपल्या मरणानंतर आपल्या वारसाकरितां पैशाचा संग्रह करून ठेवितां यावा ह्मणून हा फंड १८९४ मध्यें स्थापन झाला आहे. इतक्या अवधींत ३००० पेक्षां जास्त मेंबर झाले असून सरासरी १५० मेंबरांस फायदा मिळाला आहे. लग्नफंडाची वर्गणी दर महिन्यास १। पासून ६। रु. पर्यंत आहे.

मरण-फंडाची वर्गणी फक्त १ रुपया आहे.

व या मरणफंडांतील मेंबरांच्या पश्चात् त्यांच्या वारसास २००० रुपयेपर्यंतची रक्कम फायद्यादाखल मिळेल. जास्त माहिती खालील पत्त्यावर एक आण्याचें तिकिट पाठविल्यानें मिळेल. [५–१२

आफीस–५
कावसजी पटेल स्ट्रीट
फोर्ट, मुंबई.

परुळकर ॲण्ड कं०
एजंट्स.

व्यापारी व ग्राहक ह्यांकरितां.

दत्तात्रेय कृष्ण सांडू ह्यांचें हरएक प्रकारचा माल मिळणारें, आणि माफक अडत घेऊन माल रवाना होणारें दुकान:—

हरएक प्रकारचा माल मुंबईत मिळणारा वक्तशीर बाहेरच्या लोकांस मिळण्याची सोय.

D. K. SANDU
RAMWADI, BOMBAY.

रामवाडी, मुंबई.

आमच्या दुकानीं सावंतवाडीचा रंगीत माल, **गंजिफा**, आर्यौषधिकारखाना—पनवेल येथील **औषधें, स्टेशनरी, वाकेरीचें भातें** असून सतारीची **तार**, सतारी, मृदंग, तबले, वक्षेकृत **कफनाशक गोळ्या**, इत्यादि पाठवितों.

वा. कृ. सांडू. दुकानदार—रामवाडी, मुंबई.

केरळकोकिळांत प्रसिद्ध झालेल्या कविता—

सासरची पाठवणी.

स्वतंत्र पुस्तक किंमत ८० ट. ख. ८॥०

"केरळकोकिळांत छापविलेली साठ श्लोकांची सुंदर कविता सगळ्या लहानमोठ्या स्त्रियांनीं वाचावी, गावी आणि पाठ करावी अशी आहे."—**बालबोध.**

धनुर्धारीरचित—**नवीन पुस्तक. स्वधर्मज्ञानपुस्तकालयापैकीं.**

१ धर्माची आवश्यकता आणि व्याख्या.

किं. ८॥ आणा. ट. ख. बारा प्रतींस ८॥०

१ सुखाचें साधन. २ निराशाबीज. ३ उदात्तवृत्ति व कृति कशी होईल. ४ कर्तव्य. ५ स्वधर्माश्रय. ६ स्वधर्माचें अज्ञान. ७ धर्मज्ञानाचा यत्न. ८ धर्म ह्मणजे काय. असे विषयविवेचनाचे भाग आहेत. वर्गणीदारांस ५ प्रतींस ८० ट. ख. ८॥०

स्वधर्मज्ञानपुस्तकालय—पुस्तक दुसरें.

२ आर्यधर्माचा इतिहास.

किं. ८॥०. ट. ख. बारा प्रतींस ८॥०

वैदिककाळ, आर्यांच्या पुरातन धर्मसमजुती, मंत्र, छंद, ऋषि, वेद, श्रुति, वेदांचा कर्ता, वेदांचा काळ, वेदांतील त्रिमूर्ति, अग्नि, इंद्र, वेदांचे विभाग, ऋचा, सूक्त, ब्राह्मण, ऋग्वेद, यजुर्वेद, साम, अथर्ववेद, वेदशाखा, देवता ईश्वरसंबंधीं कल्पना, धर्मग्लानि—धर्माचा जीर्णोद्धार इत्यादि विषयांचें थोडक्यांत दिग्दर्शन केलें आहे.

जनार्दन महादेव गुर्जर, मुंबई.

केरळकोकिळच्या वर्गणीदारांसच किं. रु. ३ ट. ख. ८६.

मनुस्मृति मराठी भाषांतरसहित.

किं. रु. ५ ट. ख. ८६.

हा आर्यधर्माचा मुख्य व अतिप्राचीन ग्रंथ असल्यामुळें प्रत्येक हिंदूला पूज्य व संग्रह करणें फार अगत्याचें होय. त्यांत मराठी भाषांतराच्या योगानें तो सर्वांस समजण्यास सुलभ झाला आहे. ह्यांत ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यास हे आश्रम, व धर्म, संकीर्ण जाती व त्यांचे धर्म, राजकीय विचार, दायविभागादि न्याय, दिवाणी, फौजदारी प्राचीन कायदे, प्रायश्चित्त इत्यादि विषय फार सुलभ रीतीनें कथन केले आहेत. सोनेरी सुरेख बांधणी. ठिकठिकाणीं सर्वटीकाधारानें टीपा दिल्या आहेत.

केरळकोकिळाच्या वर्गणीदारांस रु. १४१४ ट. ख. ८४.

वैद्यकशार्ङ्गधरसंहिता.

नवीन मराठी भाषांतरसहित.

पृष्ठसंख्या–५२७–किं. रु. २॥ ट. ख. ०.

" अर्वाचीन सर्व ग्रंथांमध्यें शार्ङ्गधरसंहिता अत्युत्तम होय. ह्यामध्यें सर्व विषयांची व्यवस्था जशी अनुक्रमानें लावलेली आहे तशी दुसऱ्या कोणत्याही ग्रंथांत केलेली आढळत नाहीं. ह्या ग्रंथांत जे प्रयोग लिहिले आहेत ते सारे अनुभव घेऊन त्यांचें यथार्थ गुणवर्णन केलें आहे. ह्यांत इतर ग्रंथांप्रमाणें औषधांची अतिशयोक्ति नाहीं. अशा प्रकारचा सर्वोत्तम लोकप्रिय ग्रंथ असून त्याच्या प्राकृत भाषांतरामध्यें–प्राकृत टीकाकाराचे स्वतः असोत किंवा लेखकाचे असोत जे प्रमाद झालेले आहेत त्यांची दुरुस्ति छापणारांनीं आजपर्यंत केलेली नाहीं. कित्येकांनीं तर कांहीं बाहेरचा ग्रंथच ह्यांत घुसडून दिला आहे. हे सर्व घोंटाळे काढून करवेल तितकें शुद्ध व सरळ भाषांतर केलें असून विषयानुक्रमणिकेशिवाय आजपर्यंत न झालेली रोगानुक्रमणिका दिली आहे. त्यामुळें कोणत्या रोगावर काय औषध हें झटकन् पाहिजे त्यास समजतें. प्रसिद्ध प्रसिद्ध अशा वैद्यांच्या सूचनेप्रमाणें ह्यांत शक्य ती सुधारणा केली आहे. व्हा. पे. नें पाठवूं.

जनार्दन महादेव गुर्जर, रामवाडी–मुंबई.

स.ना.पंडित,बाई.

जुलै. (वर्षांची वर्गणी १८३ ट. खर्चासह. फुटकळ अंकास ८४.) १८९६.

केरळकोकिळ.

वर्षारंभ जानेवारी.

पु० १०] [अं० ७

विधिरेव विशेषगर्हणीयः करट त्वं रट कस्तवापराधः ॥
सहकारतरौ चकार यस्ते सहवासं सरलेन कोकिलेन ॥१॥

दामोदर महादेव गुर्जर बुकसेलर अॅण्ड पब्लिशर.
रामवाडी
मुंबई.

सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत.

VAIDYA. वैद्य.

ह्या पुस्तकांतील लेख कोची (मलबार) येथें तयार होऊन,
ते मुंबई येथें छापून प्रसिद्ध होतात.

विषयांची अनुक्रमणिका.

	पृष्ठ.		पृष्ठ.
बील्हर.	१४५	पत्रव्यवहार.	१६२
श्रीमच्छत्रपति शि० (कविता)	१५३	वाचा, विचार करा आणि	
पुस्तकपरीक्षा.	१५६	प्रयत्नास लागा. ...	१६६

पुस्तकांची पोंच.

१ स्त्रियांचीं कर्तव्यकर्में. २ रोम व कार्थेज. ३ घर आणि त्याच्या भोंवतालची जागा. ४ ख्रिस्ट अथवा संकेत. ५ काश्मीरवर्णन. ६ मराठ्यांचे पराक्रम. ७ निबंधसंग्रह, कै० आगरकरकृत. ८ आचारमीमांसा. ९ शिवराजविजय. १० गणपतीच्या मेळ्यांचीं पदें. हीं पुस्तकें पाठविणारांचे फार आभार आहेत.

केरळकोकिळच्या वर्गणीदारांसच किं. रु. २ ट. ख. ८८.
(नंबर कळवून वर्गणीदारांनीं मागणी करावी.)

श्रीगुरुचरित्र.

किं. रु. ३ ट. ख. ८८.

भाविक लोकांजवळील बऱ्याच प्रतींवरून व जागृतस्थानाच्या पोटभेदांस अनुसरून तयार केलें असून त्यांत अध्याय २६ यांतील **वेदरचना** व अध्याय ३६–३७ यांतील **कर्ममार्ग** अगदीं चरित्रकाराच्या मूळाप्रमाणें शुद्ध केले आहेत. वृद्धांसही वाचण्यास फारसा त्रास पडणार नाहीं असा टाईप मोठा आहे. प्रत्येक अध्यायास चित्रें आहेत. व्हा. पे. पाठवूं.

प्रभाकर–रोजचें वर्तमानपत्र.

१८३९ त सुरू झालेलें. गेल्या दसऱ्यापासून व्यवस्थित रीतीनें व वक्तशीर प्रसिद्ध होतें. वर्षाची वर्गणी ट. हं. सह ९॥ रुपये.

मुकुंद बाळकृष्ण गुर्जर, बी. ए. म्यानेजर. गिरगांव—मुंबई.

॥ ओं नमः श्रीरामचंद्राय ॥

आर्यमहौषधालय मु० आंजलें.

या अत्यंत खात्रीच्या औषधाचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यांस कदाचित् आला नाहीं तर पैसे परत देऊंच व त्याशिवाय त्यांच्या आरोग्यार्थ एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकटच देऊं.

मदनविलासामृतसंजीविनी.

वीर्यस्तंभक, रक्तशोधक, अत्यंत कामोत्तेजक, चित्तोत्साहक, बुद्धि–कांतिवर्धक व धातुपौष्टिक सुवर्णमाक्षिक मौक्तिक कस्तूरीमिश्र अपूर्व गुटिका.

१. शरीराची उत्तम सुधारणा करणारीं अत्यंत महत्वाचीं जीं औषधें आहेत, त्यांत या गुटिका अगदीं पहिल्या प्रतीच्या ठरल्यामुळें यांचे अपूर्व गुण थोड्याच काळांत या देशाच्या सर्वभागीं व त्यांच्या आसमंतात् अतिशय पसरले आहेत. या सेवन केल्यानें नपुंसकत्व, इंद्रियशिथिलता, कडकी, जीर्णज्वर, अग्निमांद्य, अशक्तता, स्वप्नजन्य किंवा इतर धातुपात, छातींतील रोग, मेंदूचे विकार, पांडुरोग, क्षय, मूत्रसंकोच किंवा मूत्रातिरेक, कटिशूल, वातरोग, उपदंशसंबंधी मुरलेले विकार, हात, पाय, मूत्रमार्ग, व शरीर यांचा दाह, व अरुचि, इ० अनेक विकार कितीही वर्षाच्या मनुष्यास नवीन किंवा जुनाट असले तरी खात्रीनें बरे होतात. धातु व रक्त यांची शुद्धि व वृद्धि होऊन रक्तदूषणजन्य अनेक रोग हटकून बरे होतात. वीर्यस्तंभन, व कामोद्दीपन होऊन अग्नि व शक्ति भरपूर वाढते. स्त्रियांची धुपणी व संततीस अपायकारक जे गर्भाशयस्थ रोग त्यांचें त्वरित निवारण होऊन कांति, स्मरणशक्ति व बुद्धि वाढते. ज्यांस शारीरिक व मानसिक श्रम फार पडतात, त्या सर्वांच्या आंगीं यांनीं अतिशय शक्ति येऊन मनास उत्साह प्राप्त होतो, सुस्ती जाते. ज्यांस दूध व जडान्न पचत नाहीं त्यांस तें भरपूर पचूं लागतें, कोष्ठशुद्धि होते. या अप्रतिम गुटिका अत्यंत शोधानें केल्या असून त्यांच्या अप्रतिम गुणका-

रित्वाबद्दल हजारों सर्टिफिकिटें मिळालीं व नित्य मिळत आहेत. यांत अपायकारक पदार्थ बिलकूल नाहींत. वरील सर्व रोग जाऊन उत्तम गुण प्राप्त होण्यास या गुटिकांसारखें अप्रतिम औषधच नाहीं असें पूर्ण अनुभवावरून स्पष्ट ह्मणतों. यांस पथ्यसेवनाची गरज नसतां या पाहिजे त्या दिवसांत घेतल्या तरी हटकून गुण करितात. यामुळें त्यांचा अतिशय खप सुरू आहे. गोळ्या रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम सहा रुपयांच्या किंवा त्यांहून कितीही जास्त गोळ्या घेणारांस बंगीचा सर्व टपालखर्च माफ आहे. त्यांचे आंत घेणारांस मात्र तो वेगळा सहा आणे पडेल. एकदम ३२ गोळ्यांस १ रु. ७० गोळ्यांस २ रु. १६० गोळ्यांस ४ रु. २६० गोळ्यांस ६ रु. ५२० गोळ्यांस १० रु.

थंडगार नेत्रांजन—हें अंजन स्तुतीस अत्यंत पात्र आहे, हें सतत दहा वर्षांच्या पूर्ण अनुभवानें कळवितों. यानें डोळ्यांचे साधारण विकार तर सहजच, परंतु दृष्टीचा समूळ नाश करणारे, तिमिरांध्य, वडस, बिंदु, फुलें, कांच, सारा, भोर, गळती, खुपऱ्या, जळजळ, कंड, फूट, चिकटा, ठणका व लाली इ० अनेक विकार, तत्संबंधी मस्तकशूलादि विकारांसह कितीही वयाच्या मनुष्यास कोणत्याही कारणांनीं प्राप्त झालेले नवीन किंवा जुनाट असले तरी नाजूक रीतीनें कोणतीही इजा न होतां बरे होतात. दृष्टि तीव्र व थंडगार राहते. हें चांगल्या दृष्टीच्या मनुष्यांनींही डोळ्यांत घातल्यास वरील विकार त्यांस बिलकूल होणार नाहींत. लहान मुलांस तर हें अत्यंत उपयोगी आहे. २ तो० ड० १॥ रुपया.

विशेष सूचना.—अलीकडे आंजर्ले व मुर्डी वगैरे गांवांतील औषधांच्या बऱ्याच जाहिराती सुरू आहेत व त्यांपैकीं कांहीं जाहिरातींत ज्या सह्या आहेत त्या बहुतेक आमच्याच नांवासारख्या भासण्याचा विशेष संभव आहे. तरी अशा लोकांशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं हें अवश्य लक्षांत ठेवून आमचीं औषधें **"कृष्णशास्त्री बिवलकर वैद्य. मु० आंजर्ले ता० दापोली जि० रत्नागिरी."** याच पत्त्यावर रोखीनें किंवा व्ही.पी.नें मागवावींत. अनुपानपत्रक सोबत असतेंच.

१–१२]

बीव्हर.

ताजमहालासारख्या भव्य व शोभिवंत इमारती, **चीनच्या** तटासारखा अजस्र तट, **पिरामिद** नांवाच्या मनोऱ्यांसारखे विशाल व आश्चर्यजनक मनोरे, असलीं जगांतील अचाट कृत्यें पाहिलीं किंवा त्यांचीं वर्णनें वाचलीं ह्मणजे, तीं ज्या ज्या कारागिरांनीं करून ठेविलीं, त्यांच्या त्यांच्या हस्तकौशल्याचा व त्यांच्या त्या अप्रतिम शिल्पशास्त्रनैपुण्याचा मनास विलक्षण चमत्कार वाटून, मानवी प्राण्याच्या नैसर्गिक बुद्धिकौशल्याच्या पूर्णत्वाचा ठसा मनावर उमटतो. परंतु ह्मांत फारसें नवल नाहीं, कारण मनुष्यप्राण्यास बुद्धि, ज्ञान, भाषा आणि सामर्थ्य या चार गोष्टींचें मुख्यत्वेंकरून सहाय असतें. ह्यामुळें तो काय काय कृत्यें करील याचा पत्ता लागणार नाहीं. मानवी प्राणी कदाचित् वरच्याहूनही सुंदर व अपूर्व अशीं कामें उठवून देईल. ह्मणूनच एखादा विद्वान् किंवा एखादा अद्वितीय गुण अंगीं असलेला मनुष्य पाहिला ह्मणजे कविजन

त्यास 'नररूपें **नारायण**' अशीं गुणानुवादरूपी विशेषणें देऊं लागतात, ही सर्वानुभवसिद्ध गोष्ट आहे. वरील गुणचतुष्टयाभावामुळें इतर प्राण्यांस गौणता प्राप्त होते. तरी कित्येक प्राणी असे आहेत कीं, ते क्षुल्लक असूनही बुद्धिमत्तेच्या कामीं मानवी प्राण्यांची बरोबरी करतात. त्यांतील कित्येक घरें बांधतात आणि कित्येक तर आपल्या अंगभूत अपूर्व करामतीनें सांखळीप्रमाणें देहाचा पूल तयार करितात. उदाहरणार्थ, मुंगी ही तर शहरेंच्या शहरें वसविते, आणि स्वज्ञातिबांधवांस जमवून पूलही तयार करिते. तसेंच **उत्तरअमेरिकेंत प्रेअरी** नांवाची एक कुत्र्यांची जात आहे; ह्या कुत्र्यांनीं घरें बांधून शहरेंच्या शहरें वसविलीं आहेत. जे प्राणी जन्मतःच मूक आणि ज्यांस मनुष्याइतकें ज्ञान नाहीं, आणि ज्यांस लांकूड-फांटा किंवा दगड नेण्याचें सामर्थ्य नाहीं, त्यांनीं शहरेंच्या शहरें वसवावींत ही केवढी आश्चर्यायी गोष्ट ! असे जे प्राणी पृथ्वीतलावर वास करीत आहेत त्यांपैकींच **बीव्हर** हा एक प्राणी आहे; त्याचें वर्णन आज आह्मी खालीं देत आहों.

बीव्हर हा प्राणी दिसण्यांत फारसा सुरेख नसतो. त्याचें तें लठ्ठ व बोजड शरीर, त्याचें तें लांबोळें डोकें, त्याचे ते लहान लहान डोळे, त्याचा तो दोन चिरफळ्या झालेला—ज्यांतून त्याचे धारेसारखे तीव्र सुळे दिसून येतात तो, वरील ओंठ; आणि त्याचें तें चमच्याच्या दांड्यासारखें चापटकें, लहान लहान खवल्यांनीं भरून गेलेलें, विस्तृत व सळनळीत शेंपूट, यांहींकरून त्याच्या रूपाचें बेरूप बनून जातें. त्याचे मागील पाय पुढील पायांहून मोठे असतात, त्याचीं बोटें बदकाप्रमाणें चामडीनें सांधलेलीं असतात. बोटांच्या विरळपणामुळें, आणि नख्यांखालीं काहीं मांसल गट्ट असल्यामुळें, त्यास आपले आंगठे अग्रभागीं पसरतां येतात. थोबाड कांहींसें जवड्याच्या मागें झुकलेलें असतें. त्याच्या नाकपुड्या त्यास पाहिजे तेव्हां हालवितां येतात आणि कानही तसेंच विलक्षण असतात. ते फारसे दिसून येत नसून बुडी मारतेवेळीं त्यास ते मस्तकाशीं अगदीं भिडवितां येतात; त्यामुळें श्रवणेंद्रियांत पाण्याचा प्रवेश होत नाहीं. त्याच्या अंगावर दोन जन्मकवचें असतात, त्यांतील वरील कवच जलचरांस जसें हवें तसें नीटनेटकें असून, त्यावर दाट व नितळ लोंकरीचें आवरण असतें, तें पाण्यास केवळ निर्भेद्य होय. हें पहिलें आच्छादन लांब लांब,

रेशमासारख्या नितळ व तुळतुळीत कुंतलांखालीं झांकून गेलेलें असतें. ह्या प्राण्याची उंची सुमारें एक फूट व शेंपूट खेरीजकरून लांबी सुमारें दोन फूट असते, आणि शेंपूट अदमासें शरीरप्रमाणाच्या अर्धाइतकें असतें.

ह्या प्राण्यांचा एकोपा फारच विलक्षण असतो. चिचुंद्री नांवाचे मूषकवर्गांतील प्राणी एक जूट करून राहतात खरे; पण **बीव्हर**ची कृति ह्याहूनही कांकणभर चढच. ती मनुष्यमात्रांस चकवून सोडील, एवढेंच नव्हे तर तिच्या योगेंकरून मानवी प्राण्याच्या मुखास काळिमा लागेल. त्यांना स्वज्ञातिबांधवांत मिळून मिसळून राहण्याची अतोनात आवड असते, आणि शक्य असल्यास ते आपले मोठमोठे समाज स्थापून चिरस्थायी होऊन राहतात.

बीव्हर हे जन्मतः जलचर होत; त्यांस पोहणें ह्मणजे अगदीं सुलभ वाटतें. त्यांच्या मागील पायांत अशी अद्भुत शक्ति असते कीं, त्यामुळें त्यांस छान वल्हीं मारितां येतात, आणि शेंपटींत नावेप्रमाणें प्रतिसुकाणूंच आहे असें वाटतें. ह्मणून **उत्तरअमेरिका** व **कानडा** येथील नद्यांसरोवरांनीं वेष्टिलेलीं विविक्षित स्थलें हीं यांचीं वसतिस्थानें होऊन राहिलीं आहेत. ते तेथें प्रत्यहीं आढळून येतात. गोऱ्यालोकांच्या आगमनापूर्वी हे प्राणी त्या खंडाच्या उत्तरभागीं सर्वत्र पसरले होते.

बीव्हरच्या नित्यक्रमांतील टिपून ठेवण्यासारखी गोष्ट ह्मणजे त्याची प्रशंसनीय स्वच्छता ही होय. त्याच्या वसतिगृहांतील भुईवर पडलेल्या घाणीचा त्यास यत्किंचित् जरी मागमूस लागला तरी तो त्यास पुरवत नाहीं. **बफन** नांवाच्या एका गृहस्थानें एक **बीव्हर** पाळला होता. तो त्याजविषयींचा येणेंप्रमाणें उल्लेख करितोः—

"मी त्यास पुष्कळ वेळ पावेतों कोंडून ठेवीं, तेव्हां तो आपला मळ दारापाशीं सांठवून ठेवी, आणि दाराची नुसती फट म्यां उघडली कीं पुरे, तो, तो मळ काढून टाकण्यास धांव घेत असे. त्याच्या घ्राणेंद्रियाच्या तीक्ष्णबुद्धिज्ञानामुळें ही ओंगळपणाची भीति–तिटकारा–त्यास उत्पन्न होत असेल असें दिसतें."

ज्या ज्या गोष्टींची घर बांधावयास अनुकूलता पाहिजे ती असल्यास ते घरें बांधितात. अमेरिकेंतील **बीव्हरांस** सर्वप्रकारें अनुकूलता असते, ती युरोपांतील **बीव्हरां**स नसल्याकारणानें, ते अमेरिकेंतील

बीव्हरांप्रमाणें परस्पर मिळून मिसळून न राहतां केवळ एकांतवासांत कालक्रमणा करून राहतात, आणि विवरें पोखरून ठेवितात. त्यांजवरून यांस **'टेरियरबीव्हर'**–विवर पाडणारे–असें नांव प्राप्त झालें आहे. मनुष्यप्राणी हा एक त्यांचा दुस्मान होऊन बसला आहे. मनुष्यजातीचा रावता, त्याची एकसारखी छळणा, आणि त्याचे वारंवार होणारे हल्ले यांहींकरून त्यांचें नष्टचर्य ओढवलें. बिचाऱ्यांस आपल्या वसतिस्थानीं विघ्नें येऊं लागल्याकारणानें आपल्या अंगभूत गुणधर्मांचा पुरा बींमोड करावा लागला. नदीतटाकावरील एकांतवासाची कला दिवसेंदिवस कमी होत गेल्यामुळें इतर ठिकाणींचसें काय पण **अमेरिका** जें केवळ त्यांचें मायपोट, तेथें देखील ते दिसेनासे झाले. त्यांजवर होत असलेले इतके हल्ले, आणि त्यांच्या तारतम्यज्ञानशून्यतेमुळें होत असलेली कत्तल, ह्यामुळें त्यांचा नायनाट होऊन बसणार. तरी अझून देखील ते **फ्रान्स**मध्यें आहेत. जसजसे मानवी प्राणी शस्त्रविद्येंत आणि शिकारींत सुधरूं लागले, तसतसे **बीव्हर**ही सारासारविचारांत, शहाणपणांत व कावेबाजपणांत एक एक पाऊल पुढें टाकूं लागले. त्यांचें परस्परसंघट्टन झालेले जीवसमुदाय महत्संकटावस्थेंत गुरफटले गेल्याकारणानें त्यांच्या समाजाच्या रमणीयतेचा ऱ्हास झाला. त्यांच्या कुटुंबांची वाताहात झाली, आणि शत्रुजनांचें चित्ताकर्षण करणाऱ्या त्यांच्या झोंपड्यांत त्यांस निर्भयस्थान न मिळाल्यामुळें, ओढ्यांच्या कांठीं दगडांच्या खबदडींत ते वास करूं लागले. अशा दुर्धर स्थितींतही त्यांच्या अद्भुत गुणधर्मांचा लोप झाला नाहीं, इतकेंच नव्हे तर पूर्ववत् नव्हे, त्याहूनही सुरेख असा आपला व्यवसाय त्यांनीं चालू ठेविला आहे; असो. आतां ते घरें कशीं कशीं बांधतात, व त्यांची रचना कशी असते तें सांगूं. **बीव्हर** हे जलस्थलचर असतात. ते एखादा पदार्थ न्यावयाचा झाला झणजे पुढील पाय व हनुवटी यांत धरून नेतात. त्यांच्या घर बांधण्याच्या दोन रीति असतात. **बीव्हर** आपलें घर झुलू लोकांच्या झोंपड्याप्रमाणें वाटोळें व घुमटाकार बांधितो. त्याची रचना अशी विलक्षण असते कीं, कसलाही सामर्थ्यवान् शत्रु चालून आला तरी त्याचें कांहीं चालूं नये. तें नेहमीं नद्यांच्या किंवा ओढ्यांच्या तीरावर असतें, आणि त्याचा व्यास १५ किंवा अठरा फूट

असतो, आणि त्याची उंची सात किंवा आठ फूट असते. ही बाहेरील गोष्ट झाली. त्याची भिंत इतकी जाड असते कीं, आंतील व्यास फक्त सात फूट असतो, व उंची तीन फूट असते. ती, मोठमोठाले ओंढके व वृक्षांच्या डाहळ्या यांनीं तयार केलेली असते, आणि त्यावर चिखलाचें लिंपण केलेलें असतें. हिंवाळा येण्यापूर्वीच, **बीव्हर** बाहेरील अंगास आणखी एक चिखलाचा थर चढवून ठेवतो. त्याच्या वसतिगृहाभोंवतीं एक लहानसा चर खणलेला असतो. ते जो लांकूडफांटा या कामीं उपयोगांत आणितात, त्यांचा त्यांस दोन तऱ्हांनीं उपयोग होतो. ते झाडांच्या सालींवर आपला उदरनिर्वाह चालवितात. झाड सोलून काढल्यानंतर, पुष्कळ साली एके ठिकाणीं जमवून भावी उपयोगाकरितां पाण्याखालीं सांठवून ठेवितात. कधीं कधीं असें होतें कीं, उन्हाळा फारच कडक पडून पाणी पुष्कळ आटतें, आणि त्यांस इतस्ततः भ्रमण करण्यास मिळत नाहीं. अशा वेळीं **बीव्हर**चें बुद्धिकौशल्य फार पाहण्यासारखें असतें. तो एक भली मोठी भिंत उभारतो, त्यायोगेंकरून पाणी वर चढतें, आणि त्यास पाण्याचा निरंतर पुरवठा होतो. ह्या कामाकरितां लागणारें लांकूड तो मोठमोठालीं झाडें तोडून पुरवितो. तो आपल्या मागील पायांवर बसून, तें झाड सभोंवार कुरतुडतो. त्या वेळीं तो वाळूच्या घड्याळाप्रमाणें शोभतो. नंतर तसेंच हवें तितक्या लांबीचें तो तोडून घेतो. दगड, चिखल, लहान लहान फांद्या, आणि ओंढके यांचा उपयोग करून, तो एक भली जंगी भिंत उभारतो. तिची तळाशीं बारांपासून वीस फुटांपर्यंत रुंदी असते, आणि शेंड्यास तीनपासून पांच किंवा सहा फूट असते. ही भिंत तयार झाल्यानंतर कांहीं वर्षेपर्यंत, झाडांचा पालापाचोळा पडून, नदींतील लहान लहान वनस्पति, आणि वाहत येणारा सर्वप्रकारचा केरकचरा जमून, एकप्रकारची जमीनच तयार होते. नानाप्रकारचें बीं, आणि कधीं कधीं झाडांचीं बियें, ह्यांत पडून त्यांचीं झाडें वर येऊन मुळें **बीव्हर**च्या वसतिगृहाच्या त्या भिंतींत खोल खोल जाऊन तीं एकवट होऊन जातात, आणि त्या ओंढक्यांत, घरांवर घातलेल्या फांद्यांतही जाऊन तीं एकत्र जखडलीं जातात. जरी **बीव्हरांच्या** एकूनएक घरांची नासाडी झाली किंवा केली तरी देखील त्यांच्या ह्या भक्कम भिंती कायम राहतात. ते जीं झाडें तोडतात,

त्यांचा एक उपयोग सांगितलाच आहे व दुसरा ह्या सांगितलेल्या कृत्यांकडे ते करतात. त्यांच्या ह्या वसतिगृहास एक लहानसा सज्जा असतो. त्याचें तोंड जलपृष्ठभागाच्या खालीं असतें. त्यांतून पाण्याचा आंत थोडा प्रवेश होतो. तें मनुष्यांच्या पापी डोळ्यांस दिसूं नये ह्मणून तोंडाची योजना अशी केलेली असते. हें विवर इतकें मोठें व विस्तृत असतें कीं तें हजारों **बीव्हर** रहिवाशांचें मायपोट बनतें.

गॉड नदीच्या जवळील प्रदेशांत त्यांच्या एका वसतिस्थानावर एक तीरच्या तीर कोसळून पडलें होतें, आणि त्यावर त्यांचें भूगर्भस्थित एक विवर वर उघड्या जागेवर येऊन पडलें होतें, त्याचें मोजमाप काढलें तों तें लांबीला चाळीस पन्नास फूट भरलें. मजा ही कीं मनुष्यांच्या घरांप्रमाणें त्यांत कित्येक पडव्या होत्या. वरील सर्व प्रतिपादनावरून हा मोठा शिल्पी आहे हें वाचकांच्या सहज ध्यानांत येईल. तर त्यास **'पाणगवंडी'** असें नांव दिलें असतां पुष्कळ अंशीं शोभेल. आणि **युरोपांत** कितीएक **बीव्हर** असे आहेत कीं त्यांस **'गवंडी'** हीच संज्ञा योग्य आहे. वर सांगितलेली हकीकत ह्याच जातींच्या **बीव्हरां**ची आहे. ही गोष्ट १७८७ त घडून आली. ही एका **जर्मन** मनुष्यानें **एल्ब** नदीच्या तीरीं शोधून काढली. तेथें त्यांचा एक समाजच्या समाज होऊन बसला होता. ती गृहाची रचना हुबेहुब **अमेरिकेंतील बीव्हर**च्या धर्तीवर होती. त्यांच्या झोंपड्या सर्वोत्कृष्ट असून त्या केवळ नयनाल्हादक वस्तूंचें भांडार आहे, असा भास होतो.

पाळींव **बीव्हरां**स सोयस्कर अशा ठिकाणीं बाळगून ठेविलें असतां, पाणी हें जरी त्यांचें स्वाभाविक रीत्या घटकद्रव्य आहे, तरी त्यांस त्याची विलक्षण विस्मृति पडते. **बफन**नें एक **बीव्हर** पाळला होता, तो अगदीं लहान असतां त्यास **कानड्या**हून आणलें होतें. त्याची व पाण्याची दृष्टादृष्ट झाली कीं पुरे तो पाणी पाहून फार घाबरून जात असे, आणि बळेंच त्यास कोणी तलावाच्या कांठीं नेऊन पाण्यांत सोडण्याचा प्रयत्न करूं लागलें असतां तो फारच नाखुषी दर्शवी, व फारच ओढामाणक्या आणीत असे. परंतु जेव्हां त्याला एकदां बळेंच पाण्यांत सोडला, आणि त्यास कांहीं मिनिटें तसेंच राहावयास लावलें, तेव्हां तो वरचेवर पोंहण्यास जाऊं लागला: तो फारच माणसाळला होता. तो

चारा मागतेवेळीं दीन मुद्रा धारण करून आपले पुढील पंजे हालवी आणि केंविलवाणा शब्द काढून ओरडे. एक पाळींव स्थितींतील **बीव्हरा**चा मनोवेधक प्रयोग करण्यांत आला. नानाप्रकारचीं साधनें करून, त्याचें नैसर्गिक बुद्धिकौशल्य विकास पावावें, अशा स्थितींत त्यास ठेविलें होतें. हा प्रयोग **मॅडलिन (पोलांद)** लगतचा प्रदेश, यांत असलेल्या एका सरोवराच्या कांठीं **वियेज्ञा** येथील **एम् एक्सिगर** यांनीं केला. **सोसीटी ॲक्लिमेटेशन**च्या (ज्यानुवारी १८६६ त) **बुलेटिन** नांवाच्या गृहस्थांनीं प्रस्तुत प्रयोगाचें सविस्तर वर्णन दिलें आहे. वरील गृहस्थांचे पाळींव 'गवंडी' बीव्हरच्याच जातीचे होते. प्रस्तुत शोधक सहा वर्षेपर्यंत त्यांजविषयीं शोध करण्यांत गुंतले होते. हे प्राणी फार भित्रे होते. ते कधीं कधीं सायंकालपर्यंत आपली जागा सोडून देत. हिंवाळा नजीक येऊन ठेपला ह्मणजे 'विलो' आणि 'पॉप्लर्स' नांवाचीं झाडें तलावाच्या कांठीं तोडून ठेवीत, आणि कांहीं सोटच्या सोट पाण्यांत सोडून देत. पहिल्या पंधरवड्यांत हीं झाडें **बीव्हर** तळीं नेऊन बाजूबाजूनें रचून, एकमेकांत अशीं गुंतवून टाकीत कीं, तो एक भला भक्कम व जलप्रतिबंधक तटच बनावा. हिंवाळा लांबे तेव्हां, बर्फ फोडून वृक्षांचे नुकते तोडलेले सोटच्या सोट आंत पाण्यांत खुपसून देत. ह्मणजे त्या प्राण्यांची अन्नसामुग्रीची दधात उरत नसे.

इ. स. १८६८ त **पारीस**मधील **जार्डीन डीसफ्ल्यान्ट्स्** येथें अ**मेरिकेहून** कांहीं **बीव्हर** आणण्यांत आले. **एम् एर्नेस्ट मेनॉल्ट** ह्यांनीं त्यांच्या अंगभूत गुणधर्मांचा एके ठिकाणीं उल्लेख केला आहे. ते ह्मणतातः—" या प्राण्यांची संख्या चार होती, दोन **क्याप्टन लेनेल** ह्यांनीं **न्यूफौन्लंन्ड**मधून आणलेले होते. बाकीचे **एम् डोनेएल** यांजकडून विकत घेतले होते. त्या सर्वांना एका भल्या मोठ्या लांकडी पेटींत ठेविलें होतें. तिला एक उघडें दार राखलेलें होतें, तें तळयाकडील बांधाकडे फिरवून ठेविलेलें होतें.. ती पेटी त्यांस फारच सोयस्कर होती. हें जेव्हां त्यांनीं पाहिलें, तेव्हां त्यांनीं त्या आपल्या वसतिगृहाची खंबिरी करण्यास सुरवात केली. त्यामुळें हिंवाळ्यांतील मनस्वी गार हवेचें निवारण होऊन त्यांस पहिल्याहून अधिक मोकळेपणानें

राहतां आलें. ह्यांत त्यांच्या अस्सल बुद्धिकौशल्याची व त्यांच्या अंगभूत उत्तम गुणधर्मांच्या साक्षित्वाची गोष्ट ही कीं, हे जलचर आपल्या टापूंतील प्रदेशांतून मातीचीं ढेंकळें, आपल्या झोंपडीकडे वाहून नेत, व अशा तऱ्हेनें वर पसरीत कीं तिचें परिपूर्ण आच्छादन व्हावें, आणि एक छप्पर त्यावर घालून तयार करीत, त्यामुळें पाऊस, थंडी, वारा, आणि मनुष्याचा आवाज ह्यांचा लवलेशही आंत प्रवेश होऊं नये. "

" त्यांच्या नैसर्गिक बुद्धिज्ञानाची आणखी एक गोष्ट आहे. त्यांच्या त्या वसतिगृहाच्या पलीकडील टोंकाशीं एक खिडकी राखिली होती. तींतून त्यांस अन्नसामुग्री, भाकर, गाजरें वगैरे पुरवीत असत. पण हें गवाक्ष त्यांस निरर्थक भासलें. ह्यास्तव त्यांनीं त्यावर माती लिपून तें अगदीं बंद करून टाकिलें. त्यांच्या धन्यानें येऊन तें मोडून टाकावें, आणि त्यांनीं तें पुन्हा बंद करावें; असा क्रम प्रतिदिवशीं सुरू झाला. मग सरतेशेवटीं ते एकटेच काय करतात तें करोत ह्मणून त्यांच्या धन्यानें तो क्रम सोडून दिला. **एम्मिल्ने एड्वर्ड्स्** ह्यांना त्यांची फारच मौज वाटली, ह्मणून त्यांनीं त्याच्या तोंडाशीं कांहीं झाडांच्या डाहळ्या घालून ठेवल्या. पण त्यांत **बीव्हरनां** ही मौजच वाटली. ते मोठ्या चैनींत त्या फांद्या करांडत, व त्यांच्या ढलप्या झोंपडींत नेत. त्यांचा ते थंडीच्या निवारणार्थ उपयोग करीत, आणि थंडीवाऱ्याचा आंत प्रवेश होऊं नये ह्मणून दार अगदीं गच्च बसवीत."

ह्यावरून ह्या प्राण्याच्या अंगीं किती अद्भुत गुण आहेत हें व्यक्त होतें. ह्याचें नैसर्गिक गुणधर्मांचें साग्र विवेचन करून पाहिलें असतां, मनुष्याच्या अंगीं देखील क्वचित्च असले गुण वास्तव्य करीत असतील. हा शिल्पशास्त्रपारंगत किती आहे हें सांगणें नकोच. असो.

बीव्हरची लोंकर फार मौल्यवान् असते; ह्या प्राण्यापासून आणखी एक प्रकारचें तेल उत्पन्न होतें. त्यास ' क्यास्टॉरिअम् ' असें ह्मणतात. हें एक सुगंधि द्रव्य आहे. ह्याचा वैद्यशास्त्रांत फार उपयोग होतो. पेटक्यांवर तर हें रामबाण औषध होय. ह्या प्राण्याच्या शेंपटाच्या मूळाशीं दोन मांसपिंड असतात. त्यांजवळच आणखी दोन तोसदानें असतात, त्यांपासून हें उत्पन्न होतें. त्याच्या जन्मकवचावर यानेंच तुळतुळीतपणा राहतो, व यानेंच त्यास निर्भेद्यता प्राप्त होते. त्याशिवाय **बीव्हरचें**

मांस रुचकर असतें. ह्मणूनच **उत्तरअमेरिकेंतील इंडियन** लोक त्यास ' सुग्रास अन्न ' असें मानतात. 'क्यास्टर' जातीचे **बीव्हर** दोन खंडांच्या उत्तरप्रदेशांत वास्तव्य करतात. ते **एशिया, युरोप** व **उत्तरअमेरिका** यांत आढळून येतात. **एशिया** खंडांत ते फक्त **सायबेरिया** आणि **उत्तरतातरींत** सांपडतात. पुरातन कालीं ते **फ्रान्समध्यें** आणि बहुतेक **ग्रेटब्रिटन**मध्यें आढळून येत. **पारीस** शहराजवळ **बीव्हर** अश्मनीभूत स्थितींत सांपडतात. **बीव्हरे** नांवाच्या लहानशा नदीला देखील हें नांव पडण्यास हेच प्राणी कारणीभूत असावेत. **व्होन** नदीवर राहणाऱ्या 'क्यास्टर' नांवाच्या जातीस **फ्रान्स**मधील लोक **बीव्हरेच** ह्मणतात. असु.

श्रीमच्छत्रपति शिवाजी.

३ तेजस्विता.

(दों दिवसांची तनु हे साची-ह्या चालीवर.)

शुभदिन पाहुनि पिता सुताला सांगुनि धाडी मंत्रिमुखें ।
बादशहा तो भला स्वभावें जाऊं पाहूं चला सुखें ॥
कोप चढे तो निरोप ऐकुनि संकट शिवरायास पडे ।
हात जोडणें दहांत यवनां शूर गड्याला कसें घडे ॥
लाल जाहला बाल नृपाचा काल पातला उलट गती ।
पित्राज्ञेचा भंग होतसे प्रसंग हा हा कठिण किती ॥
नित्य वदावें सत्य असें हें सज्जन कथिती पुनःपुन्हा ।
अभिप्राय तो मनिंचा उघडा करितां होतो काय गुन्हा ॥
नीट करोनि विचार ऐसा धीटपणानें स्पष्ट वदे ।
दुष्टवृत्ति ही जगांत सांगा चित्तीं कोणा ताप न दे ॥
क्रूर दांडगे यवन नीच हें मीच न सारें विश्व ह्मणे ।
दीनपणानें लीन तयांला होतां उरलें काय जिणें ॥

आर्य म्हणोनी कार्य करावें अनुचित हा हा काय असें ।
शिखानष्ट हे दुष्ट तयांना वंदन करणें इष्ट नसे ॥
गाय चरारां चिरोनि खाती हाय हाय हे भराभरा ।
धरावयाला पाय तयांचे काय नसावी लाज जरा ॥
हुजऱ्यासमान मुजरा करणें वांकवुनी त्यांपुढें शिरें ।
शरण होउनी चरणहि धरणें मरण त्याहुनी फार बरें ॥
गोमांसाचे गोळे बघतां डोळे किटले काय करूं ।
खास वाटतें जिवास माझ्या मारूं अथवा ह्यांस मरूं ॥
मस्त होउनी भररस्त्यावरि गोवध करिती नीच महा ।
गळे चिरोनी फळें तयांचीं द्यावीं वाटे त्वरित पहा ॥
परंतु राजे पाहुनि माझें वर्तन म्हणतिल काय असें ।
वसे अंतरीं भीति म्हणोनी सर्व गिळोनी स्वस्थ बसें ॥
हां जी हांजी करितां पाजी राजी करिती यवनपती ।
खास पाहुनी जिवास माझ्या त्रास होतसे सांगुं किती ॥
हिंदू असुनी बिंदु नसावा अभिमानाचा काय मनीं ।
लाज न वाटे आज अह्मांला म्हणतां तिळही म्लेंच्छ धनी ॥
क्षात्रकुलांतिल असोनि झालों दास्यत्वाला पात्र सदा ।
हरहर म्हणतां थरथर कांपे आवेशानें आंग तदा ॥
कर्म करोनी अघोर ह्यांनीं धर्म बुडविला पहा कसा ।
उसासारखी प्रजा पिळोनी भुसाच केली सर्व रसा ॥
स्फूर्ति दावुनी मूर्ति फोडुनी करिती त्यांचा चकाचुरा ।
उरास लावुनि सुरा छंद तो पुरा करावा खराखुरा ॥
गोविप्रांना छळती खळ हे पळभर साहिल कोण भला ।
पापें पाहुनि चरचर ह्यांना कापावेंसें गमे मला ॥
भ्रष्ट नष्ट हें स्पष्ट बोलतां तिळभर नाहीं त्यांत गुन्हा ।
छाया पडतां काया वाटे स्नान करावें पुनः पुन्हा ॥

शिवालयातें लयास धाडुनि थडगीं केलीं चहूंकडे ।
कृपा करा हे महेश ह्मणुनी केश तोडुनी देश रडे ॥
दुःख सर्व हें मनांत डांचे वाचे बोलुनि काय फळ ।
दळावांचुनी बळावांचुनी काय करावें वायफळ ॥
घोळतसे हा विचार चित्तीं आत्मा माझा पोळतसे ।
टोळधाड ही घरांत शिरली उरीं सुरी ही बरी नसे ॥
अशुभ ओखटें म्लेंच्छवदन तें बघतां लागे पाप जना ।
दर्शन किंवा स्पर्श तयांचा माझ्याकडुनी घडेचिना ॥
पंत जाउनी महाराजांना विनयें कळवा हेतु खरा ।
आज्ञा सारी वंद्य परंतु जर्जर झाली सर्व धरा ॥
बोधामृत तें पाजिल पुढती प्रेमें पुत्राप्रती सती ।
गा जी गाजी प्रेमें आजी राय शिवाजी छत्रपती ॥
यवनकरींना हरीसारखा जर्जर करि जो शीघ्रगती ॥ ध्रु० ॥ ९ ॥
मंत्रिमुखानें उत्तर ऐकुनि उदास झाला अति प्रभू ।
पारावारा नसे विचारा उलटा सारा होय विभू ॥
रुचे न कोठें सुचे न कांहीं खचे ऐकुनी धैर्य जरी ।
वृत्त भेटुनी जिजाबाइला आंगें सांगें सकल तरी ॥
चिन्ह मुलाचें भिन्न दिसे गे बुद्धिच भलतीकडे वळे ।
काय करावा उपाय ह्याला भावी कोणा काय कळे ॥
शुद्ध शहाच्या विरुद्ध बोले निशिदिनिं डोळां युद्ध दिसे ।
क्रुद्ध होतसे प्रबुद्ध असुनी ह्याला आतां करूं कसें ॥
बादशहा तो धनी आपुला मनीं न ऐसें लेश धरी ।
मानी बहु तो कानीं जातां हानिच होइल परोपरी ॥
गोड बोलुनी तुह्मीं तरी त्या सोड, ह्मणावें खोड अशी ।
जोड दिल्याविण तोडच नाहीं पडशिल सांगा तोंडघशीं ॥
चतुरपणानें कळवा त्याला वळवा वृत्तिस अल्प तरी ।
ताताहुनिही माता वाटे पूज्य मुलाला खरोखरी ॥

नयनीं पाणी आणी राणी दूत पाठवी सुताप्रती ।
त्वरें येउनी पाय वंदुनी हात जोडले शीघ्रगतीं ॥
कुरवाळोनी ह्मणे माउली बाळ आमुचा बहुत गुणी ।
ज्येष्ठपुत्र तूं श्रेष्ठ मतीनें ऐकुनि ध्यावें नीटपणीं ॥
ध्यानीं आणीं शास्त्रपुराणीं राजा ह्मणजे देव खरा ।
ठेव मनीं तूं प्राण आपुला जाण मानिते वसुंधरा ॥
क्रोध धरोनी विरोध करणें यवन ह्मणोनी तयांसवें ।
कृतघ्न होउनि विघ्न मांडणें कुलास अपुल्या नीट नव्हे ॥
यवनांपासुनि मुला कुलाला वैभव अमुच्या सर्व मिळे ।
पृथ्वीपति तो तुझ्या मतीला अझुनि न बाळा कसें कळे ॥
करोनि सेवाकर्म असावें धर्म आपुला हाच खरा ।
तोच चालवीं पोंच आणुनी पुढचा चित्तीं नीट बरा ॥
बाळा काळावरती देउनि दृष्टि देवही पुरातन ।
कष्टी होउनि दशाननाचे होउनि बसले बंदिजन ॥
दशा कुणाला सुटे न बाळा कशास होशी उतावळा ।
मुळास तोडुनि खुळयासारखा गुंतविशी कां स्वयें गळा ॥
गेल्या गोष्टीकरितां कष्टी होउं नको तूं दुःख सहा ।
काळावरती नदर देउनी पदर पसरितें नीट रहा ॥
केरळकोकिळ ह्मणे दर्शनें पावन पुढती यवनपती ।
गा जी गाजी प्रेमें आजी राय शिवाजी छत्रपती ॥
यवनकरींना हरीसारखा जर्जर करि जो शीघ्रगती ॥ ध्रु० ॥ ६ ॥

पुस्तकपरीक्षा.

स्त्रियांचीं कर्तव्यें–हें **मिस फ्रान्सिस पावर कॉब** ह्या बाईनें केलेल्या 'ड्यूटीज् ऑफ वुइमेन' नांवाच्या पुस्तकाचें भाषांतर रा. रा. **नारायण भास्कर पंडित**, बी. ए., आणि रा. रा. **बाबण बापू कोरगांवकर** ह्या उभय-

तांनीं तयार केलें आहे. ह्या पुस्तकाच्या बाह्यसौंदर्याविषयीं जितकें लिहावें, तितकें थोडेंच होणार; इतका त्यांत मनमोहकपणा आहे. ह्मणजे तें निर्णय-सागरमध्यें फार उत्कृष्ट टाइपांनीं छापलें आहे. पुष्ठा सर्वोत्कृष्टच आहे. शिवाय मूळ ग्रंथकर्त्रीची तसबीर, व तिच्या बंगल्याच्या दोन तसविरा दिल्या आहेत. त्या सर्व सुरेख असून त्या कागदांची झिलई फार सतेज आहे. बाईची तसबीर तर नमुनेदार आहे. तें काम विलायती असावें, येवढेंच नव्हे, पण तें छापलेलेंही विलायतेंतच असावें असा आमचा तर्क आहे. असो.

आतां आंतील विषयाकडे वळूं. कोणत्याही पुस्तकाचें भाषांतर ह्मटलें कीं, त्याचे दोन भाग होतात. पहिला भाग हा कीं, भाषांतर कसें उतरलें आहे? आणि दुसरा हा कीं, मूळ विषय कसा आहे? तेव्हां ह्याच क्रमानें आपणांसही विचार केला पाहिजे. भाषांतराच्या संबंधानेंच आमचें मत ह्मटलें तर तें सरळ आहे; शुद्ध आहे; आणि खुलासेवारही आहे. हें सर्व खरें; पण त्यांत एक 'परंतु' आहे. परंतु ह्मणून इतकेंच कीं, तें ज्या वर्गासाठीं लिहिलें आहे, त्या वर्गास निदान आंजमितीला तरी 'निरुपयोगी'—ह्मणजे उपयोगीं न पडण्यासारखें आहे, इतकेंच. हें विधान ऐकून आमचे कितीएक वाचक सुद्धां खरोखर बुचकळ्यांत पडतील. कारण भाषांतर 'सरळ' 'शुद्ध' आणि 'खुलासेवार' असून 'निरुपयोगी' ह्याचा अर्थ तरी काय? परंतु ह्यांत फारसें गूढही नाहीं, व फारसें आश्चर्यही नाहीं. साक्रेटिसाच्या प्राणरक्षणार्थ वकिलानें तयार करून आणलेल्या कैफियतीस त्या महासाधूनें दिलेला दृष्टांत वाचकांस स्मरत असेलच. तो ह्मणाला "वस्तु चांगली असूनही कधीं कधीं मनुष्याला निरुपयोगी होते. समजा कीं, एकाद्यानें हिरेमाणकें जोडलेला, आणि बरती सुंदर नकशी केलेला रत्नखचित जोडा तयार करून आणला, तर तो जोडा चांगला, ह्याबद्दल शंका नाहीं. पण तो माझ्या गरीबाच्या काय उपयोगीं?" हेंच उत्तर आमच्या स्त्रियांनीं प्रस्तुत पुस्तकास दिलें, तर अगदीं यथार्थ होईल. प्रस्तुत पुस्तकांतील गोडी सांप्रत वाचावयास येत असलेल्या स्त्रियांना कळणें ह्मणजे दंतहीन मनुष्यास शुष्कचणकांची जितकी इतकीच त्यांच्या पदरीं गोडी पडणार. पण हा दोष केवळ भाषांतरकारांचाही नव्हे, व केवळ पुस्तककर्त्रीचाही नव्हे. हा आमच्या स्त्रियांचा. मूळ पुस्तकांतील विषय कदाचित् त्या भाषापद्धतीप्रमाणें सोपाही असूं शकेल. किंवा गहन असलाच, तरी इंग्लिश स्त्रिया तो समजून घेण्याइतक्या विदुषी आहेत. पण प्रस्तुत 'स्त्रियांचीं कर्तव्यें' हें भाषांतर आमच्या विद्यमान स्त्रीजातीकरितां केलेलें

आहे. त्यांची गोष्ट मात्र अगदीं भिन्न आहे. विद्वानांत मोडणाऱ्या पुरुषांनाही ज्याच्यांतील वाक्यें दोन दोन वेळ तीन तीन वेळ वाचून पुरतीं लक्ष्यांत येत नाहींत, तो विषय, ज्याच्यांतील उच्चप्रतीच्यांचीही कल्पित कादंबऱ्या, गोष्टी, नाटकें ह्यांपुढें मजल गेली नाहीं, त्या आमच्या स्त्रीवर्गास कितपत समजणार? आधीं नीतीसारखा विषय ह्मटला ह्मणजे त्याच्याकडे स्वभावगत्याच मनुष्याचें दुर्लक्ष्य असतें. त्यांत 'स्त्रियांच्या कर्तव्या' इतका तो कठीण असला, ह्मणजे आटोपलेंच. खरोखर हें पुस्तक आमच्या स्त्रियांना नीट समजेपर्यंत किती तपांचा काल लोटला पाहिजे, ह्याचा अंदाज करणें बहुतेक दुरापास्तच आहे. तोंपर्यंत त्या विचाऱ्यांचें अस्तित्वही जगावर राहणें कठीण! आतां ह्यांतील मर्म जाणणाऱ्या पंडिता रमाबाईसारख्या फार तर एक किंवा दोन स्त्रिया निघतील. पण त्यांच्याकरितां ह्या पुस्तकाची मुळींच खटपट नको होती. कारण, त्या मूळ ग्रंथ वाचण्याइतक्या समर्थ आहेत. ह्मणून "हें पुस्तक मुख्यत्वेंकरून स्त्रीवर्गास फार उपयोगी पडण्यासारखें आहे" ही जी ग्रंथकर्त्यांची आशा ती केवळ निरर्थक दिसते.

"आपल्या स्त्रियांची हल्लींची स्थिति अगदींच अजाणपणाची ह्मटली तरी चालेल. त्या मानानें व्याख्यानांतील विचार त्यांच्या आटोक्याबाहेरचे आहेत." हें जर खरें, तर गाभाऱ्यांतून गोपुरावर चढावयाचें कसें? त्याला मध्यंतरीं सोपानमार्ग नको का? ह्या गोष्टींचा विचार मनांत न आणतां, किंवा आणून हें पुस्तक लिहिलें ह्मटलें तरी सुद्धां, वरील हेतु पुस्तककर्त्याच्या परिश्रमानें सफल होण्याचा संभव नाहीं. 'आपल्या लोकांना विचार करण्यासाठीं 'पाश्चात्य स्त्रियांचे विचार' असा जर हेतु मानला, तर तो मात्र कांहीं अंशानें तरी सफल होण्याची आशा आहे.

आपण कोणासाठीं व कोणत्या हेतूनें पुस्तक लिहीत आहों ही गोष्ट हृदयांत बाळगणें, हें पुस्तककर्त्याचें पहिलें काम आहे. पण प्रस्तुत पुस्तककर्त्यांचें त्याकडे अगदींच दुर्लक्ष! लहान मुलांस शास्त्राभ्यासाची संवय नाहीं, ती हळूहळू लागावी ह्मणून पहिल्या पुस्तकाच्या ऐवजीं भूमिति, अर्थशास्त्र अशा गहन विषयांचें पुस्तक दिलें, तर त्यांस त्याचा कितपत उपयोग होणार? तोच मासला 'स्त्रियांच्या कर्तव्यांत' आहे. आमच्या स्त्रिया "अजाण" व कॉबबाईचे विचार "आटोक्याबाहेरचे," ह्याकरितां, ते निदान सोपे करून लहान लहान वाक्यांनीं सांगणें हें पुस्तककर्त्याचें पहिलें कर्तव्य होतें. पण त्यांच्या वाक्यांचा नमुना पहा:—

"आणि जसजशा त्या मुली मोठ्या होत जातात, तसतसे त्यांचे आईबाप, शिक्षक, आणि इतर वडील माणसें, त्यांच्या शारीरिक आणि मानसिक शक्तींस, नैसर्गिक निरुपद्रवी उल्हासास आणि जगांत आपला कांहींना कांहीं तरी सदुपयोग व्हावा अशी जी त्यांची सदिच्छा असते तीस प्रतिबंध केला पाहिजे, असा वरचेवर उपदेश करीत असतात, परंतु त्यांचा पोकळ डामडौल, पोरकटपणा आणि चैनवाजी यांचा निरोध करण्याकडे मात्र त्यांचें लक्ष्य नसतें."

हें काय वाक्य, का मारुतीचें शेंपूट? ह्याच्या मापास सुजाण पुरुषदृष्टीची यष्टि सुद्धां पुरावयाची मारामार, तेथें अजाण स्त्रियांचा पल्ला लागावा कसा? असें वाक्य एकच आहे असें नाहीं. पदोपदीं मासला हाच. दुसरें वाक्य पहाः—

"त्यांत केवळ अधिक हक्क आणि अधिक स्वातंत्र्य मिळालें ह्मणजे झालें असें समजूं नये; तर त्यांत आपणांस जें योग्य वाटेल तिकडे चित्ताची स्थिति आदरयुक्त असून, उदार धर्मशीलता, कोमल साधुता, उत्कृष्ट शुद्धता, आणि अचल सत्यता हे गुण आंगीं अवश्य असले पाहिजेत."

ज्यांच्या गुंडिका करूनही पुरुषास अर्थबिंदु प्राप्त व्हावयाचा नाहीं, अशीं नारीकेलपाकवत् वाक्यें अजाण स्त्रियांची 'उदार विचाराकडे प्रवृत्ति' कशी काय करणार? 'आदरयुक्त' स्थिति ती कशी काय असते? उदार धर्मशीलता आणि कृपण धर्मशीलता ती कसली? तीव्र साधुता आणि कोमल साधुता हे भेद कधींपासून झाले? उत्कृष्ट शुद्धतेची व्याख्या काय, आणि नीच शुद्धतेची व्याख्या काय? हे विचार मनांत आले ह्मणजे मराठी भाषेची मोठी कींव येते. तात्पर्य काय कीं, सदरहू पुस्तकाच्या भाषेंत लहान लहान वाक्यें करून विषय होईल तितका सुगम करून देणें, भाषांतरकारांचें पहिलें काम होतें, तें त्यांनीं जितकें लक्षपूर्वक करावयास पाहिजे होतें, तितकें लक्षपूर्वक केलें नाहीं, असें मोठ्या दिलगिरीनें ह्मणणें भाग येतें. मूळाप्रमाणें विशेष्यविशेषणांची मालिका लावून दिली, ह्मणजे ती दिसते सुरेख, परंतु अर्थ मात्र असत नाहीं. बाकी पुरुषांसाठीं हें पुस्तक आहे असें मानलें, तर मात्र तो दोष तितपत त्यांवर लागू पडणार नाहीं.

आतां मूळ पुस्तकांतील सिद्धांतांच्या संबंधानें थोडें तरी लिहिणें अवश्य आहे.

पाश्चात्य देशांतील स्त्रिया–किंवा त्यांचेंच वळण वळविणाऱ्या आमच्या देशांतील नवशिक्या स्त्रिया–ह्मणजे नाकापेक्षां मोतीं जड ! पोप कवीनें एक स्वतंत्र विषयच घेऊन त्यांचें फार मजेचें वर्णन केलें आहे, त्याचा उल्लेख करण्याला येथें अवकाश नाहीं. त्यांत अविवाहित स्त्रिया ह्मणजे तर बोलणें नकोच. पुरुषांच्या पायमल्लीच्या चालत्याबोलत्या पुतळ्याच त्या ! मग त्यांची झांक प्रस्तुत पुस्तकांत दृष्टीस पडली, तर त्यांत फारसें नवल वाटावयास नको.

" मिल्टनसारख्या पुरुषाचेंही मत असें आहे कीं, पुरुषांनीं प्रत्यक्ष ईश्वराची सेवा करावी आणि स्त्रियांनीं पुरुषांस दैवत समजून त्यांची सेवा करावी. परंतु हें मत अगदीं चुकीचें आहे."

ह्या एका वाक्यावरूनच कॉबबाईचें मत काय आहे, त्याचें अनुमान होईल. जी आपल्या देशांतील तत्त्ववेत्त्याला केरासमान लोटते, ती आमच्या देशांतील तत्त्ववेत्त्यांस धूप घालणार थोडीच ! तेव्हां अशा ठिकाणीं त्याचें प्रत्युत्तर सांगत बसण्यांतही अर्थ नाहीं. खरोखर कॉबबाईनीं नीतीविषयीं पुष्कळ प्रकारचा व चांगला बोध केला आहे, ह्यांत शंका नाहीं. पण त्या स्वतः अविवाहित असल्यामुळें, त्यांच्या नैसर्गिक स्वभावाप्रमाणें, त्यांच्या भाषणांत पुरुषाविषयीं जागजागीं तुच्छबुद्धि प्रगट झाली आहे. आतां मानवजातींत–नव्हे आमच्या आर्यकुलांत सुद्धां–जनावराप्रमाणें अर्धांगीस बेदम मारणारे अधमाधम नाहींत असें नाहीं. पण ते फार थोडे आहेत. तेवढ्यावरून यच्चयावत् पुरुषमंडळास दोष देणें बरोबर नाहीं. पण ग्रंथकर्त्रीस पतीच्या भाषणास 'आज्ञा' ह्मणणें सुद्धां महत्पातक वाटतें. त्या ह्मणतातः—

" त्यापासून प्रेम आणि ममता दृढ होतात असें समजणें मूर्खपण आहे. कारण जेथें प्रेम असतें, तेथें आज्ञेची कल्पना सुद्धां राहूं शकत नाहीं."

यापुढें आणखीः—

" उभयतांपैकीं कोणाही एकानें दुसऱ्याची सेवा करण्याचा आपला मधुर हक्क सोडून देऊन दुसऱ्याला हुकूम करण्याचा कठोर हक्क स्वीकारणें ह्मणजे प्रेमाचा अपमान करणें व त्यावर पाणी सोडणें होय. यामुळें वैवाहिकप्रेमाचें तेज कमी होतें."

ठीक आहे. ही स्त्रीची आज्ञा स्त्रियांनींच पाळावी ह्मणजे बस्स !

" आपल्या बायकोनें आपली आज्ञा पाळली पाहिजे, हा आपला हक्क आहे, अशी राक्षसी समजूत ज्या पतीची आहे त्याला तरी या-पासून कांहीं सुख आहे काय ? खरोखर कांहीं नाहीं."

आजपर्यंत सारे जगांतील पुरुष दुःखसागरांत गटकळ्या खात होते, त्यांचा आतां नव्या विदुषी स्वतंत्र होऊन उद्धार करणार, आणि त्यांना सुखाच्या मैदानांत आणून सोडणार ! ह्या बाईनीं आपलें मत एके ठिकाणीं स्पष्ट सांगितलें आहे तें असें:—

" जर विवाहामुळें वर सांगितलेल्या प्रकारचा आज्ञाधारकपणा आणि नैतिक पराधीनता उत्पन्न होत असतील तर मग कोणत्याही स्त्रीस अशा प्रकारें लग्न करणें रास्त होणार नाहीं, असें माझें मत आहे !!

अवश्य. असाच बायकांनीं कट करून साऱ्या पुरुषांची खोड मोडली पाहिजे !

" दोघांतून एकाला आपल्या ह्मणण्याप्रमाणें संसार चालविण्याची पूर्ण सत्ता असल्याशिवाय दोघांचें एकत्र चालेल तरी कसें ? "

ही आजपर्यंत चालत आलेली सर्वमान्य कल्पना या बाईस कवडीच्या मो-लाची वाटते. व त्या समर्थनार्थ बाई इंग्लंदच्या प्रजासत्ताक राज्याचें उदाहरण दाखवून देतात. पण त्यांतही एक मत अधिक असेल तोच पक्ष खरा ठरतो, ह्याची त्यांस विस्मृति होते, हें केवढें आश्चर्य !

तात्पर्य, बेकननें एके ठिकाणीं ह्मटलें आहे:—

" अविवाहित मनुष्यें बहुधा क्रूर व पाषाणहृदयी अर्थात् उच्छृंखल असतात. शांत किंवा गंभीर विचाराचीं मनुष्यें ह्मटलीं ह्मणजे विवाहित पुरुषच होत." तें खरें दिसतें. असो.

हा वादाचा विषय बाजूस ठेविला तर, कॉबबाईचा उपदेश नीतीसंबंधानें अत्यंत बोधप्रद आहे ह्यांत शंका नाहीं. आणि " ज्या स्त्रीला घरची व्यवस्था चांगली ठेवतां येत नाहीं, ती वास्तविक कुचकामाची स्त्री समजली पाहिजे." ह्या सिद्धांतास कोण शिरसावंद्य करणार नाहीं ? आमची तर त्यास त्रिवार मान्यता आहे.

सरतेशेवटीं येवढेंच सांगावयाचें कीं, सदरहू पुस्तक आजमितीस आमच्या स्त्रियांस जरी समजण्यासारखें नाहीं, मन लागण्यासारखें नाहीं, तरी पुरुषांनीं वाचून त्याचा विचार व उपयोग करणें अगदीं योग्य आहे. ह्याकरितां समाज-

स्थितीचा विचार करणारांनीं ह्या उत्तम पुस्तकानें आपला पुस्तकसंग्रह अवश्य सुशोभित करावा.

लोकोत्तर चमत्कार.

पत्रव्यवहार.

राजमान्य राजश्री केरळकोकिळकर्ते यांस:—

वि. वि. आपल्या परम स्तुत्य व जगन्मान्य मासिकपुस्तकांतील लोकोत्तर-चमत्कारसंग्रहास कांहीं मदत करावी, या उद्देशानें खालील मजकूर लिहीत आहें, तरी त्यास येत्या अंकीं जागा मिळेल अशी केलेली आशा विफळ न होवो.

जिल्हा रत्नागिरी तालुका वेंगुर्ले यांतील केळूस नांवाच्या खेड्यांत बागलांची राई ह्मणून एक वाडी आहे. तेथें दगडी बांधलेला एक मठ आहे. हा मठ चिदानंद स्वामींनीं बांधला असावा असें तेथील लोकांच्या सांगासांगीच्या माहितीवरून समजतें. त्या मठांत दोन्ही बाजूंच्या भिंतींवर एक लांकडी तुळई आहे. तींतून प्रतिवार्षिक महाशिवरात्रीच्या दिवसापासून मुख्य पादुकांवर अभिषेक होण्यास सुरवात होते, असा प्रकार पाऊस लागे तोंपर्यंत असतो. तुळईचीं दोन्हीं शेवटें कोरडीं असून, मध्यभागांतून पांच सेकंदांच्या अंतरानें पाण्याचा एक एक थेंब पडतो. कांहीं दिवसांपूर्वी जुनी तुळई कुजून पडली. नंतर तेथील लोकांनीं दुसरी तुळई त्याच जागीं ठेविली. पूर्ववत्प्रमाणें त्यांतूनही पाणी गळूं लागलें. सदरहू मठास डोंगराचा कडा किंवा दुसरा संशय येण्यासारखा कोणताही पदार्थ लागलेला नाहीं. हल्लीं कित्येक आमचे सुधारक बंधु अमानुषचमत्कार निवळ खोटे मानितात. तरी त्यांनीं सदरहू प्रकाराबद्दल 'चक्षुर्वै सत्यं' या वाक्याप्रमाणें पाहिजे असल्यास अनुभव घेऊन आपला मार्ग सुधारावा अशी माझी त्यांस सविनय सूचना आहे. शुष्क लांकडांतून आपोआप पाणी गळणें या गोष्टीस सृष्टिजन्यकार्यकारणसंबंध असेल असें निदान माझ्या तरी बुद्धीस वाटत नाहीं. तो खरोखर ईश्वरीचमत्कार आहे असें एथील कांहीं विद्वान् मंडळीनें माझ्या मताप्रमाणेंच प्रत्यक्ष अनुभव घेऊन ठरविलें आहे. असो. लेखनांत कांहीं चूकभूल झाल्यास क्षम्यदोषांत गणना व्हावी. कळावें कृपालोभ असावा हे वि.

विष्णु आत्माराम देसाई,
अ. मास्तर. शाळा कणकवली. ता० देवगड.

पत्रव्यवहार, त्यांस उत्तरें, व विद्युन्मानसशास्त्राविषयीं पुढील व्यवस्था.

रा० रा० सि० ह० कानिटकर, कासर्डे; रा. रा. वालचंद मियाचंद गुजर, अकळूज; व अहमदनगरचे एक गृहस्थ इत्यादि सद्गृहस्थांकडून बरींच पत्रें आलीं आहेत. त्यांतील क्रमशः सारांश असा आहे:—

"तुझ्या सर्वांगाची कांती नीलमण्यासारखी सुंदर असून तूं फारच गोजिरवाणा दिसतोस. तूं सर्वांचें मनोरंजन करण्याकरितां लोकोत्तर चमत्कार, मलबारवर्णन, स्वदेशधर्माभिमानाच्या उपदेशपर कविता, सिंहलद्वीप, विद्युन्मानसशास्त्र, गोरक्षण इत्यादि अनेक विषयांवर नीतीचीं व्याख्यानें देऊन तृषित झालेल्या मित्रजनांवर शब्दरूपी प्रेमानें ज्ञानामृतपर्जन्याचा वर्षाव करून त्यांना गारीगार करतोस. तूं मोठा ज्ञानपंडित असून मूढजनांचें शब्दजाल खंडित करून त्यांस पंडित करतोस. तूं प्रतिवर्षी वसंतऋतूंतील पसंत आम्रवृक्षफळांचा आहार करून कुसंतजनांचे मनास उसंत देऊन पसंत संगतीस लावतोस. तूं सावरीच्या कापसाच्या मृदु तक्तावर बसून ईश्वरप्राप्तीस भुक्त झालेल्या भक्तजनांस अनुरक्त करून त्यांना शास्त्रयुक्त उक्त उपदेशाचा बोधरस पाजून, एकनिष्ठभक्तीनें परमेश्वराच्या पुराणवर्णित लीलेच्या शब्दसुमनांच्या माळा आपल्या कंठांत घालून साधूसारखा कीर्तनांत तल्लिन होत्साता, गद्यपद्यात्मक भजनाचा आपल्या मंजुळ वाणीनें घोष करून पंचम स्वरांत सुस्वर गायन करतोस, आणि सदाचरणानें वागतोस. ह्मणून मी तुला, 'आचार्य' 'गुरु' अशी संज्ञा देतों. तुझ्या ज्ञानामृत प्राशनास लुब्ध होऊन कोकिळाचार्य गुरूपाशीं हा आर्य, आपल्या शिष्याचा शिष्य चातकाचार्य, महत्कार्य हातीं घेऊन शब्दरचनेनें तयार केलेली आर्यांची चादर, आदरानें आपल्याकडे सादर करीत आहे. तिचा अनादर न होतां तिजवर नदर देऊन सदर वर्षीतील पुढील अंकीं दाखल होण्याबद्दल पदर पसरून विनंति करतों. इ० इ०"

ह्यापुढें रा० कानिटकर ह्यांनीं केरळकोकिळच्या स्तुतिपर कविता दिल्या आहेत. परंतु अशा प्रकारचे स्तुतिपर लेख व कविता हल्लीं मनस्वीच येऊं लागल्या आहेत. अशा लेखांची केरळकोकिळांत प्रसिद्धि करणें स्थलसंकोचामुळें फार कठीण आहे हें उघडच आहे. हें सांगण्यासही आह्मांस दिलगिरी वाटते. आतां असे लेख, जे कोणी पाठवितात ते आमचा गौरव करण्याकरितां, आमच्याविषयीं

आपल्या मनांत असलेली पूज्यबुद्धि व्यक्त करण्याकरितां, व आह्मांस एकप्रकारचें उत्तेजन व उमेद देण्यासाठीं पाठवितात, ही गोष्ट खरी आहे. पण वरील कारणामुळें त्यांचा प्रत्यादर करणें आटोक्याबाहेरचें झालें आहे. ह्मणून अशा प्रकारच्या पत्रांस कोकिळांत स्थळ मिळालें नाहीं, किंवा त्याबद्दल कांहीं उल्लेख झाला नाहीं, ह्मणून राग नसावा. बाकी अशा सर्व लोकांच्या श्रद्धेबद्दल, व पूज्यबुद्धीबद्दल आह्मी त्यांचे सर्वस्वीं ऋणी आहों हें पुनःपुन्हा सांगणें नकोच. असो. आतां दुसरें पत्रः—

"मन जरी क्रोधाग्नीनें कितीही तडफडून गेलें, अथवा भयंकर संकटाच्या ज्वालाग्नीनें (संकटामुळें होणारें दुःख) कितीही होरपळून गेलें, वा रोगग्रस्ततेमुळें कितीही त्रासून गेलें, किंवा दुसऱ्या अनेक व्याधींनीं अस्वस्थ आणि असमाधानकारक झालें, तरी मनोरंजन करून ज्ञान वाढविणारा कोकिळ दृष्टीस पडतांच हे सर्व विकार क्षणभंगुर होऊन मनास एकप्रकारची आनंदोत्साहित प्रफुल्लता येऊन आंतील विषय पहाण्याची मोठीच उत्कंठा प्राप्त होते. आंतील विषयांच्या लालसेनें तो मनोरंजक, ज्ञानवर्धक कोकिळ पाहूं लागलें असतां सर्व मन त्या ठिकाणीं तल्लीन होऊन जातें. तशांत जर "विद्युन्मानस" शास्त्र दृष्टीस पडलें तर मग पुसावयासच नको. कोकिळांतील गायन मधुरतम असून अनुकरणीय असतें. कोकिळाच्या गेल्या ३ ऱ्या अंकांतील "स्वदेशवसनग्रहण" नामक गोड सुधेचा फटका नव्हे, गुटका खरोखर गोड असून चित्तवेधक, व अनुकरणीय आहे. कोकिळांतील प्रत्येक विषय मनोरंजक, उपयुक्त, ज्ञानवर्धक असतो. 'पशुपक्ष्यादि प्राण्यांचीं व मलबारादि व्यापारी प्रांतांचीं वर्णनें, लंकादि स्थलनिर्देश, विद्युन्मानसादि शास्त्रीय विषय, मधुर-तम गायन, हडसून खडसून पुस्तकपरीक्षण, कूट प्रश्न व मधून मधून येणारा व तसें लिहिण्याची चटक लावणारा, कलमबहादुरांस शेलापागोटें" इत्यादि इत्यादि अनेक विषयांनीं ओतप्रोत भरल्यामुळें कोकिळास फारच मनोरम रूप प्राप्त झालें आहे. अशा ह्या मधुर व स्वादिष्ट पक्वान्नानें वाचकवर्ग तृप्त होऊन सदरहूप्रमाणें आशीर्वाद देतात. आणि या आशीर्वादांस खरोखरच कोकिळा, तूं योग्य आहेस; ह्मणून कोकिळा, तुला माझे शतशः थ्यांक्स असोत. एवढ्यानें गोड व स्वादिष्ट अशा पक्वान्नाचा मोबदला कधींही होणार नाहीं असो.

कोकिळांत आजपर्यंत शास्त्रीय विषय जितके आले असतील तितक्यांचें एक स्वतंत्र पुस्तक जर होईल तर त्यापासून वाचक व इतर यांचा फार फायदा होईल.

कोकिळांत हल्लीं चालू असलेले कूट प्रश्न चालू असून शिवाय गणितावर कांहीं कूट प्रश्न येतील तर विद्यार्थीचा व इतरांचाही बराच उपयोग होईल."

आतां 'विद्युन्मानसशास्त्रा'संबंधानें सर्वांच्या एकंदर पत्रांतील सारांशः—

"विद्युन्मानसशास्त्राविषयीं तर बोलणेंच नाहीं. तें एक अपूर्व शास्त्र आहे. तें आमच्या जन्मांत आह्मांस वाचावयास मिळालें, हें मोठें जन्माचें सार्थक झालें असें आह्मी समजतों. त्यांतील विचार ऐकून आंगावर रोमांच उभे राहतात, गुदगुल्या होतात. तें वाचून कोणकोणतें ज्ञान प्राप्त होत नाहीं? ईश्वरस्वरूपाची ओळख होते; आत्म्याचें सामर्थ्य कळतें; आरोग्याचे नियम समजतात; पंचमहाभूतांचे धर्म लक्ष्यांत येतात; आणि मनाला एकाप्रकारचा नवाच संस्कार घडतो. त्यांत आपली भाषाशैली केवळ अप्रतिम. भाषांतर असें मुळीं वाटतच नाहीं. आपल्याच भाषेंतील वेदांताचा ग्रंथ आपण वाचीत आहों असें वाटतें. प्रसिद्ध राव० कुंटे ह्यांच्या षट्दर्शनचिंतनिकेच्या भाषाशैलीची लोक तारीफ करतात. पण आपली लेखनशैली त्यांच्याच तोडीची, किंबहुना कांकणभर अधिक सुलभ व मनोरम आहे. ती पुन्हा पुन्हा कितीही वेळ वाचली, तरी तृप्ति ह्मणून होत नाहीं. एकंदरींत 'विद्युन्मानसशास्त्राचीं राहिलेलीं व्याख्यानें–निदान आह्मांकरितां—तद्व्याख्यानप्रियांकरितां तरी—लौकर लौकर छापून प्रसिद्ध करावींत. आज कितीएक महिन्यांत मुळींच व्याख्यान नाहीं. इ० इ०"

ह्यांवर आमचें उत्तर—केरळकोकिळांत पुस्तकपरीक्षा व विषय ह्यांची दिवसेंदिवस गर्दी होत चालली आहे. तेव्हां त्यांत स्थलावकाश होणें मोठें मुष्किलीचें काम दिसतें. शिवाय अकराव्या व्याख्यानाला मूळ ग्रंथकर्त्यानें **'शिष्यांस गुप्त मंत्रोपदेश'** असें नांव दिलें आहे. तेव्हां तें आह्मीं अगदींच उघडकीस आणणें उचित नव्हे !! ह्माकरितां आह्मी 'विद्युन्मानस'शास्त्राचें स्वतंत्र पुस्तक छापण्याचें काम पुन्हा सुरू करणार आहों. तें काम लौकरच पुरें होईल. व त्यांतच पुढील दोन व्याख्यानें सामील होऊन येतील. ज्यांस तें पुस्तक सबंध पहाण्याची इच्छा असेल, त्यांनीं त्या पुस्तकाचा संग्रह करावा. त्यांस होणारे ग्राहक 'विद्युन्मानस'शास्त्राचे खरे भक्त असें समजूं. व त्यांच्याच हातांत **"गुप्त मंत्र"** जाईल. सदरहू पुस्तक ज्यांस घेणें असेल,, त्यांनीं खालील पत्त्यावर कळवावें:– रा. रा. जनार्दन महादेव गुर्जर, प्रोप्रायटर, केरळकोकिळ, रामवाडी, मुंबई.

—ए० के० को०—

वाचा, विचार करा आणि प्रयत्नास लागा.

(धनुर्धारी यांजकडून)

(मागील अंकावरून संपूर्ण.)

त्याचप्रमाणें हल्लीं आफ्रिकेंत आमच्या देशबंधूंचे हाल चालले आहेत त्यासंबंधाची दरोबस्त माहिती व त्यांना लागेल ती वाचिक कुमक करण्यासाठीं तिघे प्रतिनिधी मुंबई, मद्रास, व बंगाल येथून रवाना केले पाहिजेत. मागें पार्लमेंटच्या निवडणुकीसाठीं इकडून **चंदावरकर**प्रभृति मंडळी गेली व रवाना करणें आवश्यक वाटलें आणि साध्य झालें. तसाच प्रकार आफ्रिकेंतल्या स्वदेशबंधूंचा आहे. कलकत्त्याचे जमीनदार धनाढ्य व विद्वान् असा लौकिक आहे. **महाराष्ट्रांतले जाहगीरदार** मनावर घेतील तर त्यांना या गोष्टी शक्य आहेत. वास्तव त्या धोरणानें या प्रयत्नास लागावें. मराठी व इंग्रजी पत्रांतून चर्चा, गांवोंगांवीं लोकमताची निष्पत्ति आणि मग त्या दिशेनें प्रयत्न असा हा प्रारंभ हवा. मद्रास व बंगाल इकडून "कूली एमीग्रंट" गुलामनौकर पैदा करण्याचीं दुकानें आहेत व तिकडूनच हल्लीं लोक जास्त जात आहेत. कारण इंग्रजी साम्राज्य अगोदर तिकडे स्थापिलें गेलें. पंजाबांतूनही यंदां व याच महिन्यापासून लोक जाण्याची सुरुवात झाली आहे. आणि मुंबई इलाख्यांत तो वखत यावयाला फारसा अवकाश उरलेला नाहीं. मानेवर गुद्दे घेत बाहेर पडावें त्यापेक्षां आपण होऊन आबांत उठून गेलेलें काय वाईट?

ह्मणून महाराष्ट्रांत व बंगाल्यांत या विषयाची चर्चा करण्याला तिघे चौघे व आफ्रिकेकडे जाऊन तेथली माहिती प्रथमतः आणण्यास दोघे तिघे असे पांच सहा जण आधीं तयार झाले पाहिजेत आणि इतका विद्याप्रसार व एवढा स्वदेशाभिमान जागृत असतांही असल्या अत्यंत हितकारक गोष्टीच्या सिद्ध्यर्थ कोणी पुढें सरसावत नाहीं ह्मणजे त्या विद्याप्रसाराची व देशाभिमानाच्या आवेशाची किंमत काय मोलाची हें कांहीं सांगावयाला नको.

५ **यासंबंधाचे आक्षेपः**—परदेशच्या वसाहतीचा प्रश्न परिणामीं कितीही कल्याणप्रद असेल, पण तो सध्यां **साध्य** व **शक्य** नव्हे. कारण (१) राजाश्रयाविणें सर्व व्यर्थ आहे. (२) आमच्या लोकांच्या अंगीं तेवढी योग्यता नाहीं; लग्नाच्या पार्यी डुबघाईस आलेले आह्मी लोक. इकडून उठून तिकडे गुलामगिरीस जावें एवढीच आमची योग्यता? आणि (३) एथल्याएथें काय कमी आहे तें परखंडीं वसाहतीस जावें. अशा तीन मुद्यांवर हा प्रश्न कुचकामाचा असें ठरविण्याला आमची मंडळी भारी तत्पर असते. काय ह्मणणें आहे हें पुरें न पाहतां किंवा त्याचा थोडा तरी विचार न करितां आपलें ठाम मत ठोकून देणें आणि त्यांतून टर उडविण्यांत

खपवेल तितका आवेश खपविणें हें आमच्या विद्वान् मंडळीचें मुख्य कर्तव्य किंवा विचारी विद्वत्तेचें द्योतक झालेलें आहे. आणखी त्यांतल्यात्यांत दुसरी एक अशी मजा आहे कीं, परीक्षण करितांना पाहूं लागावयाचें अत्युच्च गिरिशिखरांवरून. पुण्याला **ज्ञानप्रकाश** ह्मणून एक वर्तमानपत्र आहे. त्यांत रा. **पारसनीस** यांच्या एका पुस्तकाचें परीक्षण चाललें होतें. त्यावेळीं इतिहास ह्मणजे काय? व ते लिहावे कसे यावद्दलचे विलायती ग्रंथकारांनीं ठरविलेले नियम सादर करीत रा. **पारसनिसां**च्या पुस्तकाची त्या पत्रकर्त्यानें परीक्षा चालविली होती. तो प्रकार कांहीं गैर नाहीं किंवा इतिहाससंबंधानें ज्ञानप्रकाशांतले नियमही चुकीचे नव्हते हें खरें. पण इकडील विद्याप्रसार, ग्रंथकारांचे प्रयत्न, वाचकांची अभिरुची व प्राथमिक अवस्था इत्यादिकांचा विचार मशारनिल्ह्या पत्रकारानें करावयास पाहिजे होता. पण इतकें कशाला? इतिहासपुस्तकांची परीक्षा ज्या देशच्या तत्वांवर करण्यास जो पत्रकार पुढें सरसावला त्याच पत्रकाराची योग्यता विलायतेकडील एखाद्या पत्रकाराशीं किंवा तिकडील स्थितीच्या ईयत्तेवरून तुलना करावयास लागलें असतां काय मजा होईल बरें? ह्मणजे आमच्या मंडळीच्या अशा चुका होताहेत. तें असो.

आतां या आक्षेपासंबंधानें थोडथोडके विचार सादर करावयाचे आहेत.

(१) **राजाश्रय.** राजाश्रयाखेरीज कोणतीच गोष्ट साध्य व्हावयांची नाहीं, या समजुतीचे आह्मी लोक पडलों. शिवाय वसाहत करणारांना सहाय्य करण्याला एक प्रकारचें स्वप्रजापक्षाभिमानी सरकार लागतें तसें आमचें कोठें आहे? करितां हा प्रश्न आमच्या आवांक्यांतला नव्हे असें ह्मणणारांनीं इंग्लंडच्या वसाहतीचा इतिहास तरी एकवार वाचावा अशी प्रार्थना आहे. इंग्लंडचा श्रेष्ठपणा, सर्वस्वीं तेथील धाडसी लोकांच्या साहसाचें फळ आहे. कोणत्या वसाहतीला आणि कोणत्या राजाच्या कारकीर्दीत काय कुमक मिळाली हें तरी कोणी दाखवील काय? आस्त्रेलियाची वसाहत "डांबीस" ठरलेल्या इंग्लंडकरांनीं केली. त्यांना इंग्लंडच्या सरकारानें काडीइतकी सुद्धां कुमक केलेली नाहीं. इंग्लंडच्या लोकांनीं तरी कुमक केली ह्मणावें तर शेंकडा आणि दरसाल ६०।७० रुपये व्याजाच्या रकमा मात्र कर्जाऊ दिल्या! चालता काळ आला ह्मणजे खायाला मिळतात हा व्यावहारिक सिद्धांत वसाहती व इंग्लंडचें पार्लमेंट यांचा आहे. हवीं असल्यास प्रत्यंतरें लागतील तितकीं सादर करितां येतील. आफ्रिकेंत नवी निघालेली ईष्टआफ्रिकनकंपनी दोन वर्षांखालीं बुडविली ती इंग्लंडच्या सरकारानेंच ना? हल्लींचीं संयुक्त संस्थानें ह्मणून प्रसिद्ध असलेल्या अमेरिकन वसाहतीला इंग्लंडच्या सरकारानें काय कुमक केली होती याचा कोणीं कधीं विचार केला आहे काय?

ह्मणून सरकारची कुमक हवी आहे खरी पण मिळत नाहीं ह्मणून नडावयाचेंही पण नाहीं हें खचित. आमच्या सार्वभौम सरकाराकडून कुमक मिळण्याचा संभव

असता तर मग वसाहतीची तरी कशाला उरस्फोड करावयाला हवी होती?

(२) **आमच्या लोकांच्या आंगचीं योग्यता.** प्रसंग दाखवा ह्मणजे गुण आपोआप व्यक्त होतील. घरीं आणि जमिनीवर बसून पोंहतां येतें कीं नाहीं हें कसें दाखवावें? भुकेबंगाल मावळे उत्तम लढवय्ये बनतील हें कोणाला खरें वाटत होतें? कडीभातखाऊ आणि सोंवळेंओंवळें करीत बसणारे ब्राह्मण कधीं तरी भीष्माचार्यासारखें शौर्य आडदांड मुसलमानांशीं झगडतांना दाखवितील हें कधीं कोणीं शक्य मानिलें का असतें? प्रसंगच माणसाला कर्तृत्ववान् बनवीत असतो हा हरहम्मेश आढळणारा अनुभव पाहिला ह्मणजे या आक्षेपांतही अर्थ नाहीं असें दिसून येईल. लग्नादिकांमुळें आणि स्वदेशप्रेमासाठीं घर कोण सोडणार नाहीं हें उघडपणें निदान आतां तरी ह्मणतां यावयाचें नाहीं. खात्री करा आणि मग कोणी जातो कीं नाहीं पहा. महाराष्ट्राच्या लोकांनीं चंदीचंदावराकडे कशी वसाहत केली? मराठे ग्वालेरीकडे घरदार सोडून गेले त्या वेळीं का फाजील लग्नें नव्हतीं का स्वदेशप्रेम शिथिल होतें?

(३) **एथल्याएथें काय कमी आहे?** अगोदर इकडलें पहा आणि मग परदेशचें आणि परखंडाचें. या ह्मणण्यांत मात्र अर्थ पुष्कळ आहे. पण आफ्रिकेकडे जावयाचा मुख्य हेतु **राजकीय** आणि **व्यापारी** तो इकडे कसा साधणार? "हजारों एकर" "लाखों मैल" येथें असें आहे आणि तेथें तसें आहे हें घेऊन कर्तव्य काय? ड्रेपर यानें Conflict between Science and Religion या पुस्तकांत ह्मटलें आहे. "अत्यंत अवनतीस आलेल्या राष्ट्राच्या अभ्युदयाची आशा परदेशीं वसाहत किंवा स्वदेशीं श्रेष्ठ व कनिष्ठ अवलादीचें कलम करणें या दोन्हींवरच असावयाची". पैकीं दुसऱ्या उपायांचा उल्लेखच आर्य ह्मणविणारांस हटकून संताप आणविणारा आहे. आणखी येथें राहून करणार तरी काय? चोंहोंकडे सारखें गुडघाभर पाणी आहे. आज नाहीं अर्धशतकानें तरी वसाहतींत आह्मी नांवालौकिकास चढूं अशी आशा आहे. येथें काय? जास्त बंदे होऊं!

इतके विचार सादर केले आहेत. त्यांची चर्चा व्हावी.

धनुर्धारी.

सोबतची चिठी पहा.

सन १८८७ ते ९० पर्यंत ४ वर्षें **"केरळकोकिळ"** कोचीस छापून प्रसिद्ध झाला, त्याच्या दोनही आवृत्ति संपल्यामुळें आजपर्यंत लोकांच्या मागण्या व्यर्थ झाल्या. त्याची ३ री आवृत्ति छापण्यासंबंधानें सोबत चिठी जोडली आहे ती ध्यानीं घ्यावी.

PRINTED and published by Janardan Mahadeo Gurjar AT JAVAJI DADAJI'S "NIRNAYA-SAGARA" PRESS, Bombay.

आर्यधर्माभिमानी लोकांकरितां सचित्र हिंदु घड्याळें.



प्रत्यक्ष देवदेवतांनींच हृदयासन्निध वास
केल्यावर अधर्म कितीसा टिकेल.

नमुना मागवा. तुमच्या पहाण्यानेंच आनंद जर होईलच
होईल, तर मग घापरण्यानें कां न होणार बरें ? देवतांचे
दर्शनानें हिंदुधर्माभिमानास भरती नाहींका येणार ? नांव
एकतांच पहावेंसें घटतें व पाहतांच घ्यावेंसें घटतें.

हिंदु घड्याळें कशीं आहेत, दिसण्यांत सुंदर, खिशांत हलकीं, मजबूत, टिकाऊ, **अंगचे चावीचीं**, तवकडी मिन्याची पांढरी असून त्यावर रीतीप्रमाणें रोमन आंकडे असून ठळक मराठी आंकडेही आहेत आणि प्रत्येक आंकड्यामध्यें हिंदुपूज्य देवतांचीं सुंदर चित्रें आहेत. श्रीगणपति, सरस्वती, रामदासस्वामी, हनुमंत, रामसीता, लक्ष्मीनारायण, गरुड, अष्टभुजादेवी, विठ्ठलरखुमाई, शंकरपार्वती, अक्कलकोटस्वामी, **श्रीगुरुदत्तात्रय**, आणि मध्यभागीं, महाराष्ट्रास जिवंत करणारे गोब्राह्मणप्रतिपालक **श्रीशिवाजीछत्रपतिमहाराज** यांचें सुबक चित्र आहे. अशीं हीं अपूर्व हिंदु घड्याळें आमचे देशबांधव व भगिनी काय ह्मणून न घेतील !

हिंदु सिलेंडर पिक्क नी. सी. वॉच किं. रु. १० ग्या. वर्ष १
हिंदु लिव्हर प्रीव्हेन्स नी. सी. वॉच किं. रु. १५ ग्यारन्टी वर्षें २
हिंदु रासकोप सिस्टीम नी. सी. वॉच किं. रु. १७ ग्या. वर्षें ३
हिंदु प्रिव्हेलन्स चांदीचें वॉच किं. रु. २५ ते ३० ग्या. वर्षें ४
हिंदु सोन्याचें वॉच किं. रु. १०० ते १२५ ग्या. वर्षें ४
हिंदु सचित्र आर्मी वॉचेस किं. रु. १० ते १२५ पर्यंत.

हिंदु सचित्र टाईमपीसेस साधें, अलार्म, स्विंग, जपींगई. आंकड्यांमध्यें देवतांचीं चित्रें, मध्यभागीं दरबारी व अश्वारूढ श्रीशिवाजी, आणि श्रीशंकर पार्वतीसह. किं. रु. ४–६–१० ते ३० पर्यंत. [७

जी० बी० नाईक आणि कंपनी. बिलासिंसरोड, नाका भायखळा, मुंबई.

धि इंडियन म्यारेज ऍण्ड डेथ बेनिफिट फंड लिमिटेड, मुंबई.

डिरेक्टर्स.

रावसाहेब दलपतराम प्राणजीवन खक्कर जे. पी.

बद्रुद्दिन अब्दुल्ला कूर एस्कायर जे. पी.

रुसतम बी. पेमास्तर एस्कायर बी. ए. एल् एल्. बी.

धनजीशा फ्रामजी चिनाय एस्कायर.

विष्णु नारायण परुळकर एस्कायर (एक्स आफिशिओ.)

मध्यम स्थितींतील मनुष्यांस आपल्या मुलांमुलींच्या लग्नाचे वेळीं व आपल्या मरणानंतर आपल्या वारसाकरितां पैशाचा संग्रह करून ठेवितां यावा ह्मणून हा फंड १८९४ मध्यें स्थापन झाला आहे. इतक्या अवधींत ३००० पेक्षां जास्त मेंबर झाले असून सरासरी १५० मेंबरांस फायदा मिळाला आहे. लग्नफंडाची वर्गणी दर महिन्यास १। पासून ६। रु. पर्यंत आहे.

मरण-फंडाची वर्गणी फक्त १ रुपया आहे.

व या मरणफंडांतील मेंबरांच्या पश्चात् त्यांच्या वारसास २००० रुपयेपर्यंतची रक्कम फायद्यादाखल मिळेल. जास्त माहिती खालील पत्त्यावर एक आण्याचें तिकिट पाठविल्यानें मिळेल. [६–१२

आफीस–५
कावसजी पटेल स्ट्रीट
फोर्ट, मुंबई.

परुळकर ऍण्ड कं०
एजंट्स.

व्यापारी व ग्राहक ह्यांकरितां. **हरएक प्रकारचा माल** मुंबईत मिळणारा वक्तशीर बाहेरच्या लोकांस मिळण्याची सोय.

D. K. SANDU
RAMWADI, BOMBAY.

दत्तात्रेय कृष्ण सांडू ह्यांचें हरएक प्रकारचा माल मिळणारें, आणि माफक **अडत** घेऊन माल रवाना होणारें दुकान:—

रामवाडी, मुंबई.

वा. कृ. सांडू. दुकानदार—रामवाडी, मुंबई.

यांचा कदाचित् गुण नच आल्यास पैसे परत देऊंच.

मंत्रसिद्ध ताईत व दोरे.

हिमालयावरील एका महान् तपस्वी (सिद्ध) पुरुषानें आमच्या निःसीम भक्तीस तुष्ट होऊन आपला अत्यंत उपयोगी असा जो पिशाचबाधा व दुसरे अनेक विकार दूर होणारा अद्‌भुत मंत्र तो ताईत व दोरे मंत्रून देण्यास शिकविला आहे. व त्या योगानें खालील विकार फार त्वरित बरे होतात. पिशाचादि पीडेनें मुलें, स्त्रिया किंवा पुरुष झोंपेंत अगर जागतावस्थेंत घाबरतात, कंप सुटतो, वेड लागतें, दांत ओंठ चावतात, दचकून उठतात, व कधीं ज्वरादि विकार उत्पन्न होतात आणि कित्येक प्रसंगीं अपस्मार, भ्रम वगैरे अत्यंत वाईट रोग उत्पन्न होतात. कित्येक स्त्रियांस पिशाचादि पीडेनें संतती होत नसते व झालीच तर वांचत नसते. कित्येकांस स्वप्नामध्यें स्त्रीचा भास होऊन धातुपात होतो; कित्येक स्त्रीपुरुषांमध्यें व कित्येक मित्रांमध्यें वैमनस्यें उत्पन्न होतात, इत्यादि अनेक विकार या आमच्या अद्‌भुत मंत्रसिद्ध ताईत व दोरे यांनीं फार त्वरित खात्रीनें बरे होतात. गुणाबद्दल हजारों सर्टिफिकिटा मिळाल्या व मिळत आहेत. थोड्याच काळांत याचे अपूर्व गुण या देशाच्या, आसमंतात्‌भागीं ब्रह्मदेश, सिलोन, बनारस, पंजाब, मद्रास, मुंबई, कानडा, इत्यादि ठिकाणीं अतिशय पसरले आहेत. सबब जास्त वर्णन करीत नाहीं. सिद्धमंत्र खोटे ह्मणणारांनीं एकवार अनुभव घेऊन पहावा, ह्मणजे ते नेहमींच ग्राहक बनतील. पुरुषांचे विकारांस दोरा, कि० ८ आणे. स्त्रियांचे विकारांस ताईत १ रु०; रुप्याचा २ रु०; सोन्याचा ६; कित्येक रोगांस दोन वस्तू घ्याव्या लागतील. दोन वस्तू घेणारास ४ आणे, टपालखर्च माफ. एकवार अनुभवानेंच पूर्ण खात्री होईल. माहितीखर्डा सोबत पाठविला जाईल. व्ही. पी.नें. पाठवूं. पत्ता स्पष्ट व पूर्ण लिहावा.

विष्णुबोवा सिद्धमांत्रिक.

४] **पत्ता**—पोष्ट हर्णे, जिल्हा रत्नागिरी.

अमूल्यपुस्तकांची दुर्मिळ संधी.

अभिनवस्त्रीचरित्र—साहसी स्त्रियांच्या मनोरंजक गोष्टी. किं० १ रु.

श्रीमंत नारायणरावपेशवे ह्यांच्या मृत्युचा फार्स. किं० ८८.

वसंतविलास कादंबरी. किं० ८६.

इंद्रजाल तंत्र मंत्र यंत्र. किं० ८६.

चतुर लोकांच्या नकला. किं० ८६.

कजाग सासू. प्रत्येक सासूसुनेला एक वेळ वाचून दाखवावें. किं० ८४.

सूचना—हीं २८१४ चीं ६ पुस्तकें जुलई अखेरपर्यंत घेणारास १८६ स देऊन शिवाय चार आण्यांचें पुस्तक बक्षीस मिळेल. ट. ख. नि.

पत्ता—आर. सि. हिरेमठ आणि कंपनी मु. खानापूर जि. बेळगांव.

केरळकोकिळाच्या वर्गणीदारांस रु. १८१४ ट. ख. ८४.

वैद्यकशार्ङ्गधरसंहिता.

नवीन मराठी भाषांतरसहित.

पृष्ठसंख्या-५२७-किं. रु. २॥ ट. ख. ।

" अर्वाचीन सर्व ग्रंथांमध्यें शार्ङ्गधरसंहिता अत्युत्तम होय. ह्यामध्यें सर्व विषयांची व्यवस्था जशी अनुक्रमानें लावलेली आहे तशी दुसऱ्या कोणत्याही ग्रंथांत केलेली आढळत नाहीं. ह्या ग्रंथांत जे प्रयोग लिहिले आहेत ते सारे अनुभव घेऊन त्यांचें यथार्थ गुणवर्णन केलें आहे. ह्यांत इतर ग्रंथांप्रमाणें औषधांची अतिशयोक्ति नाहीं. अशा प्रकारचा सर्वोत्तम लोकप्रिय ग्रंथ असून त्याच्या प्राकृत भाषांतरामध्यें-प्राकृत टीकाकाराचे स्वतः असोत किंवा लेखकाचे असोत जे प्रमाद झालेले आहेत त्यांची दुरुस्ति छापणारांनीं आजपर्यंत केलेली नाहीं. कित्येकांनीं तर कांहीं बाहेरचा ग्रंथच ह्यांत घुसडून दिला आहे. हे सर्व घोंटाळे काढून करवेल तितकें शुद्ध व सरळ भाषांतर केलें असून विषयानुक्रमणिकेशिवाय आजपर्यंत न झालेली रोगानुक्रमणिका दिली आहे. त्यामुळें कोणत्या रोगावर काय औषध हें झटकन् पाहिजे त्यास समजतें. प्रसिद्ध प्रसिद्ध अशा वैद्यांच्या सूचनेप्रमाणें ह्यांत शक्य ती सुधारणा केली आहे. ठहा. पे.नें पाठवूं.

जनार्दन महादेव गुर्जर, रामवाडी-मुंबई.

ल.ना.पंडित,पार्ले.

आगस्ट. (वर्षांची वर्गणी १८३ ट. खर्चासह. फुटकळ अंकास ७४.) १८९६.

केरळकोकिळ.

वर्षारंभ जानेवारी.

पु० १०] [अं० ८

विधिरेव विशेषगर्हणीयः करट त्वं रट कस्तवापराधः ॥
सहकारतरौ चकार यस्ते सहवासं सरलेन कोकिलेन ॥१॥

जनार्दन महादेव गुर्जर बुकसेलर ॲण्ड पब्लिशर
रामवाडी
मुंबई.

सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत.

VAIDYA. वैद्य.

ह्या पुस्तकांतील लेख कोची (मलबार) येथें तयार होऊन, ते मुंबई येथें छापून प्रसिद्ध होतात.

विषयांची अनुक्रमणिका.

	पृष्ठ.		पृष्ठ.
जपानचा बाहशहा. ...	१६९	पत्रव्यवहार.	१८२
लोकोत्तरचमत्कार (सवाई राक्षस).	१७७	पुस्तकपरीक्षा (करवीरस्थ महिलेकडून). ...	१८६

पुस्तकांची पोंच.

१ इंदूरसंस्थान भाग ३ रा. २ भ्रमनिरसन भाग २. ३ ठाणें मराठी ग्रंथसंग्रहालयाचा तिसरा वार्षिक रिपोर्ट. ४ कापडावरील जकातिचा इतीहास. ५ अज्ञान खेडें; निश्चय मोठा. ६ हें साध्य आहे काय? ७ दुर्व्यसननिषेधाष्टक. ८ डेक्कनव्हर्न्याक्युलर ट्रान्सलेशनसोसायटीचा वार्षिक रिपोर्ट. ९ एकादश राष्ट्रीयमहोत्सवाचें कवितावद्ध वर्णन. १० कवायतीचें पुस्तक.

हीं पुस्तकें पाठविणारांचे फार आभार आहेत.

गोवें मडगांव–'आपला एक वाचक'–आपलें पत्र पोंचलें. आपला वैद्यक-विषयावरील विस्तृतलेख पाठवावा. मागाहून सर्व गोष्टींचा विचार करूं.

—ए० के० को०—

केरळकोकिळच्या वर्गणीदारांसच किं. रु. २ ट. ख. ४८.
(नंबर कळवून वर्गणीदारांनीं मागणी करावी.)

श्रीगुरुचरित्र.

किं. रु. ३ ट. ख. ४८.

भाविक लोकांजवळील बऱ्याच प्रतींवरून व जागृतस्थानाच्या पोटभेदांस अनुसरून तयार केलें असून त्यांत अध्याय २६ यांतील **वेदरचना** व अध्याय ३६–३७ यांतील **कर्ममार्ग** अगदीं चरित्रकाराच्या मूळाप्रमाणें शुद्ध केले आहेत. वृद्धांसही वाचण्यास फारसा त्रास पडणार नाहीं असा टाईप मोठा आहे. प्रत्येक अध्यायास चित्रें आहेत. व्हा. पे. पाठवूं.

॥ ओं नमः श्रीरामचंद्राय ॥

आर्यमहौषधालय मु० आंजलें.

या अत्यंत खात्रीच्या औषधाचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यांस कदाचित् आला नाहीं तर पैसे परत देऊंच व त्याशिवाय त्यांच्या आरोग्यार्थ एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकटच देऊं.

मदनविलासामृतसंजीविनी.

वीर्यस्तंभक, रक्तशोधक, अत्यंत कामोत्तेजक, चित्तोत्साहक, बुद्धि-कांतिवर्धक व धातुपौष्टिक सुवर्णमाक्षिकमौक्तिक कस्तूरीमिश्र अपूर्व गुटिका.

१. शरीराची उत्तम सुधारणा करणारीं अत्यंत महत्वाचीं जीं औषधें आहेत, त्यांत या गुटिका अगदीं पहिल्या प्रतीच्या ठरल्यामुळें यांचे अपूर्व गुण थोड्याच काळांत या देशाच्या सर्वभागीं व त्यांच्या आसमंतात् अतिशय पसरले आहेत. या सेवन केल्यानें नपुंसकत्व, इंद्रियशिथिलता, कडकी, जीर्णज्वर, अग्निमांद्य, अशक्तता, स्वप्नजन्य किंवा इतर धातुपात, छातींतील रोग, मेंदूचे विकार, पांडुरोग, क्षय, मूत्रसंकोच किंवा मूत्रातिरेक, कटिशूल, वातरोग, उपदंशसंबंधी मुरलेले विकार, हात, पाय, मूत्रमार्ग, व शरीर यांचा दाह, व अरुचि, इ० अनेक विकार कितीही वयाच्या मनुष्यास नवीन किंवा जुनाट असले तरी खात्रीनें बरे होतात. धातु व रक्त यांची शुद्धि व वृद्धि होऊन रक्तदूषणजन्य अनेक रोग हटकून बरे होतात. वीर्यस्तंभन, व कामोद्दीपन होऊन अग्नि व शक्ति भरपूर वाढते. स्त्रियांची धुपणी व संततीस अपायकारक जे गर्भाशयस्थ रोग त्यांचें त्वरित निवारण होऊन कांति, स्मरणशक्ति व बुद्धि वाढते. ज्यांस शारीरिक व मानसिक श्रम फार पडतात, त्या सर्वांच्या आंगीं यांनीं अतिशय शक्ति येऊन मनास उत्साह प्राप्त होतो, सुस्ती जाते. ज्यांस दूध व जडान्न पचत नाहीं त्यांस तें भरपूर पचूं लागतें, कोष्ठशुद्धि होते. या अप्रतिम गुटिका अत्यंत शोधानें केल्या असून त्यांच्या अप्रतिम गुणका-

रित्वाबद्दल हजारों सर्टिफिकिटें मिळालीं व नित्य मिळत आहेत. यांत अपायकारक पदार्थ बिलकूल नाहींत. वरील सर्व रोग जाऊन उत्तम गुण प्राप्त होण्यास या गुटिकांसारखें अप्रतिम औषधच नाहीं असें पूर्ण अनुभवावरून स्पष्ट ह्मणतों. यांस पथ्यसेवनाची गरज नसतां या पाहिजे त्या दिवसांत घेतल्या तरी इटकून गुण करितात. यामुळें त्यांचा अतिशय खप सुरू आहे. गोळ्या रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम सहा रुपयांच्या किंवा त्यांहून कितीही जास्त गोळ्या घेणारांस बंगीचा सर्व टपालखर्च माफ आहे. त्यांचे आंत घेणारांस मात्र तो वेगळा सहा आणे पडेल. एकदम ३२ गोळ्यांस १ रु. ७० गोळ्यांस २ रु. १६० गोळ्यांस ४ रु. २६० गोळ्यांस ६ रु. ५२० गोळ्यांस १० रु.

थंडगार नेत्रांजन—हें अंजन स्तुतीस अत्यंत पात्र आहे, हें सतत दहा वर्षांच्या पूर्ण अनुभवानें कळवितों. यानें डोळ्यांचे साधारण विकार तर सहजच, परंतु दृष्टीचा समूळ नाश करणारे, तिमिरांध्य, वडस, बिंदु, फुलें, कांच, सारा, भोर, गळती, खुपऱ्या, जळजळ, कंड, फूट, चिकटा, ठणका व लाली इ० अनेक विकार, तत्संबंधी मस्तकशूलादि विकारांसह कितीही वयाच्या मनुष्यास कोणत्याही कारणांनीं प्राप्त झालेले नवीन किंवा जुनाट असलें तरी नाजूक रीतीनें कोणतीही इजा न होतां बरे होतात. दृष्टि तीव्र व थंडगार राहते. हें चांगल्या दृष्टीच्या मनुष्यांनींही डोळ्यांत घातल्यास वरील विकार त्यांस बिलकूल होणार नाहींत. लहान मुलांस तर हें अत्यंत उपयोगी आहे. २ तो० ड० १॥ रुपया.

विशेष सूचना.—अलीकडे आंजर्ले व मुर्डी वगैरे गांवांतील औषधांच्या बऱ्याच जाहिराती सुरू आहेत व त्यांपैकीं कांहीं जाहिरातींत ज्या सह्या आहेत त्या बहुतेक आमच्याच नांवासारख्या भासण्याचा विशेष संभव आहे. तरी अशा लोकांशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं हें अवश्य लक्षांत ठेवून आमचीं औषधें **"कृष्णशास्त्री बिवलकर वैद्य. मु० आंजर्ले ता० दापोली जि० रत्नागिरी."** याच पत्त्यावर रोखीनें किंवा व्ही.पी.नें मागवावींत. अनुपानपत्रक सोबत असतेंच.

२–१२]

मिक्याडो

अथवा

जपानचे बादशहा.



".....But if a King,
more wise, more learned, more everything."*

POPE.

* "..... परंतु राजा ह्मटलें कीं शहाणपण, विद्वत्ता इत्यादि सर्वांचा कळस झाला ह्मणून समजावें." हें वाक्य 'पोप' कवीनें केवळ विनोदानें उच्चारलें आहे खरें, तथापि खरोखर तसा सद्गुणी असेल तोच 'राजा' ह्या पदवीला खरोखर योग्य होईल.

जेथें जेथें सत्ता अधिक असते तेथें तेथें कर्तव्याचा बोजा अधिकच असतो. पण साधारणतः लोकांना सत्ता हवी असते, आणि कर्तव्याचा बोजा नको असतो. ह्मणजे 'दूध देखलें पण बडगा देखला नाहीं' अशांतलीच अवस्था ह्मणावयाची. बाप किंवा आई होणें फार आवडतें, पण पुढें मुलांची संगोपना कशी करावी, अथवा त्यांस शिक्षण कसें द्यावें ह्याकडे कोणाचेंच लक्ष्य नसतें. पुष्कळ पुरुषांना वरत्व प्राप्त झालें ह्मणजे मोठें भूषण वाटत असतें. पण पुढें आपल्या स्त्रीस कसें वागवावें अथवा शिक्षण कसें द्यावें, ह्मणजे आपणास व तीस सुख लागून ह्या संसारयात्रेंतून सहज पार पडतां येईल, ह्याचा विचार कोणाच्या मनांत कधीं येत असेल किंवा नाहीं ह्याची शंकाच आहे. कामदार व्हावें असें पुष्कळांस वाटतें, पण हाताखालच्या नोकरांस कसें वागविलें असतां ते खूष राहून आपली कामगिरी उत्तम रीतीनें बजावतील, ह्याचा लवमात्रही कोणी विचार करीत नसतील. ह्यांपैकीं पहिले दोन संबंध बहुधा प्रत्येकास असतातच, पण, तिसरा फारच थोड्यांना असतो. वर सांगितलेली प्रवृत्ति (ह्मणजे कर्तव्याचा बोजा नकोसा असणें व सत्ता हवीशी असणें) जर आह्मां मानवांत नसती, तर 'जुल्म' हा शब्द बियास सुद्धां दृष्टीस पडला नसता. दररोजच्या संबंधांतही कर्तव्य बजावणें इतकें कठीण आहे कीं, लोक होईल तितकी त्याची टाळाटाळ करतात. तर, राजानें आपलें कर्तव्य उत्तम रीतीनें बजाविणें झाल्यास त्याला किती ज्ञान, किती चौकसपणा, व किती व्यवहारदाक्षिण्य वगैरे गुण लागत असतील, हें शिरोलेखांतील **'पोप'** साहेबांच्या सूत्रावरून बरेंच लक्ष्यांत येईल. ह्यांपैकीं एकादा गुण थोड्या अंशानें जरी कमी असला, तरी किती घोंटाळा होतो, व राजाला आणि प्रजेलाही किती त्रास सोसावा लागतो हें इतिहासवाचकांस सांगणें नलगे. **युरोपांत** राज्याचें जूं बहुधा प्रजेवरच तोललें असतें. ह्यामुळें राष्ट्राचें हित किंवा अहित हें राजावर फारसें अवलंबून नसतें. परंतु हिकडील–ह्मणजे **एशिया**खंडांतील राष्ट्रांत राजसत्तात्मक पद्धतीच चालू आहे व होती. प्रजासत्तात्मक पद्धति मुळीं माहीतच नव्हती असें ह्मणण्यास हरकत नाहीं. निदान हिंदुस्थानांत तरी बहुतेक राजपद्धतीच चालू होती. आतां ह्यांपैकीं चांगली कोणती ह्याबद्दल आह्मी

आज येथें विवेचन करीत बसत नाहीं तथापि हीं दोन्हींही तत्वें एकत्र असणें बरें. एकमेकांचा विचार हा सर्व गोष्टीस लागतोच. कित्येक वेळां एकाच्या हातीं सर्व सत्ता दिल्यानेंच सर्व कांहीं नीट होतें. एखाद्या अवघड प्रसंगीं उपाय सुचविणें हें सर्वांचें काम. पण त्यांतील चांगला कोणता हें सर्वांनुमतें ठरल्यावर तो अमलांत आणण्यास मात्र एक सत्ताधारी मनुष्य लागतो. हें तत्त्व (ह्या दोन्ही पद्धति कांहीं प्रमाणानें एकत्र असणें हें) माहित नसल्यामुळें **रोमन*** लोकांचें येवढें थोरले वैभव नष्ट झालें. वर सांगितलेंच आहे कीं, आमच्या हिंदुस्थान देशांत फक्त राजसत्ताक पद्धति होती. पण ते राजे लहानपणापासून आपलें खरें कर्तव्य कोणतें, आपला व प्रजेचा संबंध काय, इत्यादि सर्व, कोणत्या तरी चांगल्या गुरूजवळ शिकत असत. हे गुरु बहुधा ऋषींसारखे असत. त्यांची सत्यप्रियता व निरपेक्षता सांगावयास नकोच. ह्यामुळेंच पुराणांतरीं, किंवा ऐतिहासिक कालांतही प्रजेची राजासंबंधानें कुरकुर ऐकिवांत नाहीं. सध्यांच्या **मिक्याडोला**–ह्मणजे जपानच्या बादशहाला–अशा प्रकारचे कोणी गुरु भेटले होते किंवा कसें, हें कांहीं कळत नाहीं. तरी पण ह्यांचें चरित्र–कर्तबगारी–वाचल्यावर, ते आपल्या कर्तव्याला किती जागे आहेत हें सहज कळून येतें. हल्लीं **जपानांत** इंग्लडच्या धर्तीवर जी राज्यपद्धति चालू आहे, तिचे उत्पादक हेच होत.

खरोखर पाहूं गेलें तर, **जपान** देश तो केवढा? साऱ्या भूगोलांत–नव्हे त्याच्या अर्धांत पाहूनही विचार केला–तुलना केली–तर एखाद्या सरोवरांत पडलेली केवळ बाभळीची शेंग ह्मटलें तरी शोभेल. बेटांबेटांची वस्ती; ज्वालामुखींचा तडाका; क्षेत्रफळ अवघें एक लक्ष मैल; लोकवस्ती चार कोटी. ह्मणजे सरासरी आमचा मद्रासइलाखा शोभेल. पण त्याच चिमुकल्या देशानें, पंचावन कोटींची वस्ती करून राहणाऱ्या, बाराशें मैलांचा कोट करून बसणाऱ्या, नामांकित **चीन** देशाला जर्जर करून सोडलें; हार खावयास लावली; आपला प्रभाव गाजविला; मर्दुमकी दाखवून दिली; पृथ्वीवरील अग्रणी राष्ट्रांत आपलें

* सीझर, पांपी वगैरे मोठमोठ्या नायकांची उचंबळणारी महत्त्वाकांक्षा लगामांत कशी धरावी, ह्याचा विचार सोडून त्यांनीं सीझर प्रबळ झाला असें पाहून त्यासच ठार मारलें. खरोखर सीझरकडून आणखी पुष्कळ चांगलीं कृत्यें झालीं असतीं.

नांव घातलें. आपल्या सल्लामसलतीशिवाय कोणतेंही जगांतील राजकारण होऊं नये अशी नुकतीच कीर्ति संपादन केली. तेव्हां त्याची शामत काय सांगावी? त्याची करामत किती वर्णन करावी? आणि त्याचे पवाडे किती गावेत?

ही इतकी सुधारणा व देशाभिमानाचें वारें अवघें चाळीस पन्नास वर्षांतील आहे. आणि हें सर्व फल हल्लींच्या तेथील **मिक्याडो**च्या कर्तबगारीचें आहे. ह्यांचें नांव **'मित्सुहितो'** असें आहे. व **'मिक्याडो'** ही त्यांची पदवी आहे. **जपानी** भाषेंत तिचा अर्थ 'भव्य दरवाजा' असा आहे. हा शब्द 'बादशहा' ह्या अर्थी योजितात. हे **'मिक्याडो'** इ० स० १८६७ मध्यें गादीवर बसले. आणि तेव्हांपासूनच **जपान**चा उदय झाला. पहिलें मन्वंतर सारें बदलून जाऊन 'कीर्ति, जयश्रीनें' त्यांस माळ घातली. आमच्या राजेलोकांत 'मराठमोळा' फक्त बायकांमध्येंच आहे. पण **जपानां**त ह्यापूर्वी तो पुरुषांत होता! **'मिक्याडो'** ला ते लोक केवळ साक्षात् देव आहे असें मानीत. **मिक्याडो**चा पाय कधीं जमिनीस लागावयाचा नाहीं, कीं तोंड दृष्टीस पडावयाचें नाहीं. राज्याचा सर्व कारभार **'शोगून'** वंशांतील पुरुषांच्या हातीं असे. **मिक्याडो**स राज्यकारभार चालविणें, किंवा त्यासंबंधीं माहिती असणें, हें तर लांबच, पण त्याच्या दर्शनाचा लाभ सुद्धां मुख्य प्रधान व राणी, ह्यांशिवाय कोणत्याही मनुष्यास घडत नसे.

पण ह्या वर्षाच्या सुमारास कांहीं **जपानी** होतकरू लोक **युरोप** व **अमेरिके**मध्यें गेले होते. त्यांनीं **मिक्याडो**स 'युरोपांतील व अमेरिकेंतील लोक फार सुधारलेले आहेत. ते आपणांस पुष्कळ प्रकारें उपयोगीं पडतील. त्यांच्या सारखी आपल्या देशांतही सुधारणा होणें अत्यंत इष्ट आहे.' अशा मजकुरांचीं पत्रें पाठविलीं.

चांगली सूचना करणारे लोक जगामध्यें बरेच आढळतील. पण ती मान्य करणारे मात्र अतिशय विरळा. त्यांतून राजाविषयीं तर बोलावयासच नको. पण ह्या नियमास **मिक्याडो** केवळ अपवादासारखेच झाले ह्मटलें तरी चालेल. ही सूचना त्यांच्या अंतःकरणांत पूर्णपणें बिंबून गेली. त्यांनीं आपला गोषा एकदम झुगारून दिला, आणि एखाद्या मुत्सद्याप्रमाणें राज्याच्या उत्कर्षाचा विचार करूं लागले. राजदर्शनास पा-

हिजे त्याला मोकळीक दिली. आगगाडी व तारायंत्र सुरू केलें. पण एकटा राजा करून करून तें किती करणार? त्यास प्रजेचें सहाय्यही अवश्य पाहिजे. पण सुदैवानें त्यास प्रजाही तशीच एकनिष्ठ मिळाली. एका मोठ्या सरदाराच्या सांगण्यावरून **'शोगून'** वंशांतील प्रधानानें आपली सर्व सत्ता मोठ्या खुषीनें **'मिक्याडो'**च्या हातांत दिली. हें औदार्य किंवा मनाचा सरळपणा–कांहीं सामान्य नव्हे. ह्याच वर्षापासून त्यांनीं नवा शक सुरू केला. त्यास **'मिजी'** वर्ष असें ह्मणतात. इ. स. १८७३ पासून युरोपियन पद्धतीवर नवीन पंचांग सुरू केलें. **'मिजी'** वर्षापासून **जपान**चा मोठ्या उलाढालीचा काल होय. **'मिजी'** ह्याचा अर्थ 'दिव्यराज्य' असा आहे. **मिजी**च्या तेविसाव्या वर्षी–ह्मणजे इ. स. १८९० त, **मिक्याडो**नें आपल्या पार्लमेंटाची स्थापना केली. पार्लमेंटाची तयारी पूर्वीपासूनच चालली होती. इंग्रजी शाळा आधींपासूनच सुरू होत्या. त्यामुळें चोहोंकडे शिक्षणाचा प्रसार तेव्हांच झाला. प्रथमतः तीन मुख्य प्रधान व एक सभा ह्यांच्याच हातांत सर्व राज्यसूत्रें होतीं, पण पुढें–इ. स. १८७९ त–निरनिराळ्या प्रांतांवरील गव्हरनरांस बोलावून त्यांचीं निरनिराळ्या विषयांवर मतें घेतलीं. नंतर तीन वर्षानंतर प्रांतिक सभा स्थापन होऊन तिच्यांतील सभासद, प्रांतांतील कर, व इतर बाबतींत आपआपलीं मतें देऊं लागले. ह्या सभेंतील सभासदांस फक्त लिहितां वाचतां आलें पाहिजे, व प्रत्येक असामी पांच **डालर्स** सारा देत असला पाहिजे असा नियम केला. ह्यानंतर पार्लमेंट स्थापित झालें. खरें ह्मटलें तर, **शोगून** वंशाकडून सर्व सत्ता **मिक्याडो**च्या हातांत आलेली होती, तेव्हां ते सर्व राज्याचे मुखत्यार होते, हें उघड आहे. तथापि सध्यांचे **मिक्याडो** हे चांगल्या स्वभावाचे, व लोकहिततत्पर असल्यामुळें त्यांनीं आत्मसुखाकडे व पोकळ अभिमानाकडे लक्ष्य न देतां प्रजासत्ताक पद्धति सुरू केली. ह्या पार्लमेंटांत ब्रिटिश पार्लमेंटप्रमाणेंच एक 'अप्पर हौस' व दुसरा 'लोअर हौस' असे दोन विभाग आहेत. पहिल्यांत कायमचे सभासद असून त्यांत मोठमोठे सरदार, मोठमोठे कर देणारे, राजघराण्यांतील पुरुष, विद्वान्, कामदार मिळून एकंदर २५२ लोक असतात. दुसऱ्यांत एकंदर ३०० सभासद असून त्यांचें वय निदान ३० वर्षांचें असावेंच लागतें. प्रत्येक चार वर्षांनीं ह्या दुसऱ्या वि-

भागांतील सभासद नवे होतात. ह्यांतील प्रत्येक सभासद निदान १९ **डालर्स** तरी कराच्या रूपानें देतो. दुसऱ्या बैठकीस, सरकारच्या हरएक प्रश्नास–मग तो प्रश्न चांगला असो कीं वाईट असो–हरकत येऊं लागली, ह्मणून **मिक्याडो**नीं पहिली सभा बरखास्त करून, लोकांस नवीन सभासद निवडण्यास सांगितलें. ह्या निवडणूकीच्या वेळीं बरीच धांदल उडून थोडीशी मारामारीही झाली. पण हा आरंभच होता, ह्मणून त्याबद्दल विशेष नवल नाहीं. खरोखर हल्लींच्या **मिक्याडो**सारखे जर चतुर बादशहा नसते, तर लोक अज्ञानी असल्यामुळें मोठा दंगा उडाला असता. सरकारच्या कृत्यांवर वर्तमानपत्रांत भलभलतीं विधानें केल्यास, बरीच जबर शिक्षा होते. (बरोबरच आहे. स्वराज्यांत कोणताही राजा बुद्धचा वाईट कृत्य करणार नाहीं.) सन १८८९ मध्यें सुमारें ४३ वर्तमानपत्रें कांहीं दिवस बंद करण्यांत आलीं होतीं. सन १८९० त एका वर्तमानपत्रकर्त्यास जवळजवळ साडेचार वर्षांची सजा झाली. **जर्मनी** व **फ्रान्स** ह्यांचें कायद्यांमध्यें **जपान**, अनुकरण करतें. इंग्लिशांचें फारच थोडें.

प्रत्येक वीस वर्षांच्या वरच्या मनुष्यानें निदान तीन वर्षें तरी, लष्करांत चाकरी केलीच पाहिजे असा ठराव आहे. ही मंडळी पांच वर्षांनीं एकदां देखरेखेखालीं एकत्र जमते, व त्यांतील निवडक मंडळींचें एक मोठें सैन्य होतें. त्यास **'न्याशनल गार्डस्'** असें ह्मणतात. हें अति महत्वाच्या प्रसंगाशिवाय कधीं बाहेर येत नाहीं. हें सैन्य तयार करण्याकरितां, **फ्रान्स** व **जर्मनी**मधून चांगले चांगले लष्करी लोक मागविले आहेत. ह्यांचा पोषाख अगदीं युरोपियन लष्करी पोषाखासारखाच असतो.

व्यापारही मोठ्या झपाट्यानें चालू आहे. सन१८८९त६६००००० **येन** किंमतीचा (येन ह्मणजे आपलेहिकडील जवळजवळ दोन रुपये होतात.) माल बाहेरून आला. व ७०,०००,००० **येन** किंमतीचा माल बाहेर गेला.

हल्लींचे **मिक्याडो** गादीवर बसतांच ह्यांनीं इंग्लिश, जर्मन व अमेरिकन प्रोफेसर नेमून कॉलेजें–विश्वविद्यालयें–स्थापन केलीं. सन १८८८ मध्यें एकंदर शाळा व कॉलेजें मिळून २७, ९२३ होतीं. त्यांत६५२९१ पुरुष व ३७४२ स्त्रिया शिकवीत होत्या व २१,६४,९६३ मुलें, आणि

८८९,१७९ मुली शिकत होत्या. परदेशांतील २४७ प्रोफेसर काम करीत होते. शाळांतून इंग्लिश भाषा शिकवितात.

हिंदुस्थानांतल्याप्रमाणें जपानांतही जातिभेद आहेत. १ (सर्वांत श्रेष्ठ) **स्यामुराई,** अथवा लष्करी लोक. २ जमीनदार. ३ कारागीर. ४ दुकानदार; हे तिकडील चतुर्वर्ण. परंतु सन १८६८ पासून हें जातीचें बंड कायद्यांत मुळींच धरीत नाहींत. सन १८७१ सालीं जपानांतील अगदीं हलक्या प्रतीच्या लोकांस सुद्धां नगरवासी लोकांचे सर्व हक्क मिळाले. ही सर्व सुधारणा **मिक्याडो** ह्यांनींच केली आहे. कारण, तेथील पार्लमेंट अद्याप बाल्यावस्थेंत आहे. ह्यांस पाश्चात्य शिक्षणही अद्याप ह्मणण्यासारखें मिळालेलें नाहीं. फक्त पाश्चात्य राष्ट्रें सुधारलीं आहेत, तसें आपलें राष्ट्र व्हावें, येवढ्याच इच्छेनें त्यांनीं इतकी सुधारणा केली. आपल्या राष्ट्राची किंवा प्रजेची उन्नति व्हावी अशी प्रथमतः राजांच्या मनांत उत्कट इच्छा असते अशी थोडीच. त्यांतूनही असलीच तर, खरी सुधारणा कोणती व तिचे मार्ग कोणते हें कळणें फार कठीण पडतें. तितकेंही सर्व होऊन प्रजा जर सद्गुणी, आज्ञाधारक नसेल, तर सगळेंच मुसळ केरांत जातें. कोणतेंही काम एकजुटीनें करणें, सुधारणा झटली ह्मणजे मग युरोपांतून येवो कीं कोठूनही येवो, जातिभेद किंवा चालरीत न पाहतां झटकर अमलांत आणणें, माफक स्त्रीशिक्षण देणें, हे जपानी लोकांचे मुख्य गुण असून त्याच गुणांनीं त्यांची सुधारणा झपाट्यानें चालली आहे. शिवाय, ते लोक मातापितरांना व धन्याला फारच मान देतात. हे गुण पूर्णपणें आंगात भिनल्याशिवाय खरी सुधारणा कधींही व्हावयाची नाहीं, हें पक्कें मनांत बागविलें पाहिजे.

सुधारणेसाठीं ते लोक किती नुकसान सोसण्यास तयार असतात, ह्याचें एकच उदाहरण देतों. नवीन तऱ्हेची राज्यपद्धति सुरू करण्याचा जेव्हां **मिक्याडो**नीं ठराव केला, तेव्हां राज्याचे निरनिराळे विभाग असणें चांगलें नव्हे असें पाहून, मोठमोठ्या सरदारांनीं आपआपलीं लहान लहान संस्थानें, आपण होऊन सरकारच्या ताब्यांत दिलीं. अशा तऱ्हेचें उदाहरण साऱ्या जगांत सांपडणें कठीण, मग हिंदुस्थानांत तर

पहावयासच नको. शिवाय, सर्वांत ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, नीतिमत्ता संरक्षण करण्याकडे **मिक्याडो**चें लक्ष्य अगदीं पहिल्या प्रतीचें आहे. नुकताच **फोर्मोसा** बेटांतील जे जपानी लोक तंबाकू ओढतील, अथवा गांजा ओढतील, त्यांस देहांतशिक्षा व्हावी असा ठराव झाला आहे.

हल्लींच्या **मिक्याडो**ची जेवढी माहिती उपलब्ध झाली तेवढी दिली आहे. पण तेवढीवरूनही आह्मां हिंदुस्थानवासी लोकांस पुष्कळ बोध घेण्यासारखा आहे. सुधारणा करण्याचीं खरीं साधनें कोणतीं, हें वरील हकीगतीवरून उत्तम प्रकारें कळून येतें. प्रथमतः सुधारणेचें महत्व आपल्या मनांत बिंबलें पाहिजे. ह्मणजे सुधारणेच्या पायांत पाहिजे तें नुकसान सोसण्यास एका पायावर मनुष्य तयार होतें. दुसरें असें कीं, नीतिमत्ता मनांत पूर्णपणें ठसली, ह्मणजे खऱ्या सुधारणेचा मार्ग कळतो. नाहीं तर सुधारणेची दुर्धारणा होऊन बसावयाची !

हें झाल्यावर हरएक प्रकारचें शास्त्रीय व व्यावहारिक ज्ञान जितकें होईल तितकें सर्व लोकांत पसरण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ह्या तिन्ही गोष्टी एकसमयावच्छेदेंकरून—पण फार बेताबातानें—सुरू केल्या पाहिजेत. हिकडे हल्लींच्या आमच्या सुधारक ह्मणविणारांनीं विशेष लक्ष्य द्यावें.

वरच्या हकीगतीवरून आणखी एक गोष्ट लक्ष्यांत येते. ती ही की, स्वराज्य असलें ह्मणजे सुधारणा अतिशय झपाट्यानें होते. आमच्या देशावर इंग्रज लोक राज्य करूं लागून साठाच्या वर वर्षें होऊन गेलीं. तरी, पूर्वी आह्मी जपानपेक्षां चांगल्या—सुधारलेल्या—स्थितींत असतांही, अद्याप जपानाच्या एक शतांशही सुधारणा आमच्यांत झाली नाहीं. ही खेदाची गोष्ट नव्हे का ? आणि जपानास अद्याप पुर्तीं चाळीस वर्षें सुद्धां झालीं नाहींत. ह्यावरून जपानासारखी सुधारणा फक्त आमच्या एतद्देशीय संस्थानांतच होणें शक्य आहे. अर्थात आमच्या प्रत्येक संस्थानिकानें हल्लींच्या मिक्याडोचा कित्ता उचलावा. आमच्या संस्थानांत बडोद्यानें ह्या कामांत उत्तम पुढाकार घेतला आहे. म्हैसूरच्या माजी राजबिंड्यावर आमच्या कमनशिबानें अकालिक मृत्यूनें झडप घातली, त्यामुळें, आमच्या आशेला ज्या कळ्या फुटल्या होत्या, त्या उमलण्याच्या

आधींच खुडल्यासारख्या झाल्या. इंदूरचा बोभाटा तर सर्वतोमुखीं झाला आहे. तरी लवकरच शांतता होऊन तें चांगलें सुधरेल अशी उत्कट इच्छा आहे. ग्वाल्हेर व कोल्हापूर ह्यांचा तर 'श्रीगणेशाच' आहे ह्मटलें तरी चालेल. निजामसरकारांत शांतता आहे तरी, ह्मणण्यासारखी सुधारणा दिसत नाहीं. ह्मणून प्रत्येक संस्थानिकानें व्यापारधंद्यांत तूर्तच्या काळीं जपानचा कित्ता पुढें ठेवून, त्यांतील वळण उचलण्याकडे धोरण ठेवणें हेंच इष्ट दिसतें.

लोकोत्तर चमत्कार.

सवाई राक्षस.

एखादा मनुष्य वाजवीपेक्षां फाजील खादाड, कच्चें अन्न किंवा मांस खाणारा, अबरसबर पदार्थांवर ताव देणारा, असा दृष्टीस पडला ह्मणजे 'तो काय राक्षस आहे' असें ह्मणण्याचा प्रघात आहे. पण सजीव प्राणी; मनुष्याचा प्राण घेणारीं शस्त्रें; जर मटामट गिळून टाकणारा असला, तर त्याला काय ह्मणावें? 'सवाई राक्षस' हेंच नांव योग्य. अशाच कांहीं अद्भुत व्यक्तींचें आज वर्णन करावयाचें आहे. पूर्वी घड्याळ खाणाऱ्या मनुष्याचें 'कोकिळा' मध्येंच एक मोठें मजेचें वर्णन येऊन गेलें आहे. पण त्याहून आजचा वृत्तांत पुष्कळ भिन्न आहे. त्यावरून मनुष्याची अद्भुत शक्ति, संवय, आणि विक्षिप्तपणा ह्यांचें उत्कृष्ट दिग्दर्शन होतें.

'विटनबर्ग' येथें डाक्टर भोमन ह्या नांवाचा एक विद्वान् गृहस्थ होऊन गेला. त्यानें आपल्या एका पुस्तकांत एका खादाड मनुष्याची गोष्ट लिहिली आहे. त्या माणसानें एके वेळीं कित्येक मंडळीसमक्ष एक कच्चें मेंढरूं, व एक डुकराचें जिवंत पोर बसल्या बैठकीस पार केलें. आणि मुखशुद्धीस वीस पौंड खारका पार केल्या. आणि त्याहि बियासकट! हा

* ह्या संबंधानें खरी व राजकीयन्यायदृष्ट्या अशी दुसऱ्या बाजूची हकीकत प्रसिद्ध करण्याविषयीं एका कारस्थानी विद्वानानें मनावर घेतल्याचें समजतें, त्यांत त्यास यश आल्यास ह्या बोभाटांत पुष्कळच अंश मत्सराचे आहेत हें सिद्ध करून दाखवितां येईल असेंही त्यांचे ह्मणणें असल्याचें कळतें.

आहार संपला तेव्हां मंडळीस वाटलें कीं, आतां ह्या राजेश्रीची भूक तृप्त झाली असावी. ह्मणून त्यांतील कितीएक मंडळींनीं पुन्हा त्यास पैजेवर घातलें. तेव्हां लगेच त्यानें दोन बुशील बोरें, सहा खापराचीं मडकीं, चार ओंजळी चुलींतल्या ढलप्या, एका मोठ्या बाटलीच्या काचा, चार पांच मुठी खडे, एक धनगराचें अलगुज, दोन उंदीर, पंखांसुद्धां एक पक्षी इतक्यांचा पुन्हां चट्टामट्टा उडविला! पण इतक्यानेंच झालें नाहीं. विक्षिप्त मनुष्याची गांठ पडली, ह्मणजे टवाळ मंडळी काय विचारतां? ती त्यास पुन्हां घोड्यावर चढविते. त्याप्रमाणें ह्या मनुष्यासही लोकांनीं चढीस घातलें. तेव्हां फिरून त्यानें बचकभर धूळ, एक जस्ताची दौत, तिच्यांतील पेन, चाकू, आणि वाळूदाणी सुद्धां खाऊन पार केली!! ह्या गोष्टी सांगावांगीच्या नव्हेत, तर वर निर्दिष्ट केलेल्या डाक्टरांनीं प्रत्यक्ष पाहिलेल्या आहेत. आतां ज्यांना विश्वासाचें स्थळच जगांत मिळत नाहीं, अशा भगवद्भक्तांची गोष्टच निराळी. त्याविषयीं आह्मी वाद करूं इच्छित नाहीं. असो. वरचे डाक्टर ह्या मनुष्याविषयीं असें सांगतात कीं, तो मनुष्य ह्या वेळीं दारूच्या कैफांत होता, तरी त्यास हा उपहार मोठा आवडला असें दिसलें. ह्या मनुष्याचे स्नायु वगैरे मजबूत होते आणि तो लवकर मरण पावला असेंही नाहीं. तर तो आपल्या वयाच्या ७९ व्या वर्षी मेला. असले असले अपाचक पदार्थ वारंवार खाऊन तो इतकीं वर्षे जगला, ही कांहीं कमी आश्चर्याची गोष्ट नव्हे.

हेव्लिंग नांवाच्या गृहस्थानें एक पुस्तक लिहिलें आहे. त्यांत तो ह्मणतो कीं "प्रत्येक दिवशीं ८० पौंड वजनाचें अन्न खाणारा एक गृहस्थ माझ्या माहितींतील असून हयात आहे." कोलंब ह्या नांवाचा एक साहेब होता. त्यानें अशाच एका खादाड मनुष्याची गोष्ट सांगितली आहे. ती फारच विचित्र आहे; ह्या मनुष्यास एक वेळ भूक लागली, तेव्हां त्यानें एक पोतेंभर कोळसे पार केले, येवढेंच नव्हे, तर त्याबरोबर पोतेंही पण खाऊन टाकलें!!

क्लाउडीअस या नांवाचा आणखी एक गृहस्थ होता. त्याच्या खाण्याचा प्रकार, इ० स० १६३२ मध्यें एका पुस्तकांत लिहिला आहे. वस्तुतः ही मूर्ति अगदीं ठेंगणी व शहाआंगीच असे. पण काचा, दगड, व लांकडाचे तुकडे हा ह्याचा आवडता फराळ. सशाचे पाय,

गवत, भूस, लोंकरीचे व कापडाचे तुकडे इत्यादि विलक्षण विलक्षण पदार्थ ही स्वारी नेहेमीं चापीत असे. लहान लहान जिवंत प्राणी गिळून टाकणें ही तर त्याची घटकेघटकेची करमणूक होती. एक वेळ तर ह्या गृहस्थानें एक घुशीची जोडीच्याजोडी जिवंतच पार करून टाकली! सतराव्या शतकांतील प्रख्यात तत्त्ववेत्ता राबर्ट बॉयल, आपल्या एका ग्रंथांत लिहितो कीं 'रायल सोसायटीमध्यें एक इंग्रजी शिपायी दगड खात असे; आणि लेझारस नांवाचा गृहस्थ काचा खात असे.' पारिसच्या वनस्पतींच्या बागेंतील 'बीजो' नांवाच्या गृहस्थानें एकदां एक मेलेला सिंहच खाल्ला! ह्या मनुष्याचें पोट फाडून पाहिलें, तेव्हां त्याच्या पक्वाशयांत लांकडाचे, जस्ताचे व लोखंडाचे मिळून सुमारें ६०० तुकडे सांपडले!

कित्येक सद्गृहस्थांनीं व वैद्यांनीं कितीएक ठिकाणीं टेरी ह्या नांवाच्या गृहस्थाविषयीं माहिती दिली आहे. तींत हा गृहस्थ बाटलीचीं बुचें, खडे व सबंधाच्यासबंध फळें तो किती तरी खात असे. पुढें त्यानें शिपायाची नोकरी पतकरली. तेव्हां डाक्टर लॅरेन्सच्या समक्ष ह्यानें एक जिवंत मांजर घेऊन तें फाडलें, त्याचें रक्त प्याला, व बाकीचें सारें गिळून टाकलें! कार्व्हिले ह्मणून दुसरा एक डाक्टर होता. त्यानें ह्या मनुष्याचा एका विशेष कामाकडे उपयोग करावा असें मनांत आणलें. तें काम ह्मणजे शत्रूच्या सैन्यांतून गुप्त रीतीनें डाक पोंचविणें हें होय. त्यानें अशी युक्ति मनांत आणली कीं, त्यास एखादें पत्र गिळावयास द्यावें. ह्मणजे प्रसंगोपात्त शत्रूंनीं त्याचा झाडा घेतला तरी पत्र सांपडण्याची भीति नको, व त्याच्या प्राणावरही बेतावयास नको. ह्याचा पडताळा पाहण्यासाठीं ह्या डाक्टरानें आपल्या एका शस्त्राच्या पेटीभोंवतीं एक कागद डसवून ती पेटीच त्यास खावयास दिली. ह्या कामांत त्यास यश आलें. इतकेंच नव्हे, तर त्या कामावर सरकारांतून त्याची नेमणूकही पण झाली. त्याप्रमाणें तो सरकारचें टपाल पोटांत सांठवून शत्रूच्या सैन्यांतून खुशाल पार पडूं लागला. परंतु परशियन लोकांस त्याची गुणगुण कळतांच त्यांनीं त्यास पकडलें, रेचक देऊन त्याच्या जवळचें टपाल पकडलें, व त्यास शिक्षा दिली. हा गृहस्थ आपल्या वयाच्या २६ वर्षी व्हर्सेलिस येथील हास्पिटलांत मरण पावला!

आतां कांहीं फिरस्त्या गारोडी लोकांनीं तरवारी व चाकू गिळून दाखवून,

प्रेक्षकसमुदाय अगदीं चकित करून सोडला, व असल्या विपरीत आहाराबद्दल सरकारांत ज्यांनीं दंडही भरला, अशा लोकांच्या कांहीं गोष्टी यथातथ्य व सप्रमाण पुढें मांडतों. एक वेळ 'एडिंबर्ग फिलॉसोफिकल जर्नल' मध्यें 'जॉन क्यूपिंग्ज' ह्या नांवाच्या मनुष्याच्या अचाट कृत्याबद्दल मोठी वाटाघाट चालली होती. हा मनुष्य अमेरिकेंतील एका जहाजावरचा खलाशी होता. ह्याचें जहाज एका बंदरीं नांगरलेलें असतां, हा कांहीं खलाशांबरोबर बाजारचे जिन्नस आणण्यासाठीं शहरांत गेला होता. तेथें त्यानें एक गारोड्याचा खेळ पाहिला. त्यांत त्या गारोड्यानें एक सबंध चाकू गिळून दाखविला. ती गोष्ट ध्यानांत धरून जान क्यूपिंगनें जहाजावर आल्यानंतर आपल्या मित्रमंडळींत त्या गारुड्याप्रमाणें चाकू गिळण्याची प्रतिज्ञा केली. आणि त्याप्रमाणें खरोखर गिळला. तेव्हां त्याची मोठी तारीफ होऊं लागली. त्या स्तुतीस भुलून हा वेडगळ मनुष्य आणखीही पैजेपैजेनें अनेक चाकू गिळूं लागला. आणि तेही रोजच्यारोज! सन १८०५ च्या मार्च महिन्यांत बोस्टन येथें असतांना ह्या विक्षिप्त मनुष्यानें—फारसे नव्हेत—तरी चवदा चाकू मुठीसकट गिळले! पण त्यामुळें तो अतिशय आजारी पडला. ह्मणून कायद्याविरुद्ध वर्तन केल्याबद्दल सरकारानें त्यास आपल्या ताब्यांत घेऊन उपचाराकरितां हास्पिटलांत ठेवलें. तेथें तो बरा होऊन शिक्षा भोगून पुन्हा आपल्या जहाजावर आला. परंतु पुन्हा काय, येरे माझ्या मागल्या आहेच! ता० ४ डिसेंबर १८०६ मध्यें त्यानें आणखी बारा चाकू गिळले. आणि त्यांतच त्याच्या आयुष्याचा शेवट झाला. शेवटच्या दुखण्यांत हा मनुष्य गॉयच्या हास्पिटलमध्यें डॉक्टर बॉबिंगटन् ह्याच्या देखरेखीखालीं होता. त्यांनीं त्याची सर्व हकीगत ननूद करून ठेवलेली आहे. प्रथम प्रथम चाकू गिळण्याची गोष्ट कोणासच खरी वाटत नसे. परंतु मागाहून अनुभवांतीं सर्वांची पूर्णपणें खात्री झाली. त्याच वर्तमानपत्रांत आणखी एक अशीच गोष्ट कारलाइलच्या डाक्टर ब्यारन्स ह्यांनीं प्रसिद्ध केली आहे. ती डेंप्स्टर नांवाच्या गारोड्याविषयीं आहे. ह्या तरुण पुरुषानें सन १८२३ मध्यें बोचरगेट येथें, एका लहानशा कलालाच्या दुकानीं बसल्या बसल्या एक चाकू तोंडांत टाकून तो गिळला. हा गारोडीही सुऱ्या, चाकू खाण्याच्या कामांत मोठा पटाईत

होता. पण हें शस्त्र नऊ इंच लांबीचें असल्यामुळें, तें त्यास दुःसह होऊन त्याचा जीव कासावीस होऊं लागला. ह्मणून तेथें घाईघाईनें एका डाक्टरास बोलावून आणिलें, व हां हां ह्मणतां दुसरेही अनेक डाक्टर जमा होऊन त्याच्या उपायाचा ऊहापोह सुरू झाला. अखेर सर्वानुमतें शस्त्रप्रयोग करून तो चाकू काढण्याशिवाय दुसरा उपाय नाहीं असें ठरलें. पण त्यास तो गारोडी कबूल होईना. कारण, त्या कृत्यांत आपणास खास मरण येणार असें त्याच्या मनानें पक्कें घेतलें होतें. आणि अखेर तेंच खरें झालें. तो मिडल्वुइच् येथें आपल्या घराकडे जात असतां जानेवारीमध्यें रस्त्यावरच मरण पावला!

डाक्टर जे. जी. मिलिंजन ह्यानेंही एका मनुष्याविषयीं अशाच प्रकारची गोष्ट लिहिलेली आहे. हा मनुष्य एका धर्मशाळेंत पडून एकाएकीं मरण पावला. ह्मणून डाक्टर लोकांनीं त्याचें पोट चिरून पाहिलें. तों त्याच्या कोठ्यामध्यें कितीएक सुऱ्या व चाकू आढळले. त्यांच्या मुठी अगदीं वितळून गेल्या होत्या, व पातीं बोथड झालीं होतीं! हाही मनुष्य अशाच विक्षिप्त खादाडपणानें मेला असावा असें अनुमान आहे.

चाकू सुऱ्या खाण्याहून तरवार खाण्याची गोष्ट भयंकर तर खरीच, पण बरीच भिन्न आहे. ह्मणजे तरवार गिळणें हें काम आधीं अशक्यच आहे. तर ती पोटांत खुपसून पुन्हा बाहेर काढणें, येवढेंच त्यांत कृत्य असतें. पण तेवढें सुद्धां अद्भुतपणांत कमी आहे असें नाहीं. कित्येक गारोडी पातळ पात्याची तरवार घेऊन ती चांगली हात हात घशांतून पोटांत घालतात, तिचें टोंक जोरानें दाबतात, आणि पुन्हा बाहेर काढतात, तरी त्यांस कांहीं इजा होत नाहीं. ह्यांत फसवाफसवीचा प्रकार मुळींच जमेस धरावयाचा नाहीं. कारण कित्येक गारोडी सुरीची किंवा तरवारीची मूठ पोकळ करून तिचें पातें दांतांत धरधरून, परत त्या मुठींत खुपसतात. आणि तें पातें आपल्या पोटांत गेलें असा लोकांचा समज करतात. व साध्याभोळ्या प्रेक्षकांस तें अगदीं खरें असा भास होतो. पण कित्येक गारोडी खरोखरच तरवार पोटांत खुपसणारे असतात. सन १८८१ मध्यें लंदन शहरांत अशा प्रकारचा एक गारोडी आला होता. त्याची मोठमोठ्या नामांकित डाक्टर लोकांनीं अगदीं बारकाईनें तपासणी केली. तेव्हां त्यांस असें आढळून आलें कीं, तरवारीच्या अ-

ग्रानें पोटाच्या पुढची बाजू, एखाद्या लवचिक पिशवीप्रमाणें खालीं दड-पून जात असे! त्यामुळें त्यास कांहींच इजा होत नसे.

अशा प्रकारच्या गोष्टी अनेक लिहिलेल्या आहेत. त्या कशा होतात, ह्याबद्दल कोणाचाच अद्याप नीट तर्क चालत नाहीं. तथापिः—

"असाध्य तें साध्य करीतां सायास। कारण अभ्यास तुका ह्मणे"

हेंच तत्व त्यांत असावें असें बहुत अंशानें अनुमान होतें.

पत्रव्यवहार.

नंबर ८०१.

हिंदुस्थानसरकार.

होम डिपार्टमेंट.

पब्लिक.

मुक्काम सिमला, तारीख १ माहे मे सन १८९६.

जाहिरनामा.

मलिका माआझमा कैसरेहिंद यांचें खालीं दिलेलें पत्र, तारीख १६ माहे फेब्रुवारी सन १८९६ चें लंडन गझेट याच्या दुसऱ्या पुरवणींत प्रसिद्ध झालेलें आहे, तें सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं पुनः प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

मुक्काम व्हाइट हॉल, तारीख १५ माहे फेब्रुवारी सन १८९६.

महाराणी साहेबांचें खालीं दिलेलें पत्र होम डिपार्टमेंटचे नेक नामदार सेक्रेटरी ऑफ् स्टेट यांजकडे आलें आहेः—

मुक्काम ऑस्बर्न, तारीख १४ माहे फेब्रुवारी सन १८९६.

मजवर व माझी लाडकी कन्या, शहाजादी बियॅट्रिस, ब्याटेन्बर्गचे राज-पुत्र हेन्री यांची पत्नी हिजवर जो मोठा दुःखाचा प्रसंग नवीन गुदरला आहे, त्याविषयीं माझ्या राजनिष्ठ प्रजेनें अंतःकरणपूर्वक प्रदर्शित केलेल्या कळवळ्या-बद्दल तिचे पुनः एकवार आभार मानणें माझ्या वांट्यास आलें आहे!

ह्या नवीन दुःखाला सीमा नाहीं, व मला तर तें दुबार सलत आहे, कारण ज्याची मूर्ति माझ्या घरीं उज्वळ सूर्यकिरणाप्रमाणें भासत असे असा एक परम-प्रिय व साह्यकारी पुत्र मला अंतरला, आणि ज्याशीं माझी प्रिय कन्या अतिस्निग्ध प्रेमपाशानें बद्ध झालेली होती तो थोरमनाचा पत्नीपरायण पति तिला अंतरला.

ज्या कन्येनें मला कधींच सोडलेलें नाहीं व जिनें माझें सांत्वन करून मला धीर दिलेला आहे, तिच्या सुखाचा भंग झालेला पाहणें हें मला दुःसह होय. परंतु माझ्या समस्त प्रजेनें इतक्या चित्तवेधक रीतीनें सर्वत्र प्रदर्शित केलेला कळवळा पाहून माझ्या कन्येचें व माझें अंतःकरण फारच द्रवलें, आणि आ-ह्यांस मोठा धीर येऊन चित्तास पुष्कळ समाधान वाटलें. याबद्दल, व तसेंच ज्या प्रिय प्रतापी राजपुत्रानें स्वभूमीप्रमाणें मानलेल्या देशाच्या सेवेमध्यें आपला देह ठेविला त्याच्या गुणांचा उल्लेख केल्याबद्दलही मी माझ्या प्रजाजनांचे अंतः-करणपूर्वक आभार मानूं इच्छितें.

या प्रसंगीं माझ्या लाडक्या कन्येचें धैर्य, शांतवृत्ति व ईश्वराच्या इच्छेवर अवलंबन हीं सर्वांनीं उदाहरण घेण्यायोग्य आहेत.

व्हिक्टोरिया, रा. कै.
जे. पी. ह्यूवेट,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्थानसरकार.

(TRUE TRANSLATION)
M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

श्री. कोल्हापूर, ता. २५ जून १८९६.

राजमान्य राजश्री केरळकोकिळकर्ते यांशीं:—

आपण केलेली "सासरची पाठवणी" व "मुलींचें पहिलें पुस्तक"—हें पुस्तक आपणच लिहिलें किंवा दुसऱ्या कोणीं लिहिलें याविषयीं मला संशय आहे—अशीं दोन पुस्तकें मजकडे रा. रा. गुर्जर यांजकडून अभिप्रायासाठीं आलीं, याबद्दल रा. रा. गुर्जर यांची मी फार फार आभारी आहें. "सासरची पाठवणी" हें लहानसें कवितावद्ध पुस्तक फारच उत्तम झालेलें आहे. त्यांत सासरीं जाण्यास निघालेल्या मुलीला आईनें जो उपदेश केला आहे तो उत्तम बोधपर असून कवितारूपानें लिहिला असल्यानें फारच मनोरंजक झाला आहे. व त्यांतील कविता अगदीं साध्या सरळ असल्यामुळें त्या कोणासही समजण्यास जड जात नाहींत.

ह्या कविता मुलींच्या शाळांतून शिकविल्या असतां फार उपयोग होऊन मनोरंजकही होतील. व हल्लींच्या क्रमिक पुस्तकांतील कविता मुलींस शिकण्यास व त्यांचा अर्थ समजण्यास जसा जड जातो तसा ह्या कवितांचा अर्थ समजणें जड जाणार नाहीं.

हें पुस्तक जरी आपण मुलींकरितां केलेलें आहे तथापि त्यांत विवाहहोम प्रकरणांतील ऋचांचा अर्थ शुद्ध मराठींत आणिला आहे ह्मणून तें आबालवृद्धांनीं वाचण्याजोगें झालें आहे. कारण लग्नांत स्त्रीपुरुषांचा जन्माचा संबंध जोडला जातो, अशा वेळीं जे मंत्र उच्चारिले जातात त्यांचा अर्थ सामान्य लोकांस तर मुळींच कळत नाहीं व तो समजून घेण्याबद्दल कोणी कधीं यत्नही करीत नाहींत. फार काय, पण स्वतः ते मंत्र उच्चारणाऱ्या उपाध्यास देखील कितपत कळतात कोण जाणे? परंतु अशा महत्त्वाच्या ऋचांचा अर्थ सर्वांस व विशेषेंकरून वधूवरांस समजणें किती अगत्याचें आहे हें सांगणें नकोच.

आपण तो अर्थ सर्वांस समजून देण्याचें श्रेय प्रथमच घेतलें आहे; इतकेंच नव्हे तर तो कवितारूपानें समजून दिला असून आपल्या कविता सरळ, सोप्या व फारच गोड आणि सर्वांस व मुलींस सुद्धां विशेष श्रम न पडतां सहज समजण्याजोग्या आहेत वगैरे कारणांमुळें आपली स्तुति करावी तितकी थोडीच होणार आहे.

सारांश ही जी आपण आमच्या सर्व महाराष्ट्रांतील मुलींस लहानशी देणगी दिली आहे तिजबद्दल सर्वांनीं आपले मनापासून आभार मानणें अगदीं योग्य आहे.

आतां दुसऱ्या ह्मणजे "मुलींच्या पहिल्या" पुस्तकासंबंधानें आपणांस माझ्या मनांतून बरेंच लिहावयाचें आहे ह्मणून पुढें एकादे वेळेस सवडीप्रमाणें त्याविषयीं मी आपणांस लिहीन. तें मीं मुद्दाम लांबणीवर टाकलें आहे. कळावें लोभ करावा हे विनंती. विलंब लागल्याबद्दल माफी असावी.

आपली भगिनी,

रखमाबाई केळोकर.

रा० रा० केरळकोकिळकर्ते यांस,

साष्टांग नमस्कार विनंति विशेष. पाठविलेल्या आर्या येत्या अंकीं छापून प्रसिद्ध व्हाव्या अशी उत्कट इच्छा आहे; पूर्ण करणें आपणांकडे आहे. कळावें.

आर्या.

आबालवृद्ध म्हणती बा ! केरळकोकिळा चिरंजीव
राहोनि अम्हां सर्वां प्रतिमासीं तूं असेंचि रंजीव. १.
त्वद्दर्शनें अम्हांशीं आला वाटे वसंत परतून
निज मंजुरवें सुखविशि सकल जनां मानिशी स्व पर तूं न. २.
होती क्षणैक जन भवतापस्मृतिरहित तूझिया गानें
केले न लुब्ध ऐसे आजवरी एकही विहंगानें. ३.
जो तो पात्र म्हणे मी सांप्रत कविरत्नहारपदकाला
सोडूनि कोकिलाला देऊं श्रेष्ठत्व काय बदकाला ? ४.
त्वत्कवन-सुमनगंधचि सुरसिकजनमधुपवृंद धुंद करी
घेतो कोण कशाला चंपक जाई गुलाब कुंद करीं. ५.
परमायावरणांतुनि व्हाया निजदेशबंधुंची सुटका
त्वां कालचक्रगतितें कथिलें सुंदर करोनियां फटका. ६.
सांप्रत छत्रपति श्रीशिवगुणगणवर्णनांत रतलासी
तुज लिंबलोण करितां होवो श्रम अंगनाकरतलासी. ७.
पुस्तकपरीक्षणीं तूं काढुनि गुणदोष दाविसी स्पष्ट
इष्ट तुझा सत्पथ गा होतिल तरि हो खुशाल जन रुष्ट. ८.
विविधोपविषयकवितापक्वान्नें करुनि वाढिशी मिष्ट
पुष्ट जहाले आश्रयदाते होईल त्यांजला द्दष्ट. ९.
लेखनकलाकुशलही लेख तुझे बघुनि डोलविति माना
कविमंडळांत तर तूं असशी बा ! पात्र उच्चपदमाना. १०
देवो तो परमेश्वर मति तुज सत्कवनिं मजहि सत्स्तवनीं
जा कोकिला ! विहर जा स्वच्छंदें सुरसिकाम्रवृक्षवनीं. ११.

रामचंद्र नारायण दीक्षित, मुंबई.

* मागील अंकीं आह्मीं सूचना केलीच आहे; ह्यापुढें 'केरळकोकिळचे' स्तुतिपर लेख किंवा कविता आमच्या पुस्तकांत घेणें प्रशस्त नव्हे. तथापि मोठ्या आग्रहास्तव, भिडेस्तव व कवित्व गुणदर्शक असल्यामुळें आह्मीं आजच्या येवढ्या कविता घेतल्या आहेत. ह्यापुढें, ज्यांस अशा कविता, किंवा केरळकोकिळाच्या गौरवाचे लेख पाठविणें असतील, त्यांनीं कृपा करून ते इतर वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध करावेत. येवढी निरुपायानें विनंति करणें भाग पडतें. राग नसावा. ए० के० को०

पुस्तकपरीक्षा.

सौ० डा० आनंदीबाईचें चरित्र.

(पु० ६ अं० ५ वरून पुढें.)

(करवीरस्थ महिलेकडून.)

खरें पाहतां पुस्तककर्त्रीला चरित्रनायिकेच्या स्वरूपाला शृंगारित बसण्याचें प्रयोजन नव्हतें. लंबकर्णास 'ह्रस्वकर्ण' ह्मटल्यानें, लोंकरीस लव ह्मटल्यानें, ओठाळीस लगाम ह्मटल्यानें, उकिरड्यास कुरण ह्मटल्यानें, मुठास खोगीर ह्मटल्यानें, झिपऱ्यांस आयाळ ह्मटल्यानें, 'खास श्रीदत्तात्रेय महाराजांचे गुरु' जसे शामकर्ण बनावयाचे नाहींत; तसेंच उकट्या तोंडाला, नकट्या नाकाला, पिचक्या डोळ्याला, बावऱ्या ओंठाला रंभा ह्मटल्यानें 'गोपाळरावांचे गुरु'ही (पान २५४ ओ. २२) 'समर्थ' बनावयाचे नाहींत. सद्गुणी चरित्रनायिकेच्या स्वरूपांत कांहीं व्यंग असल्यास—किंवा कुरूपता असल्यास—चरित्रलेखकास उलटा आनंदच असावा. कारण, शरीरांतील उणीव तिनें, सद्गुणांनीं भरून काढली असें ह्मणण्यास व अभिमान बाळगण्यास जागा असते. हें सर्व सोडून देऊन **काशीबाईनीं** डाक्टरणीला 'रंभा' ह्मणून समाजरंगभूमीवर आणण्याकरितां नकली शब्दमौक्तिकांची नखशिखांत जी रेलचेल करून दिली आहे, व **"विस्तारा"**च्या नागपुरी कांड्यांत जीं 'भारदस्त' झालीं आहेत, त्यांचा थोडासा नमुना पूर्वलेखांत वाचकांस सादर केला. आतां सद्गुणाच्या थाटाला कशीं काय फुलेंमळलीं आहेत तें पहावयाचें.

सौ० **काशीबाईनीं** रूपावरच जर सूपभर मोत्यें ओंवाळलीं, तर सद्गुणरत्नांची प्रभा उजळण्याकरितां, जडावाचें काम किती मेहनतीनें केलें असेल, हें निराळें सांगण्याची तादृश गरज उरली नाहीं. तथापि सुशिक्षित स्त्रियांच्या जडणकामाचा मासला वाचकांस कळावा ह्मणून थोडेंसें मणिमंगळसूत्र पुढें ठेवितें.

डाक्टर **जोशी**बाईच्या चरित्राचा अर्धा अधिक भाग, त्यांच्या स्वदस्तूरच्याच पत्रानें भरलेला आहे. त्या साऱ्या पत्राचें भाषांतर **काशीबाईस** कोणी **'बावळे'** ह्या नांवाच्या गृहस्थानें करून दिलें आहे. तेव्हां हा भाग वजा करून बाकी राहील तेवढाच लेख ग्रंथकर्त्रीचा. त्यांतही खरोखर चरित्राचा भाग फार थोडा असून बहुतेक पृष्ठें वडील मनुष्यांची हेलना करण्यांत, पुरुषांवर भडिमार

करण्यांत, जुन्या स्त्रीपुरुषांची मानहानि करण्यांत, आत्मप्रौढीची शेखी मिरविण्यांत, व चरित्रनायिकेखेरीजकरून यच्चयावत् व्यक्तींस तुच्छ करण्यांत खर्च केलीं आहेत. आतां ह्यांचीं सविस्तर उदाहरणेंच कोणी दाखवा ह्मणेल, तर ती गोष्ट मजसारखीला तरी निदान अशक्य होय. कारण, तसें करूं लागल्यास **काशीबाई**च्या पुस्तकायेवढीं, किमानपक्ष दहापांच तरी पुस्तकें भरावीं लागतील. ह्मास्तव त्या फेऱ्यांत न पडतां, कांहीं ठळक ठळक स्थलें मात्र दाखवितें, शितावरून भाताची परीक्षा सहज होईल.

सौ० **काशीबाई**ना आपल्या प्रियपतीच्या अनुग्रहानें बावन्न अक्षरांची ओळख होतांच, व तीं कागदावर नमुद करण्याचें त्यांच्या आंगीं सामर्थ्य येतांच, त्यांच्या मनाचा असा एक कल झालेला दिसतो कीं, ज्ञानभांडारांतील सर्व जामदारखान्याच्या किल्ल्या माझ्या हातीं आल्या. त्या सर्वांची मुखत्यारीण काय ती मी. त्यांतील प्रत्येक वस्तूची पारख काय ती मला. सारासार विचाराच्या तराजूची पेटी काय ती माझी लेखण. लेखनवाचनरूप दुर्बिणींतून स्त्रीपुरुषरूपी चंद्रसूर्यांवरचे काळेकुट्ट डाग दिसूं लागले काय ते माझ्या नेत्रांना. सर्व पृथ्वींत अडाणी आणि रानटी देश काय तो आमचा. सर्व अडाणीपणाची रास काय त्या आमच्या बायका. आपलपोटेपणाचे खंदक, क्रूरपणाचे सागर, मत्सराचे पर्वत, कृतघ्नतेचे पुतळे काय ते आमच्या देशांतले पुरुष! असा अनर्थोत्पादक ग्रहरूप दूषित वायु त्यांच्या हृदयांत कुपित झाल्यामुळें, त्यांचा लेखनौघ अमर्याद फोंफावत सुटून घटकेघटकेस त्यास बांध घालतां घालतां ग्रंथकर्त्यांच्या नाकीं नऊ आले आहेत. **काशीबाई**चे व्यवहारांतील नियम, आणि सुधारणेचा रोंख जो काय आहे, तो तर मासलेवाईकच. **हिंदुस्थानां**तील आईबापें—त्यांतून आई ह्मणजे तर महत्पातकी! अशी त्यांची दृढ समजूत होऊन गेली आहे.

पहा! पहिलेंच पान. आनंदीबाईचें जन्म झालें, कीं झालें त्यावर **काशीबाई**चें पुराण सुरू. भरलें दीड पान! त्या ह्मणतात "लहान मुलांना क्रूरपणानें वागविण्यापेक्षां ममतेनें वागविलीं असतां, तीं चांगलीं सुधरतात हें आमच्या लोकांस कधीं कळेल तें कळो!" खरोखरच आमचीं आईबापें अभागी! पोटच्या सोन्यासारख्या गोळ्याला, स्वस्तनांतील दुग्धामृताचा एक बिंदूही न पाजतां, तो उपजतांच कैकाडणीसारख्या भेसूर व काळ्याकुट्ट शिद्दिणीच्या तैनातीस देणें, मुलांस पुरतें सोळावें वर्ष लागतें न लागतें तोंच घराबाहेर काढणें, लहान लहान अर्भकांचा दहा दहा हजारांचा विमा उतरून,

त्यांचें अन्नपाणी तोडून त्यांस झिजवून झिजवून ठार मारून आपला तळिराम गार करून घेणें, इत्यादि सुधारलेल्या ममतेच्या प्रकारांपैकीं त्यांस एकही प्रकार माहीत नाहीं! "एकादा हात फिरविला, तर जनावरें सुद्धां आपणावर प्रीति करून आपण सांगूं त्याप्रमाणें करतात." हें तत्त्व खरें असतें, तर राजेरजवाड्यांस चाबुकस्वारांची गरजच राहिली नसती. प्रसिद्ध प्रो. विष्णुपंत छत्रे येवढे कुशल असतां घोड्याच्या सरकशींत हातांत चाबूक घेऊन कां बरें उभे राहतात? 'एकादा हात फिरविल्यानेंच जर जनावर वळतीवर येतें,' तर छत्र्यांपाशीं एक सोडून दोन सुद्धां हात आहेत. मग चाबूक कां? कामिण झाली, ह्मणजे डोळ्यांला जसे सारेच पदार्थ पिंवळे दिसूं लागतात, तसाच प्रकार काशीबाईचा झालेला आहे. त्या स्वतः जरी आर्यकुलांत जन्मलेल्या आहेत, तरी त्यांचें मन, दृष्टि, ह्यांचें त्यांत मुळींच वास्तव्य नाहीं. पूर्वापार चालत आलेला रीतिरिवाज, हा केवळ हाटेंटाट लोकांसारखा रानटी असें त्यांस वाटतें. आमच्या आया, आमचे बाप, आमचीं मुलें, आमचा पोषाख झाडून सारें गचाळ! नव्हे निखालस रानटी! ह्यावरून काशीबाईची नजर ह्या नव्या विद्यासंस्कारानें कशी फिरली आहे, हें वाचकांच्या सहजीं ध्यानांत येईल. आनंदीबाईला येवढ्या योग्यतेस चढविण्यास कारण झालेले जे गोपाळराव, त्यांस सुद्धां त्यांनीं अगदीं कुचेंनिपट करून सोडलें आहे. बिचाऱ्या गोपाळरावांची वागणूक पहिल्यापासूनच अगदीं साधी असे. पण त्या त्यांच्या साध्या पोषाखाची सुद्धां काशीबाईनीं कशी निर्भत्सना केली आहे पहा! गोपाळरावांस आनंदीबाई देण्याचें ठरल्यावर तिची आई व आजी ह्यांनीं त्यांस जाऊन पाहिलें. तेव्हां काशीबाई ह्मणतात "स्वारीचें तें बारीक बोलणें, लहान शेंडी, पागोट्याची चुंबळ, टांचेपर्यंत धोतराचे सोगे व कासोटा वगैरे पाहून जांवयी तर मानवला." बूट, पाटलोन, घेरा, ह्यांपैकीं एकही सरंजाम त्यांजकडे नसतां, त्यांस ज्या अर्थी जांवयाचें सरटिफिकिट दिलें, त्या अर्थी ह्या जुन्या चालीच्या बायका अजागळच खऱ्या! निदान गोपाळरावांनीं तरी, आपल्या भावी सासवा आल्या असें समजून त्यांस प्रसन्न करण्याकरितां, घोगरा आवाज काढून गर्दभरागाची एक तान झोडावयाची होती कीं, नाहीं? पण ही स्वारी विक्षिप्तच! ही असली निंदा ह्मणजे ग्रंथकर्त्रीचा केवळ उपोद्घात आहे. ह्यापुढें जी मी गोष्ट सांगणार आहें, त्यांतील उद्गार, त्यांतील कुत्सित शब्द, त्यांतील हेटाळणी ऐकून काशीबाईचीं धर्मसंबंधीं मतें, स्वधर्माविषयीं श्रद्धाळूपणा, ह्यांची चोख साक्ष पटून वाचकांना त्यांची कींव

आल्यावांचून खचित राहणार नाहीं. खरोखर असल्या शुष्क गोष्टींचा उल्लेख आमच्यासारख्या बायकांनीं न करावा हें उत्तम; परंतु स्वधर्म हा आपला प्राण असें माझें मत असल्यामुळें, व त्याची ह्या नव्या स्त्रिया कशी दुर्दशा करतात, ह्याचें चित्र स्पष्ट रीतीनें डोळ्यांपुढें रहावें, व भावी विदुषी स्त्रियांनीं तरी सावध व्हावें, ह्णून मी मुद्दामच त्यांचा उल्लेख करतें.

आनंदीबाईवर पहिल्यापासूनच आईपेक्षांही आजीची ममता विशेष होती. ह्णून **गोपाळराव**जींनीं **अलीबागेस** असतांना घरांत वडील माणूस ह्णून तीस ठेवलें होतें. व ते तीस आईप्रमाणें मान देत. व तीही दोघांस जीवप्राण करी. त्या वृद्ध माउलीस ग्रंथकर्त्रीनें कसें 'गुलजार' सर्टिफिकिट दिलें आहे तें पहा. " आजी जें जें ह्णेल तें ते ऐकत. त्यामुळें आजीची कमान बरीच वर चढली. आजीबाईच्या नाकावर माशी सुद्धां बसण्याची पंचाईत पडूं लागली." हे उद्गार ऐकून वाचकांच्या मनांत सहजीं कल्पना येईलच, कीं येवढी त्या ह्यातारीच्या हातून ब्रह्महत्त्या तरी कोणती घडली ? त्याचा वृत्तांत **काशीबाई**नीं येणेंप्रमाणें कथन केला आहे.

" **आनंदीबाई**ला **अलीबागेस** असतां ऋतु प्राप्त झाला. तेव्हां तिसऱ्या दिवशीं **गोपाळराव** इकडे तिकडे कोणी नाहीं असें पाहून मखराजवळ जाऊन बसले, व बायकोला थट्टेनें ह्णाले ' काय, तुझी तर बोवा चैन आहे दोन दिवस ! कसें सुंदर मखर घातलें आहे ! किती अंगावर दागिने लटकावले आहेस ! चांदीचीं भांडीन् बिंडीन् मोठा थाट केला आहे बोवा ! आणखी, त्यामुळें तूं किती सुंदर दिसते आहेस ह्णून सांगूं !!!' असें ह्णून तिला त्यांनीं हात लावला. त्यासरशी 'अगबाई ! विटाळ झाला ना ?' असें ह्णून **आनंदीबाई** ओरडली. हे शब्द आजीनें ऐकिले; व ती माडीवर आली. **आनंदीबाई**नें आजीजवळ सर्व हकीकत सांगितली. इतक्यांत गोपाळरावांनीं 'ही सांगते, हें सर्व खोटें आहे,' असें सांगितलें. व तेथें असलेल्या विछायतीवरून ते दुसऱ्या खोलींत चालते झाले. हें सर्व पाहून आजीच्या जिवाचा संताप झाला. ती ह्णूं लागली, 'मी आतांच्याआतां कल्याणाकडे निघून जातें. मला असला भ्रष्टाकार मुळींच खपावयाचा नाहीं.' परंतु **काशीबाई**च्या मताप्रमाणें हें फक्त पातक झालें. खरी ब्रह्महत्त्या ती पुढेंच आहे. ती कोणती ? तर " त्या दिवशीं ह्यातारी जेवली नाहीं. दुसऱ्या दिवशीं तिनें आपणच होऊन चिरगुटें पांघुरणें धुतलीं, व नंतर सैंपाक वगैरे करून जेवली" ही. आणि ह्या घोर पातकाबद्दल

त्या माउलीला 'आजीचें घरांत इतकें प्रस्थ गोपाळरावांनीं माजविलें होतें कीं, कांहीं बोलावयाची सोय नाहीं.' हें काशीबाई प्रायश्चित्त देतात ! ह्मणजे काशीबाईचा ध्वनितार्थ हा कीं, विटाळशीचा विटाळ मानणें, ह्यासारखा मूर्खपणा दुसरा कोणताच नाहीं. त्या ह्मातारीनें गुपचुपपणें साऱ्या घरांत विटाळ कालविला असता, तर काशीबाईनीं तिचे पवाडे गायिले असते, स्तुतिस्तोत्रें केलीं असतीं,—नव्हे—तिचें चरित्र लिहून तिला देवांगना सुद्धां बनविलें असतें !

शिवशिव ! काशीबाईना जो येवढा विद्येचा संस्कार झाला आहे, तो मोठेपणींच झालेला आहे. चढत्या कलेच्या सुधारणेचीं तत्त्वें जीं त्यांच्या मनांत बिंबलीं आहेत, व उचंबळत आहेत, तींही मोठेपणाचींच आहेत. त्यांचा जन्म ब्राह्मणकुलांत झाला आहे. त्यांच्या सहवासिनी तर त्यांच्या सुशीलतेची मोठी तारीफ करितात. असें असून त्यांस स्वधर्माचीं येवढालीं तत्त्वें कळूं नयेत, किंवा कळून त्यांच्याकडून अशा प्रकारें त्यांची विटंबना व्हावी, ही केवढी दुर्भाग्याची गोष्ट ! ऋतुमतीचा विटाळ ब्राह्मण लोक किती अपवित्र मानतात, त्याच्या पातकाचें महत्त्व वृद्ध स्त्रियांच्या किती हाडीं खिळलेलें असतें, ह्याचा विचार मनांत आणून काशीबाईनीं त्या आजीबाईवर थोडी तरी गय करावयाची होती ! धर्माचें गवाळें लागो खुंटीला ! निदान व्यवहारीत्या अमंगलत्वाचा व दूषित्वाचा सांसर्ग तरी मनांत आणून टांक चालवावयाचा होता ? मनुष्याला जनाची नाहीं तर मनाची तरी निदान चाड पाहिजे. प्रस्तुत मन्वंतरांत आपल्या धर्मगुरूच्या हातांत माजिस्ट्रेटचा अधिकार नाहीं, ह्मणून आजच दाही दिशा मोकळ्या झाल्या असें समजूं नये.

स्वधर्मास गुंडाळून ठेवणें, हाच जर विद्येचा परिणाम असेल, विटाळशीचा विटाळ घरांत कालविणें हाच जर सुधारणेचा पंथ असेल, वडिल माणसांस अपशब्द बोलणें, हाच जर परोपकार असेल, तर जळो ती विद्या ! आग लागो त्या सुधारणेला ! आणि सत्यनाश होवो त्या परोपकाराचा. देवा ! असेंच जर आमच्या विदुषी स्त्रियांचें विद्येनें मातेरें करणार असशील, तर त्यापासून आमचें संरक्षण करण्यासाठीं तुला शतवार लोटांगण घालतें.

काशीबाईच्या तोंडाचा पट्टा खरोखरच मोठा सुश्राव्य आहे. दुष्काळांतून हपापून आलेल्या मनुष्यानें अन्न पाहिलें ह्मणजे त्यास जसें किती खाऊं आणि किती न खाऊं असें होऊन जातें, तशीच प्रस्तुत ग्रंथकर्त्रीची स्थिति झाली आहे. माझ्या हातांत लेखण पडली; आतां कोणाकोणास व काय काय मी बोलेन

तेवढी थोडी, असें त्यांस होऊन गेलें आहे. मासल्यासाठीं (पा० ५१) पुढील उद्गार पहा:—"**मुंबईच्या चाळी ह्मणजे शुद्ध बाजार असतो. चाळींतल्या लोकांना, सभ्यपणा कशाला ह्मणतात याची, चाळींत राहूं लागल्यापासून विस्मृतिच पडते! आणखी टवाळ मंडळीबरोबर सभ्य मंडळीही त्यांच्यासारखीच बनते! बायकाही सहवासाप्रमाणेंच असतात!**" यापेक्षां अधिक वाचाळता ती कोणती? आज शेंकडों संभावितांत व सज्जनांत मोडणारे रावसाहेब व रावबहादुर पूर्वी मुंबईच्या ह्याच चाळींत राहून योग्यतेस चढले आहेत. व आजही शेंकडों संभावित गृहस्थ चाळींमध्येंच वास्तव्य करीत आहेत. त्या सर्वांची अशी सरशाहा बोळवण केलेली पाहून ते लोक **काशीबाईस** काय ह्मणतील बरें? 'काय ही तुफान बायको? असें जर त्यांनीं ह्मटलें, तर तें **काशीबाईनीं** नको का सोसून घ्यावयाला? आणि नको का खालीं मान घालावयाला? त्या आपल्या मतानें मोठा भक्कम पुरावा देतात कीं 'याचा अनुभव ज्यांनीं ज्यांनीं मुंबई पाहिली आहे त्यांना त्यांना असेलच.' इतक्या साक्षीदारांचा भत्ता भरण्याची तसदी **काशीबाईनीं** विनाकारण घेतली. कारण, प्रसंग पडल्यास त्यांच्या पक्षाकडे एक तरी स्वारी हजर राहील किंवा नाहीं ह्याचा वानवाच दिसतो. मी मात्र प्रसंग पडल्यास **काशीबाईना** एक सोडून पन्नास साक्षीदार देईन. आणि तेही सौजन्यांत, सभ्यपणांत, व्यवहारांत आणि विद्येंत राजमान्य असे. बरें; पुरुषांस ह्मटलें तर ह्मटलें घटकाभर. पण विचाऱ्या त्यांच्या बायकांनीं तर कांहीं पाप केलें नव्हतें ना? पण सरसकट बारा टक्के! 'बायकाही सहवासाप्रमाणेंच असतात.' ह्मणून दिली एक नव्या पेनाची आणि नव्या विद्वत्तेची फर्डेशाई ठोकून! **काशीबाई!** मी तुह्मांला भगिनीच्या नात्यानें व सलगीनें विचारतें, ह्याचा राग मात्र मानूं नका. खरेंच सांगा, तुमच्या तोंडाला कांहीं हाड ह्मणून आहे का हो? जर असतें, तर त्याच्याकडून असें अद्वातद्वा लेखनरूपी भाषण खचित निघालें नसतें.

मुंबईतील चाळींतल्या लोकांवर येवढी इतराजी कां? तर '**आनंदीबाईना** वाटेनें जातांना हलकट लोक त्रास देत.' पण त्रास देणें ह्मणजे तरी काय? ही कोण, कोणाची, नवीन शिकलेली इत्यादि कुजबुजण्यापलीकडे, निदान चाळींतील लोक तरी कांहीं करीत असतील, असें मला वाटत नाहीं. पण त्याचा दोष सुद्धां लोकांकडे देतां येत नाहीं. आतां एखादी संभावित, चारचौघींसारखी वागणारी स्त्री चाळींत जाऊं द्या. आणि तिचें कोणी नांव काढतें

का पहा? रिकाम्या चवकशा करावयाला वेळ असतो कोणाला? आणि मुंबईत तर बोलणेंच नाहीं. पण एखादें मनुष्य, चालचलणुकींत, पोषाखांत विचित्र दिसलें, तर त्याजकडे लोकांचें लक्ष्य लागावें, व त्याविषयीं आपआपसांत कोण, काय ह्मणून चौकशी करावी, हा मनुष्यमात्राचा स्वभावच आहे. आनंदीबाईनें तरी बूटस्टॉकिंग इत्यादि नवा थाट करून चाळींत जावें कशाला? ज्या मनुष्यामध्यें नवें असें कांहींच विशेष दिसणार नाहीं, त्याविषयीं कोणी चर्चाही करणार नाहीं हें उघड आहे. आपला 'दाम कुडा' असतां दुसऱ्याशीं झगडा करण्याची काशीबाईची लेखनबहादुरी तरी ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.

आनंदीबाईचें वर्तन अलीबागच्या लोकांस 'विपरीत वाटूं लागलें.' ह्मणून त्यांस 'व्रात्य' ह्मण; ती मंडळी टाळण्याकरितां कोल्हापुरास गेलें तरी तीच संभावना; तेव्हां तेथील कारभारीमंडळ 'स्त्रीशिक्षणांत बरेंच मन घालतें' असें दिलेलें 'सरटिफिकेट' रद्द करून त्यास पुन्हा 'अगदीं कुत्सितबुद्धीचें व जुन्या चालीचें' ह्मणत बस; मुंबईस कोणी घरांत जेवावयासही घालीनासें झालें, व कुजबुज होऊं लागली ह्मणून चाळीला 'बाजार' ह्मण; बंगाल्यांतही तीच दशा सुटेना ह्मणून बाबूलोकांवर अपशब्दांचा वर्षाव कर; इतकें करीत बसण्यापेक्षां 'टांचणीनें कुंकूं लावणें, पदर तोकडा काढणें, चोळी तंग घालणें, आंबाडा बांधणें, बूटस्टॉकिंग घालणें,' इत्यादि पोक्तपणाचा लोप करणारी वागणूक आनंदीबाईच्याच आंगीं होती हें काशीबाईस उमगावयास पाहिजे होतें. पण तें छपविण्याकरितां त्यांनीं ज्याच्या त्याच्यावर तोंड सोडलें आहे. परंतु, असत्याचीं कितीही ठिगळें जोडलीं तरी, सत्य तें बाहेर ओळखूं आल्यावांचून रहावयाचें नाहीं. आपल्यांतील आबालवृद्धांना, थोरथोरांना, आईबापांना, मुलांलेंकरांना व वडिल माणसांना तीव्र वाक्कुठारानें छिन्नभिन्न करून टाकण्याच्या हौसेसाठींच जर काशीबाईनीं कलम उचललें असेल, तर त्यांनीं तशा प्रकारचें एक स्वतंत्रच पुस्तक करावयाचें होतें. किंवा तोच विषय सदासर्वकाल आपल्या मासिकपुस्तकांत चालू ठेवला असता तरी चालतें. आनंदीबाईच्या चरित्रांत त्याचें कांहीं कारण नव्हतें. पण ह्या तीक्ष्ण कर्णकटुवाक्प्रहारांची ह्या चरित्रांत त्यांनीं इतकी रेलचेल करून दिली आहे कीं, ह्या पुस्तकास 'आनंदीबाईचें चरित्र' ह्मणण्यापेक्षां 'स्वकीय गुरुजनांस व बायकामुलांस नव्या विदुषीनें वाहिलेली अपशब्दांची लाखोली' असें नांव दिलें असतें तर, अगदीं यथायोग्य झालें असतें!

पुढें चालू.

PRINTED and published by Janardan Mahadeo Gurjar AT JAVAJI DADAJI'S "NIRNAYA-SAGARA" PRESS, Bombay.

आर्यधर्माभिमानी लोकांकरितां सचित्र हिंदु घड्याळें.



प्रत्यक्ष देवदेवतांनींच हृदयासन्निध वास केल्यावर अधर्म कितीसा टिकेल.

नमुना मागवा. तुमच्या पहाण्यानेंच आनंद जर होईलच होईल, तर मग वापरण्यानें कां न होणार बरें? देवतांचे दर्शनानें हिंदुधर्माभिमानास भरती नाहींका येणार? नांव ऐकतांच पहावेसें वाटतें व पाहतांच घ्यावेसें वाटतें.

हिंदु घड्याळें कशीं आहेत, दिसण्यांत सुंदर, खिशांत हलकीं, मजबूत, टिकाऊ, अंगचे चावीचीं, तबकडी मित्याची पांढरी असून त्यावर रीतीप्रमाणें रोमन आंकडे असून ठळक मराठी आंकडेही आहेत आणि प्रत्येक आंकड्यामध्यें हिंदुपूज्य देवतांचीं सुंदर चित्रें आहेत. श्रीगणपति, सरस्वती, रामदासस्वामी, हनुमंत, रामसीता, लक्ष्मीनारायण, गरुड, अष्टभुजादेवी, विठ्ठलरखुमाई, शंकरपार्वती, अक्कलकोटस्वामी, श्रीगुरुदत्तात्रय, आणि मध्यभागीं, महाराष्ट्रास जिवंत करणारे गोब्राह्मणप्रतिपालक **श्रीशिवाजीछत्रपतिमहाराज** यांचें सुबक चित्र आहे. अशीं हीं अपूर्व हिंदु घड्याळें आमचे देशबांधव व भगिनी काय ह्मणून न घेतील!

हिंदु सिलेंडर पिक्क नी. सी. वॉच किं. रु. १० ग्या. वर्षे १
हिंदु लिव्हर प्रीव्हेन्स नी. सी. वॉच किं. रु. १५ ग्यारन्टी वर्षे २
हिंदु रासकोप सिस्टीम नी. सी. वॉच किं. रु. १७ ग्या. वर्षे ३
हिंदु प्रिव्हेलन्स चांदीचें वॉच किं. रु. २५ ते ३० ग्या. वर्षे ४
हिंदु सोन्याचें वॉच किं. रु. १०० ते १२५ ग्या. वर्षे ४
हिंदु सचित्र आर्मी वॉचेस किं. रु. १० ते १२५ पर्यंत.

हिंदु सचित्र टाईमपीसेस साधें, अलार्म, स्विंग, जपींगई. आंकड्यांमध्यें देवतांचीं चित्रें, मध्यभागीं दरबारी व अश्वारूढ श्रीशिवाजी, आणि श्रीशंकर पार्वतीसह. किं. रु. ४–६–१० ते ३० पर्यंत. [८

जी० बी० नाईक आणि कंपनी. बिलासिसरोड, नाका भायखळा, मुंबई.

धि इंडियन म्यारेज ऍण्ड डेथ बेनिफिट फंड लिमिटेड, मुंबई.

डिरेक्टर्स.

रावसाहेब दलपतराम प्राणजीवन खक्कर जे. पी.

बद्रुद्दिन अब्दुल्ला कूर एस्क्वायर जे. पी.

रुसतम बी. पेमास्तर एस्क्वायर बी. ए. एल् एल्. बी.

धनजीशा फ्रामजी चिनाय एस्क्वायर.

विष्णु नारायण परुळकर एस्क्वायर (एक्स आफिशिओ.)

मध्यम स्थितींतील मनुष्यांस आपल्या मुलांमुलींच्या लग्नाचे वेळीं व आपल्या मरणानंतर आपल्या वारसाकरितां पैशाचा संग्रह करून ठेवितां यावा झणून हा फंड १८९४ मध्यें स्थापन झाला आहे. इतक्या अवधींत ३००० पेक्षां जास्त मेंबर झाले असून सरासरी १५० मेंबरांस फायदा मिळाला आहे. लग्नफंडाची वर्गणी दर महिन्यास १। पासून ६। रु. पर्यंत आहे.

मरण-फंडाची वर्गणी फक्त १ रुपया आहे.

व या मरणफंडांतील मेंबरांच्या पश्चात् त्यांच्या वारसास २००० रुपयेपर्यंतची रक्कम फायद्यादाखल मिळेल. जास्त माहिती खालील पत्त्यावर एक आण्याचें तिकिट पाठविल्यानें मिळेल. [७–१२

आफीस–५
कावसजी पटेल स्ट्रीट,
फोर्ट, मुंबई.

परुळकर ऍण्ड कं०
एजंट्स.

व्यापारी व ग्राहक ह्यांकरितां.
हरएक प्रकारचा माल मुंबईत मिळणारा वक्तशीर बाहेरच्या लोकांस मिळण्याची सोय.

D. K. SANDU
RAMWADI, BOMBAY.

दत्तात्रेय कृष्ण सांडू ह्यांचें हरएक प्रकारचा माल मिळणारें, आणि माफक अडत घेऊन माल रवाना होणारें दुकान;—
रामवाडी, मुंबई.

वा. कृ. सांडू. दुकानदार—रामवाडी, मुंबई.

यांचा कदाचित् गुण नच आल्यास पैसे परत देऊंच.

मंत्रसिद्ध ताईत व दोरे.

हिमालयावरील एका महान् तपस्वी (सिद्ध) पुरुषानें आमच्या निःसीम भक्तीस तुष्ट होऊन आपला अत्यंत उपयोगी असा जो पिशाचबाधा व दुसरे अनेक विकार दूर होणारा अद्भुत मंत्र तो ताईत व दोरे मंत्रून देण्यास शिकविला आहे. व त्या योगानें खालील विकार फार त्वरित बरे होतात. पिशाचादि पीडेनें मुलें, स्त्रिया किंवा पुरुष झोंपेत अगर जागृतावस्थेंत घाबरतात, कंप सुटतो, वेड लागतें, दांत ओंठ चावतात, दचकून उठतात, व कधीं ज्वरादि विकार उत्पन्न होतात आणि कित्येक प्रसंगीं अपस्मार, भ्रम वगैरे. अत्यंत वाईट रोग उत्पन्न होतात. कित्येक स्त्रियांस पिशाचादि पीडेनें संतती होत नसते व झालीच तर वांचत नसते. कित्येकांस स्वप्नामध्यें स्त्रीचा भास होऊन धातुपात होतो; कित्येक स्त्रीपुरुषांमध्यें व कित्येक मित्रांमध्यें वैमनस्यें उत्पन्न होतात, इत्यादि अनेक विकार या आमच्या अद्भुत मंत्रसिद्ध ताईत व दोरे यांनीं फार त्वरित खात्रीनें बरे होतात. गुणाबद्दल हजारों सर्टिफिकिटा मिळाल्या व मिळत आहेत. थोड्याच काळांत याचे अपूर्व गुण या देशाच्या, आसमंतात् भागीं ब्रह्मदेश, सिलोन, बनारस, पंजाब, मद्रास, मुंबई, कानडा, इत्यादि ठिकाणीं अतिशय पसरले आहेत. सबब जास्त वर्णन करीत नाहीं. सिद्धमंत्र खोटे ह्मणणारांनीं एकवार अनुभव घेऊन पहावा, ह्मणजे ते नेहमींच ग्राहक बनतील. पुरुषांचे विकारांस दोरा, किं० ८ आणे. स्त्रियांचे विकारांस ताईत १ रु०; रुप्याचा २ रु०; सोन्याचा ६; कित्येक रोगांस दोन वस्तू ध्याव्या लागतील. दोन वस्तू घेणारास ४ आणे, टपालखर्च माफ. एकवार अनुभवानेंच पूर्ण खात्री होईल. माहितीखर्डा सोबत पाठविला जाईल. व्ही. पी.नें. पाठवूं. पत्ता स्पष्ट व पूर्ण लिहावा.

विष्णुबोवा सिद्धमांत्रिक.
पत्ता—पोष्ट हर्णे, जिल्हा रत्नागिरी.

अमूल्य पुस्तकांची दुर्मिळ संधि.

अभिनवस्त्रीचरित्र—साहसी स्त्रियांच्या मनोरंजक गोष्टी. कि०. १ रु.
श्रीमंत नारायणरावपेशवे ह्यांच्या मृत्यूचा फार्स. कि० ८८.
वसंतविलास कादंबरी. कि० ८६.
इंद्रजाल तंत्र मंत्र यंत्र. कि० ८६.
चतुर लोकांच्या नकला. कि० ८६.
कजाग सासू. प्रत्येक सासूसुनेला एक वेळ वाचून दाखवावें. कि० ८४.
सूचना—ह्या १९१४ चीं ६ पुस्तकें जुलई अखेरपर्यंत घेणारास १९६ स देऊन शिवाय चार आण्यांचें पुस्तक वक्षीस मिळेल. ट. ख. नि.
पत्ता—आर. सि. हिरेमठ आणि कंपनी मु. खानापूर जि. बेळगांव.

केरळकोकिळाच्या वर्गणीदारांस रु. १९१४ ट. ख. ८४.

वैद्यकशार्ङ्गधरसंहिता.

नवीन मराठी भाषांतरसहित.

पृष्ठसंख्या–५२७–किं. रु. २॥ ट. ख. ।।

" अर्वाचीन सर्व ग्रंथांमध्यें शार्ङ्गधरसंहिता अत्युत्तम होय. ह्यामध्यें सर्व विषयांची व्यवस्था जशी अनुक्रमानें लावलेली आहे तशी दुसऱ्या कोणत्याही ग्रंथांत केलेली आढळत नाहीं. ह्या ग्रंथांत जे प्रयोग लिहिले आहेत ते सारे अनुभव घेऊन त्यांचें यथार्थ गुणवर्णन केलें आहे. ह्यांत इतर ग्रंथांप्रमाणें औषधांची अतिशयोक्ति नाहीं. अशा प्रकारचा सर्वोत्तम लोकप्रिय ग्रंथ असून त्याच्या प्राकृत भाषांतरामध्यें–प्राकृत टीकाकाराचे स्वतः असोत किंवा लेखकाचे असोत जे प्रमाद झालेले आहेत त्यांची दुरुस्ती छापणारांनीं आजपर्यंत केलेली नाहीं. कित्येकांनीं तर कांहीं बाहेरचा ग्रंथच ह्यांत घुसडून दिला आहे. हे सर्व घोंटाळे काढून करवेल तितकें शुद्ध व सरळ भाषांतर केलें असून विषयानुक्रमणिकेशिवाय आजपर्यंत न झालेली रोगानुक्रमणिका दिली आहे. त्यामुळें कोणत्या रोगावर काय औषध हें झटकन् पाहिजे त्यास समजतें. प्रसिद्ध प्रसिद्ध अशा वैद्यांच्या सूचनेप्रमाणें ह्यांत शक्य ती सुधारणा केली आहे. व्ही. पे.नें पाठवूं.

जनार्दन महादेव गुर्जर, रामवाडी–मुंबई.

सप्टंबर. (वर्षांची वर्गणी १८३ टा. खर्चासह. फुटकळ अंकास ८४.) १८९६.

केरळकोकिळ.

वर्षारंभ जानेवारी.

पु० १०] [अं० ९

विधिरेव विशेषगर्हणीयः करट त्वं रट कस्तवापराधः ॥
सहकारतरौ चकार यस्ते सहवासं सरलेन कोकिलेन ॥१॥

जनार्दन महादेव गुर्जर बुकसेलर आणि पब्लिशर.
रामवाडी
मुंबई.

सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत.

वैद्य.

ह्या पुस्तकांतील लेख कोची (मलबार) येथें तयार होऊन, ते मुंबई येथें छापून प्रसिद्ध होतात.

विषयांची अनुक्रमणिका.

पृष्ठ.
सौभाग्यवती रखमाबाई केळोकर. (लेडी सुपरिंटेंडेंट, कोल्हापूर.) १९३

पुस्तकाची पोंच.

दापोलीबोर्डिंगहाउसचे—(बालसंवर्धनालयाचे) व्यवस्थापक यांजकडून ह्या संस्थेच्या माहितीचें आलेलें पुस्तक.

आह्मी बरेच दिवस या संस्थेबद्दल ऐकत होतों, व कित्येक आमच्या मित्रांनीं तिकडील व्यवस्था सद्यस्थितीला अनुरूप अशी असते असें सांगितलें होतें त्याप्रमाणें ती आहे अशी माहिती मिळाल्यावरून खात्री होते.

आमचें मनांत, ही संस्था प्रत्यक्ष पहावयाची आहे, त्या वेळीं सविस्तर लिहूं. तरी तूर्त निराश्रित स्थितींत ही संस्था आज अर्धे तपपर्यंत चालविल्याबद्दल तेथील व्यवस्थापकांचें आह्मी अभिनंदन करितों.

जनककन्या रामभार्या–

सीता.

स्वयंवरापासून तों रामराज्याभिषेकापर्यंत, रामायणांतील, मराठी भाषेंत सर्व कथा मुख्यत्वें स्त्रियांनीं, मुलांनीं व पुरुषांनींही वाचण्याजोगी आहे. किंमत २ रु. पण केरळकोकिळचे वर्गणीदारांस मात्र फक्त रु. १॥ ट. ख. माफ.

जनार्दन महादेव गुर्जर, दुकान रामवाडी–मुंबई.

॥ ओं नमः श्रीरामचंद्राय ॥

आर्यमहौषधालय मु० आंजलें.

या अत्यंत खात्रीच्या औषधाचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यांस कदाचित् आला नाहीं तर पैसे परत देऊंच व त्याशिवाय त्यांच्या आरोग्यार्थ एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकटच देऊं.

मदनविलासामृतसंजीविनी.

वीर्यस्तंभक, रक्तशोधक, अत्यंत कामोत्तेजक, चित्तोत्साहक, बुद्धि-कांतिवर्धक व धातुपौष्टिक सुवर्णमाक्षिक मौक्तिक कस्तूरीमिश्र अपूर्व गुटिका.

१. शरीराची उत्तम सुधारणा करणारीं अत्यंत महत्वाचीं जीं औषधें आहेत, त्यांत या गुटिका अगदीं पहिल्या प्रतीच्या ठरल्यामुळें यांचे अपूर्व गुण थोड्याच काळांत या देशाच्या सर्वभागीं व त्यांच्या आसमंतात् अतिशय पसरले आहेत. या सेवन केल्यानें नपुंसकत्व, इंद्रियशिथिलता, कडकी, जीर्णज्वर, अग्निमांद्य, अशक्तता, स्वप्नजन्य किंवा इतर धातुपात, छातींतील रोग, मेंदूचे विकार, पांडुरोग, क्षय, मूत्रसंकोच किंवा मूत्रातिरेक, कटिशूल, वातरोग, उपदंशसंबंधी मुरलेले विकार, हात, पाय, मूत्रमार्ग, व शरीर यांचा दाह, व अरुचि, इ० अनेक विकार कितीही वर्षाच्या मनुष्यास नवीन किंवा जुनाट असले तरी खात्रीनें बरे होतात. धातु व रक्त यांची शुद्धि व वृद्धि होऊन रक्तदूषणजन्य अनेक रोग हटकून बरे होतात. वीर्यस्तंभन, व कामोद्दीपन होऊन अग्नि व शक्ति भरपूर वाढते. स्त्रियांची धुपणी व संततीस अपायकारक जे गर्भाशयस्थ रोग त्यांचें त्वरित निवारण होऊन कांति, स्मरणशक्ति व बुद्धि वाढते. ज्यांस शारीरिक व मानसिक श्रम फार पडतात, त्या सर्वांच्या आंगीं यांनीं अतिशय शक्ति येऊन मनास उत्साह प्राप्त होतो, सुस्ती जाते. ज्यांस दूध व जडान्न पचत नाहीं त्यांस तें भरपूर पचूं लागतें, कोष्ठशुद्धि होते. या अप्रतिम गुटिका अत्यंत शोधानें केल्या असून त्यांच्या अप्रतिम गुणका-

रित्वाबद्दल हजारों सर्टिफिकिटें मिळालीं व नित्य मिळत आहेत. यांत अपायकारक पदार्थ बिलकूल नाहींत. वरील सर्व रोग जाऊन उत्तम गुण प्राप्त होण्यास या गुटिकांसारखें अप्रतिम औषधच नाहीं असें पूर्ण अनुभवावरून स्पष्ट ह्मणतों. यांस पथ्यसेवनाची गरज नसतां या पाहिजे त्या दिवसांत घेतल्या तरी हटकून गुण करितात. यामुळें त्यांचा अतिशय खप सुरू आहे. गोळ्या रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम सहा रुपयांच्या किंवा त्यांहून कितीही जास्त गोळ्या घेणारांस बंगीचा सर्व टपाखर्च माफ आहे. त्यांचे आंत घेणारांस मात्र तो वेगळा सहा आणे पडेल. एकदम ३२ गोळ्यांस १ रु. ७० गोळ्यांस २ रु. १६० गोळ्यांस ४ रु. २६० गोळ्यांस ६ रु. ५२० गोळ्यांस १० रु.

थंडगार नेत्रांजन—हें अंजन स्तुतीस अत्यंत पात्र आहे, हें सतत दहा वर्षांच्या पूर्ण अनुभवानें कळवितों. यानें डोळ्यांचे साधारण विकार तर सहजच, परंतु दृष्टीचा समूळ नाश करणारे, तिमिरांध्य, वडस, बिंदु, फुलें, कांच, सारा, भोर, गळती, खुपऱ्या, जळजळ, कंड, फूट, चिकटा, ठणका व लाली इ० अनेक विकार, तत्संबंधी मस्तकशूलादि विकारांसह कितीही वयाच्या मनुष्यास कोणत्याही कारणांनीं प्राप्त झालेले नवीन किंवा जुनाट असले तरी नाजूक रीतीनें कोणतीही इजा न होतां बरे होतात. दृष्टि तीव्र व थंडगार राहते. हें चांगल्या दृष्टीच्या मनुष्यांनींही डोळ्यांत घातल्यास वरील विकार त्यांस बिलकूल होणार नाहींत. लहान मुलांस तर हें अत्यंत उपयोगी आहे. २ तो० ड० १॥ रुपया.

विशेष सूचना.—अलीकडे आंजलें व मुर्डी वगैरे गांवांतील औषधांच्या बऱ्याच जाहिराती सुरू आहेत व त्यांपैकीं कांहीं जाहिरातींत ज्या सह्या आहेत त्या बहुतेक आमच्याच नांवासारख्या भासण्याचा विशेष संभव आहे. तरी अशा लोकांशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं हें अवश्य लक्षांत ठेवून आमचीं औषधें **"कृष्णशास्त्री बिवलकर वैद्य. मु० आंजलें ता० दापोली जि० रत्नागिरी."** याच पत्त्यावर रोखीनें किंवा व्ही.पी.नें मागवावींत. अनुपानपत्रक सोबत असतेंच.

३–१२]

सौभाग्यवती रखमाबाई केळोकर.

लेडी सुपरिंटेंडेंट, कोल्हापूर.

संपत्सरस्वती सत्यं संतानं सदनुग्रहः ।
सत्ता सुकृतसंभारः सकाराः सप्त दुर्लभाः ॥ १ ॥

संपत्ति, सरस्वती, सत्य, संतान, सदनुग्रह, सत्ता, आणि सुकृतसंचय; हीं सात एकत्र आढळणें पुरुषांत सुद्धां दुर्लभ, मग तीं स्त्रीजातीमध्यें आढळणें त्याहूनही दुर्लभ हें सांगणें नकोच. प्रस्तुतकालीं आमच्या देशांत स्त्रीशिक्षणाच्या संबंधानें मोठी चळवळ चालली आहे; त्यांत उच्चप्रतीच्या शिक्षणाच्या संबंधानें तर विशेषच. नवीन विद्वानांचें असें मत आहे कीं, आपल्या स्त्रियांना उच्चप्रतीचें शिक्षण मिळाल्याशिवाय,

कोणत्याही बाबतींत आपली उन्नति होणार नाहीं. आणि बहुसमाजाचें ह्मणणें असें आहे कीं, सद्यस्थितींतील उच्च शिक्षण दिलें असतां, स्त्रिया शिरजोर होतील, पतिप्रेमाचा बिघाड होईल, विनयादि गुण अस्तास जातील, स्वधर्मावरची श्रद्धा उडेल, दंपत्यसुखावर पाणी पडेल, संसाराची माती होईल, आणि पूर्वापार चालत आलेल्या सुखावह समाजपद्धतीचा विध्वंस होऊन जाईल. आणि ह्याच्या पुष्टयर्थ त्याच्याकडून वरींच उदाहरणें दाखविण्यांत येतात. आणि मधून मधून कित्येकांच्या नेत्रांस त्याचा प्रत्यक्षतःही अनुभव येतो. 'विद्या ददाति विनयम्' ह्या न्यायानें ह्मटलें ह्मणजे विदुषी स्त्रिया खरोखर अधिक सुशील, व अधिक विनयसंपन्न व्हाव्यात. परंतु बहुधा प्रकार दिसतो उलट. पायाशुद्ध शिक्षण, मनोनिग्रहांत दृढता, व स्वभावांत प्रौढपणा राहील, तर अशी गोष्ट होणार नाहीं. ह्यास्तव ह्या आणीबाणीच्या प्रसंगीं नूतन विद्याविभूषित स्त्रियांनीं, नव्या विद्येंतही पारंगत होऊन, स्वधर्मांत तत्पर राहून, विनयानें युक्त होऊन, पाश्चात्य आचारविचारांपासून अलिप्त राहून, पातिव्रत्यानें वागून प्रतिपक्षाच्या मंडळीस लज्जित केलें पाहिजे. आणि त्यांना त्यापासून जो अनर्थावह परिणाम होईल अशी भीति पडली आहे, ती दूर केली पाहिजे. पण तसें कोणाकडून घडत असल्याचें दिसत नाहीं. निदान आमच्या पहाण्यांत तरी, हें पहिलेंच उदाहरण ह्मटलें तरी चालेल, तें कोणाचें? तर शिरोभागीं निर्दिष्ट केलेल्या साध्वी सौभाग्यवती **रखमाबाई केळोकर** ह्यांचें. ह्या बाईना जे जे कोणी पहातील, किंवा त्यांची विद्वत्ता, सौजन्य, पतिनिष्ठा, विनय, शालीनता, धार्मिकता इत्यादि गुण श्रवण करतील, त्यांच्या मनांत स्त्रीशिक्षणाविषयीं कितीही दुराग्रह असला, तरी तो खचित पालटेल. आणि शिरोभागीं दिलेले सप्त सकार त्या ठिकाणीं कसे एकत्र नांदतात, ह्याचें कौतुक दृष्टीस पडेल. ह्यासाठीं मोठ्या आनंदानें त्यांचें अल्पसें चरित्र आमच्या वाचकांस आह्मी सादर करीत आहों.

परंतु एका गोष्टीबद्दल मोठी दिलगिरी वाटते. ती गोष्ट ह्मणजे, सदरहू चरित्र विस्तारपूर्वक लिहिण्यास जीं साधनें अनुकूल असावींत तीं नाहींत ही. चरित्राचें मुख्य साधन ह्मटलें ह्मणजे, ज्याचें चरित्र लिहावयाचें, त्याच्या मुखांतून त्याचा थोडा तरी आयुःक्रम ऐकणें हा होय.

परंतु ती गोष्ट, प्रस्तुत चरित्राच्या संबंधानें केवळ अशक्य होय. कारण, **रखमाबाई** ह्या अतिशय सत्वस्थ वृत्तीच्या असल्यामुळें, त्यांना आत्मश्लाघेचा मनस्वीच तिटकारा आहे. आपण नांवाजण्यासारखें लोकहित कांहीं केलें आहे, असें त्यांस मुळींच वाटत नाहीं. येवढेंच नव्हे, तर असें करणें ह्मणजे केवळ लब्धप्रतिष्ठितपणा मिरविणें असें त्यांचें ठाम मत आहे. तेव्हां त्यांच्या तोंडांतून त्यांच्या आयुःक्रमाची माहिती निघण्याची मुळींच आशा नको. ह्या प्रसंगीं त्यांच्या फोटोनें आमचा अंक सुशोभित करतां आला, हेंच आमचें मोठें सुदैव असें आह्मी समजतों. कारण, कोल्हापूरच्या फीमेल ट्रेनिंग कॉलेजावरच्या पूर्वीच्या **लेडी सुपरिंटेंडेंट मिस् लिटल्** ह्यांचा व **रखमाबाई**चा अत्यंत स्नेह असतां, त्यांस स्वतः फोटोग्राफ घेतां येत असतां व त्यांनीं तो मोठ्या प्रेमानें काढून घेतें ह्मटलें असतां, त्यांनीं ती विनंती मोठ्या विनयानें अमान्य केली! व तो पुढेंही यावज्जन्मांत काढावा असें त्यांच्या मनांत नव्हतें. परंतु फोटोग्राफचें काम आह्मी स्वतःच करीत असल्यामुळें, मोठ्या मिनतवारीनें तो आह्मीं काढून घेतला. त्यास किती प्रयास पडले, ते वाचकांस सांगून पुरवणार नाहींत. केवळ पतिवचनास मान देण्यासाठींच त्यांनीं तेवढें काम अंगिकारलें. त्या वेळेस तरी, तो प्रसिद्ध होईल, त्यासोबत आपलें चरित्र येईल ही कल्पनाही त्यांच्या पुढें नव्हती, ह्मणूनच मिळाला. ह्यापैकीं यत्किंचित् सुगावा जर का **रखमाबाई**च्या मनास लागता, तर साराच कारभार आटपता. सौ० **रखमाबाई**ंस आपण नांवाजण्यासारखें कांहीं केलें नाहीं, किंवा आपल्या हातून कांहीं घडलें नाहीं असें जरी वाटत आहे, तरी झालेलें–नव्हे–करून दाखविलेलें–ही लोकदृष्टचा कांहीं कमी नाहीं. त्यांचें आचरण, त्यांची विद्या, त्यांची सुशीलता, त्यांची कर्तबगारी, त्यांचें धैर्य, त्यांचें सौजन्य इत्यादि गुण, नव्या व जुन्या पक्षांनींही नांवाजण्यासारखे, स्त्रीशिक्षणाविषयीं आदरबुद्धि उत्पन्न करण्यासारखे, आबालवृद्धांनीं पवाडे गाण्यासारखे, व होतकरू स्त्रियांनीं कित्ता वळविण्यासारखे आहेत. हे विचार मनांत आणून आह्मी त्यांच्या परवानगीशिवायच त्यांचें चित्र व चरित्र प्रसिद्ध करण्याचें धाडस केलें आहे. ह्याबद्दल सौ० **रखमाबाई**नीं क्षमा करावी, असें विनयपूर्वक त्यांस मागणें आहे. व तसेंच वरील अडचणी

मनांत आणून, विस्तृत चरित्र न दिल्याबद्दल वाचकांनींही आह्मांवर रुष्ट न होतां, त्यांच्या आप्त व मित्रमंडळीकडून मिळालेल्या त्रोटक माहितीवरच आज मितीस गुजारा करून घ्यावा, येवढें सुचवून मुख्य विषयाकडे वळतों.

सौ० **रखमाबाई** ह्या जातीनें वैश्य आहेत. **मुंबई, सोलापूर, विजापूर, वसई** वगैरे प्रांतांत ह्यांच्या ज्ञातीची मंडळी आहे. यांचा जन्म मुंबईस १८५७ च्या सुमारास झाला. बाळपणीं यांस विद्येचा कांहीं संस्कार नव्हता. त्यांचें लग्न सन १८६८ चे सुमारास मुंबईस डाक्टर **कृष्णाजी दादाजी** नांवाच्या गृहस्थांबरोबर झालें. येथपासूनच ह्यांच्या चरित्रास आरंभ झाला ह्मणावयास हरकत नाहीं. राजश्री **कृष्णाजी दादाजी** ह्यांचें मूळ गांव **वसई**. त्यांनीं **मुंबईत ग्र्याण्ड मेडिकल कालेजा**मध्यें अभ्यास करून परीक्षा दिली. ह्या गृहस्थांचा स्वभाव पहिल्यापासूनच विद्याव्यसनी आहे. ते जसे वैद्यकीय विद्येंत व इंग्रजींत निपुण आहेत, तसेच मराठी भाषा, व्याकरण, कविता इत्यादि विषयांतही निपुण आहेत. ह्या गृहस्थांचा पहिल्यापासूनच स्त्रीशिक्षणाकडे फार ओढा आहे. त्यांच्या मनानें असें घेतलें आहे कीं, आपल्या स्त्रियांना उच्चप्रतीचें शिक्षण अवश्य पाहिजे. त्यापासून आपल्या लोकांचें कांहीं एक नुकसान होणार नाहीं येवढेंच नव्हे, तर उलटें मोठें हित होईल. स्त्रीशिक्षणापासून अनिष्ट परिणाम होईल, ह्मणून जी भीति लोक बाळगतात, ती व्यर्थ आहे. इतकेंच कीं, तें शिक्षण जसें व्हावें तसें पायाशुद्ध असलें ह्मणजे झालें. त्याप्रमाणें आपल्या पत्नीस आपण स्वतःच शिक्षण देऊन सुशिक्षित करावयाचें, असा निश्चय करून त्याप्रमाणें त्यांनीं क्रम सुरू केला. लग्न होईपर्यंत ह्यांस शिक्षणाचा गंधही नव्हता, हें खरें; तरी त्या मोठ्या बुद्धिमती होत्या. यामुळें त्यांस लवकरच चांगलें बालबोध लिहितां वाचतां येऊं लागलें. त्यामुळें **कृष्णाजी**सही अधिक शिक्षण देण्याची उमेद आली. पत्नीला शिक्षण देणें हा एक त्यांचा करमणुकीचा व्यवसायच होऊन बसला. दवाखान्यांत जाणारा वेळ, व खासगी रीतीनें रोग्यांच्या घरीं जाऊन चिकित्सा करण्यांत जेवढा काल जाई, तेवढा खेरीज करून बाकीचा त्यांचा सारा वेळ पत्नीच्या शिक्षणाकडे जात असे.

वस्तुतः त्या कालीं **कृष्णाजी दादाजी** व **रखमाबाई** हीं उभयतांही यौवनसंपन्न होतीं. द्रव्यासंबंधानेंही त्यांची स्थिति चांगल्या प्रकारची होती. तेव्हां जनरीतीप्रमाणें व वयोमानाप्रमाणें त्यांनीं ऐषआरामांत चूर होऊन जावें. परंतु तशा प्रकाराकडे त्यांचें उभयतांचें लक्ष फारच जुजबी होतें. पण त्या वयांत **रखमाबाई**पेक्षां **कृष्णाजी**च्या सद्धेतूचीच तारीफ करणें योग्य आहे. त्यांची, पत्नीस शिक्षण देण्याची पद्धति फारच नांवाजण्यासारखी व सर्व लोकांनीं कित्ता घेण्यासारखी होती. ह्मणजे तिच्यांत मनास श्रम न पडतां, जिवास कंटाळा न येतां, साहजिक ज्ञानप्राप्ति व्हावी, हा मुख्य उद्देश होता. नेहमींची त्यांची उठण्याबसण्याची खोली अशा रीतीनें सुशोभित केली होती कीं, तिच्यांतील कोणत्याही भिंतीकडे, चित्राकडे, किंवा पदार्थाकडे नजर गेली, तर त्यापासून कांहींना कांहीं तरी ज्ञान व शिक्षण हें मिळावेंच. त्यांनीं तेथील भिंतीस गोलाचे, गोलार्धाचे, व खंडाचेच नकाशे टांगले होते, असें नाहीं; तर, ज्या नकाशांत सर्व पृथ्वीवरील नद्याच आहेत, सारे पर्वतच आहेत, सारीं सरोवरेंच आहेत, अशा प्रकारचे परोपरीचे नकाशे, मुद्दाम मिळवून आणून टांगून ठेवले होते. ज्यांच्यावर तुकाराम, रामदास, मोरोपंत इत्यादि कवींचीं वाक्यें लिहिलेलीं आहेत, असे मोठमोठाले कागद लावले होते. रेशमी किडे, **ओऱ्यांगोऱ्यांग, क्यांगरू**, अशा प्रकारचीं मोठमोठालीं रंग भरलेलीं प्राण्यांचीं चित्रें ठिकठिकाणीं टांगलीं होतीं. त्यांची अभ्यासाची खोली ह्मणजे तें एक सरस्वतीचें विश्रांतिमंदिरच होतें. मग त्यांत **रखमाबाई**स विश्रांति मिळाली व सरस्वतीशीं त्यांचें जीवस्य कंठस्य सख्य झालें ह्यांत आश्चर्य तें काय? डाक्टर हे आरामखुर्चीवर पडले असतां, त्यांची साहजिक ज्या ज्या पदार्थावर नजर जाई, त्या त्या पदार्थांची, किंवा साहजिक संभाषणांत जो विषय निघे त्याची माहिती, ते आपल्या पत्नीस सविस्तर सांगत. व **रखमाबाई**ही ती मोठ्या उत्सुकतेनें श्रवण करून मनांत नीट रीतीनें ग्रहण करीत. इतिहासांतील एक एक गोष्ट एकाद्या मनोरंजक कादंबरीप्रमाणें त्यांनीं त्यांच्या मनांत ठसवून द्यावी. गणित आणि व्याकरण हे विषय–निदान स्त्रियांना तरी–शिकण्याला कंटाळवाणे वाटण्याचा संभव आहे. परंतु ते विषय **रखमाबाई**स कोणत्या प्रकारें अवगत आहेत, हें त्यांनीं

कोल्हापूर येथील ट्रेनिंगाचें काम एकट्यानीं किती उत्तम प्रकारें बजाविलें आहे, ह्यावरून उघड होतें. हें सर्व **कृष्णाजी दादाजी**ंच्या परिश्रमाचें फल होय. जे लोक इंग्रजी भाषेंत प्रवीण होतात, त्यांची जन्मभाषा,–ह्मणजे मराठी,–कविता, इत्यादि विषय बहुधा कच्चे असतात, असा साधारण नियम आहे. परंतु **कृष्णाजी दादाजी** ह्यांची स्थिति मात्र अगदीं उलट आहे. त्यांच्या पुढें कोणताही विषय काढा, त्यांची त्यामध्यें मार्मिकताच दिसून येते. असो.

अशा रीतीनें मराठी लिहिणें, वाचणें, गणित, व्याकरण, इतिहास, भूगोल इत्यादि विषयांशीं **रखमाबाई**नीं परिचय करून घेतला. आणि तोही घरांतील सर्व काम सांभाळून! वास्तविक हें सर्व शिक्षण घरगुती होतें. तरी तें उत्तम प्रकारचें झालेलें होतें, ही गोष्ट पुढें येणारी असल्यामुळें येथें त्याविषयीं अधिक उल्लेख करण्याचें प्रयोजन नाहीं. मराठी अभ्यास चालला असतां, **रखमाबाई**नीं इंग्रजी शिकण्यासही आरंभ केला. आणि त्यांतही थोडेच दिवसांत यश मिळविलें. ह्याप्रमाणें **अ-ल्लीबागे**स असतां, किंवा जेथें जेथें ह्या होत्या तेथें तेथें **रखमाबाई** हें एक झांकलें माणीक होतें. त्यांस लिहितां वाचतां येतें, ह्याविषयीं शेजाऱ्या पाजाऱ्यांस सुद्धां फारच थोडी कल्पना होती. परंतु रत्नाचें तेज झांकून किती दिवस राहणार? केव्हांना केव्हां तरी तें चमकावयाचेंच. त्याप्रमाणें एक वेळ एक मोठा चमत्कारिक योग आला. तो प्रकार असाः— डाक्टर **कृष्णाजी दादाजी** हे आपल्या कार्यांत तत्पर, स्वभावानें मनमिळाऊ, व स्वतःस झीज सोसणारे असल्यामुळें, त्यांचें वरिष्ठ अधिकाऱ्यापाशीं चांगलें वजन असे. डाक्टर **जॉनस्टन्** ह्या नांवाचे गृहस्थ हे त्या वेळचे त्यांचे वरिष्ठ अधिकारी होते. त्यांची **कृष्णाजी दादाजी** ह्यांजवर मोठी मर्जी होती. एके दिवशीं अकस्मात् डाक्टर साहेब हे **कृष्णाजी दादाजी**ंच्या हास्पितलाची तपासणी करण्यासाठीं आले. व येतांच शिपायाबरोबर डाक्टर **कृष्णाजी** यांस चिठ्ठी लिहिली कीं, आपण जरूर येऊन मला भेटून जावें. पण त्याच दिवशीं **कृष्णाजी दादाजी** हे एका रोग्यास पाहण्यासाठीं, पांच सहा मैलांवर एक गांव होतें, तेथें गेले होते. तेव्हां अर्थातच ती चिठ्ठी **रखमाबाई**च्या हातीं आली. त्यांनीं ती वाचून पाहिली, व ती इंग्रजींत होती ह्मणून ति-

च्याच खालीं त्यांनीं इंग्रजींत उत्तर लिहिलें कीं, "डाक्टर **कृष्णाजी** हे एका रोग्यास पहाण्यासाठीं परगांवीं गेले आहेत, ते आज संध्याकाळीं किंवा उद्यां सकाळीं येथें परत येतील." हें डॉक्टर **जॉन्स्टन**नें वाचून पाहिलें. पण त्याखालीं कोणाचीच सही नव्हती, ह्मणून तोही मोठ्या संशयांत पडला.

सायंकाळीं **कृष्णाजी** घरीं परत येऊन, लागलेच डाक्टर **जॉन्स्ट**नच्या भेटीस गेले. त्या भेटींत साहेबांनीं **कृष्णाजीं**स असा प्रश्न केला कीं, "माझ्या चिठ्ठीवर उत्तर कोणीं दिलें?" तेव्हां ते मोठ्या विनयानें ह्मणाले कीं "तें माझ्या पत्नीनें लिहिलें." तेव्हां साहेबांस मोठें आश्चर्य वाटलें. व "तुमची पत्नी इंग्रजी उत्तर देण्याइतकी सुशिक्षित आहे, तर त्यांनीं इतका अभ्यास कोठें केला?" असा साहजिकच साहेबांनीं प्रश्न केला. कारण त्या वेळीं हल्लीं इतका विद्येचा प्रसार नव्हता. ह्या वेळीं डाक्टर **कृष्णाजी** ह्मणाले "त्या कोणत्याच शाळेंत शिकलेल्या नाहींत. मीच फावल्या वेळांत तिला मार्ग दर्शवून, तिनें आपलें ज्ञान स्वतःच वाढविलेलें आहे." हें ऐकून त्या साहेबांस तर मोठाच विस्मय वाटला. आणि मोठ्या अदबीनें त्यानें **कृष्णाजीं**स विनंती केली कीं "आपल्या पत्नीचें दर्शन मला होईल काय?" ती गोष्ट त्यांनीं मोठ्या आनंदानें मान्य केली. दुसऱ्या दिवशीं रीतीप्रमाणें हास्पितलाची तपासणी वगैरे झाल्यावर **कृष्णाजीं**नीं साहेबांस आपल्या पत्नीची ओळख करून दिली. त्यांची ती सौम्य मुद्रा व साधी वागणूक इत्यादि गोष्टी पाहून, ह्यांनींच आपल्या चिठ्ठीवर उत्तर लिहून दिलें असेल, हें त्या साहेबांस खरें सुद्धां वाटेना. परंतु पुढें संभाषणांत त्यांच्या विद्वत्तेविषयीं त्यांची अगदीं बालंबाल खात्री झाली. आणि आश्चर्यानें अगदीं चकित होऊन गेले. केवळ खासगी रीतीनें, कोणत्याही विद्यालयाची पायरी न चढतां, इतक्या योग्यतेचें शिक्षण झालेलें पाहून कोणासही नवल वाटावें हें साहजिकच आहे. व त्यामुळें साहेबबहादुरांचा उभयतांवरही फारच लोभ जडला.

वस्तुतः डाक्टर **कृष्णाजीं**नीं आपल्या पत्नीस विद्या शिकविली, किंवा **रखमाबाई** शिकल्या, त्या वेळीं त्यांनीं पुढें नोकरी करावी, किंवा दोन पैसे मिळवावेत, ही गोष्ट उभयतांच्याही ध्यानींमनीं नव्हती. डा-

क्टर **कृष्णाजी**नीं केवळ मनोल्हासासाठीं, पत्नीच्या उन्नतीसाठीं, ज्ञानानें त्यांस आपलेबरोबर आणण्यासाठीं, स्वतःच्या समाधानासाठीं व प्रपंचोपयोगासाठीं शिक्षणाचें काम केलें होतें. परंतु ईश्वरी संकेत कांहीं वेगळाच असतो, तो कधीं कधीं मनुष्याच्या तर्काच्या बाहेर जातो. तीच गोष्ट ह्या दंपत्याच्या संबंधानें घडून आली, आणि सरकारी नोकरीचें जूं मानेवर घेण्याचा त्यांस प्रसंग आला. तो हृदयद्रावक प्रकार ह्यापुढें सांगणें भाग आहे.

सुखामागून दुःख, आणि दुःखामागून सुख, हें जगांतलें नेहमींचें रहाटगाडगेंच आहे. डाक्टर **कृष्णाजी** व सौ. **रखमाबाई** ह्यासारखें सुखी दंपत्य त्या वेळीं कोणी नव्हतें. शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या तरुण स्त्रीपुरुषांनीं सुद्धां त्यांचा हेवा करावा अशी त्यांची स्थिति होती. उभयतांचीं वयें, उभयतांचे स्वभाव, उभयतांची उत्सुकता, उभयतांची मनोवृत्ति, उभयतांची ज्ञान संपादण्याविषयीं हौस व प्रेम हीं एकमेकांशीं अगदीं स्पर्धा करण्यासारखीं होतीं. **रखमाबाई**चा स्वभाव, पहिल्यापासूनच मोठा सात्विक, दयाळू व पापभीरू असा होता. आणि त्यावर आतां विद्येचा संस्कार घडल्यामुळें तो अतिशयच प्रगल्भदशेस आला. अशा प्रकारें हीं उभयतांही सुखांत संसार करीत असतां, व अखिल विद्याव्यसनांत निमग्न असतां, सुखाचें पारडें कसें फिरलें तें पहा.

डाक्टर **कृष्णाजी** हे मोठे मेहनती व परोपकारार्थ झटणारे असल्यामुळें, त्यांचें गांवांत वजनही चांगलें होतें. परंतु बाळपणापासून दुर्दैवानें त्यांस पिनसाचा विकार होता, तरी तो प्रथमतः अल्प असल्यामुळें त्यापासून त्यांस तादृश इजा नव्हती. त्यांस कळूं लागल्यापासून त्यांनीं त्यावर स्वतः बरेच उपचारही केले होते. पण त्यापासून कांहीं फायदा न होतां, तरुणपणीं तो हळू हळू वाढतच गेला. **पनवेल** येथील **म्युनिसिपालिटी**त हे एक मेंबर होते. एके दिवशीं **म्युनिसिपालिटी**त एका वादग्रस्त विषयासंबंधानें वाद चालला असतां, त्यांच्या नाकांतल्या पिनसाची खपली निघाली. आणि एकाएकीं इतकें रक्त वाहूं लागलें कीं, त्यामुळें त्यांचा आंगरखा वगैरे भिजून अगदीं लाल झाला; तेव्हां तें भाषण तितकेंच सोडून त्यांस बिऱ्हाडीं जाणें भाग पडलें. व त्या गोष्टीचें त्यांस फार वाईट वाटून, मोठा खेद उत्पन्न झाला. त्यास कांहीं तरी

नीट औषधोपचार केल्यावांचून उगाच बसणें नीट नव्हे, असें त्यांच्या मनानें घेतलें. बरेच इंग्रजी उपचार करून पाहिले, परंतु त्यांनीं कांहीं गुण पडेना. तेव्हां, त्यांनीं **दाजी शास्त्री शुक्ल** नामक एका नामांकित नेटिव्ह वैद्याकडून पिनसावर औषध घेतलें. **दाजी शास्त्री** हे अति नामांकित नेटिव्ह वैद्य त्या वेळीं चेऊल मुक्कामीं राहत असत. हे वयोवृद्ध असून, त्यांजकडे फार दूरदूरचे शेंकडों लोक औषधोपचारार्थ येत असत. त्यांनीं त्यांची हकीकत ऐकून, व प्रथम त्यांच्याही सामान्य औषधानें गुण नाहीं असें पाहून, बराच कडक उपाय केला असें दिसतें. त्यांनीं २८ दिवस घेण्याकरितां कांहीं गोळ्या तयार करून दिल्या. परंतु दुर्दैवानें त्यांच्या औषधानें गुण यावयाचा तें तर दूरच राहिलें, पण उलट प्रकृति अगदींच विकोपास गेली. त्याच्या योगानें नुसतें नाकच सुजून राहिलें नाहीं; तर तोंड, गाल वगैरे सर्व कांहीं सुजून श्वासोच्छ्वासादि क्रियाही नीट चालेनाशा झाल्या. तेव्हां उभयतांच्याही तोंडचें पाणी पळालें. ठीकच आहे. करावयास गेले एक, आणि झालें भलतेंच. तोंडांतून अन्न गिळेना एवढेंच नव्हे, पण दूध घालण्याचीही मुष्कील पडूं लागली; त्यांतून पार पडतील अशी कोणासच आशा दिसेना. व शेवटीं चेहऱ्यांतही व्यंग दिसूं लागलें. तेव्हां कशाची नोकरी, आणि कशाचें काय ? डाक्टर **कृष्णाजी**नीं आपली हताशस्थिति सरकारास कळवून नोकरीचा राजीनामा दिला. त्या वेळीं बिचाऱ्या **रखमाबा**ईस केवढें संकट वाटलें असेल, हें सांगणें नकोच. त्यांचा जीव केवळ तुफानांत सांपडलेल्या गलबताप्रमाणें तरंगत होता.

डाक्टर **कृष्णाजी**च्या तोंडाची सूज दिवसेंदिवस अधिकाधिकच होत गेली. एवढेंच नव्हे, तर चेहऱ्यांतही व्यंगता आली. तेव्हां तीं उभयतांही एका खेडेगांवांत जाऊन राहिलीं. पण दुखण्याचा पाय मागें हटेना. त्या समयीं **रखमाबा**ईनीं जें संकट सोसलें, व जें धैर्य दाखविलें, तें अगदीं अवर्णनीय होतें. तशा प्रसंगींही **रखमाबा**ईनीं आपलें दुःख आवरून, त्यांची मनोभावें सेवा केली, एवढेंच नव्हे तर त्या त्यांस उलट धीर देत होत्या. त्या ह्मणत, "मी आहें तावत्कालपर्यंत आपण कोणत्याही गोष्टीची काळजी करूं नका." त्या दुखण्यांत त्यांनीं जी खस्त खाल्ली, व आपलें सौजन्य दाखविलें, त्याची **कृष्णाजी दादाजी** ह्यांस

अद्यापही आठवण येते. आणि ती आली ह्मणजे त्यांचा कंठ प्रेमानें सद्गदित होतो. खरेंच आहे. ताजा घोड्यावरच्या गोमाशा पुष्कळ मिळतात. पण मनुष्याची खरी परीक्षा विपत्तींत, संकटावस्थेंत व आजारीपणांतच होते. पतीची अशी स्थिति झाली, तथापि त्यांचें पतिप्रेम यत्किंचित् कमी न होतां, उलट त्या प्रसंगीं **रखमाबाई**चें प्रेम तर अधिकच दुणावलें. आणि त्यांच्या पुण्याईनेंच त्यांतून **कृष्णाजी** पार पडले, असें ह्मटलें तरी बाध येणार नाहीं. असो.

अशा प्रकारें अंगवैकल्य प्राप्त झाल्यानें पुढें सरकारी नोकरी करण्याची, चारचौघांत वागण्याची, **कृष्णाजी**स मुळींच उमेद राहिली नाहीं. ह्मास्तव त्यांनीं पुढील सर्व आयुष्य आपल्या पत्नीसहवर्तमान एकांतवासांत घालविण्याचा निश्चय केला. ते सर्व प्रकारची वारासार करून एका अगदीं लहान खेड्यांत जाऊन राहिले. आणि परस्परांच्या सहवासांत तेथें ते आपल्या आयुष्याचे दिवस कंठूं लागले. तेथें ह्मांचीं एकदोन मुलें आजारी पडलीं. त्यांस औषधें काय दिलीं पाहिजेत, हें **कृष्णाजी दादाजी**स कळत होतें, तथापि तीं औषधें त्या कुग्रामांत कोठून मिळणार? तीं न मिळाल्यामुळें त्या मुलांची बरीच आबाळ झाली, व एक मुलगीही गेली. पुढें पुढें तर त्या गांवांत चैनही पडेनासें झालें. उघडच आहे. ज्या मनुष्याचा सारा जन्म शहरांतून गेला, त्यास खेडेगांवांत प्रत्येक गोष्टीची उणीव वाटणारच. त्यांस त्या खेडवळपणाचा कंटाळा आला. आणि त्यांची एक आवडती कन्याही गेली. ह्मणून कोठें तरी शहरांत जावें, व समुद्रकांठच्या हवेंत राहावें, असा विचार करून ते **अलीबागे**स आले.

त्याच वेळीं त्यांचा पूर्वीचा वरिष्ठ अधिकारी डाक्टर **जॉन्स्टन** हाही तेथेंच होता. व तो शिपायांकडून पहिले डाक्टर **कृष्णाजी दादाजी** कोठें असतात, ह्मावद्दल तपास करीतच होता. त्याचा एक पट्टेवाला रस्त्यांतून जात असतां, **कृष्णाजी दादाजी** हे सहज त्याच्या दृष्टीस पडले. तेव्हां त्यानें त्यांस साहेब तुमची वाट पहात आहेत, ह्मणून कळविलें. त्या निरोपावरून **कृष्णाजी दादाजी** हे साहेबांस जाऊन भेटले. साहेबांचा **कृष्णाजी**वर मनस्वीच लोभ होता. त्यामुळें त्यांची ती विपन्न स्थिति पाहून त्यांस फार खेद झाला. त्यांनीं सरकारांत रा-

जीनामा गुदरतांनाच शिफारस करून नोकरीबद्दल बक्षीस मिळण्याचा हुकूम आणून ठेवला होता, तोही तेथेंच **कृष्णाजीं**च्या हातांत दिला, आणि मुंबईस जाऊन रुपये घ्यावयास सांगितलें. आणखी मोठ्या कळकळीनें उपदेश केला कीं, आतां तुह्मी असे शरीरानें पंगू झालां आहां व तुह्मांवर मोठा प्रसंग आहे. परंतु तुमची पत्नी चांगली विदुषी असून सुशील आहे. तिच्या विद्येची कांहीं तरी ह्या वेळीं चीज करा. तिला कोठें तरी चांगली जागा मिळेल. मेहरबान **वार्डिंग्टन** साहेब हे विद्याखात्यांत इन्स्पेक्टर आहेत, त्यांस तुह्मी जाऊन अवश्य भेटा. असें ह्मणून त्यांनीं लागलेंच **वार्डिंग्टन** साहेबांच्या नांवाचें पत्र लिहून **कृष्णाजीं**च्या स्वाधीन केलें. **कृष्णाजीं**नीं तें घेऊन आनंद व आभार प्रदर्शित करून, व साहेबांचा निरोप घेऊन ते परत घरीं आले. झालेला सर्व मजकूर **रखमाबाई**स निवेदन केला, व डाक्टर **जान्स्टन**नीं **वार्डिंग्टन** साहेबांस दिलेलें पत्रही दाखविलें. तेव्हां **रखमाबाई**चें मन बुचकळ्यांत पडलें. त्यांस एकीकडून वाटे कीं, आलेली ही संधि दवडूं नये. कारण चार पैसे मिळूं लागले तर तितकीच प्रपंचास मदत होईल. दुसरीकडून वाटे कीं, आपणास जरी बरीच विद्या येते, तरी परीक्षा वगैरे देणें आपल्या हातून कसें घडणार? शिवाय तादृश अनुभवही आपल्याला नाहीं. तेव्हां एखादी नोकरी मिळाली, तर ती आपल्याच्यानें निभावी कशी? इत्यादि विचारांनीं त्यांचें मन द्विधा होऊन गेलें. **कृष्णाजी दादा**जींचीही अवस्था तशीच झाली. तथापि **रखमाबाई**नीं मनाचें धाडस केलें. आणि पुण्यास जाऊन **वार्डिंग्टन** साहेबांस भेटावें, हाच बेत निश्चित केला. याच संधीस पुणें फीमेल ट्रेनिंगाचे शिक्षक कांहीं कामानिमित्त **अलीबागे**स आले होते त्यांचा परिचय होऊन, त्यांच्या उपदेशानें **रखमाबाई**चें मन वळण्यास फार मदत झाली. **कृष्णाजीं**नीं पुण्यास जाण्याची तयारी केली. आणि तीं उभयतांही पुण्यास जाऊन **वार्डिंग्टन** साहेबांस भेटलीं व डाक्टर **जॉन्स्टन**चें पत्र त्यांस दिलें.

त्या पत्रांत **जॉन्स्टन** साहेबांनीं **कृष्णाजीं**वर आलेला दुर्धर प्रसंग व्यक्त केला होता. व ती दशा **वार्डिंग्टन** साहेबांनीं प्रत्यक्षही पाहिली तेव्हां त्यांसही त्यांची फार दया आली. त्यांनीं आपल्याकडून होईल तितकें सहाय करण्याचें कबूल केलें. नंतर त्यांनीं **रखमाबाई**स कांहीं

प्रश्न वगैरे विचारून त्यांच्या शिक्षणाचें चांचण पाहिलें; तेव्हां त्यांची हुशारी त्यांस विशेषच दिसून आली. ते ह्मणाले "घरगुती शिक्षणांत इतकें प्राविण्य मिळविल्याचें मी हें पहिलेंच उदाहरण पाहतों. तरी तुह्मीं येथील **फीमेल एज्युकेशन**च्या **लेडी सुपरिंटेंडेंट** ह्यांस भेटून तेथील एक सर्टिफिकिट मिळवून ठेवावें. त्याचा तुह्मांस प्रसंगीं चांगलाच उपयोग होईल. त्यानें तुमच्या जागेस अधिक बळकटी येईल. व तेथें तुह्मांस शिकण्याचेंही फारसें कारण पडणार नाहीं. कारण तुमचा अभ्यास बराच झालेला आहे."

वाडिंग्टन साहेबांच्या उपदेशाप्रमाणें **रखमाबाई** पुण्याच्या **फीमेल ट्रेनिंग कॉलेजा**च्या लेडी **सुपरिंटेंडेंट**कडे गेल्या. त्या समयीं तेथील त्या विद्यालयावर मिस्. **एम्, आर, मिचल्** ह्या बाई होत्या; त्या फार सज्जन असत. त्यांनीं **रखमाबाई**ची विद्या, आचरण, सद्गुण इत्यादि पाहून त्यांचा मोठा सत्कार केला. त्या ह्मणाल्या "तुमचा अभ्यास बराच झालेला आहे, ह्यांत तर शंका नाहीं. तथापि कॉलेजच्या नियमाप्रमाणें थोडे दिवस तरी तुह्मांस येथें राहणें भाग आहे. त्यावांचून सर्टिफिकिट देतां येणार नाहीं." तें त्यांचें ह्मणणें मान्य करून **रखमाबाई** आपल्या पतीसहवर्तमान अल्पकाल तेथें राहिल्या. व ट्रेनिंग कॉलेजांत त्यांनीं रीतीप्रमाणें आपलें नांव दाखल केलें. वस्तुतः तेथें त्यांस शिकण्यासारखे विषय कांहीं नव्हते, तथापि कशी तरी कालक्रमणा करावी लागे. व नवीन स्थित्यंतरानें मनासही चैन पडेना. शिवाय पुण्याची हवाही त्यांस नवीनच असल्यानें, ती त्यांस मानवेना. आणखी त्या वेळीं त्या गरोदर होत्या. तेव्हां त्यांनीं कांहीं दिवस रजा घेऊन गांवीं जाण्याचा विचार केला. पुणें फीमेल कॉलेजांत नांव वगैरे घालून फार दिवस झाले नाहींत तोंच, कर्मधर्मसंयोगानें मुंबईतील **ऑंग्लो ज्युइश असोशिएशन्** नामक मंडळीच्या मुलींच्या शाळेवर मुख्य अध्यापकाचे जागीं त्या मंडळीस एक बाई पाहिजे होती. तिची **रखमाबाईस** फार आग्रहपूर्वक मागणी आली. व परीक्षेसही बरेच महिने अवकाश होता. तोंपर्यंत ती जागा पत्करण्याबद्दल त्यांस मिसेस् **मिचल्** लेडी सुपरिंटेंडेंट यांनींही आग्रह केला. व कॉलेजांतून बिनपगारी रजाही दिली. तेव्हां परीक्षेपर्यंत ती जागा पत्करून **रखमाबाई** मुंबईस गेल्या. **रखमाबाई**

रजा घेऊन जाते वेळीं, तेथील ट्रेनिंग कॉलेजावरील लेडी सुपरिंटेंडेंट ह्यांनीं त्यांस सर्टिफिकिटासारखें एक पत्र दिलें होतें. त्यावरून त्यांची योग्यता किती होती हें सहज लक्षांत येईल. ह्मणून तें पत्र येथें दाखल करतों:—

*पुणें २७ डिसेंबर १८८१ इ.

"सौ० **रखमाबाई केळोकर** ह्या कांहीं दिवस पुण्याच्या स्त्रियांच्या ट्रेनिंग कॉलेजांत होत्या. त्यांचे अभ्यास व्हावयाचे राहिलेले फारसे नाहींत. पुण्याची हवा मानवेना, ह्मणून मी त्यांस एक वर्षाची बिनपगारी रजा दिली आहे. त्या सद्गुणांनीं उत्तम, आचरणानें उत्कृष्ट, आणि ज्ञानसंपादनाचे कामीं उत्सुक अशा आहेत. माझ्या मतें त्या एक उत्तम शिक्षकांपैकीं होतील."

एम्, आर, मिचल्.
लेडी सुपरिंटेंडेंट, फीमेल ट्रेनिंग कॉलेज, पुणें.

मुंबईची आँग्लो ज्युइश असोशिएशनची शाळा फार मोठी आहे. त्यांत शें दीडशेंवर मुली असून दोन तीन मदतगार आहेत. परंतु **रखमाबाईस** कांहीं पूर्वीचा अभ्यास नसतांही त्यांनीं त्या शाळेचें काम फार उत्तम प्रकारें बजावून लौकिक संपादिला. व त्या कमिटीपासून उत्तम सर्टिफिकिटही मिळविलें. त्या अल्प काळांत तेथें इतक्या प्रिय झाल्या कीं, ज्युइश कमिटी त्यांस सोडण्यास फारच नाखुष होती. इत-

---

Poona, December 27th 1881.

*The bearer of this Mrs. Rakhmabai Keloker has been for some time in the Poona Female Training College. She is not far from the close of her studies. I have given her leave without pay for a year as she suffers from the climate of Poona. She is a most superior and excellent woman, and eager for the attainment of the knowledge. I think she will make an excellent mistress.

M. R. Mitchell,
Lady supt. Female Trainning College,
Poona.

क्या काळांत त्यांचें एक बाळंतपणही होऊन ट्रेनिंग कॉलेजच्या शेवटील परीक्षेची वेळ येतांच, त्या परीक्षेस येऊन हजर झाल्या, व ती त्यांची परीक्षा किती उत्तम प्रकारें उतरली हें खालील सर्टिफिकिटावरून कळेल.

*फीमेल ट्रेनिंग कॉलेज पुणें.

१६ मार्च १८८३.

"अशी शिफारस करण्यांत येते कीं, सौ० **रखमाबाई केळोकर** ह्या पुण्याच्या फीमेल ट्रेनिंग कॉलेजांतील अति उच्च परीक्षा, अतिशय उत्तम रीतीनें व अगदीं पहिल्या प्रतीची पास झाल्या आहेत. तशाच त्या उत्तम सद्गुणी, आणि अप्रतिम सदाचरणी असून उत्तम प्रतीच्या शिक्षक आहेत. त्या कॉलेज सोडून जात आहेत, आणि कॉलेजाच्या सर्व बाबतींत त्या परमपूज्य आहेत."

एम्, आर. मिचल्

लेडी सुपरिंटेंडेंट, फीमेल ट्रेनिंग कॉलेज, पुणें.

हें सर्टिफिकिट ह्मणजे कांहीं सामान्य नव्हे. ह्यापुढें **रखमाबाईं**च्या विद्येचें व सद्गुणांचें अधिक वर्णन करण्याची गरज नाहीं. हें सर्टिफिकिट मिळवून त्या थोडे दिवस विश्रांतीकरतां घरीं जातात तोंच ब्रिटिश सरकाराकडे एक उत्तम स्त्रीशिक्षक मिळण्याबद्दल कोल्हापूर दरबारांतून मागणें झालें. तेव्हां त्याजबद्दल सरकारांतून सौ० **रखमाबाईं**ची शिफारस होऊन आणि ब्रिटिश सरकारांतून, त्यांची नोकरी करवीर सरकारास दिली आहे, असा सरकारी ठराव होऊन, ह्या ९९ रु. पगारावर **कोल्हापुरास**

---

*This is to certify that the bearer Rakhmabai Keloker has passed the highest standard of the Poona Female Training College, with great credit. She is also a woman of a very fine disposition and great energy of character and is a good teacher. She leaves us with the best wishes of all connected with the college.

M. R. Mitchell,

Lady supt. Female Training College,

Poona.

आल्या. ह्यांनीं प्रथम ही जागा लांबीच्या पल्ल्यामुळें नाकारली होती. पण लेडी सुपरिंटेंडेंट साहेब वगैरेनीं कोल्हापूर हें संस्थान असून, तेथें तुमची योग्यता वाढून, तुह्मांस लवकरच बढती मिळेल, ह्यासाठीं तुह्मींही जागा पत्करावी हें चांगलें, अशी सल्ला मिळून यांनीं ती पत्करली. प्रथमतः कांहीं दिवस श्री. मातोश्री **आनंदीबाई** राणीसाहेब यांस शिक्षण देण्याचें काम त्यांजकडे होतें. परंतु त्यांचे पती श्री. ४ थे शिवाजी महाराज हे कैलासवासी झाल्यामुळें, राणीसाहेबांस स्वभावतःच महत् दुःख होऊन पुढें औदासिन्य प्राप्त झाल्याकारणानें, राणीसाहेबांनीं शिक्षण सोडिलें. तेव्हां **रखमाबाई**ची फीमेल ट्रेनिंगाकडे योजना होऊन, येथें असणाऱ्या मिस् **लिटल्** लेडी सुपरिंटेंडेंट ह्यांच्या हाताखालीं कोल्हापूर फीमेल ट्रेनिंग कॉलेजच्या शिक्षकाचें सर्व काम केवळ एकट्या—असिस्टंटाशिवाय—करूं लागल्या.

ही गोष्ट इ० स० १८८३ मध्यें झाली. त्या वेळीं रावबहादूर **बर्वे** हे कारभारी होते. त्यांनींही **रखमाबाई**स—अर्थात् डाक्टर **कृष्णाजी**स—बऱ्याच प्रकारें मदत दिली. प्रथमतः रहाण्याच्या जाग्यासंबंधानें वगैरे त्यांस बरीच अडचण सोसावी लागली. पण लौकरच मे. पोलिटिकल एजंट साहेबांनीं—कर्नल **रीव्हस**—ह्यांनीं त्यांचा—मुलांबाळांचा प्रपंच, व रस्त्यांतून जाण्यायेण्याची अडचण लक्षांत आणून मुलींच्या ट्रेनिंग कॉलेजानजीकच एक सरकारी उत्तम बंगला त्यांस रहावयास दिला. तो अद्याप त्यांजकडेसच आहे.

सौ. **रखमाबाई** नेहमीं अतिशय साधेपणानें वागतात. त्यांची वागणूक किती साधी आहे हें शब्दांनीं सांगतां येणें सुद्धां कठीण. आपलें काम भलें कीं आपण भल्या, असा त्यांचा स्वभाव आहे. त्यांना नुसत्या पाहिल्या, तर त्यांच्या चर्येवरून त्या इतक्या सुशिक्षित असतील ही कल्पना सुद्धां मनांत येत नाहीं. तथापि गणित, व्याकरण, इतिहासासारख्या गहन विषयांतही त्यांची मार्मिकता फार तारीफ करण्यासारखी आहे. कविता, शिवणकाम हे तर त्यांचे आवडीचे विषय. ह्मणून त्यांच्या आजपर्यंत झालेल्या शिष्यिणींनींही बहुतेक त्यांचाच कित्ता उचलला आहे. शिकविण्याच्या कामांत तर त्यांचा हातखंडा. यांच्या अंगीं असलेल्या अशा अमोल्य गुणांची पारख प्रथमतः लेडी सुपरिंटेंडेंट मिस्

लिटल् यांस झाली नाहीं. परंतु उत्तम गुण कोठेंही असले तरी ते फार दिवस झांकत नाहींत. त्यांचे उत्तम गुण हळू हळू लेडी सुपरिंटेंडेंटच्या नजरेस येऊन पुढें पुढें तर त्यांजवर त्यांचा अतिशयच लोभ जडला. त्यांनीं जातांना त्यांस न मागतांच एक सर्टिफिकिट दिलें. त्याची नक्कल पुढें दिली आहे. ती पाहिली असतां, त्या **रखमाबाईस** किती मानीत होत्या हें दिसून येईल. अशा प्रकारें त्या आपल्या स्वतःच्या परिश्रमांवर, सद्गुणांवर लोकादरास पात्र झाल्या, व हळू हळू योग्यतेसही चढूं लागल्या. असो.

ह्याप्रकारें कांहीं काळ लोटल्यावर कोल्हापूरच्या लेडी सुपरिंटेंडेंट मिस् लिटल् ह्यांनीं आपल्या लग्नाची तयारी करून संसारसुखांत पडण्याचें मनांत आणिलें. आणि ता० २० आगष्ट १८९९ इ० रोजीं त्यांनीं आपल्या जागेचा राजीनामा दिला. तेव्हां ही एवढी मोठी जागा आतां कोणास द्यावी, हा प्रश्न उद्भवला. कारण, लेडी सुपरिंटेंडेंट मिस् लिटल् ह्यांस दरमहा साडेचारशें रुपये पगार, रहाण्यास मोठा बंगला, चाकरमाणसें, शिपाई, शिवाय दोन घोड्यांची गाडी वगैरे सरंजाम सरकारांतून त्यांच्या तैनातीस होता. स्त्रीशिक्षणाच्या सर्व खात्यांवर त्यांची सत्ता होती. त्यांच्या हुकुमावांचून एक पान देखील हालत नव्हतें. तेव्हां ही एवढी जागा आतां कोण भरणार हा प्रश्न अगदीं साहजिकच आला. व त्यासंबंधानें चर्चा सुरू झाली. त्यांत लेडी सुपरिंटेंडेंटच्या जागीं पुन्हा दुसरी युरोपिअन स्त्री आणणार हा बूटही निघाला होता. परंतु सौ. **रखमाबाई**ची योग्यता, थोरवी, विद्वत्ता, सुशीलता, कोल्हापुरांतील आबालवृद्धांसही माहीत असल्यामुळें, **विद्याविलास, ज्ञानसागर,** इत्यादि तेथील वर्तमानपत्रांनीं **रखमाबाई**च्या गुणांचें, विद्वत्तेचें, सुशीलतेचें व कर्तबगारीचें यथातथ्य वर्णन करून त्या जागेस ह्याच योग्य आहेत असें श्री. **महाराजछत्रपती** सरकार करवीर ह्यांस सुचविलें. व तीच गोष्ट सरकारांनीं व दिवाणादि कारभारी मंडळींनीं मनास आणून गेल्या सालीं ह्या मोठ्या हुद्याच्या व सन्मानाच्या जागेवर सौ. **रखमाबाई** ह्यांची कायमची नेमणूक केली, हें त्यांस खरोखर मोठें भूषणास्पद होय ह्यांत शंका नाहीं. **रखमाबाई** ह्या प्रस्तुतच्या लेडी सुपरिंटेंडेंटच्या जागेस तर काय, पण त्याहून एखादी वरच्या प्रतीची जागा झाली, तरी त्यासही

त्या योग्य आहेत, ह्यांत काडीमात्र शंका नाहीं. पण त्या पडल्या नेटिव्ह! तेव्हां त्यांस साडेचारशें रुपये व घोड्याची गाडी देणार कोण? त्या बिचाऱ्यांची अवघ्या शंभर रुपयांतच बोळवण झाली. आणि गाडीचे पंधरा रुपयेही त्यांतच. पण करणार काय? वारा येईल तशी पाठ दिलीच पाहिजे. 'लेडी सुपरिंटेंडेंट' येवढ्या हुद्याचा मान आमच्या नेटिव्ह स्त्रियेस दिला, हेंच त्यांचें –नव्हे आह्मां महाराष्ट्रीयांचें–भाग्य समजावें झालें. दुसरें काय? नाहीं तर आमच्या मुलींच्या शिक्षणावर दुसरीच एखादी गोरीबाई येते कीं काय नकळे, हीच सर्वांस काळजी पडली होती. परंतु आमच्या **श्री. शाहू महाराज छत्रपतीं**चे गुणग्राहित्वाबद्दल त्यांची तारीफ करणें योग्य आहे.

सौ. **रखमाबाई केळोकर** ह्यांस हा जो सांप्रत हुद्याचा बहुमान मिळाला आहे, तो फार मोठा–निदान महाराष्ट्रांतील स्त्रीजातीमध्यें तरी पहिलाच–ह्मटला तरी चालेल. तथापि त्यांस गर्व किंवा अभिमान ह्मणून कसला तो शिवलेला सुद्धां नाहीं. आपण कांहीं मोठें शतकृत्य केलें, किंवा माझ्या अंगीं कांहीं विशेष योग्यता आहे, हें त्यांच्या मनांत किंमपिही वागत नाहीं. पोक्तपणें मर्यादेनें वागणें, आणि स्वकार्यांत दक्ष राहणें, हें त्यांचें मोठें ब्रीद आहे. त्यांची वागणूक साधी व पोषाख फार साधा असतो, हें पूर्वी सांगितलेंच आहे. त्या इतर चारचौघी गृहस्थांच्या पोक्त स्त्रियांप्रमाणेंच वागतात. मग बूट, स्टाकिंग इत्यादि पाश्चात्य थाटाचें नांव कशाला? कोणी सभ्य मनुष्य शाळा पहावयास गेला तर, त्या त्याच्या समक्ष खुर्चीवर सुद्धां बसत नाहींत. कोणी फारच आग्रह केला, तर वर्गांतील बांकावरच किंचित् स्थिर होतात. ह्मणजे कोणत्याही स्थितींत, कोणत्याही समयीं, विनय हा त्यांजपासून विभक्त ह्मणून होतच नाहीं. कोल्हापूर शहरांतील व बावडें येथील सर्व मुलींच्या शाळेवर देखरेख करण्याचें काम त्यांचेकडे असतें. ह्मास्तव प्रत्यहीं त्या गाडींतून शाळा तपासण्यासाठीं जाऊन, तेथील मुलींस कधीं खाऊ, वगैरे देऊन विद्या शिकविण्याविषयीं उत्तेजन देतात. त्यांची परीक्षा घेतात, त्यांशीं गोड बोलतात, व उपदेश करतात तो तर फार श्रवणीय असतो. कधीं मुलींच्या आईबापांपाशीं–विशेषेंकरून आईशीं–बोलण्याचा प्रसंग आला, तर त्या आपल्या मधुर वाणीनें मुलींस

शाळेंत पाठविण्याविषयीं, व स्त्रियांनीं शिकण्याविषयीं त्यांचीं मनें वळविल्यावांचून राहत नाहींत. कधीं कधीं रविवारीं सभा भरवून सभ्य स्त्रियांना बोलावून आणून निरनिराळे विषय त्यांच्या कानांवरून जावेत असे प्रयत्नही त्यांचे वारंवार चालू असतात.

इतकी योग्यता व थोरवी त्यांस प्राप्त झाली असतां, शाळेचें काम उरकून ह्या घरीं आल्या व त्यांस कोणीं घरांत पाहिलें तर ह्या शाळेच्या लेडी सुपरिंटेंडेंट अशी शंका, त्यांच्या घरांतील वागणुकीवरून कोणाच्या स्वप्नांत देखील येणार नाहीं. फार काय पण ह्या नोकर असतील हें देखील मनांत येणें कठीण. घरीं येऊन शाळेचा पोषाख बदलला, कीं यांचें घरांतील प्रपंचाचें काम सुरू झालेंच. खरें पाहिलें असतां आज त्यांस कांहीं कमी आहे, असें नाहीं. एखादा आचारी व एकदोन चाकरमाणसें ठेवून त्यांजकडून काम करून घेणें, आज त्यांस मुळींच अशक्य नाहीं, आणि पतीची इच्छा त्यांनीं श्रम करावे अशी मुळींच नाहीं. त्यांचे श्रम पाहून त्यांचे पतीचा जीव तिळतिळ तुटत असतो, परंतु इतर सुशिक्षित ह्मणविणाऱ्या व अर्ध्या हळकुंडानें पिंवळ्या होणाऱ्या आपल्या देशभगिनींस उदाहरणच दाखविण्यासाठीं, व बायका शिकल्या ह्मणजे शिरजोर होतील वगैरे ह्मणणाऱ्या व स्त्रीशिक्षणाविरुद्ध असणाऱ्या पुरुषांनीं ह्यांची वागणूक पाहून खालीं माना घालाव्या, ह्मणूनच कीं काय नकळे, घरांतील स्वयंपाक स्वतः करणें, आपल्या मुलाबाळांचीं व घरांतील सर्व धुणीं स्वतः धुणें, मुलाबाळांचे व इतर आपल्या पतीचेही कपडे स्वतः शिवणें वगैरे सर्व मोठ्यापासून बारीक सारीक कामापर्यंत सर्व कामें स्वतःच त्या करतात. बरें विद्येंतच नव्हे तर सर्व प्रकारचीं शिवणकामें स्वतः बेतण्यांत व शिवण्यांत, तसेंच स्वयंपाकसंबंधीं पाहिजे ते पदार्थ व पाहिजे तीं पक्कान्नें करण्यांत सुद्धां त्यांचा हातखंडा आहे. त्या मुलांच्या संगोपनाच्या, आरोग्यरक्षणाच्या, औषधपाणी देण्याच्या, प्रसूतीच्या ह्मणजे सुइणीच्या कामांतही अत्यंत प्रवीण आहेत. सारांश ह्यांच्या गुणांचें जितकें वर्णन करावें, तितकें थोडेंच होणार ह्यांत तिळमात्र संदेह नाहीं. या गोष्टी कोणाच्या सांगोसांगीच्या नाहींत, तर खऱ्याखुऱ्या आहेत.

शाळांची तपासणी करून त्या आल्या ह्मणजे ट्रेनिंग कॉलेजांतील

शिक्षणाचें काम कसें काय चाललें आहे तें पाहातात, व वेळ असल्यास वर्गास शिक्षण देतात. त्यांनीं शाळा चालविण्याचे नियम फार चांगले केले आहेत. कोणत्याही मुलीस शिक्षा करण्यास सक्त मनाई आहे. होईल तितकें गोडीगुलाबीनें शिकवावें हा त्यांचा मुख्य उद्देश आहे. प्रत्येक शाळेंतील मास्तरणी व मुली ह्यांचें आचरण व नीतिमत्ता उत्तम रहावी ह्याकडे त्यांचें विशेष लक्ष्य आहे. ब्राह्मणेतर जातींच्या पुष्कळ बायका नवऱ्यास सोडून देऊन, कांहीं स्कॉलरशिप किंवा एखादी जागा मिळेल ह्मणून शाळेंत शिकण्यास येतात व त्या वयांत आलेल्या असतात. त्यामुळें त्यांच्या संगतीनें इतर मुलीही बिघडण्याचा संभव असतो. ह्मणून त्यांनीं असा एक नियम करून टाकला आहे कीं,—मुली लहान अगर अविवाहित असल्यास बापाचें सर्टिफिकिट, व प्रौढ, लग्न झालेल्या अशांस शाळेंत अगर ट्रेनिंगांत घेण्यास नवऱ्याचें सर्टिफिकिट असल्यावांचून शाळेंतच घेऊं नये. एकंदरींत त्यांच्या शाळेंतील व्यवस्था पाहिली ह्मणजे कोणासही आनंद झाल्यावांचून रहात नाहीं. मुलींचीं मोडी व बालबोध अक्षरें, शुद्धलेखन, शिवणकाम, व इतर कोणतेही विषय पाहिले तरी जिवास समाधान वाटतें. व आपल्या देशांतील स्त्रिया इतक्या योग्यतेस पोंचल्या हें पाहून मनास एक प्रकारचा आल्हाद व भूषण वाटून आश्चर्यही वाटल्यावांचून रहात नाहीं.

ही **रखमाबाई**ची सरकारी कामासंबंधानें थोडक्यांत माहिती झाली. आतां घरगुती आचरणासंबंधानें विचार मनांत आणला, व त्यांची उद्योगशीलता पाहिली ह्मणजे छाती अगदीं दडपून जाते. व ह्या बाई इतकीं कामें करतात तरी कशीं, ह्याचा मोठा विस्मय वाटतो. त्यांस पांच मुली व चार मुलगे इतका तर पाठीमागें परिवार आहे. बरें; घरांतील स्वयंपाकास बाई वगैरे असावी, तर तेंही नाहीं. स्वयंपाकाच्या बाईसंबंधानें त्या असें ह्मणतात कीं, त्यांच्या हातून आधीं हवेंतसें अन्न मिळत नाहीं; नासधूस होते; आणखी त्यांच्या बरोबर हुजत घालीत बसावें लागतें तें वेगळेंच. त्यापेक्षां आपलें आपण करावें हें उत्तम. त्या योगानें निर्मळ व हवेंतसें अन्न तरी पोटास मिळतें. त्या ह्मणतात 'माझ्या हातच्या स्वयंपाकावांचून मला अन्न गोडच लागत नाहीं.' ह्मणजे

पहा! शाळेंतून आल्या ह्मणजे घरच्या कामाची जुपी, आणि घरच्या कामांतून मोकळ्या झाल्या कीं शाळेंतील कामाची जुपी. हाच नित्यक्रम. शिवाय मध्यंतरीं घराकडे असल्या तरीही शाळामास्तर, मास्तरणी, पट्टेवाले, वगैरे कांहीं कामासंबंधानें अगर रजा विचारावयास येतात. बोलणें, रजा देणें, त्यांच्या कामावर दुसऱ्याची योजना करणें इत्यादि व्यवस्था कराव्या लागतात. तें शिवाय घरांतलें काम तरी थोडें? आधीं लहान लहान मुलें झटलीं ह्मणजे त्यांच्याबद्दल किती व्याप सोसावा लागतो हें संसारी मनुष्यास सांगावयास नकोच. आज हें आजारी, तर उद्यां तें आजारी. एक भूक लागली ह्मणतें, तर दुसरें झोंप आली ह्मणतें. एक हें मागतें तर दुसरें तें मागतें. हाच क्रम नेहमीं चालावयाचा. पण तो सर्व व्याप त्या अतिशय शांतपणानें सोसून आपलें काम अगदीं वेळच्या वेळीं करतात. मधून मधून थोरामोठ्यांच्या बायका त्यांस भेटावयास येतात, त्यांशीं घटकाभर बोलणें, स्त्रीशिक्षणाची स्थिति त्यांच्या मनांत नीट भरवून देणें हेंही चालू असतेंच. मुलांची व्यवस्था व त्यांचें आरोग्य कसें राखावें हें तर आमच्या सर्व स्त्रियांनीं यांजपाशीं शिकण्याजोगें आहे.

इतर लोकांच्या मुलींना शिक्षण देण्याविषयीं **रखमाबाई** जर इतक्या झटतात, तर आपल्या स्वतःच्या मुलांस शिक्षण देण्याविषयीं त्या किती काळजी वहात असतील हें वेगळें सांगणें नकोच. त्यांना प्रथमतः एकसारख्या चार मुलीच झाल्या. जणों काय परमेश्वराचा स्त्रीशिक्षणाचा त्या घराण्यावर वरदहस्तच. ह्या चार मुलींस किती शिक्षण मिळालें आहे तें पहा. सौ० **द्वारकाबाई** व **कृष्णाबाई** ह्या पहिल्या दोन मुली. ह्या **पी. ई.** च्या परीक्षेंत पास होऊन हल्लीं मुंबईच्या **ग्यांड मेडिकल कॉलेज**मध्यें **एल्. एम्.** आणि **एस्.**च्या क्लासांत अभ्यास करीत आहेत. आणि त्यांचा नंबर अगदीं वर असतो. यंदा शारीरशास्त्रांत **द्वारकाबाई** तर पहिल्या आल्या आहेत असें ऐकतों. गेल्या वर्षी पुण्यास जी राष्ट्रीय सभा भरली होती, तींत ह्या दोन्ही विदुषी भगिनी कोल्हापुराच्या तर्फेनें डेलिगेट निवडून गेल्या होत्या. ह्यांच्या सर्व मुलींचे सद्गुण, सुशीलता अगदीं थेट मातोश्रीच्या वळणावर आहे. दुसऱ्या दोन मुली सौ० **यमुनाबाई** व **अहिल्याबाई** ह्या पुण्याच्या फी-

मेल हायस्कूलमध्यें आहेत. ह्यांपैकीं धाकटी तर यंदां गणितांत पहिली आली असें ऐकतों. ह्याच मानानें बाकीच्या लहान लहान मुलांच्या शिक्षणाचीही वाचकांनीं कल्पना करावी. ह्या सर्व मुलांचे कपडेलत्ते **रखमाबाई** ह्या स्वतः घरींच तयार करतात. मे महिन्यांत सर्व मुली घरीं आल्या ह्मणजे त्यांची त्यांच्या मुलांची कपड्यालत्त्यांची वर्षाची बेगमी एकदम करून देतात. शिवाय फावल्या वेळांत वर्तमानपत्रें, मासिकपुस्तकें पहाणें, नवे नवे ग्रंथ वाचणें ह्यावांचून त्यांस चैन पडत नसेल हें तर उघड आहे. फार काय सांगावें? पण कधीं कधीं त्या स्वयंपाक करीत असतात, व जवळ डा० **कृष्णाजी दादाजी**, किंवा मुलीबाळी त्यांस नवे नवे ग्रंथ वाचून दाखवीत असतात. ह्मणजे तो वेळ सुद्धां त्यांचा फुकट नाहीं. तेव्हां केवढी बरें धन्य त्यांची?

जेवणाखाण्यांत त्या अतिशयच नियमितपणा ठेवतात, त्यामुळें त्यांची प्रकृति नेहमीं आराम असते. फार तर काय, पण ताप येणें किंवा कपाळ दुखणें सुद्धां साऱ्या जन्मांत त्यांस कधीं माहीत नाहीं असें ह्मणतात. त्यांचा सकाळीं सहा वाजल्यापासून तों रात्रीं दहा वाजेपर्यंत सारखा उद्योग चालू असतो. स्त्रीशिक्षणासंबंधानें त्यांनीं पुष्कळ विचार केलेला आहे. त्या ह्मणतात, हल्लींच्या स्त्रीशिक्षणामध्यें पुष्कळ फेरफार केला पाहिजे. त्यावांचून स्त्रियांस योग्य वळण लागणार नाहीं. त्यांच्या मनांतून स्त्रीशिक्षणाविषयीं पुष्कळ लिहावयाचें आहे, व त्या लिहितीलही. परंतु त्यांस वेळ मिळत नाहीं, ही आमच्या दुर्भाग्याची गोष्ट आहे. विद्येनें व विद्वान् पतीच्या सहवासामुळें त्यांचे विचार व त्यांचीं मतें जरी उन्नत झालीं आहेत तथापि देवधर्म, देवदर्शन, व व्रतें इत्यादि त्या भक्तिभावानें करतात. परंतु सर्वांत त्यांचें मोठें व्रत ह्मटलें ह्मणजे आपल्या पतीवर निष्ठा ठेवणें हें होय. त्या आपल्या पतीस केवळ देवाप्रमाणें पूज्य मानतात. खरें ह्मटलें तर सौ० **रखमाबाईस** संतति व संपत्ति आजमितीस अनुकूल आहेत. सरकारदरबारांत त्यांचा मान मोठा आहे, त्यामुळें वरकरणी पहाणाराला त्या मोठ्या सुखी आहेत असें वाटतें. परंतु त्यांची अंतस्थ स्थिति अगदीं भिन्न आहे. आपल्या पतीची—जोडीदाराची—हताश स्थिति साऱ्या दिवस त्यांच्या डोळ्यांसमोर उभी असते, आणि त्यामुळें त्या रात्रंदिवस मनांत झुरत अ-

सतात. आपला पति येवढा विद्वान्, रसिक, गुणी व कर्ता असतां त्यानें घरांत बसून रहावें, व आपलें नांव पुढें होऊन लोकांनीं कीर्ति गावी हें त्यांस बिलकुल बरें वाटत नाहीं. त्यांच्या तोंडांतून प्रसंगोपात्त अशा अर्थाचे उद्गार निघतात. "पुरुषांनीं घरांत बसावें, आणि बायकांनीं पुढें यावें, ही स्थिति खेदकारक आहे. परंतु तसा योगायोग परमेश्वरानें आणला त्यास उपाय नाहीं. मुलाबाळांची नीट स्वस्थता व्हावी, ह्मणून हें गाडें कसें तरी हाकावें लागतें, बाकी मनाला खरा आनंद असा कांहीं नाहीं. कोणीकडून तरी जगाचे दिवस ढकलावयाचे इतकेंच. मी माझें काम करतें, ह्यांत अधिक कांहीं नाहीं." ह्यावरून त्यांच्या मनाचा कल कसा आहे तें स्पष्ट कळतें. पुरुषामध्यें येऊन बसणें किंवा ईझिचेरवर पडणें ह्या गोष्टी त्यांनीं केल्या तर, त्यांस खरोखर शोभण्यासारख्या सुद्धां आहेत. पण त्या तसें कधींही करीत नाहींत. कोणास भेटावयाचा, किंवा बोलण्याचा प्रसंग आलाच, तर स्वयंपाकघराच्या दारांत उभें राहून बोलावयाचें इतकी त्यांची मर्यादशीलता आहे.

लेडी सुपरिंटेंडेंटचें काम करण्याइतकी विद्वत्ता, सारा प्रपंच संभाळण्याइतकी कर्तबगारी, असें असून इतकी मर्यादा, इतका विनय, येवढें सदाचरण, निस्सीम पतिप्रेम हें पाहिलें ह्मणजे त्यांच्याविषयीं कोणाचीही पूज्य बुद्धि उत्पन्न झाल्यावांचून रहात नाहीं. त्या साध्वीच्या गुणांचें वर्णन आह्मीं किती ह्मणून करावें? माजी लेडी सुपरिंटेंडेंट मिस् **लिट्ल** ह्यांनीं राजीनामा दिला, तेव्हां त्या **रखमाबाई**स फार प्रेमपूर्वक भेटल्या. व त्यांचा निरोप घेतांना त्यांचे सद्गुण आठवून त्यांचा कंठ अगदीं सद्गदित झाला. त्या रखमाबाईस ह्मणाल्या 'मी तुमचा एक फोटो काढून घेतें' परंतु आपला फोटो काढून देणें त्यांस प्रशस्त न वाटल्यामुळें त्यांनीं त्यांची माफी मागितली. तेव्हां मिस् **लिट्ल**ची मोठी निराशा झाली. तरी त्यांनीं त्या वेळीं सौ० **रखमाबाई**स आपला एक

उत्तम फोटो देऊन एक सर्टिफिकिटासारखें आपण होऊन पत्र पाठवून त्यांत त्यांच्या गुणांचें मनःपूर्वक वर्णन केलें आहे. तेंच येथें दाखल करतों. कारण त्याहून अधिक शब्दांनीं **रखमाबाईं**चें वर्णन कोणासच करतां येणार नाहीं. तें पत्र असें:–

*"सौ० **रखमाबाई केळोकर** ह्या कितीएक वर्षांपासून ट्रेनिंग कॉलेजांतील मास्तरणींस शिक्षण देण्याच्या कामांत अतिशय अनुभविक, प्रवीण झालेल्या आहेत. स्त्रियांना शिक्षण देण्याच्या कामांत त्यांची मनस्वी उत्सुकता असते; आणि तें त्यांचें उत्तम वळण चहूंकडे स्त्रीशिक्षणाच्या विस्तारास कारणभूत झालें आहे. अशा प्रकारच्या हुषार, व मदत करणाऱ्या असिष्टंट मला मिळाल्याबद्दल मला त्यांचे उपकार मानणें जरूर आहे. त्या मोठ्या सद्गुणी असून परोपकाराविषयीं तत्पर आहेत. त्यांजक-

---

* Mrs. Rakhmabai Keloker has been a most successful mistress of the Training Class for mistresses for several years. She takes great interest in female education and by her good example has greatly furthered the cause. I have reason to be thankful that I had such a clever and helpful assistant, as she has had, by her position, great power of doing good, by sending out well and carefully trained mistresses to the various towns of the Kolhapur state. Most of her pupils are following in her footsteps and are blessings to the people amongst whom they are thrown.

I have the very highest opinion of Rakhmabai as a lady, a wife, a mother and mistress of a school. And I shall always be pleased to hear of her well-being.

Agust 20th, 1895. *A. Little,*
Lady supt. Female Education,
Kolhapur.

ड्डून काळजीपूर्वक उत्तम शिक्षण मिळालेल्या मास्तरणी कोल्हापूर इलाख्यांतील शहरोशहरीं पाठविल्या गेल्या आहेत. त्यांच्या शिक्षिणींपैकीं पुष्कळ शिक्षिणी त्यांचाच कित्ता वळवून ज्या लोकांमध्यें त्या पडल्या आहेत, त्या लोकांवर उपकार करून त्यांस संतोषित करीत आहेत.

रखमाबाई ह्या एक **कुलीन स्त्री, सुशील पत्नी, अनुभविक माता,** आणि शाळेच्या उत्तम शिक्षक इतक्या नात्यानें त्यांच्या ठिकाणीं माझा अत्यंत पूज्य भाव आहे. आणि त्यांची भरभराट झालेली ऐकून मला केव्हांही आनंदच वाटेल.

एच्. लिट्ल.
लेडी सुपरिंटेंडेंट, फीमेल एज्युकेशन.
आगष्ट २०।१८९५ कोल्हापूर.

ह्या परक्या बाईनें जर **रखमाबाईं**ची येवढी मनोभावें स्तुति केली, तर त्यांची खरोखर योग्यता केवढी असावी ह्याचें अनुमान वाचकांनींच करावें. **ज्ञानेश्वरां**नीं एके ठिकाणीं ह्मटलें आहेः—

पहाया अनुरागें भजे । जे प्रियोत्तमें मानिजे ।
ते पतीहूनि काय न वानिजे । पतिव्रता—

"हें पहा! प्रीतीनें पतीची सेवा करते आहे; पतीही जिला मान देतो आहे; त्या पतिव्रतेचें वर्णन, पतीपेक्षांही अधिक करावयास नको काय?" तेंच आम्हीही येथें ह्मणतों. आणि सौ० **रखमाबाई** ह्यांची व त्यांच्या सर्व कुटुंबाची उत्तरोत्तर भरभराट होवो, व त्यांच्या हातून स्त्रीशिक्षणास उन्नति येऊन आपल्या देशाचें पुष्कळसें कल्याण होवो, असें परमेश्वरापाशीं मागणें मागून हें अल्प चरित्र समाप्त करतों.

PRINTED and published by Janardan Mahadeo Gurjar AT JAVAJI DADAJI'S "NIRNAYA-SAGARA" PRESS, Bombay.

आर्यधर्माभिमानी लोकांकरितां सचित्र हिंदु घड्याळें.

प्रत्यक्ष देवदेवतांनींच हृदयासन्निध वास केल्यावर अधर्म कितीसा टिकेल.



नमुना मागवा. तुमच्या पहाण्यानेंच आनंद जर होईलच होईल, तर मग वापरण्यानें कां न होणार बरें ? देवतांचे दर्शनानें हिंदुधर्माभिमानास भरती नाहींका येणार ? नांव ऐकतांच पहावेंसें वाटतें व पाहातांच घ्यावेंसें वाटतें.

हिंदु घड्याळें कशीं आहेत, दिसण्यांत सुंदर, खिशांत हलकीं, मजबूत, टिकाऊ, अंगचे चावीचीं, तवकडी मिन्याची पांढरी असून त्यावर रीतीप्रमाणें रोमन आंकडे असून ठळक मराठी आंकडेही आहेत आणि प्रत्येक आंकड्यामध्यें हिंदुपूज्य देवतांचीं सुंदर चित्रें आहेत. श्रीगणपति, सरस्वती, रामदासस्वामी, हनुमंत, रामसीता, लक्ष्मीनारायण, गरुड, अष्टभुजादेवी, विठ्ठलरखुमाई, शंकरपार्वती, अक्कलकोटस्वामी, श्रीगुरुदत्तात्रय, आणि मध्यभागीं, महाराष्ट्रास जिवंत करणारे गोब्राह्मणप्रतिपालक श्रीशिवाजीछत्रपतिमहाराज यांचें सुबक चित्र आहे. अशीं हीं अपूर्व हिंदु घड्याळें आमचे देशबांधव व भगिनी काय झणून न घेतील !

हिंदु सिलेंडर पिक्क नी. सी. वॉच किं. रु. १० ग्या. वर्षे १
हिंदु लिव्हर प्रीव्हेन्स नी. सी. वॉच किं. रु. १५ ग्यारन्टी वर्षे २
हिंदु रासकोप सिस्टीम नी. सी. वॉच किं. रु. १७ ग्या. वर्षे ३
हिंदु प्रिव्हेलन्स चांदीचें वॉच किं. रु. २५ ते ३० ग्या. वर्षे ४
हिंदु सोन्याचें वॉच किं. रु. १०० ते १२५ ग्या. वर्षे ४
हिंदु सचित्र आर्मी वॉचेस किं. रु. १० ते १२५ पर्यंत.

हिंदु सचित्र टाईमपीसेस साधें, अलार्म, स्विंग, जपींगई. आंकड्यांमध्यें देवतांचीं चित्रें, मध्यभागीं दरबारी व अश्वारूढ श्रीशिवाजी, आणि श्रीशंकर पार्वतीसह. किं. रु. ४–६–१० ते ३० पर्यंत. [९

जी० बी० नाईक आणि कंपनी. बिलासिसरोड, नाका भायखळा, मुंबई.

धि इंडियन म्यारेज ऍण्ड डेथ बेनिफिट फंड लिमिटेड, मुंबई.

डिरेक्टर्स.

रावसाहेब दलपतराम प्राणजीवन खक्कर जे. पी.
बद्रुद्दिन अब्दुल्ला कूर एस्क्वायर जे. पी.
रुसतम बी. पेमास्तर एस्क्वायर बी. ए. एल् एल्. बी.
धनजीशा फ्रामजी चिनाय एस्क्वायर.
विष्णु नारायण परुळकर एस्क्वायर (एक्स आफिशिओ.)

मध्यम स्थितींतील मनुष्यांस आपल्या मुलांमुलींच्या लग्नाचे वेळीं व आपल्या मरणानंतर आपल्या वारसाकरितां पैशाचा संग्रह करून ठेवितां यावा झणून हा फंड १८९४ मध्यें स्थापन झाला आहे. इतक्या अवधींत ३००० पेक्षां जास्त मेंबर झाले असून सरासरी १५० मेंबरांस फायदा मिळाला आहे. लग्नफंडाची वर्गणी दर महिन्यास १। पासून ६। रु. पर्यंत आहे.

मरण-फंडाची वर्गणी फक्त १ रुपया आहे.

व या मरणफंडांतील मेंबरांच्या पश्चात् त्यांच्या वारसास २००० रुपयेपर्यंतची रक्कम फायद्यादाखल मिळेल. जास्त माहिती खालील पत्त्यावर एक आण्याचें तिकिट पाठविल्यानें मिळेल. [८–१२

आफीस–५
कावसजी पटेल स्ट्रीट,
फोर्ट, मुंबई.

परुळकर ऍण्ड कं०
एजंट्स.

प्रभाकर–रोजचें वर्तमानपत्र.

१८३९ त सुरू झालेलें. गेल्या दसऱ्यापासून व्यवस्थित रीतीनें व वक्तशीर प्रसिद्ध होतें. वर्षाची वर्गणी ट. ह. सह ९॥ रुपये.

मुकुंद बाळकृष्ण गुर्जर, बी. ए. म्यानेजर. गिरगांव—मुंबई.

व्यापारी व ग्राहक ह्यांकरितां. **हरएक प्रकारचा माल** मुंबईत मिळणारा वक्तशीर बाहेरच्या लोकांस मिळण्याची सोय.

D. K. SANDU
RAMWADI, BOMBAY.

दत्तात्रेय कृष्ण सांडू ह्यांचें हरएक प्रकारचा माल मिळणारें, आणि माफक अडत घेऊन माल रवाना होणारें दुकानः—

रामवाडी, मुंबई.

वा. कृ. सांडू. दुकानदार—रामवाडी, मुंबई.

यांचा कदाचित् गुण नच आल्यास पैसे परत देऊंच.

मंत्रसिद्ध ताईत व दोरे.

हिमालयावरील एका महान् तपस्वी (सिद्ध) पुरुषानें आमच्या निःसीम भक्तीस तुष्ट होऊन आपला अत्यंत उपयोगी असा जो पिशाचबाधा व दुसरे अनेक विकार दूर होणारा अद्‌भुत मंत्र तो ताईत व दोरे मंत्रून देण्यास शिकविला आहे. व त्या योगानें खालील विकार फार त्वरित बरे होतात. पिशाचादि पीडेनें मुलें, स्त्रिया किंवा पुरुष झोंपेंत अगर जागृतावस्थेंत घाबरतात, कंप सुटतो, वेड लागतें, दांत ओंठ चावतात, दचकून उठतात, व कधीं ज्वरादि विकार उत्पन्न होतात आणि कित्येक प्रसंगीं अपस्मार, भ्रम वगैरे अत्यंत वाईट रोग उत्पन्न होतात. कित्येक स्त्रियांस पिशाचादि पीडेनें संतती होत नसते व झालीच तर वांचत नसते. कित्येकांस स्वप्नामध्यें स्त्रीचा भास होऊन धातुपात होतो; कित्येक स्त्रीपुरुषांमध्यें व कित्येक मित्रांमध्यें वैमनस्यें उत्पन्न होतात, इत्यादि अनेक विकार या आमच्या अद्‌भुत मंत्रसिद्ध ताईत व दोरे यांनीं फार त्वरित खात्रीनें बरे होतात. गुणाबद्दल हजारों सर्टिफिकिटा मिळाल्या व मिळत आहेत. थोड्याच काळांत याचे अपूर्व गुण या देशाच्या, आसमंतात् भागीं ब्रह्मदेश, सिलोन, बनारस, पंजाब, मद्रास, मुंबई, कानडा, इत्यादि ठिकाणीं अतिशय पसरले आहेत. सबब जास्त वर्णन करीत नाहीं. सिद्धमंत्र खोटे ह्मणणारांनीं एकवार अनुभव घेऊन पहावा, ह्मणजे ते नेहमींच ग्राहक बनतील. पुरुषांचे विकारांस दोरा, कि० ८ आणे. स्त्रियांचे विकारांस ताईत १ रु०; रुप्याचा २ रु०; सोन्याचा ६; कित्येक रोगांस दोन वस्तू घ्याव्या लागतील. दोन वस्तू घेणारास ४ आणे, टपालखर्च माफ. एकवार अनुभवानेंच पूर्ण खात्री होईल. माहितीखर्ची सोबत पाठविला जाईल. व्ही. पी.नें. पाठवूं. पत्ता स्पष्ट व पूर्ण लिहावा.

विष्णुबोवा सिद्धमांत्रिक.

५] पत्ता—पोष्ट हर्णे, जिल्हा रत्नागिरी.

केरळकोकिळच्या वर्गणीदारांस मात्र किं. रु. ३ ट. ख. ८६.

मनुस्मृति मराठी भाषांतरसहित.

किं. रु. ५ ट. ख. ८६.

हा आर्यधर्माचा मुख्य व अतिप्राचीन ग्रंथ असल्यामुळें प्रत्येक हिंदूला पूज्य व संग्रह करणें फार अगत्याचें होय. त्यांत मराठी भाषांतराच्या योगानें तो सर्वांस समजण्यास सुलभ झाला आहे. ह्यांत ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यास हे आश्रम, व धर्म, संकीर्ण जाती व त्यांचे धर्म, राजकीय विचार, दायविभागादि न्याय, दिवाणी, फौजदारी प्राचीन कायदे, प्रायश्चित्त इत्यादि विषय फार सुलभ रीतीनें कथन केले आहेत. सोनेरी सुरेख बांधणी. ठिकठिकाणीं सर्वटीकाधारानें टीपा दिल्या आहेत.

केरळकोकिळाच्या वर्गणीदारांस रु. १।१४ ट. ख. ८४.

वैद्यकशार्ङ्गधरसंहिता.

नवीन मराठी भाषांतरसहित.

पृष्ठसंख्या–५२७–किं. रु. २॥ ट. ख. ।।

" अर्वाचीन सर्व ग्रंथांमध्यें शार्ङ्गधरसंहिता अत्युत्तम होय. ह्यामध्यें सर्व विषयांची व्यवस्था जशी अनुक्रमानें लावलेली आहे तशी दुसऱ्या कोणत्याही ग्रंथांत केलेली आढळत नाहीं. ह्या ग्रंथांत जे प्रयोग लिहिले आहेत ते सारे अनुभव घेऊन त्यांचें यथार्थ गुणवर्णन केलें आहे. ह्यांत इतर ग्रंथांप्रमाणें औषधांची अतिशयोक्ति नाहीं. अशा प्रकारचा सर्वोत्तम लोकप्रिय ग्रंथ असून त्याच्या प्राकृत भाषांतरामध्यें प्राकृत टीकाकाराचे खुतः असोत किंवा लेखकाचे असोत जे प्रमाद झालेले आहेत त्यांची दुरुस्ती छापणारांनीं आजपर्यंत केलेली नाहीं. कित्येकांनीं तर कांहीं बाहेरचा ग्रंथच ह्यांत घुसडून दिला आहे. हे सर्व घोंटाळे काढून करवेल तितकें शुद्ध व सरळ भाषांतर केलें असून विषयानुक्रमणिकेशिवाय आजपर्यंत न झालेली रोगानुक्रमणिका दिली आहे. त्यामुळें कोणत्या रोगावर काय औषध हें झटकन् पाहिजे त्यास समजतें. प्रसिद्ध प्रसिद्ध अशा वैद्यांच्या सूचनेप्रमाणें ह्यांत शक्य ती सुधारणा केली आहे. व्ही. पे.नें पाठवूं.

जनार्दन महादेव गुर्जर, रामवाडी–मुंबई.

ल.रा.पंडित,मुं.

आक्टोबर. (वर्षाची वर्गणी १४ शे. खासई. फुटकळ अंकास ८४.) १८९६.

केरळकोकिळ.

वर्षारंभ जानेवारी.

पु० १०] [अं० १०

विधिरेव विशेषगर्हणीयः करट त्वं रट कस्त्वापराधः ॥
सहकारतरौ चकार यस्ते सहवासं सरलेन कोकिलेन ॥१॥

जनार्दन महादेव गुर्जर बुकसेलर अॅण्ड पब्लिशर.
रामवाडी
मुंबई.

सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत.

ह्या पुस्तकांतील लेख कोची (मलबार) येथें तयार होऊन, ते मुंबई येथें छापून प्रसिद्ध होतात.

विषयांची अनुक्रमणिका.

	पृष्ठ.		पृष्ठ.
समुद्र लेखनी.	२१७	दुसऱ्याचें घेऊन मजा पाहूं•नये,	
थिओट्रोग्राफ.	२२०	देऊन पहावी.... ...	२३४
नरदेहाविषयीं थोर लोकांचें		पुस्तकपरीक्षा (निर्मला नाटक.)	२३६
ह्मणणें....	२२८	सौ०डा० आनंदीबाईचें चरित्र.	२३८
पूर्वजांचा अभिमान. ...	२३०		

मुलींस व स्त्रियांस

रंगवल्लिका

अथवा

रांगोळी व लेणीं काढण्याचें पुस्तक.

काढण्यास सोप्या व सुशोभित अशा आकृति ३० आहेत. किं. ४ आणे. ट. ख. ८॥ आणा. पांच प्रती एकदम मागविल्यास ट. ख. सह किं. १ रुपया.

जनककन्या रामभार्या–

सीता.

स्वयंवरापासून तों रामराज्याभिषेकापर्यंत, रामायणांतील, मराठी भाषेंत सर्व कथा मुख्यत्वें **स्त्रियांनीं**, मुलांनीं व पुरुषांनींही वाचण्याजोगी आहे. किंमत २ रु. पण केरळकोकिळचे वर्गणीदारांस मात्र किं. रु. १॥ ट. ख. माफ.

जनार्दन महादेव गुर्जर, दुकान रामवाडी–मुंबई.

॥ ओं नमः श्रीरामचंद्राय ॥

आर्यमहौषधालय मु० आंजलें.

या अत्यंत खात्रीच्या औषधाचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यांस कदाचित् आला नाहीं तर पैसे परत देऊंच व त्याशिवाय त्यांच्या आरोग्यार्थ एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकटच देऊं.

मदनविलासामृतसंजीविनी.

वीर्यस्तंभक, रक्तशोधक, अत्यंत कामोत्तेजक, चित्तोत्साहक, बुद्धि-कांतिवर्धक व धातुपौष्टिक सुवर्णमाक्षिकमौक्तिक कस्तूरीमिश्र अपूर्व गुटिका.

१. शरीराची उत्तम सुधारणा करणारीं अत्यंत महत्वाचीं जीं औषधें आहेत, त्यांत या गुटिका अगदीं पहिल्या प्रतीच्या ठरल्यामुळें यांचे अपूर्व गुण थोड्याच काळांत या देशाच्या सर्वभागीं व त्यांच्या आसमंतात् अतिशय पसरले आहेत. या सेवन केल्यानें नपुंसकत्व, इंद्रियशिथिलता, कडकी, जीर्णज्वर, अग्निमांद्य, अशक्तता, स्वप्नजन्य किंवा इतर धातुपात, छातींतील रोग, मेंदूचे विकार, पांडुरोग, क्षय, मूत्रसंकोच किंवा मूत्रातिरेक, कटिशूल, वातरोग, उपदंशसंबंधी मुरलेले विकार, हात, पाय, मूत्रमार्ग, व शरीर यांचा दाह, व अरुचि, इ० अनेक विकार कितीही वयाच्या मनुष्यास नवीन किंवा जुनाट असले तरी खात्रीनें बरे होतात. धातु व रक्त यांची शुद्धि व वृद्धि होऊन रक्तदूषणजन्य अनेक रोग हटकून बरे होतात. वीर्यस्तंभन, व कामोद्दीपन होऊन अग्नि व शक्ति भरपूर वाढते. स्त्रियांची धुपणी व संततीस अपायकारक जे गर्भाशयस्थ रोग त्यांचें त्वरित निवारण होऊन कांति, स्मरणशक्ति व बुद्धि वाढते. ज्यांस शारीरिक व मानसिक श्रम फार पडतात, त्या सर्वांच्या आंगीं यांनीं अतिशय शक्ति येऊन मनास उत्साह प्राप्त होतो, सुस्ती जाते. ज्यांस दूध व जडान्न पचत नाहीं त्यांस तें भरपूर पचूं लागतें, कोष्ठशुद्धि होते. या अप्रतिम गुटिका अत्यंत शोधानें केल्या असून त्यांच्या अप्रतिम गुणका-

रित्वाबद्दल हजारों सर्टिफिकिटें मिळालीं व नित्य मिळत आहेत. यांत अपायकारक पदार्थ बिलकूल नाहींत. वरील सर्व रोग जाऊन उत्तम गुण प्राप्त होण्यास या गुटिकांसारखें अप्रतिम औषधच नाहीं असें पूर्ण अनुभवावरून स्पष्ट ह्मणतों. यांस पथ्यसेवनाची गरज नसतां या पाहिजे त्या दिवसांत घेतल्या तरी हटकून गुण करितात. यामुळें त्यांचा अतिशय खप सुरू आहे. गोळ्या रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम सहा रुपयांच्या किंवा त्यांहून कितीही जास्त गोळ्या घेणारांस बंगीचा सर्व टपालखर्च माफ आहे. त्यांचे आंत घेणारांस मात्र तो वेगळा सहा आणे पडेल. एकदम ३२ गोळ्यांस १ रु. ७० गोळ्यांस २ रु. १६० गोळ्यांस ४ रु. २६० गोळ्यांस ६ रु. ५२० गोळ्यांस १० रु.

थंडगार नेत्रांजन—हें अंजन स्तुतीस अत्यंत पात्र आहे, हें सतत दहा वर्षांच्या पूर्ण अनुभवानें कळवितों. यानें डोळ्यांचे साधारण विकार तर सहजच, परंतु दृष्टीचा समूळ नाश करणारे, तिमिरांध्य, वडस, बिंदु, फुलें, कांच, सारा, भोर, गळती, खुपऱ्या, जळजळ, कंड, फूट, चिकटा, ठणका व लाली इ० अनेक विकार, तत्संबंधी मस्तकशूलादि विकारांसह कितीही वयाच्या मनुष्यास कोणत्याही कारणांनीं प्राप्त झालेले नवीन किंवा जुनाट असले तरी नाजूक रीतीनें कोणतीही इजा न होतां बरे होतात. दृष्टि तीव्र व थंडगार राहते. हें चांगल्या दृष्टीच्या मनुष्यांनींही डोळ्यांत घातल्यास वरील विकार त्यांस बिलकूल होणार नाहींत. लहान मुलांस तर हें अत्यंत उपयोगी आहे. २ तो० ड० १॥ रुपया.

विशेष सूचना.—अलीकडे आंजलें व मुडी वगैरे गांवांतील औषधांच्या बऱ्याच जाहिराती सुरू आहेत व त्यांपैकीं कांहीं जाहिरातींत ज्या सह्या आहेत त्या बहुतेक आमच्याच नांवासारख्या भासण्याचा विशेष संभव आहे. तरी अशा लोकांशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं हें अवश्य लक्षांत ठेवून आमचीं औषधें **"कृष्णशास्त्री बिवलकर वैद्य. मु० आंजलें ता० दापोली जि० रत्नागिरी."** याच पत्त्यावर रोखीनें किंवा व्ही.पी.नें मागवावींत. अनुपानपत्रक सोबत असतेंच.

४–१२]

महासागर.

समुद्रलेखनी.



कोणत्याही गोष्टीचा अतिशयपणा व अनंतत्व दाखवावयाचें, ह्मणजे त्यास समुद्राची उपमा देतात. कारण, तो तसाच अगाध आहे. आणि त्याच्या संबंधीं प्रत्येक गोष्टींत त्याचा तो गुण कायमच असतो. ह्मणजे त्याची खोली अगाध; त्याचा विस्तार अगाध; त्याची लीला अगाध; त्याचा उपयोग अगाध; सर्वच कांहीं अगाध. पण ह्या सर्वांपेक्षांही त्याच्यातील जलचरें व जलस्थ पदार्थ फारच अगाध. त्याच्या खोलीचा, त्या-

च्या विस्ताराचा, थोड्या बहुत अंशानें तरी मनुष्यांस थांग लागला आहे; पण त्याच्यांतील विचित्र व अद्भुत जलचरांचा व वस्तूंचा थांग लावणार कोण? आमच्या प्राचीन शास्त्रवेत्त्यांनीं साधारणपणें सर्व जगांत चौऱ्यायशीं लक्ष योनी आहेत, अशी गणना केली आहे. पण नुसत्या महासागरांतच चौऱ्यायशीं लक्ष तर काय, पण चौऱ्यायशीं कोटींनीं सुद्धां कांहीं दाद लागावयाची नाहीं! त्यांतील प्राणी, प्राणिसमुदाय, व त्यांस जन्मतःच ईश्वरानें दिलेलीं घरें पाहिलीं ह्मणजे आश्चर्यानें मन अगदीं थक्क होऊन जातें. विचाराचा व्यापार खुंटून जातो. आणि परमेश्वराचें अगाध सामर्थ्य डोळ्यांपुढें उभें राहतें. असो, आज **'समुद्रलेखनी'** ह्या नांवाच्या, महासागरांतील विचित्र जीवांविषयीं थोडीशी माहिती आमच्या वाचकांस करून द्यावयाची आहे.

प्रथमदर्शनीं दिलेल्या चित्रावरून एकदम पहाणाराची कल्पना कांहीं निराळीच होते. हा काय पंखा आहे, का एखाद्या सुंदर कारागिरानें केलेलें रत्नजडित हत्यार आहे, का आहे तरी काय? असें वाटतें. परंतु परमेश्वरानें हा सूक्ष्म जीवांचा निर्मिलेला गांव आहे, किंवा त्यांस बांधून दिलेली ही एक सोयीकर वाडी किंवा चाळ आहे, ह्मटलें तरी चालेल.

समुद्रलेखनीला खालच्या बाजूस एक दांडा असून वरच्या बाजूस तो चिंचोळा होत गेलेला असतो. आणि त्याच्या दोहों बाजूंस इंग्रजी क्वीलपेनाप्रमाणें दोन पिसारे असतात. ह्यामुळें त्याचा एकंदरींत आकार क्वीलपेनाशीं अगदीं सादृश्य पावतो. ह्मणून इंग्रजी खलाशांनीं व दर्यावर्दी लोकांनीं, त्यास **'सीपेन'**–**समुद्रलेखनी**–असें नांव दिलें आहे. आणखी, समुद्रपर्यटणांत त्याच लोकांनीं अघाडी मारलेली आहे. तेव्हां त्यांनीं दिलेल्या नांवांत आपणांसही तूर्त बदल करतां येत नाहीं. कित्येक लोकांस त्याचा आकार कोंबड्याच्या तुऱ्याशीं सारखवट वाटल्यावरून त्यांनीं त्यास **'कोंबड्याचा तुरा'** असेंही एक नांव दिलें आहे व कधीं कधीं पाश्चात्य लोक त्याचा उपयोग करतात.

समुद्रलेखनीचा आकार जांभळसर असून त्याचा शेंडा नारिंगी रंगाचा असतो. मध्यभागीं पाठीच्या कण्यासारखा कणा असून, दोहों बाजूंस एकसारखी कातरेबाज झालर लागलेली असते. तिच्या व-

रचें नकासकाम, इतकें सुंदर, इतकें मनोहर, व इतकें नमुनेबाज असतें कीं, हल्लींच्या एखाद्या मोठ्या नामांकित प्रदर्शनांत सुद्धां तसलें काम पहावयास मिळणें दुर्लभ! ह्या झालरीच्या दोन्ही बाजूंनीं शेवतीच्या पानासारखे फार मजेचे कातरे असतात. त्यांचा आकार शेंड्याकडे निमुळता होत होत, अखेर पिंपळपानासारखा बनतो. प्रत्येक कातऱ्याच्या शेवटास एक लहानशी खळगी असून तींत एक सूक्ष्म व पारदर्शक असा प्राणी असतो. ह्मणजे **'समुद्रलेखनी'** हें एक झाड असें मानलें, तर त्याच्या झालरीच्या प्रत्येक टोंकास लागलेला एक प्राणी हीं त्याचीं फळें ह्मटलें तर शोभण्यासारखें आहे. हे प्राणी एकत्र कसे उत्पन्न होतात, व त्या सर्वांस सांधणारें, शरीराच्याच घटकावयवांचेंच घर कसें प्राप्त होतें, ह्याचा अद्यापि बरोबर शोध लागलेला नाहीं. हें घर प्राण्याबरोबरच मृतप्राय कां व्हावें, त्यांत जीवांश कांहीं आहे कीं काय, ह्याचाही अद्याप उलगडा झालेला नाहीं.

दांड्यामध्यें एक पातळ, सुईच्या आकाराचें हाड असतें. त्याचीं दोन्ही टोकें लवचिक असून दोहों बाजूंस वळलीं असल्यानें, त्यांचा आकार हुकासारखा झालेला असतो. कितीएक ग्रंथकारांनीं असें ह्मटलें आहे कीं, **समुद्रलेखनी** ही, आपल्या दोहों बाजूंच्या झालरीच्या सहाय्यानें समुद्रामध्यें खुशाल पोहते. परंतु अर्वाचीन प्राणिशास्त्रशोधकांचा त्यावर भरंवसा नाहीं. त्यांस ती गोष्ट अगदीं असंभवनीय वाटते. मच्छिमार लोक असें सांगतात कीं, **समुद्रलेखनी** ही आपले पंख चिखलांत रोवून समुद्राच्या तळाशीं वस्ती करते. परंतु कितीएक गृहस्थांना जहाजांच्या बुडास चिकटलेल्या **समुद्रलेखन्या** अशा आढळून आल्या आहेत कीं, त्यांच्या पंखांत–झालरींत–कोणत्याच प्रकारची शक्ति किंवा सामर्थ्य नव्हतें. येवढेंच नव्हे, पण त्यांस ह्या बाजूचें त्या बाजूवर सुद्धां होतां येत नव्हतें. ह्मणजे त्या सांगाड्यांत जीवशक्तीचें चिन्ह अद्याप कोणासच आढळलेलें नाहीं.

समुद्रांतील बहुतेक प्राण्यांच्या देहाचा रात्रीं काजव्याप्रमाणें प्रकाश पडतो. तसा **समुद्रलेखनी**च्या देहाचाही प्रकाश पडण्याच्या अनेक जाती आहेत. थोडा बहुत प्रकाश हा प्रत्येक जातीला आहेच. जिचा प्रकाश कमीसा वाटेल, तीस काठीसारखें कांहीं तरी हातांत घेऊन डिव-

चावें, ह्मणजे अतिशय उज्वल प्रकाश पडतो. ह्या प्रकाशांत निळसर रंगाची झाक असते. **समुद्रलेखनी**चा दांडा शृंगमय पदार्थाचा, पोकळ असून त्यांत मांसासारखा पदार्थ भरलेला असतो. ह्मणून तो खाण्यासाठीं अनेक जलचरें पाठलाग करीत असतात. अशा वेळीं **समुद्रलेखन्यां**चा घोळकाच्या घोळका समुद्राच्या तळाशीं जातो. आणि आंधेरांत काजव्याप्रमाणें, एकदम चक्क चक्क असा प्रकाश पाडतो. तेव्हां त्याच्या शत्रूंची अगदीं दाणादाण उडून जाते. ते सारखे बेदम पळत सुटतात. मग त्यांच्या वाटेला जाण्याचें नांव कशाला? अशा प्रकारें **परमेश्वरानें** स्वसंरक्षणासाठीं प्राणिमात्रास काय काय व कसकशीं साधनें दिलीं आहेत, तें मनांत आणलें ह्मणजे प्रेमानें कंठ कसा सद्गदित होतो, व त्या **परमात्म्या**विषयीं कांहीं विलक्षण प्रकारची पूज्यबुद्धि उत्पन्न होते.

लोकोत्तर चमत्कार.

थिओट्रोग्राफ

अथवा

पदार्थांच्या हालचालीप्रमाणें हुबेहुब चलनवलन करणारीं चित्रें.

पाश्चात्य लोक त्यांतून अमेरिकन् हे आपल्या शोधाचें घोडें एकसारखें दिवसेंदिवस पुढें ढकलीत आहेत. आणि हे त्यांचे शोध अखेरीस कोठपर्यंत पोंचतात ह्याविषयीं लोकांची कल्पना अगदींच गुंग होऊन गेली आहे. **फोटोग्राफ** नांवाच्या कलेच्या साह्यानें कोणत्याही पदार्थाचें चित्र अगदीं यथातथ्य निघतें हें आतां जगजाहीर झालें आहे. पण त्याबरोबरच तें चित्र ज्या स्थितींत निघालें असेल, त्या स्थितींत सदान्कदां दिसतें. त्यापुढची त्याची हालचाल कांहीं दिसत नाहीं, व तसें होणें शक्यही नाहीं हेंही सर्व प्रसिद्ध आहे. परंतु आलीकडे फोटोग्राफीमध्यें **'थिओट्रोग्राफ'** नांवाच्या जातीच्या चित्रांचा नवाच शोध निघाला आहे. त्या योगानें मनुष्यांची, पदार्थांची वगैरे हालचाल अगदीं हुबेहुब दिसते. आणि त्याविषयींची मनुष्याची कांहीं कल्पनाच

चालत नाहीं. ही गोष्ट सांगावांगीची नव्हे. तर तो खेळ प्रत्यक्ष मुंबईस आला होता, तो आह्मांसही पाहण्याचा प्रसंग येऊन मोठा आनंद झाला. आमच्या बरोबर आणखीही पुष्कळ विद्वान्, शोधक व चतुर पुरुष आलेले होते, तेही आश्चर्यभरित होऊन आपआपल्या घरीं गेले. यास्तव ज्यांनीं तो खेळ पाहिला नाहीं, त्यांस तो कसा होता हें कळावें, व ज्यांस तो कसा करितात ही गोष्ट कळली नाहीं, त्यांस त्याची घटना कळावी, ह्मणून त्याविषयीं बरीचशी माहिती देण्याचें आज योजिलें आहे.

हा विषय ज्यास **फोटोग्राफी**ची व **म्याजिकल्यांटर्न**ची थोडीबहुत तरी माहिती आहे त्यास चांगला कळेल. परंतु ज्यांस ती माहिती अगदींच नाहीं त्यांस तो नीटसा कळणार नाहीं. ह्यास्तव **फोटोग्राफा**विषयीं व **'म्याजिकल्यांटर्न'** नांवाचा–जो चित्रें मोठीं करून दाखविण्याचा कंदील असतो–त्याविषयीं प्रथम थोडेंसें दिग्दर्शन करतों. **फोटोग्राफ**चें चित्र प्रथमतः कांचेवर काढितात. ह्या कांचेला पूर्वी एका रसायनाचा थर दिलेला असतो. ह्या थरांत कोणत्याही पदार्थाचें किंवा मनुष्याचें चित्र कोरून निघतें. ह्मणजे मनुष्याच्या छायेच्या ठिकाणीं तो रसायनाचा थर धुतला जाऊन तेथें स्वच्छ कांच राहते. व प्रकाशाच्या ठिकाणीं कांचेवर त्या रसायनाचा थर घट्ट बसलेला असतो. ह्यामुळें ती कांच प्रकाशाकडे धरून पाहिली तर तींत विविक्षित पदार्थाची प्रतिमा दिसते. पण ती चांगली ओळखूं येत नाहीं. कारण, ती उलट दिसते. तिच्यांतील प्रकाशाचे भाग काळे दिसतात, व छायेचे भाग प्रकाशित दिसतात. ज्याच्या मिशा काळ्या असतात, त्याच्या मिशा पिकल्याप्रमाणें पांढऱ्या दिसतात. व ज्याच्या पिकलेल्या असतात त्याच्या काळ्या दिसतात. पांढरा आंगरखा असला तर तो काळा आहे असें वाटतें, व काळा असला तर तो पांढरा आहे असें वाटतें. ह्याप्रमाणें सर्व प्रकार उलट होतो. ह्या कांचेवर घेतलेल्या तसबिरीला **'निगेटिव्ह'** असें ह्मणतात. ह्या निगेटिव्हवरून **फोटोग्राफ**चें काम करणाऱ्या लोकांस, कागदावर त्या चित्राच्या पाहिजे तितक्या प्रती काढतां येतात.

आतां **म्याजिकल्यांटर्न** ह्मणजे कांय तें सांगतों. **म्याजिकल्यांटर्न** ह्मणजे **'निगेटिव्ह'**–अर्थात् कांचेवर काढलेल्या तसबिरा–दाखविण्याचा एक प्रकारचा कंदील आहे. ह्या कंदिलाच्या तिन्ही बाजू लांकडी फ-

ळयांनीं किंवा काळें रोगण केलेल्या जस्ताच्या पत्र्यांनीं बंद केलेल्या असतात. पुढच्या बाजूस एक मोठा व एक लहान असे दोन तोंडांस दोन **लेन्स** बसवून सुमारें वीतभर लांबीची नळी बसविलेली असते. **लेन्स** हीं, मोठें दिसणाऱ्या भिंगाप्रमाणें–**म्याग्निफाइंगग्लास**प्रमाणें–वर्तुळ आकाराची वक्रता दिलेलीं भिंगें असतात. ह्या कंदिलाच्या मध्यभागीं एक ढळढळीत दिवा असतो, व त्याची काजळी जाण्यास गोमुखी आकृतीची वरच्या बाजूस एक काळ्या रंगाची चिमणी–धुरांडें–असतें.

पुढील तोंडास जे दोन **लेन्स** असतात ह्मणून सांगितलें, त्यांच्या मध्यभागीं एक आडवी फट ठेवलेली असते. तींत कोणतेंही कांचेवर काढलेलें पारदर्शक चित्र घालावें, आणि समोर एक पांढरा पडदा लावून त्यावर त्याचें पाहिजे तेवढें प्रतिबिंब पाडावें. बाहेरच्या बाजूस प्रेक्षक मंडळी बसवून आंधेर करावा. ह्मणजे हीं चित्रें त्यांस फारच सुरेख दिसतात.

म्याजिकल्यांटर्नमध्यें घालून दाखविण्यास, **फोटोग्राफां**त तयार केलेले निगेटिव्हज् उपयोगीं पडत नाहींत. कारण, त्यांच्यांतील छाया व प्रकाश उलट सुलट दिसत असल्यामुळें, तीं चित्रें **म्याजिकल्यांटर्न**मध्यें अगदींच विद्रूप दिसतात. ह्यास्तव त्याच **फोटोग्राफां**तील **निगेटिव्ह**वरून दुसरे उलटे **निगेटिव्हज्** तयार करून तीं चित्रें दाखविलीं ह्मणजे तीं सुरेख व जशींच्या तशीं दिसतात.

ह्यावरून **म्याजिकल्यांटर्न**चीं चित्रें पडद्यावर रात्रौ कशीं दाखवितात, ही गोष्ट बरीच ध्यानांत येईल. ह्या चित्रांतील मनुष्यादिकांच्या अवयवांस आजपर्यंत चलनवलन देतां येत नसे, हें उघडच आहे. कारण, मूळ चित्रांतच जर अवयव हालण्याचें कांहीं साधन नाहीं, तर ते पडद्यावर तरी कसे हालणार? तथापि चतुर लोकांनीं त्यांतही कांहीं युक्त्या काढल्या आहेत, त्या अशा. एकामागें एक दुहेरी कांचा बसवून, त्यांच्या सरकविण्यानें एक अवयव झांकावा, व दुसरा दुसऱ्याच रीतीनें उत्पन्न व्हावा. अशा रीतीनें एखादा पाय किंवा हात, किंवा फार तर डोकें एकाच गतीनें हालवितां येत असे. व तेवढ्या हालचालीनेंही मनुष्यांस बरीच करमणूक वाटे. पण शिरोभागीं लिहिलेलीं चित्रें, मुंबईस जीं नुकतींच दाखविण्यांत आलीं, त्यांचीं चलनवलनें केवळ मनुष्यासारखीं हुबेहुब, व मनास अगदीं थक्क करून सोडणारीं होतीं.

त्याचा अद्भुत चमत्कार मनांत येण्यासाठीं, त्यांतील कांहीं चित्रांची कृति सांगतों. पहिल्या प्रथम पडद्यावर एका बगीच्याचा देखावा दिसूं लागला. ह्या बगीच्यांत एक मनुष्य बंबाची नळी हातांत धरून झाडावर पाणी शिंपीत होता. खरें पाहतां हें एक चित्र होतें. त्याचे हातपाय हालण्याचें कांहीं कारण नव्हतें. पण त्याचे हातपाय मागेंपुढें होत होते, व बंबांतील पाणी वरचेवर बाहेर उसळून त्याचे नवे नवे फवारे बाहेर उडत आहेत असें स्पष्ट दिसत होतें. पण ह्याहूनही विलक्षण चमत्कार पुढें दिसूं लागला. तो असा. बंब उडविणारा मनुष्य झाडाकडे पाहून व प्रेक्षकाकडे पाठ करून बंबानें पाणी सोडीत आहे इतक्यांत त्याचा एक चेष्टेखोर मित्र लपत लपत पाठीमागून आला. आणि त्यानें हळूच त्या बंबाच्या लांब पसरलेल्या नळीवर पाय देऊन ती दाबून टाकली. तेव्हां अर्थातच पुढें येणारें पाणी बंद झालें, आणि पाणी शिंपणारा मनुष्य एकदम चकित झाला. तो त्या नळीच्या भोंकाकडे पुनःपुन्हा पाही. पाणी एकदम बंद होण्याचें कारण काय? ही कल्पना मनांत येऊन तो मोठ्या बुचकळ्यांत पडला आहे असें ह्याच्या मुद्रेवरून व हावभाव करण्यावरून वाटे. शेवटीं त्यानें तेथें जमिनीवर पडलेली एक काडी आपल्या हातांत घेतली. आणि ती त्या बंबाच्या नळीच्या भोंकांत घालून आंत कांहीं बसलें आहे कीं काय, ह्मणून टोंकारून पाहूं लागला. इतक्यांत बंबाच्या नळीवर पाय देऊन उभ्या राहिलेल्या चेष्टेखोरानें, ही संधि आतां खूप आहे असें मनांत आणून त्या बंबाच्या नळीवरचा पाय एकदम काढला. त्यासरशी त्या नळीच्या तोंडांतून भसकर पाणी वर उसळून त्या नळी धरणाराच्या तोंडावर सारें पाणीच पाणी उडून तो अगदीं भिजून चिंब झाला. ती त्याची फजीती पाहून हा चेष्टेखोर मनुष्य पळत सुटला. त्यावर त्या पहिल्या मनुष्याची नजर गेली, आणि तो त्याच्या पाठीस लागला. ह्याप्रमाणें बराच वेळ त्या बागेंत त्यानें त्यास हुलकावण्या दाखविल्या. अखेर त्यानें त्यास धरून खालीं पाडलें, व कुंबल कुंबल कुंबलला. येथें एक चित्र संपलें. ह्यांत वर लिहिलेली सर्व कृति हुबेहुब मनुष्याच्या कृतिप्रमाणें होत असे. कांहीं फरक ह्मणून नाहीं. शब्द मात्र काय तो कमी.

आतां दुसरें चित्र. एका 'राउंड टेबला' भोंवतीं चार गृहस्थ येऊन

पत्त्यांनीं खेळत बसलेले होते. ते आपआपलीं पानें इतक्या आवेशानें आपटीत, एकाबाजूस सारीत, कीं सांगतां सोय नाहीं. इतक्यांत एक मनुष्य चहाचा पेला घेऊन येई. त्याचें येणें, नम्रतेनें चहाचा पेला टेबलावर ठेवणें, त्यांचें पिणें, इतक्या क्रिया स्पष्ट होत असलेल्या दिसत. नंतर त्यांतीलच एक गृहस्थ चिरूट आणावयास सांगे. तो घेऊन आगकाडीच्या पेटींतील काडी काढून ती भक्कर पेटवी; चिरूट पेटवी; धूर सोडी; हात खालवर करी; व एका हातानें पानें मारण्याचा झपाटा चाले, इतकीं चलनेंवलनें स्पष्ट, व अगदीं स्वाभाविक अशीं दिसत, व पहाणारास अतिशय आल्हाद वाटे.

तिसरें चित्र आगगाडीचें. हें तर फारच पहाण्यासारखें होतें. नेहमींच्या रीतीप्रमाणें भक् भक् भक् भक् वाफेचे फवारे उडवीत आगगाडी स्टेशनांत येऊन पोंचली. मग जी काय धांदल उडाली ती कांहीं पुसूंच नये. उतरणाऱ्या लोकांची तारांबळ, चढणाऱ्यांची गर्दी, हमालांचा हांजीहांजीपणा, इत्यादि पाहून मनास एक प्रकारची विलक्षणच मौज वाटे. वर चढणाऱ्या लोकांस खालीं उतरणारे लोक खालीं ढकलीत. कोणी आपल्या मित्रास आपल्या डब्यांत येण्याविषयीं खूण करीत; कोणी आपला बोजा आपणच घेऊन रडतखडत चालत. गार्ड स्टेशन मास्तरापाशीं **लाइनक्लीअर** मागत असे. फळफळावळ व मेवामिठाई विकणारांची त्यांतच धांदल. इतकें होत आहे, तोंच गार्डनें प्रत्येक कंपार्टमेंटचें दार झांकून घेऊन शीळ फुकली, व गाडी सुरू करण्याविषयीं वर हात केला. तेव्हां पुन्हा पूर्ववत् वाफेचे सोसाटे टाकीत ती स्टेशनापासून पुढें निघून गेली. ह्याप्रमाणें अनेक प्रकारचीं चित्रें दाखविण्यांत आलीं. कोठें बाजार भरला असून त्यांतील लोक देवघेव करीत आहेत, कोठें जत्रा भरलेली असून त्यांत पाळणे फिरत आहेत, अशीं अनेक प्रकारचीं चित्रें दाखविण्यांत आलीं. त्यांतील हालचाल सर्व प्रत्यक्ष मनुष्यें करीत आहेत असें वाटे. फक्त शब्द मात्र नाहीं. पण आमच्या मतें ह्याच चित्रांतील शब्दाचे ध्वनि जर फोनोग्राफ नांवाच्या यंत्रानें धरून ह्या खेळाबरोबर दाखविण्याची तजवीज ठेवली, तर सर्व देखावा अगदीं आपल्यापुढें प्रत्यक्ष चालला आहे असा बरोबर भास होईल. चित्रांची कल्पना सुद्धां मनांत रहाणार नाहीं. असो.

आतां हीं चलनवलनाचीं चित्रें कशीं तयार करतात, ह्याविषयीं थोडेंसें सांगूंया. हल्लीं फोटोग्राफीच्या कलेची जी अत्यंत सुधारणा झाली आहे, तिचा हा प्रभाव होय. सन १८२७ मध्यें फोटोग्राफची तसबीर घेण्याला ६ तास लागत! तें बस्तान १८३९ मध्यें मिनिटांवर आलें. ह्मणजे ह्या वेळीं फक्त तीस मिनिटें अर्थात् अर्धा तास लागे. सन १८४१ मध्यें ती तीन मिनिटांत निघूं लागली. व १८५१ त तो काल सेकंदांत ह्मणजे क्षणांत येऊन पोंचला. सन १८७८ पासून तर सेकंदाचे हिस्से पडूं लागले. ह्मणजे $\frac{१}{४}$ सेकंद, $\frac{१}{२}$ सेकंद इत्यादि. हल्लीं जी नवीन युक्ति निघाली आहे, तिच्या योगानें निमेषमात्रांत किती तरी तसबिरा निघतात. ह्मणजे मनुष्याचे डोळ्यांचें एक पातें लवेपर्यंत ५।१० तसबिरा निघून पार होतात. ह्मणजे त्वरेची परमावधी झाली.

आजपर्यंत प्रथमतः फोटोग्राफची तसबीर घेणें ती, कांचेवर घेत असत. पण आतां कांचेच्या ऐवजीं **'सेल्युलाईड'** नांवाच्या पारदर्शक

---

१ आमच्या पहाण्यांत जे **सेल्युलाइड**वरचे **निगेटिव्ह** आले आहेत, ते पत्रे सारे पारदर्शक आहेत. व तसले पत्रे आमच्या संग्रहींही आहेत. ते साधारणपणें अभ्रकाच्या पत्र्याप्रमाणें दिसतात. परंतु **सेल्युलाइड**चा दुसरा प्रकार आहे, तो हुबेहुब हस्तिदंतासारखा दिसतो. व तो हवातेवढा जाडही करतां येतो. ह्यामुळें त्याच्या हजारों वस्तु करतां येतात, व त्या हस्तिदंताच्या वस्तूशीं अगदीं सदृश दिसतात, ओळखतां सुद्धां येत नाहींत. ह्यास्तव ती कृति येथें सांगून ठेवतों. **पारिस** येथील कारखान्यांत जो **'सेल्युलाइड'** तयार होतो, तो खालीं लिहिल्याप्रमाणें तयार करतात.

'शिगारेट्स' नांवाच्या विलायती विड्या करण्यासाठीं बाजारांत अतिशय लहान आकाराच्या पातळ कागदांचीं जीं बुकें विकत मिळतात, त्यांतील कागद घेऊन ते **नाइट्रिक** आसिड व **सल्फ्युरिक** आसिड ह्यामध्यें विरवितात. ते विरून त्याचा चांगला मलिदा झाला ह्मणजे तो पाण्यानें धुऊन धुऊन त्यांतील आसिडाचा भाग अगदीं नाहींसा करून टाकतात. नंतर त्यांत कापूर–व पाहिजे असल्यास इच्छित रंग–घालून तो सुकवितात. आणि पुन्हा थोड्याशा ऊन्ह पाण्यांत टाकला ह्मणजे तो मऊ होतो. नंतर त्यास एका प्रेसाखालीं दाबतात. ह्मणजे त्याचे अर्धा इंच जाडीचे पत्रे होतात. हे पत्रे **अलकोहल**मध्यें थोडेसे भिजत घालून सुकविले ह्मणजे हुबेहुब हस्तिदंताप्रमाणें दिसतात. .शिवाय ऊन्ह पाण्यांत टाकून ते मऊ

रासायनिक पत्र्यावर घेण्याची युक्ति निघाली आहे. हा, पत्रा असल्यामुळें लवचिक असतो, आणि कांचेप्रमाणें त्यास फुटण्याचेंही भय नसतें. शिवाय त्याची पाहिजे तितकी लांब गुंडाळीही करतां येते, आणि ती अशा प्रकारच्या चित्रास उपयोगीं पडते.

फोटोग्राफची तसबीर काढण्यासाठीं प्रथम रसायन लावलेल्या कांचा तयार कराव्या लागतात, त्याचप्रमाणें सांप्रत **'सेल्युलाइडचे'** पत्रे रसायन लावून तयार करतात. व त्यावर कांचेप्रमाणेंच पाहिजे त्याचा फोटो घेता येतो. आतां **थिओट्रोग्राफ**मधील चित्रें कशीं तयार करतात तो प्रकार सांगतों.

सेल्युलाइडची एक भली मोठी गुंडाळी घेऊन तिच्यावर **फोटोग्राफ** उठण्याचें रसायन–**सिल्व्हर ब्रोमाइड**–लावतात. आणि त्यावर एका मिनिटांत हालचाल करणाऱ्या एका मनुष्याचे किंवा अनेक मनुष्यांचे फोटो घेतात. ह्यासाठीं **फोटोग्राफ** घेण्याच्या यंत्रांत--**क्यामेऱ्यांत**–ही निराळी रचना केलेली असते. ती ध्यानांत येण्यासाठीं खालची आकृति पहावी.



ह्यांत वरच्या बाजूस जें मोठें 'अ' चक्र आहे, त्यावर **सेल्युलाइडा**च्या रसायन लावलेल्या पत्र्याची गुंडाळी लावलेली असते. आणि खालच्या

झाले ह्मणजे एखाद्या सांच्यांत दाबले तर पाहिजे त्या आकाराचा पदार्थ बनतो. व तो थेट हस्तिदंतासारखा दिसतो. ह्मणजे **'सेल्युलाइड'** हा एक प्रकारचा कृतीचा हस्तिदंत आहे ह्मटलें तरी चालेल; त्याचे हवे ते पदार्थ करतां येतात.

बाजूस जें लहानसें 'ब' चक्र आहे, त्यास त्याचा एक शेवट गुंडाळलेला असतो. हें यंत्र **क्यामेऱ्यांत** असतें. **क्यामेरा** ह्मणजे एक अंधारमय पेटी ह्मटलें तरी चालेल. त्याचे पुढील तोंडास झांकण बसविलेलें असतें. तें तसबीर ध्यावयाच्या वेळीं उघडें करावें लागतें, व तसबिरीचें काम संपलें कीं, लगेच लावावें लागतें. हल्लीं **'शर्टस'** नांवाचीं यांत्रिक झांकणें तयार झालेलीं आहेत. त्यांच्या मध्यभागीं एक पडदा लावलेला असतो. व एका बाजूस एक रबराची लांब नळी असून तिच्या शेवटास एक रबराचा पोकळ चेंडू असतो. तो आपण हातानें दाबला कीं लगेच स्प्रिंगच्या योगानें तो पडदा बाजूस सरून तोंड खुलें होतें. व तें बंद केव्हां व्हावें अशी आपली इच्छा असेल त्याप्रमाणें दुसऱ्या बाजूवरचें चक्र पूर्वीच फिरवून ठेवावें लागतें. ह्मणजे विविक्षित वेळेस तें बंद होतें.

सेल्युलाइडच्या रसायन लावलेल्या पट्ट्याच्या गुंडाळीलाही अशीच स्प्रिंग लावून ठेवलेली असते. अशा प्रकारचें **फोटोग्राफचें** यंत्र कोणत्याही मनुष्याच्या किंवा हालणाऱ्या पदार्थाच्या समोर नेऊन उभें करतात. व तसबीर ध्यावयाच्या वेळीं तो रबरी चेंडू दाबतात. ह्मणजे त्याजबरोबर झपाट्यानें आंतील सेल्युलाइड पट्ट्याची गुंडाळीही वरच्या चक्रापासून सुटून खालच्या चक्रास गुंडाळते. व मधील भागावर पुढील पदार्थाच्या किंवा मनुष्यांच्या तसबिरा एकामागून एक भराभर उठत जातात. ह्याप्रमाणें पाहिजे तितक्या **सेल्युलाइड**च्या गुंडाळ्यांवरच्या तसबिरा तयार करून त्याच **म्याजिकल्यांटर्न**मध्यें तशाच रीतीनें बसवितात. हीं अशींच चक्रें **म्याजिकल्यांटर्न**मध्येंही बसविलेलीं असतात. ह्यामुळें प्रेक्षकांस चित्रें दाखवितांनाही ती चित्रांची गुंडाळी तितक्याच वेगानें फिरत असते. हिच्या फिरण्याच्या वेगाची कल्पना सुद्धां मनुष्यास होणार नाहीं. त्या पहातांना मनुष्याची नजरसुद्धां ठरत नाहीं. अर्थात एकच चित्र हातपाय हालवीत आहे असें दिसतें. पण खरोखर त्याचीं चित्रें एकामागून एक चालत असतात. ह्यांचीं संख्या एका सेकंदास बेचाळीस ह्या मानानें असते. समजा; कीं आपण एक चित्र एक मिनिटभर पहात राहिलों. तर ६०×४२=२५२०

चित्रें आपल्या डोळ्यांसमोरून जातात! तितक्याच वेगानें हे **फोटोग्राफ** आधीं घेतलेले असतात, हें उघड आहे.

हें नीट मनांत उतरण्यासाठीं, कल्पना करा कीं एका मनुष्यानें आपला हात मस्तकापर्यंत नेऊन खालीं आणला. तो कितीही वेगानें नेला, तरी तेवढ्या कृत्याला त्याला निदान एक तरी सेकंद लागेल. तितक्यांत बेचाळीस तसबिरा होऊन जातात. आणि त्या तितक्याच वेगानें आपल्याही डोळ्यासमोरून जात असल्यामुळें, त्या तसबिरी निरनिराळ्या आहेत असें भासत नाहीं. तर तो मनुष्य एकच असून खरोखरच आपला हात हालवित आहे असें वाटतें. आगगाडीच्या चित्राची तऱ्हाही अशीच. येवढ्यावरून थोड्याशा विचाराअंतीं हीं थिओट्रोग्राफीचीं चित्रें कशी चलनवलन करतात ह्याची कल्पना होईल. ह्याच चित्रांत रंग असून शिवाय पूर्वी सांगितल्याप्रमाणें **फोटोग्राफा**च्या साह्यानें शब्द व भाषण उठविण्याचें जुळेल, तर चित्रामध्यें व प्रत्यक्ष देखाव्यामध्यें कांहींच अंतर ह्मणून रहाणार नाहीं. आणि ही युरोपियन लोकांची व अमेरिकन लोकांची उद्योगवृद्धि, आणि सतत परिश्रम, वाढत्या प्रमाणावर राहतील, तर कालांतरानें–नव्हे थोड्याच शतकांनीं–तेंही साध्य होईल असें अनुमान करण्यास कांहीं विशेषशी दिकत वाटत नाहीं. आमच्या देशांत मात्र–निदान तूर्त तरी–अशा गोष्टींचें व कलांचें नांव सुद्धां काढावयास नको. ही **थिओट्रोग्राफी**ची कलाच कां पहाना. **अमेरिकेंत** जगजाहिर असतां, आमच्या हिकडे कोणास माहित नाहीं, येवढेंच नव्हे, तर हीं चित्रें पाहण्याचा मुंबईसारख्या शहरास सुद्धां हा पहिलाच प्रसंग! ह्याची आह्मांस कधीं ईर्ष्या लागेल ती लागो.

नरदेहाविषयीं थोर लोकांचें ह्मणणें.

धन्य धन्य हा नरदेहो । ह्याची अपूर्वता पहा हो ।
जो जो कीजे परमार्थलाहो । तो तो पावे सिद्धीतें ॥ १ ॥

रामदास.

'नरदेह' हा एक पृथ्वींतील अपूर्व चमत्कार आहे. तो कसा निर्माण होतो,

ह्याविषयीं कोणाचीही बरोबर कल्पना चालत नाहीं. त्याविषयीं प्राचीन तत्त्ववेत्त्यांनीं मोठे चमत्कारिक उद्गार काढले आहेत. ते वाचून मनास मोठा आनंद होतो. ते उद्गार असेः—

" जग ही एक रंगभूमि आहे. आणि सारीं स्त्रीपुरुषें हीं त्यांतील पात्रें होत. त्यांनीं सजून यावें, आणि आपआपले हावभाव करावेत हें त्यांच्या मागें लावून दिलें आहे. एकएका पात्राला अनेक सोंगें घ्यावीं लागतात. पुरुषाकडे सात भूमिका आहेत. पहिलें सोंग—किंवा पहिली भूमिका ह्मणजे अज्ञान बालक होऊन आईच्या कडेवर बसावें, तिचें स्तनपान करावें, मलमूत्रानें तिचें आंग लिप्त करावें, आणि रडावें. दुसऱ्या सोंगांत शाळेंतील बिगारी विद्यार्थी बनून खाकोटीस बुकांचीं पातडीं लावून मुंगीच्या पावलानें जेमतेम शाळेची वाट सुधारावी. तिसऱ्या सोंगांत एखाद्या तरुणीवर आषक होऊन निराशेनें भात्यासारखे सुसकारे टाकीत, दुःखित अंतःकरणानें प्रियपात्रावर डोळे मोडीत बसावें. चवथें सोंग मर्दानी बाणा. अस्वलासारख्या कल्लेदार मिशांस पीळ घालून हव्या तशा प्रतिज्ञा कराव्यात; प्रतिष्ठेसाठीं चुरशी धरावी; तंट्याबखेड्यांत तिसरा पाय, प्राण ह्मणजे पाण्याचा बुडबुडा असें समजून तोफेच्या तोंडांत जाण्यास सुद्धां तयार व्हावें. पांचवें सोंग संभावित. मोठें भव्य दोंदिल पोट, आणि त्याच्या घड्या; अर्धोन्मीलित नेत्र; क्षौरी मिशा; शहाणपणाच्या मसलती व संभावित बागणूक; अशा रीतीनें आपल्या कामाची बतावणी करावी. सहावें सोंग ह्मणजे नाकावर चाळशी; हातांत काठी; कडूसरीला तपकिरीची डबी; **'निबरदोडका तेवि रोडका'** अशी दशा. नंतर आवाज वगैरे बदलून **'अंगं गलितं पलितं मुंडं दशनविहीनं जातं तुंडं, करधृतकंपितशोभितदंडं'** हें शेवटचें सोंग. ह्मणजे पुन्हा पोराचा अवतार. दांत नाहींत; डोळे नाहींत; रुचि नाहीं; वाचा नाहीं; ज्ञान नाहीं; कांहीं नाहीं." —शेक्सपीयर—

" केशरूप तरूंचा मळा; आध्यात्मिक, आधिदैविक व आधिभौतिक ह्या तापत्रयाची शेगडी; जी मृत्युरूप कावळ्याला टाकलेली उंडी; जें दैन्याचें दुभतें; महा भयोत्पादक; सकल दुःखांचें भरपूर भांडवल; दुर्मतीचें मूळ; कुकर्माचें फळ; भ्रांतीची मूर्ति; संसाराचा पाया; विकाराचें उद्यान; सकल रोगांचें वाढलेलें खाद्य; काळाची उष्टी खिचडी; आशेची प्रतिमा; स्वभावानें जन्ममरणाचा राजरस्ता; भुलीची ठेव; विकल्पाची मूस; विंचवाचें पेंव; व्याघ्राची गुहा; वेश्येचें सोबती; विषयाच्या माहितीचें उत्कृष्ट यंत्र; राक्षसिणीचा कळवळा; शीतल विषोद-

काचा घुटका; मानभावी चोराचें विश्वासस्थळ; कोड्याचें आलिंगन; काळसर्पाची मृदुलता; पारध्याचें प्रत्यक्ष गायन; शत्रूचें आदरातिथ्य; दुर्जनाचा सत्कार; हें तर काय? पण जें अनर्थांचा समुद्र; जें स्वप्नांत पाहिलेलें स्वप्न; मृगजलानें भरलेलें वन; किंवा धुराचें तयार झालेलें अभ्र; अशा प्रकारचें जें हें शरीर, तें, जे पुरुष माझें अनंत स्वरूप बनून राहिले, त्यांस पुढें प्राप्त व्हावयाचें नाहीं."

—ज्ञानेश्वर—

पूर्वजांचा अभिमान.

Then let us boast of our ancestors
Or deeds of heroes done in days of yore
For the families is all a cheat
Ti's personal virtue only makes us great.*

(Danial Eefoe.)

आमचें राष्ट्र दिवसेंदिवस रसातळास कां जात चाललें? तर आह्मां भरतखंडवासी लोकांस आमच्या पूर्वजांचा अभिमान मुळींच नाहीं, त्यांच्या सद्गुणांचें, त्यांच्या शौर्यगुणांचें, त्यांच्या तेजस्वीपणाचें, त्यांच्या धर्मनिष्ठतेचें, आणि त्यांच्या सच्छीलतेचें पाणी आमच्या अंगांत शपथेस सुद्धां खेळत नाहीं, हेंच खरें. शेवटच्या **रावबाजी**पासून रणांगणांत जी आह्मीं एकदां भागूबाईची दीक्षा घेतली, ती आह्मीं आपली सर्व गोष्टींत कायमच ठेवीत आलों. त्यामुळें आमच्या कलाकौशल्यांत ह्मणा, व्यापारधंद्यांत ह्मणा, शिक्षणाच्या कामांत ह्मणा, हवें असेल तर कृषिकर्मांत ह्मणा, मिळून हरएक गोष्टींत आमचें आपलें पाऊल दोन घरें मागें तें मागेंच पडत चाललें. आमच्यावर कालचक्राचा फेरा आल्यामुळें आमच्या साऱ्या हिंदुस्थानांतील एकूणएक लोक निःसत्त्व व परावलंबी बनले.

वृषभनासिकिं घालुनि वेसणी
वश करोनि सदा फिरवी धनी ॥

---

* (सारांश) तर आह्मांला आमच्या पूर्वजांचा आणि प्राचीन शूर नरवरांनीं केलेल्या कृत्यांचा अभिमान बाळगिला पाहिजे, कारण कुटुंबलौकिक हा सर्व अभावाचा भोंपळा आहे. तेव्हां आह्मांस—आमच्या देशास—उच्चपदाप्रत पोंचविणें हाच व्यक्तिमात्राच्या आंगचा खरा सद्गुण होय.

ह्या सद्यस्थितिदर्शक व संस्मरणीय अशा **वामनपंडितकृत** चरणयुग्माप्रमाणें आह्मी हुबेहुब वेसणीचे बैल होऊन बसलों. प्रत्येक हिंदूस प्रत्यहीं प्रत्येक कामांत इंग्रजांच्या तोंडून पाणी पिण्याची पाळी येऊन ठेपली. अशा आह्मां वेसणीच्या बैलांस पोटभर वैरण–अन्न–मिळण्याची मारामार पडली. बीए., एम् ए., एल्. एल्. बी, अशा किताबतींच्या परीक्षांत जेव्हां उतरावें, तेव्हां कोठें आमची थोडीशी डाळ शिजते. नाहीं तर अर्धेकचें शिक्षण असलें कीं, 'हरहर महादेव' आपला ठेवलेला. जंगलखात्यानें व कसायांच्या सुरीनें आमच्या शेतकीचें साधन गुरेंढोरें, ह्यांचे केव्हांच बारा वाजले. आमचें तोंडीं लावण्याचें–नव्हे प्राणरक्षणाचें–साधन मीठ, पण त्यावरही कर बसवून, सरकारानें **इंग्लंदांतील** 'विंडो टॅक्स–' 'खिडक्यांवरील कर–' नांवाचा कर जेव्हां प्रजेवर लादला, तेव्हां जसे इंग्लंदांतील लोक कराचा बोजा आपणांवर बसेल या भीतीनें लहान व थोडक्या खिडक्या घरास राखीत असत, तसेंच आमच्या लोकांसही बेताबाताचें व थोडकें मीठ खर्च करण्याची स्थिति आमच्या दयाळू गौरकाय प्रभूंनीं आणून ठेविली. पिंजऱ्यांतील राघू तरी बरा; त्याचें स्वयंभू हत्यार जें चोंच तें तरी धनी कायम ठेवतो. पण आह्मी राघूसारखे पिंजऱ्यांत पडून, आमचीं हत्यारेंही सरकारानें काढून घेतलीं. तेव्हां आमची चोंच तर केव्हांच गमावली. पण त्याबरोबर आह्मी आमचें स्वातंत्र्यही गमावून बसलों. आमच्या कोणत्याही धंद्यास तेजी नाहीं. मिळून आह्मी सर्वस्वी नाडलों आहों. तेव्हां अशा आमच्या दुर्धर स्थितीचा प्रतिकार करावयाचा झटला झणजे, आमच्या लोकांत स्वदेशाभिमान, स्वधर्माभिमान, आणि पूर्वजांचा अभिमान, यांचें वीं रुजलें पाहिजे. पण पूर्वजांचा अभिमान वागविला झणजे त्यांत स्वदेशाभिमान, व स्वधर्माभिमान आपोआप येतातच. कारण आपल्या पूर्वजांनीं जीं कांहीं पराक्रमाचीं कृत्यें केलीं, तीं स्वदेशाचा व स्वधर्माचा अभिमान बाळगिल्याशिवाय केलीं नाहींत. तेव्हां त्यांचा व त्यांच्या कृत्यांचा अभिमान प्रथमतः मनांत बाळगिला झणजे स्वभावतःच स्वदेशाभिमान व स्वधर्माभिमान हे जागृत होतात. झणून आह्मांस आधीं पूर्वजांचा अभिमान बाळगणें हेंच इष्ट आहे.

---

१ हा कर इ. स. १६९६ त बसविण्यात आला. पुष्कळ कारणांस्तव हा कर १८५१ पर्यंत चालू ठेविला होता. पण त्या करामुळें **इंग्लंदांतील** लोकांची स्थिति पाहूं गेलें असतां, त्या दीडशें वर्षांच्या अवधींत, तेथील लोकांनीं करभार टाळण्याकरितां, पुष्कळ घरांना थोडक्या–मोडक्या–व लहान खिडक्या लावलेल्या चहूंकडे पाहण्यांत येत.

पूर्वजांच्या अभिमानानें पृथ्वीतलावरील कित्येक राष्ट्रांची उलथापालथ झाली, कित्येक उदयास आलीं व कित्येक धुळीस मिळालीं. उदाहरणार्थ, आमचें यःकश्चित् **मराठ्या**चें पोर **शिवाजी** पहाना? त्यानें राज्य कसें बरें मिळविलें? त्याच्या अंगीं स्वधर्माची स्फूर्ति कशी बरें बाणली असेल? त्यास लहानपणापासून, रामायण, महाभारत, भागवत वगैरे ग्रंथांतील शूर नरवरांच्या गोष्टी ऐकण्याची फार आवड असे. त्यानें मोठेपणींही कोठें कथा होते असें ऐकलें ह्मणजे, मार्गींत कसलीही अडचण असली तरी, तीस न जुमानतां तो कथा श्रवण करण्यास जात असे. ह्मणूनच आपल्या पूर्वजांच्या, आपल्या धर्माच्या, आपल्या देशाच्या अभिमानाचें वारें त्याच्या अंगांत मुरलें होतें. आणि तोच अंकुर पुढें वाढीस लागून, त्याचा मोठा **महाराष्ट्रवृक्ष** उदयास आला. त्यालाच पुढें मोठमोठाल्या शाखा फुटून, त्याचा पुष्कळ विस्तार झाला. आणि एवढ्या **मराठ्या**च्या पोराचे पुढें महाराज **श्रीशिवछत्र**पति बनले. ते आपले पूर्वज होत, तर त्यांचा अभिमान आपणांस नको का बाळगावयाला? त्यांच्या योगानें स्वधर्माभिमान व स्वदेशाभिमान नाहीं का आमच्या मनांत उत्पन्न व्हावयाचा? नाहीं का आमचें त्यापासून कल्याण होणार? त्यापासून कोणत्याही कामांत आह्मी त्यांच्या सारखाच पराक्रम करून दाखवूं, असा आवेश आमच्या अंगांत नाहीं कां भिनावयाचा? हो, अवश्य भिनला पाहिजे. ह्या सर्व गोष्टी एका पूर्वजांच्या अभिमानानें अवश्य झाल्या पाहिजेत. आणि आह्मीं पूर्वजांचा अभिमानही अवश्य बाळगिला पाहिजे.

रोमन लोकांची पुढें पुढें फार सरशी होण्याला हेंच कारण बहुतेक झालें. ह्मणूनच त्यांच्या अंगांत सणसणून आवेश आला, आणि ह्मणूनच त्यांनीं मोठमोठालीं पराक्रमाचीं कृत्यें केलीं. त्यांच्या पूर्वजांवर केलेलीं कवनें, त्यांतील त्यांनीं केलेलीं शौर्याचीं कृत्यें, हीं बराच कालपर्यंत तेथील लोक गात आले. **विल्यम विजयी, इंग्लंड**वर जेव्हां चालून गेला, तेव्हां **सॅक्सन** लोकांशीं लढतांना, त्यानें आपल्या सैन्याकडून **रोलंड**चें **गीत** ह्मणविलें. त्यामुळें पूर्वजांचा अभिमान त्यांजमध्यें जागृत होऊन त्यांस आवेश उत्पन्न झाला, आणि त्यामुळेंच **विल्यम विजयी झाला,** पुढें **इंग्लंड** मिळालें, नाहीं तर मिळतें ना. **रोलंड** नांवाचा एक **शार्लमेन** बादशहाचा सरदार होता तो मोठा पराक्रमी योद्धा असे. पण एकदां **शार्लमेन** बादशहा **स्पेन**मधून परत येत असतांना, वाटेंत **स्पेन**मधील **बास्क** नांवाच्या लोकांनीं **रोलंड**च्या टोळीवर हल्ला केला. त्या हल्ल्यांत रोलंडचे एकून एक लढवय्ये धारातीर्थी पतन पावले. त्याजवर तें गीत होतें. तेव्हां

अर्थातच अशा शूर रोलंडचा अशा रीतीनें शेवट झाला, ह्याचा प्रत्येकास अभिमान वाटे. ह्मणूनच त्यावर एका कवीनें गीत केलें तेंच गीत, कीं ज्यामध्यें पूर्वजांचें—रोलंडचें–शौर्य ओतप्रोत भरलेलें होतें—तें सर्वांनीं ह्मटल्यावर तसा आवेश विल्यमच्या शिपायांस येणें साहजिकच आहे. असो.

ह्यावरून उघड होतें कीं, एक पूर्वजांचा अभिमान लोकांस असला ह्मणजे पाहिजे त्या गोष्टींत पराक्रम गाजवितां येतो. पूर्वजांच्या अभिमानाविषयीं प्रसिद्ध पुरुष **बर्क** व **मेकॉले** काय ह्मणतात तें पहाः—"ज्या लोकांना आपल्या वाडवडिलांच्या कृत्यांविषयीं, अभिमान वाटत नाहीं, त्यांच्या मुलांच्या हातून वाखाणण्यासारखें कांहींच होणार नाहीं." खरोखर हें त्यांचें ह्मणणें अगदीं अक्षरशः खरें आहे. जर आतां आमच्यांत पूर्वजांचा अभिमान नसला, तर आमच्या मागें तो आमच्या मुलांवाळांत तरी कसा यावा? जर बापच पूर्वजांविषयीं निरभिमानी असले तर "बीज तैसें फळ, पुढें होईल अमंगळ" ह्या विख्यात भगवद्भक्त **तुकारामा**च्या उक्तीप्रमाणें कां बरें निरभिमानी पोरें निपजणार नाहींत? बरें वडिलांच्या अंगांतच जर पराक्रमशक्ति नसली तर मुलांच्या अंगांत तरी ती कोठून येणार? मुळींच येणार नाहीं. तेव्हां ती जर त्यांच्या अंगांत यावी, अशी इच्छा असेल, तर पूर्वजांविषयीं अभिमान, त्यांजमध्यें रुजविला पाहिजे, पूर्वजांचे पराक्रम, त्यांचें शौर्य, त्यांचे सद्गुण, आणि त्यांनीं केलेलीं चांगलीं कृत्यें, त्यांच्या मनांत भरवून देऊन, आपल्या पूर्वजांविषयीं पूज्यबुद्धि, त्यांच्या चिमुकल्या व कोमल अंतःकरणक्षेत्रांत रुजत घातली पाहिजे. त्यांनीं केलेलें स्वदेशहित, राखलेला स्वधर्माभिमान, हीं देखील त्यांच्या मनांत ठसविलीं पाहिजेत. ह्मणजे पूर्वजांच्या कृत्यांचें, त्यांच्या सद्वर्तनाचें प्रतिबिंब त्यांच्या मनावर उठून, तीं—आपलीं मुलेंही प्रत्येक काम नेटानें चालवून, त्यांत यश संपादन करतील, आणि देशाचें अंशतः तरी कल्याण करतील. असो.

सध्यां आपण पूर्वजांचा अभिमान बाळगून, त्यांनीं जसा युद्धांत लौकिक संपादन केला, आणि ते जसे नेटानें टक्कर देत गेले, तसेंच व्यापारधंद्यांत, कलाकौशल्यांत, शेतकींत, शिक्षणाच्या कामांत, व खऱ्या सुधारणेंत, इष्ट मार्गांत आडवे पडणाऱ्या संकटांस–नेटानें, उत्साहानें, धीरसो गंभीर या तत्वानुसरणानें, किंवा हिय्येदार बाण्यानें–दूर झुगारून, त्या त्या कामांत यश संपादन करावें. प्रत्येक कामांत **नानाफडनविसासारखी** दक्षता, चातुर्य व मागचा पुढचा पोंच, **शिवाजी, बाजीराव, राघोबादादा,** ह्यांसारखा जोम, **माधवरावा-**

सारखी टापटीप, तान्हाजी मालुसऱ्यासारखें मित्रत्व, वगैरे गोष्टी आह्मांस राखल्या पाहिजेत. तरच आमचा देश ऊर्जितावस्थेंत येईल. पण ह्या सर्व गोष्टी घडून येण्यास आमच्या लोकांस त्या त्या शूर व दूरदर्शी नव्हे राजकार्यधुरंधर नररत्नशिरोमणींचा ह्मणजे आपल्या त्या पूर्वजांचा अभिमान पूर्णपणें बाळगला पाहिजे, त्यांच्या तेजस्वी कृत्यांचे पवाडे गाइले पाहिजेत, त्यांच्या सद्गुणांचा कित्ता वळविला पाहिजे आणि हस्तेंपरहस्तें देशसेवा करून, देशास उच्चस्थितीप्रत पोंचविलें पाहिजे. तेव्हां देशबांधवहो! तुह्मांस करद्वय जोडून हेंच सांगणें आहे कीं, व्यक्तिमात्राच्या अंगचा खरा सद्गुण जो देशाचें कोटकल्याण करणें, त्यास, पूर्वजांचा अभिमान मनांत बागवून, पात्र व्हा.

दुसऱ्याचें घेऊन मजा पाहूं नये, देऊन पहावी.

एका श्रीमंताचा एक मुलगा एका विद्वान् गुरूपाशीं अभ्यास करीत असे. मुलगाही चांगला जाणता असल्यामुळें, गुरुही प्रतिदिवशीं सायंकाळीं त्यास आपल्याबरोबरच बाहेर फिरावयास घेऊन जात; आणि फिरतां फिरतां अनेक प्रकारच्या बोधपर गोष्टी वगैरे सांगत. एके दिवशीं बोलत बोलत ते गांवापासून बरेच लांब गेले असतां, त्या चालत्या वाटेवरच एक फाटकासा जोडा ठेवलेला त्यांस आढळला. तेव्हां तो कोणाचा असावा ह्याविषयीं बरीच वाटाघाट झाली. अखेर त्या वाटेपासून थोड्या अंतरावर एक मळा असून त्यांत एक गरीब मनुष्य काम करीत होता, त्याचा असावा असें दोघांनीं अनुमान केलें. तोही आपलें भांगलणीचें काम संपवून गवताचा भारा वगैरे बांधून निघण्याच्याच तयारींत होता. तेव्हां मुलगा गुरूकडे वळून ह्मणाला "गुरुजी! आतां आपण त्या माणसाची जराशी मजा करूं या. ह्याचा हा जोडा आपण आतां दडवून ठेवूं, आणि त्या पलीकडच्या झाडींत जाऊन लपून बसूं. आणि आपला जोडा ठेवलेला नाहींसा पाहून तो कसा कावराबावरा होईल, आणि वेड्यासारखा इकडे तिकडे पाहूं लागेल तें बघूं या." तेव्हां गुरु ह्मणाला "बाळासाहेब! दुसऱ्याची वस्तु घेऊन आपण कधींही मजा पाहूं नये. आपण श्रीमान् आहां, तेव्हां त्यास कांहींतरी देऊन मजा पहाण्याइतकें तुह्मांस सामर्थ्य आहे. तर तुह्मी असें करा, तुमच्या खिशामध्यें रुपये असतीलच; त्यांतील दोन रुपये काढून एकएका जो-

ड्यांत एक एक ठेवून द्या. आणि मग आपण जाऊन त्या जाळींत लपून बसून त्याला जोड्यांतले रुपये अकस्मात् पाहून किती आनंद होतो तो पाहूं या." मुलानें ती गोष्ट मान्य केली. आणि लागलीच आपल्या खिशांतील दोन रुपये काढून त्या फाटक्या जोड्यांत एक एक ठेवून दिला; आणि आपण जवळच्याच एका जाळींत जाऊन लपून उभे राहिले.

थोड्याच वेळांत त्या मळ्यांतील माणसाचें काम आटपलें. तेव्हां तो त्या रस्त्यावर जेथें आपलें घोंगडें व जोडा ठेवला होता, तेथें आला. त्यानें आपलें घोंगडें आपल्या खाद्यावर टाकतांटाकतांच एका जोड्यांत चट्कर पाय घातला. तों त्यांत कांहीं कठीणसें पायास लागलें. तें काय आहे ह्मणून पहाण्यासाठीं तो वांकला, आणि पहातो तों रुपया! त्याकडे पाहून तो अगदीं गोंधळांत पडला, व त्याचें त्याला फारच आश्चर्य वाटलें. तो त्या रुपयाकडे पाही, पुन्हा आपल्या सभोंवार हिकडे तिकडे चारही बाजूंस पाही. असें एकसारखें चाललें होतें. पण आसपास कोणी कोठेंच मनुष्य दिसेना. तेव्हां तो रुपया त्यानें आपल्या लंगोटीच्या पदरांत बांधला, आणि दुसरा पाय दुसऱ्या जोड्यांत घातला. तों दुसऱ्यांत दुसरा रुपया! तेव्हां तर तो फारच चकित झाला. त्याच्या हृदयांत जें आनंदाचें भरतें आलें, तें त्यास आंवरेना. त्यानें त्या आनंदांत ईश्वराचें स्मरण करून व हात जोडून तो मोठ्यानें ह्मणाला "देवा! तूं मजवर आज केवढे बरें उपकार केलेस? घरांत बायको आजारी; अगदीं हांथरुणास खिळलेली व पोरेंबाळें भाकरीवांचून चरफडतात. आज साऱ्या दिवसांत मला कांहींएक मिळालें नव्हतें. आज हे रुपये जर तूं मला दिले नसतेस, तर तीं खचीत भुकेनें तरफडून मेलीं असतीं! ईश्वरा! किती वेळेवर आणि केवढा बरें अकल्पित लाभ तूं आज दिलास, आणि पोरेंबाळें वांचविलींस!" हे त्याचे शब्द, त्याची ती दीनवाणी, केंविलवाणी गृहस्थिति, पोराबाळांची दैना, हीं ऐकून त्या श्रीमंताच्या मुलाच्या नेत्रांतून खळखळ अश्रु वाहूं लागले. तें पाहून गुरु ह्मणाला "कां बाळासाहेब! मघांशी तुझी जोडा लपवून ठेवून जी मजा करणार होतां, त्यापेक्षां ही मजा अधिक नाहीं का?" बाळासाहेबांनीं नम्रपणें गुरूजीस सांगितलें. "गुरुमहाराज! आपण केलेला आजचा हा उपदेश मी कधीं कधीं विसरणार नाहीं. "दुसऱ्याचें घेऊन मजा पाहण्यापेक्षां देऊन पहावी" ही गोष्ट अगदीं खरी आहे. आणि आजपर्यंत मला ती माहिती नव्हती.

पुस्तकपरीक्षा.

निर्मला नाटक—हें पंचांकी नाटक रा. रा. **विष्णु सदाशिव फाटक शहापूरकर** ह्यांनीं रचून प्रसिद्ध केलें आहे. कोणतेंही पुस्तक काय, किंवा काम काय, तें लोकमान्य होण्याला तें करणाराची अक्कल व श्रम हीं चांगल्या प्रमाणानें खर्च झालीं पाहिजेत; नाहीं तर सारें व्यर्थ होतें. परंतु लिहिण्यास संतोष वाटतो कीं, प्रस्तुत पुस्तकांत रा. फाटक ह्यांनीं घ्यावे तितके श्रमही घेतले आहेत, व यथाशक्ति चातुर्यही खर्च केलें आहे. आलीकडे नवीं नाटकें ह्मणजे बहुतेक संस्कृत किंवा इंग्रजीचीं भाषांतरें करण्याचा प्रघात पडला आहे. एखाद्यानें कोणीं नवें नाटक लिहिलेंच, तर त्यांत स्वारस्य ह्मणून कसलें तें नांवाला सुद्धां असावयाचें नाहीं. कांहीं तरी चर्पटपंजरी लावून किंवा ग्राम्य कथा घालून पानें भरावयाचीं. तसा प्रकार ह्या पुस्तकांत मुळींच दिसून येत नाहीं. सर्वांत मोठा गुण हा कीं, भाषा आधीं सारी इडियाम्याटिक–सुभाषिताच्या धर्तीवर असल्यामुळें, प्रत्येक पात्राच्या तोंडीं त्याच्या स्वभावास शोभेसें भाषण असल्यामुळें, व प्रत्येक प्रवेशांत, प्रत्येकाच्या भाषणांत मार्मिकपणा असल्यामुळें, वाचणाराचें चित्त विषयाकडे तेव्हांच वेधलें जातें.

शेक्सपीयरचीं नाटकें वाचणारांस बऱ्याच ठिकाणीं नायिकेनें पुरुषवेष घेतल्याचें दिसून येईल. तरी ह्यांतील कथानकाच्या धोरणाचा विचार केला ह्मणजे ह्यांतील संविधानकांतही बराच नवेपणा आढळून आल्यावांचून रहाणार नाहीं. पात्रांचे स्वभाव यथातथ्य साधण्याविषयीं चांगला प्रयत्न केला आहे. कित्येक पात्रांचे स्वभाव तर खरोखरच रेखल्यासारखे आहेत. कामज्वराच्या वेदनेनें मनुष्याचे गुप्त व्यापार, कारस्थानें, निर्लज्जता, विवेकशून्यता व पातकप्रवृत्ति हीं कसकशीं चालतात, ह्याचें मुख्यत्वेंकरून ह्या नाटकांत अगदीं हुबेहुब चित्र दाखविलें आहे.

तिसऱ्या अंकांतील दुसऱ्या प्रवेशामध्यें पद्मलोचनेचा व जयदेवाचा जो संवाद आहे तो, वाचला ह्मणजे मानवीस्वभावाच्या प्रतिबिंबानें अंतःकरण अगदीं थक्क होऊन जातें. व ऐशीं वर्षांच्या जख्ख कपींनीं तरुण पोरीस नाडलें असतां, सापत्न माता व सापत्न पुत्र यांच्या भावना कशा होतात तें अगदीं डोळ्यासमोर उभें रहातें. तसेंच अविचारी थेरडे, हांथरुणावर लोळत असतांही, कन्यास्नुषेचा भेद मनांत न आणितां पशुतुल्य वर्तन करण्यासही मागेंपुढें कसे पहात नाहींत, तें, चवथ्या अंकांतील दुसऱ्या प्रवेशावरून उत्तम कळतें. तो सासऱ्याचा

व सुनेचा संवाद फार वाचण्यासारखा आहे. मर्यादेनें परंतु संतप्त अंत:करणानें निर्मलेनें थेरड्याचे दांत पाडलेले तर तेथें विशेष खुलतात. जयदेवाचा साधा-भोळा स्वभाव, व त्यानें उताविळपणानें केलेला निर्मलेवरील गहजब चांगला हृदयद्रावक उतरला आहे. ह्यातान्याच्या नीचपणाची मात्र कमाल आहे. सुभानरावाच्या सोंगाची बतावणी, भोंदुलोकांचा ठकबाजीपणा, त्यांचीं अनन्वित कृत्यें, स्त्रियांचा नादिष्टपणा, इत्यादि उत्कृष्ट रीतीनें दर्शवून व शेवटीं निर्मलेच्या चातुर्यानें सर्व योग नीट जमवून आणला आहे. तो वाचून तर वाचकाचें अंत:करण विस्मयसागरांत व आनंदलहरींत मज्जन झाल्यावांचून रहातच नाहीं.

एके ठिकाणीं चोरी करण्याच्या विद्येविषयीं भवानराव नांवाच्या पात्राच्या तोंडीं असें भाषण आहे:—"वाहवा—मला चमत्कार हा वाटतो, जो तो ह्मणतो मी चोरी करतों, पण ती साधावी कशी ? पापपुण्य तें मी जुमानीत नाहीं. पाप ह्मणजे दारिद्र्य व पुण्य ह्मणजे सुख, येवढें मी जाणतों. कशाही रीतीनें द्रव्य मिळविलें ह्मणजे तो सुखी प्राणी पुण्यवान् झाला. कायहो तुह्मी चोरी करण्याला राजी आहांत, पण विचार करा, लोकांनीं आपलें द्रव्य रस्त्यावर का टाकलें आहे? अरे, लोक एक कवडी जवळ असली तर ती पन्नास गांठी मारून सात पड-द्यांच्या आड पाताळांत पुरून ठेवितात, तें द्रव्य तुह्मांला मिळावें कसें ? आपल्याच घरांत आपली वस्तु स्वत:ला वक्तशीर मिळत नाहीं, मग परक्याचे घरीं अवेळीं अंधारांत, छपविलेली वस्तु कशी मिळावी ? बाबारे, इतर विद्या सोप्या आहेत; तरी त्या साध्य होण्याला तपांचीं तपें घालवावीं लागतात. मग या चोरीची विद्या पाहिजे त्यांना कशी करतां येईल ?"

हें वाक्य कोठचें तरी एक दिलें आहे. चांगलेंसें पाहून निवडून दिलें असें मुळींच नाहीं. तथापि तेवढ्यावरून भाषेची ठेवण, व व्यवहारांतील मार्मिकता सहज दिसून येईल. पांचव्या अंकांत एके ठिकाणीं विदूषकाचा व सूत्रधाराचा संवाद घातला आहे, तो वाचून मनाला चांगलीच करमणूक होते; आणि त्यांतल्या त्यांत सद्यस्थितीचें प्रतिबिंबही डोळ्यासमोर उभें रहातें. एके ठिकाणीं विदूषक ह्मणतो:—"हिअर ह्मणजे ऐका,—(शाळेंतील लहान मुलासारखे हेल काढून) खोटें कसें बोलावें व खोटें कसें लिहावें, आणि खऱ्याचें खोटें कसें करून दाखवावें, हें कायदा ह्मणजे न्यायशास्त्र शिकवितें. कायद्याचे मुख्य भाग दोन, एक काळा व एक गोरा. गोऱ्या कायद्यानें गोऱ्यांचें उखळ पांढरें व काळ्या कायद्यानें काळ्यांचें तोंड काळें. इत्यादि." चांगले उतारेच घेतले अ-

सते, तर बरेच घेण्यासारखे होते. परंतु तसें करणें प्रशस्त नव्हे. तरी तेवढ्यावरून प्रस्तुत पुस्तकांत विशेष असें जें काय आह्मी ह्मणतों, त्याची थोडी तरी कल्पना वाचकांस सहज होईल.

ह्या पुस्तकांत बारकाईनेंच पाहूं गेलें तर, दोषस्थळेंही सांपडतील; नाहीं असें नाहीं. पण तीं गुणांपुढें इतकीं थोडीं आहेत, तीं जमेस धरणें उचित नव्हे. हिंदुस्थानी भाषा नीट नाहीं. पण कुणबाऊ भाषा अगदीं हुबेहुब मजेची आहे. 'भ्या,' देना हय, उस्से मेरा दिल बहुत रंज था, जवाब देना हय, विष्णुदेवा, दळत बसा, इत्यादि शब्द व वाक्यें कर्णकटु आहेत. "त्याजागची कळ दबली पाहिजे." (पान २१) इशीशीशी! ह्या एका वाक्यानें साऱ्या पुस्तकाची माती झाली. आणि साऱ्या चांगुलपणावर पाणी पडलें! असलें अश्लील व ग्राम्य वाक्य पुनरावृत्तीचा प्रसंग आल्यास अजी कमी केलें पाहिजे. हें पहिलें काम. शिवाय, सुभानराव जातीचा मराठा असून त्यानें देवीच्या पुजाऱ्याची जागा मागणें, जयदेवरावानें सापत्न मातोश्रीची तरवारीनें कंठस्नान घालण्याइतकी पूजा करून पुन्हा 'आईसाहेब' ह्मणून पुढें पुढें जाणें, इत्यादि गोष्टींतही थोडथोडी सुधारणा करणें इष्ट दिसतें. तरी एकंदरींत रा. फाटक ह्यांनीं आपल्या देशभाषेची सेवा मोठ्या भक्तिभावानें व बऱ्या प्रकारची केली, ह्याबद्दल ते प्रशंसेस पात्र आहेत, व त्यांची कृतिही लोकादरास पात्र आहे, इतकें सांगून हा अभिप्राय समाप्त करतों.

सौ० डा० आनंदीबाईचें चरित्र.

(पु० १० अंक ८ वरून पुढें.)

(करवीरस्थ महिलेकडून.)

'यद्यपि शुद्धं लोकविरुद्धं, नाकरणीयं नाचरणीयम्' हें श्रीमज्जगद्गुरु **शंकराचार्यां**चें वाक्य आमच्या **काशीबाईस** मुळींच मान्य नाहीं. कोणाची वागणूक कितीही भिन्न असली, तरी त्यास नांवें ठेवणें उचित नाहीं. जगाप्रमाणें—अर्थात चारचौघांप्रमाणें—वागलें नाहीं, तर त्यास नांव ठेवणें, किंवा दोष देणें ही मोठी चूक आहे. व तिच्यामुळेंच आमचें मोठें नुकसान झालें आहे, ह्या मुद्यावरचे **काशीबाईचे** विचार खालीं दिले आहेतः—

"**कोल्हापूर** कारभारीमंडळ अगदीं जुन्या मतांचें व कुत्सित होतें." (संस्कृत भाषेंत स्त्रियांचे वर्णन केलेले अनृत, साहस, मूर्खत्व इत्यादि गुण, का-

शीबाईनीं ह्या एका वाक्यांत परिपूर्ण रीतीनें दाखवून दिले आहेत. श्रीमंत **आबासाहेब कागलकर** रीजंट; मेहरबान खानसाहेब **मेहेरजी कुवरजी** दिवाण; रावबहादुर **बळवंत नारायण जोशी** चीफ जज्ज; रावबहादुर **राजाराम खंडेराव वैद्य** सरसुभे; हें कोल्हापूरचें मंत्रिमंडळ. अशा नव्या व सुशिक्षित गृहस्थांस 'अगदीं जुन्या मताचे' व 'कुत्सित' ह्मणणें ह्मणजे शहाणपणाचा कळस झाला! जे स्त्रीशिक्षणाच्या प्रसारार्थ रात्रंदिवस झटत आहेत, हजारों रुपये खर्ची घालीत आहेत, ज्यांच्या राजधानींत शेंकडों विदुषी तयार होऊन गांवगन्ना स्त्रीशिक्षणासाठीं पाठवल्या जात आहेत, सौ० **रखमाबाईसार**ख्या सुशील व विदुषी स्त्रीला लेडी सुपरिंटेंडेंटची जागा मिळाली आहे, येवढेंच नव्हे तर प्रत्यक्ष **आनंदीबाई** अमेरिकेंत असतांच साडेचारशें रुपयांची जागा येथें कायम करून, नवराबायकोच्या पहिल्या वर्गाचें भाडें सुद्धां ज्यांनीं आगाऊ भरलें, ते कारभारी 'अगदीं जुन्या चालीचे' व 'कुत्सित' नव्हेत तर काय? मला वाटतें, **काशीबाईचें** हें राजमान्य सर्टिफिकिट वरील कारभारीमंडळाच्या हातींच गेलें नसावें. किंवा गेलें असून त्यांनीं त्याच्याकडे कानाडोळा केला असेल तर ते मोठे शांत, थोर, व उदार पुरुष असें खचित समजावें. ते जर का कुत्सित बुद्धीचे असते, तर ह्या एका वाक्यानें करवीर इलाख्यांतील स्त्रीशिक्षणाला आज केवढा धक्का बसला असता, ह्याचा **काशीबाईनीं** यत्किंचित्ही विचार केलेला दिसत नाहीं. पण विचार न करितां लिहावयाचें, हेंच जर त्यांचें मूळपासून ब्रीद आहे, तर मग बोलून तरी उपयोग काय? असो. पुढें:—)

"**आनंदीबाई** मडमेबरोबर बसून शाळेंत जात. हें त्यांना सहन झालें नाहीं. (ह्याला पुरावा काय? **काशीबाईची** लेखणी आणि जिव्हा!) त्यांनीं **मावशी**बाईला **आनंदी**बाईस आपल्याबरोबर गाडींत बसवून नेण्याविषयीं प्रतिबंध केला! ते **गोपाळरावां**ची पुष्कळ चेष्टा करीत. नाना तऱ्हेचे उपहास करीत. (पोरें किंवा हलकट लोक चेष्टा करतात, झटलें तर कांहीं तरी शोभतें, पण मोठमोठे दिवाणबहादुरांसारखे अंमलदार चेष्टा करतात ह्मणणें ह्मणजे निखालस खोटसाळपणा!) बहुतकरून लोकांची चालच अशी आहे, त्यांतून आमच्या देशांत तर मला वाटतें फारच आहे. एखादें सत्कृत्य आपण स्वतः करावयाचें नाहीं तर नाहीं; आणखी दुसऱ्यानें केलें असतांही सहन होत नाहीं! एका अर्थी पाहिलें तर, लोकांना तरी कां दोष द्यावा! त्यांना ज्या गोष्टीची संवय असते, त्यांत कांहीं कमीजास्त दिसलें, ह्मणजे त्यांना कसेंसेंच वाटूं लागतें! जगाला

आपलें एकसारखें एक माणूस पहाण्याची संवय झालेली असते. वस्तुतः सृष्टींत मौज ही आहे कीं, जितक्या मूर्ति तितक्या प्रकृति भिन्न भिन्न असतात. परंतु लोकांस नेहमीं असें वाटत असतें कीं, आचारविचार सर्वांचे एकसारखे असावेत. एकासारखा दुसरा, दुसऱ्यासारखा तिसरा, याप्रमाणें जसे छापांतील गणपतीच, किंवा जसे गिरणींतील एका नमुन्याचे, एका सांच्याचे पदार्थ! मला वाटतें, ही फार वेडेपणाची समजूत आहे, व तिच्यामुळें आपलें फार नुकसान होत आहे! एकाद्याचें वागणें निराळें पडलें, ह्मणजे तो जगाविरुद्ध आहे, असें लोक ह्मणतात; व त्याचा होईल तितका छल करतात; हें चांगलें नाहीं. असो; या विषयावर लिहावें तितकें थोडेंच होणार आहे, परंतु विषयांतर होईल ह्मणून आपण येथेंच त्याला रजा देऊं."

वाचकांचें नशीब मोठें बलवत्तर, ह्मणूनच काशीबाईकडून गणपतीच्या छापावर व गिरण्यांच्या पदार्थावरच विषयांतरास रजा मिळाली, नाहीं तर आणखी काय काय बाहेर आलें असतें, कोण जाणे! **आनंदीबाई** आपल्या पत्रांत (पान १००) बंगाली स्त्रियांना मात्र अशीं नांवें ठेवतात कीं "कांहीं बंगाली स्त्रिया आपले ओंठ बाहेरून रंगवितात, परंतु तेणेंकरून त्यांचा उपहास व निंदा होते. शिवाय, त्या असा कांहीं चमत्कारिक पोषाक करतात कीं, जुन्या चालींच्या लोकांस त्यांचा सर्वपरी तिरस्कार येऊं लागतो." पण स्वतःमध्येंही तीच गोम असल्याशिवाय, लोकांनीं नांवें ठेवलीं नाहींत, ही गोष्ट दोघींच्याही ध्यानांत राहिली नाहीं. दिव्याखालीं आंधेर ह्मणतात तो हा!

पतिसेवा, पतिनिष्ठा आणि पातिव्रत्य ह्यांचें माहात्म्य पुराणादि प्राचीन ग्रंथ ह्यांतून वर्णन केलें आहे. आणि स्त्रियांचें खरें कर्तव्य काय तें तेंच असें ठिकठिकाणीं प्रतिपादन केलेलें आहे. हेंच तत्त्व आह्मां आर्यस्त्रियांच्या मनांत रात्रंदिवस जागृत असतें, ह्मणून ही संसारयात्रा, जगांतील कोणत्याही देशापेक्षां आमच्या देशांत फार सुखावह होते. पण त्यावर **काशीबाईनीं** दोन वाक्यांत बोळा फिरवून कसें मातेरें करून सोडलें आहे पहाः—

(पुढें चालू.)

PRINTED and published by Janardan Mahadeo Gurjar AT JAVAJI DADAJI'S "NIRNAYA-SAGARA" PRESS, Bombay.

आर्यधर्माभिमानी लोकांकरितां सचित्र हिंदु घड्याळें.

प्रत्यक्ष देवदेवतांनींच हृदयासन्निध वास केल्यावर अधर्म कितीसा टिकेल.

नमुना मागवा. तुमच्या पहाण्यानेंच आनंद जर होईलच होईल, तर मग बारण्यानें कां न होणार बरें ? देवतांचे दर्शनानें हिंदुधर्माभिमानास भरती नाहींका येणार ? नांव ऐकतांच पहाव्यासें वाटतें व पाहातांच घ्यावेसें वाटतें.

हिंदु घड्याळें कशीं आहेत, दिसण्यांत सुंदर, खिशांत हलकीं, मजबूत, टिकाऊ, **अंगचे चावी**चीं, तबकडी मिन्याची पांढरी असून त्यावर रीतीप्रमाणें रोमन आंकडे असून ठळक मराठी आंकडेही आहेत आणि प्रत्येक आंकड्यामध्यें हिंदुपूज्य देवतांचीं सुंदर चित्रें आहेत. श्रीगणपति, सरस्वती, रामदासस्वामी, हनुमंत, रामसीता, लक्ष्मीनारायण, गरुड, अष्टभुजादेवी, विठ्ठलरखुमाई, शंकरपार्वती, अक्कलकोटस्वामी, श्रीगुरुदत्तात्रय, आणि मध्यभागीं, महाराष्ट्रास जिवंत करणारे गोब्राह्मणप्रतिपालक **श्रीशिवाजीछत्रपतिमहाराज** यांचें सुबक चित्र आहे. अशीं हीं अपूर्व हिंदु घड्याळें आमचे देशबांधव व भगिनी काय ह्मणून न घेतील !

हिंदु सिलेंडर पिक्क नी. सी. वॉच किं. रु. १० ग्या. वर्ष १
हिंदु लिव्हर प्रीव्हेन्स नी. सी. वॉच किं. रु. १५ ग्यारन्टी वर्षें २
हिंदु रासकोप सिस्टीम नी. सी. वॉच किं. रु. १७ ग्या. वर्षें ३
हिंदु प्रिव्हेलन्स चांदीचें वॉच किं. रु. २५ ते ३० ग्या. वर्षें ४
हिंदु सोन्याचें वॉच किं. रु. १०० ते १२५ ग्या. वर्षें ४
हिंदु सचित्र आर्मी वॉचेस किं. रु. १० ते १२५ पर्यंत.

हिंदु सचित्र टाईमपीसेस साधें, अलार्म, स्विंग, जपींगई. आंकड्यांमध्यें देवतांचीं चित्रें, मध्यभागीं दरबारी व अश्वारूढ श्रीशिवाजी, आणि श्रीशंकरपार्वतीसह. किं. रु. ४–६–१० ते ३० पर्यंत. [१०

जी० बी० नाईक आणि कंपनी. बिलासिसरोड, नाका भायखळा, मुंबई.

धि इंडियन म्यारेज ऍण्ड डेथ बेनिफिट फंड लिमिटेड, मुंबई.

डिरेक्टर्स.

रावसाहेब दलपतराम प्राणजीवन खक्कर जे. पी.
बद्रुद्दिन अब्दुल्ला कूर एस्क्वायर जे. पी.
रुसतम बी. पेमास्तर एस्क्वायर बी. ए. एल् एल्. बी.
धनजीशा फ्रामजी चिनाय एस्क्वायर.
विष्णु नारायण परुळकर एस्क्वायर (एक्स आफिशिओ.)

मध्यम स्थितींतील मनुष्यांस आपल्या मुलांमुलींच्या लग्नाचे वेळीं व आपल्या मरणानंतर आपल्या वारसाकरितां पैशाचा संग्रह करून ठेवितां यावा ह्मणून हा फंड १८९४ मध्यें स्थापन झाला आहे. इतक्या अवधींत ३००० पेक्षां जास्त मेंबर झाले असून सरासरी १५० मेंबरांस फायदा मिळाला आहे. लग्नफंडाची वर्गणी दर महिन्यास १। पासून ६। रु. पर्यंत आहे.

मरण-फंडाची वर्गणी फक्त १ रुपया आहे.

व या मरणफंडांतील मेंबरांच्या पश्चात् त्यांच्या वारसास २००० रुपयेपर्यंतची रक्कम फायद्यादाखल मिळेल. जास्त माहिती खालील पत्त्यावर एक आण्याचें तिकिट पाठविल्यानें मिळेल. [९–१२

आफीस–५
कावसजी पटेल स्ट्रीट,
फोर्ट, मुंबई.

परुळकर ऍण्ड कं०
एजंट्स.

प्रभाकर–रोजचें वर्तमानपत्र.

१८३९ त सुरू झालेलें. गेल्या दसऱ्यापासून व्यवस्थित रीतीनें व वक्तशीर प्रसिद्ध होतें. वर्षाची वर्गणी ट. ह. सह ९॥ रुपये.

मुकुंद बाळकृष्ण गुर्जर, बी. ए. म्यानेजर. गिरगांव—मुंबई.

व्यापारी व ग्राहक ह्यांकरितां. **हरएक प्रकारचा माल** मुंबईत मिळणारा वक्तशीर बाहेरच्या लोकांस मिळण्याची सोय.

D. K. SANDU
RAMWADI, BOMBAY.

दत्तात्रेय कृष्ण सांडू ह्यांचें हरएक प्रकारचा माल मिळणारें, आणि माफक **अडत** घेऊन माल रवाना होणारें दुकान:—

रामवाडी, मुंबई.

वा. कृ. सांडू. दुकानदार—रामवाडी, मुंबई.

यांचा कदाचित् गुण नच आल्यास पैसे परत देऊंच.

मंत्रसिद्ध ताईत व दोरे.

हिमालयावरील एका महान् तपस्वी (सिद्ध) पुरुषानें आमच्या निःसीम भक्तीस तुष्ट होऊन आपला अत्यंत उपयोगी असा जो पिशाचबाधा व दुसरे अनेक विकार दूर होणारा अद्‌भुत मंत्र तो ताईत व दोरे मंत्रून देण्यास शिकविला आहे. व त्या योगानें खालील विकार फार त्वरित बरे होतात. पिशाचादि पीडेनें मुलें, स्त्रिया किंवा पुरुष झोंपेंत अगर जागृतावस्थेंत घाबरतात, कंप सुटतो, वेड लागतें, दांतओंठ चावतात, दचकून उठतात, व कधीं ज्वरादि विकार उत्पन्न होतात आणि कित्येक प्रसंगीं अपस्मार, भ्रम वगैरे अत्यंत वाईट रोग उत्पन्न होतात. कित्येक स्त्रियांस पिशाचादि पीडेनें संतती होत नसते व झालीच तर वांचत नसते. कित्येकांस स्वप्नामध्यें स्त्रीचा भास होऊन धातुपात होतो; कित्येक स्त्रीपुरुषांमध्यें व कित्येक मित्रांमध्यें वैमनस्यें उत्पन्न होतात, इत्यादि अनेक विकार या आमच्या अद्‌भुत मंत्रसिद्ध ताईत व दोरे यांनीं फार त्वरित खात्रीनें बरे होतात. गुणाबद्दल हजारों सर्टिफिकिटा मिळाल्या व मिळत आहेत. थोड्याच काळांत याचे अपूर्व गुण या देशाच्या आसमंतात् भागीं ब्रह्मदेश, सिलोन, बनारस, पंजाब, मद्रास, मुंबई, कानडा, इत्यादि ठिकाणीं अतिशय पसरले आहेत. सबब जास्त वर्णन करीत नाहीं. सिद्धमंत्र खोटे ह्मणणारांनीं एकवार अनुभव घेऊन पहावा, ह्मणजे ते नेहमींच ग्राहक बनतील. पुरुषांचे विकारांस दोरा, किं० ८ आणे. स्त्रियांचे विकारांस ताईत १ रु०; रुप्याचा २ रु०; सोन्याचा ६; कित्येक रोगांस दोन वस्तू घ्याव्या लागतील. दोन वस्तू घेणारास ४ आणे, टपालखर्च माफ. एकवार अनुभवानेंच पूर्ण खात्री होईल. माहितीखर्डा सोबत पाठविला जाईल. व्ही. पी.नें. पाठवूं. पत्ता स्पष्ट व पूर्ण लिहावा.

विष्णुबोवा सिद्धमांत्रिक.

६] पत्ता—पोष्ट हर्णै, जिल्हा रत्नागिरी.

केरळकोकिळच्या वर्गणीदारांस मात्र किं. रु. ३ ट. ख. ८६.

मनुस्मृति मराठी भाषांतरसहित.

किं. रु. ५ ट. ख. ८६.

हा आर्यधर्माचा मुख्य व अतिप्राचीन ग्रंथ असल्यामुळें प्रत्येक हिंदूला पूज्य व संग्रह करणें फार अगत्याचें होय. त्यांत मराठी भाषांतराच्या योगानें तो सर्वांस समजण्यास सुलभ झाला आहे. ह्यांत ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यास हे आश्रम, व धर्म, संकीर्ण जाती व त्यांचे धर्म, राजकीय विचार, दायविभागादि न्याय, दिवाणी, फौजदारी प्राचीन कायदे, प्रायश्चित्त इत्यादि विषय फार सुलभ रीतीनें कथन केले आहेत. सोनेरी सुरेख बांधणी. ठिकठिकाणीं सर्वटीकाधारानें टीपा दिल्या आहेत.

केरळकोकिळाच्या वर्गणीदारांस रु. १।१४ ट. ख. ८४.

वैद्यकशार्ङ्गधरसंहिता.

नवीन मराठी भाषांतरसहित.

पृष्ठसंख्या–५२७–किं. रु. २॥ ट. ख. ।।

" अर्वाचीन सर्व ग्रंथांमध्यें शार्ङ्गधरसंहिता अत्युत्तम होय. ह्यामध्यें सर्व विषयांची व्यवस्था जशी अनुक्रमानें लावलेली आहे तशी दुसऱ्या कोणत्याही ग्रंथांत केलेली आढळत नाहीं. ह्या ग्रंथांत जे प्रयोग लिहिले आहेत ते सारे अनुभव घेऊन त्यांचें यथार्थ गुणवर्णन केलें आहे. ह्यांत इतर ग्रंथांप्रमाणें औषधांची अतिशयोक्ति नाहीं. अशा प्रकारचा सर्वोत्तम लोकप्रिय ग्रंथ असून त्याच्या प्राकृत भाषांतरामध्यें–प्राकृत टीकाकाराचे स्वतः असोत किंवा लेखकाचे असोत जे प्रमाद झालेले आहेत त्यांची दुरुस्ती छापणारांनीं आजपर्यंत केलेली नाहीं. कित्येकांनीं तर कांहीं बाहेरचा ग्रंथच ह्यांत घुसडून दिला आहे. हे सर्व घोंटाळे काढून करवेल तितकें शुद्ध व सरळ भाषांतर केलें असून विषयानुक्रमणिकेशिवाय आजपर्यंत न झालेली **रोगानुक्रमणिका** दिली आहे. त्यामुळें कोणत्या रोगावर काय औषध हें झटकन् पाहिजे त्यास समजतें. प्रसिद्ध प्रसिद्ध अशा **वैद्यांच्या सूचनेप्रमाणें** ह्यांत शक्य ती सुधारणा केली आहे. व्ही. पे.नें पाठवूं.

जनार्दन महादेव गुर्जर, रामवाडी–मुंबई.

ल.रा.पंडित,बाई.

नोवेंबर. (वर्षाची वर्गणी [illegible] फुटकळ अंकास ०४.) १८९६.

केरळकोकिळ.

वर्षारंभ जानेवारी.

पु० १०] [अं० ११

विधिरेव विशेषगर्हणीयः करट त्वं रट कस्त्वयापराधः ॥
सहकारतरौ चकार यस्ते सहवासं सरलेन कोकिलेन ॥१॥

दामोदर महादेव गुर्जर बुकसेलर ॲण्ड पब्लिशर.
रामवाडी
मुंबई.

सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत.

ह्या पुस्तकांतील लेख कोची (मलबार) येथें तयार होऊन, ते मुंबई येथें छापून प्रसिद्ध होतात.

विषयांची अनुक्रमणिका.

	पृष्ठ.		पृष्ठ.
लोकोत्तर चमत्कार–दंतयुक्त व चतुष्पाद पक्षी. ...	२४१	लोकोत्तर चमत्कार–दीर्घायुषी मंडळी.	२४९
सूर्याच्या उष्णतेची परमावधि.	२४६	विद्युन्मानसशास्त्र, व्याख्यान अकरावें.	२५२

पुस्तकांची पोंच.

१ कुभ्रमनिर्णय. २ मेळ्यांचीं पदें वगैरे. ३ अधिक प्रकाश. ४ इस्राएली-कथारत्नमाला. ५ लोकरीचें विणकाम शिकविण्याचें पुस्तक. ६ इस्राएली धर्म-दीप–वर्षपतिपदेप्रीत्यर्थ विशेष अंक. ७ कन्याविक्रयदुष्परिणाम नाटक. ८ बो-र्डिंगहाउस–दापोली. ९ A Summary of the 7th report of the Maharashtra village Education Society (1895–96). १० घड्याळें वापरण्याचे नियम. ११ मौजच मौज. १२ कलहविपाक नाटक.

रोजनिशा.

निर्णयसागरची रोजनिशी–नेहमींप्रमाणेंच सुरेख व उपयुक्त आहे. २ घोर-पडे यांची रोजनिशी–हिच्यांत प्रतिवर्षाप्रमाणेंच उपयुक्त माहिती असून शिवाय सर्व हिंदुस्थानांतील आगगाड्यांचा रस्ता व स्टेशनें दाखविलेला नकाशा नवा जोडला असल्यामुळें लोकांस विशेष सोय झाली आहे. त्यांत रेल्वेचें भाडें, अंतर वगैरे माहिती पुष्कळच आहे. ३ पटवर्धनांची रोजनिशी–हीही ठीक आहे. शाई आणि रोजनिशी दोन पदरांत पडतात. वावगें नाहीं.

वरील पुस्तकें पाठविणारांचे आह्मी मनःपूर्वक उपकार मानितों.

॥ ओं नमः श्रीरामचंद्राय ॥

आर्यमहौषधालय मु० आंजलें.

या अत्यंत खात्रीच्या औषधाचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यांस कदाचित् आला नाहीं तर पैसे परत देऊंच व त्याशिवाय त्यांच्या आरोग्यार्थ एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकटच देऊं.

मदनविलासामृतसंजीविनी.

वीर्यस्तंभक, रक्तशोधक, अत्यंत कामोत्तेजक, चित्तोत्साहक, बुद्धि–कांतिवर्धक व धातुपौष्टिक सुवर्णमाक्षिक मौक्तिक कस्तूरीमिश्र अपूर्व गुटिका.

१. शरीराची उत्तम सुधारणा करणारीं अत्यंत महत्वाचीं जीं औषधें आहेत, त्यांत या गुटिका अगदीं पहिल्या प्रतीच्या ठरल्यामुळें यांचे अपूर्व गुण थोड्याच काळांत या देशाच्या सर्वभागीं व त्यांच्या आसमंतात् अतिशय पसरले आहेत. या सेवन केल्यानें नपुंसकत्व, इंद्रियशिथिलता, कडकी, जीर्णज्वर, अग्निमांद्य, अशक्तता, स्वप्नजन्य किंवा इतर धातुपात, छातींतील रोग, मेंदूचे विकार, पांडुरोग, क्षय, मूत्रसंकोच किंवा मूत्रातिरेक, कटिशूल, वातरोग, उपदंशसंबंधी मुरलेले विकार, हात, पाय, मूत्रमार्ग, व शरीर यांचा दाह, व अरुचि, इ० अनेक विकार कितीही वयाच्या मनुष्यास नवीन किंवा जुनाट असले तरी खात्रीनें बरे होतात. धातु व रक्त यांची शुद्धि व वृद्धि होऊन रक्तदूषणजन्य अनेक रोग हटकून बरे होतात. वीर्यस्तंभन, व कामोद्दीपन होऊन अग्नि व शक्ति भरपूर वाढते. स्त्रियांची धुपणी व संततीस अपायकारक जे गर्भाशयस्थ रोग त्यांचें त्वरित निवारण होऊन कांति, स्मरणशक्ति व बुद्धि वाढते. ज्यांस शारीरिक व मानसिक श्रम फार पडतात, त्या सर्वांच्या आंगीं यांनीं अतिशय शक्ति येऊन मनास उत्साह प्राप्त होतो, सुस्ती जाते. ज्यांस दूध व जडान्न पचत नाहीं त्यांस तें भरपूर पचूं लागतें, कोष्ठशुद्धि होते. या अप्रतिम गुटिका अत्यंत शोधानें केल्या असून त्यांच्या अप्रतिम गुणका-

रित्वाबद्दल हजारों सार्टिफिकिटें मिळालीं व नित्य मिळत आहेत. यांत अपायकारक पदार्थ बिलकूल नाहींत. वरील सर्व रोग जाऊन उत्तम गुण प्राप्त होण्यास या गुटिकांसारखें अप्रतिम औषधच नाहीं असें पूर्ण अनुभवावरून स्पष्ट ह्मणतों. यांस पथ्यसेवनाची गरज नसतां या पाहिजे त्या दिवसांत घेतल्या तरी हटकून गुण करितात. यामुळें त्यांचा अतिशय खप सुरू आहे. गोळ्या रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम सहा रुपयांच्या किंवा त्यांहून कितीही जास्त गोळ्या घेणारांस बंगीचा सर्व टपालखर्च माफ आहे. त्यांचे आंत घेणारांस मात्र तो वेगळा सहा आणे पडेल. एकदम ३२ गोळ्यांस १ रु. ७० गोळ्यांस २ रु. १६० गोळ्यांस ४ रु. २६० गोळ्यांस ६ रु. ५२० गोळ्यांस १० रु.

थंडगार नेत्रांजन—हें अंजन स्तुतीस अत्यंत पात्र आहे, हें सतत दहा वर्षांच्या पूर्ण अनुभवानें कळवितों. यानें डोळ्यांचे साधारण विकार तर सहजच, परंतु दृष्टीचा समूळ नाश करणारे, तिमिरांध्य, वडस, बिंदु, फुलें, कांच, सारा, भोर, गळती, खुपऱ्या, जळजळ, कंड, फूट, चिकटा, ठणका व लाली इ० अनेक विकार, तत्संबंधी मस्तकशूलादि विकारांसह कितीही वयाच्या मनुष्यास कोणत्याही कारणांनीं प्राप्त झालेले नवीन किंवा जुनाट असले तरी नाजूक रीतीनें कोणतीही इजा न होतां बरे होतात. दृष्टि तीव्र व थंडगार राहते. हें चांगल्या दृष्टीच्या मनुष्यांनींही डोळ्यांत घातल्यास वरील विकार त्यांस बिलकूल होणार नाहींत. लहान मुलांस तर हें अत्यंत उपयोगी आहे. २ तो० ड० १॥ रुपया.

विशेष सूचना.—अलीकडे आंजर्ले व मुर्डी वगैरे गांवांतील औषधांच्या बऱ्याच जाहिराती सुरू आहेत व त्यांपैकीं कांहीं जाहिरातींत ज्या सह्या आहेत त्या बहुतेक आमच्याच नांवासारख्या भासण्याचा विशेष संभव आहे. तरी अशा लोकांशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं हें अवश्य लक्षांत ठेवून आमचीं औषधें **"कृष्णशास्त्री बिवलकर वैद्य. मु० आंजर्ले ता० दापोली जि० रत्नागिरी."** याच पत्त्यावर रोखीनें किंवा व्ही.पी.नें मागवावींत. अनुपानपत्रक सोबत असतेंच.

५–१२]

लोकोत्तर चमत्कार.

दंतयुक्त व चतुष्पाद पक्षी !

सृष्टीचें अवलोकन, व प्राणिमात्राविषयीं विचार, हें परमात्म्याचें स्वरूप आणि सामर्थ्य अधिकाधिक हृदयांत बिंबण्याचें एक मोठें साधन आहे. सृष्टींतील प्रत्येक पदार्थाचे गुणधर्म घेतले तरी ते आश्चर्यजनक असतातच. पण त्यांतूनही प्राणिकोटि–तींत ईश्वरांशाची लीला–चैतन्यशक्ति–असल्यानें, विशेषच मनास रंजविणारी असते. ह्मणून तिच्याविषयीं विचार करणें ही एक परमेश्वरभक्ति–पुण्य आहे असें आह्मी समजतों. व दांभिकपणानें लोकोपचारार्थ नाक धरून बसण्यापेक्षां, गोमुखींत हात घालून निद्रासमाधि लावण्यापेक्षां, किंबहुना रामनामाची सुकी बडबड, व टाळवीण्यांचा खीस यापेक्षांही सृष्टीच्या अवलोकनानेंच परमात्म्याच्या स्वरूपाची ओळख अधिक होईल असें

आमचें मत आहे. त्यापासून स्वार्थ आणि परमार्थ असे दोन्हीही लाभ प्राप्त होतात. ह्मणजे सृष्टीविषयीं किंवा प्राणिमात्राविषयीं विचार केल्यानें व्यवहारांत पुष्कळ फायदा होतो आणि पारलौकिक सुखासही साधन होतें.

'नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते'–ज्ञानासारखें पवित्र आणि उत्तम असें दुसरें कांहीं नाहीं; असें गीतेंतील भगवद्वाक्य आहे. तेव्हां त्याच्या सत्यत्वाविषयीं प्रशंसा ती काय करावी? त्याचा दाखला पदोपदीं अनुभवास येतो. तें ज्ञान जे कोणी अहर्निश झटून संपादन करतात, तेच कोट्यवधि मानवी प्राण्यांवर सत्ता चालवून प्रभुत्व मिरवितात. त्याची आज्ञा ईश्वराप्रमाणें पाळिली जाते; मी मी ह्मणविणारे बलशाली पुरुषही त्याच्या पायांशीं लीन होतात. त्याच्या एका शब्दानें हजारों प्राण वांचतात किंवा लयास जातात. हा सर्व प्रभाव प्रत्यक्ष ह्मणा किंवा परंपरया ह्मणा ज्ञानाचाच आहे, ह्यांत शंका नाहीं. पण ह्या सर्वांहूनही सृष्टिचमत्काराच्या सूक्ष्म अवलोकनानें व विचारानें जें ज्ञान वृद्धिंगत होत जातें, त्याचा आपल्या मनास जो आनंद व उल्हास वाटतो तो केवळ अप्रतिम होय. आणि तोच लाभ मराठी वाचकांस वारंवार मिळावा ह्मणून मोठ्या भक्तिभावानें 'लोकोत्तर चमत्कार' हें नवेंच सदर आह्मीं घातलें आहे. असो. आज एका पूर्वकालिन अपूर्व प्राण्याची हकीगत देण्याचें मनांत आणिलें आहे. हा प्राणी ह्मणजे आरंभीं दिलेलें चित्र हाच होय. हा प्राणी ह्या युगांत पृथ्वीच्या पाठीवर कोठेंही उपलब्ध नाहीं. मग त्याचें चित्र आणलें कोठून? अशी सहजीं जिज्ञासा उत्पन्न होते; ती पूर्ण होण्यासाठीं खालचा लेख लिहिला आहे.

पूर्वयुगांतील प्राणी व वनस्पति कोणत्या प्रकारच्या होत्या हें कळण्याला मुख्य साधन भूगर्भशास्त्र आहे. भूगर्भांतील रचनेकडे लक्ष्य दिलें तर, ही पृथ्वी, एकावर एक मृत्तिकेचे–अथवा दुसऱ्या कांहीं तदंशिकच पदार्थांचे–थर चढून बनली आहे असें दृष्टोत्पत्तीस येतें. ह्या प्रत्येक थरांत त्या त्या युगांतील प्राणी व उद्भिज्जें ह्यांचीं कलेवरें–किंवा निदान सांगाडे तरी पाषाणमय झालेले सांपडतात. आणि ते त्याच्या मूळरूपाशीं अगदीं सदृश असतात. अशा प्रकारचे पूर्वयुगांतील

पाषाणरूप झालेले प्राणी–ज्यांस इंग्रजींत 'फासील' असें ह्मणतात–जे वेळोवेळीं भूगर्भांतून मनुष्याच्या हातीं येतात, ते साक्षेपानें एखाद्या मोठ्या प्रसिद्ध सार्वजनिक पदार्थसंग्रहालयांत ठेवण्याची पाश्चात्य लोकांस फार आवड आहे. अशा प्रकारचे हजारों प्राणी युरोपखंडांत पहावयास मिळतात. आणि त्यावरून कोट्यवधि वर्षांच्या पूर्वीच्या प्राणिवर्गाचे चमत्कार दृष्टिगोचर होऊन मनांत अनेक विचाराच्या लहरी उठतात. आजपर्यंत सांपडलेल्या पाषाणरूपी प्राण्यांवरून असें दिसतें कीं, एखाद्या अज्ञान व नवीन राष्ट्राप्रमाणेंच ह्या प्राणिकोटींतही उत्तरोत्तर सुधारणा होत आली आहे. मग ती सुधारणा परमेश्वर करो, कीं नैसर्गिक असो. पण परमेश्वर सुधारणा करितो असें ह्मणतां येत नाहीं. कारण त्या योगानें त्याच्याकडे अज्ञानपणा येतो. किंवा निदान अपक्वपणा व पक्वपणा तरी त्याच्या पदरास लागतो. तें कसेंही असो. त्याचा विचार गहन आहे. ह्यास्तव त्या भानगडींत पडण्याचें तूर्त कारण नाहीं. तरी पण अशी सुधारणा सृष्टिक्रमांत स्पष्ट दिसते ह्यांत संशय नाहीं.

अनेक प्रमाणांवरून असें सिद्ध होतें कीं, पृथ्वी निर्माण होतांना आधीं पाणी उत्पन्न झालें. नंतर प्राणी, अर्थात जलचर. नंतर मृत्तिका. मृत्तिका ही मृतापासून झालेली हें शब्दार्थावरूनच कळतें. तेव्हां मृत्तिकेच्या पूर्वी प्राणी असले पाहिजेत हें उघड आहे. प्रथमतः कालवासारखे अवयवशून्य प्राणी झाले असावेत. त्यांतच थोडा फेरफार होऊन मासे झाले. माशांस पाण्यांत पोहतां यावें–हिकडे तिकडे विहार करतां यावा ह्मणून वल्ह्यासारखीं दोन पंखें व एक दुमाल्यासारखें शेंपूट करण्याची योजना झाली. पुढें जसा प्राणिसंचय अधिक होऊन मृत होऊं लागला, तसतशी कलेवरांची प्रसंगोपात्त संख्या वाढून मृत्तिकाही वाढत चालली. तेव्हां त्या प्राण्यांना जमिनीवरही विहार करण्याचीं साधनें देणें भाग झालें. ह्मणून पुढील पंखास व मागील पंखास कांहींसा पंजासारखा आकार देऊन, व श्वासोच्छ्वास करणाऱ्या इंद्रियांत पाण्यांतल्या प्रमाणेंच वायूंतीलही आक्सिजन शोषून घेण्याचीं साधनें देऊन बेडूक, कासव, सुसर इत्यादि प्राणी निर्माण केले. कासव हें कालवाचें सुधारलेलें स्वरूप होय. व बेडूक, सुसर हें माशांचें सुधारलेलें स्वरूप होय. कासव

व सुसर ह्या दोन्ही देहांचे मिश्र प्राणी सुद्धां हल्लीं समुद्रांत आहेत. सुसरीच्या पायाला बळकटी देऊन व वायूंतील आक्सिजन शोषण्यासाठीं स्वतंत्रच इंद्रियें देऊन कोल्ह्याकुत्र्यांसारखीं चतुष्पाद जनावरें उत्पन्न झालीं. नंतर जनावरांचेच मागील पाय अधिक मजबूत करून व त्यांमध्येंच सर्व शरीराचा गुरुत्वमध्य (जवळ जवळ) आणून वानरें, माकडें निर्माण झालीं. त्यांत सुधारणा होऊन 'गारेला[1]' 'ओऱ्यांग ओऱ्यांग' इत्यादि पुच्छहीन मर्कट. आणि सर्वांच्या मागून उच्चप्रतीस पोंचलेला मानवी प्राणी असा हा क्रम दिसतो.

'प्रेशासरस[2]' नांवाचा चतुष्पाद प्राणी पूर्वयुगांत होता. ह्याची मान सापासारखी असे. साप, पाल, घोरपड हीं त्याचीं रूपांतरें किंवा सुधारलेली स्थिति होय. कारण, त्याचे पाय पूर्वस्थितींत माशांच्या पंखांच्या जवळजवळ होते. तसेंच चतुष्पादामध्यें 'ट्यापीर' ह्या नांवाचा एक प्राणी होऊन गेला. त्याच्या तोंडाचा भाग कांहीं अंशीं जिराफासारखा होता. आणि सध्या जीं आपण जनावरें नेहमीं पाहतों, त्यांसारखेच त्याच्या पायांला खूर असत. त्याची मान किंचित् आंखूड होती. त्याचा आकारांत थोडासा फेरबदल होऊन, ह्मणजे पाय व मान थोडींशीं लांब होऊन जिराफ व उंट हे प्राणी निर्माण झाले असावेत. त्याच सांखळींत पुढें 'मेग्याथेरियम्' नांवाचा प्राणी उत्पन्न झाला. त्याच्या शरीराची ठेवणही ट्यापीरप्रमाणेंच असून चारही पायांस खूर होते. तोंड मात्र जरा निराळें, ह्मणजे अस्वल, गेंडा वगैरे प्राण्यांसारखें, आणि अंगानेंही जरा स्थूल असे. ह्या दोन्ही प्राण्यांपासूनच गायी, बैल, ह्मशी, रेडे, उंट, जिराफ, घोडे, गेंडे, अस्वलें, वगैरे प्राणी थोड्याशा फेरफारानें बनले असावेत असाच विद्वान् लोकांचा तर्क आहे. गाढवापासून खेचर व खेचरापासून घोडें. ही तर उघड उघड सुधारणा दिसते. ज्याच्या अंगाला कधीं खरारा ठाऊक नाहीं, असें एखादें भाड्याचें तट्टू किंवा शामभट्टाची तट्टाणी पहा. पण ह्मणजे तिचे ते सळवळीत लांबडेसे कान, तिच्या अंगावरची लव इत्यादि गोष्टी व कुलालवाहनाचीं लक्षणें ह्यांत फारच थोडा भेद दिसेल. वर सांगितलेल्या चतुष्पादांतच आणखी थो-

१ ह्याचें सचित्र वर्णन के० को० वर्ष ४ अंक १२ ह्यामध्यें येऊन गेलें आहे.
२ के. को. पु. ३ अं. ८.

डासा फेरफार करून, ह्मणजे अग्रभागीं एक सोंडेसारखा अवयव लावून, व जवळजवळ हत्तीचें स्वरूप-मात्र थोडेंसें ओबडधोबड-देऊन, आंगावर केंसांचें जंगल वाढवून मेमोथ नांवाचा प्राणी सृष्टिकर्त्यानें निर्माण केला. आणि त्यांतही आणखी थोडीशी सुधारणा करून व पूर्वापेक्षां फार उत्तम तऱ्हेचें स्वरूप देऊन हत्ती हा सुंदर व राजमान्य प्राणी भूतलावर पाठवून दिला असावा.

अशा प्रकारें जलचर व स्थलचर प्राणी तयार झाल्यावर खचर ह्मणजे आकाशांत संचार करणारे प्राणी निर्माण करण्याची कल्पना जगन्नियंत्याच्या मनांत आली असावी. आणि त्याप्रमाणें चतुष्पादासच प्रथमतः पंख देण्यास सुरवात झाली. असें मानण्यास 'चोंचीचें जनावर' 'उडतें जनावर' इत्यादि सद्यःकालांत विद्यमान असणाऱ्या प्राण्यावरून बळकट पुरावा आहे. जनावरांना पक्ष्याचें स्वरूप देतांना त्या दोहोंच्या मध्यें दुव्यासारखे, भूचर व खचर ह्या दोहों धर्मीचे मिश्र प्राणीही उत्पन्न करावे लागले असें दिसतें. हे सांध्यावरचे किंवा दुव्याचे प्राणी दिसण्यांत चमत्कारिक असल्यामुळें इतर प्राण्यांहून त्यांचें लोकांस विशेष कौतुक वाटतें.

प्रथमारंभीं दिलेला प्राणी हा एक अशाचपैकीं दुवा आहे. ह्याच्या देहरचनेंत पशु व पक्षी ह्या दोहोंचेंही सादृश्य आहे. वस्तुतः चित्रामध्यें जसा हा प्राणी काढला आहे, तसा तो प्रत्यक्षतः कोणीही पाहिलेला नाहीं. पण त्याच्या हाडांचा सांपळा भूगर्भात जशाचा तसा पाषाणरूप झालेला आढळला. त्यावरून प्रोफेसर फिलिप्स नांवाच्या प्रसिद्ध शास्त्रज्ञांनीं आपल्या कल्पनेनें हा त्याचा देह बनविलेला आहे. ह्यांत फारशी चूक असण्याचा संभव नाहीं. कदाचित् असलीच तर बाह्यस्वरूपांत ह्मणजे मांसचर्मांत असूं शकेल. परंतु अवयवांत कमजास्तीपणा मुळींच असणार नाहीं. कारण, प्रत्येक अवयवाची रचना अंतर्गत अस्थिसमुच्चयावरून तयार केलेली आहे. पक्ष्याला खरोखर दांत हे कधींच नसतात. ह्या प्राण्याला दांत आहेत येवढेंच नव्हे, तर दोन मोठमोठाले सुळेही आहेत. चोंच असून शिवाय दांत निर्माण करण्यांत परमेश्वराचा काय उद्देश असेल तो असो. तसेंच त्याला चार पाय असून शिवाय

१ के. को. पु. ४ अं० ७ मध्यें ह्या प्राण्याचें सचित्र वर्णन आहे.

पंख आहेत. तेव्हां अर्थातच ह्याला पशूसारखें चार पायांनीं चालतां– निदान फरपटतां तरी–येत होतें, व पंख असल्यानें त्यास आकाशांतही संचार करतां येत असलें पाहिजे. ह्या पक्ष्याचें प्रस्तुत मन्वंतरांतील वडवाघुळाशीं कांहींसें साम्य असावें असें वाटतें. पूर्वयुगांतील हे असले कधीं आपल्यास दृष्टीस न पडणारे प्राणीही आज आपल्या डोळ्यासमोर असल्याप्रमाणें दिसतात, हा केवळ बुद्धीचा व उद्योगाचा प्रभाव होय. आणि त्यावरून सृष्टीमध्यें युगायुगांत कसकसा फेरफार होतो, ह्याचीही बरीच कल्पना मनांत उभी रहाते. व आज जें सृष्टीचें स्वरूप आपण पहात आहों, त्यास युगाचा काल लोटल्यानंतर अगदीं नवेपणा येऊन प्राणी व उद्भिज्जें ह्यांत विलक्षण भेद दिसेल असें दृढतर अनुमान होतें. ह्या गोष्टीचा विचार करूं लागलें तर अनंत आहे. ह्यास्तव तो वेळोवेळीं थोडथोडा केला पाहिजे. आज इतकाच पुरे.

सूर्याच्या उष्णतेची परमावधि.

आपणांस सूर्यप्रकाशापेक्षां अधिक आनंददायक वस्तु जगामध्यें फारच थोड्या आहेत. किंबहुना तशी वस्तु एकही नाहीं ह्मटलें तरी सुद्धां चालेल. पण तो आपणांस नित्यशः प्राप्त होतो, ह्मणून त्याची आह्मांस कांहींच किंमत वाटत नाहीं. आह्मी ज्यांची खरी किंमत जाणतों, अशा वस्तु जगामध्यें बहुतकरून कमीच. ह्यामुळें अनेक गोष्टी अत्यंत विचारणीय असूनही आह्मी कधींच त्यांविषयीं विचार करीत नाहीं, तशीच गोष्ट सूर्याच्या उष्णतेची आहे. पण कधीं कधीं सूर्याचे प्रखर किरण आह्मांवर पडतात, आणि त्या वेळीं थोडा तरी विचार आपल्या मनांत आल्यावांचून रहात नाहीं. तरी एका व्यक्तीवर पडलेल्या उन्हावरून सूर्यकिरणांत असणाऱ्या अपार उष्णतेची कल्पना फारच थोडी होते. एखादा मनुष्य उन्हांतून फिरत असला, तर त्याला कांहीं परिमित उष्णतेचें मान समजेल. परंतु त्याच्या सभोंवार पसरून राहिलेल्या एकंदर उष्णतेची कल्पना सुद्धां व्हावयाची नाहीं.

सारख्या उंचीचे दोन मनुष्य उन्हांत उभे राहिले. तर प्रत्येकास सारख्या प्रमाणांत उष्णता लागते. आतां त्या उभयतांपैकीं एकाची

उष्णता, कांहीं कृतीनें दुसऱ्यांत घालतां येईल तर, ती त्यास पहिल्याहून दुप्पट भासेल हें उघड आहे. प्रत्येक मनुष्याला किंवा पदार्थाला जी सूर्यकिरणांची उष्णता लागते, ती त्याच्या पृष्ठभागावर जेवढे किरण पडलेले असतात, तेवढ्यांची असते. ह्यावरून पदार्थाच्या आकाराचें जितकें जितकें क्षेत्रफळ अधिक, तितकी तितकी त्यावर उष्णताही अधिक.

ही सूर्यकिरणांतील विस्तृतभागावर पसरलेली उष्णता कांहीं कृतीनें एका बिंदूत आणतां येते. त्यास मुख्य साधन वक्रता असलेलें भिंग आहे. अशा वक्रता दिलेल्या भिंगांना इंग्रजीमध्यें **'लेन्स'** असें ह्मणतात. अंतर्वक्रता, बहिर्वक्रता इत्यादिकांच्या योगानें **लेन्सा**चे अनेक प्रकार होऊन त्यांतून किरण पसरतात किंवा एकत्र होतात. डोळ्यास लावण्याची चाळशी, व **म्याग्निफाइंगग्लास**–मोठें दिसणारें भिंग–हे एक प्रकारचे **लेन्स** होत. ह्मणून ते उन्हांत धरून त्यांच्यावर पडणाऱ्या किरणांचा एक केंद्र केला असतां, त्या ठिकाणीं कापूस, कागद वगैरे पदार्थ पेटतो. ह्या **लेन्सां**चा व्यास जितका जितका अधिक असेल, तितका तितका त्याच्या खालचा पदार्थ जलद पेट घेतो. समजा, कीं आपण दोन इंच व्यासाचें एक **म्याग्निफाइंगग्लास** घेतलें, आणि तें दुपारीं दहाअकरा वाजण्याच्या सुमारास जमिनीपासून सुमारें वीत दीड वीत अंतरावर धरलें, तर त्याच्या खालीं एक अति तेजस्वी बिंदु पडतो. तो इतका प्रखर असतो कीं, त्याच्या खालीं कापूस, कागद वगैरे पदार्थ धरले, तर ते पेटावयास पुरते दहा सेकंदही लागत नाहींत. ही जी येवढी उष्णता उत्पन्न होते, तिचें कारण सहज ध्यानांत येण्यासारखें आहे. तें हेंच कीं, त्या **लेन्सा**च्या परीघावर जेवढे किरण पडलेले असतात, तेवढ्यांचें, त्या कांचेस वक्रता असल्यामुळें एकीकरण होतहोत, त्या प्रकाशबिंदूच्या ठिकाणीं पूर्ण एकीकरण होतें. ह्यावरून ही गोष्ट सहज सिद्ध होते कीं, दोन इंच व्यासावर सूर्यकिरणांच्या योगानें उत्पन्न होणारी उष्णता एकत्र केली तर, तिची बेरीज इतकी होते कीं, तिनें पदार्थ तत्काल पेट घेतो! अशी उष्णता आपल्या पृथ्वीच्या अर्धभागावर नेहमीं पसरलेली असते. ती सर्व एकत्र केली, तर ती केवढी अनर्थोत्पादक होईल? आणि येवढी उष्णता ज्या एका सूर्यापा-

सून आह्मांस कोट्यवधि वर्षें सारखी मिळत आहे, तो सूर्य तरी किती जाज्वल्य असेल ? त्याचा थोडासा विचार करूं या.

आपण एखादें उष्णतामापक यंत्र घेऊन त्यांत पारा भरलेल्या गड्डचावर प्रत्यक्ष सूर्याचे किरण पाडावेत, ह्मणजे लागलीच तो पारा ४०′ अंशांपर्यंत वाढतो. आतां कल्पना करा कीं, सावलीमध्यें एका उष्णतामापक यंत्राची उष्णता ९०′ अंशांपर्यंत चढलेली आहे. त्यास प्रत्यक्ष सूर्याचे किरण लावले, ह्मणजे तेंच यंत्र उन्हांत नेऊन ठेवलें, तर त्यांतील पारा ९०$\frac{३}{४}$′ अंशांपर्यंत चढेल. तीच उष्णता दुप्पट केली तर, १३१′ अंशांवर जाईल, व चौपट केली तर २१२′ अंशांवर जाईल. अर्थात तेवढ्या उष्णतेनें पाण्यास अधण येईल. पण ही उष्णता वाढविण्याला एक प्रमाण आहे. त्यापुढें नुसत्या किरणांनीं ती वाढावयाची नाहीं. त्यापुढें तिला वाढविण्याला दोन मार्ग आहेत. एक **लेन्सां**च्या योगानें आणि दुसरा उत्कृष्ट झिलई दिलेल्या पत्र्याच्या योगानें किंवा कृतीच्या आरशानें.

असा एक आरसा तयार करावा कीं, त्यांतील तुकड्यातुकड्यांचे किंवा पैलूंचे किरण एका विविक्षित जाग्यावरच पडतील. ह्या आरशांची व तुकड्यांची संख्या जितकी अधिक असेल, तितक्या पटीनें त्यांच्यापासून निघणाऱ्या प्रकाशाची उष्णता वाढेल. अशा प्रकारच्या आरशापासून निघणारे प्रकाशकिरण **लेन्सा**प्रमाणेंच एका केंद्रांत मिळतात, आणि तेथें अतर्क्य उष्णता उत्पन्न होते. **व्हिलेट** नांवाचा एक **फ्रेंच** गृहस्थ होता. त्यानें पुष्कळ वर्षें खटपट करून एक आरसा तयार केला; तो निखालस धातूचाच केलेला होता. ह्मणजे कांचेच्या ऐवजीं धातूच्या पत्र्यासच झिलई देऊन त्याचें परावर्तन पडेल असें केलें होतें. ह्या आरशाची तीव्रता इतकी होती कीं, एका मिनिटांत पोलाद सुद्धां वितळून जाई. त्यानेंच दुसराही एक अशाच प्रकारचा आरसा तयार केला होता, तो लहान होता. त्याचा व्यास बावीस इंच भरे. ह्या आरशानें पूड केलेल्या गारेवर केंद्रकिरण पाडले, तर अर्ध्या मिनिटांत तिची कांच बनत असे.

कांचेच्या अंतर्वक्र व बहिर्वक्र **लेन्सा**पासूनही सूर्यकिरण एका केंद्रांत येऊन मोठे चमत्कारिक चमत्कारिक प्रयोग होतात. कांहीं वर्षी-

पूर्वी **पारकर** ह्या नांवाचा एक इंग्रजी गृहस्थ होता, तो **लेन्स** करण्याचें काम करीत असे. त्यानें एक तीन फूट व्यासाचा **लेन्स** तयार केला होता. त्याची शक्ति इतकी होती कीं, पोलादाची नळी तीन सेकंदांत वितळून जात असे. आणि एका मिनिटांत दगडाची राख होत असे!

ह्या साधारण गोष्टीवरून सूर्याच्या एकंदर उष्णतेची आपणास बऱ्याच अंशानें कल्पना करतां येईल. कारण, त्या गणिताला **पारकर** साहेबांच्या **लेन्सा**चा व्यास हा पाया आहे. सात चौरस फुटांच्या सूर्यकिरणांनीं जर तीन सेकंदांत पोलाद वितळतें, तर एका चौरस मैल व्यासावरच्या सूर्यकिरणांनीं, तें एका सेकंदाच्या लक्षांशापेक्षांही कमी वेळांत वितळेल. आतां आपली पृथ्वी घेऊं. ही प्रत्यहीं ५,००,००,००० चौरस मैलांवरील उष्णता नेहमीं घेत आहे. परंतु पृथ्वी ही सूर्याहून पुष्कळ लहान आहे. पृथ्वीसारखे आणखी २३००००००० गोल असले, तरी सुद्धां त्यांस उष्णता देतां येईल, इतका सूर्याच्या ठिकाणीं उष्णतेचा सांठा आहे. तेव्हां तिची एकंदर बेरीज किती तिचें कल्पनेनेंच अनुमान करावें, आणि सूर्याची दैदीप्यता लक्षांत आणावी. अशा तेजःपुंज गोलापुढें पदार्थ नेले, तर त्यांची स्थिति काय बरें होईल? आपल्या ह्या यःकश्चित् भूगोलासारख्या भूगोलास, जर यदाकदाचित् दुर्दैवानें सूर्यास भेटण्याचा प्रसंग आला, तर त्याचें निमिषमात्रांत भस्म होऊन तो कोठें जाईल याचा पत्ता सुद्धां लागावयाचा नाहीं. मग त्यावरील प्राणिमात्रांची दाद कोठची!

लोकोत्तर चमत्कार.

दीर्घायुषी मंडळी.

आपल्या देशांत पूर्वी शतायुषी माणसें पुष्कळ होतीं; पण त्यांतील एकाचीही नांवनिशी कोठें करून ठेविलेली आढळून येत नाहीं. नाहीं म्हणावयास **निजामउल्मुल्क** एकशें चार वर्षांचा होऊन मेला, एवढा मात्र इतिहासांत दाखला सांपडतो. पण तीच इंग्लिश लोकांची

टापटीप पहा. कोठें कांहीं थोडकेंसें चमत्कारिक दृष्टीस पडलें, कीं, त्यांनीं त्याची तपशीलवार हकीकत लिहून ठेवलीच. त्यांनीं जगतीतलावरील प्राण्यांचीं, कीटकांचीं, जनावरांचीं, मत्स्यांचीं, पांखरांची, मनुष्यांचीं, वनस्पतींचीं, वृक्षांचीं, जागोजागच्या अप्रतिम स्थलांचीं व तेथील अद्भुत गोष्टींचीं वर्णनें जशीं सविस्तर नोंदून ठेविलीं आहेत, तशींच अंतरिक्षांतील चमत्कारांचींही रसभरित वर्णनें लिहून काढलीं आहेत. त्यांतच कित्येक दीर्घायुषी माणसांची तपशीलवार हकीकत नोंदून ठेविली आहे. ती वाचली ह्मणजे मनास फार आल्हाद उत्पन्न होतो, ह्मणून ती आह्मी आमच्या वाचकांकरितां येथें देत आहों.

लार्ड फ्रान्सिस बेकननें एका दीर्घायुषी मनुष्याची हकीकत लिहिली आहे. ह्या मनुष्याचें नांव **थॉमस पार** असें होतें. इ. स. १४८३ त ह्याचें जन्म झालें, आणि १६३५ त काळ झाला. ह्मणजे मरणसमयीं त्याचें वय १५२ वर्षांचें होतें. पण चमत्कार हा कीं, तो मरतांना शरीरव्याधि होऊन, किंवा हातपाय वगैरे एखादें इंद्रिय अधु होऊन, मरण पावला नाहीं, तर, नेहमींच्या खाण्यापिण्यांत बेसुमारपणा केल्याकारणानें, दुष्पट रक्त होऊन, त्यास इहलोकाचा त्याग करावा लागला. तो आपल्या देशांत उद्योगानें कालक्रमण करी, आणि त्याच देशची हवा आणि व्यायाम घेई; पण त्याला एकदां **लंदन** येथें बोलावण्यांत आलें, तेथें मात्र त्याच्या बेसुमार खाण्यापिण्यानें त्याचा लवकरच शेवट लागला. रुधिराभिसरणाचा शोध लावणारे सुप्रसिद्ध डॉक्टर **हार्वे** ह्यांनीं त्याचें शव तपासून पाहिलें, आणि त्याची हकीकत लिहून ठेविली, कीं **पार**नें दीडशें वर्षेपर्यंत उत्तम प्रकारचें आरोग्य संपादन केलें होतें. **थॉमस पार**च्या मरणानंतर सुमारें पसतीस वर्षांनीं **यॉर्कशर** (इंग्लंद) येथें राहणारा, **हेन्रीजेवकिन्स,** नांवाचा मनुष्य १६९ वर्षांचा होऊन मरण पावला. तो १५०१ त जन्मून १६७० त मेला. ह्याचें वय अगदीं सप्रमाण रीतीनें गणलें आहे, आणि तें अर्वाचीन कालांत सर्वांत मोठें आहे. **कॉर्नवाल**चा (इंग्लंद) **जॉन एर्फिगहाम्** हा १४० वर्षांचा होऊन परलोकीं गेला. **जेम्स लॉरेन्स** १४० वर्षेपर्यंत जिवंत होता. १७९४ च्या सुमारास **जोसेफ् सरिंगटन्,** नांवाचा गृहस्थ **बर्गेन** (नॉर्वे) येथें, १६० वर्षांचा होऊन मेला. इ. स. १७७२ त **द्रेकनबर्ग**

नामें एक मनुष्य, **डेनमार्क** येथें आपल्या वयाच्या १४७ व्या वर्षी स्वर्गस्थ झाला. १२ व्या **पोप लिओनें, इटा**लींतील **लेक् थ्रासिमेन**जवळ राहणाऱ्या एका गरीब मनुष्याला त्याच्या उतारवयामुळें पेन्शन् करून दिलें होतें; हा गृहस्थ त्या वेळीं १२९ वर्षांचा होता. तो पुढें पांच वर्षांनीं ह्मणजे १३० वे वर्षीं मरण पावला. १८३० त एक मनुष्य **सेन्टपीटर्सबर्ग** येथें १३० वर्षांचा होऊन मेला. एक प्रसिद्ध ग्रंथकर्ता ह्मणतो कीं, "**क्युबा**बेटांत राहणाऱ्या एका १२० वर्षांच्या मनुष्याविषयीं मला माहिती होती; त्याच्या अंगांत इतकी ताकत होती कीं, तो एका दिवसांत अश्वारोहण करून ६० मैलांची मजल मारी, आणि दुसरे दिवशीं घरीं परत येत असे. आतां आपण **अमेरिके**कडे वळूं.

इ. सन १८२० त **हेन्री फ्रान्सिस्को** नांवाचा एक मनुष्य **न्यूयॉर्क** संस्थानांतील **व्हाईट हॉल** येथें १३४ वर्षांचा होऊन मेला. त्यानें राणी **आने**च्या पट्टाभिषेकसमारंभाचे वेळीं मंगलवाद्य वाजविलें होतें, आणि त्या समयीं तो सारा सोळा वर्षांचा होता. तो आपल्या वार्धक्यानें मेला नाहीं, तर त्याच्या मरणास फक्त हिंवतापाचें कारण झालें. **एलिझाबेथ** राणीच्या पदरीं एक दाक्तर **मीड**नामें राजवैद्य होता, त्यानें १४८ वर्षांची मजल गांठून, स्वर्गलोकीं प्रयाण केलें. **जॉन हाईट ओव्हर** हा, **मेरेंगो** परगण्यांत, **आलभामा**जवळ राहत असून, इ. स. १८४५ च्या जानेवारी महिन्यांत मृत्युलोक सोडून गेला. त्या वेळीं तो १२६ वर्षांचा होता. **मेरिल्यांड**चा **विल्यम् प्रिंग्दे**न १३४५ त १२३ वर्षांचा होऊन मरण पावला. आणखी एक, **ग्रेनव्हिले** (नॉर्थ क्यारोलिना) जवळ राहणारा मि. **ब्लेकवेल्** ह्मा नांवाचा मनुष्य पुरीं १३५ वर्षें लोटल्यावर नंतर थोडक्याच कालानें मरण पावला.

अलीकडे नुकतीच 'धारवाडवृत्त' नांवाच्या वर्तमानपत्रांत एका दीर्घायुषी मनुष्याची हकीकत प्रसिद्ध झाली आहे. ती येणेंप्रमाणेः—

"बांदा जिल्ह्यांतील राजापूर गांवीं एक वृद्ध ब्राह्मण ११६ वर्षांचा आहे. त्याच्या डोळ्यांनीं कमी दिसतें, याची चालही कमीच असते, कानांनींही कमीच ऐकतां येतें, तोंडांत दांत फक्त एक आहे; परंतु आश्चर्याची गोष्ट ही कीं, अशा वृद्धावस्थेतही तो सहा महिने देशपर्यटन

करून द्रव्यार्जन करितो, आणि सहा महिने आपल्या घरीं असतो. त्याच्या दोन मुलांपैकीं वडील मुलगा वारला व लहान मुलाचें वय ७९ वर्षांचें आहे. व मेलेल्या वडील पुत्राचा एक मुलगा आहे, त्याचें वय ४९ वर्षांचें आहे."

असेंच सुबोधसिंधूवरून देशसेवकांत एक वृत्त घेतलें आहे. "निजामसरकारचे गुरु मोलवी तिस्किनशहा हे ता० २४ आगष्ट (१८९६) रोजीं मरण पावले. त्यांचें वय ११८ वर्षांचें होतें. सुमारें अर्ध्या हैदराबादचे लोक यांचे शिष्य होते. त्यांचें ९।१० वर्षांपूर्वी लग्न झालें असून त्यांना ७।८ वर्षांचा मुलगा झाला आहे." असो.

मुंबईतील प्रसिद्ध वैद्य वे. शा. सं. रा. रा. त्र्यंबकभट वैद्य हे आज विद्यमान असून ते आपला देहिक व्यवसाय स्वतः करतात इतकेंच नव्हे तर ते निरुद्योगी बसत नाहींत. ह्यांचें चरित्र बालबोध मासिकपुस्तकांत आलें आहेच. अलिकडे संन्यास घेण्याची त्यांची प्रवृत्ति होऊन त्यांनीं ता. २० नवंबर रोजीं सकाळीं संन्यास घेतला. ह्यांचा जन्म सन १८०२ मध्यें झाला. ह्मणजे आज त्यांस ९५ वर्षें आहेत.

आमचे आजेपणजे देखील शतायुषी–दीर्घायुषी–होते, आणि आमची आधुनिक विद्याधुरीण मंडळी पटापट अल्पवयांत–विशीतिशीच्या आंतबाहेरच–मृत्युमुखीं पडते. ह्यावरून प्रस्तुत मन्वंतरांतील आपली आयुष्यमर्यादा किती अल्प आहे बरें?

विद्युन्मानसशास्त्र.

व्याख्यान अकरावें.

विषय—शिष्यशाखेस गुप्त मंत्रोपदेश.

सभ्य गृहस्थहो,

सांप्रतकालीं जितक्या ह्मणून औषधोपचारपद्धति चालू आहेत, त्या सर्वांपेक्षां 'विद्युदुपचारपद्धति'च श्रेष्ठ आहे, असें मीं माझ्या पूर्वीच्या व्याख्यानांत प्रतिपादन केलें आहे. ह्याचें कारण, प्रत्येक पद्धतींत असणारा उत्कृष्टपणा तिच्या मध्यें अंतर्भूत होतो हें एक; आणि शिवाय, तिच्यांतील सुगमोपाय, वैद्यशास्त्रानेंही

अद्याप प्रचारांत आणलेले नाहींत. जे कोणी, 'विद्युन्मानसशास्त्रा'कडे यत्किंचित् तरी लक्ष पुरवितील, त्यांस, माझ्या विषयाच्या ह्या अद्भुत गुणावरून, व ही पद्धति आरोग्यदात्री असल्यामुळें, ती अत्यंत श्रेष्ठ आहे इतकेंच नव्हे, तर मनुष्यजातीस अत्युपयोगी व अत्यावश्य आहे असें आढळून येईल. आणि ह्मणूनच निदान, प्रचारांत असून हटकून रोग व दुःख यांचा परिहार करीत आहे, तावत्कालपर्यंत तरी, ती सर्व लोकांस पूज्य होईल. त्यांत वैद्यलोकांस तर विशेषच. ही येवढी विद्या अवघे ४० रुपये दिले ह्मणजे साध्य होते. आणि अभ्यासानें तर पुढें तिचें मोल हजारों पटीनें वाढतें. शिवाय, औषधोपचारांनीं जेथें हात टेंकलेले असतात, अशा शेंकडों मनुष्यांचे प्राण वांचविल्यानें मनास आनंद होतो तो वेगळाच. ह्या शास्त्रांत नीट गति होण्याला, प्रत्येक दिवशीं दोन तास याप्रमाणें सुमारें पांच दिवस अभ्यास केला ह्मणजे बस्स आहे. तूर्त मीं **न्यूयार्क** शहरामध्येंच ठाणें दिलें असल्यामुळें, जे कोणी **सदाचारसंपन्न** गृहस्थ शिक्षण घेण्याविषयीं मला बोलवितील, त्या सर्वांना शिकविण्यास मी तयार आहें. कोणी गृहस्थ परठिकाणीं राहणारा असून, माझा खर्च भागविण्यापुरता वर्ग काढून, मला **न्यूयार्क**च्या पत्त्यावर पत्र पाठवील, तर मी त्या ठिकाणीं जाऊन एक आठवडापर्यंत मुक्काम करीन. आणि तितक्या अवधींत मी त्यास ह्या शास्त्राची गुप्त माहिती—गुरुमंत्र—सांगेन इतकेंच नव्हे, तर संध्याकाळच्या वेळीं पांच दिवस पांच व्याख्यानें देऊन चमत्कारिक चमत्कारिक प्रयोगही करून दाखवीन. त्या वेळीं जमणाऱ्या प्रेक्षकमंडळीकडून फी घेतल्यास, अशा वर्गाला नफा सुद्धां होण्याचा संभव आहे. अशी युक्ति पुष्कळ लोकांनीं करून पाहिलेली आहे, व ती त्यांना साध्यही पण झालेली आहे.

इतका उल्लेख करण्याचें कारण हेंच कीं, ह्या शास्त्राचीं तत्त्वें काय, त्यांची लेखी किंवा तोंडी सुद्धां मजकडून माहिती न घेतलेले असे शेंकडों अडाणी मनुष्य, ह्या शास्त्रावर व्याख्यान देण्याला—नव्हे शिकविण्याला सुद्धां उद्युक्त झाले आहेत. हे लोक उपदेश देण्याचा मोठाच आव घालतात, आणि तो देखील पंचवीस रुपयांपासून तों आठ आण्यांपर्यंत जें काय हातीं पडेल, तेवढ्या किमतीला! पण मला वाटतें ह्यापेक्षां ते आपल्या विद्वत्तेची किंमत एक पै किंवा कवडी ठेवण्याचा परिपाठ ठेवतील तर, त्यांच्या गुरुदक्षणेचें मोल अधिक बरोबर होईल! माझ्या हाताखालीं पढलेले जे माझे पट्टशिष्य आहेत, ते चाळीस रुपये घेतल्याशिवाय कधींही कोणास शिकवून ह्या शास्त्राची किंमत कमी करणार नाहींत,

अशाबद्दल लेखी नियमानेंच बद्ध झालेले असतात. ह्मणून जे खरे गुरु व अब्रूदार मनुष्य आहेत, ते लेखबद्ध नियमांस अनुसरून गुरुदक्षणा घेणें ती ठरींव घेतात. परंतु आपल्या नियमास हरताळ लावणारे, किंवा ज्यांस ह्या शास्त्राचें मर्म कळलें नाहीं, असे लोक ह्याचा अगदीं चिवडा करून सोडतात. ह्मावरून त्यांची योग्यता कशी काय असेल, हें सर्वांच्या ध्यानांत येईलच.

ह्या ठिकाणीं मला हें एक सांगून ठेवणें अवश्य आहे कीं, कित्येक लोक **'विद्युत्स्वरूपशास्त्र'** तें हेंच, असें ह्मणून त्याच्या शोधकतेविषयीं वाद घालतात. परंतु मी सांगून ठेवतों कीं, **'विद्युन्मानसशास्त्रा'**चा **'विद्युत्स्वरूपशास्त्रा'**शीं अर्थाअर्थीं सुद्धां कांहीं संबंध नाहीं. हें एक निखालस स्वतंत्र शास्त्र आहे. ह्मणून त्या गोष्टीचें यथास्थित खंडन करणें मला भाग आहे. **विद्युत्स्वरूपशास्त्र**वेत्त्यांच्या मुख्य मुख्य व्याख्यानांच्या ठिकाणीं मीं जाऊन पाहिलें आहे. आणि त्यांच्या प्रयोगाच्या कृति, कारणें, उपपत्ति इत्यादिकांचा सारा संबंध लक्ष्यांत घेतला आहे. त्याचा इत्थंभूत इतिहास मला अवगत आहे, आणि **'विद्युत्स्वरूपशास्त्रा'**लाच प्रथम **'विद्युन्मानसशास्त्र'** असें कां ह्मणत होते, त्याचा उलगडा करण्यासाठीं तो विषय लौकरच हातीं घेऊन माझी बाजू मला राखली पाहिजे. आणि ह्या शास्त्राचा मनोरमपणा, वर्चस्व, हीं उघड करून न्याय व कर्तव्य बजाविलें पाहिजे. तथापि ओघ येईपर्यंत, त्या सर्व विचारांस माझ्या हृदयांतच पडून राहणें भाग आहे. तूर्त मी इतकेंच सांगतों कीं, **'विद्युन्मानसशास्त्र'** हें हयात आहे. व **'विद्युत्स्वरूपशास्त्रा'**चा मागमूसही राहिलेला नाहीं. तेव्हां पहिल्यानें दुसऱ्यापासून कांहीं घेतलेंच असलें, तरी त्यास हक्क सांगावयास कांहीं मार्ग नाहीं हें उघड आहे. आणि जरी तो असता, तरी 'माझ्या नांवांतील विद्युत् येवढीं अक्षरें मात्र घेतलीं आहेत' येवढेंच त्यास ह्मणतां आलें असतें, ह्यापेक्षां अधिक कांहीं नाहीं.

मीं पूर्वी सांगितलेंच आहे कीं, कितीएक व्यक्ति देशावर व्याख्यानें देत फिरत आहेत. आणि चार किंवा आठ रुपये, तेवढेही मिळण्यासारखे नसतील तेथें रुपया आठ आणे घेऊन सुद्धां हें शास्त्र शिकविण्याचें ढोंग करीत आहेत. हे लोक इतके ज्ञानशून्य असतात कीं त्यांस मनुष्यदेहाची माहिती नसते; ज्या व्याधीनें लोक ग्रस्त झालेले असतात, त्या व्याधीची माहिती नसते; इतकेंच नव्हे, तर कोणत्याही शास्त्रांतील साधारण तत्त्वें सुद्धां त्यांस माहीत नसतात. असे लोक कदाचित् डोळे झांकावेत कसे, हातपाय नीटनेटके ठेवावेत कसे, किंवा

हालवावेत कसे, आणि मनावर मानसिक ग्रह उत्पन्न कसा करावा, हें तुह्मांस सांगू शकतील. पण एखाद्या मनुष्याला, किंवा लोकोपयोगी वैद्याला, रोगावरचा शास्त्रोक्त उपाय त्यांस कसा सांगतां येईल ? साधारण व्यवहार जाणणाऱ्या मनुष्याच्या बुद्धां ही गोष्ट ध्यानांत येण्यासारखी आहे कीं, कोणत्याही शास्त्राचें सामान्य ज्ञान तरी असल्याशिवाय ही गोष्ट अशक्य आहे. अशा चुटपुट्या लोकांनीं 'विद्युन्मानसशास्त्र' हें अनर्थोत्पादक मात्र करून ठेवलें आहे. आणि कित्येक ठिकाणीं त्याबद्दल फिर्यादीपर्यंतही मजल येऊन ठेपलेली आहे.

ह्या सर्व प्रकारावरून मला असें वाटतें कीं, मानसिक व शारीरिक ग्रह उत्पन्न करून एखाद्या मनुष्याला वश कसें करून घ्यावें, ह्या गुप्तविद्येचा परिस्फोट करून अशा अज्ञान लोकांच्या पुंडाईचा बीमोड करून टाकावा, हेंच प्रशस्त. आतां हें सारें बोलूनच भागेल, असें मात्र मला मानतां उपयोगनाहीं. तर, प्रतिपादन केल्याप्रमाणें अनुभव, मनुष्यास गुण—ह्मणजे प्रत्यक्ष प्रयोग—आणि त्यापासून रोगाचा परिहार हीं करून दाखविलीं पाहिजेत. तथापि सत्यास अनुसरून माझ्यानें जितकी फोड होण्यासारखी आहे, तितकी मी करीन. आणि येवढें खचित सांगतों कीं, सांप्रतकालीं खंडोगणती वक्ते आपल्या शिष्यशाखेला जितकें ह्मणून कांहीं सांगतात, त्यापेक्षां मी पुष्कळ पटीनें अधिक सांगेन. ह्या शास्त्रावर पुढें येणाऱ्या दोषारोपांचा प्रतिकार करणें जर माझ्या हातांत असेल, तर तो दोष न येऊं देण्याविषयीं मीं संकल्प केलेला आहे. ह्मणून जे कोणी ह्या शास्त्राचा अभ्यास करूं इच्छितात, प्रतिपादन करूं इच्छितात, लोकांस शिक्षण देऊं इच्छितात, त्यांना जसें मी सांगणार तसेंच, यच्चयावत् सर्व लोकांसही आपआपल्या ज्ञातिबांधवांवर कसकसे प्रयोग करावेत ह्याविषयीं खुलासेवार सांगण्यास सुरुवात करतों. आणि त्याची समाप्तीही होतां होईल तितकी, लौकरच करीन. जें सांगण्याला निदान दहा तास तरी पाहिजेत, तें कांहीं केलें तरी, अर्ध्या अर्ध्या तासांच्या दोन व्याख्यानांत संपूर्ण येणें अशक्यच आहे. तथापि त्यांतील सारा गोषवारा मी आणीन, आणि तो देखील साधारण शिक्षक आपल्या शिष्यांना जितका सांगतात त्याहून पुष्कळ अधिक.

प्रथमतः मी हें एक सांगून ठेवतों कीं, मनुष्यदेहाचे जे निरनिराळे भाग आहेत, त्या प्रत्येकामध्यें परमेश्वरानें होतां होईल तों सरळपणा ठेवून दिला आहे. मीं माझ्या सहाव्या व्याख्यानामध्यें सांगितलेंच आहे कीं, शरीराचा प्रत्येक अ-

वयव फक्त एकेक कार्य करतो. डोळा पहातो; कान ऐकतो; नाकपुड्या वास घेतात; जिव्हा रुचि घेते. हृदय नियमित रक्ताभिसरण करितें; हात हालतात; पाय चालतात; यकृत् आपलें पित्त संरक्षण करतें; आणि पक्वाशय किंवा जठराग्नि आपलें अन्न पचवितो. डोळा कधीं ऐकत नाहीं, आणि कान कधीं पहात नाहीं. ह्यावरून हें उघड आहे कीं, बाह्यसृष्टीपासून होणाऱ्या ग्रहाची मनास वर्दी देणारा ज्ञानतंतु, किंवा ज्ञानतंतुसमुच्चय एकच असला पाहिजे. ही गोष्ट अगदीं खरी आहे. कारण, मनाला एकाच वेळीं एकच कल्पना ग्रहण करतां येते. मनामध्यें नेहमीं हलक्या सलक्या कल्पना किती झटपट येतात ? पण त्या एकामागून एक येत असतात. एकाच वेळीं दोन कल्पना करणें, मनाच्यानें होत नाहीं. एक झाल्यावर मग दुसरी. मेंदूमध्यें जर लक्षावधि ज्ञानतंतु असते, आणि तारआफिसाप्रमाणें प्रत्येक कल्पनेची वर्दी देण्यास निरनिराळा—स्वतंत्र—ज्ञानतंतु असता, तर लक्षावधि कल्पनेप्रमाणेंच लक्षावधि ज्ञानतंतुही एकसमयावच्छेदेंकरून तेथें पोंचले असते. पण ते एकसमयावच्छेदेंकरून येत नाहींत. एकामागून एक असे येतात हें आपण जाणतों. दोन वक्ते एकदम आमच्या समोर उभे राहून दोन निरनिराळे विषय एकदम प्रतिपादन करूं लागले, तर त्यांच्या कल्पना मनात भरतील अशा रीतीनें त्यांच्याकडे आपणांस लक्ष्य पुरवितां येत नाहीं. अशा प्रसंगीं एकाकडे लक्ष्य देऊन दुसऱ्याकडे दुर्लक्ष करावें लागतें. खरोखर, मनाला कल्पनांची वर्दी एकामागून एक जाते ही गोष्ट अगदीं निःसंशय आहे, हें, एकच वक्ता जर आपलें व्याख्यान अतिशय जलद देऊं लागला तर, ऐकणाराची कशी धांदल उडते, त्याचा विचार मनांत आणला ह्मणजे कळून येईल.

मन हें सजीव व साकार असल्यामुळें, त्यास लिंगरूप—सूक्ष्म—मेंदू व लिंगरूप—सूक्ष्म—अवयव असतात. आणि त्याच्यापासून वृद्धिगत झालेला जो शारीरिक मेंदू, त्याशीं संबंध ठेवणारे किंवा वर्दी पोंचविणारे जे दृश्य अवयव, त्यांस त्याच्याकडून हुकूम मिळतो. बीजांतील सूक्ष्म जीवांपासून—लिंगरूप देहापासून—जसा झाडाचा आकार दृग्गोचर होतो, तसा शारीरिक मेंदू हा मनाच्या लिंगरूप किंवा सूक्ष्म मेंदूपासून उत्पन्न होतो. ज्ञानतंतूच्या किंवा ज्ञानतंतुसमुच्चयाच्या द्वारें, अमुक अमुक भाग हालवावेत ह्मणून मनास वर्दी पोंचते; मनाकडून शरीरास पोंचते. मेंदूचे—आणि खरोखर साऱ्या देहाचे सुद्धां—अवयव दुहेरी दुहेरी आहेत. आणि त्यांचें ज्ञानही पण तसेंच दुहेरी दुहेरी आहे. मेंदूला गोलार्ध दोन; डोळे दोन; कान दोन; रुचि उत्पन्न करणाऱ्या लालाग्रंथी दोन

आणि वास घेण्यास नाकपुड्याही दोन. आह्मांला हात दोन; पाय दोन; हृदयाला खालचीं पुडें दोन, आणि वरचीं पुडेंही पण दोन. सूक्ष्मदेहाचीं किंवा लिंगदेहाचीं इंद्रियेंही अशींच दुहेरी दुहेरी आहेत. त्यांची स्थापना, मस्तकाच्या खालच्या भागामध्यें केलेली असून, तींच आपल्या शाखा डोळ्याकडे, कानाकडे, आणि जिव्हेकडे पाठवितात. मेंदूच्या दोन्ही गोलार्धांत पसरतात; पृष्ठरज्जूंत शिरतात; आणि त्यांतूनच पुढें तीं, आपआपल्या शाखा, हाताकडे व त्यांच्या खालच्या अवयवांकडे—अर्थात शरीराच्या कोणत्या पाहिजे त्या भागाकडे पाठवितात. ह्यावरून इच्छाचैतन्य हें मूळ मनामध्यें उद्भवून तें सूक्ष्मदेहाच्या अवयवांपर्यंत येतें. आणि तेथून तें, ज्ञानतंतूच्या द्वारें, मन ज्या शरीराच्या भागावर हालचाल करावयास हुकूम फर्मावतें, त्या भागापर्यंत जातें. ह्यावरून सूक्ष्मदेहाचीं इंद्रियें हींच आह्मां मनुष्यांचीं किंवा जीवांचीं तादात्म्यता करणारीं साधनें आहेत. त्यांच्याच योगानें बाह्यसृष्टींतील सर्व निरनिराळ्या पदार्थांशीं आह्मी एकरूप होतों. तीं जरी स्थूलदेहाच्या मेंदूंतील इतर साऱ्या अवयवांप्रमाणेंच, ज्ञानतंतुसमुच्चयांनींच बनलेलीं आहेत तरी, मला एक समाधानाची गोष्ट वाटते कीं, त्यांच्यामध्यें तादात्म्यता करणारा मूळ ज्ञानतंतु एकच आहे. त्यास मानसिकग्रहानें जागृत करतां येतें, किंवा चैतन्य उत्पन्न होतें ह्मटलें तरी चालेल. आणि तो आपल्या प्रकृतिस्वभावाप्रमाणें त्या इंद्रियांत असणाऱ्या सर्व ज्ञानतंतुसमुच्चयांना चेतना देतो. आणि त्यामुळें चैतन्यचालक मन शरीराच्या ज्या ज्या भागावर हुकूम फर्मावतें, त्या त्या इच्छित भागास चेतना प्राप्त होते.

वरील गोष्ट व्यक्त होण्यासाठीं कल्पना करूं या कीं, आपण एक खडा उचलून तो मानससरोवरांत टाकला. ह्मणजे तो ज्या ठिकाणीं पडेल, तेथचें पाणी बाजूस सरून त्या जागीं एक वर्तुळ उत्पन्न होतें. त्या वर्तुळापासून दुसरें, दुसऱ्यापासून तिसरें ह्याप्रमाणें क्रमाक्रमानेंच उत्पन्न होऊन त्यांची क्रिया अगदीं संपेपर्यंत व तीं वर्तुळें अगदीं बारीक बारीक होऊन डोळ्यांनीं दिसेनातशीं होईपर्यंत हें चालतें. आतां नुसत्या डोळ्यांनीं ह्यापेक्षां अधिक क्रिया दिसत नाहीं तरी, त्या पाण्याच्या मध्यापासून तों तहत दूरदूरच्या किनाऱ्यापर्यंत सुद्धां पाण्याच्या प्रत्येक परमाणूची हालचाल होते, इतकेंच नव्हे, तर तो खडा आपल्या स्वभावधर्माप्रमाणें ज्या सरोवरांत पडेल, त्यांतील पाण्याचा प्रत्येक परमाणु हालवून सोडील. मग तें पाणी कितीही खोल असो! ह्याचें कारण उघड आहे. तें असें

कीं, सरोवर जितकें विस्तृत आहे, त्याच्या अर्ध्या आकारायेवढी प्रचंड शिळा घेऊन ती जर त्यांत फेंकून दिली, तर पाण्याची मोठीच खळबळ होऊन प्रत्येक परमाणु हाललेला आपल्या नेत्रांस स्पष्ट दिसेल. ह्याच तत्त्वावर एका खड्याचा आणि वाढूच्या एका रजःकणाचा सुद्धां—हाच परिणाम होईल. भेद इतकाच कीं, त्याचें प्रमाण फार लहान असेल. अशाच प्रकारें सूक्ष्मदेहाच्या अवयवांतील मध्यज्ञानतंतूला (असें आपण त्यास नांव दिलें तर) मानसिकग्रहानें चैतन्य उत्पन्न होतें. आणि ती चेतनाशक्ति, आपल्या स्वभावधर्माप्रमाणें, मन ज्या भागावर हुकूम फर्मावतें, त्या शरीराच्या प्रत्येक भागाची हालचाल करतें. मनुष्यदेहाच्या भागाभागामध्यें, आत्म्याच्या नानाप्रकारच्या धर्मामध्यें, आणि एका प्राण्यामध्यें व दुसऱ्या प्राण्यामध्यें जे परिणाम उत्पन्न होतात, ज्यांस आह्मी मनोविकार असें ह्मणतों, त्याच्या उत्पत्तीचें खरें कारण हेंच नव्हे काय ? जिच्या गुप्ततेबद्दल ग्रंथच्या ग्रंथ लिहिले गेले आहेत, त्या प्राण्याच्या तादात्म्यतेचें खरें कारण हेंच नव्हे काय ? मनाच्या, प्राणाच्या, आत्म्याच्या, जीवाच्या, किंवा परलोकामध्यें मनुष्याचा अमर होऊन राहणारा जो अंश—किंवा त्याला जें कांहीं तुह्मी आपल्या इच्छेप्रमाणें नांव द्याल—त्याच्या साऱ्या गुणधर्मांचें एकीकरण ह्या सूक्ष्म अवयवांत झालेलें असतें. मनुष्याच्या मेंदूंतील दृश्य अवयव हे फक्त "इलार्ज" केलेल्या—वाढविलेल्या फोटोसारखे आहेत. ह्मणजे तें सचेतन मनाच्या सूक्ष्म अवयवांचें वाढलेलें स्वरूप आहे. हे अवयव, मृत्तिकागृहांत वस्तीस आलेला जो बिऱ्हाडकरू त्यास, तो येथें असेपर्यंत, त्याच्या सोयीप्रमाणें राहण्याजोग्या खोल्या करून देतात.

इतक्या वेळपर्यंत, ज्यांमध्यें गोड आणि आनंदायक अशी प्रकृतिसाम्याची माहिती भरलेली आहे, असे मनोरंजक मुद्दे आपणांपुढें स्पष्ट रीतीनें मांडले. आतां प्राणिमात्राला विद्युच्छक्तीनें व मानसिकशक्तीनें आपण वश कसें करून घ्यावें, याची माहिती सांगतों. ह्या विषयाच्या अंगीं आजाऱ्यांस आणि दुःखितांस बरें करण्याचें सामर्थ्य असल्यामुळें, तो अतिशय उपयोगाचा आहे. आणि ह्मणून प्रत्येक कोमल अंतःकरणाचें तो इतकें रंजन करील कीं, त्यामुळें तीं अगदीं तन्मय होऊन जातील. मनुष्याला वश करणें, ह्मणजेच बरें करणें होय. हा प्रयोग एखाद्या मनुष्यावर करणें, त्याच्या मनाला व स्नायूंना पूर्णपणें ताब्यांत घेणें, तर प्रथमतः ज्याच्यावर प्रयोग करावयाचा, त्याच्यावर–मनोविकार जागृत

होईल अशा तऱ्हेचा–कांहीं प्रयोग करून तो मनुष्य आपणाशीं ऋणस्थितींत उभा राहील असें केलें पाहिजे. कित्येक लोक मूळचेच ह्या स्थितींत असतात. ते ह्याच स्थितींत जन्मलेले असतात; ह्याच स्थितींत राहिलेले असतात; आणि तींतच ते मरणारे असतात. दुसरे कितीएक लोक ह्या स्थितींत नसतात. त्यांस वश करण्यापूर्वी ह्या स्थितींत आणावें लागतें. प्रयोग करणारा मनुष्य तुमच्याशीं–प्रयोग करणाऱ्याशीं–ऋणस्थितींत उभा आहे किंवा नाहीं, हें ताडून पहाण्यासाठीं मीं ज्याला 'प्रवाहसाम्य' असें नांव दिलें आहे, तो चालू केला पाहिजे. हा प्रवाह शास्त्रीय पद्धतीनेंच दोहों जीवांतून एकसारखा चालू करतां येतो. मग तो परिणाम दृश्यपदार्थांच्या संयोगाचा असो, दुसऱ्या कशाचा असो, दोन साधनांचा असो, विजेच्या धन व ऋण शक्तीचा असो, किंवा त्याच जातीच्या ज्ञानतंतूचा अगर ज्ञानतंतुसमुच्चयाचा असो, (जे आमच्या प्राणधर्मांचें किंवा व्यक्तितादात्म्याचें दृश्य स्वरूप आहेत) त्याबद्दल मी काळजी करीत नाहीं.

'विद्युन्मानस' प्रवाह सुरू करण्याची अत्यंत सोपी, खात्रीची, व सरळ रीत दाखवून देण्यापूर्वी, प्रथमतः मी साधारण प्रवाह उत्पन्न होण्याच्या उत्पत्तीविषयीं बोलतों. धन व ऋण ह्या दोन विजांच्या दोन शक्तींपासूनच ही सर्व सृष्टि तयार झाली आहे, हें तर उघड आहे. ह्या दोन शक्तींनाच मीं माझ्या सातव्या व्याख्यानांत **पुरुषविद्युत्** व **स्त्रीविद्युत्** असें म्हटलें आहे. ह्या दोन शक्ति, कमजास्त प्रमाणानें, सृष्टींतील यच्चयावत् पदार्थांत असतात येवढेंच नव्हे, तर त्या अखंड रीतीनें त्यांतून निघून **विद्युन्मंडलांत** जात असतात. तसेंच, मनुष्य हा ब्रह्मांडाचाच एक अंश असल्यामुळें, तो श्वासोच्छ्वास करतांना, पाणी पितांना, अन्न खातांना, हवेंत असणाऱ्या विजेचा बराच अंश नेहमीं आपल्या शरीरांत घेत असतो. आणि मानसिक व शारीरिक क्रियेनें, व साधारण जीवनधर्मानें, ज्ञानतंतूंच्या द्वारें एकसारखा त्यास तो बाहेर टाकीत असतो. हा अंश, त्याच्या शरीरांतून निघून भोंवतालच्या तत्त्वांतून जाऊं लागला म्हणजे, त्या मनुष्याभोंवतीं त्याचें एक **विद्युन्मंडळ** किंवा **चुंबकमंडळ** तयार होतें. आतां हें मंडळ केवढें मोठें असतें, हें अद्याप आह्मांस समजलेलें नाहीं. तरी त्यामुळें, दोन प्राणी–मनुष्य–जेव्हां कांहीं विविक्षित मर्यादेच्या आंत येतात, तेव्हां त्यांचीं मंडळें एकमेकांस भेटतात, आणि त्यांची परिधरेषा एकमेकांस स्पर्श करते. त्या दोन मनुष्यांपैकीं, एक मनुष्य **'विद्युन्मानस'** स्थितींत असला, तर धनशक्तीच्या आणि

ऋणशक्तीच्या द्वारानें त्यांचा प्रवाह सुरू होईल. हा प्रवाह व्यक्तिसंयोगानें सुरू झाला नाहीं, तर तो आमची आत्मैक्यता व तादात्म्यता करणाऱ्या ज्ञानतंतूंच्या योगानें सुरू होतो. ह्या रीतीनें प्रवाह सुरू होण्याला अतिशय कोमल मनाचीं मनुष्यें लागतात. अशा स्थितीचा मनुष्य पंचवीसांत सारा एक असतो. ह्याकरितां मी हजारों मनुष्यांच्या समोर जाऊन उभा राहतों, आणि मी काय करणार तें त्यांस सांगतों. असें कीं, त्यांचें सर्व लक्ष्य मजकडेच लागून राहील. नंतर त्यांना घट्ट डोळे मिटण्यास सांगून म्हणतों कीं **"आतां तुह्मांला तुमचे डोळे उघडतां यावयाचे नाहींत."** असें केलें म्हणजे हजारोंपैकीं चाळीसास डोळे उघडतां येत नाहींत. आणि हें सर्व कृत्य सभेंत पाऊल ठेवल्यापासून अवघें पांच मिनिटांच्या आंतच होतें.

तथापि येवढें खचित आहे कीं, व्यक्तितादात्म्य करणाऱ्या सूक्ष्मदेहावयवाच्या ज्ञानतंतूच्या शक्तिद्वारें, प्रयोग करणारा व प्रयोग करून घेणाऱ्यामध्यें प्रवाह सुरू होईपर्यंत हा प्रयोग साध्य व्हावयाचा नाहीं, किंवा त्यावर अंमलही बसावयाचा नाहीं. पण ज्या अर्थी ह्या अवयवांच्या मध्यतंतूचें किंवा चैतन्य ज्ञानतंतूचें, शरीराच्या सर्व इच्छित ज्ञानतंतूंशीं साम्य आहे, व ज्या अर्थी ते परस्परांवर परस्पर अंमल करतात, त्या अर्थी तुह्मांला–प्रयोग करणाराला–विशेषेंकरून जे मनुष्य अत्यंत कोमल अंतःकरणाचे व मनावर त्वरित ठसा उमटण्यासारखे असतील, त्यांजवर, ज्या भागांत इच्छित ज्ञानतंतु बसविलेले असतात, त्या शरीराच्या भागास स्पर्श करून मानसिक प्रवाह सुरू करतां येईल. पण चांगला प्रवाह सुरू करण्याची अगदीं प्रचारांतील चाल झटली म्हणजे, प्रेक्षकांनीं प्रयोगांस साधारणपणें योग्य होईल, अशा निवडून काढलेल्या मनुष्याचा हात–आपण "शेकह्यांड" हस्तावलंब केल्याप्रमाणें–धरणें ही होय. आपला आंगठा **'प्रधान'** धमनीवर बऱ्याच जोरानें दाबावा. ह्या धमनीच्या शाखा करांगुली व अनामिकेपर्यंत आलेल्या असतात. हा दाब, बोटांच्या पेरांच्या वर सुमारें एक इंचावर असावा. मात्र तो अनामिकेच्या सरळ रेषेंत असला पाहिजे. ह्या धमनीवर आंगठ्याची पोटरी दाबून ती थोडीशी तिरपी ठेवावी, अशी कीं, तेणेंकरून ह्या चैतन्योत्पादक व ज्ञानोत्पादक ज्ञानतंतूच्या शाखा तींत आच्छादून जातील. हा दाब घट्ट तर असावा; पण तो, प्रयोग करून घेणारास वेदना लागतील, किंवा तसें धरणें असह्य होईल, असा असूं नये. अशा प्रकारें हात धरला म्हणजे, प्रथम त्यास

आपणाकडे सारखी नजर लावावयास सांगावें. नजर अशी असावी कीं, आपल्या मुद्रेवरच्या मनोविकाराची प्रत्येक हालचाल तींत नमुद व्हावी. ही नजर, आणि हाताच्या ज्ञानतंतूवरील दाब, हीं अर्धा मिनिटपर्यंत किंवा थोडीं अधिक वेळ तशींच असूं द्यावींत. नंतर त्यास आपले डोळे झांकावयास सांगावेत. आणि आपलीं बोटें (मंत्र घालून विंचू उतरतात त्याप्रमाणें) कितीएक वेळां हळूच त्याच्या पापण्यांवरून खालीं उतरावींत. आपल्या हाताचीं बोटें अशीं मिटलेलीं असावींत, कीं जणों काय तीं एकत्र घट्ट आंवळलेलींच आहेत. हा प्रयोग चालू असतांना सर्वकाल ह्याचे डोळे खास झांकणार असा मनाचा निश्चय असावा. तो इतका कीं, तो निश्चय—तो विश्वास—तुमच्या मुद्रेंत आणि चालचलणुकींत सुद्धां स्पष्ट दृष्टोत्पत्तीस यावा. इतकें झालें म्हणजे, आपला हात त्याच्या टाळवेवर ठेवावा, आणि आंगठा सूक्ष्मदेहाच्या अवयवावर कांहींसा खालीं धरून घट्ट दाबावा, आणि दुसऱ्या आंगठ्यानें प्रधान ज्ञानतंतु तसाच दाबून धरून त्याला सांगावें कीं " तुला तुझे डोळे आतां उघडतां यावयाचे नाहींत !" हें मात्र ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, आपली ढब, आपली वृत्ति, आपली मुद्रा, आपलें चलनवलन, आपलें भाषण, हीं सारीं अतिशय निःसंशयाच्या लक्षणांनीं युक्त असलीं पाहिजेत. त्यास डोळे उघडतां येत असले, तर पुन्हा दोन तीन वेळ तसाच प्रयोग करावा. कारण, शारीरिक असोत कीं मानसिक असोत, ग्रह हे पुनरावृत्तीनें अधिक बळकट होतात. इतकेंही करून त्याचे डोळे न मिटतील, किंवा कोणत्याही प्रकारचा प्रयोग त्याजवर लागू न पडेल तर, अधिक खटपट करूं नये. कारण, मग आपणांस स्पष्ट कळून येतें कीं, त्याचें मन व शरीर—जीं मानसाकर्षणास अनुकूल असणारीं—तीं दोन्हीही आपणाशीं धनस्थितींत राहिलेलीं आहेत.

तथापि हा प्रवाह सुरू करण्याची दुसरी एक रीत मीं शोधून काढलेली आहे. ती आतां सांगितल्यापेक्षां पुष्कळ पटीनें चांगली आहे, इतकेंच नव्हे, तर दुसऱ्या कोणत्याही रीतीपेक्षां ही उत्तम आहे. ही प्रयोग करून घेणारास, त्याच्या ज्ञानतंतूंत आपल्या इष्ट हेतूप्रमाणें बदल होईपर्यंत मानसिक स्थितींत ठेवते. हा प्रयोग मध्यज्ञानतंतूच्या योगानें करावयाचा असतो. हा ज्ञानतंतु मिश्र असून त्याच्या अंगीं चेतनाशक्ति व ज्ञानशक्ति हीं दोन्हीही आहेत. हा तंतु तळहाताच्या वरच्या बाजूस जेथें मणगटाचा सांधा असतो, तेथें असतो. ह्या ज्ञानतंतूच्या द्वारें प्रवाह चालू करणें असेल तर, प्रयोग करून घेणाराचा हात उताणा

धरावा. आणि आपल्या आंगठ्याची पोटरी त्याच्या तळहाताच्या मध्यभागीं त्याच्या आंगठ्याच्या मुळाशीं ठेवावी. आणि मग साधारण पण घट्ट जोर द्यावा. ह्मणजे मानसाकर्षणाचा अद्भुत प्रभाव प्रगट होऊन आत्मसाम्य झाल्याचें दिसून येईल. हा ज्ञानतंतु इच्छाचैतन्य आणि ज्ञान ह्यांचा असल्यामुळें, तो मागच्या मेंदूच्या ताम्यांतला असून त्याचें स्थानही तेथेंच असतें. आतां हें खरें आहे कीं, ह्याला पृष्ठरज्जूपुढें थेट पाठवितां येत नाहीं. तथापि पुढच्या मेंदूंतील त्याचें मूळ त्याला सांपडावयाला फारसें कठीण पडत नाहीं. कारण, सर्व अनिच्छित शक्तींचा अवयव जसा मागचा मेंदू आहे, तसाच सर्व इच्छित शक्तींचा अवयव पुढचा मेंदू आहे. ह्या रीतीनें पाहिजे तिकडे विद्युत्प्रवाह सुरू होतो, आणि होण्यासारखीं असतील तीं सर्व कार्यें होतात. मग तो मनुष्य वश होण्याला कठीण असो, कीं तो अतिशय नाजूक व मनोविकार ग्रहण करणारा असो. दोघांवरही प्रयोग लागू होतोच. प्रवाह सुरू करणें तो, तुह्मी संयोगावांचून करा, कीं शरीराच्या कोणत्याही एखाद्या भागास स्पर्श करून करा, त्याबद्दल मी काळजी करीत नाहीं. तरी अखेरीस परिपूर्ण प्रवाह सुरू होणें तो, जो सूक्ष्म देहाच्या अवयवापासून बातमी आणणारा मुख्य बातमीदार; ज्या अवयवाच्या द्वारें सर्व कल्पना आणि विकार बाह्य जगापासून मनापर्यंत पाठविले जातात; ज्याच्या द्वारें मनाच्या इच्छेनें कोणताही अवयव शरीराच्या निरनिराळ्या भागांवर पाठविला जातो, त्या मध्यज्ञानतंतूच्या द्वारेंच होतो. हस्तज्ञानतंतूवर दाब देऊन जरी प्रवाह सुरू केला तरी सुद्धां, तो मध्यज्ञानतंतूच्याच योगानें सुरू होतो. आणि त्याच्याकडून प्रत्यक्षतः सुरू होतो, तो तर निखालस परिपूर्णच होतो. दृक्, श्रोतृ, स्पर्श आणि रस, ज्ञानतंतु ह्या, ज्याच्याकडून विकार किंवा कल्पना सूक्ष्म शरीरावयवाच्या द्वारें मनापर्यंत पाठविल्या जातात, त्या प्रधानतंतूच्याच शाखा आहेत ह्याबद्दल मला तर संशय वाटत नाहीं. ही माहिती ज्यांना मीं सांगितली आहे, त्यांनीं कृपा करून तिचें स्मरण ठेवावें. आपणांस, आणि इतर सर्वांसही माझी अशी सूचना आहे कीं, ह्या शक्तीचे प्रयोग करावयाचे ते, मध्यज्ञानतंतूच्या द्वारेंच करावेत, ह्मणजे परिपूर्ण होतात. ह्याच्याच द्वारें विद्युत्प्रवाह मेंदूकडे जाऊन शरीर विद्युयुक्त होतें.

हें तर मी जाणून आहें कीं, तुह्मी स्वतः त्यांत अनुभव घेतल्यावांचून हें ज्ञानतंतूचें स्थान तुह्मांस सांपडणें बरेंच जड जाईल. वरच्या रीतीनें प्रयोग करणाराचे डोळे झांकेपर्यंत तुमचा अंमल बसला, ह्मणजे मग तुह्मी त्याला त्याचा

हात त्याच्या मस्तकावर, किंवा तुह्मांस वाटेल तेथें ठेववायास सांगा आणि ह्मणा– "आतां तुला तो काढतां यावयाचा नाहीं!" हें साधलें, ह्मणजे त्याला बसावयाला सांगा. आणि ह्मणा–"आतां तुला उठतां येणार नाहीं!" हें सिद्धीस गेलें ह्मणजे त्याला हात हालवावयास सांगा. आणि ह्मणा कीं "तुला तो हात आतां थांबवितां यावयाचा नाहीं!" हेंही काम उत्तम वठलें, ह्मणजे त्यास जमिनीवर चालावयास लावा. आणि सांगा–"आतां तुला चालणें बंद करतां येणार नाहीं!" अशा प्रकारें हा प्रयोग तुह्मांस वाटेल तेथपर्यंत चालवितां येईल. ह्याप्रमाणें तुमचा त्यावर पूर्णपणें अंमल बसेपर्यंत तुमच्या युक्तीप्रमाणें त्याच्या स्नायूंची हालचाल करवून, शरीराचा कोणताही इच्छित भाग उचलून किंवा हालवून प्रयोगानुभव चालू ठेवतां येईल. हें साध्य झालें ह्मणजे सोयीसाठीं आपण त्यास, तो विद्युत्स्थितीमध्यें आहे असें ह्मणूं.

ह्यापुढें कदाचित् तुह्मांस प्रयोग करतां येणार नाहीं, व तो कसा करावा ह्याची परीक्षा पाहिल्यावांचून समजणार नाहीं. ह्याकरितां पुढें फक्त मनाचाच हुकूम करून मनोविकार कसे होतात तें पहाण्यासाठीं मानसिक प्रयोग सुरू ठेवावा. तो जर पूर्ण स्थितींत असेल तर, त्याला तुह्मी वेताची छडी दाखवून हा जिवंत साप किंवा वांब आहे असें सांगावें. टोपी हा नक्र आहे; हातरुमाल हा पक्षी, मूल किंवा ससा आहे; किंवा प्रेक्षकांपैकीं कोणावर चंद्र किंवा तारा पतन पावला; कोठें आग लागली; इत्यादि सांगून ती विज्ञविण्याविषयीं त्यास जलदी करावी. अथवा तो एखादी नदी पहातो आहे, तींत नौकेंत मनुष्यांची गर्दीचगर्दी उडून गेली आहे असें त्यास भासवावें. किंवा एखादें एंजिन पेटत आहे; धुराचा लोट सुटत आहे; आगबोट झपाट्यानें चालली आहे; तींत त्याचा बाप, आई, भाऊ किंवा बहीण, बायको, मूल आहे असें सांगावें. तुह्मी त्याच्यापुढें एक प्रेत आहे असा भास करून त्याच्या शेजारीं त्यास बसवावें, आणि त्याला ममतेनें व दुःखानें रडावयास लावावें. किंवा अकस्मात् त्याला तुह्मी एक मुलगा किंवा मुलगी दाखवा आणि सांगा कीं, हा तुह्मा मेलेला बाप किंवा आई तुह्मापुढें उभी आहे. आणि लावा त्याला घट्ट मिठी मारावयाला! तुह्मांला त्याच्या जीवित्वाचा सुद्धां बदल करतां येईल. त्याला सांगा कीं, 'तूं एक दोन किंवा तीन वर्षांचें पोर आहेस.' आणि भंग लावा त्याला खेळ खेळावयाला व पोरचेष्टा करावयाला! अथवा, तूं एक जख्खड ह्यातारा आहेस; किंवा बायको आहेस; किंवा शिद्दी आहेस; किंवा एखादा मोठा जहागिरदार आहेस; किंवा

योद्धा आहेस असें सांगा. तसेंच तुझांला, पाण्याची चव भिन्न आहे असें सांगून, त्यास मद्याची, सरबताची, मधाची, अथवा इच्या त्या पातळ पदार्थाची चव आणतां येईल. अशा प्रकारें तुझांस त्याच्या ऐकण्यांत, वास घेण्यांत, पहाण्यांत, किंवा भासण्यांतही पाहिजे तसा फेरफार करतां येईल. अशा प्रकारच्या मनोविकाराचा, किंवा दुसऱ्याही हजार प्रकारचा ठसा त्याच्या मनावर पसरून तादात्म्यतेचा अंमल बसला, झणजे आपण आपल्या सोयीकरतां तो मानसिक स्थितींमध्यें आहे असें झणूं.

ह्या प्रमाणें स्वाभाविक रीत्याच जे लोक विद्युन्मानस स्थितींत असतात, त्यांच्या वर्गाच्या संबंधानें मीं पुष्कळच सांगितलें. आणि शारीरिक रीतीनें व मानसिक रीतीनें त्यांच्यावर पूर्ण अंमल कसा बसवावा, त्याचीही नीट फोड करून दिली. युनाइस्टेट्समध्यें राहणाऱ्या लोकांत, स्वाभाविक मानसिक स्थितींत असणारांची संख्या, सरासरीच्या मानानें पंचविसांत एक आहे. अशा लोकांना वतनदार रोगांनीं कितीही ग्रासलेलें असलें तरी, आतांच मीं सांगितलेल्या साध्या प्रयोगानें, किंवा तशाच तऱ्हेच्या दुसऱ्या रीतीनें बरें करतां येतें. इतकेंच नव्हे, तर अशा लोकांवर यत्किंचित्ही दुःख झाल्याशिवाय शस्त्रक्रिया सुद्धां करतां येते. आणि ती देखील ते लोक निखालस जाग्रतावस्थेमध्यें असतां, व सर्व विचारशक्ति परिपूर्ण असतां ! आतां, पंचविसांमध्यें एक स्वभावधर्माप्रमाणेंच जर ह्या परिपूर्ण स्थितींत असतो, तर अंशतः त्या स्थितींत असलेला कदाचित् बारांमध्यें सुद्धां एक आढळेल. आणि त्यावरही थोड्या बहुत प्रमाणानें हा प्रयोग लागू पडेल. आणखी ह्या सर्वांमध्यें, ज्यांच्यावर कोणताही प्रयोग लागू होत नाहीं, असे लोक, दुसऱ्या कांहीं प्रयोगानें वश करून सामील करतां येतील, तर केवढें मोठें कार्य होईल हें आपणांस कळतेंच. खरोखर असें झालें तर, मनुष्यानें एक अप्रतिम दिग्विजय संपादन केला असें होईल. त्याच्या योगानें रोगांवर व दुःखावर झेंडा फडकून मनुष्यजात दीर्घायु होऊन राहील.

(पुढें चालू.)

PRINTED and published by Janardan Mahadeo Gurjar AT JAVAJI DADAJI'S "NIRNAYA-SAGARA" PRESS, Bombay.

आर्यधर्माभिमानी लोकांकरितां सचित्र हिंदु घड्याळें.



हिंदु घड्याळें कशीं आहेत, दिसण्यांत सुंदर, खिशांत हलकीं, मजबूत, टिकाऊ, अंगचे चावीचीं, तबकडी मिन्याची पांढरी असून त्यावर रीतीप्रमाणें रोमन आंकडे असून ठळक मराठी आंकडेही आहेत आणि प्रत्येक आंकड्यामध्यें हिंदुपूज्य देवतांचीं सुंदर चित्रें आहेत. श्रीगणपति, सरस्वती, रामदासस्वामी, हनुमंत, रामसीता, लक्ष्मीनारायण, गरुड, अष्टभुजादेवी, विठ्ठलरखुमाई, शंकरपार्वती, अक्कलकोटस्वामी, श्रीगुरुदत्तात्रय, आणि मध्यभागीं, महाराष्ट्रास जिवंत करणारे गोब्राह्मणप्रतिपालक **श्रीशिवाजीछत्रपतिमहाराज** यांचें सुबक चित्र आहे. अशीं हीं अपूर्व हिंदु घड्याळें आमचे देशबांधव व भगिनी काय ह्मणून न घेतील!

हिंदु सिलेंडर पिक्क नी. सी. वॉच किं. रु. १० ग्या. वर्ष १
हिंदु लिव्हर प्रीव्हेन्स नी. सी. वॉच किं. रु. १५ ग्यारन्टी वर्षें २
हिंदु रासकोप सिस्टीम नी. सी. वॉच किं. रु. १७ ग्या. वर्षें ३
हिंदु प्रिव्हेलन्स चांदीचें वॉच किं. रु. २५ ते ३० ग्या. वर्षें ४
हिंदु सोन्याचें वॉच किं. रु. १०० ते १२५ ग्या. वर्षें ४
हिंदु सचित्र आर्मी वॉचेस किं. रु. १० ते १२५ पर्यंत.

हिंदु सचित्र टाईमपीसेस साधें, अलार्म, स्विंग, जपींगई. आंकड्यांमध्यें देवतांचीं चित्रें, मध्यभागीं दरबारी व अश्वारूढ श्रीशिवाजी, आणि श्रीशंकरपार्वतीसह. किं. रु. ४-६-१० ते ३० पर्यंत. [११

जी० बी० नाईक आणि कंपनी. गिलासिसरोड, नाका भायखळा, मुंबई.

धि इंडियन म्यारेज ॲण्ड डेथ बेनिफिट फंड लिमिटेड, मुंबई.

डिरेक्टर्स.

रावसाहेब दलपतराम प्राणजीवन खक्कर जे. पी.

बद्रुद्दिन अब्दुल्ला कूर एस्क्वायर जे. पी.

रुसतम बी. पेमास्तर एस्क्वायर बी. ए. एल् एल्. बी.

धनजीशा फ्रामजी चिनाय एस्क्वायर.

विष्णु नारायण परुळकर एस्क्वायर (एक्स आफिशिओ.)

मध्यम स्थितींतील मनुष्यांस आपल्या मुलांमुलींच्या लग्नाचे वेळीं व आपल्या मरणानंतर आपल्या वारसाकरितां पैशाचा संग्रह करून ठेवितां यावा ह्मणून हा फंड १८९४ मध्यें स्थापन झाला आहे. इतक्या अवधींत ३००० पेक्षां जास्त मेंबर झाले असून सरासरी १५० मेंबरांस फायदा मिळाला आहे. लग्नफंडाची वर्गणी दर महिन्यास १। पासून ६। रु. पर्यंत आहे.

मरण-फंडाची वर्गणी फक्त १ रुपया आहे.

व या मरणफंडांतील मेंबरांच्या पश्चात् त्यांच्या वारसास २००० रुपयेपर्यंतची रक्कम फायद्यादाखल मिळेल. जास्त माहिती खालील पत्त्यावर एक आण्याचें तिकिट पाठविल्यानें मिळेल. [१०–१२

आफीस–५
कावसजी पटेल स्ट्रीट,
फोर्ट, मुंबई.

परुळकर ॲण्ड कं०
एजंट्स.

प्रभाकर–रोजचें वर्तमानपत्र.

१८३९ त सुरू झालेलें. गेल्या दसऱ्यापासून व्यवस्थित रीतीनें व वक्तशीर प्रसिद्ध होतें. वर्षाची वर्गणी ट. ह. सह ९॥ रुपये.

मुकुंद बाळकृष्ण गुर्जर, बी. ए. म्यानेजर, गिरगांव—मुंबई.

व्यापारी व ग्राहक ह्यांकरितां.
हरएक प्रकारचा माल मुंबईत मिळणारा वक्तशीर वाहेरच्या लोकांस मिळण्याची सोय.

D. K. SANDU
RAMWADI, BOMBAY.

दत्तात्रेय कृष्ण सांडू ह्यांचें हरएक प्रकारचा माल मिळणारें, आणि माफक अडत घेऊन माल रवाना होणारें दुकानः—

रामवाडी, मुंबई.

वा. कृ. सांडू. दुकानदार—रामवाडी, मुंबई.

यांचा कदाचित् गुण नच आल्यास पैसे परत देऊंच.

मंत्रसिद्ध ताईत व दोरे.

हिमालयावरील एका महान् तपस्वी (सिद्ध) पुरुषानें आमच्या निःसीम भक्तीस तुष्ट होऊन आपला अत्यंत उपयोगी असा जो पिशाचबाधा व दुसरे अनेक विकार दूर होणारा अद्भुत मंत्र तो ताईत व दोरे मंत्रून देण्यास शिकविला आहे. व त्या योगानें खालील विकार फार त्वरित बरे होतात. पिशाचादि पीडेनें मुलें, स्त्रिया किंवा पुरुष झोंपेंत अगर जाग्रतावस्थेंत धावरतात, कंप सुटतो, वेड लागतें, दांतओंठ चावतात, दचकून उठतात, व कधीं ज्वरादि विकार उत्पन्न होतात आणि कित्येक प्रसंगीं अपस्मार, भ्रम वगैरे अत्यंत वाईट रोग उत्पन्न होतात. कित्येक स्त्रियांस पिशाचादि पीडेनें संतती होत नसते व झालीच तर वांचत नसते. कित्येकांस स्वप्नामध्यें स्त्रीचा भास होऊन धातुपात होतो; कित्येक स्त्रीपुरुषांमध्यें व कित्येक मित्रांमध्यें वैमनस्यें उत्पन्न होतात, इत्यादि अनेक विकार या आमच्या अद्भुत मंत्रसिद्ध ताईत व दोरे यांनीं फार त्वरित खात्रीनें बरे होतात. गुणाबद्दल हजारों सर्टिफिकिटा मिळाल्या व मिळत आहेत. थोड्याच काळांत याचे अपूर्व गुण या देशाच्या आसमंतात् भागीं ब्रह्मदेश, सिलोन, बनारस, पंजाब, मद्रास, मुंबई, कानडा, इत्यादि ठिकाणीं अतिशय पसरले आहेत. सबब जास्त वर्णन करीत नाहीं. सिद्धमंत्र खोटे ह्मणणारांनीं एकवार अनुभव घेऊन पहावा, ह्मणजे ते नेहमींच ग्राहक बनतील. पुरुषांचे विकारांस दोरा, किं० ८ आणे. स्त्रियांचे विकारांस ताईत १ रु०; रुप्याचा २ रु०; सोन्याचा ६; कित्येक रोगांस दोन वस्तू घ्याव्या लागतील. दोन वस्तू घेणारास ४ आणे, टपालखर्च माफ. एकवार अनुभवानेंच पूर्ण खात्री होईल. माहितीखर्डा सोबत पाठविला जाईल. व्ही. पी.नें. पाठवूं. पत्ता स्पष्ट व पूर्ण लिहावा.

विष्णुबोवा सिद्धमांत्रिक.

पत्ता—पोष्ट हर्णै, जिल्हा रत्नागिरी.

केरळकोकिळच्या वर्गणीदारांस मात्र किं. रु. ३ ट. ख. ८६.

मनुस्मृति मराठी भाषांतरसहित.

किं. रु. ५ ट. ख. ८६.

हा आर्यधर्माचा मुख्य व अतिप्राचीन ग्रंथ असल्यामुळें प्रत्येक हिंदूला पूज्य व संग्रह करणें फार अगत्याचें होय. त्यांत मराठी भाषांतराच्या योगानें तो सर्वांस समजण्यास सुलभ झाला आहे. ह्यांत ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यास हे आश्रम, व धर्म, संकीर्ण जाती व त्यांचे धर्म, राजकीय विचार, दायविभागादि न्याय, दिवाणी फौजदारी प्राचीन कायदे, प्रायश्चित्त इत्यादि विषय फार सुलभ रीतीनें कथन केले आहेत. सोनेरी सुरेख बांधणी. ठिकठिकाणीं सर्वटीकाधारानें टीपा दिल्या आहेत.

केरळकोकिळाच्या वर्गणीदारांस रु. १८१४ ट. ख. ८४.

वैद्यकशार्ङ्गधरसंहिता.

नवीन मराठी भाषांतरसहित.

पृष्ठसंख्या–५२७–किं. रु. २॥ ट. ख. ।·

" अर्वाचीन सर्व ग्रंथांमध्यें शार्ङ्गधरसंहिता अत्युत्तम होय. ह्यामध्यें सर्व विषयांची व्यवस्था जशी अनुक्रमानें लावलेली आहे तशी दुसऱ्या कोणत्याही ग्रंथांत केलेली आढळत नाहीं. ह्या ग्रंथांत जे प्रयोग लिहिले आहेत ते सारे अनुभव घेऊन त्यांचें यथार्थ गुणवर्णन केलें आहे. ह्यांत इतर ग्रंथांप्रमाणें औषधांची अतिशयोक्ति नाहीं. अशा प्रकारचा सर्वोत्तम लोकप्रिय ग्रंथ असून त्याच्या प्राकृत भाषांतरामध्यें–प्राकृत टीकाकाराचे स्वतः असोत किंवा लेखकाचे असोत जे प्रमाद झालेले आहेत त्यांची दुरुस्ती छापणारांनीं आजपर्यंत केलेली नाहीं. कित्येकांनीं तर कांहीं बाहेरचा ग्रंथच ह्यांत घुसडून दिला आहे. हे सर्व घोंटाळे काढून करवेल तितकें शुद्ध व सरळ भाषांतर केलें असून विषयानुक्रमणिकेशिवाय आजपर्यंत न झालेली रोगानुक्रमणिका दिली आहे. त्यामुळें कोणत्या रोगावर काय औषध हें झटकन् पाहिजे त्यास समजतें. प्रसिद्ध प्रसिद्ध अशा वैद्यांच्या सूचनेप्रमाणें ह्यांत शक्य ती सुधारणा केली आहे. व्ही. पे.नें पाठवूं.

जनार्दन महादेव गुर्जर, रामवाडी–मुंबई.

डिसेंबर. (वर्षाची वर्गणी १४३ ट. खर्चासह. फुटकळ अंकास ८४.) १८९६.



ह्या पुस्तकांतील लेख कोची (मलबार) येथें तयार होऊन,
ते मुंबई येथें छापून प्रसिद्ध होतात.

विषयांची अनुक्रमणिका.

	पृष्ठ.		पृष्ठ.
कोळी.	२६५	विद्युन्मानसशास्त्र, व्याख्यान अकरावें.	२७६

सूचना.

१. सिंहावलोकनानंतर अंक बांधावे.

२. मुंबईत आज तीन चार महिने महामृत्यूनें **नरयज्ञ** चालविला आहे!! रोज दोनशें नरांची आहुति चालली आहे असें सरकारी सरासरी गुडघ्याभर पाण्याच्या प्रमाणानें दिसतें! त्या यज्ञांतील प्रखरतर ज्वालांच्या भयंकर तापामुळें सर्व लोक दशदिशा पळत आहेत! त्यामुळें व्यापार, लहानमोठे धंदे, नियमित कार्यें, ह्यांची फारच अव्यवस्था होत आहे. ह्या अपरिहार्य अडचणीमुळें कोकिळाच्या नियमितपणांत अंतर पडण्याचा संभव आहे; तसें अंतर पडलें तरी आश्रयदात्यांनीं काळजी करूं नये. प्रतिमहिन्याचें स्वरूप–अनियमितपणानें कां होईना–प्रकट होण्यास अंतर होणार नाहींच नाहीं, हें ह्या वेळीं सांगणें विहित दिसतें.

दुष्काळ–मलाही पण खराच दुष्काळ!

मेघराजांनीं एक महिना अवकृपा केल्यामुळें साऱ्या भरतखंडास त्राहि त्राहि झालें आहे. आश्रयदात्यांची वर्षच्या वर्षे अवकृपा झाल्यामुळें माझ्यासारख्या पाखराची काय दशा व्हावी किंवा झाली असेल हें सद्हृदय आश्रयदात्यांस सांगितलें पाहिजे असें नाहीं. दुष्काळनिवारणार्थ सार्वभौम सरकारास सर्व लोक आपआपल्यापरी विनवीत आहेत. म्यां कोकिळानें आश्रयदात्यांविना कोणास विनवावें! जानेवारींत मागील सर्व बाकी पाठविण्याची कृपा करावी. ती न आली तर फेब्रुवारीचा सर्व अंक, कोणाकडे किती बाकी आहे हें नांवनिशीवार दाखविण्यांत भरून काढावा लागेल. अशा दुःसह प्रकारचें अवलंबन करण्यास माझे श्रीमंत सरकार आश्रयदाते लावणार नाहींत, ही आशा ईश्वर पूर्ण करो.

आपला नम्र, **केरळकोकिळ.**

दुकान—जनार्दन महादेव गुर्जर, रामवाडी, मुंबई.

॥ ओं नमः श्रीरामचंद्राय ॥

आर्यमहौषधालय मु० आंजलें.

या अत्यंत खात्रीच्या औषधाचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यांस कदाचित् आला नाहीं तर पैसे परत देऊंच व त्याशिवाय त्यांच्या आरोग्यार्थ एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकटच देऊं.

मदनविलासामृतसंजीविनी.

वीर्यस्तंभक, रक्तशोधक, अत्यंत कामोत्तेजक, चित्तोत्साहक, बुद्धि-कांतिवर्धक व धातुपौष्टिक सुवर्णमाक्षिक मौक्तिक कस्तूरीमिश्र अपूर्व गुटिका.

१. शरीराची उत्तम सुधारणा करणारीं अत्यंत महत्वाचीं जीं औषधें आहेत, त्यांत या गुटिका अगदीं पहिल्या प्रतीच्या ठरल्यामुळें यांचे अपूर्व गुण थोड्याच काळांत या देशाच्या सर्वभागीं व त्यांच्या आसमंतात् अतिशय पसरले आहेत. या सेवन केल्यानें नपुंसकत्व, इंद्रियशिथिलता, कडकी, जीर्णज्वर, अग्निमांद्य, अशक्तता, स्वप्नजन्य किंवा इतर धातुपात, छातींतील रोग, मेंदूचे विकार, पांडुरोग, क्षय, मूत्रसंकोच किंवा मूत्रातिरेक, कटिशूल, वातरोग, उपदंशसंबंधी मुरलेले विकार, हात, पाय, मूत्रमार्ग, व शरीर यांचा दाह, व अरुचि, इ० अनेक विकार कितीही वयाच्या मनुष्यास नवीन किंवा जुनाट असले तरी खात्रीनें बरे होतात. धातु व रक्त यांची शुद्धि व वृद्धि होऊन रक्तदूषणजन्य अनेक रोग हटकून बरे होतात. वीर्यस्तंभन, व कामोद्दीपन होऊन अग्नि व शक्ति भरपूर वाढते. स्त्रियांची धुपणी व संततीस अपायकारक जे गर्भाशयस्थ रोग त्यांचें त्वरित निवारण होऊन कांति, स्मरणशक्ति व बुद्धि वाढते. ज्यांस शारीरिक व मानसिक श्रम फार पडतात, त्या सर्वांच्या आंगीं यांनीं अतिशय शक्ति येऊन मनास उत्साह प्राप्त होतो, सुस्ती जाते. ज्यांस दूध व जडान्न पचत नाहीं त्यांस तें भरपूर पचूं लागतें, कोष्ठशुद्धि होते. या अप्रतिम गुटिका अत्यंत शोधानें केल्या असून त्यांच्या अप्रतिम गुणका-

रित्वाबद्दल हजारों सर्टिफिकिटें मिळालीं व नित्य मिळत आहेत. यांत अपायकारक पदार्थ बिलकूल नाहींत. वरील सर्व रोग जाऊन उत्तम गुण प्राप्त होण्यास या गुटिकांसारखें अप्रतिम औषधच नाहीं असें पूर्ण अनुभवावरून स्पष्ट ह्मणतों. यांस पथ्यसेवनाची गरज नसतां या पाहिजे त्या दिवसांत घेतल्या तरी हटकून गुण करितात. यामुळें त्यांचा अतिशय खप सुरू आहे. गोळ्या रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम सहा रुपयांच्या किंवा त्यांहून कितीही जास्त गोळ्या घेणारांस बंगीचा सर्व टपालखर्च माफ आहे. त्यांचे आंत घेणारांस मात्र तो वेगळा सहा आणे पडेल. एकदम ३२ गोळ्यांस १ रु. ७० गोळ्यांस २ रु. १६० गोळ्यांस ४ रु. २६० गोळ्यांस ६ रु. ५२० गोळ्यांस १० रु.

थंडगार नेत्रांजन—हें अंजन स्तुतीस अत्यंत पात्र आहे, हें सतत दहा वर्षांच्या पूर्ण अनुभवानें कळवितों. यानें डोळ्यांचे साधारण विकार तर सहजच, परंतु दृष्टीचा समूळ नाश करणारे, तिमिरांध्य, वडस, बिंदु, फुलें, कांच, सारा, भोर, गळती, खुपऱ्या, जळजळ, कंड, फूट, चिकटा, ठणका व लाली इ० अनेक विकार, तत्संबंधी मस्तकशूलादि विकारांसह कितीही वयाच्या मनुष्यास कोणत्याही कारणांनीं प्राप्त झालेले नवीन किंवा जुनाट असले तरी नाजूक रीतीनें कोणतीही इजा न होतां बरे होतात. दृष्टि तीव्र व थंडगार राहते. हें चांगल्या दृष्टीच्या मनुष्यांनींही डोळ्यांत घातल्यास वरील विकार त्यांस बिलकूल होणार नाहींत. लहान मुलांस तर हें अत्यंत उपयोगी आहे. २ तो० ड० १॥ रुपया.

विशेष सूचना.—अलीकडे आंजलें व मुर्डी वगैरे गांवांतील औषधांच्या बऱ्याच जाहिराती सुरू आहेत व त्यांपैकीं कांहीं जाहिरातींत ज्या सह्या आहेत त्या बहुतेक आमच्याच नांवासारख्या भासण्याचा विशेष संभव आहे. तरी अशा लोकांशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं हें अवश्य लक्षांत ठेवून आमचीं औषधें **"कृष्णशास्त्री बिवलकर वैद्य. मु० आंजलें ता० दापोली जि० रत्नागिरी."** याच पत्त्यावर रोखीनें किंवा व्ही.पी.नें मागवावींत. अनुपानपत्रक सोबत असतेंच.

६–१२]

कोळी.

सूक्ष्मरीतीनें विचार करून पाहिलें असतां, वनस्पतिकोटीहून, जीवकोटी अपरंपार भरलेली आहे, असें आढळून येतें; व जीवकोटींत जे कांहीं भिन्न भिन्न प्रकार आहेत, त्या सर्वांत कीटकसृष्टि ही अनंत आहे. हींत किती सूक्ष्म प्राणी आहेत, व त्यांचीं रंगरूपें व गुणधर्म किती निराळे व आश्चर्यकारक असतात किंवा असतील, ह्याची कल्पना आह्मां मानवांस कोठून असणार? हरहमेशा आपल्या दृष्टीस पडणारी गुळाची ढेंप पाहिली कीं त्यांतील रसास्वाद ग्रहण करण्यास, तीवर जाऊन वसणारी, आपल्या कानाशीं घों घों शब्द करणारी, आणि धरावयास गेलें तर चट्कन उड्डन जाणारी, चपळ व चिमुकली जी माशी तिजविषयीं यत्किंचित् विचार तरी आपण मनांत आणतों काय? रात्रीं झोंप घेण्यासाठीं बिछान्यावर जाऊन पडलें असतां, आपल्या अंगास चुटचुट चा-

वणारा व आपल्या अंगांतील ताज्या रक्तबिंदूवर ताव मारणारा; व त्यामुळें आपला निद्राभंग करणारा जो ढेंकूण, त्याजविषयीं व त्याच्या गुणधर्मांविषयीं थोडीशी तरी कल्पना आपल्या डोक्यांत शिरते काय? जर आह्मी प्राणिधर्मज्ञानाविषयीं पराङ्मुख झालों तर ढेंकणास सोंड असते, पेंगूळ हा अगदीं क्षुल्लक प्राणी, पण तो नेत्रसंख्येंत सहस्र भगें पडलेल्या इंद्रावरही ताण करतो, वगैरे गोष्टी जर कोणीं आपणास सांगितल्या तर आपणास त्या खऱ्या तरी कशा वाटतील? मुळींच वाटणार नाहींत. पण त्या गोष्टी अक्षरशः खऱ्या आहेत. घराच्या खिडकीसमोर जाळें बांधून राहणारा, एक क्षुल्लक प्राणी कोळी, त्याचें धागे भराभर काढणारें अंतर्गत यंत्र कसें आहे, त्याचे धर्म कोणकोणते आहेत, त्याचा शोध आपण कधीं तरी करतों काय? ढेंकणासारखा रात्रीं निजल्यावेळीं त्रास देणारा, जो डांस त्याचीं चावण्याचीं व रक्त शोषून घेण्याचीं हत्यारें काय आहेत, ह्याची माहिती तरी आपणास असते काय? अगदींच नाहीं. डांसाला एक कर्वत, एक सांडस, अशा प्रकारचीं साधनें ईश्वरानें दिलीं आहेत; व कोळ्याला गिरणीसारखें यंत्र धागे भराभर काढण्यासाठीं दिलेलें असतें, ह्या गोष्टी आपणास खोट्या वाटतील. पण प्राणिशास्त्रवेत्त्यांच्या शोधांनीं ह्या गोष्टी अगदीं खऱ्या ठरून गेल्या आहेत. मिळून तात्पर्य काय कीं, अगदीं क्षुल्लक प्राणी जरी असले, तरी देखील त्यांच्यामध्यें कांहींना कांहीं तरी अद्भुतता असतेच. तशीच कोळ्याची बाह्य व अंतर्गत शारीरिक रचना, धागे काढण्याची तऱ्हा व त्याचें साधन, आणि त्याची बुद्धिमत्ता हीं फार विलक्षण असतात, असें त्याचीं जीं काय वर्णनें ग्रंथांतरीं दिलेलीं आहेत, त्यांवरून दिसून येईल. त्यांतीलच कांहीं कोळ्यांची माहिती फार विलक्षण वाटल्यावरून आज आह्मी कोळ्याचें वर्णन खालीं देत आहों.

विंचू, खेंकडे, कोळी वगैरे प्राणी एकाच वर्गांत घालतां येतात. ह्यांचा कीटकवर्गाहून एक निराळाच वर्ग काढला पाहिजे. ॲप्टेरा—पक्षहीन कीटक—ह्मणून एक किड्यांचा वर्ग आहे. **लीनीअस** नांवाच्या प्राणिशास्त्रवेत्त्यानें कोळी, विंचू, खेंकडे वगैरे प्राण्यांस त्याच वर्गांत लोटलें आहे. परंतु ह्यांची अंतर्गत रचना व गुणधर्म ह्यांचा विचार

१. ह्याला २५००० पंचवीस हजार डोळे आहेत.

करूं लागलें तर, त्यांना वरील कोटींतून वगळून, त्यांचा एक निराळाच वर्ग करावा लागेल; व ह्या निराळ्याच कोटींत जरी फारशा प्राण्यांचा समावेश होत नाहीं, तथापि त्यांची शरीररचना व त्यांचे धर्म ह्यांवरून त्यांची योग्यता प्राणिवर्गाहून तिळभरही कमी करतां येत नाहीं.

कीटक ह्मणून जे असतातं, त्यांच्या शरीराचे तीन भाग परमेश्वरानें केलेले असतात. परंतु वरील कोटींतील प्राण्यांच्या शरीराचे दोन भाग असतात. गोमा[1] वगैरे प्राण्यांच्या पुढची पायरी ह्मटली ह्मणजे मुंग्या, डोंगळे वगैरे कीटक होत; व त्याच्याही पुढील पायरी ह्मणजे विंचू, खेंकडे, कोळी वगैरे प्राण्यांची होय. कारण ह्यांच्या शरीराचे दोनच भाग झालेले दिसून येतात. एक धड व दुसरें डोकें. धडाला डोकें चिकटविल्याप्रमाणें असून, धड व डोकें ह्यांच्यामध्यें थोडीशी खोबण असते. ह्याशिवाय किडे व कोळी ह्यांमध्यें एक मोठा फरक दिसून येतो. तो हा कीं, किड्यांस सहा पाय असतात; उदाहरणार्थ भुंगा ह्यास सहा पाय असतात, ह्मणूनच ह्याला षट्पद असें नांव आहे. परंतु कोळ्याला त्यांहून दोन अधिक ह्मणजे आठ पाय असतात. झुरळ, गोगलगाय वगैरे इतर कीटकांना, त्यांस स्पर्शज्ञान होण्यासाठीं जशीं सृष्टिकर्त्यानें मिशा, शिंगें वगैरे स्वयंभू साधनें दिलीं आहेत, तशीं त्यास बिलकुल नाहींत. शिवाय सुरवंट, रेशमी किडे[2] वगैरे प्राण्यांचें जसें रूपांतर होतें, तसें ह्या कोटींतील प्राण्यांचें मुळींच होत नाहीं. तथापि कोळ्यासारख्या प्राण्यांचा कांत टाकण्यासारखा कांहींसा प्रकार असतो. ह्याशिवाय एक मोठा भेद असतो, तो असा. इतर किड्यांना–त्यांच्या एकेका डोळ्यांत दोन दोन तीन तीन असे कित्येकांचे पन्नासांपर्यंत देखील लेन्स असल्याकारणानें–संयुक्त नयन असतात. पण ह्याचा प्रकार त्यांहून अगदीं उलट असतो. ह्मणजे ह्यास स्वतंत्र–एकेरीच–डोळे असतात, असें ह्मणावयास हरकत नाहीं.

ह्याचें फुप्फुस पिशव्या मिळून बनलेलें असतें. त्यांतून ह्याची श्वासोच्छ्वासक्रिया चालते. ह्या पिशव्यांना घड्या घड्या पडलेल्या असतात; व त्यांची रचना अशी असते कीं, त्यांच्या बऱ्याच भागाला चांगली हवा लागावी. ह्या पिशव्यांस सूक्ष्म द्वारें असतात, त्यांतून हवेचा अं-

१. ह्या प्राण्यास पुष्कळ पाय असतात. ह्यास इंग्रजींत सेंटिपडी (Centipede)–शतपदी–असें ह्मणतात. २ रेशमी किड्याचें वर्णन केरळकोकिळ पु० ७ अं० २ मध्यें आलेलें आहे.

तर्भागीं प्रवेश होतो. कीटकांना जशा हवा घेण्यासाठीं हवेच्या नळ्या (air-pipe) असतात, त्यासारखींच हीं कोळ्याचीं फुप्फुसांतील पिशव्यांचीं द्वारें असतात. ह्याच्या स्नायूंची विलक्षण रचना पाहून देखील, विधात्यानें किड्यापेक्षां ह्याच्यामध्यें किती सुधारणा केलेली आहे, हें तेव्हांच दिसून येईल. किड्यांना निरनिराळ्या स्नायुग्रंथी असतात; व ह्याच कोटींतील प्राणी विंचू ह्याच्या शेंपटांतील स्नायुग्रंथी जरी फार निरनिराळ्या असतात, तरी मान व डोकें ह्यांच्या आसपास त्यांचा एक भला थोरला जुमडा असतो. परंतु कोळ्याची रचना मात्र ह्याहून जरा निराळी असते. ह्या सर्व स्नायुग्रंथी एकवटून कोळ्याच्या मस्तकांत ठाण धरून बसलेल्या असतात व ह्या मोठ्या ग्रंथींपासून ह्यांचे तंतु सर्व अंगभर खेळत असतात. हा ह्यांच्यामधला व इतर कीटकांमधला फरक झाला. आतां ह्याच्या गुणधर्माविषयीं सांगूं.

कोळी आणि विंचू हे लहान लहान प्राण्यांवर आपला उदरनिर्वाह चालवितात. परंतु ह्या दोहोंत कोळी हाच मोठा धूर्त दिसतो. कोळ्याला आपलें भक्ष्य मिळवितांना नानाप्रकारच्या युक्ति लढविणें फारसें जड जात नाहीं. कारण ईश्वरानें त्याला तसेंच बुद्धिकौशल्य दिलेलें असतें. ह्याविषयीं **जोन्स** नांवाचे एक विद्वान् प्रोफेसर येणेंप्रमाणें उल्लेख करतात, "कोळी हे किड्यांच्या जीवितावर गदा घालून, त्यांवर ते आपला उदरंभरणाचा व्यवसाय चालवितात. परंतु ह्यांची किडे मारण्याची रीत फार लोकविलक्षण असते. ह्यांची व ह्यांच्या भक्षजीवाची एकमेकांच्या त्वेषानें एकसारखी–निकराची–लढाई जुंपते. ह्यांत प्रतिपक्षापेक्षां कोळ्याला जास्त शक्ति असणें, आवश्यक आहे; व भक्षजीवापेक्षां त्यास बुद्धिमत्ता व चातुर्य ह्यांचेंही त्याहून अधिक आनुकूल्य पाहिजे, हेंही उघड आहे." कोळ्यांचें जाळें हें प्राणिमात्रांच्या ईश्वरदत्त बुद्धिकौशल्याची पूर्वीपासून साक्ष देत आहे. काय त्याची करामत! काय त्याचें चातुर्य! जाळ्याचें काम तरी किती सुबक व व्यवस्थेशीर! आणि शिकारीच्या वेळीं त्याची चपळाई तरी किती दिसून येते! व भक्ष तरी किती बेमालूमपणानें पकडतो! एकंदरींत धन्य त्या प्राण्याची! असो.

इंग्लंदांत एक प्रकारचे कोळी आहेत. ते हिंवाळ्यांत भूमितींतील आकृतींप्रमाणें रेखल्यासारखीं जाळीं विणतात. हीं जाळीं जिन्याच्या

कंगोऱ्याला किंवा झाडांच्या फांद्यांस जिकडेतिकडे लोंबकळत असतात. ह्या कोळ्यास तिकडील लोक **गार्डन स्पायडर**–बगीच्यांतील कोळी–असें ह्मणतात. हा शरीरानें बराच मोठा असून, तसाच सुंदरही पण असतो. कोळ्याचें जाळें दोन तऱ्हेच्या धाग्यांनीं विणलेलें असतें. ही गोष्ट अगदींच क्षुल्लक, पण किती आश्चर्य वाटण्यासारखी! ही गोष्ट फारच थोड्यांस माहित असेल! त्याच्या वर्तुलाकृति जाळ्याच्या केंद्रापासून त्रिज्यांप्रमाणें पसरत गेलेले, असे कांहीं धागे असतात, त्यांच्या अंगीं चिकटपणा नसतो. पण ह्या धाग्यांवरून कोळी फेऱ्या करून दुसऱ्या एकप्रकारच्या चिकट धाग्यांनीं तेच धागे सांधवून घेतो. इतकें झालें ह्मणजेच त्याचें खरें जाळें तयार झालें ह्मणावयाचें. आतां त्याचे पहिले धागे हे परंपरया घराच्या तुळया होत, व दुसरे धागे हे त्यांच्या भिंती होत. किंवा दुसऱ्या तऱ्हेनें ह्मणावयाचें असल्यास त्या जाळ्यांतील पहिले तंतु हे मानवदेहांतील हाडें होत; व दुसरे हे त्यांतील मांस, स्नायु वगैरे होत. हे दुसऱ्या तऱ्हेचे धागे किंवा तंतु, कोळी पहिल्यावर कसे चिकटवितो, हें समजलें ह्मणजे मनास मोठी मौज वाटेल. तो एकप्रकारच्या चिकट पदार्थाचे गोळे पहिल्या धाग्यांवर ठेवितो. ह्मणजे अर्थातच त्यांस दुसरे धागे चिकटतात. केव्हां केव्हां असें होतें कीं, आपण एखादी माशी कोळ्याच्या जाळ्यावर टाकली तर चिकटत नाहीं. ह्याचें कारण एवढेंच कीं, ती माशी त्या जाळ्याच्या पहिल्या तऱ्हेच्या धाग्यांवर पडते.

कोळ्याच्या पोटांत एक यंत्र असतें, त्या योगानें तो आपलें जाळें विणण्याकरितां धागे काढतो. हें यंत्र फारच आश्चर्यकारक असतें. ह्याचे दोन भाग आहेत. एक अंतर्भाग व दुसरा बहिर्भाग. पहिल्यांत ज्या चिकट पदार्थाचे धागे होतात, त्यांचा सांठा असतो. शिवाय हा चिकट पदार्थ दुसऱ्या भागांत नेतां यावा ह्मणून तेथें नळ्या असतात. दुसऱ्या भागांत स्त्रियांच्या स्तनाग्राप्रमाणें चार कुकडीं असून, त्यांस बा-



रीक कांटे असतात. प्रत्येक कुकड्याच्या भोंवतालीं असणाऱ्या कांट्यांची संख्या हजारांच्या जवळ जवळ असते! शिवाय त्यांना अति सूक्ष्म अशीं हजार हजार छिद्रें असतात; व ह्या प्रत्येक छिद्रांतून त्या चिकट पदार्थाचे बनलेले व ज्यांची नुसती कल्पना होणें देखील अशक्य इतके सूक्ष्म तंतु बाहेर पडतात. आणि हेच तंतु हवा लागून अगदीं बारीक रेशमासारखे होतात; व हे सर्व धागे कुकड्यापासून कांहीं अंतरावर एकत्र होऊन, त्यांचा एक भला मोठा धागा बनतो. साधारणतः लोकांचा समज असा झालेला असतो कीं, धागा मूळचा सारा एकच निघतो. परंतु वर सांगितल्याप्रमाणें तो चार हजार अति सूक्ष्मतंतूंचा एक दोरखंडच बनलेला असतो, असें ह्मणावयास हरकत नाहीं.

कोळ्यांना आपल्या रेशमी धाग्यांचे आणखी किती तरी उपयोग करतां येतात. कित्येकांना हे धागे हवेंत पसरतां येतात; व ते हवेपेक्षां हलके असल्यामुळें त्यांचें एक छोटेंसें विमान बनतें. आणि मग हे आमचे कोळीमहाराज मेघमंडलांतून मोठ्या उल्हासानें संचार करीत असतात. कित्येक कोळी आपलीं जाळीं दाट रेशमी धाग्यांनीं विणून काढतात. हीं कांहीं अंशीं रेशमी किड्याच्या कोसल्याप्रमाणें असतात. ह्यांचा उपयोग कोळी निराळाच करतात. ह्मणजे ते आपलीं अंडीं ठेवण्याकरितां, त्यांची पिशवी बनवितात. आतां ह्या पिशव्या रेशमी तंतूंच्याच करण्याचा उद्देश एवढा कीं, त्यांच्या योगानें अंड्यांस ऊबच्या ऊब मिळून, त्यांचें संरक्षणही होतें. कांहीं जातीचे कोळी ह्या पिशव्या आपल्या बरोबर बाळगितात, आणि कांहीं एखादें चांगलें सुरक्षित स्थळ पाहून तेथें ठेवितात.

अयोनियन, वेस्टइंडीज, फ्रान्सच्या दक्षिण भागांत, व कॉर्सिका बेटांत कोळ्याची एक जात आहे, ह्या कोळ्यास इंग्रजींत **ट्रॅपडोअर** (Trapdoor-spider)–कळीच्या दरवाज्याचा कोळी–असें ह्मणतात. ह्याचें घरटें पेल्यासारखें असून, त्यास एक वाटोळें दार असतें. त्याच्या खालची बाजू, एक थर मातीचा व एक रेशमाचा असे देऊन तयार केलेली असते. आणि दरवाजा त्या घरट्याला बिजागरीनें बसविलेला असतो. व ह्या घरट्याची आंतली बाजू अस्तर लावल्याप्रमाणें रेशमानें गुंफून टाकलेली असते. ज्या बाजूनें घरट्याला विशेष भीति पों-

चण्याचा संभव असतो, त्या बाजूनें विशेष कळाकुसरीनें, चातुर्यानें, व पूर्ण काळजीनें बंदोबस्त केलेला असतो. दरवाज्याविषयीं विशेष खबरदारी राखलेली आढळांत येते. ह्या दरवाज्याची जाडी ½ इंच असते; व ह्याचा व्यासही तितकाच असतो. त्यांत कोळ्याची मादी २० पासून ६० पर्यंत अंडीं घालते. तीं पिंवळसर असतात. घरट्याच्या बाहेरची बाजू कांहींशी कालवाच्या शिंपीच्या पाठीसारखी खरबरीत असते. बिजागरीच्या जागीं, ती भक्कम बनण्यासाठीं फारच खबरदारी घेतलेली असते. पण त्याच्या कड्या अगदीं पातळ असतात. ह्या बिजागरीची रुंदी निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळी आढळून येते. ती फार लवचिक असते. दार उघडल्यानंतर, तसेंच सोडलें तर आपोआप गच्च बसतें. जाळ्याच्या घड्या बिजागरीच्या दोंही टोंकांस जखडलेल्या असतात. त्यामुळें तें दार फक्त उमें करितां येतें; व तें सोडतांक्षणीं पटकर बंद होतें; व हें जास्त उघडण्याचा प्रयत्न केल्यास मोडल्या तोडल्याशिवाय कांहीं काम भागावयाचें नाहीं. दाराची आंतील बाजू मऊ असून, फारच मजबूत व सुरक्षित असते. दाराचा आकार कांहींसा उशीसारखा असून, तें नीटनेटकें बसावें व उघडतांना फारसे श्रम न पडतां निघावें, अशी योजना केलेली असते. ह्या घरट्यांचे आकार चहुंकडे एकाच तऱ्हेचे असतात, असा कांहीं नेम नाहीं. निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळे दिसून येतात. झांटी बेटांत एक घरट्याची विलक्षण तऱ्हा आढळते. त्याच्या दरवाज्यास बिजागरीजवळ ह्या प्राण्यानें आपल्या रेशमाचें बनविलेलें एक टोंक असतें. त्या टोंकावर थोडासा दाब देतांच तें दार पटकन् उघडतें. आतां एवढी मात्र त्यांत एक गोम असते कीं, त्यापासून कोळ्यास जितका उपयोग करून घेतां येईल, तितकाच त्याच्या शत्रूंसही करितां येईल. परंतु अनुभवांअंतीं असें आढळून आलें आहे कीं, साधारणतः कोळ्याला तें दार जितकें झटकन् उघडतां येतें, तितकें त्याच्या शत्रूंस यावयाचें नाहीं. कारण त्यांस त्या टोंकाचा उपयोग काय आहे, हें चटकन् कळून येत नाहीं. व कोळी प्रत्यक्ष आंत असला म्हणजे तो आपले पुढील पाय व आंकडे हे दरवाज्यांत खुपसून, तो दरवाजा घट्ट आंवळून धरतो. आणि ह्या युक्तीनें त्यास आपल्यापेक्षां बलवान् शत्रूचाही प्रतिकार करा-

वयास येतो. अनेक लोकांनीं ह्यांचीं घरटीं भुईतून काढून पाहिलीं असतां हे बोवाजी आपले पुढील पाय व आंकडे दरवाज्यांत रोंवून बसलेले आढळून आले आहेत. असे प्रयोग पुनःपुन्हा करितां करितां कित्येक कोळी अखेरीस अगदीं दमून जाऊन, त्यांनीं आंतून विणकाम करून दार इतकें गच्च बसवून टाकलें कीं, तें कांहीं केल्या उघडेना, अशा स्थितीपर्यंत ते येऊन पोंचतात असें कळून चुकलेलें आहे. ह्या घरट्याच्या ह्या दरवाज्याचा रंग जमिनीसारखा–मातीसारखा असतो. त्यामुळें दहा पांच घरटीं जरी एके ठिकाणीं असलीं, तरी तीं कोळ्याचीं घरटीं आहेत ह्मणून मुळींच समजून येत नाहींत. ती चांगली जमीनच आहे असें वाटतें; व मनुष्य चकतें.

थंड प्रदेशांत राहणाऱ्या कोळ्यांहून, उष्ण प्रदेशांतील कोळी सौंदर्यानें व कांतीनें फार चांगले असतात. इंग्लंदांत राहणाऱ्या कोळ्यांचा रंग मळकटसा असतो. पण **आफ्रिके**च्या व **हिंदुस्थाना**च्या दक्षिणेस राहणारे कोळी इतके सुंदर असतात कीं, तीं सूर्यतेजाखालीं चमकणारीं दिव्य रत्नेंच आहेत कीं काय, असा भास होतो. त्यांच्या देहाला सोन्यारुप्याचें पाणी देऊनच जणूं काय **विधात्या**नें तेज चढविलें आहे ! इतकेंच केवळ नव्हे तर तो चिमुकला देह ह्मणजे माणकांची लाली, इंद्रनीळाचा कोमळ श्यामवर्ण, आणि पाचूचा मनमोहक हिरवाचार रंग ह्यांचें केवळ अधिष्ठानच होऊन राहिलें आहे, असें वाटतें.

कोळ्यांत पुष्कळ प्रकार आहेत. त्यांचे मुख्य दोन भेद करितां येतात. एक जाळीं विणणारे व दुसरे तीं न विणतां नुसते शिकार करून राहणारे. ह्या दुसऱ्या जातींत मादी आपल्या पिलांस बरेच दिवसपावेतों पोसते. ह्यांचें भक्ष्य मुंग्या ह्या होत.

ह्यांपैकीं पहिल्या जातींतच पाण्यांत राहणारे कोळी येतात. त्यांचे पुढील पाय मागील पायांपेक्षां जरा लांब असतात. पोटाच्या वरचा भाग तांबूस असतो. हे गोड्या पाण्यांतच राहतात. हे पोहूं लागले ह्मणजे ह्यांचा पोटाकडील भाग रुप्यासारखा पांढरा सफेत दिसतो. ह्यांचीं घरटीं कंदुकाकार–किंवा घांटेसारखीं गाटोळीं असून, पाण्याला केवळ निर्भेद्य होत. आणि त्याच्या आंतील बाजूस पुष्कळ हवा भरलेली असते; व त्याचें तोंड खालीं केलेलें असतें. तरी पण ह्यांना माशांसारखा पाण्यां-

तच श्वासोच्छ्वास करतां येत नाहीं. हा खालीं बुडतांना पोटानें व पायानें हवेचे बुडबुडे घेऊन जातो; व खालीं घरट्याच्या तोंडाशीं येतांच तो आपलें अंग झाडतो. आणि मग ती हवा त्याच्या घरट्यांत जाते, ह्याप्रमाणें थोड्याच वेळांत तो आपलें घरटें हवेनें भरून टाकतो; आणि नंतर ही स्वारी त्या घरट्यांत आपलें ठाणें धरून राहते. त्याचप्रमाणें साधारण बुडतांना त्याच्या पायांला पोटाला लागलेली हवा असते, त्यावर त्याचा श्वासोच्छ्वास अवलंबून असतो. ह्या दुसऱ्या प्रकारांत मुख्यत्वेंकरून पळणारे कोळी, उड्या मारणारे कोळी ह्मणजे माशीचा वाघ इत्यादि, खेंकडा कोळी, लंगडे कोळी, वगैरे कोळ्यांचे प्रकार येतात.

पळणारे कोळी हे आपल्या भक्ष्याचा पाठलाग धांवत पळत करतात; व ह्याची पाठीकडून पळण्याची अगदीं हद्द आहे. हा जमिनीवरून पळूं लागला ह्मणजे एखादा उंदीर पळत असल्याप्रमाणें भास होतो. ह्या जातींतील माद्या आपलीं अंडीं नेहमीं आपल्या पोटाशीं बाळगतात.

उड्या मारणाऱ्या कोळ्यांस पळतां येत असून, ह्यांना चटकन् मागें किंवा बाजूसही वळतां येतें; व भक्ष्य आटोक्यांत आल्यावर, त्यावर उडीही घालतां येते.

खेंकडा कोळी हा अंगानें फार मोठा असतो. ह्याचे पुढचे आंकडे ह्मणजे खेंकड्याच्या आंकड्यांप्रमाणेंच असतात. हे खालचे बाजूस मुरडलेले–वळलेले–असतात. हा जमिनींत बिळें करून राहतो. ह्या बिळांस आंतून अस्तर असून, वर झांकण असतें. निशापतीनें क्षितिज सोडलें कीं, ही स्वारी भक्ष्याच्या शोधार्थ धांव घेते. ह्याचें भक्ष्य ह्मणजे लहान लहान पक्ष्यांचीं पिलें होत. हा रात्रौ बाहेर पडून, चोरून हळूच पक्ष्यांच्या घरट्यांत शिरून, त्या चिमण्या पिलांस पळवून नेतो; व मग पुढच्या आंकड्यांनीं त्यांची मुंडी पिरगाळून त्यांचा क्षणार्धांत चट्टामट्टा करून टाकतो. ह्या जातीचे कोळी बहुतकरून **मिसुरी** नदीच्या दक्षिणेस आणि अमेरिकेंतील उष्ण प्रदेशांतील निबिड अरण्यांत, आढळून येतात. ह्यांच्या अंगावर लव असते. ह्यांना फुप्फुसाच्या ठिकाणीं चार पिशव्या असतात. ह्यांना विणकाम करण्याचीं साधनें किंवा यंत्रें चार नसतात. दोनच असतात. ह्यांचे डोळे संयुक्त नसतात. साधे–एकेरीच असतात. ह्या जातीच्या माद्या ८०० पासून २००० पर्यंत अंडीं

घालतात; व तीं एका सुंदर रेशमी पिशवींत ठेवलेलीं असतात. दक्षिण अमेरिकेंतील मि. **बेट्स्** नांवाच्या एका प्रसिद्ध मुशाफरानें एकदां दोन लहान लहान पक्षी एका कोळ्याच्या घरट्यांत येतांना, व त्या घरट्याचे धनी कोळीदादा तिसऱ्याच एका पांखरास मारीत असतांना पाहिलें होतें, इतकेंच नव्हे तर एक इंडियन मुलगा ह्या जातीच्या कोळ्यास त्याच्या कमरेला एक दोरा गुंडाळून, बरोबर एकाद्या पाळींव जनावराप्रमाणें घेऊन चाललेला पाहिला आहे. ह्या जातीचे दोन कोळी लंडन येथें झुऑलॉजिकल सोसायटीच्या बागेंत आणून ठेविलेले होते. त्यांपैकीं एक उंदीर मारीत असे; व दुसरा तर बेडूक मारी.

आतां चवथ्या प्रकारचे ह्मणजे लांडगे कोळी ह्यांच्याविषयीं सांगूं. **ब्याऱ्यांट्यू**ला ह्मणून एक त्यांची जात आहे. ही जात इतकी विषारी आहे कीं, त्यांतील एखादा कोळी जर मनुष्यास चावला, तर मनुष्य वेडा होऊन जातो, असें ह्मणतात. ही जात **इटाली**च्या दक्षिणेस असते. ह्यांच्या माद्या आपल्या पोटाखालीं अंड्यांची रेशमी पिशवी बाळगतात. आणि ती जर कोणी एखाद्या मादीजवळून बळजबरीनें हिसकून घेतली, तर ती फार कावरीबावरी होते. ह्या जातीचे कोळी मधमाशा व इतर किडे मारण्यांत फार पटाईत असतात. बाकी इकडच्या कोळ्यांसारखें जाळें वगैरे विणणें मात्र ह्यांस बिलकूल ठाऊक नाहीं. कोळ्यांस श्रोत्रेंद्रिय असल्याबद्दलचा कोठेंही दाखला सांपडत नाहीं. परंतु स्पर्शज्ञान मात्र चांगलें असतें.

सिलोनांत अरण्यांतील दाट झाडी थेट हमरस्त्यापर्यंत येऊन भिडलेली असते; व अशा ठिकाणीं एका जातीचा कोळी एकप्रकारचें जाळें विणीत असतो. हें जाळें जमिनीपासून सुमारें ४ पासून ८ फूट उंचीवर असतें. ह्याचे धागे दोरखंडाप्रमाणें असून ते झाडांच्या पसरलेल्या फांद्यांना लावलेले असतात. एखादा वाटसरू तें न पाहतां जर चालूं लागेल, तर त्या विचाऱ्याचें दुर्दैवच ओढवलें, ह्मणून समजावें. तेथून चालतांना बहुधा प्रवाशाच्या तोंडावर सडकून तडाखा बसतो. हें जाळें पुष्कळ लांबरुंद असतें; व त्याचें घरटें ह्या जाळ्याच्या मध्यभागीं असतें. तें गुहेप्रमाणें सुरक्षित असतें. त्यांत ह्याचा सर्व परिवार वस्ती करून राहिलेला असतो. ह्या पसरलेल्या जाळ्यांत प्राणी अडकला

असल्यास तो त्यास आपल्या गुहेंत घेऊन जातो. आणि मग तेथें तो किंवा त्याच्या कुटुंबांतील मंडळी त्यावर यथेच्छ ताव मारतात. याप्रमाणें नेहमीं असे प्राणी जाळ्यांत अडकून, त्यांचे हातपाय अडकलेले त्यांत तसेच्यातसेच राहून, जाळें खराब झालें, असें त्या कोळ्यास दिसून आलें तर तो तें जाळें काढून आपल्या गुहेभोंवतीं गुंडाळतो. आणि असे त्या गुहेवर थरावर थर चढून, ती एक भली मोठी गुहाच बनलेली असते.

आफ्रिकेंत पुष्कळ विषारी कोळी आहेत. आफ्रिकेंतील प्रख्यात प्रवासी **लिव्हिंगस्टोन** ह्या साहेबांना अर्धवट झोंपेंत असतां, कांहींसें चावून, आपल्या कपाळावरून चालत गेल्यासारखें वाटलें. ह्मणून त्यांनीं आपल्या हातानें थोडेंसें कपाळ झाडलें, तों त्यांच्या हातास व कपाळास तो प्राणी पुन्हा चावला. तो प्राणी ह्मणजे, तो आफ्रिकेंतील विषारी कोळीच होता, हें सांगावयास नकोच. तो कोळी त्यांस चावल्यामुळें त्या साहेबांच्या आंगांत त्याचें विष भिनून दोन तासपर्यंत एकसारख्या विंचवाप्रमाणें वेदना होत होत्या. त्याच साहेबांनीं दुसरा एक कोळी पाहिला. त्याच्या आंगावर काळीभोर लव वाढलेली होती. हा १। इंच लांब व $\frac{3}{4}$ इंच रुंद असा होता. त्याला पुढें विंचवाच्या नांगीप्रमाणें एक नांगी होती. परंतु ह्याच्या दंशानें एखादा प्राणी मेला, असें मात्र कोठें पहाण्यांत आलें नाहीं. कित्येक कोळी पुष्कळ कोळ्यांचा एक जमाव करून एकत्र राहतात. आफ्रिकेंत आणखी एक कोळी आढळतो; तो लंकेंतील किंवा सिलोनांतील कोळ्यांप्रमाणें गुहा बांधून राहतो.

कोळी हे पाळतांही येतात. पेलिसन्चे चरित्रलेखक **ॲबेड ऑलिव्हेट** साहेब ह्यांनीं **फ्रेंच ॲकॅडमीच्या** इतिहासांत कोळ्याविषयीं थोडासा उल्लेख केला आहे. एकदां ते तुरुंगांत असतां, आपल्यास करमणूक व्हावी ह्मणून एक कोळी त्यांस दिसला, तो पाळण्याचें त्यांनीं मनांत आणिलें. दररोज त्यांनीं माशा मारावयाच्या व त्याजपुढें टाकावयाच्या ह्मणजे तो कोळी चटकन् त्या उचलून नेई व खाई. ह्याप्रमाणें क्रम चालला असतां ते दिवसेंदिवस त्या माशा जवळ जवळ ठेवूं लागले. होतां होतां हातभर अंतरावरचेंही तो खाऊं लागला. तेव्हां ती एक त्यांना करमणूकच होत असे.

कित्येकांचे आकार दिसण्यांत फारच विचित्र दिसून येतात, कित्ये-

कांच्या मागच्या बाजूस ह्मशींच्या शिंगांप्रमाणें मोठे थोरले फांटे फुटलेले असतात. कित्येकांस तर ह्या फुटलेल्या फांट्यांस पुन्हा प्रतिफांटे फुटलेले दिसून येतात. असो. ह्यावरून कोळी हा अगदीं क्षुल्लक प्राणी असून, त्याचे गुणधर्म, त्याची शरीररचना, त्याचें बुद्धिकौशल्य व त्याचीं अद्भुत अंतस्थ यंत्रें हीं जर इतकीं विलक्षण व मनास कौतुक वाटण्यासारखीं आहेत, तर जगामध्यें ह्याहूनही आणखी किती आश्चर्यकारक जीवजंतु विधात्यानें निर्माण केले असतील बरें? तसेंच त्यांना ज्यानें इतकी लोकविलक्षणता दिली असेल, त्या परमात्म्याचें चातुर्य किती अगाध असेल बरें, ह्याचा विचार करा.

विद्युन्मानसशास्त्र.

व्याख्यान अकरावें.

(मागील अंकावरून पुढें.)

असें करावयाला तूर्तच्या काळीं खालीं दिलेल्या प्रयोगाहून दुसरा उत्तम प्रयोग मिळावयाचा नाहीं. तो प्रयोग असाः—

एक शुद्ध जस्ताचा व तांब्याचा पत्रा आणून तींत विद्युत्प्रवाह खेळण्यासाठीं एक तांब्याची तार घ्यावी. ती तार जस्तांतून काढून चांदीच्या पत्र्याला मिळेल असें करावें. हें करणें सोपें आहे. दुऱ्या पैशायेवढ्या आकाराचा पण त्याहून थोडा जाड असा जस्ताचा तुकडा घेऊन त्याच्या मधोमध एक अधेली–किंवा त्याच आकाराचा चांदीचा पत्रा–ठोकून बसवावा. आणि त्या दोहोंस मधोमध भोंक पाडून त्यांतून तांब्याची जाड तार ओवून तिचीं दोन्हीं तोंडें खिळ्याप्रमाणें मुरडून टाकावींत. हें नाणें रुप्याची बाजू वर करून प्रयोग करणाराच्या तळहातावर ठेवावें. आणि प्रयोग करून घेणारास सांगावें कीं, तें नाणें तूं आपल्या डोळ्यापासून सुमारें एक फुटीवर धर. तो मनुष्य बसलेला असो कीं उभा असो. त्यानें वीस मिनिटेंपर्यंत किंवा त्याहून अधिक हात, पाय, ओंठ, मस्तक अथवा शरीराचा कोणताही भाग हालवूं नये. त्यानें स्वाभाविक डोळ्यांच्या पात्याशिवाय कांहींएक हालवूं नये; दगडाच्या पुतळ्यासारखें अगदीं स्तब्ध रहावें. त्याचें मन निखालस शांत असावें. सभोंवतालच्या पदार्थांपासून कोणताही विकार किंवा विचार त्याच्या मनांत येऊं नये. त्या नाण्यावर त्याचे डोळे अगदीं खिळून रहावेत. ते

त्या साऱ्या वीस पंचवीस मिनिटांत दुसऱ्या कोणत्याही पदार्थाकडे किंवा मनुष्याकडे जाऊं नयेत. कोणताही विचार मनांत येऊं नये. प्रेक्षकांनींही तेथपर्यंत स्तब्ध असावें. त्याला डोळे झांकावेसे वाटले, तर ते उघडे ठेवं ह्मणून सांगण्याचें कारण नाहीं. ते त्यास खुशाल झांकूं द्यावेत. ह्मणजे एकंदरींत स्वाभाविक रीत्या जें होईल तें होऊं द्यावें. सार्वजनिक व्याख्यान देतांना, सोय असेल तर, तीस तीस मनुष्यांचा एक एक वर्ग करावा. वर सांगितलेला वेळ भरला ह्मणजे तें नाणें त्याच्या हातांतून घेऊन सर्व वर्गाची त्रासापासून सुटका करावी. नंतर पूर्वी सांगितल्याप्रमाणें प्रवाह सुरू करून प्रत्येक मनुष्यावर प्रयोग करून पहावा, आणि स्वाभाविक स्थितींत असल्याप्रमाणेंच त्याजवर सर्व कृति करावी. एका बैठकींत पूर्ण मानसिक स्थिति प्राप्त झाली नाहीं, तर दुसऱ्या दिवशीं सायंकाळीं पुन्हां तोच प्रयोग करावा. आणि सिद्धि होईपर्यंत असाच क्रम चालवावा. ह्या प्रयोगानें थोडे लोक खेरीज करून बहुतेकांस ही स्थिति प्राप्त होते. कांहीं लोक मूळचेच ह्या प्रयोगास योग्य असतात; कांहीं एका बैठकीनें योग्य होतात; कांहीं दोन प्रयोगानें होतात; कांहीं तिहींनीं होतात; आणि कांहींना ह्या अमोलिक सौख्यस्थितींत यावयाच्या पूर्वी अर्ध्या अर्ध्या तासाच्या शंभर शंभर बैठकासुद्धां द्याव्या लागतात. मानसिकशक्ति, शारीरिकशक्ति, नीतिसामर्थ्य, सदाचार इत्यादि कोणत्याही बाबींत दोन मनुष्य सारखे मनोविकारग्राहक नसतात, परंतु त्याबद्दल आपणांस आश्चर्य वाटावयास नको. कारण, ते सारे ह्या शास्त्रांतील ज्ञानतंतूच्या विकारवशतेंत भिन्न भिन्न प्रमाणानें असतात; त्यांच्या पुढील मेंदूंतील अवयवरचना आणि त्यामुळें त्यांची चेतनाशक्तीही भिन्न भिन्न असते. दोन मनुष्याचें कोणत्याही बाबतींत साम्य नसतें, हें कळावयास इतकें सांगणें बस्स आहे.

सर्व प्रयोगांपेक्षां, चित्ताकर्षक नाण्याचा प्रयोगच सर्वोत्कृष्ट असें माझें मत असल्यामुळें, मीं त्याचें वर्णन करून उपयोग कसा करावा तेंही सांगितलें. आतां हाच प्रयोग सृष्टींतील आणखीही कितीएक पदार्थांच्या योगानें होतो, हेंही येथें मला सांगून ठेवलें पाहिजे. नुसता जस्ताचा (pure zinc) पत्रा हातावर घेऊन त्याजकडे एकसारखी नजर लावली असतांही त्याचा परिणाम तसाच होतो, किंवहुना रुपें, तांबें, लोखंड, शिसें अथवा दुसऱ्या कोणत्याही धातूच्या तुकड्यानेंही हा प्रयोग साध्य होतो. एखादा लांकडाचा तुकडा, किंवा पृथ्वीवरचा दुसरा कोणताही पदार्थ घेऊन त्यानें, किंवा कोणताही पदार्थ न घेतां, केवळ सभोंवतीं असणाऱ्या पंचतत्त्वांच्या सहाय्यानेंच चित्ताकर्षण करून हा प्रयोग

करतां येतो. परंतु कोणत्याही पदार्थाच्या साह्यावांचून प्रयोग करणें तो फार हळू होतो, आणि त्यामुळें करणारास मनस्वी त्रास सोसावा लागतो. बाकी कोणत्याही अतिशय सूक्ष्म पदार्थापासून, तों विद्युदाकर्षक नाण्यापेक्षांही अतिशय तीव्र असणारी जी **ग्यालव्हानिक व्याटरी** तिच्यापर्यंत कोणताही पदार्थ हातावर ठेवला, तरी तो उपयोगीं पडतो, आणि त्यानें सुद्धां हा प्रयोग साध्य होतो, असा माझा अनुभव आहे. खिशांतून नेण्याजोगी, व बरोबर वागविण्यास सोयीकर, अशी **ग्यालव्हानिक व्याटरी** मिळेल, तर तीच उपयोगांत आणण्याविषयीं माझी शिफारस आहे. जर तीस मनुष्यांनीं एकमेकांचे हात धरून मालिका केली, आणि शेवटच्या दोघांनीं आपआपल्या एका हातांत **ग्यालव्हानिक व्याटरी**ची एक एक मूठ धरली, आणि अगदीं हळू—प्रत्येकाच्या मनास भास होतो न होतो—इतका विद्युत्प्रवाह सुरू केला, तर तो इतर पदार्थांपेक्षां अधिक लागू पडतो. हें करतांना, इतर प्रयोगांतील कृतीप्रमाणेंच, ह्यायूंची हालचाल बंद करणें, विविक्षित पदार्थावर किंवा स्थानावर सारखी नजर ठेवणें, मन स्थीर करणें, इत्यादि गोष्टींकडे अगदीं पुरोपूर लक्ष्य पुरविलें पाहिजे हें सांगणें नकोच.

आतां मंडळींतील कितीएक लोकांच्या मनांत असा प्रश्न उत्पन्न होईल कीं, सृष्टींतील प्रत्येक पदार्थाच्या अंगीं—अशी स्थिति उत्पन्न करण्याचा धर्म कमजास्त प्रमाणानें असण्याचें कारण काय? ह्याचें उत्तर हेंच कीं, **परमेश्वरानें** विजेला प्रमुखत्व देऊन **विश्वप्रधान** नेमिलें आहे. व जगद्राष्ट्रांतील यच्चयावत् पदार्थांच्या उत्पत्तीचें, रूपांतराचें व पृथक्करणाचें कार्य तिजवर सोंपविलें आहे. ह्मणून अस्तित्वांत असणारे एकूनएक पदार्थ, एकसारखे सतत, कमजास्त प्रमाणानें आपल्या देहांतून विद्युत्प्रवाह बाहेर टाकीत असतात. तो प्रवाह कमजास्त नसता तर, उत्पत्ति, वृद्धि व लय ह्यांपैकीं कांहींच बदल होतीना. हे प्रवाह कमजास्ती प्रमाणाचे असल्यामुळें, आपआपल्या सामर्थ्याप्रमाणें व त्यांच्याशीं ज्या प्रकारचा त्यांचा संबंध असेल त्या संबंधाप्रमाणें व ते ज्या ठिकाणीं असतील, त्या स्थानमाहात्म्याप्रमाणें प्रत्येक मनुष्यमात्रावर परिणाम करीत असतात. त्यामुळेंच निद्रा व जागृति; सशक्तपणा व अशक्तपणा; सुख आणि दुःख इत्यादि सर्व प्रकारच्या भावना—ज्यांचा मनुष्यदेह हा तावेदार आहे—त्यांचा अनुभव घडतो. आणखी, आह्मी जेव्हां एकाच पदार्थावर लक्ष्य लावतों, आणि सभोंवार असणाऱ्या कल्प-

१ हें एकप्रकारचें विद्युत् उत्पन्न करणारें यंत्र आहे. त्याची अधिक माहिती के. को. पु. ४ अं. १० पान २३० मध्यें आहे.

नांशीं विमुख होतों, तेव्हां त्या एकाग्रतेच्या योगानेंच ज्या पदार्थाच्या **धनस्थितीच्या** अमलांत आह्मी गुंतून पडलेलों असतों, त्याच्याशीं संलग्न असेपर्यंत, ती गुंगी उतरेपर्यंत, अथवा इतर कल्पनातरंग व अद्भुत व्यापार असेपर्यंत, आह्मी स्वतः **ऋणस्थित्यात्मक** बनून राहतों. कारण, एकाग्रतेच्या योगानें फुप्फुसें आणि पक्काशय यांजकडून मेंदूस पोंचणारा **विद्युत्ज्ञानरस** नेहमीपेक्षां अधिक झपाट्यानें पोंचतो. परंतु आपल्या मानसिक व शारीरिक अंकुराला चंचलता प्राप्त झाली कीं, त्याच मनःचांचल्यानें व विस्कळितपणानें, सभोंवार असणाऱ्या सृष्टींतील प्रत्येक पदार्थाच्या विकृतीशीं, आह्मी **धनस्थित्यात्मक** होऊन राहतों. आणि जागृति झटली,–मग तींत कितीही आनंदातिरेक असो–तिचा परिणाम हाच. कारण, तशा स्थितीमध्यें फुप्फुसांतून व पक्काशयांतून मेंदूला जितका **विद्युत्ज्ञानरस** पोंचतो, त्यापेक्षां अधिक झपाट्यानें आह्मी आपल्या मनाच्या आणि स्नायूंच्या कृतीनें त्याचा व्यय करीत असतों.

ह्यासाठीं, मनुष्यावर शीघ्र व हमखास प्रयोग करणें असेल, आणि तो हातांत कोणताही पदार्थ धरण्याच्या पद्धतीनेंच करावयाचा असेल व तो सतत सारखा विनचूक साध्य व्हावा, अशी इच्छा असेल, तर पूर्वी सांगितल्याप्रमाणें स्थिति आणावयास–ह्मणजे एखाद्या मनुष्यास योगनिद्रा किंवा समाधि लावावयास–आपण **विद्युदाकर्षक नाण्याचाच** उपयोग करावा असें माझें ह्मणणें आहे. आणखी मी हेंही सांगून ठेवतों कीं, ह्या शास्त्रांत अंतर्भूत होणारे मानसिक व वैद्युत् ह्या दोन्ही प्रकारच्या एकूनएक चमत्कारांचे प्रयोग करावयासाठीं, प्रयोगकर्ता व करविता ह्या उभयतांमध्यें विद्युत्प्रवाह सुरू करण्याला **मध्यज्ञानतंतूवरच** दाब दिला ह्मणजे पुरे. खरोखर, दरोबस्त पदार्थाच्या अंगीं जर विद्युत्प्रवाह सोडण्याचें सामर्थ्य आहे, तर मीं वर्णन केलेल्या नाण्याप्रमाणेंच त्या प्रत्येक पदार्थाच्या अंगींही तो गुण उत्पन्न करण्याची शक्ति अंशतः तरी असलीच पाहिजे. ह्मणून सत्यत्वानें व तात्त्विकदृष्ट्या पाहिलें तर, वरची स्थिति–ह्मणजे **समाधि** किंवा **योगनिद्रा**–आणावयाला **विद्युदाकर्षक नाण्याची** पद्धतीच सर्वोत्तम आहे. आणि ज्या अर्थी विद्युत्प्रवाह सुरू करण्याचे जेवढे ह्मणून मार्ग आहेत, तेवढे सारे–मग ते स्पर्शजन्य असोत किंवा कसेही असोत–ज्याच्या द्वारानें सर्व कल्पना मनावर उमटतात व मनांतून निघून ज्यांच्या द्वारें शरीराच्या इच्छित भागावर जातात, त्या **प्राणेंद्रियांमध्यें** एकत्र मिळालेच पाहिजेत, त्या अर्थी सत्यत्वानें व तत्त्वदृष्टीनें विचार केला तर प्रवाह सुरू

होण्याचा खरा मार्ग ह्मणून एकच, तो कोणता ? तर **मध्यज्ञानतंतु.** तथापि ह्या मनोरंजक व भानगडीच्या विषयाचें मीं केलेलें विवरण जर आपल्या स्मरणांत असेल, तर पाखांडी लोकांच्या हल्ल्याविरुद्ध उभे राहण्यास आतां आपणांस विशेषसें जड जाणार नाहीं. तरी पण मी आपणांस येथें सुलभ असे दोनच प्रयोग सांगतों. एक **विद्युदाकर्षक नाण्याचा,** व दुसरा **मध्यज्ञानतंतूचा.**

ह्याप्रमाणें प्रस्तुत विषयाचे मुख्य मुख्य मुद्दे स्पष्टपणें आपल्यापुढें ठेवले. आतां सुलभ होण्यासाठीं त्या शास्त्राचे मी पांच विभाग करतों. ह्या पांचांपैकीं पहिल्या तिहींच्या योगानें, मनुष्यांस **'विद्युन्मानस'** स्थितींत आणतां येतें. पहिल्या प्रयोगांत **'मेसमेरिझम्'–वशीकरणशास्त्र** किंवा **मोहनीविद्या**– याचा उपयोग करावा लागतो. ह्मणून त्यास आपण **'मोहनीप्रयोग'** असें ह्मणूं. दुसऱ्या प्रयोगांत जे कोणी मूळचेच **विद्युन्मानस** स्थितींत असतात, त्यांच्या ज्ञानतंतूवर दाब देऊन त्यांस ओळखून काढतां येतें. ह्याला आपण **दुसऱ्या नंबरचा प्रयोग** ह्मणूं. **तिसरा** प्रयोग ह्मणजे नाण्याच्या योगानें त्या स्थितींत आणणें. ह्यासाठीं तिसऱ्या प्रयोगाला **नाण्याचा प्रयोग** असेंच आपण नांव देऊं. चवथ्या प्रयोगांत सर्व आरोग्यदायक वैद्युत् व मानसिक चमत्कार ह्यांचा समावेश होतो. ह्याच्या योगानें जे कोणी आधींच त्या स्थितींत असतील, त्यांच्या दुःखाचा नाश करणें, रोगांचा परिहार करणें, अथवा कोणताही शस्त्रप्रयोग केला तरी, मनुष्यास यत्किंचित्ही वेदना होणार नाहींत अशी तजवीज करणें ह्याला आपण **चवथ्या नंबरचा प्रयोग** असें ह्मणूं. परंतु जे कोणी ह्या स्थितींत नसतील, त्यांच्या देहावर शारीरिक प्रयोग आणि औषधोपचार करून– मग ते आंत असोत कीं बाहेर असोत–त्यांचे रोग बरे करणें. ह्या प्रयोगाला **पांचव्या नंबरचा प्रयोग** ह्मणावा. आतां ह्या पांचही प्रयोगांची आवश्यक तेवढी सारी माहिती होईल तेवढ्या सुलभ व सुबोध रीतीनें देऊन त्यांचा खुलासा करतों.

पहिल्या नंबरचा प्रयोग जो **'मेसमेरिझम्'**–किंवा मोहनी विद्या–त्याच्या संबंधानें मी इतकेंच सांगतों कीं, आपणास जर तो त्या स्थितींत नसलेल्या, किंवा ज्यावर कधींच त्याचा अंमल बसलेला नाहीं अशा एखाद्या पुरुषावर करणें असेल तर, पुढें दिलेल्या प्रयोगांपेक्षां दुसरा चांगला प्रयोग नाहीं, असें माझें मत आहे. ज्याच्यावर प्रयोग करावयाचा त्याला सहजरीतीनें–ह्मणजे त्याचा कोणताही अवयव अवघडणार नाहीं, किंवा त्यास रग लागणार नाहीं अशा बेतानें बसवावा. आणि त्यास कोणत्याही प्रकारची हालचाल न करितां,

शांत चित्तानें बसण्यास सांगावें. नंतर आपण त्यास दोन्ही हातांनीं–किंवा एका हातानें धरून दुसरा हात हलकेच त्याच्या कपाळावर ठेवावा. परंतु **धनशक्ति व ऋणशक्ति** ह्यांचा–संयोगानें **'विद्युन्मंडल'** तयार होऊन–प्रवाह सुरू व्हावा, ह्यासाठीं, मनुष्याच्या ज्या भागाला आपण स्पर्श केला असेल त्याच्या दोन्ही टोंकांस स्पर्श करण्याबद्दल नेहमीं सावधगिरी ठेविली पाहिजे. अशा प्रकारें दोन्ही हातांनीं त्यास स्पर्श केल्यावर त्याच्याकडे आपली सारखी नजर लावावी. आणि साधेल तर, त्यासही आपल्या तोंडाकडे निश्चल व एकसारखें पहावयास सांगावें. ही मुद्रा त्याचे नेत्र झांकेपर्यंत अशीच राहूं द्यावी. नंतर आपले दोन्हीही हात त्याच्या मस्तकावर ठेवावेत आणि ते तसेच उतरीत उतरीत दोन्ही खांद्यांवर, खांद्यांवरून हातावर, व हातापासून बोटांच्या अगदीं टोंकापर्यंत आणावेत. आणि मग ते दोन्हीही हात तेथेंच बाहेरच्या बाजूस झाडून टाकून पुन्हा मस्तकावर न्यावेत. याप्रमाणें विंचू उतरल्यासारखा हाताचा क्रम, त्या मनुष्यास आपल्या शब्दाशिवाय दुसऱ्याचा शब्द ऐकूं न येईल इतक्या वेळपर्यंत चालवावा. इतकें झालें ह्मणजे त्यास **मोहनी पडली,** किंवा **समाधिस्थिति प्राप्त झाली** ह्मणून समजावें.

हातउतारे करतांना आपले हात फिरून मस्तकावर नेण्यापूर्वी झाडावेत असें मीं ह्मटलें, ह्याचें कारण, त्याच्या शरीराला लागून आणि समोरून हातउतारे गेल्यानें तो जागा होऊं नये. ही गोष्ट तर सुप्रसिद्धच आहे कीं, **ग्यालव्हानिक ब्याटरी**ला लावून ठेवलेला विद्युल्लोहचुंबक सुलटा फिरविला, तर तें पोलाद इतकें आकर्षक होतें कीं, त्याच्या योगानें एक शेर लोखंड उचलतें. पण तोच उलटा फिरवा, कीं लगेच त्याच्यांतील ती शक्ति नाहींशी होऊन त्याच्यानें एक रजःकण सुद्धां उचलवत नाहीं. मीं सुलटा असें ह्मटलें, त्याचा अर्थ हा कीं, लोहचुंबकाच्या मध्यापासून शेवटापर्यंत व उलटा ह्मटलें त्याचा अर्थ शेवटापासून लोहचुंबकाच्या मध्यापर्यंत असा समजावा. मनुष्यप्राण्यासही त्याच्या मनाला प्रयोगसंस्कार लागू होण्यापूर्वी हाच नियम लागू आहे. परंतु मनुष्य पूर्णपणें समाधिस्थितींत असतांना आपण प्रयोग केला, तर उलट हातउतारे करूनही तो जागा होणार नाहीं. त्या वेळीं आपल्या मानसिक स्थितीच्या योगानेंच तो आपली समाधि कायम राखील, आणि आपण उलट किंवा सुलट कसेही हातउतारे केले तरी त्यांस तो जुमानणार नाहीं. **योगनिद्रे**मध्यें असतांना विद्युद्रूप होणें किंवा न होणें, लोहचुंबकात्मक होणें किंवा न होणें हें मनाच्या खुषीवर आहे.

परंतु योगनिद्रेसाठीं आपण बसविलेल्या मनुष्यावर आपला प्रयोग कांहींच लागू न होईल, आणि पंधरा किंवा वीस मिनिटें खटपट केली तरी त्याचे डोळे न झांकतील, तर पूर्वी सांगितल्याप्रमाणें पुन्हा पंधरा किंवा वीस मिनिटें हातउतारे चालू ठेवावेत. नंतर पुन्हा पूर्ववत् त्याला दोन्ही हातांनीं धरावें, आणि त्याच मुद्रेनें सुमारें पंधरा किंवा वीस मिनिटें बसावें. आणि पुन्हा पहिल्याप्रमाणें हात-उतारे सुरू करावेत. ह्याप्रमाणें ह्या दोन पद्धति प्रत्येक बैठकीला सुमारें तास तासभर चालू ठेवाव्यात. प्रयोग पुरा करून उठण्यापूर्वी, तो जागृत होण्यासाठीं मिनिटभर सुमारें उलटे हातउतारे करावेत. ह्मणजे हाताच्या बोटापासून मस्त-कापर्यंत उलट हात न्यावेत. एखाद्या मनुष्यावर प्रयोग लागू पडत नाहीं असें वाटलें, तरी सुद्धां हें कृत्य केलेंच पाहिजे. पुन्हा दुसऱ्या दिवशीं हाच प्रयोग अशाच रीतीनें सुमारें तासभर करावा. त्याजवर मोहनी पडेपर्यंत, अथवा योगनिद्रेची स्थिति येईपर्यंत–दररोज हाच क्रम चालवावा. ही एक गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे कीं, कोणत्याही मनुष्यावर आपण प्रयोग केला–मग तो मिनिटभर असो कीं कि-तीही असो–त्याचा अंशतः गुण तरी त्याजमध्यें राहतोच. आणि त्यामुळें थोड्याच दिवसांत फिरून फिरून प्रयोग केल्यानें ती स्थिति प्राप्त झाल्यावांचून राहत नाहीं.

कोणताही मनुष्य जेव्हां योगनिद्रेमध्यें असतो–मग ती निद्रा आपण आणलेली असो, किंवा दुसऱ्या कोणी आणलेली असो–त्याच्यांतील विद्युत्प्रवाह सुरू होणें तो नंबर दोनच्या प्रयोगानें सुरू होतो. आणि उलट्या हातउताऱ्यांनीं तो बंद होतो–ह्मणजे त्याला जागृतावस्था प्राप्त होते. अथवा त्याला जागा कर-ण्याला–किंवा पाहिजे तर शुद्धीवर आणण्याला ह्मणा–आणखी एक युक्ति आहे. ती ही कीं, त्याच्या मनाचा कल बदलावा, तो असा. त्याला ह्मणावें कीं "मी आतां तीन अंक मोजतों. आणि तीन झटल्याबरोबर मी आपल्या हातांनीं टाळी वाजवितों; ह्मणजे तूं नीट जागा होऊन चांगला शुद्धीवर येशील. आहे तुझी तयारी?" ह्याचें त्याच्याकडून अनुकूल उत्तर मिळालें कीं आपण अंक मोजावयास लागावें. "एक, दोन, तीन!" ह्यांतील 'तीन' हा शब्द मो-ठ्यानें आणि झटपट उच्चारावा. आणि लागलीच हात मिटून टाळी वाजवावी. ह्मणजे तो तत्काल जागा होईल. अशा रीतीनें योगनिद्रेची स्थिति अनुभवून जे जागे होतात–त्यांतील फारच थोडे खेरीज करून–बाकी सर्व **'विद्युन्मानस'** स्थितींत असतात. आणि त्यांच्यावर आपणांस तच्छास्त्रसंबंधीं पाहिजे ते प्रयोग करतां येतात. ह्यावरून एवढें सिद्ध झालें कीं, नंबर एकच्या प्रयोगानें मनु-

ध्यास त्या स्थितींत आणतां येतें; आणि तादात्म्यतेच्या योगानें तो आपल्याशीं **ऋणस्थितींत** असतो; व त्याचें शरीर, पृथ्वीपासून प्राप्त होणारी, जिच्यावर आपल्या **धनविद्युत्**चा सर्वस्वी तावा चालतो, **त्या ऋणविद्युत्**नें युक्त असतें.

इतका वेळपर्यंत योगनिद्रा कशी आणावी, किंवा एकाद्या मनुष्यावर मोहनी कशी टाकावी, ह्यावद्दल आवश्यक तेवढी माहिती सांगितली. व नंबर एकच्या प्रयोगानें मनुष्याला '**विद्युन्मानस**' स्थितीमध्यें कसें आणावें, आणि प्रयोग करतांना मनुष्य आपल्यापुढें कोणत्या स्थितींत असतो तेंही मीं दाखवून दिलें. आतां **दुसऱ्या नंबरच्या प्रयोगासंबंधानें सांगतों.** हें विवेचन थोडक्यांतच आटपेल. कारण, त्याचें यथास्थित विवेचन मीं पूर्वीच केलें आहे. प्रथमतः आपण एखाद्या प्रसिद्ध समाजांत अथवा मित्रमंडळांत जावें. आणि त्यांपैकीं पाळीपाळीनें एकएकाचे हात धरून मीं पूर्वी सांगितल्याप्रमाणें त्यांच्या **मध्य-ज्ञान**तंतूवर दाब द्यावा. आणि त्यांपैकीं एखाद्यावर आपली शारीरिक व मानसिक सत्ता चालूं लागली तर, त्याला दुसऱ्या नंबरच्या प्रयोगानें विद्युन्मानस-स्थिति प्राप्त झाली ह्मणून समजावें. त्यानें कधींही योगनिद्रेचा अनुभव घेतलेला नसला, त्याच्यावर कोणताही प्रयोग कोणीं केलेला नसला, तरी नंबर एकच्या प्रयोगानें मनुष्यास जी स्थिति प्राप्त झाली होती तीच ह्या दुसऱ्या नंबरच्या प्रयोगानेंही प्राप्त झाल्याचें दिसून येईल. ह्या दोघांनाही जवळ जवळ बसविलें, तर त्या परस्परांचे मनोविकार सारखे असतात. ते एकाच **ऋणविद्युत्**नें युक्त असतात, आणि तादात्म्यतेच्या संबंधानें पाहिलें तर ते उभयतांही आपल्याशीं **ऋण-स्थित्यात्मक**–अर्थात आपल्या मनाचे हुकुमबंदे–असतात.

आतां **नंबर** तीनच्या प्रयोगांतील मुख्य साधन जें **विद्युच्चुंबक नाणें** तें घ्यावें, आणि ज्यावर आपला प्रयोग लागू पडलेला नाहीं त्याच्या हातांत द्यावें. व पूर्वी सांगितल्याप्रमाणें त्याच्याकडे नजर लावण्यास सांगावें. यथायोग्य काल होईपर्यंत बसलें ह्मणजे दुसऱ्या नंबरच्या प्रयोगाप्रमाणेंच विद्युत्प्रवाह सुरू होऊन सहजगत्या त्याच्यावर शारीरिक व मानसिक अंमल चालूं लागेल. असें झालें ह्मणजे नंबर तीनच्या प्रयोगद्वारें तो **विद्युन्मानसस्थिती**मध्यें आला ह्मणून समजावें. आतां ह्या तिन्ही व्यक्ति एकाच तादात्म्यशक्तीमध्यें आल्या; एकाच ऋणविद्युत्नें युक्त झाल्या आणि आपल्याशीं ऋणस्थित्यात्मक शक्तीमध्यें उभ्या राहिल्या. अर्थात त्या शक्तीमुळें त्या एकत्र किंवा निरनिराळ्या रीतीनें सुद्धां तुमच्या तावेदार झाल्या. हे सारे गृहस्थ एका विद्युन्मानसस्थितीमध्येंच आले,

पण ते तीन निरनिराळ्या प्रयोगाच्या द्वारें आले. कोणत्याही साधनानें मनुष्यास ह्या स्थितींत आणलें तरी, हें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे कीं, गुप्त, अदृश्य, सत्ताधारक शक्तीची केवळ सूक्ष्म शृंखळा, ज्याच्याशिवाय कोणताच प्रयोग लागू पडत नाहीं, तो विद्युत्प्रवाह स्पर्शानें ह्याणा कीं स्पर्शावांचून ह्याणा नंबर दोनच्या प्रयोगानेंच आपण सुरू करतों. शास्त्रांतील प्रत्येक गोष्ट, हेतु, साधन व परिणाम ह्या तीन पायांवर उभारलेली असते. प्रत्यक्ष **विधाता** सुद्धां ह्या पृथ्वीपासून जर अलग असता, तर तिच्यावर किंवा तिच्या पृष्ठभागीं वस्ती करून राहणाऱ्यांवर कांहींच कार्य होतेंना. कारण, तसें झालें तर तिच्या सन्निध येण्याला, अथवा तिच्यावरील प्राणिकोटींत किंवा वनस्पतिकोटींत यत्किंचित् फेरफार करण्याला सुद्धां कांहीं साधन राहणार नाहीं. आपण पाहिजे त्या ज्ञानतंतूस स्पर्श करावा. स्पर्श करून किंवा स्पर्श न करितां साधेल तसा प्रवाह सुरू करावा–त्याबद्दल मी काळजी करीत नाहीं. पण तो प्रवाह ज्ञानतंतूच्या द्वारें, प्राणेंद्रिय जो मेंदू, त्याला पोंचला पाहिजे, आणि तेथून मनाला पोंचला पाहिजे. आपण **अंत्यज्ञानतंतूवर** जरी दाब दिला तरी तो प्रवाह, त्याच्याहून फार मोठा व हातार्शी समांतर रेषेनें पृष्ठरज्जूपर्यंत जाणारा जो **मध्यज्ञानतंतु** त्याला मिळालाच पाहिजे. आणि तेथून ते दोन्हीही निःसंशय पुढें, पुढच्या मेंदूंतील प्राणेंद्रियांत मिळाले पाहिजेत. हे दोन्हीही मिश्रज्ञानतंतु आहेत. मिश्र किंवा जोड ह्याचा अर्थ इतकाच कीं, ते दोघेही इच्छाशक्ति व ज्ञान यांचे ग्राहक आहेत. कारण, **विद्युत्ज्ञानरस** मनांत घेणें व तेथून बाहेर दवडणें हीं कामें ह्यांच्याकडे असल्यामुळें, ते नेहमीं मनाच्या सान्निध्यास असतात. बाह्यजगाशीं व्यवहार घडणें तो ह्यांच्याच द्वारानें घडतो. तें ह्यांच्याच द्वारें भावनेनें निरोप घेतें आणि ह्यांच्याच द्वारें भावनेनें परत उत्तर देतें. ह्याकरितां प्रवाह सुरू करणें तो प्रत्यक्ष **मध्यज्ञानतंतूच्या** द्वारें सुरू करणें हा मार्ग इतर मार्गांहून अधिक पसंत. आणि जे फार नाजूक अथवा प्रयोगवश नव्हेत अशावर तर विशेषच सोयीचा. ह्या ज्ञानतंतूला सोडून जितका अधिक अधिक अंतरावरून प्रवाह सुरू करावा, तितके तितके मनुष्यावर सत्ता चालविण्यास आयास पडतात. आणि वेळेनुसार प्रयोग सुद्धां लागू पडत नाहीं. आणखी, जरी तो लागू होऊन प्रवाह सुरू झालाच तरी, त्याचे चमत्कार तितके चित्तवेधक, अद्भुत व बहारीचे वठतही नाहींत. दुसरी प्रवाह सुरू करण्याची उत्तम पद्धत–जी मी साधारणपणें उपयोगांत आणतों–ती **अंत्यज्ञानतंतूच्या** द्वारें सुरू करण्याची आहे. ह्या पद्धतीपासून आणखी एक फायदा असतो तो हा कीं, ह्या विद्येची गुरुकिल्ली इतरांपासून गुप्त राखतां येते.

येवढा वेळपर्यंत मी पहिल्या तीन प्रयोगांच्या द्वारें मनुष्यांना विद्युन्मानस-स्थितीमध्यें कशीं आणावींत आणि सूक्ष्म प्रवाहाच्या साधनानें त्यांच्या ठिकाणीं तादात्म्यता उत्पन्न करून त्यांस आपल्या हुकमांत कशीं ठेवावींत हें थोडक्यांत दाखवून दिलें. **चवथ्या प्रयोगांत** सर्व शारीरिक व मानसिक चमत्कारांचा समावेश होतो. आणि ते करावेत कसे ह्याविषयींची विस्तृत माहिती मीं पूर्वीच दिली असल्यामुळें, ह्या विषयाचा बहुतेक भाग आपणांस पूर्वीच श्रुत आहे. तथापि ते चमत्कार आरोग्याला कां उपयोगीं पडतात, व रोगी निखालस जागृतावस्थेमध्यें व चांगला शुद्धीवर असतांनाही, त्याला यत्किंचितही दुःख व वेदना न होतां, त्यावर शस्त्रप्रयोग कसा करतां येतो हें निवेदन करण्याची मला परवानगी असावी. ह्या दोन मुद्यांचें मी तात्विकदृष्टीनें विवेचन करतों.

ह्या प्रयोगाचा नीट उपयोग केला तर, त्यापासून आरोग्यास सहाय होतें. ह्याचें कारण, मन हें ज्ञानतंतूच्या विजेशीं संलग्न होऊन, तिला प्रयोगकर्त्या रोग्याचा ग्रह पालटून शरीराच्या ज्या भागाकडे लक्ष्य वळवितो, तिकडे पाठवितें. तिच्या वेगानें हातपाय इतके बधिर होतात कीं, प्रयोग करून घेणारानें हवी तितकी झटपट केली तरी त्यास चालवत नाहीं. चालत असला तर उभें राहवत नाहीं; किंवा बसलेला असला तर उठणेंही त्याच्या स्वाधीन नसतें. त्याचे हात निमिषमात्रांत इतके बधिर होतात कीं, त्यास ते हालत नाहींत. किंवा हालत असले तर त्यास थांबवितां येत नाहींत. मनोभावनेनें त्यास आपल्या चिरगुटास आग लागली; अथवा एखादें घर पडून त्याच्या खालीं आपल्या हातापायांचा चुराडा झाला असें वाटतें. अथवा एखादा मोठा सिंह, वाघ अथवा सर्प आपल्या पाठीस लागून चवताळून खावयास येऊस भिडला असें भासवितां येतें. अथवा मर्जी असेल तर, त्याला मोठ्या खुषींत व बहारींतही गुंगवितां येतें. त्याच्या मनावर पाहिजे त्या विकाराचा ठसा पूर्णपणें उठवितां येतो. हे नानाप्रकारचे मनोविकार ज्ञानतंतूची वीज, शरीराच्या प्रत्येक भागावर इतक्या वेगानें सोडून देतात कीं, तेणेंकरून शरीरकार्यांस आलेल्या दरोबस्त व्यत्ययांचा विध्वंस होऊन ज्ञानतंतूंची शक्ति व रुधिराभिसरणाची समतोलता होते, आणि रोगाचा बींमोड होऊन वेदना बंद होतात. वैद्यशास्त्रांतही ही गोष्ट प्रसिद्धच आहे कीं, मनोल्हासानें वातरोगासारखे रोग बरे होतात, आणि पांगळे लोकही चालूं लागतात.

आतां **नंबर पांचव्या** प्रयोगांत ह्या स्थितींत न आल्या कारणानें जे लोक बरे होत नाहींत त्यांचा समावेश होतो. ह्यासंबंधानें मला फारच थोडें सां-

गतां येईल. ह्याच्यामध्यें, रोगाच्या जातीप्रमाणें व मनावर उमटलेल्या ठशाप्रमाणें त्याच्या शरीरावर उत्पन्न होण्यासारखीं जीं शारीरिक कार्यें आहेत त्यांचा समावेश होतो. भावनेला लागतील त्या बाह्योपचारांचा किंवा अंतरोपचारांचा समावेशही ह्यांतच होतो. ह्मणजे एकंदरींत ह्याच्यामध्यें सर्व पद्धतींतील अप्रतिम गुणांनीं व सौंदर्यानें युक्त जी अत्युत्कृष्ट पद्धति, तिचा समावेश होतो. आणि ती सर्वोत्तम पद्धति कोणची ? तर **'विद्युदुपचारपद्धति.'** आतां मी कबूल केलेल्या शेवटच्या मुद्याकडे वळतों.

तिळमात्रही दुःख होऊं न देतां एखादा दांत उपटून काढतां येतो, किंवा शस्त्रप्रयोगही करतां येतो. ह्याच्या कारणाचा शास्त्रदृष्ट्या विचार केला तर असें दिसतें कीं, भास किंवा ज्ञान किंवा विकार ह्मणा, मेंदूमध्यें वस्ती करून राहणारें जें मन त्याच्यामध्यें असतात–किंवा उत्पन्न होतात. तें मन सचेतन व शाश्वताकार असल्यामुळें त्यास, शरीराशीं व्यवहार ठेवण्यासाठीं लिंगरूप किंवा सूक्ष्मरूप हात पाय इत्यादि अवयव आहेत. खऱ्या रीतीनें पाहिलें तर सर्व अवयवयुक्त शरीर हें मेंदूमध्यें अदृश्यरूप असणाऱ्या आत्म्याचीच विस्तारलेली प्रतिमा आहे. आपल्या सादृश्यांत त्यानें त्याच्याच रूपलक्षणांची नक्कल केली आहे. ह्या सर्वांतील मथितार्थ ह्मणून इतकाच कीं, शरीराला स्वतः कांहीं भास किंवा विकार नाहीं. उदाहरणार्थ आपण एक सुई घेऊन तिचें टोंक बोटास टोंचलें, तर कांहीं मिनिटें एका ज्ञानतंतूच्या शाखेची कांहीं वेळ आग होऊं लागते. ही आग ज्ञानतंतूला तारबातमीप्रमाणें सहाय्य करण्यासाठीं तिच्या सन्निध असणाऱ्या **ज्ञानविद्युत्ला** चेतवून देते. आणि तिचें मूळ ठिकाण, नित्यव्यवहाराचें स्थान जें आत्म्याचें सूक्ष्म रूप किंवा लिंगरूप बोट, त्यांत धक्का उत्पन्न होतो. त्यामुळें लिंगरूप गोलार्धांत जी सुंदर हालचाल चालू असते तिची विघडाविघड होते, आणि वेदना सुरू होतात.

तर मग, ज्याला आपण सुईचें टोंक लावलें, तो मन आणि ज्ञानतंतूच्या विजेमधील संबंध आपणांस तोडतां येईल. तारायंत्राची तार जर इतकी निरुपयोगी केली कीं, तींतून मनास धक्का पोंचविण्याला विजेस जातां येऊं नये, तर दुःख किंवा वेदना संपल्या. अर्धांग वायूमध्यें नेहमीं ज्ञानतंतूची शक्ति नष्ट झालेली असते ती अशीच. ह्याच रीतीनें वेदना झाल्याशिवाय शस्त्रप्रयोगही करतां येईल. ह्यावरून बधिरपणा उत्पन्न होण्याइतका मनाचा ग्रह किंवा भास जर वाढला, तर त्या मनोल्हासानें वेदना किंवा दुःख समजण्यांत येणार नाहीं, हें खचित

आहे. कारण, ज्या अर्थी मनुष्यदेहामध्यें ज्ञानाचें कांहीं एक प्रमाण ह्मणून आहे, त्या अर्थी शरीराच्या एका भागावरचें ज्ञान अधिक वाढलें तर, दुसऱ्या भागावर शून्य झालेंच पाहिजे. ही गोष्ट खालीं दिलेल्या **हेन्री क्ले**च्या हकीगतीवरून स्पष्ट समजून येईल. ती हकीगत अशीः—

"एकदां राष्ट्रीय सभेमध्यें एक गृहस्थ भाषण करीत असतां त्यानें **हेन्री क्ले** ह्याला अनुलक्षून अतिशय मर्मभेदक भाषण केलें. तेव्हां **मिस्तर क्ले** फारच हिरमुष्टि झाला आणि तो त्यास प्रत्युत्तर देईल असें मुळींच वाटलें नाहीं. तथापि त्याच्या शेजारीं एक गृहस्थ बसला होता, त्याच्या कानाशीं लागून तो हळूच ह्मणाला 'मला कांहीं तरी उत्तर देणें भाग आहे. परंतु आपण कृपा करून मला अर्ध्या तासाच्या वर बोलूं देऊं नका.' इतकें सांगून त्यानें बोलण्यास प्रारंभ केला. आणि लौकरच त्याचा झपाटा सुरू झाला. त्याचा आवाज तृतीय स्वरांत चढला आणि आपल्या तर्फेच्या भाषणानें त्यानें पृथ्वी व आकाश हीं अगदीं द-णाणून सोडलीं. प्रत्येक वाक्य उच्चारतांना सारें ब्रह्मांड थरथर कांपतें आहे असें वाटे. तो फार चिडीस पेटला; तापला; आणि आवेशानें त्याचा मेंदू खव-ळून गेला. अशा स्थितींत अर्धा तास गेला तेव्हां संकेताप्रमाणें शेजारचा गृह-स्थानें त्याचा आंगरखा ओढला. पण तें **क्ले**च्या मुळींच लक्ष्यांत आलें नाहीं. त्यानें त्याच्या आंगाला चिमटे घेतले, पण ते त्याला मुळींच कळले नाहींत. त्यानें त्याच्या पायांच्या पोटरीमध्यें अर्धीअर्धी आंत जाईपर्यंत कितीएक वेळां जोरानें टांचणी टोंचून पाहिली, परंतु कांहीं नाहीं. **क्ले**ला त्याचें मुळींच भान राहिलें नाहीं. तो दोन तास सारखें कडाक्यानें बोलला व मग अगदीं थकून जाऊन खालीं बसला. आणि त्यानें आपणास न थांबविल्याबद्दल आपल्या मित्रास उलट दोष दिला! कारण त्याच्या खुणा त्यास मुळींच कळल्या नव्हत्या. त्याच्या आवे-शानें त्याच्या शरीरांतील सर्व बीज मेंदूमध्यें नेली. आणि मनोद्वारें तिचा व्यय केला. जितक्या प्रमाणानें त्याचें चैतन्य मेंदूमध्यें ओढलें गेलें, तितक्याच प्रमा-णानें हातापायांतील चैतन्य कमी झालें."

लेसिंगटन नांवाची आगबोट जळून जेव्हां अनेक प्राण्यांच्या आहुति पडल्या त्या वेळीं **डाक्टर क्यानिंग** ह्यांनीं जो तत्त्वोपदेश केला, त्यांत ह्या गोष्टीचें वि-वेचन फारच उत्कृष्ट रीतीनें केलें आहे. ते ह्मणतातः—

"**परमेश्वरानें** आह्मांला जन्मतःच दुःख—नव्हे दुःखाचे डोंगर आले तरी ते सुद्धां—भोगण्यास पात्र करून ठेवलें आहे. सुखोपभोग घेणें हा जसा आमचा

जातिस्वभाव आहे, तसाच दुःख भोगणें हाही एक जातिस्वभावच आहे. त्याचें बीजारोपण **परमेश्वरानेंच** केलें असून आमच्या जिवित्वामध्यें दुःखाचा एक झराही त्यानें सुरू करून ठेवलेला आहे; हा आमच्या अंतर्यामीं आहे. विचारशक्ति जशी आह्मांस केव्हांही सोडतां येत नाहीं, त्याप्रमाणेंच ह्या झऱ्यापासूनही आमची सुटका होत नाहीं. निमित्तास कारण होणाऱ्या ज्या बाह्यवस्तु त्यांजवरच आह्मी आपल्या दुःखाचीं कारणें ढकलीत असतों. अग्नि, समुद्र, तरवार अथवा मानवी दुष्टपणा हींच आमच्या दुःखाचीं कारणें असें आह्मी ह्मणतों. परंतु खरोखर विचार केला तर, अग्नींत किंवा तरवारींत कांहीं दुःख नाहीं, कीं जें त्यांतून निघून चटकर आत्म्यांत शिरेल! दुःख हें स्वयमेव आत्म्यांतच उत्पन्न होतें, आणि आत्म्यांतच लय पावतें. बाह्यवस्तु ह्या केवळ निमित्तास कारण आहेत. शरीरांतही पण दुःखबीज नाहीं, कीं जें उठून मनांत शिरेल! शरीराला स्वभावतः मुळींच दुःख नाहीं. समजा; कीं हात एखाद्या दगडाखालीं ठेंचला; किंवा चापांत सापडून चेंगरला; किंवा विस्तवानें भाजला; तर ह्यांतील शिरा, धमन्या, कातडी, किंवा हाडें ह्यांना कांहीं दुःख नाहीं. हीं **ईशेच्छेनें** आमच्या आत्म्यांतील दुःखोद्रमाशीं फक्त जोडलेलीं आहेत. चाकूनें हात कापला, तरवारीनें उरांत भोसकलें, तरी त्यापासून सुद्धां दुःख न होतां उलटा अत्यानंद व्हावा असें करणें सुद्धां **ईश्वराच्या** मनास आल्यास तो करूं शकेल. तुंबळ युद्ध चाललें असतां जखम लागलेली कळत नाहीं. त्यागा करून घेणारे किंवा देवाप्रीत्यर्थ आपखुषीनें बळी जाणारे जे धर्मभोळे लोक असतात, त्यांच्या तोंडावर मरणकालीं सुप्रसन्नता दिसून येते. ह्याचें कारण, येवढेंच कीं त्या शरीराच्या जखमांचा योग, आत्म्याच्या दुःखोद्रमाशीं होत नाहीं. अशा वेळीं इतर तत्त्वांच्या कार्याच्या योगानें आत्म्याच्या दुःखोद्रमाचें कार्य कमी होतें किंवा बंद पडतें. दुःख ह्मणजे आपल्या आत्म्यास जो दुःखानुभव घडतो तो. ही दुःख भोगण्याची योग्यता **विधात्यानें** अभेद्य रीतीनें आपणां सर्वांमध्यें जन्मापासून ठेविली आहे."

'**विद्युन्मानसशास्त्र**' हा श्रेष्ठ मनोधर्माचा एक पंथ असल्याकारणानें यत्किंचित्ही वेदना झाल्याशिवाय शस्त्रप्रयोग कसे करतां येतात, ह्याचें कारण, आपल्यास लौकरच कळून येईल. इतकें सांगून मी आपलें भाषण समाप्त करतों.

अकरावें व्याख्यान समाप्त.

PRINTED and published by Janardan Mahadeo Gurjar AT JAVAJI DADAJI'S "NIRNAYA-SAGARA" PRESS, Bombay.

आर्यधर्माभिमानी लोकांकरितां सचित्र हिंदु घड्याळें.

हिंदु घड्याळें कशीं आहेत, दिसण्यांत सुंदर, खिशांत हलकीं, मजबूत, टिकाऊ, अंगचे चावीचीं, तबकडी मिन्याची पांढरी असून त्यावर रीतीप्रमाणें रोमन आंकडे असून ठळक मराठी आंकडेही आहेत आणि प्रत्येक आंकड्यामध्यें हिंदुपूज्य देवतांचीं सुंदर चित्रें आहेत. श्रीगणपति, सरस्वती, रामदासस्वामी, हनुमंत, रामसीता, लक्ष्मीनारायण, गरुड, अष्टभुजादेवी, विठ्ठलरखुमाई, शंकरपार्वती, अक्कलकोटस्वामी, श्रीगुरुदत्तात्रय, आणि मध्यभागीं, महाराष्ट्रास जिवंत करणारे गोब्राह्मणप्रतिपालक **श्रीशिवाजीछत्रपतिमहाराज** यांचें सुबक चित्र आहे. अशीं हीं अपूर्व हिंदु घड्याळें आमचे देशबांधव व भगिनी काय ह्मणून न घेतील !

हिंदु सिलेंडर पिक्क नी. सी. वॉच किं. रु. १० ग्या. वर्ष १
हिंदु लिव्हर प्रीव्हेन्स नी. सी. वॉच किं. रु. १५ ग्यारन्टी वर्षें २
हिंदु रासकोप सिस्टीम नी. सी. वॉच किं. रु. १७ ग्या. वर्षें ३
हिंदु प्रिव्हेलन्स चांदीचें वॉच किं. रु. २५ ते ३० ग्या. वर्षें ४
हिंदु सोन्याचें वॉच किं. रु. १०० ते १२५ ग्या. वर्षें ४
हिंदु सचित्र आर्मी वॉचेस किं. रु. १० ते १२५ पर्यंत.

हिंदु सचित्र टाईमपीसेस साधें, अलार्म, स्विंग, जपींगई. आंकड्यांमध्यें देवतांचीं चित्रें, मध्यभागीं दरबारी व अश्वारूढ श्रीशिवाजी, आणि श्रीशंकरपार्वतीसह. किं. रु. ४-६-१० ते ३० पर्यंत. [१२

जी० बी० नाईक आणि कंपनी. बिलासिसरोड, नाका भायखळा, मुबंई.

धि इंडियन म्यारेज ॲण्ड डेथ बेनिफिट फंड लिमिटेड, मुंबई.

डिरेक्टर्स.

रावसाहेब दलपतराम प्राणजीवन खक्कर जे. पी.

बद्रुद्दिन अब्दुल्ला कूर एस्कायर जे. पी.

रुसतम बी. पेमास्तर एस्कायर बी. ए. एल् एल्. बी.

धनजीशा फ्रामजी चिनाय एस्कायर.

विष्णु नारायण परुळकर एस्कायर (एक्स आफिशिओ.)

मध्यम स्थितींतील मनुष्यांस आपल्या मुलांमुलींच्या लग्नाचे वेळीं व आपल्या मरणानंतर आपल्या वारसाकरितां पैशाचा संग्रह करून ठेवितां यावा झणून हा फंड १८९४ मध्यें स्थापन झाला आहे. इतक्या अवधींत ३००० पेक्षां जास्त मेंबर झाले असून सरासरी १५० मेंबरांस फायदा मिळाला आहे. लग्नफंडाची वर्गणी दर महिन्यास १। पासून ६। रु. पर्यंत आहे.

मरण-फंडाची वर्गणी फक्त १ रुपया आहे.

व या मरणफंडांतील मेंबरांच्या पश्चात् त्यांच्या वारसास २००० रुपयेपर्यंतची रक्कम फायद्यादाखल मिळेल. जास्त माहिती खालील पत्त्यावर एक आण्याचें तिकिट पाठविल्यानें मिळेल. [११–१२

आफीस–५
कावसजी पटेल स्ट्रीट,
फोर्ट, मुंबई.

परुळकर ॲण्ड कं०
एजंट्स.

प्रभाकर–रोजचें वर्तमानपत्र.

१८३९ त सुरू झालेलें. ७व्या दसऱ्यापासून व्यवस्थित रीतीनें व वक्तशीर प्रसिद्ध होतें. वर्षाची वर्गणी ट. ह. सह ९॥ रुपये.

मुकुंद बाळकृष्ण गुर्जर, बी. ए. म्यानेजर. गिरगांव—मुंबई.

व्यापारी व ग्राहक ह्यांकरितां.
हरएक प्रकारचा माल मुंबईत मिळणारा वक्तशीर बाहेरच्या लोकांस मिळण्याची सोय.

D. K. SANDU
RAMWADI, BOMBAY.

दत्तात्रेय कृष्ण सांडू ह्यांचे हरएक प्रकारचा माल मिळणारें, आणि माफक अडत घेऊन माल रवाना होणारें दुकान:—
रामवाडी, मुंबई.
वा. कृ. सांडू. दुकानदार—रामवाडी, मुंबई.

यांचा कदाचित् गुण नच आल्यास पैसे परत देऊंच.

मंत्रसिद्ध ताईत व दोरे.

हिमालयावरील एका महान् तपस्वी (सिद्ध) पुरुषानें आमच्या निःसीम भक्तीस तुष्ट होऊन आपला अत्यंत उपयोगी असा जो पिशाचबाधा व दुसरे अनेक विकार दूर होणारा अद्‌भुत मंत्र तो ताईत व दोरे मंत्रून देण्यास शिकविला आहे. व त्या योगानें खालील विकार फार त्वरित बरे होतात. पिशाचादि-पीडेनें मुलें, स्त्रिया किंवा पुरुष झोंपेंत अगर जागृतावस्थेंत घाबरतात, कंप सुटतो, वेड लागतें, दांतओंठ चावतात, दचकून उठतात, व कधीं ज्वरादि विकार उत्पन्न होतात आणि कित्येक प्रसंगीं अपस्मार, भ्रम वगैरे अत्यंत वाईट रोग उत्पन्न होतात. कित्येक स्त्रियांस पिशाचादि पीडेनें संतती होत नसते व झालीच तर वांचत नसते. कित्येकांस स्वप्नामध्यें स्त्रीचा भास होऊन धातुपात होतो; कित्येक स्त्रीपुरुषांमध्यें व कित्येक मित्रांमध्यें वैमनस्यें उत्पन्न होतात, इत्यादि अनेक विकार या आमच्या अद्‌भुत मंत्रसिद्ध ताईत व दोरे यांनीं फार त्वरित खात्रीनें बरे होतात. गुणाबद्दल हजारों सर्टिफिकिटा मिळाल्या व मिळत आहेत. थोड्याच काळांत याचे अपूर्व गुण या देशाच्या आसमंतात् भागीं ब्रह्मदेश, सिलोन, बनारस, पंजाब, मद्रास, मुंबई, कानडा, इत्यादि ठिकाणीं अतिशय पसरले आहेत. सबब जास्त वर्णन करीत नाहीं. सिद्धमंत्र खोटे ह्मणणारांनीं एकवार अनुभव घेऊन पहावा, ह्मणजे ते नेहमींच ग्राहक बनतील. पुरुषांचे विकारांस दोरा, किं० ८ आणे. स्त्रियांचे विकारांस ताईत १ रु०; रुप्याचा २ रु०; सोन्याचा ६; कित्येक रोगांस दोन वस्तू ध्याव्या लागतील. दोन वस्तू घेणारास ४ आणे, टपालखर्च माफ. एकवार अनुभवानेंच पूर्ण खात्री होईल. माहितीखर्डा सोबत पाठविला जाईल. व्ही. पी.नें. पाठवूं. पत्ता स्पष्ट व पूर्ण लिहावा.

विष्णुबोवा सिद्धमांत्रिक.
पत्ता—पोष्ट हर्णे, जिल्हा रत्नागिरी.

केरळकोकिळच्या वर्गणीदारांस मात्र किं. रु. ३ ट. ख. ८६.

मनुस्मृति मराठी भाषांतरसहित.

किं. रु. ५ ट. ख. ८६.

हा आर्यधर्माचा मुख्य व अतिप्राचीन ग्रंथ असल्यामुळें प्रत्येक हिंदूला पूज्य व संग्रह करणें फार अगत्याचें होय. त्यांत मराठी भाषांतराच्या योगानें तो सर्वांस समजण्यास सुलभ झाला आहे. ह्यांत ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यास हे आश्रम, व धर्म, संकीर्ण जाती व त्यांचे धर्म, राजकीय विचार, दायविभागादि न्याय, दिवाणी फौजदारी प्राचीन कायदे, प्रायश्चित्त इत्यादि विषय फार सुलभ रीतीनें कथन केले आहेत. सोनेरी सुरेख बांधणी. ठिकठिकाणीं सर्वटीकाधारानें टीपा दिल्या आहेत.

केरळकोकिळाच्या वर्गणीदारांस रु. १८१४ ट. ख. ८४.

वैद्यकशार्ङ्गधरसंहिता.

नवीन मराठी भाषांतरसहित.

पृष्ठसंख्या–५२७–किं. रु. २॥ ट. ख. ।।

" अर्वाचीन सर्व ग्रंथांमध्यें शार्ङ्गधरसंहिता अत्युत्तम होय. ह्यामध्यें सर्व विषयांची व्यवस्था जशी अनुक्रमानें लावलेली आहे तशी दुसऱ्या कोणत्याही ग्रंथांत केलेली आढळत नाहीं. ह्या ग्रंथांत जे प्रयोग लिहिले आहेत ते सारे अनुभव घेऊन त्यांचें यथार्थ गुणवर्णन केलें आहे. ह्यांत इतर ग्रंथांप्रमाणें औषधांची अतिशयोक्ति नाहीं. अशा प्रकारचा सर्वोत्तम लोकप्रिय ग्रंथ असून त्याच्या प्राकृत भाषांतरामध्यें–प्राकृत टीकाकाराचे स्वतः असोत किंवा लेखकाचे असोत जे प्रमाद झालेले आहेत त्यांची दुरुस्ती छापणारांनीं आजपर्यंत केलेली नाहीं. कित्येकांनीं तर कांहीं बाहेरचा ग्रंथच ह्यांत घुसडून दिला आहे. हे सर्व घोंटाळे काढून करवेल तितकें शुद्ध व सरळ भाषांतर केलें असून विषयानुक्रमणिकेशिवाय आजपर्यंत न झालेली रोगानुक्रमणिका दिली आहे. त्यामुळें कोणत्या रोगावर काय औषध हें झटकन् पाहिजे त्यास समजतें. प्रसिद्ध प्रसिद्ध अशा वैद्यांच्या सूचनेप्रमाणें ह्यांत शक्य ती सुधारणा केली आहे. व्ही. पे.नें पाठवूं.

जनार्दन महादेव गुर्जर, रामवाडी–मुंबई.